मंडन—हा मेवाडांतील सुप्रसिद्ध सुतार होय. यानें देवतामूर्तिप्रकरण, प्रासादमण्डन, राजवल्लभ, रूपमण्डन, वास्तुमण्डन, वास्तुशास्त्र, वास्तुसार व रूपावतार असे वास्तुशास्त्रावर ग्रंथ केले. याला उदेपूरच्या कुंभ राण्याचा आश्रय होता.

२. मंख कवीचा गुरुबंधु. पिता श्रीगर्भ. हा सर्व शास्त्रांत प्रवीण होता.

३. (स. १६६० सुमार) हिंदी कवि. हा बुंदेलखंडांतील मंगदसिंहाच्या दरबारीं होता. याच्या रसरत्नावली वगैरे पांच ग्रंथांचीं फक्त नांवें आढळतात. फक्त फुटकळ कविता प्रसिद्ध आहेत.

मंडनमिश्र—(सुरेश्वराचार्य पाहा).

मंडलिक यादव—(मृत्यु स. १४७२) हा गिरनार (सोरठ-काठेवाड दक्षिण) चा यादव (चूडासमा) राजा होय. याला राणा कुंभाची मुलगी रमाबाई दिली होती.

पृथ्वीराजानें याला प्राणभिक्षा देणें किंवा रामस्वामींच्या मंदिरप्रतिष्ठेच्या वेळीं याला बोलावणें या गोष्टी भाटांनीं कल्पिलेल्या आहेत. कारण महमूद बेगड्यानें पराभव केल्यावर स. १४७१ नंतर हा मुसलमान झाला होता. तसेंच राणा रायमल यास राज्य मिळण्यापूर्वी हा मेलाहि होता (स. १४७२). हा मेल्यावर किंवा मुसलमान झाल्यावर रमाबाई मेवाडांत आली असावी.

मंमट—(स. ९०३ सुमार) राजपुतान्यांतील हथुंडीचा राठोड राजा. हा मेवाडच्या दुसऱ्या भर्तृभटाचा समकालीन होता. याचा पुत्र धवल. महालक्ष्मी ही याची बहीण किंवा मुलगी भर्तृभटाची पत्नी होती.

माऊली-देव कदंब—हानगळ येथील कादंब घराण्यांतील दुसऱ्या जयवर्मा कदंबाचा मुलगा.

माऊली तैल कदंब—(तैल कदंब पाहा).

मागुत्त—हा गुत्त घराण्यांतील आद्य पुरुष होय. हा चंद्रगुप्ताचा समकालीन होता.

माघ—(स. ६२५ सुमार) सुप्रभदेवाचा पुत्र दत्तक आणि दत्तकाचा पुत्र माघ. हा श्रीमाल जातीचा गुजराथी ब्राह्मण होता. सुप्रभदेव हा गुजराथच्या भीनमाळ (श्रीमाल) येथील वर्मलात राजाचा मंत्री होता. दत्तकाला सर्व लोक सर्वाश्रय असें त्याच्या गुणावरून म्हणत असत. यानें 'शिशुपालवध' नांवाचें महाकाव्य संस्कृत भाषेंत केलें (माघ काव्यांतील वंशवर्णन). तें उपमा, अर्थगौरव आणि पदलालित्य यांमुळें प्रसिद्ध आहे.

वर्मलाताचा एक शिलालेख सांपडला आहे. अबू पर्वताच्या जवळ असलेल्या वसंतपूरचा हा राजा होता (एपिग्राफिका इंडिका, ९.१९१-१९२). या लेखांत वर्मलाताच्या सामंत वज्रभटानें क्षेमार्यचें मंदिर बांधल्याचा उल्लेख आहे. हा लेख वि. सं. ६८२ (स. ६२५) मधला आहे. याचा मंत्री सुप्रभदेव असावा. भीनपाळहि अबूपासून जवळच आहे. यावरून स. सातव्या शतकाच्या सुमारास हा झालेला असला पाहिजे हें उघड आहे.

चंद्रप्रभसूरीच्या प्रभावकचरित्रांत याचा चुलता शुभंकर श्रेष्ठी होता आणि त्याचा मुलगा सिद्ध यानें उपमितिभवप्रपंचाकथा लिहिली ही माहिती आणि मेरुतुंगाच्या प्रबंधचिंतामणींत दिलेली माघाची माहिती यांत मेळ नाहीं. भोजनप्रबंधांतील माहिती ऐतिहासिक दृष्ट्या अगदीच चुकीची आहे.

माघाच्या शिशुपालवधांत- 'अनुत्सूत्रपदन्यासा सद्वृत्तिः सन्निबंधना। शब्दविद्येव नो भाति राजनीतिरपस्पशा ॥' (२.११२) या श्लोकांत आलेल्या न्यास व वृत्ति यांच्या उल्लेखावरून आठव्या शतकाच्या उत्तरार्धांत माघाचा काळ ओढण्याचा जो प्रयत्न झाला आहे तोहि बरोबर नाहीं. कारण न्यास व वृत्ति अनेक असल्यामुळें त्याच्यावरून कालनिर्णय करणें बरोबर नाहीं (इंडि. अँटि. १.४६).

माचयनायमींगारू—(स.१३०३-३१) यास इम्मडी निःशंकवीर अशी पदवी होती. हा दुसऱ्या प्रतापरुद्राचा लष्करी अधिकारी होता.

माणकजी—(मृ. स. १७९२) हा प्रसिद्ध जहाजें बांधणारा लौजी नसरवाजीचा वडील मुलगा. याचा बाप मरण पावल्यावर, जहाजें बांधण्याचें काम यानें सुरू केलें. कोर्ट ऑफ डायरेक्टर्सनीं याला याच्या चांगल्या कामाबद्दल एक चांदीचा रूळ व मूल्यवान् शाल नजर पाठविली. यानें व याच्या बापानें ईस्ट इंडिया कंपनीच्या उपयोगाकरितां ९०० टन वजनाचीं दोन नवीन जहाजें तयार केलीं; व हीं जहाजें युरोपखंडांतील कोणत्याहि बंदरांत तयार केलेल्या जहाजांशीं बरोबरी करण्यासारखीं होतीं (ऐ. च. पृ. १२६-२७).

माणकोजी बोधला—(स. १६२५ सुमार) हा एक मराठी संत. हा सोलापूर जिल्ह्यांतील धामणगांवचा पाटील. याचें उपनांव जगताप असून, हा जातीनें मराठा होता. याच्या बायकोचें नांव ममताई व मुलाचें नांव यमाजी. याच्या संबंधीं कित्येक गोष्टी, चमत्कार वगैरे भक्तविजयाच्या ५३ व्या अध्यायांत वर्णिलीं आहेत.

याचें चरित्र याच्या जोतिराम नांवाच्या शिष्यानें अकरा अध्यायांत वर्णिलें आहे (मं.वा.इ. १८३७ ले.४).

माणकोजी दहातोंडे—(स. १६३७-४३) हा शिवाजीचा प्रारंभींचा सेनापति. स. १६३७ मध्यें शहाजी बंगळूरास राहूं लागला त्याच सालीं 'शहाजीनें आपले तर्फे दादाजी कोंडदेव मलठणकर यास सुभा सांगोन पुण्यास ठाणें घेतलें' (मराठी दप्तर, रुमाल ३ रा). तेथील बंदोबस्तासाठीं व व्यवस्थेसाठीं शहाजीनें शामराजपंत रांझेकर, बाळाजी हरि व हा यास शिवाजीसमवेत स. १६४१ च्या हिवाळ्यांत बंगळूरहून पुण्यास रवाना केलें. शिवाजीनें मावळे जमविले आणि यास स. १६४३ मध्यें पागेची सरनोबती दिली, आणि लोहगड विसापुरावर पाठविलें. तेथील ठाणेदार सीदी हिलाल हबशी सामोपचारानें किल्ला देईना. तेव्हां त्यास माणकोजीनें शहाजीकडे पाठवून दिलें व विसापूरचा ताबा घेतला (सीदी हिलाल पाहा).

माणिक्य—(अरिमर्दन पाहा.)

माणिक्यचंद्र—याची मम्मटाच्या काव्यप्रकाशावर टीका आहे (२ केशवमिश्र पाहा).

माणिक्यदेव—दिल्लीचा राजा. यानें 'उणादिसूत्रवृत्ति' हा ग्रंथ लिहिला. अलंकारशेखर करणारा माणिक्यचंद्र यापेक्षां वेगळा आहे.

माणिक्यदेवी—ही गोवें येथील कदंब घराण्यांतील त्रिभुवनमल्लाची बायको. हिला शिवचित्तदेव २ रा नांवाचा मुलगा होता.

माणिक्यनंदी—(स. ८०० सुमार) हा जैनधर्मी दिगंबरपंथी होता. यानें परीक्षामुखशास्त्र किंवा परीक्षामुखसूत्र नांवाचा जैन तत्त्वज्ञानावर ग्रंथ लिहिला.

मातब्बरखान सय्यद—(स. १६८८-१७०४) हा एक अरब सरदार कल्याणास वसती करून राहिलेल्या एका कुटुंबांतला होता. हा प्रथम नाशिक जिल्ह्यांत ठाणेदार असून मावळे, कोळी, भिल्ल इत्यादि लोकांत मिसळणारा होता व डोंगराळ प्रदेशाची याला माहिती होती. हरजी जाखरे नांवाचा एक हुशार मराठा याच्या हाताखालीं होता. स. १६८८-८९ या सालांत संभाजीचा अंमल ढिला पडल्यानें भराभर यानें अनेक किल्ले सर केले. पुढें कल्याणचा सुभेदार म्हणून हा नेमला गेला. औरंगजेबाच्या विश्वासांतील हा एक होता. हा स. १७०४ च्या मार्चांत मृत्यु पावला. यानें बांधलेल्या मशिदी वगैरेचे अवशेष अद्याप कल्याण येथें आढळतात (संभाजी पा. ८९-९०).

मातला (मात्ला) अनंत—विजयनगरच्या दुसऱ्या वेंकटपतिदेवराय आरविदूचा हा एक सेनापति होता. त्याचप्रमाणें हा कविहि पण होता. याला विजयनगरच्या राज्याचा उजवा हात समजत असत.

यानें 'काकुस्थविजयम्' हा पद्यात्मक ग्रंथ तेलगूमध्ये लिहिला आहे. शिवाय यानें पुष्कळ लिखाण लिहिले असून तें विद्वानांना मान्य आहे. तसाच हा मोठा शूर व लढवय्या होता. याचा तारिगोप्पुलदत्त मंत्री हा दुसऱ्या वेंकटपतिदेवराय आरविदूचाहि एक मंत्री होता.

मातंग किंवा **मातंगदिवाकर**—हा संस्कृत कवि. चांडाल जातीचा असूनहि हर्षवर्धनाच्या दरबारांत बाण व मयूर यांच्या जोडीनें बसत असे.

मातृगुप्त—(स. ५२८ सुमार) हा कवि काश्मीरचा राजा झाला होता. आणि तें राज्यपद याला उज्जयनीच्या हर्ष विक्रमादित्यानें दिलें होतें (रा. त. ३. १२९-१८९). हा हर्ष विक्रमादित्य म्हणजे मंदोसरचा यशोवर्मा विष्णुवर्धन असावा. पुढें प्रवरसेनानें आपलें काश्मीरचें राज्य मातृगुप्तापासून घेतलें.

यानें नाट्यशास्त्रावर वार्तिकासारखा कांहीं ग्रंथ केलेला होता असें राघवभट्टाच्या शाकुंतलटीकेवरून दिसतें (साहित्यशास्त्राचा इतिहास, पा. २५).

मातृदत्त—हा सत्याषाढश्रौतसूत्रांतील एकोणीस व वीस या प्रश्नांवरील टीकाकार आहे. वरील दोन प्रश्न गृह्यकर्माचे आहेत.

मादण्णा—(स. १६७७-खून स. १६८६) मादण्णा यास शिवाजीनें महादण्णा असें म्हटलें आहे (इतिहासमंजरी, पृ. ९७). पण फर्मानांत मादा किंवा मादो (सं. त्रै. व १३, अं. ४, पृ. ७२) असें म्हटलेलें आढळतें. याचें आडनांव पिंगळी असें होतें.

हा जातीचा ब्राह्मण होता. याच्या पित्याचें नांव भानुपंत. भानुपंत वारंगळ प्रांतांत हनुमकोंडा गांवीं राहत असे. तो तेथें मुलकी कारभार व करवसुलीचें काम पाहत असे. भागम्मा ही त्याची पत्नी होय. भानुपंत व भागम्मा यांस पुढीलप्रमाणें संतति झाली: १ अकण्णा, २ मादण्णा, ३ विसण्णा, ४ मृत्युंजय. यास एक मुलगीहि होती. तिचीं मुलें यंगण्णा ऊर्फ वस्तुमराव, आणि गोपण्णा ऊर्फ रामदास. ही मोठी शूर व कर्तबगार होती. मादण्णाचा पुतण्या पोडल लिंगाप्पा हाहि कर्नाटकाच्या सुभेदारीपर्यंत चढला. मादण्णाला एक मुलगा होता त्याची मुंज ता. ४ जानेवारी १६८२ रोजीं झाली व लग्न १२ आक्टोबर १६८२ रोजीं झालें. शेवटीं त्यास त्याच्या दाईनें अकण्णाचा एक हसन नांवाचा मित्र होता त्याच्या आश्रयास नेऊन वांचविलें.

याला हिंदी, फार्सी वगैरे भाषांचें चांगलें ज्ञान होतें. हा वयांत येतांच व व्यवहाराची चांगली माहिती झाल्यावर मोठ्या नोकरीच्या शोधार्थ हैद्राबादेस स. १६६० पूर्वीच आला. स. १६६० च्या सुमारास हा मीर जुम्लाकडे पोतदारीच्या कामाकडे असावा. अबुल हसन याचें अबदुल्ला कुत्बशहाच्या मुलीशीं लग्न घडवून आणण्यांत याच पोतदाराची मीरजुम्लानें नेमणूक केलीसें दिसतें. त्यामुळें अबुल हसनची व याची प्रथमपासूनच मैत्री जडली होती. यानें या वेळीं अबुल हसनवर मोठेच उपकार केले होते.

नंतर वाढत वाढत स. १६७२च्या सुरुवातीस हा सय्यद मुझावरखानाचा मुख्य पेशकार झाला. अबुल हसन २१ एप्रिल १६७२ रोजीं तख्तावर आला. त्या वेळीं मुझावरखानाबरोबर या पेशकारांनींहि बरीच मेहनत घेतली होती. स. १६७३ च्या जून महिन्यांत मुझावरखानाकडील मीर जुम्लतीचा कारभार दूर झाला व सरखेलीचें काम अबुल हसन स्वतःच पाहूं लागला. तेव्हां फर्मानें वगैरे काढणें तीं मादो भानजी 'परवानगीनें' काढूं लागला. स. १६७५ च्या अखेरीस मुझावरखानासहि दिवाणीवरून दूर केलें. त्या वेळीं याच्याकडे सर्व कारभार आला व 'सूर्यप्रकाशराव' असा याला किताब मिळाला. मादण्णा व अकण्णांनीं हैद्राबादेंत स. १६७६ च्या सुरुवातीस मोठा वाडा बांधला. १६ जानेवारी स. १६७६ रोजीं वाड्याचा मुहूर्त केला व तीन महिन्यांनीं घाईनें १० एप्रिल १६७६ रोजीं पूर्ण केला. मुसाखान व मुझावरखानाच्या स्पर्धेंत कर्नाटकाचा वसूल थकला व तिकडे बंडहि उठलें. प्रथम मादण्णानें त्याची व्यवस्था लावली. त्यांत आपले खात्रीचे व नातलग कारभारावर नेमले. धाकटा भाऊ विसण्णा यास सेनची बक्षीगिरी दिली. मृत्युंजयाला आपला कारभारी अगर पेशवा केलें. एका भाच्यास-यंगण्णास रुस्तुमराव असा किताब देवून दुय्यम सेनापति केलें. दुसरा भाचा गोपण्णा ऊर्फ रामदास यास भद्राचलमची तर्फदारी देवविली. पुतण्या पोडला लिंगाप्पा यास निरनिराळीं कामें देऊन शेवटीं कर्नाटकाची सुभेदारी दिली. स. १६७५-७६ मध्यें राज्यांत जिकडे तिकडे चांगली व्यवस्था व स्थिरस्थावर केल्यावर राज्याबाहेरच्या गोष्टीकडे हा लक्ष देऊं लागला.

या वेळीं आदिलशाहींत व कुत्बशाहींत पठाणांचें वर्चस्व होतें आणि त्यांचा ओढा मोगलाकडे होता. अशा वेळीं मोगलाच्या तडाख्यांतून दक्षिणी राज्यें वांचविण्याची मोठीच चिंता उत्पन्न झाली होती. मादण्णानें कुत्बशाहास पुढें करून शिवाजीच्या साहाय्यानें आदिलशाहींतील पठाणांचें प्राबल्य कमी केलें. या वेळीं खुद्द शिवाजी हैद्राबादेस आला होता. त्याला यानें मेजवानीस बोलावून साहाय्याचा करार केला होता (स. १६६७). पठाणांच्या जागा मराठ्यांना देऊन पठाण विरुद्ध दक्षिणी असा डाव उभा केला. आणि मोगलांविरुद्ध तीनचार वर्षें यशस्वीपणें तोंड दिलें. मादण्णा व अकण्णा यांच्या मसलती चालू आहेत तोंपर्यंत औरंगजेबाला दक्षिणेंत यशाची आशा दिसेना.

इकडे कुत्बशाहींतहि याचें वाढतें वर्चस्व सहन न होणारीं माणसें होतींच. अबुल हसनची बाजू घेतल्यानें मुलीचें व तिच्या नवऱ्याचें पारिपत्य करतांना तिची आई यांची कायमची शत्रु बनली. दुसरी बायको अबुल हसनच्या धनगरीण बायकांमुळें क्षुब्ध झाली होती. पठाणांना दूर केल्यानें तेहि नाखूष होते. सर्व दक्षिणी राज्यांचा गट केल्यानें मोगलांना याचें फक्त शिर पाहिजे होतें. पुढें कुत्बशाहानें शहाअलमशीं तह करतांच मोगलांनीं याच्याविरुद्ध गुप्त कट केला. मोगलांचा हस्तक यल्लमतराय व अबुल हसनच्या बायका जानी बेगम, सरूमादि बाया व इतर पठाण यांनीं कट केला. मादण्णाला कट समजला. मिनहाज नांवाचा कटवाल्यांचा पुढारी होता. परंतु मोगलांच्या सान्निध्यामुळें त्याचा याला नीट बंदोबस्त करितां आला नाहीं. यानें आपल्या जहागिरीचे कोलकुंडा, हसनाबाद व राजगोपाळपेठ हे तीन तर्फ आपल्या भावादिकांस दिले. जवळील संपत्तीहि दूर केली. अशा तऱ्हेनें कांहीं दिवस गेल्यावर एक दिवशीं हा राजवाड्यांतून काम आटोपून बाहेर पडत असतां दुपारीं अकराबाराच्या सुमारास ठार केला गेला. अबूल हसनला फार विषाद वाटला. कटवाल्यांनीं मादण्णा व अकण्णाचीं प्रेतें रस्त्यांतून फरफटत नेलीं. याच्या बायकामुलांस ठार केलें, घर जाळलें. मादण्णाचें शिर शहाअलमकडे पाठविलें, व शहाअलमनें तें १६ मार्च १६८६ इ. रोजीं औरंगजेबाकडे पाठविलें. याचा पुतण्या रुस्तुमराव यासहि ठार केलें. प्रथम जमशीदनें हल्ला केला. यानें संभाजीला व संभाजीनें याला मदत पाठविली होती.

याच्या नोकरीची सुरुवात वार्षिक शंभर होनांपासून झाली. शेवटीं वीस हजार सैन्य व तैनात ७५ हजार होनांपर्यंत चढली. त्याप्रमाणें यानें दानधर्म केला. काशीपासून रामेश्वरापर्यंत सदावर्तें व देवळें बांधलीं. तिरुपतीच्या यात्रेस सवडीनें जात असेच. हैद्राबादेस एक तळें व त्याच्या कांठावर विश्वेश्वराचें देऊळ बांधलें. तेथें हा रोज दोनदां दर्शनार्थ जात असे. औरंगजेबाला वाटत असलेल्या महत्त्वावरून याची योग्यता दिसून येते.

मादयगारी मल्लन्ना—(स. १६०० सुमार) भाषा तेलगू. याच्या काव्यांतील सर्वच भाग उत्तम आहे. याच्या काव्याचें नांव राजशेखरचरित्र. या कवीचीं कथानकें म्हणजे पुराणांतील राजे, राजकन्या, यक्ष वगैरे लोकांच्या कथा होत.

मादिराज—बसवपिता महादेवभट्टाचें नामान्तर.

माधव—(स. १६२५ सुमार) हरिहराचा भाऊ व मंडलेश्वरभट्ट आणि इंदुमती यांचा पुत्र. यानें एक सुभद्राहरण नांवाचें श्रीगदित लिहिलें आहे. यानें आपल्या ग्रंथास श्रीगदित म्हणण्याचीं जीं कारणें दिलीं आहेत तींच कारणें साहित्यदर्पणांत श्रीगदिताची व्याख्या करतांना दिलीं आहेत.

सुभद्राहरणांत जी एक वर्णनात्मक कविता आहे (५. १५) तिच्यावरून या नाटकाच्या प्रकारांत व छायानाटकांत बरेंच साम्य दिसून येतें. या नाटकांत अर्जुन सुभद्रेचें हरण करतो. अर्जुन यतीचा वेष घेऊन बलरामाच्या घरांत येतो, तेथें त्याची व सुभद्रेची गांठ पडते, आणि वसंतोत्सवाच्या वेळीं दोघेंहि घरांतून पलायन करतात. त्यांना मदत करण्यास कृष्ण आपला रथ पाठवितो. त्यास अटकाव करण्याची पहारेकऱ्यांची छाती होत नाहीं. आणि शेवटीं झाली ही गोष्ट बावगी झाली नाहीं अशी कृष्णहि सारवासारव करतो, त्यामुळें बलदेव व उग्रसेन हेहि त्यांच्या विवाहास अनुमति देतात. यावरून मराठी सौभद्राची कल्पना घतली असावी.

२. (स. १६५० सुमार) 'आयुर्वेदप्रकाश' या वैद्यक ग्रंथाचा कर्ता. हा साराष्ट (काठेवाड) देशांतील सारस्वत होता. यानें फिरंगरोग व भावमिश्राच्या भावप्रकाशाचा निर्देश केला आहे.

३. (स. १७०३ सुमार) रामदासी कवि. याचा मठ तंजावराकडे चित्तवंदूर म्हणजे त्रिवेंद्रम येथें आहे. हा राघवाचा शिष्य. समग्र महाभारत, रामायण, योगवासिष्ठ, गणेशपुराण इत्यादि याचे प्रचंड ग्रंथ आहेत (मं. शके १८३६ वा. इ. ले. ५६).

माधव ऊर्फ माधवमंत्री—(स. १३४७-८९) माधवामात्य, मादरस, माधवाचार्य, माधवांक, माधवराय, माधवनरपति इत्यादि नांवांनींहि याचा निर्देश शिलालेख व ताम्रपट यांत आढळतो. चौदाव्या शतकांतील हा एक उत्तम संस्कृत पंडित, रणधुरंधर व मुत्सद्दी होऊन गेला.

हरिहर राजा आपल्या बंधूंसह हस्तिनी नगरीचें (आनेगुंदीचें) राज्य चालवीत असतां, त्या बंधूंपैकीं युवराज मारप यानें पश्चिम दिशेस राज्य संपादून चंद्रगुप्ती येथें तो राज्य करीत होता. हा माधव त्याचा मंत्री होता. मारपाच्या राज्याचा हा कर्णधार होता. बुद्धिसामर्थ्यांत यानें बृहस्पतीलाहि मागें टाकलें होतें. याच्या गुरूचें नांव काशीविलास क्रियाशक्ति असें स. १३४७ च्या कातवल्ली गांवच्या ताम्रपटांत म्हटलें आहे (एपि. कर्ना. व्हा. ८, सोरब तालुका लेख नं. ३७५, पा. १३६-१३७). याच्या पित्याचें नांव चाउंड, मातेचें नांव माचांबिका आणि गुरूचें नांव काशीविलास क्रियाशक्ति. गोत्र आंगिरस. मारपरायाचा वडील भाऊ महाराजाधिराजपरमेश्वर व पूर्व-दक्षिण-पश्चिम समुद्राचा अधिपति पहिला बुक्क हा विजयनगरच्या मोठ्या सिंहासनावर अधिष्ठित असतां मारपाचा दिवाण असणारा हा माधव पहिल्या बुक्काचा मंत्री झाला. हा मोठा शैव होता. यानें मोठ्या त्वरेनें कोंकणांतील कित्येक प्रान्त जिंकले. याची उपनिषन्मार्गप्रतिष्ठागुरुः म्हणून लोकांनीं वाहवा केली. यानें बुक्कारायाच्या आज्ञेनें पश्चिम समुद्रापर्यंतच्या राज्याचा कारभार आपल्या शिरावर घेतला. गुरूच्या आज्ञेनें इष्टदेव जो त्र्यंबकनाथ त्याची शुद्ध शैवाम्नाय पद्धतीनें वर्षभर आराधना करून शा. श. १२९० कीळक संवत्सरांत कार्तिक कृ. ८ स व्रताचें उद्यापन केलें (नवंबर). या कृत्याकरितां यानें आपला देश काश्मीर येथून सत्पात्र ब्राह्मण आणून त्यांना कर्नाटकांतील नागरखंडान्तर्गत कांहीं जमीन विद्येश्वरपुर असें नांव ठेवून दिली. असें स. १३६८ मधील हारोमुच्चडी गांवच्या शिलालेखावरून कळतें (एपि. कर्ना. व्हा. ७, शिकारपुर तालुक, लेख नं. २८१, पा. २५६-२५७). यावरून हा काश्मीरी सारस्वत ब्राह्मण होता असें ठरतें.

यानें कोंकणांतील कांहीं भाग जिंकल्याचा वर निर्देश आला आहे. हा विजय स. १३६६ च्या अखेरीस झाला असें ठरतें. यानें गोवा नांवाची कोंकणाची राजधानी घेऊन तेथून तुर्क (बाहामनी सुलतान पहिला मुहम्मदशाहा याचा बुक्करायानें पराजय करून) लोकांना पिटाळून लावलें व तेथील सप्तनाथादि देव पुनः आपआपल्या जागीं स्थापिले असें आणखी एका ताम्रपटांत आलें आहे तेंहि वरील प्रसंगास उद्देशून आहे (JBBRAS व्हा. ४, पा. ११५). हारोमुच्चडी येथें श. १२९० कीळक, कार्तिक शु. १ च आणखी एक शिलालेख सांपडला आहे. त्यांत यानें काश्मीर ब्राह्मणाला दान देण्यासाठीं खरेदी केलेल्या भूमीचें कयपत्र आहे. त्यांत याचें नांव श्रीमन्महाप्रधान मादरस ओडियर असें दिलें आहे. मादरस म्हणजे माद राजा. माधवराज याचें हें कानडी रूप आहे (एपि. कर्ना. व्हा. ७, शिकार-

पूर तालुका लेख नं. २८२, पा. २५७). स. १३६८ मध्यें (श. १२९०) बीर बुक्कराय हस्तिनावतीपुरांत (आनेगुंदींत) राज्य चालवीत असतां त्याचा महाप्रधान माधवांक १२००० बनवासेचा कारभार करीत होता (JBBRAS व्हा. १२, पा. ३४०). तसेंच बाळेहुन्नरच्या स. १३६९ च्या (श. १२९० माघ) शिलालेखांत मादरस वोडेयर आरग वंगेरे तालुके असलेल्या प्रांताचा कारभार करीत होता (एपि. कर्ना. व्हा. ६, कोप्प तालुके शि. ले. नं. ६, पा. १६७). तेथेंच वीरभद्राच्या देवळांत मादरस प्रधानाला दान दिल्याचा लेख आहे (Annual Report of the Mysore Arch. Dep., १९१६, पा. ५६). स. १३७७ च्या बेचिराख सादगळ्ळे गांवच्या शिलालेखांत दुसरा हरिहरराय राज्य चालवीत असतां प्रधान मादरस ओडेयर आरग, गुत्ती व मळेदेशांतील इतर प्रांतांचा कारभार करीत होता (एपि. कर्ना. व्हा. ७, शिकारपूर तालुक लेख नं. ३५, पा. ९२). स. १३८० (श. १३०२ वैशाख) उद्धरे (उद्रि) गांवच्या शिलालेखांत पुढील माहिती आढळते. दुसरा हरिहरराय राज्य चालवीत असतां त्याचा सेवक माधवराय किंवा माधव नरपति कोंकण देशचा कारभार करीत होता. हा जळांबे गांवांत राहत होता. या वेळीं कोंकणांतील कांहीं लोक याच्याविरुद्ध उठले. तेव्हां युद्ध झालें. त्या लढाईंत १२००० बनवासींतील उद्धरे गांवचा शूर योद्धा बैचप्प कोंकणी लोकांशीं निकरानें लढून त्यानें पुष्कळ लोकांचा संहार केला व शेवटीं तो स्वर्गास गेला (एपि. कर्ना. व्हा. ८, सोरब तालुक लेख नं. १५२, पा. ५२).

स. १३८४ च्या भोगार कोप्प गांवच्या शिलालेखांत (श. १३०७ श्रावण) दुसऱ्या हरिहररायाचा महाप्रधान माधवमंत्री यानें कांहीं ब्राह्मणांस भूमिदान दिलें (एपि. कर्ना. व्हा. ८, तीर्थहल्लि तालुक लेख नं. १४७,पा. ३४५). तसेंच स. १३८९ च्या हिरे आवली गांवच्या शिलालेखांत (श. १३११ कार्तिक) दुसऱ्या हरिहररायाच्या कारकीर्दींत महाप्रधान मंत्री शिरोमणि मादरस ओडेयरच्या काळीं हिरियचंदप्प नांवाच्या जैनानें संन्यसनविधीनें प्राण सोडून स्वर्ग जोडला (एपि. कर्ना. व्हा. ८, सोरब तालुके लेख नं. ११६, पा. ३०).

वरील माहितीवरून हा स. १३४७–१३८९ पर्यंत ४२ वर्षे विजयनगरच्या दरबारांत मारप पहिला, बुक्क व दुसरा हरिहर यांचा महाप्रधान होता हें स्पष्ट होतें. यावरून याचा विजयनगरशीं संबंध यापूर्वीच आला असावा. स. १३८९ च्या नवंबरानंतर याचा विश्वसनीय उल्लेख सांपडत नाहीं. यावरून बहुधा त्या वर्षाच्या अखेरीस हा मृत्यु पावला असावा. असें असतां स. १३९१ (श. १३१३) मधील तीन ताम्रपट याच्या नांवावर आढळतात. त्यांचीं नांवें कुच्चर, मांचलापूर व चौडलापूर अशीं गांवांवरून ठेवतां येतील, पण त्यांतील मिति व मजकूर चुकीचा असल्यानें ते बनावट आहेत असें ठरतें.

मारपरायाचें प्रधानपण चालवीत असतांनाच यानें सूतसंहितेवर तात्पर्यदीपिका नांवाची टीका रचली असावी. या टीकेंत यानें आपलें नांव माधवमंत्री व माधव आर्य, इष्टदेवाचें नांव त्र्यंबक व गुरूचें नांव काशीविलास क्रियाशक्ति असें देऊन स्वतःला वेदशास्त्रप्रतिष्ठाता व उपनिषन्मार्गप्रवर्तक या पदव्या लावल्या आहेत (सोर्सेस ऑफ दि विजयनगर हिस्टरी, पा. ५१–५२); (वि. वि. ६३–४ पा. १४१–१५४).

माधवकर—हा निदानकार इंदुकाराचा मुलगा. हा बंगाली होता. याचा 'रुग्विनिश्चय' नांवाचा ग्रंथ प्रसिद्ध आहे.

माधव गंग—(स. ४७०) हा विष्णुगोप पश्चिम गंगाचा पुत्र. यास सिंहवर्मन् असें म्हणत. स्कंदवर्मन् पल्लवानें यास गादीवर बसविलें. याला बनवासीच्या सिंहवर्मा कदंबाची मुलगी दिली होती.

माधव गुप्त—(स. ६२८–५५) हा माळव्याच्या गुप्त घराण्यांतील महासेन गुप्ताचा मुलगा.

माधवदास—हा वासिष्ठ ग्रंथाचा टीकाकार.

२. (जन्म स. १७२१) यानें भागवताचा दशमस्कंध व रुक्मिणीहरण या विषयावर मराठी कविता लिहिली आहे. याची कविता मध्यम आहे.

माधवनंदन—(स. १८२७–३९) हा मराठी कवि. रघुनाथ चिंतामणपंत सचीवाचा हा आश्रित होता. याचें दशरथकौसल्याविवाहावर एक मराठी काव्य आहे (मं. वा. इ. १८३७ ले. १३३).

माधवभट्ट—(स. १६०६ सुमार) केशवमिश्राच्या तर्कभाषेवरील 'तर्कभाषाविवरण' नांवाच्या टीकेचा कर्ता.

माधवराय—' चंद्रिकापरिणय ' नांवाच्या संस्कृत नाटकाचा कर्ता. हा तेलंगी ब्राह्मण आनेगोंदीच्या राजाचा मंत्री होता.

माधवराव आनंदराव रास्ते—(मृत्यु स. १८२६) रास्ते घराण्यांतील आनंदरावाचा हा दत्तक पुत्र होय. हा खर्ड्याच्या लढाईत होता. हा परशुरामभाऊस सामील आहे या संशयावरून बाजीरावानें याला स. १८०० त कैदेंत ठेविलें व सरंजाम जप्त केला. पण पुढें स. १८०२ त

जप्ती मोकळी करून यांस सोडलें. पुढें हा इंग्रजांचा पक्षपाती म्हणून पेशव्यांनीं याचा सर्व फौज सरंजाम जप्त केला (स. १८१४). परंतु एल्फिन्स्टननें स.१८१७त जप्ती खुली केली.

माधवराव जाधवराव—हा दे. कृ. ब्राह्मण नानाचा वकील असून पुण्यास इंग्रजांकडे होता. सखारामबापू, कृष्णराव बल्लाळ व माधवराव जाधवराव यांनीं दादातर्फे मध्यस्थी करून नाना व दादा यांनीं एकविचारें कारभार करावा असें ठरविलें.

माधवराव नगरकर—हा नगरचा किल्लेदार होय. जेव्हां मोरोबानें नगर येथें फितुरी चालविली तेव्हां यानें चारदोघांचीं डोकीं फोडून लगोलग बंदोबस्त केला.

माधवराव पेशवे—(जन्म स. १७४५-फेब्रु. १६,–मृत्यु स. १७७२ नवं. १८) हा बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब पेशवे व गोपिकाबाई यांचा दुसरा मुलगा. याचा थोरला भाऊ विश्वासराव हा पानपतच्या लढाईंत मारला गेला. हा सावनूर येथें जन्मला. सोळाव्या वर्षी यास पेशवाईचीं वस्त्रें मिळालीं (ता. २०-७-१७६१). याच वेळेस नीळकंठ महादेव ऊर्फ आबा पुरंदरे यास दिवाणगिरीचीं व मुतालिकीचीं वस्त्रें देण्यांत आलीं.

उदगीरच्या लढाईंत निजामाचा पराभव झाला, त्यांत ४५ लक्षांचा सरंजाम पेशव्यांना मिळाला आणि तह झाला (पे. द. २५.२७४). पण पानपताच्या पराभवामुळें निजामानें पुनः वर डोकें काढलें. राघोबा मेदकच्या स्वारीस निघून निजामाच्या मुलखांत फेरफटका करून आल्यावर नानासाहेब वारले आणि निजामानें मराठ्यांच्या मुलखावर चाल केला. अत्याचार करीत निजाम उरुळीपर्यंत आला. इतक्यांत चांभारगोंद्याच्या जवळ त्याचे एकदोन पराभव झाले. रामचंद्र जाधव व निजामाचा भाऊ मीरमोगल हे मराठ्यांना सामील झाले. उरुळीजवळ तो कोंडला जातांच फक्त वरील दोघांच्या जहागिरीचा चाळीस लक्षांचा मुलूख ताब्यांत घेऊन बापू व दादा यांनीं तह कला (रा. खं. १०.२). पण असा तह केल्यामुळें सखारामबापूस कारभारांतून अंग काढून घ्यावें लागलें आणि राघोबा व माधवराव यांत विरोध वाढला. दोघांची घोडनदीस लढाई होऊन बापूच्या कुशलतेमुळें याला राघोबाच्या स्वाधीन व्हावें लागलें (स. १७६२ नवं.). या वेळां निजामानें मदत केली म्हणून उदगीरच्या वेळीं घेतलेली ४५ लक्षांची व उरुळीच्या तहाच्या वेळची चाळीस लक्षांची मिळून ८५ लक्षांची जहागीर निजामाला परत देण्यांत आली (पु. द. ३.१७).

पण यामुळें निजामाला जोर आला, आणि गोपाळराव पटवर्धन वगैरेंच्या उत्तेजनानें त्यानें पुण्यासकट पुष्कळसा मुलूख जाळला व लूटहि मिळवली. पण त्यामुळें राघोबा व माधवराव यांची पुनः जूट होऊन यांनींहि हैद्राबादेपर्यंत मुलूख जाळला व लूट केली. शेवटीं राक्षसभुवन येथें लढाई होऊन निजामाचा पूर्ण पराभव झाला, आणि त्यांत त्याचा दिवाण विठ्ठल सुंदर मारला गेला आणि ८२ लाखांच्या मुलुखावर पैठण येथें तह झाला (स. १७६३ आगष्ट). यानंतर निजामानें खर्ड्याच्या लढाईपर्यंत विशेष गडबड केली नाहीं. यामुळें याला पुढें कर्नाटकाच्या मोहिमेकडे निर्वेध लक्ष देतां आलें.

यानें कर्नाटकांत एकंदर पांच स्वाऱ्या केल्या. पहिल्या स्वारींत धारवाडपासून तुंगभद्रेपावेतों खंडण्या घेऊन हा परत आला (स. १७६२ जाने. जून). दुसऱ्या स्वारींत यानें तुंगभद्रेपर्यंत प्रदेश काबीज केला. सावनूर, धारवाड, रट्टेहळ्ळी, हावेरी व अनवडी येथें प्रचंड लढाया दिल्या. शेवटीं अनंतपूरचा तह होऊन हा परत आला (स. १७६४ जाने.–स. १७६५ जून). तिसऱ्या स्वारींत तुंगभद्रेचें दक्षिणतीर काबीज केलें, तसेंच शिरे, होसकोटे, बाळापूर वगैरे जुनीं स्वराज्याचीं स्थळें काबीज केली (स. १७६६ नवं.–स. १७६७ जून). चवथ्या स्वारींत तुंगभद्रेचें दक्षिणतीर काबीज केलें. भैरवदुर्ग व निजगळ यथील निकराचे प्रसंग झाले. पटवर्धनांचें शौर्य व मुरारराव घोरपड्याचा बचाव या गोष्टी घडल्या (स. १७६९ नवं.–स. १७७० जून). पांचव्या स्वारींत हा हजर नव्हता. ती स्वारी त्रिंबकराव पेठ्यांनीं चालविली. तेव्हां गोपाळराव पटवर्धनांचा मृत्यु, गुर्दमकोंडा, कोलार, मोतीतलाव येथील भयंकर लढाया व श्रीरंगपट्टणचा कायमचा तह या गोष्टी झाल्या (स.१७७० जून–स. १७७२ जून). यांपैकीं पहिल्या चार स्वाऱ्यांत हा स्वतः हजर होता. पानपतानंतर हैदर उदयास आला, आणि त्याला तडफेनें याला तोंड द्यावें लागलें. राज्याची आर्थिक सुस्थिति या दक्षिणेकडील मुलखावरच अवलंबून होती.

निजाम व कर्नाटक यांची व्यवस्था लावीत असतांच घरांतल्या रघुनाथरावाची आणि जानोजी भोसल्यासारख्या शत्रूशीं संगनमत करणाऱ्या माणसांचींहि याला व्यवस्था लावावी लागली. प्रथम खोलेश्वराचा आणि नंतर कनकेश्वराचा तह (स. १७६९) करून यानें जानोजीला पूर्ण

लगामां लावलें (१ जानोजी भोसले पाहा). यापमाणें जरूर तथें युद्ध करून निवा प्रांतांची देवघेव करून सर्व दक्षिण निर्बंध करण्याचा यानें यशस्वी प्रयत्न केला. सरदारांतील फाटाफुटीच्या धोरणास आळा घातला आणि वसूलखंडण्या वेळच्यावेळीं वसूल करून आर्थिक स्थिति खंबीर केली.

हिंदुस्थानांत सत्ता गाजवावयाची असल्यास दिल्लीवर नजर ठेवावी लागत. पूर्वी पानपतावर मराठ्यांची नाचक्की झाली होती ती नाहींशी करण्याची जबाबदारी याच्यावर होती. तींहि पार पाडण्याकरितां रामचंद्र गणेश कानडे व विसाजी कृष्ण बिनीवाले या दोन सेनानायकांची यानें योजना केली; आणि त्यांनींहि पराक्रमानें दिल्ली काबीज करून दिल्लीच्या किल्ल्यावर मराठ्यांचें निशाण चढविलें (फेब्रु.), व इंग्रजांच्या आश्रयास असणाऱ्या दुसऱ्या शहाआलम बादशहास दिल्लीच्या तक्तावर बसविलें (स. १७७१ डिसें.); आणि बादशहाची शिकेकट्यार मराठ्यांच्या ताब्यांत आली. महादजी शिंदेहि या स्वारींत होता.

दहा वर्षांच्या आंत मराठ्यांचें वर्चस्व दिल्लींत पुनः प्रस्थापित झालें. यांनीं पाठविलेल्या सेनापतींच्या पराक्रमांचीं वर्णनें ऐकून याला इतका आनंद झाला की यानें त्यांना सोन्यारुप्याचीं फुलें उधळीत पुण्यांत आणावें अशी आज्ञा केली होती.

असा हा पराक्रमी व कर्तबगार पेशवा क्षयाचे विकारानें थेऊर येथें वारला (शके १६९४ कार्तिक व. ८). रमाबाई सती गेल्या.

निजामानें पुणें जाळलें तेव्हां यानेंच पुण्याची पुनः मुहूर्तपूर्वक रचना केली (स. १७६९); आणि पेठा वगैरे वसाविल्या. सरदारांवर चौथाई कर्जफेडीकरितां बसविली.

रघुनाथराव याला सारखा त्रास देई. घोडनदीच्या लढाईनंतर धोंडपंच्या लढाईंत त्यास पकडून यानें कैदेंत टाकलें (स. १७६८ जून). तथापि तो अंधे राज्य मागून सारखा उपद्रव देई. हाहि खुबीनें त्याला व त्याच्या सल्लागारांना ताब्यांत ठेवी (रघुनाथराव पेशवे व सखारामबापू पाहा). तथापि या अल्पवयी पेशव्याला अयोग्य उपायांचीहि योजना करावी लागली. कांहीं अपमानकारक शब्द उच्चारल्यानें गंगाधर यशवंत चंद्रचूडाला यानें भर दरबारांत चाळीस कमच्या मारल्या, असें बखरींत लिहिलें आहे. दिनकर महादेवाच्या बाबतींतहि यानें असंच पोरकर व बेइज्जतीचें वर्तन केलें होतें. पुरंदरे यांचा पुरंदरचा किल्ला घेण्याकरितां यानें केलेलें कारस्थान पाहिलें म्हणजे याच्या अंतःकरणाची कल्पना येते (पु.द. ३प्रस्ता.). यामुळें याचें कोणाशीं खरें रहस्य नसे.

याच्या वेळीं राजकारणांत वावरणारी एक नवी पिढी उत्पन्न झाली. त्यामध्यें सर्व जातींच्या लोकांचा भरणा दिसतो. तथापि दूरदृष्टि नसलेल्या पटवर्धन व रास्ते यांची यावर विशेष छाप होती. देशस्थ-कोंकणस्थ वादासारखे घातक वाद याच्या वेळा उघडपणें वावरूं लागलेले दिसतात. या वेळीं तयार झालेल्या लोकांत उच्च दर्जाचा राजकारणी किंवा ध्येयवादी कोणीहि झाला नाहीं. जीं दोनतीन माणसें पुढें वावरत होतीं तींहि जुन्या पिढीतीलच होत. यानें दारुगोळा तयार करण्याचा प्रयत्न केला, तरी शास्त्रीय ज्ञानाच्या अभावामुळें परावलंबीपणा नष्ट झाला नाहीं.

२. (सवाई) (स. १७७४-१७९५) नारायणराव पेशवा मारला गेल्यावर त्याची गरोदर पत्नी गंगाबाई हिला राघोबा व आनंदीबाई यांच्या भीतीमुळें बारभाईंनीं पुरंदर किल्ल्यावर बंदोबस्तांत ठेविलें होतें. तेथेंच सवाई माधवरावाचा जन्म झाला (१८ एप्रिल); व नंतर ४० दिवसांनीं याला पेशवाईचीं वस्त्रें मिळाला.

सवाई माधवराव व गंगाबाई हे खासे आणि नाना व बापू कारभारी या चौघांना कैद करण्याचा कट राघोबाच्या पक्षानें केला, पण तो फसला. तेव्हां इंग्रजांच्या मदतीनें राघोबानें पेशव्यांशीं भांडण सुरू केलें, आणि मराठी साम्राज्यांत दुसऱ्या अनेकांनीं बंडाळी केली, पण त्या सर्व संकटांचा परिहार नानांनीं केला.

सवाई माधवराव सव्वातीन वर्षांचा असतां गंगाबाई वारली (जुलै स.१७७७). यापुढें याचें संगोपन सदाशिवरावभाऊची बायको पार्वतीबाई हिनें केलें. १७७९ सालीं सवाई माधवरावाची मुंज पुणें येथें पर्वतीवरच मोठ्या थाटानें करण्यांत आली. पुढें स.१७८३ च्या फेब्रुआरींत याचें लग्न टोकेकर थत्ते यांच्या कन्येशीं होऊन तिचें नांव रमाबाई ठेवण्यांत आलें. पेशव्यास लेखन व वाङ्मयाच्या शिक्षणासाठीं महादजीपंत गुरुजीस ठेवण्यांत आलें. पेशव्यासाठीं पौराणिक व ऐतिहासिक बखरी रचण्यांत आल्या होत्या, व भौगोलिक माहिती शिकविण्यासाठीं एक युरोपीय शिक्षकहि ठेवण्यांत आला होता. नानातऱ्हेचे खेळ खेळण्याची व्यवस्था नानांनीं केली. खबुतरें, पोपट, मैना, चंडोलपक्षी, बदकें, पाणकोंबडीं, मोर वगैरे पक्षी; ससे, हरणें, काळवीट, चित्ते, वाघ, गेंडे, एडके वगैरे पशू; आणि कुस्त्या खेळणारे पहिलवान, वज्रमुष्टी, मल्ल, दांडपट्टा व तिरंदाजी खेळणारे इसम बाळगण्यांत आले. घोड्यावर

बसणें, हत्ती चालविणें, बोथाटी व लेजीम खेळणें, तिरंदाजी करणें, वगैरे गोष्टी पेशव्यास शिकविण्यांत आल्या.

गंगापुर येथें नानासाहेब पेशव्यांची बायको गोपिकाबाई राहत होती. तिचा वृद्धापकाळ झाल्यामुळें तिच्या भेटीस सवाई माधवराव स. १७८८ च्या मार्चमध्यें गेला. यापुढें राज्यकारभारांत हा थोडथोडें लक्ष घालूं लागला. घाशीराम कोतवालाची गोष्ट, ब्राह्मणांस कोंडून ठेवल्यामुळें घाशीरामास देहांत शिक्षा झाल्याची घडून आली. स.१७९१ सालीं कन्यागत असल्यामुळें पेशवे वाईस जाऊन नंतर साताऱ्यास छत्रपति महाराजांच्या भेटीस गेले. उत्तरहिंदुस्थान पूर्णपणें ताब्यांत घेतल्यावर स. १७९२ सालीं महादजी शिंदे यांनीं पुण्यास येऊन नानाकडे असलेलें कारभारीपण स्वतःस मिळण्याची अप्रत्यक्षपणें खटपट पेशव्याजवळ केली. स. १७९४ सालीं पहिली बायको वारल्यानें याचें दुसरें लग्न गणेशपंत गोखले यांच्या मुलीशीं झालें. तिचें नांव यशोदाबाई ठेवण्यांत आलें. याच सुमारास शनवार वाड्यांतील कोठी व सातमजली बंगला जळाला.

राघोबाचा मुलगा बाजीराव जुन्नर येथें बंदींत होता. त्यानें पेशव्याशीं गुप्त पत्रव्यवहार सुरू केला. हें नानाफडणीसास समजतांच त्यानें याचा निषेध केला. या व इतर प्रकरणांत याचें नानाशीं जमत नाहींसें झालें. त्याचा परिणाम मनावर होऊन हा ज्वर व वात यांनीं आजारी पडला. स. १५ आक्टोबर १७९५ रोजीं वाताचा झटका होऊन त्या भरांत शनवारवाड्यांतील गणपतीच्या दिवाणखान्याच्या पूर्वेकडील खिडकींतून यानें खालीं उडी टाकली; ती हौदांतील कारंज्यावर पडून दोन दिवसांनीं याचा अंत झाला.

खर्ड्याच्या लढाईंतील जय हीच काय ती याच्या कारकीर्दीतील महत्त्वाची गोष्ट होय.

माधवर्मन्—(स. ५५० सुमार) यानें बोलस्वामिन् व केशवस्वामिन् या दोन सनातनधर्माप्रमाणें चालणाऱ्या व सामवेदी ब्राह्मणांना कृष्णावेण्णेच्या पूर्व-दक्षिणेस असलेलें 'रेट्टरक' (रेटरें बुद्रुक, जि. सातारा) हें गांव दान दिलें (वैशाख शु. १५). दानपत्र लिहिणारा श्रीपाल कायस्थ. हें दानपत्र उपलब्ध असून स.च्या सहाव्या शतकांतील असावें (मं. त्रै. ८.३, पा. १६३-१६५).

माधव शुक्ल—(ग्रंथकाल स.१६५५) याचा 'कुंडकल्पद्रुम' नांवाचा ग्रंथ प्रसिद्ध आहे. हा ग्रंथ संस्कृतमध्यें असून यांत १३५ श्लोक आहेत. हा काश्यपगोत्री औदिच्य ब्राह्मण होता. याचा वंश यानें पुढीलप्रमाणें दिला आहेः गोविंद-व्यासनारायण-कूक-माधव.

माधव सरस्वती-गंगाधरसरस्वतीच्या सात शिष्यांपैकीं एक.

२. हा 'तत्त्वानुसंधान' ग्रंथाचा कर्ता.

माधवसिंहराज कच्छप—(स. १६०५ सुमार) हा भगवानदास कच्छपाचा मुलगा. याला मानसिंग नांवाचा भाऊ होता. रागमालेचा कर्ता पुंडरीक विठ्ठल व पत्रप्रशस्तींचा कर्ता दलपतिराय हे याचे आश्रित होते. हा संगीताचा भोक्ता असून अकबराच्या मर्जीतील होता.

माधवसुत—यानें भागवताचा दशमस्कंध मराठींत लिहिला.

२. रुक्मिणीस्वयंवर या मराठी ओवीबद्ध ग्रंथाचा कर्ता (मं. त्रै. १२. २, ले. २०).

माधवसेन सेन—बंगाल्यांतील लक्ष्मणसेनाचा पुत्र. याच्या वेळीं सेन घराण्याचें महत्त्व नष्ट झालें.

माधोसिंग—(ईश्वरसिंग पाहा).

माधवाचार्य—(माधव ऊर्फ माधवमंत्री पाहा).

२. (मृत्यु स. १३७२ सुमार) याला माधवाचार्य, माधवामात्य व मादरस असेंहि म्हटलेलें आढळतें. हा जाडा संस्कृत-पंडित व धार्मिक बाबतींत पुढाकार घेणारा वजनदार माणूस होता. यानें बरेच संस्कृत ग्रंथ रचल्याची आख्यायिका आहे. त्यांत पराशरस्मृतिव्याख्या (पराशरमाधव), व्यवहारमाधव, जीवन्मुक्तिविवेक, कालमाधव व जैमिनीय न्यायमालाविस्तार हे प्रमुख होत.

कालमाधवाच्या व पराशरमाधवाच्या प्रारंभीं याची पुढील माहिती आढळतेः 'याचें नांव माधव, माधवार्य किंवा माधवामात्य होय. आईचें नांव श्रीमती व बापाचें नांव मायण होय. सायण व भोगनाथ हे याचे धाकटे भाऊ होत. भारतीतीर्थ व विद्यातीर्थ हे याचे गुरु होत. श्रीकंठ हा याचा तिसरा गुरु दिसतो. याचा धाकटा भाऊ भोगनाथ याचाहि गुरु श्रीकंठ असून महागणपतिस्तव नांवाच्या स्तोत्रांत त्यानें त्याची पुष्कळ स्तुति केली आहे. श्रीकंठश्च गुरुः परेऽपि गुरवो लोकत्रये त्वद्भुतम् (इंडि. ॲंटि. भा. ४५, पा. ३). भोगनाथाचा यजमान दुसरा संगम याचाहि गुरु श्रीकंठनाथ होता, असें बिट्टुंटच्या स. १३४६ च्या ताम्रपटावरून दिसतें (एपि. इंडि. भा. ३, पा. २६). श्रीकंठ शब्दाचा शंकर असाहि अर्थ होतो. हा कृष्णयजुर्वेदापैकीं बौधायनसूत्राचा भारद्वाजगोत्री ब्राह्मण होता. तसेंच बुक्कराजाच्या साम्राज्याचा भार वाहणारा अमात्य होता. यानें बुक्काखेरीज कोणाचाहि

आश्रयदाता म्हणून उल्लेख केलेला नाहीं. बुक्काच्या हातांत पूर्ण सत्ता त्याचा वडील भाऊ पहिला हरिहर मरण पावल्यानंतर आली. त्या वेळीं म्हणजे स. १३५५ च्या सुमारास यानें पराशरमाधव लिहिला असावा, व प्रायः विस्तृत माहिती दिली असल्यामुळें याचा तो पहिला ग्रंथ असावा.

व्यवहारमाधव, जीवन्मुक्तिविवेक, व कालमाधव हे तीन ग्रंथ पराशरमाधवाला पुरवणीसारखे आहेत असें म्हटलें असतां चालेल. विद्यारण्य व हा एकच अशा कल्पनेनें जीवन्मुक्तिविवेक ग्रंथाच्या कांहीं हस्तलिखत व मुद्रित प्रतींत विद्यारण्यस्वामिकृत असे किंवा अशा अर्थाचे शब्द घडले आहेत, ते लेखकांच्या गैरसमजुतीनें चुकीनें पडले आहेत असें दिसतें. कालमाधव ग्रंथांत अधिक मासाची माहिती दिली आहे, त्यावरून हा ग्रंथ श. १२८१ ज्येष्ठ (स. १३५९) नंतर लवकरच लिहिला असावा असें दिसतें.

पराशरमाधव व त्याला पुरवणीदाखल असणारे वरील ग्रंथ लिहून झाल्यावर स्मार्त ग्रंथ सोडून श्रौताकडे यानें आपली नजर फिरविली आणि जैमनीय न्यायमालाविस्तार हा ग्रंथ लिहिला, असें यानें न्यायमालाविस्ताराच्या प्रस्तावनेंत लिहिलें आहे. तेथेंच यानें भारतीतीर्थ यतींची कृपा असल्यामुळें हा ग्रंथ आपण रचला. बुक्कहि विद्यातीर्थ मुनींच्या कृपेनें सर्वज्ञ झाला. आपण बुक्काचे कुलगुरु व मंत्री आहोंत; आपण 'सर्वशास्त्रविशारद' आहोंत, तसेंच आपण प्रतिवर्षी वसंतऋतूंत सोमयाग करतों, असें यानें लिहिलें आहे. हा ग्रंथ स. १३६० मध्यें लिहून झाला असावा. संक्षेपशंकरजय या नांवाचा माधव नांवाच्या कवीचा ग्रंथ शंकरदिग्विजय या नांवानें आनंदाश्रमांत छापला आहे. पण तो माधवाचार्य किंवा विद्यारण्य यांपैकीं कोणाचाहि नाहीं.

सायण याचा सख्खा भाऊ असून त्यानें आपल्या सुभाषितसुधानिधि ग्रंथांत याला कल्पतरूची उपमा दिली आहे.

सायणानें लिहिलेल्या धातुवृत्तीला माधवीया असें विशेषण याचा सन्मान करण्याकरितां लावलेलें दिसतें.

बुक्करायानें याला वेदार्थ सांगण्याविषयीं आज्ञा केली. तेव्हां सायण त्या कामांत निपुण असल्यामुळें त्यालाच तें काम देण्यासाठीं माधवाचार्यानें विनंति केली. त्याप्रमाणें सायणाकडे तें काम सोंपविण्यांत आलें (कृष्णयजुःसंहिताभाष्य-प्रस्तावना). स्वतः माधवाचार्यानें वेदभाष्याचा कांहीं भाग रचला असावा. निदान प्रारंभ यानें केला असावा. कदाचित् सायणाकडून पुरुषार्थसुधानिधि लिहून पुरा होण्यास थोडा अवकाश असल्यामुळें, वेदार्थ समजाऊन घेण्याची बुक्करायाची उत्कण्ठा पाहून यानें वेदभाष्याचा आरंभ व नामकरण केलें असावें. याचा पुरावा कृष्णयजुःसंहिताभाष्याच्या उपोद्घातांतील व पहिल्या काण्डाच्या कांहीं प्रपाठकांतील समाप्तीचीं वाक्यें पाहिलीं असतां मिळतो. पूर्वोत्तर मीमांसेचें व्याख्यान केल्यावर वेदांचा अर्थ सांगण्यास माधवाचार्य प्रवृत्त झाला, असें उपोद्घातांत सांगून 'माधवाचार्यानें रचलेला वेदार्थप्रकाश' असें समाप्तींत म्हटलें आहे (कृ. य. सं. भा. प्र.). यांतील पूर्वोत्तर मीमांसेचा संबंध यानें रचलेल्या जैमनीय न्यायमालाविस्तारा शीं बराच पोंचत असल्यामुळें वेदभाष्यास प्रारंभ यानेंच केला, या मुद्यास बळकटी येते. पुढें सायणानें तें काम हाता घेतल्यावर सायणानें उपोद्घातांत आपलें नांव घातलें (कृपालुः सायणाचार्यो वेदार्थं वक्तुमुद्यतः । तै. आ. प्र.). पण असें म्हणण्यानें जैमनीयन्यायमालाविस्ताराचें कर्तृत्व त्याच्याकडे जाऊं शकत नाहीं. कृष्णयजुःसंहिताभाष्याच्या पहिल्या कांडाचे पांच प्रपाठक पूर्ण होण्याच्या सुमारास पुरुषार्थसुधानिधीचें काम पुरें करून सायण मोकळा झाला व त्यानें वेदार्थाचें काम अंगावर घतलें, हें लक्षांत घेतलें असतां या नांवाचा घोटाळा होणार नाहीं. वेदभाष्याचें नांव वेदार्थप्रकाश व तो माधवानें प्रारंभ केल्यामुळें त्याला माधवीय असें विशेषण लावलें, पण पहिला थोडा भाग सोडला असतां सर्व भाष्य सायणानेंच केलें आहे.

चारहि वेदांत ऋग्वेदाचा अनुक्रमांक पहिला असला तरी माधवाचार्यानें वेदभाष्याचा प्रारंभ यजुर्वेदानें करण्याचें कारण ऋक्संहिता व सामसंहिता यांच्या भाष्यांत आलें आहे. यज्ञांत अध्वर्यूच्या कार्याला प्राधान्य असल्यामुळें प्रथम यजुर्वेदाचें व्याख्यान करून नंतर होत्याच्या कार्यासाठीं ऋग्वेदाचें भाष्य आरंभिलें (ऋग्वेदभाष्य प्रस्ता. ५). शिवाय माधवाचार्याचा कृष्णयजुर्वेद असल्यानें तिकडे याचें प्रथम लक्ष जाणें स्वाभाविक आहे. वेदभाष्यास स्वतः आरंभ केल्यामुळें माधवीय वेदार्थप्रकाश असें त्याचें नांव ठेवलें आणि तेंच सायणानें शेवटपर्यंत पुढें चालविलें. कृष्णयजुर्वेद व ऋग्वेद, यानंतर त्यानें सामवेदसंहितेचें भाष्य केलें. येथें ' आदिशत् सायणाचार्य वेदार्थस्य प्रकाशने ' असा माधवाचार्यांच्या नांवाचे स्थलीं सायणाचार्यांचें नांव घालून बदल केलेला दिसतो. त्यावरून हा त्या वेळीं जिवंत नसावा.

हा केव्हां मृत्यु पावला हें नक्की समजत नाहीं. पण बुक्कराय जिवंत असतांनाच हा मृत्यु पावला असावा. बुक्कराय स. १३७७ च्या फेब्रुवारी महिन्यांत २४ तारखेस मरण पावला (श. १२९८ नळ, फाल्गुन व.१ मंगळवार, एपि. कर्ना. व्हा. ४. येडतोरे तालुक ले. नं.४६पा.९९). वेदभाष्याच्या कामास प्रारंभ स. १३६० च्या अखेरीस झाला. नंतर सतरा वर्षांत यजु, ऋक् यांचीं भाष्यें पुरीं झालीं आणि माधवाचार्य मेल्यामुळें सायणाला वेदभाष्याचें काम करण्याची बुक्कानें आज्ञा केली. म्हणजे हा स. १३७२ च्या सुमारास परलोकवासी झाला असावा. बुक्कराय मेल्यावर त्याला मुक्ति मिळण्याकरितां हरिहरानें कांहीं ब्राह्मणांना इम्मडिबुक्कराजपुर नांवाचा गांव दान दिला. या ब्राह्मणांमध्यें पहिलें नांव सायणाचें असून दुसरें नांव त्याचा पुत्र सिंगण याचें आहे (रिपोर्ट ऑन दि वर्किंग ऑफ अर्कालॉजिकल रिसर्चेस् इन् म्हैसोर, १९१४-१९१५, पा. ४२). माधवाचार्य जिवंत असता तर त्याचें नांव या दानाच्या यादींत आलें असतें. सायणानें दुसऱ्या हरिहराच्या कारकीर्दीत यज्ञतंत्रसुधानिधि (स. १३८१) नांवाचा ग्रंथ लिहिला त्यांत याची थोडी माहिती दिली आहे. त्यांत याचा भूतकाळांत निर्देश असून संन्यास घेतल्याचा निर्देश नाहीं. याचे स. १३६० पासून पुढले दिवस वेदभाष्याच्या कामावर देखरेख ठेवण्यांत खर्ची पडले असावेत.

यावरून यानें कधीं लढाया केल्या असें दिसत नाहीं. तसेंच संन्यास घेऊन विद्यारण्य नांव धारण केलें हींहि कल्पनाच आहे (श्री. रामराव, बी. ए., म्हैसूर, यांचा विद्यारण्य व माधवाचार्य व वि. वि. वि. ६३.९ विजयनगरच्या दरबारीं गाजलेले अनेक माधव वरून).

याची धाकटी बहीण सिंगले हिचा विवाह ज्या रामरस नांवाच्या गृहस्थाशीं झाला होता तो कन्नडिग कुलांतील (कानडी) होता, असें हंपीजवळच्या स. १४११ च्या शिलालेखांत म्हटलें आहे (साउथ इंडियन न्यू इंपिरियल सीरीज, व्हा. ४, पा. ६०).

३. (स. १३८७ सुमार) हा तिसरा माधव 'सर्वदर्शनसंग्रह' या नांवाच्या ग्रंथाचा कर्ता होय. हा ग्रंथहि आजपर्यंत थोरल्या माधवाचार्यांच्या नांवानेंच मोडत होता. परंतु आतां सर्व शंका दूर झाली आहे. 'सर्वदर्शनसंग्रह' सायणाचार्याचे ज्येष्ठ बंधु माधवाचार्य यांचा नसून सायणाचार्याचा पुत्र माधव याचा आहे. अर्थात् हा तिसरा माधव विद्यारण्याचा पुतण्या होय. सदर ग्रंथांतील प्रत्येक दर्शनाचे शेवटीं 'अथ श्री सायणमाधवीय' असें प्रतीक आहे. बापाचें नांव अगोदर लिहिण्याची प्राचीन परंपरा पाहिली तर ग्रंथकर्ता सायणाचा पुत्र होता हें उघड आहे. 'सायणमाधव' म्हणजे सायणाचा पुत्र माधव असा मध्यमपदलोपी समास आहे. हल्लींहि मारवाडी वगैरे लोकांत ही चाल आहे. शिवलाल मोतिलाल वगैरे नांवें अशींच आहेत. ग्रंथांच्या मंगलाचरणांत सर्वत्र हा विष्णु नांवाच्या गुरूस वंदन करून " श्रीमत्सायणदुग्धाब्धिकौस्तुभेन महौजसा " म्हणजे सायण नांवाच्या क्षीरसमुद्रापासून उत्पन्न झालेला कौस्तुभमणि असें कर्त्यानें आपलें वर्णन केलें आहे. यावरून हा सायणाचा पुत्र होता हें स्पष्ट होतें. ग्रंथांच्या प्राचीन प्रतींत वेदांतदर्शन नसून त्याचें कारण, " इतःपरं सर्वदर्शनशिरोमणीभूतं शांकरदर्शनमन्यत्र निरूपितमित्यत्रोपेक्षितम् " असा शेरा आहे, आणि वेदांतदर्शनाच्या प्रतींत 'सायणाचार्यविरचित' असें उपपद आहे. यावरून वेदांतदर्शनाचें निरूपण अगोदरच सायणानें लिहिलें होतें, म्हणून मुलानें गाळलें असें ठरतें. याचा गुरु सर्वज्ञ विष्णु दुसऱ्या हरिहररायाच्या कालीं होता. तर्कभाषा-व्याख्येचा कर्ता चेन्नुभट्ट सर्वज्ञ विष्णूचा पुत्र होता. त्यानें सदर व्याख्येच्या शेवटीं " इति श्रीहरिरायपालितेन सहजसर्वज्ञविष्णुदेवाराध्यतनूजेन सर्वज्ञानुजेन चेन्नुभट्टेन विरचिताया " अशी समाप्ति आहे (Indian Antiquary, Vol. XIV, p. 20).

मानतुंग—एक जैन कवि. 'भक्तामर' व 'भयहर' स्तोत्रांमुळें हा फार प्रसिद्ध आहे.

मानबाई—(मृत्यु स. १६०४) ही अंबरचा राजा भगवानदास याची मुलगी होय. हिचें व जहांगीरचें स. १५८५ मध्यें लग्न झालें. हिला पहिली मुलगी सुलतान उन्निसा बेगम ही झाली (ता. २४-६-१५८६). दुसरा मुलगा खुस्रव, याचा जन्म लाहोर येथें स. ६.८. १५८७ रोजीं झाला. हा जन्मास आला, त्या वेळीं मानबाईस शहाबेगम हें मोठ्या मानाचें नांव मिळालें. या बाईनें ता. १६-५-१६०४ रोजीं अफू खाऊन आत्महत्या केली.

मान विक्रमराज—(स. १६२५ सुमार) हा शक्तन तंपुरान या नांवानें प्रसिद्ध आहे. हा कालीकत येथील एक राजा होय.

मानसिंह—(स. १४९३सुमार) हा ग्वाल्हेरच्या तोमर वंशांतील राजा. तोमरवंश राजपुतान्यांत तंवर या नांवानें प्रसिद्ध आहे. हा संगीतशास्त्रांत मोठा प्रवीण होता. हा संकीर्ण (मिश्र) रागांना फार महत्त्व देत असे. यानें

आपल्या गूजरी राणी(मृगनयनी)च्या नांवानें गूजरी, बहुल गूजरी, मालगूजरी व मंगळगूजरी हे राग तयार केले (कनिंगहॅमकृत आर्किऑलॉजिक सर्वे रिपोर्ट, भा. २, पृ. ६३-६४). यानें रचलेला 'मानकुतूहल' नांवाचा संगीत-शास्त्रावरील ग्रंथ रामपूरच्या सरकारी पुस्तकालयांत सुरक्षित आहे. याच्या वेळीं ध्रुपद गाण्याची पद्धत सुरू होऊन चहूंकडे पसरली.

मानसिंग कच्छवाह—(मृत्यु स. १६१४) अकबर बादशहाचा सरदार. बंगाल, बहार व ओढ्या ह्या प्रांतांचा अधिकारी. हा उत्तम कारभारी व मुत्सद्दी होता. यास 'राजा' हा किताब होता.

बडोद्यानजीक सारसा येथें अकबरास एक जिवावरचें संकट आलें होतें, त्यांतून स्वतःची शिकस्त करून यानें अकबरास वांचविलें. यामुळें अकबर खुष होऊन यास त्यानें सप्तहजारी व पुढें (मीर्झा) राजा ही पदवी बहाल केली. यापुढें अकबराच्या बहुतेक लढायांत जय मिळण्याचें कारण हाच होता.

हा दक्षिणच्या स्वारीवर असतां स. १६१४ त मरण पावला. त्या प्रसंगीं याच्या १५०० बायकांपैकीं ६० बायका सती गेल्या. याचा भावसिंह नांवाचा मुलगा पराक्रमी होता.

मानसिंग मोरे—(स. १७०९-१६) हा राजा-रामाच्या वेळेपासून राज्यांत खपणारा असून पुढेंहि शाहूपाशीं होता. शाहूनें याला स. १७०९ च्या वेळीं सेनापति पद दिलें होतें परंतु तें याजकडून पुढें स. १७१६ त काढून घेतलें. याचें कारण बहुधा याचें दुखणें असावें. हा फार आजारी होता, त्यामुळें याचा शाहूला फारसा उपयोग झाला नाहीं. थोरात, आंग्रे यांजवरील स्वारींत हा नव्हता. ता. २०-११-१७१६ रोजीं शाहूनें याला औषधोपचार करण्याविषयीं लिहिलें आहे (शा. रो. १५५-१५८). या ठिकाणीं शिवाजीपासून झालेल्या सर्व सेनापतींचीं नांवें दिलीं आहेत.

मानसिंगराव मोहिते—(स. १७७१ सुमार) यास जानोजी भोसल्याची बहीण बाकाबाई ही दिली होती. लग्न देऊरास रघूजीच्या वेळेस झालें. रघूजीनें यास सरदारी देऊन नागपुरास आणलें. याचें घराणें नागपुरास आहे. भोसल्याच्या सोयरिकीच्या सात कुळांपैकीं मोहिते हे एक आहेत (ब. पा. ४८).

वऱ्हाडच्या सुभ्याचें काम भास्करराम कोल्हटकराची स्त्री ताई व तिचा पुत्र काशीराव यांचे तर्फे कृष्णाजी गोविंद हा करीत होता. त्यास जानोजीनें काढून वऱ्हाडच्या सुभ्याचें काम यास दिलें व याचेतर्फे त्रिंबकराव कोन्हेर प्रभु यास वहिवाटीस नेमलें (ना. प्रां. इ. पृ. १२३, १२४).

मानाजी आंगरे—(मृ. स. १७५८) हा कान्होजीचा पुत्र. याची व संभाजी आंग्र्याची लढाई होऊन यास पळून जावें लागलें. तेव्हां हा बाजीरावाच्या आश्रयास गेला. बाजीरावानें यास 'वजारतमाव' असा किताब देऊन याची कुलाब्यास स्थापना केली (स. १७३३). शेवटीं हा स. १७५८ त कुलाब्यास मरण पावला. याच्या पश्चात् याचा पुत्र रघुजीस 'वजारतमाव' व 'सरखेल' किताब व वस्त्रें मिळालीं (नानासाहेब पेशवे पाहा).

२. (मृ. स. १८१७) हा रघुजीचा मुलगा. हा अल्पवयी असतांना जयसिंग नांवाचा सरदार याचा कारभारी होता. पुढें दौलतराव शिंद्याचा सरदार बाबुरावानें या दोघांस कैद करून अलीबाग बळकाविलें. पण तो स. १८१३ त मरण पावला. नंतर यानें पेशव्यास दहा हजारांचा मुलूख व खांदेरी बेट देऊन अलीबाग परत मिळविलें.

मानाजी फांकडे—(मृ. स. १८००) एक मराठा सरदार. हा कन्हेरखेडच्या शिंद्यांपैकीं एक असून राघोबादादाच्या पक्षाचा होता. हा शूर, धाडसी व कोणास न दबणारा असे. राघोबादादानें महादजी शिंद्यास सरदारी न देतां ती यास मिळावी म्हणून पुष्कळ खटपट करून पाहिली, पण शेवटीं व्यर्थ झाली. यानें घाशीरामाचा अन्याय उघडकीस आणला. यानें दौलतरावाचे सांगण्यावरून सर्जेराव घाटग्यास ठार मारलें. राज्याचें कांहीं कां होईना, आपला मतलब साधला म्हणजे झालें, अशा प्रकारची याची वृत्ति होती. बाजीरावास पेशवाई मिळवून देण्यासाठीं यानें पुष्कळ खटपट केली. हा रघुनाथरावाच्या प्रत्येक कारस्थानांत प्रमुख असे. रघुनाथदादाच्या पक्षास अखेरपर्यंत चिकटून राहणाऱ्या थोड्या इसमांपैकीं हा एक होता. याच्या शौर्यामुळें याला 'फाकडे' ही पदवी मिळाली. याला आनंदराव शिंदे नांवाचा एक मुलगा होता.

हा नेहमीं उघडा असे. पेशवाईंत तीन फाकडे होते. ते पुढीलप्रमाणें:-इष्टुर फाकडा, कोन्हेर त्रिंबक फाकडा व हा तिसरा होय. यांचें घराणें सध्यां बडोद्यास नांदत आहे.

मानाभरण पांड्य—(स. १०४६) याचा राजाधिराज चोलानें शिरच्छेद केला. मानाभरण चतुर्वेदी मंगलम् नांवाचें खेडें तिनेवेल्ली प्रांतांत अंबासमुद्रम्जवळ आहे.

मानिक्क वाशगर—एक ब्राह्मण. हा मदुरेपाशीं वाथवुर नांवाच्या गांवीं जन्मास आला. हा एका पांड्य राजाचा प्रधान होता. राजानें याला एकदां घोडे खरेदी करण्यास पाठविलें असतां हा विरक्त झाला. पुढें राजानें याला पकडून आणण्याचा प्रयत्न केला, पण शेवटीं याच्या सामर्थ्यापुढें राजाला हात टेकावे लागले. यानें तामिल प्रांतांत भक्तिमार्गाचा प्रचार केला. शेवटीं चिदम्बर येथें येऊन राहिला. तेथें व्याघ्रपाद नांवाचा महात्मा राहत असे. याची एक सुंदर मूर्ति आज दक्षिणेंत तिरोचेनगोडूच्या मंदिरांत आहे.

मॉन्सन—(स. १८०४–५) हैस्टिंग्सच्या कौन्सिलांतील हा एक सभासद होय. हा हैस्टिंग्सच्या विरुद्ध होता. स. १८०४ मध्यें यानें होळकरावर स्वारी केली, पण यशवंतराव होळकरानें आपलें युद्धकौशल्य दाखवून याचा चांगलाच पराभव केला. हा पराभव इंग्रजांचे इभ्रतीस मोठा लांछनास्पद समजला जातो. पुढें लगेच याला भरतपूरचा किल्ला हस्तगत करण्याकरितां पाठविलें. पण त्याहि स्वारींत याचा पूर्ण मोड झाला (स. १८०५).

मामाजी—ही विजापुरच्या रणदूलाखान वजीराची दाई. हिचा वंश रहिमतपुरास आहे. रणदूलाखानाच्या दर्ग्याची व्यवस्थाहि याच्याकडेच आहे (मं. त्रै. ७.१–४, ले. ९).

मामिडी वेंकय्या—हा तैलंग भाषेचा कोशकार. हा कविहि हाता.

मायण—हा माधवाचार्य, सायणाचार्य व भोगनाथ यांचा पिता. याच्या पत्नीचें नांव श्रीमती.

मायादेवी—शुद्धोदनाची पत्नी व बुद्धाची माता.

मायुराज कलचुरी—(स. ७५०–८००) 'उत्तरराघव' या संस्कृत नाटकाचा कर्ता. हा कलचुरि राजा होता.

मायो—सिद्धराज जयसिंहाच्या वेळीं तळ्यांत पाणी राहण्याकरितां हा बळी जाण्यास तयार झाला. तेव्हां याच्या तिरस्कृत जातीस गांवाजवळ राहण्याची परवानगी देण्यांत आली (काठेवाड डि. गॅ. ८, पा. १५७).

मारकीनाथ—एक संत. चंद्रभागेतीरीं दर्यापूर म्हणून गांव आहे तेथील कण्वशाखेच्या व वैश्यवृत्तीनें उपजीविका करणाऱ्या बाबाजी नांवाच्या गृहस्थाचा वृद्धपणीं झालेला हा पुत्र. यास उपरती होऊन तो स्थूल ग्रामाजवळ खेडमाटकी येथें आला आणि १२ वर्षे मौन धारण करून यानें तप केलें. हें पूर्वीचें याचें गुरुग्राम होय. याचीं कांहीं पदें उपलब्ध आहेत.

मारप्पा संगम—हा विजयनगरच्या संगमाचा पुत्र व पहिल्या बुक्कराय संगमाचा भाऊ.

मारवर्मन् पांड्य—(स. ६००) हा कडुंगण पांड्याचा पुत्र. यास अवनिचूडामणि असें म्हणत.

२. (स. ६५०) हा जयंतवर्मन् पांड्याचा पुत्र. याला अरिकेसरी म्हणत. यानें उरय्यूर नांवाचें चोलाचें शहर जिंकलें.

३. (राज्यारोहण स. ११३२ फेब्रु. १) मारवर्मन् श्रीवल्लभ पांड्य १ ला असा याचा निर्देश आहे. याचा स. ११६८–६९ चा लेख अंबासमुद्रम् मध्यें सांपडला आहे.

४. (स. ११६०–६१) पांड्य राजा. याचा पुत्र कुलशेखर. हा केरळांतील वीर रविवर्म्याचा जहागिरदार होता.

मारसिंह गंग—(स. ७९७) दुसऱ्या शिवमार पश्चिम गंगाचा मुलगा. याला लोकत्रिनेत्र व युवराज अशीं बिरुदें होतीं.

२. (स. ८७८–९००) पृथ्वीपति पश्चिम गंगाचा मुलगा.

३. (स. ९६१–७४) हा भूतुग पश्चिम गंगाचा पुत्र. हा आपल्या सावत्रभावानंतर गादीवर बसला. यानें गंगवाडी, पुलीनगर, बेळवाल, बनवासी, नोलंबवाडी व सांतळीग या प्रांतांवर राज्य केलें. यानें गुजराथेवर स्वारी केली होती. यानें नोलंबवाडीच्या पल्लवास जिंकून मान्यखेट, गोनूर येथें मोठे विजय संपादन केले (श्रवणबेळगोळा लेख). हा जैन होता. याचा पुतळा याचा पुत्र राचमल्ल याच्या वेळीं श्रवणबेळगोळा येथें चामुंडरायानें उभारला. तो गोमटेश्वर या नांवानें प्रसिद्ध आहे. याच्याच पुतळ्याखालीं 'चामुंडरायें करविलें' हें मराठी वाक्य कोरलेलें आढळतें. तो पुतळा बाहुबलीचा नसावा.

मार्को पोलो—(स. १२५६–१३२३) प्रख्यात व्हेनिशियन प्रवासी. यानें चीन, हिंदुस्थान व इतर पौर्वात्य देश यांमध्यें प्रवास करून त्यांसंबंधानें युरोपियन लोकांस अद्भुत वाटणारी अशी माहिती पुस्तकरूपानें प्रसिद्ध केली. त्या वेळीं ती त्यांस फारशी खरी वाटली नाहीं, पण पुढें त्यांना तिचा खरेपणा पटला (ब्रि. रिया.).

मालदेव राठोड—(जन्म स. १५११–मृत्यु स. १६६२) हा जोधपूरच्या गांगाजी राठोडचा मुलगा. याजवर शेरशहानें स्वारी केली. शेरशहाची फौज बरीच असल्यामुळें याचें त्यापुढें चालणें अशक्य होतें. तरी पण हा टिकाव धरून होता. शेरशहानें मध्यंतरीं कपट केलें,

व एक बनावट पत्र मालदेवाच्या हातीं पडेल असें केलें. तें पत्र खरें समजून इतरांचें म्हणणें न जुमानतां हा रणांगण सोडून गेला (मल्लदेव पाहा).

पण शेरशाहा मरतांच या शूर राजास लोकांनीं मोठ्या सन्मानानें बोलावून राज्य स्वीकारण्याची विनंति केली.

मालदेव चौहान—(मृत्यु स. १३२१) हा जालोरच्या चौहानांपैकीं होता. जालोरचा किल्ला सोनगरे कान्हडदेवापासून अलाउद्दीनखल्जीनें स. १३११ मध्यें घेतला. कान्हडदेव या लढाईंत मारला गेला. मालदेव हा त्याचा भाऊ होता. पण वंशरक्षणार्थ त्यानें याला आधींच किल्ल्यावरून हाकून दिलें होतें. यानें देशांत फार त्रास दिल्यामुळें बादशहाची सेना याच्या मागें लागली होती. पण हा दिल्लीस जाऊन बादशहास मिळाला. बादशहानें यास चितोडचा किल्ला दिला. सात वर्षें चितोडवर राज्य केल्यावर हा मृत्यु पावला. वि. सं. १३७८ (स. १३२१)च्या सुमारास मृत्यु झाला असावा. त्या वेळीं दिल्लीस घियासुद्दीन तुघ्लक हा बादशहा होता.

याच्या वेळीं सीसोद्याचा राणा हंमीर उदयास येत होता. दिल्लीस गडबड असल्यामुळें तिकडून याला साहाय्य होण्याचा संभव नव्हता. अशा वेळीं यानें आपली मुलगी व मेवाडचे आठ जिल्हे देकार म्हणून हंमीरला देण्याचें ठरविलें. कर्नल टॉडनें विधवा मुलीशीं विवाह केल्याचें लिहिलें. तें सर्वस्वीं चूक आहे. अद्यापिहि यांच्यांत असे विवाह झाले नाहींत व होत नाहींत. शेवटीं याचा देहान्त झाल्यावर ह्याचा पुत्र जयसिंह गादीवर आला. पण त्याच्यापासून प्रेमानें किंवा सक्तीनें हंमीरानें चितोडचें राज्य पुनः घेतले, तें अद्यापि त्याच्या घराण्यांत चालू आहे. मेवाडवर आज मधलीं सतराआठरा वर्षें सोडल्यास साडेतेराशें वर्षें गुहिल वंशाचें राज्य आहे.

मालविका—विदर्भराजाची मुलगी व अग्निमित्राची पत्नी (अग्निमित्र पाहा).

मालाधर पंडित—हा मालव्याच्या परमारांपैकीं दुसऱ्या जयवर्म्याचा सांधिविग्रहिक होता.

मालाधर वसु—(ग्रंथकाल स. १४७७) बंगाली कवि. यानें प्रथम भागवतपुराणाचा बंगालींत दोन अध्याय अनुवाद केला, त्याबद्दल हुसेनशाहानें यास गुणराजखाँ ही पदवी दिली. याचा मुख्य ग्रंथ 'श्रीकृष्णविजय' होय (क. कौ. ७). राधेच्या प्रेम-वर्णनांत याच्या काव्यप्रतिभेचा परिचय होतो.

मालेराव होळकर—(अहल्याबाई पाहा).

मालोजी निंबाळकर—(स. १४३०-३५) हा फलटणच्या पहिल्या वणगोजीचा पुत्र.

२. (स. १५६०-७०) याचा जन्म स. १५३० मध्यें झाला व स. १५६० त आपल्या बापाच्या मृत्यूनंतर वयाच्या तिसाव्या वर्षी हा सरदारी करूं लागला. याचा पिता बाजी धारराव.

आदिलशाहीच्या वतीनें मालोजी राक्षसतागडीच्या (तालीकोट) लढाईंत हजर राहून यानें चांगली तलवार गाजविली. तेव्हां दरबारांतून याची मानमान्यता विशेष झाली. यास वणगोजी ऊर्फ जगपाळराव व दीपाबाई अशीं दोन अपत्यें झालीं. हीच दीपाबाई मालोजी भोसल्यास दिली.

महाराष्ट्रांतील शिरके, मोहिते, माने वगैरे अत्यंत जुन्या मराठी घराण्यांप्रमाणेंच निंबाळकरांचें घराणेंहि अभिजात आहे. यांचें मूळ नांव पवार. हे आपली पीठिका सूर्यवंशी परमार कुळांपर्यंत लावतात.

३. (स.१७७४-७७) हा तिसऱ्या मुधोजीचा मुलगा.

मालोजी घोरपडे—(स. १६६१) हा मुधोळ संस्थानांतील बाजीचा पुत्र होय. पुढें हा आदिलशहास जाऊन मिळाला तेव्हां शिवाजीनें यास एक महत्त्वाचें पत्र लिहून आदिलशहास सोडून आपल्याकडे येण्यास व आपल्या कार्यास मदत करण्यास, आणि बाजीचा घेतलेला सूड विसरून जाण्यास लिहिलें (सरस्वती-मंदिर वर्ष ५, अं. ५). परंतु हा शिवाजीस जाऊन मिळाला नाहीं. नंतर हा औरंगजेबाचा नोकर बनला. याला अकोजी नांवाचा पुत्र होता. अकोजीचा पुत्र पिराजी व त्याचा पुत्र मालोजी वगैरे लोक याच्या मागून गादीवर आले.

२. (स. १७१६-१८०५) हा पिराजीचा पुत्र. हा पेशवाईमध्यें फार जुना व रणशूर योद्धा होता. यानें कोणत्याहि लढाईंत शत्रूस पाठ दाखविली नाहीं. याच्या उजव्या बाजूस एकंदर ९६ जखमा झाल्या होत्या. हा प्रथम रघुनाथरावाचेकडे होता. पण पुरंदरचे तहानंतर हा बारभाईंस मिळाला. हा बारभाईंच्या पक्षास मिळाल्यानंतर लौकरच इंग्रजांशीं सामना सुरू झाला (स. १७७९ तळेगांव लढाई). तीनचारशें इंग्रज व गारदी मिळोन जिवेंच मारिलें. तीनचारशें जखमी झाले. यानें शिपाईगिरीची शर्थ केली. याचे बंधु राणोजी घोरपडे हेहि सामन्यांत ठार झाले. स्वतः यास पांच जखमा झाल्या. त्या बऱ्या होण्याकरितां यास दोन महिने विश्रांति घेणें भाग

पडलें. हा व मुलगा गोविंदराव यांचें वांकडें होतें, व बापलेक खर्ड्याच्या लढाईत परस्पर विरुद्ध लढले (स. १७९५).

स.१७७८ ते १७८१ पर्यंतच्या पत्रव्यवहारावरून असें दिसतें कीं, हैदरानें मुधोळकडे दंगा केला; आणि इंडी, तांबे व अलमेले (जि. विजापूर) हे परगणे, हा १ लक्ष ७३ हजार ९ शें रुपयांचा सरंजाम १०० स्वारांच्या फौजेनिशीं याला देण्यांत आला. हा यांजकडे याच्या हयातीपर्यंत चालला. त्याचप्रमाणें यांच्या फौजेच्या गोटासाठा शहर पुणें येथें जागा देण्यांत आली; व तेथें यांनीं घोरपडे पेठ स. १७८२।३ मध्यें वसाविली. याला चार बायका होत्या. एक पोल संस्थानांतली व दुसरी काठेवाडांतील रजपूत होती. बाकीच्या दोघी दाक्षणेंतील पवार व सोलंकी या घराण्यांतील होत्या. पहिल्या बायकोपासून गोविंदराव व महाराव हे दोन मुलगे झाले. दुसऱ्या बायकोचा मुलगा बाजीराव हा बडोदें राज्यांत राहिला. तिसरीचा मुलगा राणोजी हा इंग्रजांशीं झालेल्या युद्धांत मरण पावला.

मालोजी भोसले—(स. १५५०–१६२०) हा शिवाजीचा आजा. याचा बाप बाबाजी भोसले. त्याला राजा ही पदवी होती. मालोजीचा जन्म स. १५५० त वेरूळ येथें झाला. हा निजामशाही सरदार लुखजी जाधवराव यांच्या दिमतीखालीं नेमला गेला (स. १५७७). हा तोलदार सरदार असल्यानें याला जगपाळराव निंबाळकरानें आपली बहीण दिपाबाई दिली होती. तिचें सासरचें नांव उमाव्वा किंवा उमाबाई असें दिसतें.

मुर्तजानें जेव्हां इमादशाही व खानदेशची फरूकशाही डबघाईस आणली त्या वेळीं यानें बराच पराक्रम गाजविला असावा. याच्या मेहुण्यावर आदिलशाही फौज आली असतां यानें मोठा पराक्रम करून तिचा पराभव केला. त्यामुळें निजामशहानें याचा गौरव करून याला जास्त मनसब दिली. यामुळें हा लुखजीच्या तोलदारीचा झाला. अर्थात् बरोबरीचें घराणें मिळाल्यानें लुखजीनें जिजाई शहाजीस दिली. या लग्नानंतर १५-१६ वर्षांनीं हा वारला. पण मागीलप्रमाणें हाहि त्याचा काळ उपलब्ध नाहीं.

याचा मुलगा शहाजी (जिजाबाई व शरीफजी पाहा).

२. (स. १८२२–२८) हा अक्कलकोटच्या दुसऱ्या फत्तेसिंग भोसल्याचा मुलगा.

मालोपंत—(स. १६८६ सुमार) 'संतचरित्र' नांवाच्या मराठी ग्रंथाचा कर्ता. हा गृहस्थ इंदूर बोधले येथें राहत असे. हा अकण्णा व मादण्णा यांच्या हाताखालीं विजापूरला होता. याचे गुरु नरहर. 'मालोतारण' नांवाचा अप्रसिद्ध ग्रंथ संतसूचिकारानें धुंडिकुमार मालोच्या नांवावर दिला आहे. तो व हा एक किंवा भिन्न समजण्यास मार्ग नाहीं.

माहजूर सेठी बिन नागनाक महार—(स. १७०० सुमार) छत्रपति राजाराम महाराजांचे वेळीं वाई प्रांतांतील नागेवाडी गांवचा हा पाटील होता. नागेवाडीची मूळची पाटीलकी महाराची होय. यानें नागेवाडी येथील नागवडसिद्ध ह्या देवाची पूजा करून राहण्याकरितां धांडेघर व गौडाळी येथील मोरोजी व चिंतामणी ह्या दोन गुरवांना आणलें.

हे गुरव येऊन राहिल्यानंतर त्यांनीं पाटीलकी बळकाविली. तेव्हां यानें गुरवांविरुद्ध परशुरामपंताकडे फिर्याद केली. प्रतिनिधीनें गुरवास बोलाविलें, पण ते आले नाहींत. तेव्हां प्रतिनिधीनें सिवधडे यास (म्ह. नागेवाडीजवळील मोकदमास) विचारिलें. त्यानें पाटीलकीचें वतन महाराचेंच आहे असें सांगितलें. यावरून 'गुरवांनीं देव पुजून असावें, पाटीलकीशीं त्यांचा अर्थाअर्थी संबंध नाहीं' असा महार पाटलाच्या बाजूचा निकाल दिला. हा आपल्याविरुद्ध झालेला निकाल ऐकून मोरोजी व चिंतामणी या उभयतां गुरवांनीं पुनः छत्रपतींकडे फिर्याद केली. या वेळीं छत्रपती रांगण्यास होते. तेव्हां ही पाटिलकीची फिर्याद पुनः आलेली पाहून राजारामानें महारांस धारादिव्य करण्यास सांगितलें. म्हणजे 'मोगलांनीं घेतलेला वैराटगड स्वराज्यास जोडून द्यावा व पाटिलकीचें वतन अनुभवावें असा निकाल दिला.'

वरीलप्रमाणें राजारामानें निकाल दिल्यावर वैराटगड हा नागेवाडीच्या महारांनीं मोगलांशीं लढून घेतला व पाटिलकीचें वतन मिळविलें. ह्या पाटिलकीच्या वतनाबद्दल नागेवाडीच्या गुरवां-महारांमध्यें तीन वेळां फिर्यादी झाल्या. तिनहि वेळां महारांचेंच वतन ठरलें. शेवटची फिर्याद शके १६७४ म्ह. स. १७५३ तील आहे (मं. सप्तम सं. वृत्त श. १८४१, पृ. ५५).

माहप गुहिलोत—मेवाडच्या राजघराण्यांपैकीं हा रणसिंहाचा पुत्र. रणसिंहालाच कर्णसिंहहि म्हणत. वडील भाऊ क्षेमसिंह हा उदेपूरचा राजा झाल्यावर हा व याचा धाकटा भाऊ राहप हे सीसोदें येथें राहूं लागले. म्हणजे

हा सिसोदें येथील राणाशाखेचा पहिला पुरुष होय. याला पुत्र नसल्यानें याचा भाऊ राहप हा याच्यामागून याच्या जहागिरीचा मालक झाला.

माळव्याचे (मांडूचे) सुलतान—

घोरीवंश—(१) दिलावरखान (अमीशाह) स.१३७३, (२) हुशंग (अल्पखान) स. १४०५, (३) मुहम्मद (गजनीखान) स. १४३४, (४) मसूदखान स. १४३६.

खल्जीवंश—(१) महमूदशाह स. १४३६, (२) घियासशाह स. १४७५, (३) नासिरशाह स. १५००, (४) महमूदशाह (दुसरा) स. १५११-३०.

मांग सावंत—(मृत्यु स. १५८०) सावंतवाडी संस्थानचा संस्थापक. हा उदेपूरच्या सिसोदिया घराण्यापैकीं होता. याचें उपनांव भोंसले. याला सात बायका होत्या. त्यांपैकीं सहा सती गेल्या व सातवी गरोदर होती. तिला ' फोंड ' नांवाचा पुत्र झाला.

मांधात्रीवर्मन् कदंब—(स.४८८-५००) हा बनवासीच्या कदंब घराण्यापैकीं शांतिवर्मनचा पुत्र.

मिकर तिम्म—(स.१५८० सुमार) विजयनगरच्या दुसऱ्या श्रीरंग आरविदूचा जांवई. यानें अलीखान लूरीच्या मदतीनें मुहम्मद कुली कुत्बशाहाचा पराभव केला.

मित्रमिश्र—(स. १६१०-४० सुमार) याचा पिता परशुराम पंडित व आजा हंस पंडित होय. याची ' वीरमित्रोदय ' नांवाची याज्ञवल्क्यस्मृतीवरील टीका फार प्रसिद्ध आहे. तिचे प्रकाश नांवाचे विभाग आहेत. लक्षणप्रकाशांत स्त्रीपुरुषांची चांगलींवाईट लक्षणें वगैरेचें विवेचन केलें आहे. त्याचप्रमाणें व्यवहारप्रकाश, संस्कारप्रकाश, पूजाप्रकाश वगैरे भागांत त्या विषयाचें अत्यंत बारीक व विस्तृत विवेचन आहे. राजनीतिप्रकाशांत तर राजा, मंत्री, सेनापति, युद्ध, किल्ले व राजधानी यांचेंहि विवेचन आहे. याचा हा ग्रंथ वाचल्यास दुसरा कोणताहि त्या विषयावरील ग्रंथ वाचण्याची जरूरी नाहीं, असें यानें म्हटलें आहे तें यथार्थ आहे.

मिनेंदर—(मिलिंद पाहा).

मिया शौरी—(स. १७७६ १७९७) याचें मूळ नांव गुलाम नबी. याच्या पित्याचें नांव गुलाम रसूल. हा लखनौचा राहणारा. याच्या वेळीं आसफ उद्दौला लखनौचा नबाब होता. हा आपल्या बापाजवळ ख्याल-गायन शिकला. पण याचा आवाज फार पातळ असल्यानें ख्यालांतील तानबाजीनें याची तृप्ति होईना. म्हणून यानें नवीन टप्प्याचें गाणें काढलें. टप्प्यास पंजाबी भाषा सोयीची म्हणून यानें त्या भाषेचा अभ्यास केला व त्या भाषेंत टप्पे रचले. टप्पे ठराविक अशा थोड्याच रागांत असतात.

हा साधुवृत्तीनें राहत असे. एकदां आसफउद्दौला रस्त्यांतून जात असतां शौरीची व त्याची गांठ पडली. सरदारांनीं याच्या गुणाची माहिती देतांच नबाबानें यास राजवाड्यांत येण्यास फर्मावलें. पण या सत्पुरुषानें झटदिशीं उत्तर दिलें 'मला तुझें मकाण ठाऊक नाहीं.' तेव्हां हंसून नबाबसाहेबानें 'विचारीत या' म्हणून उत्तर दिलें. ठरल्याप्रमाणें हा राजवाड्यांत गेला आणि तेथें याचें गाणें अप्रतिम झालें. नबाबानें यास बक्षिस म्हणून दिलेली रक्कम यानें फकीरांस वांटून टाकली. याला मूलबाळ नव्हतें. गम्मू नांवाचा याचा एक पट्टशिष्य होता (सं. शा. क. इ. पा. १२२).

मिरान हुसेन निजाम—(स. १५८८-८९) हा अहमदनगरच्या मूर्तजा निजामाचा पुत्र. याच्या दरबारांत दक्षिणी व परदेशी असे दोन पक्ष होते. दक्षिणी पक्षाच्या लोकांनीं याची कत्तल करून इस्माईलला नादींवर बसविलें.

मिलिंद—(ख्रि. पू. १५०) हा एक उत्तरहिंदुस्थानाच्या कांहीं भागावर राज्य करणारा ग्रीक राजा होता. हा अत्यंत पराक्रमी होता व याचें राज्य दूरवर पसरलें होतें. याचें राज्य राजपुतान्यावरहि होतें असें दिसतें. पतंजलीनें आपल्या महाभाष्यांत यवन राजानें माध्यमिका नगरावर स्वारी केल्याचें लिहिलें आहे. ही माध्यमिका नगरी म्हणजे चितोडच्या उत्तरेस सात मैलांवर असलेली सध्यांची नगरी होय. प्राचीन विशाल नगरीचे अवशेष अद्यापहि तेथें विखुरलेले आहेत. कालिदासाच्या मालविकाग्निमित्र नाटकांत, शुंगवंशसंस्थापक पुष्यमित्राच्या अश्वमेधाचा घोडा सिंधूच्या दक्षिण तीरावर यवनांच्या सैन्यानें पकडला होता; मग तो वसुमित्रानें लढून सोडवला अशी हकीगत आहे (ही सिंधु म्हणजे राजपुतान्यांतील कालीसिंध दिसते). वरील दोनहि गोष्टी या मिलिंदाच्या वेळीं झाल्या असाव्यात असें अनुमान आहे (राजपूतानेका इतिहास, पा. ९८). याचीं दोन नाणीं महामहोपाध्याय गौरीशंकर हि. ओझा यांना नगरी (माध्यमिका) येथें मिळालीं, त्यांवरून या अनुमानास पुष्टि येते. तसेंच काठेवाड व गुजराथ येथें याचीं नाणीं आढळतात. त्यावरूनहि वरील म्हणणें खरें दिसतें. याविषयीं स्ट्रेबानें लिहिलें आहे कीं, ' यानें पातालन् (सिंध), सुराट्रस (सोरठ, दक्षिणी काठेवाड),

आणि सागरडिस (सागरद्वीप हें कच्छ असावें) जिंकलें ' (बाँबे ग्याझिटियर, भा. १, पृ. १६).

हा स्थविर नागसेनाच्या उपदेशानें बौद्ध झाला होता. मिलिन्दपन्हो (मिलिंदप्रश्न) नांवाच्या पाली ग्रंथांत हा व नागसेन यांचीं निर्वाणासंबंधीं प्रश्नोत्तरें आहेत. या ग्रंथावरून समजून येतें कीं हा यवन (ग्रीक) होता.

याचा जन्म अलसंद येथें झाला. अलसंद हें नगर हिन्दुकुश पर्वताजवळ अलेक्झांड्रिया येथें आहे.

याची राजधानी पंजाबमधील शाकल ही समृद्ध नगरी होती (सेक्रेड बुक्स ऑफ् दि ईस्ट, भा. ३५-३६). प्लुटार्कनें लिहिलें आहे कीं, हा इतका न्यायी व लोकप्रिय राजा होता कीं याचा देहान्त झाल्यावर याची राख लोकांनीं आपसांत वांटून घेतली आणि आपल्या ठिकाणीं नेल्यावर त्यावर स्तूप बांधले ('न्युमिस्मॅटिक क्रानिकल' स. १८६९, पृ. २२९). यावरूनहि हा बौद्ध होता ही गोष्ट निश्चित ठरते. याचें नांव याच्या नाण्यावर मेनन्द्र असें आढळतें; व ग्रीक मिनेंदर असा उच्चार करतात. याचा काळ ख्रि. पू. १५० (वि. सं. पूर्व ९३) च्या सुमारास अनुमानानें धरतात. ग्रीक राजांपैकीं याचाच संबंध राजपुतान्याशीं मानतात. पेरिप्लूसचा कर्ता म्हणतो कीं, ॲपोलोडॉटस् व हा यांचीं नाणीं अजूनपर्यंत (स. २४०) बरुगज (भृगुकच्छ-भडोच) येथें चालतात. यावरून गुजराथ व राजपुतान्याशीं याचा संबंध असावा.

मिसरुक—न्यायदीपकेचा कर्ता.

मिसरुमिश्र—(स. १५००-७५) मैथिल पंडित. हा 'विवादचंद्र' व 'पदार्थचंद्र' या ग्रंथांबद्दल प्रसिद्ध आहे. तिर्हुत घराण्यांतील चंद्रसिंहाच्या लाछमादेवी राणीच्या सांगण्यावरून यानें वरील ग्रंथ लिहिले. पहिला ग्रंथ व्यवहारावर असून दुसरा वैषेशिक तत्त्वज्ञानावर आहे. न्यायदीपिकेचा कर्ता मिसरुक व हा भिन्न होत.

मिहिरकुल—(स. ५१०-४०) हूणवंशांतील तोरमाणाचा पुत्र. याची माहिती हुएन्त्संगाचें प्रवासवर्णन, राजतरंगिणी, शिलालेख व नाणीं यांवरून मिळते. याची राजधानी पंजाबांतील शाकलनगर होती. हा अत्यंत शूर होता. सिंध वगैरे देश जिंकून यानें आपल्या ताब्यांत घेतले होते. हा प्रथम बौद्धधर्मावर प्रेम करीत होता. पण मागाहून हा त्या धर्माच्या अगदीं विरुद्ध झाला. उपदेशकांना ठार करण्याचे व बौद्धधर्म नष्ट करण्याचे यानें हुकूम दिले होते. गांधार देशांतील १६०० स्तूप व मठ यानें पाडून नष्ट केले व कितीतरी लाख लोक कापून काढले. निर्दयपणाची यानें कमाल केली. हा शिवाचा परम भक्त होता. याच्या नाण्यावर एका बाजूस 'जयतु वृषध्वज' असें लिहिलेलें आढळतें. कांहींवर 'जयतु वृष' असेंहि लिहिलेलें आढळतें. याशिवाय त्रिशूल, वृष (नंदी), व छत्र हीं चिन्हेंहि आढळतात. त्यावरून हा शैव होता हें स्पष्ट होतें. याच्या नाण्यांत इराणी लोकांच्या ससानियन् शैलीचें अनुकरण आढळतें. हा शिवाशिवाय कोणाहिपुढें आपलें मस्तक नमवीत नसे. पण माळव्याचा राजा यशोधर्म (विष्णुवर्धन), या प्रतापी राजानें स. ५३२ च्या सुमारास याला जिंकलें. तसेंच मगधाच्या बाजूनें गुप्तवंशांतील नरसिंहगुप्तानें याला पराजित केलें. त्यामुळें राजपुताना, माळवा वगैरे प्रदेश याच्या राज्यांतून कमी झाले. पण काश्मीर, गांधार यांवर याचा अधिकार कायमच होता. याचा एक शिलालेख ग्वालेर येथें मिळाला आहे. तो याच्या राज्याच्या पंधराव्या वर्षांतील आहे (प्लीट गुप्तइन्क्रिप्शन्स, ले. ३७).

मिहिर भोज प्रतिहार—(भोज(देव) प्रतिहार पाहा).

मिंगटी—(ख्रि. पू. ६१ सुमार) हा चीनदेशाचा राजा होय. एकदां स्वप्नांत याला उंच, धिप्पाड व तेजस्वी असा पुरुष आकाशमार्गानें आपल्याच प्रासादांत शिरत आहे असें दिसलें. प्रधानानें याचा खुलासा असा केला कीं, भारतवर्षांत फो नांवाचा एक सिद्ध पुरुष जन्मास आला आहे. त्याचें दर्शन आपणांस झालें असावें. हें ऐकून राजाला बुद्धाविषयीं मोठी जिज्ञासा उत्पन्न झाली आणि त्यानें बौद्धधर्माचा अभ्यास करण्याकरितां बरेच पंडित रवाना केले. या चीन देशांतल्या पंडितांच्या विनंतीवरूनच चीन देशांत भारतवर्षांतून बौद्ध प्रचारक जाण्यास सुरवात झाली. ही हकीगत अशाच स्वरूपांत निरनिराळ्या तेरा चिनी ग्रंथांत आढळते, असें तज्ज्ञांनीं लिहिलें आहे. याच्या विनंतीवरून गेलेला पहिला बौद्ध प्रचारक काश्यप मातंग हा होय. त्याच्याबरोबर धर्मरक्ष हाहि गेलेला होता (Edkines-Chinese Buddhism, p. 88).

मिंग-यु-एन—एक चिनी प्रवासी. हा ईचाव येथील राहणारा होता. भारतवर्षांत आल्यावर कलिंगाहून लंका व तेथून चीनला गेला.

मिंटो लॉर्ड—(स. १८०७-१३) एक गव्हर्नर जनरल.

मीनपा—हा चौऱ्यांशीं सिद्धांपैकीं आठवा सिद्ध. हा जातीनें मलुआ असून कामरूप देशामध्यें राहत असे. हा जालंदरपाचा शिष्य व गोरक्षपाचा पिता व गुरु. याच्या वेळेस देवपाल (स. ८०९-४९) राजा होता.

मीनाक्षी—(स. १७३१-१७३६) ही मदुरेच्या शेवटच्या राजाची राणी. विजयरंग चोक्कनाथ याच्या विधवा राणीनें तिरुमल यास दत्तक घेतलें. तो स्वतः राज्यकारभार पाहूं लागला व त्यानें राणीस मारण्याचा बेत केला. तिरुमल यानें सफदरअलीच्या मदतीनें आपण राजा असल्याचें जाहीर केलें. तेव्हां हिनें चंदासाहेबाच्या मदतीनें मदुरा व दिंदिगल घेतलें. तेव्हां तिरुमल पळून गेला. चंदासाहेबानें मदुरेचें राज्य बळकाविलें व मीनाक्षीनें आत्महत्त्या केली. याप्रमाणें मदुरा येथील हिंदु राज्याचा शेवट झाला.

मीनाक्षी पांड्य—(स. १२०० सुमार) पहिल्या सुंदर पांड्याची पत्नी. पांड्यांच्या प्रदेशांत हिची अद्यापि देवासारखी पूजा होते.

मीर—(जन्म स. १७११-मृत्यु स. १८०८) ऊर्दू कवि. याचें नांव मुहम्मद तकी मीर असें होतें. याचा पिता अबदुल्ला मीर. दिल्लीचा बादशहा शहाअलमनें याचा सन्मान केला. नंतर हा लखनौस गेला. तेथें असफुद्दौला व सादतअली यांनीं याचा सत्कार केला.

हा आपल्या काव्यामुळें फार प्रसिद्ध व लोकप्रिय होता. याचे शिकारनामा, अजगरनामा व निकातुश्शुअरा हे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. पहिल्यांत असफुद्दौल्याच्या शिकारीचें वर्णन आहे; आणि शेवटल्यांत जुन्या ऊर्दू कवितांची चर्चा आहे (क. कौ. ४).

मीर अबु तुर्ब इब्न अल सय्यद अहमद अरिदाबी—'इदिकत-अल-अलम' हा फार्सी ग्रंथ यानें लिहिला असावा (मीर अलम पाहा).

मीर अलम—(मृत्यु स.१८१३) हा दुसरा निजाम अली असफझाचा वजीर होता. यानें 'हदिकत-अल-अलम' नांवाचा निजामशाही व कुत्बशाही याची माहिती देणारा बखरवजा इतिहास फार्सीमध्यें लिहिला. हा ग्रंथ स. १८०३-४ पूर्वी पुरा केला. इंडिया ऑफिसमधील २४४० नंबरच्या हस्तलिखित प्रतीवर हा ग्रंथ कोणा एका मीर अबु तुर्ब इब्न अब सय्यद अहमद अरिदाबी यानें मीर अलमच्या सांगण्यावरून स. १८०६ मध्यें रचला, असें म्हटलें आहे व त्यांत मीर अलमचें थोडक्यांत चरित्रहि दिलें आहे (इंडिया ऑफिसांतील फार्सी हस्तलिखिताची यादि-एथेकृत, पृ. १७९). हें बरोबर असण्याचा संभव आहे.

मीर असीद—(स. १७४०) कर्नाटकचा नबाब जो दोस्तअली त्याचा हा दिवाण होय. स. १७४० मध्यें मराठ्यांनीं कर्नाटकावर स्वारी केली असतां याला मराठ्यांनीं कैद केलें.

मीर कासीम—(स. १७६१-६४) बंगालचा नबाब. यानें मोंघीर शहर राजधानी करून इंग्रजांशीं युद्ध केलें. तोफा व बंदुका तयार करण्याचे कारखाने काढले. स. १७६४ मध्यें इंग्रजांनीं याचा पराभव करून बंगाल घेतला.

मीर खलील—बुऱ्हाणपूरचा अधिकारी व औरंगजेब बादशहाच्या मावशीचा मुलगा.

मीरखान अलीशाह—(अमीरखान अलीशाह पाहा).

मीर गुलाम हसन—(हसन पाहा).

मीर जाफर—(मृत्यु स. १७६५) बंगालचा एक नबाब. हा सिराजुद्दौला सेनापति होता. सिराजुद्दौल्याशीं फितुर होऊन प्लासीच्या लढाईत हा इंग्रजांस मिळाला; आणि त्याबद्दल इंग्रजांनीं याला सिराजुद्दौलाच्या गादीवर बसविलें. यापासून क्लाइव्हनें सव्वा दोन कोटी रुपये उकळिले. पुढें याला इंग्रजांनीं पदच्युत केलें (स. १७६०), व मीर कासीम यास नबाब बनविलें. नंतर इंग्रजांनीं ह्याचाहि पराभव करून पुन्हां म्हाताऱ्या मीर जाफरास नबाब बनविलें. यानंतर जाफर हा दोन वर्षांनीं मेला. याची कबर मुर्शिदाबादेस आहे.

मीर जामरासियाखान—दुसऱ्या अली आदिलशाहाच्या दरबारांतील एक ऊर्दू कवि.

मीर जाहक—सौदाचा समकालीन ऊर्दू कवि.

मीर जुम्ला—(स. १६३०-६३) हा इराणांतील इसफाहन येथील एका तेल्याचा मुलगा. याचें मूळ नांव मुहम्मद सय्यद (सैद). हा स. १६३० मध्यें गोवळकोंड्यास आला आणि जव्हेरी म्हणून प्रसिद्ध झाला. हा आपल्या कर्तबगारीनें अबदुल कुत्बशहाचा दिवाण झाला. याच्या पदरीं युरोपियन सैन्य असे. त्या जोरावर व आपल्या हुषारीनें यानें कडप्पा, गंडीकोटाकिल्ला वगैरे बराचसा भाग मिळविला व हिऱ्याच्या खाणी याच्या मालकीच्या झाल्या. हा एखाद्या राजासारखा होता.

यामुळें कुत्बशहाला वैषम्य वाटून त्यानें याच्याशीं विरोध सुरू केला, तेव्हां हा औरंगजेबाच्या मध्यस्थीनें शहाजहानकडे नोकरीस राहिला (स. १६५५). याचीं बायकामुलें कुत्बशहानें अडकविलीं, तेव्हां औरंगजेबानें युद्ध करून त्याचा बराच भाग काबीज केला आणि हा दिल्लीस गेला (स. १६५६ जुलै). नंतर यास औरंगजेबाच्या मदतीस विजापूरच्या स्वारीवर पाठविलें (स. १६५७). शहाजहान आजारी पडला तेव्हां हा दिल्लीस निघाला. तेव्हां औरंगजेबानें यास आपल्याकडे घेतलें व याच्या सैन्यानें आपली शक्ति वाढविली. औरंगजेबानें बादशहा

झाल्यावर याला बंगालचा सुभेदार नेमलें (स. १६६०). नंतर कुचबिहार काबीज केला (स. १६६१). पुढें याच्याकडून आसाम काबीज केला. पण तेथून परत येत असतां हा वाटेंत मेला. हा मोठा दूरदर्शी होता. याचें सैन्य उत्कृष्ट असे.

मार बबरअली—(अनीस पाहा).

मीर मन्नु—(मृत्यु स. १७५४) वजीर कमरुद्दीन-खानाचा मुलगा. लाहोरचा सुभेदार (अहमदशाह-अबदाली पाहा).

मीर शहाबुद्दीन—(१ गाजीउद्दीन पाहा).

मीर हबीब—(स. १७४८-५१) इराणी मुसलमान. हा दुसऱ्या मुर्शीदकुलीखानाजवळ होता. मराठ्यांच्या बंगालवरील स्वाऱ्यांत हा प्रसिद्धीस आला. अलीवर्दीखानानें मुर्शीदकुलीखानास ओरिसांतून हाकून दिलें तेव्हां यानें मराठ्यांस साहाय्य करून त्याची खोड मोडली. रघूजीनें यास ओरिसाचा सुभेदार नेमलें. पण जानोजीस याच्या मदतीस जावें लागलें तेव्हां हा मारला गेला.

मीराबाई—(मृत्यु स. १५४६) एक हिंदी कवयित्री. ही मेढत्याच्या राठोड रत्नसिंहाची मुलगी. हिचा जन्म स. १४९८ च्या सुमारास झाला. हिचें लग्न उदेपूरच्या भोजराज गुहिलोताशीं झालें (स. १५१६) पण थोडक्या दिवसांतच हिचा नवरा वारला (स. १५१८ सुमार). कर्नल टॉडच्या लेखांत ही महाराणा कुंभाची पत्नी असें आहे, पण तें सर्वस्वीं चूक आहे.

हिला लहानपणापासून भगवद्भक्तीची गोडी लागलेली होती. त्यामुळें ह्या दुःखकारक प्रसंगीं भगवद्भजनाकडे हिचें मन ओढलें जाणें स्वाभाविक आहे. भगवद्भक्तीची देणगी हिला हिच्या पितृकुलाकडून मिळाली होती. महाराणा संग मरण पावल्यावर त्याचा पुत्र रत्नसिंह गादीवर बसला; आणि तोहि स. १५३१ त मरण पावला व नंतर त्याला पुत्र नसल्यामुळें त्याचा भाऊ विक्रमादित्य गादीवर बसला. या वेळीं हिची भक्ति आणि भावपूर्ण भजनें यांची ख्याति हिंदुस्थानभर पसरली होती. ही गोष्ट विक्रमादित्याला आवडत नसे.

ही निःसंकोचपणें आपलीं पदें गात देवापुढें नाचत असे. राजकुलांतल्या स्त्रियांनीं चारचौघांत असें भजन करीत राहणें विक्रमादित्याला पसंत नव्हतें. म्हणून तो हिला अनेक प्रकारें त्रास देई. त्यानें हिला विष देऊन पाहिलें, हिच्याकडे पेटाऱ्यांत नाग घालून पाठविला, पण त्याचा कांहींएक परिणाम न होऊन तें सर्व हिच्या भक्तिप्रभावानें निष्फल झालें. हिची अशी स्थिति विरमदेवाला कळल्यावर, त्यानें हिला मेढत्याला बोलावून नेलें. नंतर ही द्वारकेस येऊन राहिली.

हिनें तयार केलेल्या पदांचा हिंदुस्थानभर प्रचार झालेला आहे आणि तीं जागोजाग गाइलीं जातात. हिनें गीतगोविंदाच्या धर्तीवर ' राग-गोविंद ' नांवाचा ग्रंथ लिहिला. हिनें जयदेवाच्या गीतगोविंद काव्यावर टीका लिहिलेली आहे. हिचीं पदें राजपुतानीमिश्रित हिंदीमध्यें व गुजराथीमध्यें आहेत. हिचा मल्हारराग विशेष लोकप्रिय आहे.

हिनें आपल्या पदांत रैदास गुरु असल्याचा निर्देश केला आहे. ही द्वारकेस असतां राण्यानें हिला परत आणण्यासाठीं कांहीं ब्राह्मण पाठविले होते. ही वृंदावन येथें जीवगोस्वामींच्या दर्शनास गेली असतां, त्यांनीं हिला कळविलें कीं ' मी स्त्रियांना दर्शन देत नाहीं. ' तेव्हां हिनें उलट निरोप पाठविला कीं ' गिरधरलालाशिवाय दुसरा कोणी पुरुष आहे असें मला वाटत नाहीं. ' हें कळल्यावर त्यांनीं हिला दर्शन दिलें. हिच्या पदाच्या शेवटीं ' मीराके प्रभु ' असें असतें (रा. इ. पा. ६७१-७२; क. कौ. १. २११; हिं. श. सागर प्रस्तावना, पा. १११).

मीर्झा अबदुल फत्ते कुत्बशाह—(जन्म स. १५६८) गोवळकोंड्याच्या इब्राहीमचा चवथा मुलगा.

मीर्झा अमानी—(असफुद्दौला पाहा).

मीर्झा अली बरीद—(स. १५७२-१६०९) हा बेदरच्या दुसऱ्या कासीमचा पुत्र असून त्याच्या नंतर गादीवर आला. शेवटीं औरंगजेबानें हें राज्य घेऊन या वंशाचा शेवट केला.

मीर्झा अस्करी—(अस्करी पाहा).

मीर्झा मास्लिहुद्दीन—(स. १७५५) रघूजीनें अलीवर्दीखानाच्या संमतीनें यांस मीर हबीबानंतर ओरिसाप्रांताचा सुभेदार नेमलें. याच्या कारकीर्दीत पूर्वापेक्षांहि वसूल कमी झाला. तेव्हां स. १७५५ त ह्यास सुभेदारी सोडावी लागली (ना. प्रां. इ.).

मीर्झा मुहम्मद अमीन—मुस्तफाखान ह्या नांवानेंहि हा प्रसिद्ध आहे.

मीर्झा मुहम्मद ईसा अर्घून तर्खान—(स. १५५६ सुमार) या घराण्यांतील हा पहिला राजा.

मीर्झा मुहम्मद बकी तर्खान—(स. १५६०) सिंधच्या अर्घून तर्खान राजांपैकीं दुसरा.

मीर्झा मुहम्मद हकीम मोगल—(मृत्यु स. १५८६) हा काबूलचा सुभेदार असून हुमायूनचा मुलगा होय.

मीर्झा जानी बेग तर्खान—(स. १५८५-९१) सिंधच्या अर्घून तर्खान राजांपैकीं तिसरा व शेवटचा राजा.

मीर्झा नजफरखान—(स. १७३३-१७८२) हा मूळचा इराणच्या राजवंशांतील असून पुढें आपली बहीण खदीजा सुलतानाबरोबर हिंदुस्थानांत आला. हा सुजाउद्दौला, मीरकासीम व शेवटीं शहाअलमच्या पदरीं होता. ह्यानें मराठ्यांशीं सख्य ठेवून बुडत्या बादशाहीस बराच हात दिला. बादशहानें ह्यास दोन लाखांची नेमणूक देऊन अमीरुल उमराव केलें. ह्याचा मोठेपणा अबदुल अहदरखानास सहन झाला नाहीं.

मीर्झा शफी—हा मीर्झा नजाबखानाचा पुतण्या. याचा मुहम्मद बेग हमदानीनें खून केला (स. २३-९-१७८३).

मीर्झा शाहबेग अर्घून—मुलतानचा सुलतान.

मीर्झा सिकंदर जाह निजाम—(स. १८०३-१८२९) हैद्राबादचा निजाम. हा निजामअलीचा पुत्र होय. ह्याचा मुलगा नासिरुद्दौला.

मीर्झा हुसेन अर्घून—(शाहा हुसेन अर्घून पाहा).

मुअज्जम—(बहादुरशाह मोगल पाहा).

मुइझ्झुद्दीन मुबारक सय्यद—(मुबारक सय्यद पाहा).

मुकरबखान—(शेख निजाम पाहा).

मुकुलभट्ट—(स. ९२५ सुमार) हा भट्टकल्लटाचा पुत्र. हा प्रतिहारेंदु राजाचा गुरु होता. माणिक्यचंद्रानें 'काव्यप्रकाशसंकेत' नांवाच्या आपल्या काव्यप्रकाशावरील टीकेंत याच्या 'अभिधावृत्तिमातृके'तून बरींच अवतरणें घेतलीं आहेत.

मुकुंद (दीन)—(स. १६०८-२३) नेमाडांतील खांडव्यास याचा जन्म झाला. पिता-नारायण व माता-साखरबाई. हा यजुर्वेदी वाजसनेयी होता. हा पित्याच्या मरणानंतर बागलाणांत जैतापुरीं आला. स. १६०८ सालीं स्वप्नांत सद्गुरुदर्शन झालें. स. १६२३ सालीं प्रत्यक्ष सद्गुरूपदेश मिळाला. नंतर यानें तीर्थयात्रा केली. याचे ग्रंथ—रामायण-सुंदरकांड, दानलीला, यशोदा-गौळण-संवाद, छंदोरत्नाकर, गुरुस्तुति, वेदांत.

मुकुंद दैवज्ञ—हा 'उपचारसार' या ग्रंथाचा कर्ता होय. यानें आपला ग्रंथ वैद्यकशास्त्रावर लिहिला आहे. याच्या ग्रंथावर दिनकरानें 'गूढप्रकाशिका' नांवाची टीका स. १८१८ मध्यें लिहिली.

मुकुंदमुनि—याच्या नांवावर पुढील संस्कृत ग्रंथ दिलेले आढळतात. पण ते एकाचेच आहेत असें मानतां येत नाहीः १ अद्वैतज्ञानसर्वस्व, २ अष्टावक्रगीताभाष्य, ३ आत्मबोध, ४ पंचीकरण, ५ परमामृत, ६ विवेकसारसिंधु, ७ विवेकसिंधु (C. C.).

मुकुंदराज—(स. ११२८-९६ सुमार) मराठी भाषेंतील आद्य कवि व साधु. याचे ग्रंथ-१ विवेकसिंधु, २ परमामृत, ३ पंचीकरण, ४ मूलस्तंभ, ५ दशोपनिषदांवरील महाभाष्य (संस्कृत). याचें पूर्वार्धांत नांव परमार्थतत्त्वप्रबोध असून उत्तरार्धांत महाभाष्य आहे (मं. श. १८३५ वा. इ. ले. २५). शिवाय कांहीं अभंग व पदें आहेत. विवेकसिंधु हा ग्रंथ जोगाईच्या आंब्याचा राजा जयंतपाळ याच्यासाठीं रचला, असें त्या ग्रंथांतच 'नृसिंहाचा बल्लाळ। तयाचा कुमर जयंतपाळ। तेणें करविला गदारोळ। ग्रंथरचनेचा।' या शब्दांत म्हटलें आहे. जयंतपाळ, जैत्रपाळ, जैतपाळ अशींहि नांवें लिहिलेलीं आढळतात. पण या नांवाचा राजा प्रसिद्ध नाहीं. हा साधुसज्जनांस बोलावून 'तुम्हांला साक्षात्कार झाला आहे काय?' असा प्रश्न विचारी, व 'नाहीं' असें उत्तर आलें कीं त्यांना कैदेंत टाकी. पण मुकुंदरायानें त्याला साक्षात्काराचा अनुभव दिला, अशी आख्यायिका आहे. विवेकसिंधूच्या कांहीं प्रतींत शारंगधर राजा राज्य करीत असतां शके १११० साधारण संवत्सरीं द्विजोत्तम मुकुंदानें ग्रंथ केला असें म्हटलें आहे. शके १११० ला कीलक संवत्सर असून बाराला साधारण संवत्सर येतो. त्या वेळीं हे वृद्ध होते (प्रक. ७, ओवी ५४). त्या वेळीं हे साठ वर्षांचे असावेत.

आदिनाथ-हरिनाथ-रघुनाथ-मुकुंदराज अशी यांनीं आपली गुरुपरंपरा दिली आहे. मध्यप्रांतांत भंडाऱ्याजवळ वैनगंगा नदीच्या कांठीं अंभोर म्हणून तीर्थ आहे तेथें हरिनाथाची समाधि आहे. रघुनाथाची समाधि जवळच छिंदवाड्यास आहे. मुकुंदराजाची समाधिहि बैतुलजवळ खेडलें नांवाच्या गांवीं जुन्या पडक्या किल्ल्यांत आहे. यावरून ही त्रयी नागपूरकडील आहे असें ठरतें. जोगाईच्या आंब्यास मुकुंदराजाची समाधि दाखवितात पण त्या यांच्या पादुका आहेत. हे सर्व शैव होते.

पवनविजय हा संस्कृत स्वरोदयाचें भाषांतर असणारा शेख महमद कवीचा ग्रंथ मुकुंदराजाच्या नांवावर कांहीं चुकीमुळें दाखल झाला आहे. अनंत बडवे यानें याच्या मूळ मराठींत लिहिलेल्या विवेकसिंधूचें संस्कृत भाषेंत भाषांतर केलें.

२. (समाधि स. १७७५) एका बाडांत नृहरिसुतकृत 'श्रीमुकुंदराजचरित्र' दिलेलें आहे. या मुकुंदराजाचे

गुरु कोकीळ होत. यानें देवाची आराधना केली, तेव्हां याला गंगाधर कोकीळ गुरु करण्याविषयीं दृष्टांत झाला.

यानें शेवटीं चतुर्थाश्रम घेतला होता व त्या आश्रमीं याचें नांव ब्रह्मानंद होतें. ब्रह्मानंदांनीं पैठणास शके १६९७ त वैशाख व. १ स. भीमवासरे जलसमाधि घेतली, व यांचें चरित्र नृहरिसुतांनीं त्याच शकाच्या ज्येष्ठांत वर्णिलें असल्यामुळें तें अत्यंत विश्वसनीय मानण्यास हरकत नाहीं. यानें आपला देह गुरुसेवेंत फार कष्टविला. हा ब्रह्मचारी होता (मं. अहवाल १८३४).

२. एक रामदासी. भीमस्वामीचे शिष्य जे गोविंदबाबा त्यांचे हे पुतणे. यांचे ग्रंथः देवभक्तानुवाद, रामकृष्ण विलास, गरुडबाधपंचक वगैरे होत. यांचीं कांहीं पदेंहि प्रसिद्ध आहेत सं. सू. .

मुकुंदराम—(कावळकंकण मुकुंदराय पाहा).

मुकुंदराव—मराठा सरदार (बुबुजीखानूम पाहा).

मुकुंददत्त—(जन्म स. १७९) याचें मूळ नांव कलाकार. गांव नांदेड. हा सरदेशपांडे यांच्या घरांत दत्तक आला. गुरु शकानंदानें स्वप्नांत अनुग्रह दिला. मराठी, फार्सी, ऊर्दू, संस्कृत वगैरे भाषा चांगल्या येत असत यानीं शेवटीं संन्यास घेऊन ' नित्यानंदस्वामी ' असें नांव घेतलें. यांनीं आपल्या वंशाची हकीगत स्वतःपर्यंत ओवीबद्ध ग्रंथ रचून स्वतः लिहिली आहे. पुढील हकीगत दासगणूंनीं लिहिली आहे (म. क. च. भा. ६०, पृ. २४७-६०).

मुक्कु तिमण्णा—हा जातीनें नियोगी तेलंगी ब्राह्मण असून कवि होता. हा कृष्णदेव रायलूच्या पदरीं असे. याचें 'पारिजातहरण' नांवाचें काव्य तेलंगी भाषेंत आहे.

मुक्ताकुंभ—(स. ९०० नंतर) बुद्ध तर्कज्ञ. यानें धर्मोत्तराचार्याच्या ' क्षणभंगसिद्धी'वर क्षणभंगसिद्धीव्याख्या नांवाची टीका लिहिली आहे. तिबेटी भाषांतर फक्त उपलब्ध आहे.

मुक्तानंद—(स. १८०७ सुमार) हा गुजराथी कवि काठेवाडांतील गडढा येथील राहणारा होय. उद्धवगीता, धर्मामृत-पान, सतीगीता, रुक्मिणीविवाह, कृष्णप्रसाद व धर्मामृत इतके ग्रंथ यानें लिहिले. यांशिवाय यांचीं कित्येक पदें आहेत.

मुक्तापीड—ललितादित्याचें नामान्तर

मुक्ताबाई—(जन्म स. १२७९-समाधि स.१२९७) जुनी मराठी कवियित्री. ही ज्ञानेश्वराची बहीण होय. हिचा जन्म आपेगांवीं स. १२७९ मध्यें झाला. नंतर पैठण गांवीं गेली. तेथून नेवाशाच्या रस्त्यानें आळंदीस येऊन वास्तव्य केलें. हिचे गुरु निवृत्ति व शिष्य चांगदेव. ज्ञानेश्वर व सोपान यांच्या समाधीनंतर एदलाबादेजवळ माणगांवीं हिनें जलसमाधि घेतली. हिचे ग्रंथ–कल्याणपत्रिका, नमन, हरिपाठ हे होत. ही अविवाहित होती. हिच्या नांवावर असलेले ताटीचे अभंग फार प्रसिद्ध आहेत.

हिचे ताटीचे अभंग विशेष गोड आहेत. एकं दिवस ज्ञानेश्वरास पाहून एका टवाळानें, या संन्याशाच्या पोराचे दर्शन घडलें, मोठा अपशकुन झाला, असें म्हटलें. तें ऐकून ज्ञानेश्वर खिन्न झाले आणि खोलींत बसून खोलीचें दार (म्हणजे ताटी) लावून घेतलें. मुक्ताबाईसहि ताटी उघडीनात. तेव्हां हिनें ताटी उघडण्याविषयीं विनंति केली ते हे अभंग होत.

हिची 'निवृत्तिप्रसादें मुक्ताबाई' ही अभंगरूपी कविता अद्यापि अप्रसिद्ध आहे (मं. त्रै. १२-४, ले. ३५).

हिची समाधि खानदेशांत तापीतीरावर असलेल्या मेहुण या गांवांत आहे. एदलाबाद या गांवांत हिचें समाधि नसून हिचें मंदिर आहे.

मुक्तेश्वर—(जन्म स. १५९१-मृत्यु स. १६४९सुमार) पैठण येथील प्रसिद्ध एकनाथस्वामींचा हा नातू होय. एकनाथांना गोदूबाई नांवाची एक कन्या असून ती कुरुंदवाडजवळ राहणाऱ्या आत्रगोत्री गृहस्थाला दिली होती. गोदूबाईचें सासरचें नांव गंगाबाई आणि तिच्या पतीचे नांव चिंतामणी ऊर्फ विश्वंभरबाबा. मुक्तेश्वराच्या वंशजास कोल्हापूर सरकारांतून जी सनद मिळाली आहे तीवरून मुक्तेश्वर हे एकनाथाच्या गंगाबाई नांवाच्या कन्येचे पुत्र यांत शंका नाहीं. राजवाडे, पांगारकर व कविचरित्रकार म्हणतात कीं हिलाच नाथ कौतुकानें लीला म्हणत व हीहि 'लीला विश्वंभर' असा आपल्या मातापितरांचा निर्देश करतो. याचे आडनांव मुद्गल. देशस्थ ऋग्वेदी आश्वलायन ब्राह्मण. याचा जन्म शके १५२१ मध्यें झाला व मृत्यु शक १५७१ पूर्वी तेरवाड येथें झाला. तेथें याची समाधि आहे. हा दत्तभक्त होता. हा मराठीतील अत्यंत श्रेष्ठ दर्जाचा कवि आहे. याचे ग्रंथ—१ महाभारत (पर्वे– आदि, सभा, वन, विराट, सौप्तिक, शांति (अप्रसिद्ध), बाकीचीं बारा पर्वे अनुपलब्ध). १ नाटकरामायण ऊर्फ कौतुहल–रामायण, २ भागवत, ३ अग्निपुराणांतील हरिश्चंद्राख्यान, ४ फुटकळ पदें, ५ आरत्या, ६ भविष्योत्तरपुराणावर ओवीबद्ध ग्रंथ.

मुगुटराव—(स. १८४२) नागपूरच्या आपासाहेब भोसल्याचा दुसरा तोतया मुगुटराव म्हणून शिंद्यांचे राज्यांत निघाला. बळवंतराव व नाना कोतवाल म्हणून त्याचे हस्तक होते (ना. प्रां. इ. पृ. ४६७).

मुग्धतुंग कलचुरी—(स. ९००) कोक्कलदेव कलचुरीचा पुत्र. याला प्रसिद्ध धवलहि म्हणत.

मुघिसुद्दीन तुघ्रील—पहिल्या तुघ्रीलचें संपूर्ण नांव.

मुजफर—(स. १३९१-१४११) गुजराथचा सुलतान. हा मूळचा हिंदु असून पुढें मुसलमान झाला. हा गुजराथच्या रास्तीनखानास मारून आपण स्वतंत्र झाला. हा हिंदुधर्माचा फार द्वेष करीत असे. याला तातारखान नांवाचा एक मुलगा होता. पुढें याचें व त्याचें न पटून त्यानें यास कैद केलें व तो गादीवर बसला. पण तो लवकरच मरण पावल्यामुळें हा फिरून गादीवर बसला (स. १३९६). पण पुढें याचा नातू अहमदखान विशेष पराक्रमी निघाल्यामुळें त्यानें यास विषाचा प्याला पाठवून तो पेला यास पिण्यास भाग पाडलें.

२. (स. १५११-१५२६) गुजराथचा सुलतान. हा महम्मूद बेगडाचा मुलगा. यानें मेवाडच्या संग राण्याचा पराभव केला होता. याचा मुलगा बहादूरशहा याजवर रुसून गेल्यामुळें, हा मरण पावला.

३. (स. १५६१-७२) गुजराथचा सुलतान. हा तिसऱ्या महमूदाचा मुलगा. हा राज्य चालविण्यास अगदीं नालायक असल्यामुळें, याच्या राज्यांत फारच अंदाधुंदी माजून गेली होती. अशा प्रसंगीं इतिमादखान नामक एका उमरावानें अकबरास पाचारण करून याजवर स्वारी करण्यास सांगितलें. तेव्हां अकबरानें स. १५७२ त अहमदाबादेवर स्वारी करून यास पळून लाविलें व अकबराने गुजराथचें राज्य आपल्या ताब्यांत घेतलें.

मुजफरखान गारदी—(फांशी स. १७५९) बुसीनें आपल्या तालमींत जीं माणसें तयार केलीं त्यांपैकींच मुजफरखान हा एक होता. हा प्रथम बुसीजवळ होता, पण पुढें याचें व त्याचें वांकडे येऊन हा तेथून निघाला हा कवायती फौजेंत तज्ज्ञ होता म्हणून नानासाहेब पेशव्यांनीं यास कवायती फौजेवर ठेविलें. पण पुढें याचें व महादजी पुरंदऱ्याचें भांडण होऊन हा पेशव्यांपासून निघाला, व सावनूरच्या नबाबाच्या नोकरींत शिरला. हा परत पेशव्यांकडे नोकरीसाठीं आला व सदाशिवराव भाऊनें याला घेण्याचें नाकारलें असतांना देखील नानासाहेबानें याला नोकरींत ठेविलें. शेवटीं यानें सदाशिवरावभाऊचा खून करण्याचा प्रयत्न केला असतां तो फसला. तेव्हां नानासाहेब पेशव्यानें याचा शिरच्छेद केला. याला कोणाचेंहि वर्चस्व खपत नसे म्हणून हा कोठेंहि एका ठिकाणीं न राहतां सारखा नोकरीच्या शोधांत असे, पण प्रत्येकाला याचा फार वचक असे.

मुजफरजंग—(खून स. १७५१) हैदराबादच्या निजामुल्मुल्काचा नातू. यानें स. १७४८ त कर्नाटकावर स्वारी करून चंदासाहेबास अर्काटच्या गादीवर बसावलें. फ्रेंच गव्हर्नर डुप्लेच्या साह्यानें हा हैदराबादचा नबाब झाला. हा हैदराबादेस जात असतां, वाटेंत याचा खून झाला.

मुजहीदशाहा बाहामनी—(स. १३६५-खून स. १३७८) हा मुहम्मदशाहा बाहमनीचा मुलगा. यानें विजयनगरच्या बुक्करायाशीं युद्ध पुकारून त्याचा पराभव केला. याचा सरदार दाऊदखानानें याचा खून करून, आपण गादीवर बसला.

मुत्तु कृष्णाप्पा नायक—(स. १५६४-७३) मदुरेचा राजा. पत्नी लक्ष्मी.

२. (स. १६०१-९) मदुरेचा राजा. यानें प्रथम राजा ही पदवी धारण केली. तिसऱ्या विश्व नायकाचा मुलगा. याचे विजयनगरच्या दुसऱ्या वेंकटाशीं संबंध चांगले होते.

मुत्तु लिंग नायक—(स.१६७८) मदुरेचा राजा. यानें कांहीं महिने राज्य केलें. पुढें म्हैसूरकर व मराठे यांनीं याचें राज्य घेतलें.

मुत्तु वीरापा नायक—(स. १६०९-२३) मदुरेचा राजा. तंजावरच्या राजाशीं याचें युद्ध झालें.

२. (स. १६५९) मदुरेचा राजा.

३. (१६८२-८९) मदुरेचा राजा.

मुद्गल—(स. १४१३-१९) हा एक ऋग्वेदावरील भाष्यकार आहे. याच्या भाष्याचा संशोधनाकरितां मॅक्समुल्लरनें उपयोग केला होता. म्हैसूर, इंडिया ऑफिस किंवा लाहोर येथील पं. भगवद्दत्त यांच्याकडे असलेल्या प्रती अपुऱ्या आहेत. हा सायणभाष्याचा संक्षेप करतो. इंडिया ऑफिसच्या प्रतीवर संवत् १४७- असा अर्धवट लिहिला आह. पं. भगवद्दत्ताच्या मतें हा काळ स.१४१३-१४१९ सुमाराचा असावा.

मुद्गल जोशी—(स. १८०० सुमार) हा सोलापूरच्या जगन्नाथ जोशाचा वडील मुलगा आणि राम जोशाचा वडील भाऊ. याचें मराठी व संस्कृत भाषेंतील कवित्वहि उपलब्ध आहे. याचा मराठींतील स्फुट सुभाषतांचा संग्रह श्री. शंकरराव जोशी यांना मिळाला आहे. पण याची संस्कृत भाषेंतील प्राविण्याबद्दल विशेष ख्याति होती. यानें 'यदुवंश' नामक रघुवंश महाकाव्याच्या धर्तीवर १९ सर्गांचें विस्तृत संस्कृत महाकाव्य रचलें आहे पण ते अद्यापि अनुपलब्ध दिसतें (ऐतिहासिक पोवाड्याची प्रस्तावना, पा. ५९).

मुद्गलभट्ट—तेलगू भाषेंतील रामावरील मुद्गलशतकाचा कर्ता.

मुद्दप्पा संगम—(स. १३५५-१४०० सुमार) विजयनगरच्या संगम घराण्यांतील पहिल्या बुक्करायाचा भाऊ. याच्या पदरीं मोठी सेना असे.

मुधोजी निंबाळकर—(स. १५१२-२७) हा बाजीनंतर फलटणच्या गादीवर आला.

२. (स. १६१०-४४) हा वणगोजी ऊर्फ जगपाळरावाचा मुलगा (बजाजी निंबाळकर व सईबाई भोसले पाहा).

३. (स. १७४८-६५) हा जानोजीचा मुलगा. हा पेशव्यांच्या तंत्रानें वाग. याचा भाक्त ब्रह्मेंद्रस्वामीवर होता. याचा पत्नी सगुणाबाई. पताच्या पश्चात् तिनेंहि पुष्कळ वर्ष राज्य केलें.

मुधोजी भोसले—(स. १६५० सुमार) हा नागपूकर भोसल्यांचा मूळपुरुष प्रसिद्ध परसोजी भोसल्याचा बाप. मुधोजी व त्याचा भाऊ रुपाजी यांच्या पूर्वजांनीं पुणें प्रांतांतील हिंगणीनजीक बेरडी हा गांव वैराण होता, ता त्या वेळच्या सरकारांतून वसविण्याकारितां घेतला व तेथील पाटीलकी संपादन करून वसावला. शेतीं वगैरे लावून गव्हाचीं लागवण केली. त्यामुळें 'हिंगणीकर भोसले' हें नांव पडलें. मुधोजी व रुपाजी हे शिपाईगिरीचाहि धंदा करीत. ते शहाजी भोसल्याचे समकालीन असून प्रथम निजामशाहींत नोकर होते.

हे दोघे धार्मिक व श्रीमंत होते. त्यांनीं खंडेरायाची व देवीची अशा दोन मूर्ती सोन्याच्या प्रत्येकी सव्वापांच मणांच्या केल्या होत्या अशी आख्यायिका आहे.

मुधोजीस तीन पुत्र होते. वडील बापूजी, दुसरा परसोजी व तिसरा साबाजी (बखर पान ६).

२. (मृ. स. १७८८) हा पहिल्या रघुजी भोसल्याचा मुलगा. याचा बाप मरतांच यानें आपल्या जानोजी नांवाच्या भावास कळविलें कीं, मी वडील असल्यामुळें दौलतीची मालकी मजकडे द्यावी. पण या दौलतीच्या मालकीमुळें याचें व याच्या भावाचें भांडण होऊं लागलें म्हणून नानासाहेब पेशव्यानें यास सेनाधुरंधर असा किताब देऊन, चंद्रपूर व छत्तीसगड हीं शहरें दिलीं. परंतु याचा व जानोजीचा तंटा न मिटतां, त्यांची लढाई झाली व तींत याचा मोड होऊन ह्या दोघांत तह ठरला व त्यांत यानें सर्व कारभार पाहावा असें ठरलें. जानोजीच्या मृत्यूनंतर याचा मुलगा रघूजीस से. सा. सुभ्याचीं वस्त्रें द्यावा असें त्यानें सांगून ठेविलें होतें.

परंतु याबद्दल याचें व साबाजीचें भांडण होऊन दोघांची लढाई झाली, तींत दोघांचा तह होऊन यानें व साबाजीनें मिळून कारभार पाहावा असें ठरलें.

साबाजीस जानोजीची बायको दुर्गाबाई हिचें साह्य होतें. परंतु पुढें ती यास जाऊन मिळाल्यामुळें पुन्हां भांडणास सुरुवात झाली. त्याला नारायणराव पेशव्यांचें साह्य मिळालें होतें, व याला रघुनाथरावदादांचें साह्य मिळालें होतें. पुढें नारायणरावाचा खून झाल्यानंतर दादानें यास आपल्या मदतीस बोलाविलें व याचा मुलगा रघुजीस वस्त्रें देण्याचें कबूल केलें (स.१७७३). स.१७७५ मध्यें याची व साबाजीची लढाई होऊन साबाजी मारला गेला. स. १७७७ मध्यें छत्रपति रामराजा निपुत्रिक मरण पावला. तेव्हां हेस्टिंग्जनें नानाचा पाडाव करण्यासाठीं यास नेऊन साताऱ्यास छत्रपति करावें अशी सिद्धता केली. पण नानांच्या पुढें याचें कांहीं चालूं शकलें नाहीं. उलट नानानें तंबी देऊन यास घाबरावलें. तेव्हां स. १७८१ त यानें हेस्टिंग्जला आपले हातून पुणें दरबारशीं मध्यस्थी होणार नाहीं असें कळावलें. स. १७८५ त बदामीच्या वेढ्यांत हा व याचा पुत्र खंडोजी हे दोघेहि हजर होते. हा स. १७८१ पर्यंत दिवाकर पंडित नांवाच्या दिवाणाच्या सल्ल्यानें वागत असे. याला दोन बायका व रघूजी, खंडोजी व व्यंकोजी असे तीन मुलगे होते. यानें आपल्या नांवाचा शिक्का काढून त्यांत पुढील श्लोक घातला होता: शाहूप्रसादेन रघूजी सुयशोधरः । तत्सूनास्तु मुधोनाम्नस्तस्य मुद्रा विराजते ॥" (ना. प्रां. इं.).

३. (स.१७९६-१८४०) हा व्यंकोजी ऊर्फ मन्याबापू भोसल्याचा मुलगा. दुसऱ्या रघूजीचा मुलगा परसोजी हा वेडसर निघाल्यामुळें राज्याचा कारभार कोणीं करावा हा प्रश्न उभा राहिला व रघूजीची कारस्थानी बायको बांकाबाई हिचा एक पक्ष व अप्पासाहेबाचा दुसरा पक्ष असे दोन पक्ष निर्माण होऊन कारभारांत भांडण उत्पन्न झालें. यानें इंग्रज रेसिडेंटाशीं संधान बांधून, त्याच्यापासून मदत मिळवून बांकाबाईच्या सैन्याचा पराभव केला, व परसोजीस गादीवर बसवून, त्याजकडून आपणास राज्याचे मुखत्यार नेमल्याचें जाहीर केलें, व इंग्रजांशीं स. १८१६ त तैनाती फौजेचा तह केला. ता. २१-४-१८१७ त परसोजी मरण पावला व याच्या घराण्यांत याच्याशिवाय दुसरा पुरुषच न उरल्यामुळें हा गादीवर बसला. गादीवर बसल्यानंतर सेनासाहेब सुभ्याचीं वस्त्रें आणण्यासाठीं इंग्रज रेसिडेंट नको म्हणत असतां यानें आपला वकील पुण्यास पाठविला. परंतु हें करणें रेसिडेंटास पसंत न

पडून त्यानें याच्याशीं लढाई करून याचा पराभव केला. तेव्हां यानें इंग्रजांशीं तह करून हा इंग्रजांच्या स्वाधीन झाला.

परंतु याला इंग्रजांच्या हातांतलें बाहुलें बनण्याचा कंटाळा येऊन हा त्यांच्याविरुद्ध धडपड करूं लागला. तेव्हां याला इंग्रजांनीं पकडून प्रयाग येथें नेऊन ठेविलें. परंतु तेथून यानें फितुरी करून आपली सुटका केली. परंतु यास कोणीहि इंग्रजांच्या भीतीनें थारा देईना, तेव्हां हा तसाच दडून हिंडत असतां स. १८२९ त जोधपूरच्या राजानें यास पकडलें. पण इंग्रजांच्या ताब्यांत न देतां त्यानें आपल्या नजरकैदेंत ठेविलें, व शेवटीं हा नजरकैदेंतच असतां स. १८४० त मरण पावला. याला उमाबाई व सावित्रीबाई अशा दोन बायका होत्या.

मुनिचंद्र—(स. १२२९) कानडी जैन कवि. याचा को ताहि ग्रंथ उपलब्ध नाहीं. याचा शिष्य गुणवर्ण दुसरा हा कार्तवीर्य रट्टाचा गुरु होता (बॉ. ब्र. रा. ए. सो. १०, पा. २६०). कार्तवीर्याचा मुलगा लक्ष्मीदेव यास हा शस्त्रविद्या व शास्त्र शिकवीत असे. तसेंच हा रट्ट राजाचा सचीवहि होता. यानें अत्यंत पराक्रम गाजवले, शत्रूंना नाहींसें केलें आणि रट्टराज्यप्रतिरक्षणाचार्य अशी पदवी घेतला (क. क. च. भा. १, पा. ३४६).

मुनिव्यास—(ग्रंथकाल स. १३५३) एक महानुभाव. याला कुमाराम्नाय कोठी असेंहि म्हणत. यानें शके १२७५ (स. १३५३) मध्यें स्थानगोथी नांवाचा महत्त्वाचा गद्यग्रंथ लिहिला. महानुभावपंथास पूज्य असलेल्या अवतारी विभूती श्रीदत्त, श्रीकृष्ण, श्रीचक्रपाणी, श्रीगोविंदप्रभु आणि श्रीचक्रधर यांच्या लीलांनीं पवित्र झालेलीं स्थानें सर्व महाराष्ट्रभर व महाराष्ट्राबाहेरहि पसरलेलीं होतीं. त्यांपैकीं कित्येक स्थानांवर झालेल्या लीला तर कित्येकांच्या आठवणींतहि होत्या. पुढील पिढीस त्या समजाव्या म्हणून त्या स्थानांवर स्मृतिचिन्हें राहावीं आणि तीं एकत्रित अशीं एखाद्या ग्रंथांत वाचावयास मिळावीं म्हणून यानें वरील ग्रंथ लिहिला आणि त्या स्थळीं ओटे बांधविले. हें काम यानें अत्यंत भक्तीनें, चिकित्सेनें आणि परिश्रमपूर्वक केलें आहे. मोजमाप, चतुःसीमा वगैरे व्यवस्थित दिलेल्या आहेत. रिद्धिपूर, फलटण, सिन्नर, पैठण, नाशिक, मेहकर इत्यादि शहरांतील अनेक महत्त्वाच्या स्थलांचा याच्या ग्रंथांत निर्देश आहे (म. वा. इ. भा. २. ७ २९-३१).

मुनिसुव्रत—हा जैनांचा विसावा तीर्थंकर (तीर्थंकर पाहा).

मुनीश्वर—(जन्म स. १६०३-१६५०) हा रंगनाथाचा (गूढार्थप्रकाशिकाकार) पुत्र होय. त्या टीकेचा जो काल (शके १५२५) तो याचा जन्मकाल होय. यानें भास्कराचार्यांच्या लीलावतीवर निवृति टीका लिहिली आहे. शिरोमणीच्या दोन अध्यायांवर मरीची टीका व सिद्धांतसार्वभौम हा स्वतंत्र सिद्धांतग्रंथ असे याचे तीन ग्रंथ प्रसिद्ध आहेत.

सिद्धांतसार्वभौम श. १५६० मध्यें समाप्त झाला, आणि त्यावर मुनीश्वराचीच टीका आहे, ती शके १५७२ त समाप्त झाली, असें सुधाकर लिहितात.

मुनीश्वरालाच कोणीं विश्वरूप या नांवानें संबोधीत असत. याचा गुरु नारायण होता, असें हा स्वतः लिहितो.

मुप्पादी नायक—दुसऱ्या प्रतापरुद्र काकतीयांचा सेनापति.

मुप्पितदेव ओडियार—(स. १५७६-७८) म्हैसूरचा राजा. हिरे चामराजाचा मुलगा.

मुबारक—(कविताकाल स. १६१३) एक हिंदी कवि. याचे ग्रंथ अलकशतक व तिलकशतक.

२. (स. १४२७) सिंधच्या जामराजांचा दिवाण.

मुबारक खल्जी—(स. १३१६-२०) हा अलाउद्दीनाचा मुलगा होय. मलीक काफूरचा खून होतांक्षणींच शहबुद्दीनास पदच्युत करून यानें स्वतः गादी बळकावली. गुजराथेमध्यें याच वेळीं बंड झालें होत, तें मोडून तेथें शाफरखान नांवाच्या आपल्या सासऱ्यास नेमलें. देवगिरीच्या हरपाळदेवानें उठाव करतांच यानें त्याजवर स्वारी करून त्याचा पराभव केला.

हा दुर्व्यसनी व चैनी होता. हलक्या लोकांना मोठ्या जागा देण्यांत आल्यामुळें दरबारीं मुत्सद्दीमंडळाचा मान राहीनासा झाला. हसन नांवाच्या आपल्या आवडत्या माणसास यानें वजीर नेमिलें. यानें मलबारवर स्वारी करून बरीच लूट मिळविली. हा बराच आळशी व व्यसनी होता, त्यामुळें राज्यांत दारूचीं दुकानें वाढलीं. सर्वत्र महागाई झाली. देशांत बंडें उद्भवलीं. त्याचा परिणाम असा झाला कीं, दडपशाहीनें ती दडपून टाकण्यांत आली. परंतु अखेर ज्याला हात दिला त्या हसननें विश्वासघातानें यास ठार मारलें व अशा रीतीनें या घराण्याचा शेवट झाला. नासिरुद्दीन खुसरोशाह ही पदवी धारण करून हसन गादीवर बसला. पण त्यालाहि ठार करून घियासुद्दीन तुघलक बादशाहा झाला (मलीक नायब काफूर हजारदिनारी पाहा).

मुबारकखान—(मृत्यु स. १७२४ सप्टें. ९) निजामानें याला साकरखर्ड्याच्या लढाईंत ठार केलें (अमानतखान, कंबरजखान व मुहम्मदशाह सूर पाहा).

मुबारक फारुकी—(स. १५३५-६६) हा तिसऱ्या आदिल फारुकीचा मुलगा व मिरान मुहम्मदाचा भाऊ. यानें गुजराथच्या सरदारांच्या विनंतीवरून बहादूरच्या पुतण्यास तेथलें राज्य देऊन त्या मोबदल्यांत सुलतानपूर व नंदुरबार हे परगणे घेतले.

मुबारकखान बाहमनी—(स. १४२२ सुमार) हा फीरूजशाह बाहमनीचा दुसरा मुलगा. याला हसनखान नांवाचा भाऊ होता.

मुबारक लोदी—(स. १४५१ सुमार) हा बहलोल लोदीचा पुत्र. याचा भाऊ निजामखान सिकंदर नांवानें दिल्लीच्या गादीवर आला.

मुबारक सय्यद—(स. १४२१-३४) हा खिजखान सय्यदाचा मुलगा. याचें नांव मुइझुद्दीन मुबारकशाह असें होतें. याचा पुत्र मुहम्मद. याचा सरूर उल्मुल्क या प्रधानानें खून केला.

मुभट—(स. १२४३) 'दूतांगद' या संस्कृत नाटकाचा कर्ता.

मुराद मोगल—(मृत्यु स. १५९९) दिल्लीच्या मोगल घराण्यांतील जो अकबर बादशाहा त्याचा हा मुलगा होय. याला जहांगीर व दानियाल असे दोन भाऊ होते. हा स. १५९९ मध्यें मरण पावला. हा गुजराथचा सुभेदार होता. मोगलांचें अहमदनगरच्या निजामशाहीशीं युद्ध चालू असतां यानें अहमदनगरच्या किल्ल्यास वेढा दिला, पण यास किल्ला सर करतां आला नाहीं. शेवटीं वऱ्हाड प्रांत घेऊन हा परत निघून आला (स.१५९४).

२. (खून स. १६६१) दिल्लीच्या शाहजहान बादशाहाचा मुलगा. याचा स. १६६१ मध्यें औरंगजेबानें खून केला.

मुरग्गा—ही आंध्र कवयित्री अव्हेयरची बहीण. हिचा जन्म कावेरीपट्टण येथें झाला. ही एका भंडाऱ्याच्या घरीं वाढली. तामीळभाषेंत हिची कविता आहे.

मुन्यिमखान—(मृत्यु स. १७११) हा औरंगजेब बादशहाचा वजीर. याचें व झुल्फिकारखानाचें पटत नव्हतें. मराठ्यांना सनदा पाहिजे होत्या त्यांत ह्यानें ताराबाईच्या मागणीस पुष्टि दिली. याच्या मार्फतच पुढें ताराबाईशीं लढून आपला हक्क स्थापन करावा असा जबाब शाहूस मिळाला.

मुरार जगदेव—(खून स. १६३५) हा ब्राह्मण गृहस्थ आदिलशाहींत मुख्य वजीराचा कारभारी होता. दौलतखान मुख्य वजीर झाल्यावर त्यास खवासखान अशी पदवी देण्यांत आली आणि त्याचा कारभारी यास नेमण्यांत आलें (स. १६२९). या वेळीं शहाजहान दक्षिणेकडील एक एक राज्य जिंकीत होता आणि दक्षिणेकडील शाह्या मोगली संकटाकडे लक्ष न देतां आपसांत भांडत होत्या. शहाजी निजामशाही मोगलांविरुद्ध लढवीत असतां आदिलशाही शहाजहानला सामील झाली. हा व रणदुल्लाखान कान्होजी जेध्याला घेऊन पुणे प्रांतावर आले आणि यानें ' पुणे कसबा वसती जाळून तेथें गाढवाचा नांगर फिरविला, पुण्याचा कोट पाडून शहाजीचे वाडे जाळले व लूट केली आणि भुलेश्वरावर ' दौलतमंगल ' किल्ला बांधून तेथून पुणे प्रांतावर आदिलशाही अंमल सुरू केला ' (स. १६३०).

कुत्बशाहाच्या लोकांनीं आदिलशाहींतील मुलूख बेचिराख केला होता. तो वसाविण्यास लागणारा खर्च मिळेना तेव्हां कौलसला वेढा दिला व देशांतहि लुटालूट आरंभली. त्याच वेळीं आदिलशाही सरदार बाबाजी काटे याच्या मदतीस आला होता. तो फितुर होऊन कुत्बशाहास मिळाला. शेवटीं शहाजहानला तोंड देण्याच्या मुद्यावर तह झाला आणि दीड लाख रुपये खंडणी मिळाली (स. १६३१). शहाजहाननें परिंड्यावर स्वारी केली तेव्हां याला सरलष्कर करून पाठविण्यांत आलें. तेव्हां यानें परिंडा घेतला व मुलूखमैदान तोफ विजापुरी नेली (स. १६३२). अबदुल्ला कुत्बशाहाच्या बहिणीचे लग्न मुहम्मद आदिलशाहाशीं झालें त्यांत हा प्रमुख होता (स. १६३३). वधू व वऱ्हाडी मंडळी विजापूरजवळ येतात तोंच याला दौलताबादच्या वेढ्याच्या मदतीस रवाना केलें. परंतु याचें व फत्तेखानाचें न पटल्यामुळें आदिलशाही सरदारांत फूट झाल्यानें याला तेथें फारशी कामगिरी करितां आली नाहीं (ता. १७-६-१६३३). याच वेळीं भीमगड (पेमगिरी) येथून तिसऱ्या मूर्तझा निजामाच्या नांवानें निजामशाही कारभार करण्यास शहाजीनें सुरुवात केली व हा त्याला मान्यता देण्यास विजापूरकरांच्या सैन्यासह हजर होता (स. १६३३ सप्टें.). तेथें अंबरखान नांवाच्या सरदारास ५।६ हजार स्वारांनिशीं विजापूरकरांतर्फे शहाजीच्या मदतीस ठेवून हा विजापूरकडे निघाला.

वाटेंत भीमा व इंद्रायणी यांच्या संगमावर भाद्र. अमावास्येस सूर्यग्रहणप्रसंगीं (ता. २३-९-१६३३) यानें आपली सुवर्णतुला केली, नागरगांव हें नांव बदलून

तुळापूर ठेवलें, ३०० होनांची जमीन १६ ब्राह्मणांना अग्रहार दिली.

याच्या अंगावर कुष्ट झालें. तेथें नागरगांवच्या रुद्रनाथ नांवाच्या साधूच्या दर्शनानें व संगमावर स्नान केल्यानें गेलें म्हणून यानें तेथें संगमेश्वराचें देऊळ बांधलें. तें अद्यापि तुळापुरीं विद्यमान आहे.

खवासखान व हा यांचें वर्चस्व असह्य झालें, तेव्हां दोघांना वेगळें करण्याकरितां यादगिरीच्या इमामखानें बंड केलें होतें, तें मोडण्याकरिता यास पाठविण्यांत आलें. पण तेथें याचा मोड झाला आणि इकडे मुहम्मदशाहानें डोईजड झालेल्या खवासखानास सिद्दी रेहानकडून ठार मारलें आणि यालाहि पकडून कैद करून आणलें. शेवटीं निराश झाल्यामुळें हा अद्वातद्वा बोलल्यानें याची जीभ कापून, गाढवावरून धिड काढण्यांत आली आणि याचे तुकडे करून यास ठार करण्यांत आलें (स. १६३५). खवासखानानंतर एक महिन्याच्या आंत यास ठार केलें.

याच्या तर्फे जे हुकूम सुटत त्यांत यास 'महाराज-राजाधिराज मुरारीपंडत साहेब' असा मायना असे (शि. च. प्र. ले ८, पा. ९२). आणि दानपत्रांत 'धर्मावतारो राजाधिराजः महाराजः राजश्रीः पंडितः मुरारिः जगदेकप्रभुः सार्वभौमप्रातिनधीः' हे शब्द आहेत. त्यावरून याचा त्या वेळचा दर्जा लक्षांत येतो.

इब्राहीम कुत्बशाहाच्या पदरचा मुरारिपंडित हाच असावा(स.१५८०). तसेंच दौलतखानास गोवळकोंड्याच्या गादीवर आणणारा जगदेवराव याचा पिता असावा.

हा मूळ वाईजवळच्या धोमचा राहणारा होता असें म्हणतात.

मुरार परब्रह्म—(स. १६३० सुमार) एक साधु. पिता ब्रह्माजीपंत. आनंदतनय अरणीकर हे याचे शिष्य होत.

मुरारराव घोरपडे—(स. १७०४-१७७७ सुमार) मराठा सरदार. हा संताजी घोरपड्याच्या पुतण्याचा मुलगा. याच्या बापाचें नांव शिदोजीराव. याचा बाप मेल्यानंतर याच्या सगुणाबाई निंबाळकर नांवाच्या बहिणीनें यास साताऱ्यास नेलें व यास शाहूच्या पायांवर घातलें. हा पेशवाईच्या काळांत तीस वर्षे स्वतंत्रपणें वागून हैदर, इंग्रज व अर्काटचा नबाब वगैरे लोकांना एकमेकांविरुद्ध मदत करून आपला फायदा करून घेत असे. याच्याजवळ सतत आठ हजार उत्तम घोडदळ असे. हा पेशव्यांना मदत करीत असे. याला पेशव्यांनीं 'सेनापति' असा किताब दिला होता. हा मराठ्यांच्या अग्रणी सरदारांपैकीं एक बनला. यानें आपल्या शौर्याच्या जोरावर सबंध कर्नाटक जिंकून गुत्ती येथें आपली राजधानी केली. म्हणून यास गुत्तीकर घोरपडे असें नांव पडलें. यानें पेशव्यांच्यातर्फे स. १७४१ मध्यें त्रिचनापल्लीस झालेल्या चंदासाहेब व मराठे यांच्या घनघोर संग्रामांत जय मिळविला. तेव्हां ह्या कामगिरीबद्दल शाहूनें यास कर्नाटकाच्या सरदेशमुखीचें वतन व त्रिचनापल्ली किल्ल्याची सुभेदारी दिली. शेवटीं हा गुत्तीचा किल्ला सर करीत असतां हैदरच्या ताब्यांत सांपडला व त्यानें यास चांदीची बेडी घालून कपालदुर्गाच्या किल्ल्यांत ठेवलें, व शेवटीं या शूर सरदाराचा अंत तेथेंच झाला.

मुरारराव जाधव—(स. १७८० सुमार) भुईंज (जि० सातारा), वाघोली (जि० पुणें) आणि गांडापूर (इलाखा मोगलाई) ह्या तीन ठिकाणीं जाधवांचीं घराणीं होतीं. यर्थाल जाधव परस्परांचे भाऊबंद होत. यांत भुईंज व गांडापूर हें घराणें एकच. ह्या घराण्यांत शूर, अभिमानी आणि हांजी हांजी न करणारा असा एक सरदार सवाई माधवरावाच्या कारकीर्दीत होता.

नाना फडणीस इंग्रजप्रिय व महादजी दासापुत्र त्यामुळें हा दोघांशींहि बांकून वागे. हा त्यांना त्रासून बोलला कीं, "नानाची संगत व महादजीची पंगत या दोहोंचीहि मला गरज नाहीं. मी परमेश्वराची भक्ति करीन व तो माझ्या सर्व इच्छा पूर्ण करील." असें म्हणून हा निघून गेला. याचा पुन्हा पत्ता लागला नाहीं. पुढें याचा तोतया उत्पन्न झाला होता (भा. व. खं. ३, ऐ. गो. पृ. ३६ .

मुरारि—(स. १०५०-११३०) संस्कृत काव. अनर्घराघव नाटकाचा कर्ता. ह्याचें गोत्र मौद्गल्य होतें व हा भट्टश्रीवर्धमान आण तंतुमती यांचा पुत्र. यानें स्वतःस महाकाव असें म्हटलें आहे. इतकेंच नव्हे, तर हा आपल्याला 'बालवाल्मकी' असा किताब लावून घेतो. याच्या नाटकाच्या पाहिल्या अंकांतील सहा व सात या दोन पद्यांमध्यें जो गद्य भाग आहे त्यांत यानें उत्तररामचरित्र या नाटकांतील उतारा दिला आहे (६, ३०, ३१). आणि याच्या मागून झालेल्या ग्रंथकारांनीं याचा व भवभूतीचा अशा रीतीनें उल्लेख केला आहे कीं, त्यावरून हा भवभूतीच्या मागून झाला असावा असें वाटतें. मंखानें श्रीकंठचरित्रांत याचा निर्देश केला आहे (श्रीकंठ.२५.७४).

नाटकांतील वर्णनावरून माहिष्मती येथें राज्य करणाऱ्या एका कलचुरी राजाच्या पदरचा हा मुरारि कवि असावा असें आपणांस अनुमान करतां येण्यासारखें आहे. माहिष्मती म्हणजे नर्मदा प्रांतांतील हल्लींचें मांधाता नांवाचें ठिकाण होय.

'अनर्घराघव' हें सात अंकी नाटक आहे. यांत राम विश्वामित्राकडे गेल्यापासून रावणाचा पराभव करून अयोध्येस परत येईपर्यंतचा कथाभाग आहे. या ग्रंथकाराची नाटकरचनाशैली भवभूतीच्या नाटकाप्रमाणेंच आहे. वस्तुस्थितीच्या मजकुरापेक्षां वर्णनानें बराच मोठा भाग व्यापिलेला असतो. टीकेच्या साह्यावांचून ग्रंथ कळण्यास बराच कठीण जातो.

२. (स. १७१४ सुमार) एक मराठी कवि. हा कोल्हापूर येथें होऊन गेला याच्या पित्याचें नांव कृष्ण व मातेचें नांव राधा. हा शांडिल्यगोत्री ऋग्वेदी ब्राह्मण होता. यानें ओवीबद्ध भीष्मपर्व लिहिलें आहे. यानें इतर पर्वे केली नाहींत असें यानेंच शेवटीं लिहिलें आहे. भीष्मपर्व श. १६७६ भावसंवत्सर, माघ शुद्ध सप्तमीला पुरा केला आहे. हा ग्रंथ अप्रसिद्ध आहे. श्री. ल. रा. पांगारकर यांच्याकडे आहे (म. क. च. भा. २, पा. ७३–७७).

मूर्तझा निजाम—(स. १६६५–८८) हा अहमदनगरच्या हुसेन निजामचा पुत्र. हा लहानपणीं गादीवर आला, तेव्हां याची आई कारभार पाही. तिनें वशिल्याचे लोक कारभारांत नेमले, म्हणून लोकांनीं कट केला. तो फोडून तिनें कटवाल्यांना शिक्षा केल्या. यानें विजापूरवर स्वारी करून दुसऱ्या अली आदिलशाहास तह करण्यास भाग पाडलें. यानें इमादशहास ठार मारून इमादशाही आपल्या राज्यास जोडली. याला याचा मुलगा मिरानहुसेन यानें ठार केलें.

२. (स. १६०१–०७) हा अहमदनगरच्या निजामशाही घराण्यांतील शहाअलीचा पुत्र. यानें निजामशाही पुनः वाढीस लावली. दिल्लीचा अकबर मेल्यानें मलिकंबरनें बराच भाग काबीज केला. पुढें त्याचें व याचें जमेना.

३. (स. १६३३–३७) अहमदनगरच्या निजामशाही घराण्यांतील राजा. शहाजीनें हुसेननंतर यास गादीवर बसविलें. मुहम्मद आदिलशाहाच्या मदतीनें शहाजीनें अनेक ठिकाणीं मोगलांचा समाचार घेतला. पण पुढें शहाजहानेंनें निजामशाही घेतली व दीडशें वर्षे राज्य करून अहमदनगरची निजामशाही नष्ट झाली.

मुर्शीदकुलीखान—(मृत्यु स.१७२५) हा मूळचा दक्षिणेंतील एका ब्राह्मणाचा मुलगा. यास एका इराणी व्यापाऱ्यानें मुसलमान केलें. यास लहानपणीं मुहम्मद हादी म्हणत. याची हुषारी पाहून औरंगजेबानें यास कुर्तुलखान अशी पदवी दिली. यानें बंगालची व्यवस्था उत्तम ठेवल्यानें यास मुर्शीदकुलीखान अशी पदवी मिळाली. त्यानंतर हा स्वतंत्र झाला. यालाच जाफरखान ही पदवी दिसते. याची मुलगी सुजाउद्दीनला दिली होती. यानें आपली सुभेदारी आपल्या मागें आपला नातू सुजाउद्दीनचा मुलगा सरफराजखान यास दिली होती, पण हा मरतांच ती सुजाउद्दीननें आपणाकडे घेतली. याच्याच नांवानें मुर्शिदाबाद हें शहर वसविण्यांत आलें.

२. (स. १७४० सुमार) बंगालचा सुभेदार व सुजाउद्दीनचा जांवई.

मुल्ला दोपियाझा—(मृत्यु स. १६००) अकबराच्या दरबारांतील नवरत्नांपैकीं एक. याचा जन्म अरबस्थानांतील तैक गांवीं झाला. हा बापाच्या शोधार्थ इराणाहून हिंदुस्थानांत आला. पुढें हा कुराण वाचून पोट भरी म्हणून यास मुल्ला म्हणत. हा अत्यंत विनोदी होता. वरील नांवहि याला एका खाण्याच्या पदार्थावरून थट्टेनें देण्यांत आलें आहे. दक्षिणच्या स्वारींत हा बादशहाबरोबर होता. हा नर्मदातीरीं हंडिया येथें मेला. तेथें याची कबर आहे.

मुल्ला अबदुल लतीफ—(स. १६०० सुमार) विजापूरच्या अली आदिलशाहच्या वेळचा एक कवि.

मुल्ला फतेउल्ला शिराजी—(स. १६०० सुमार) हा विजापूरच्या अली आदिलशाहाचा दुसरा गुरु. खाजा इनायतुल्ला या शियापंथी गुरूस काढून यास ठेवलें.

मुल्ला मुहम्मद—(मृत्यु स. १६२४) विजापूरकरांचा प्रसिद्ध सेनापति. याचा जांवई मुस्तफाखान. हा भातवडीचे लढाईत मेला.

मुल्ला हैदर—(स. १६७२–१७०६) शिवाजीचा दुभाष्या फार्शी पंडित. स. १६७२ मध्यें यास बहादुरखानाकडे पाठविलें. संभाजीचें आणि याचें पटलें नाहीं म्हणून हा स. १६८३ त औरंगजेबाकडे गेला. तेथें याला अजीमुश्शानच्या शिक्षकाचें काम मिळालें. नंतर हा काजी (स. १७०६) व पुढें सरन्यायाधीश झाला.

मुशो दुरो ऊर्फ **मुशे दुरो**—सुरतेच्या फ्रेंच वखारीचा मुख्य एजंट. फ्रेंच लोक शिवाजीशीं स्नेहानें वागत असून त्यांजमध्यें सलोखा होता. स. १६७० च्या सुरतेच्या स्वारीच्या प्रसंगीं शिवाजीनें फ्रेंच वखारीस यत्किंचितहि उपसर्ग दिला नाहीं. फ्रेंचांच्या वखारी सुरत व राजापूर येथें होत्या (रा. खं. ८.८).

मुस्तफाखान—(स. १७४४) एक अफगाण सरदार. भास्करराम कोल्हटकराच्या खुनाच्या कटांत हा होता. यानें केलेल्या आनंदोत्सवाची माहिती प्रसिद्ध आहे (रा. खं. २.१०१).

२. (मृत्यु स. १७४८ नवं. ८) यानें नांव मीर्झा-मुहम्मद अमीन. मुहम्मद आदिलशाहास गादीवर बसविलें म्हणून ही पदवी मिळाली (शिवभारत प्र. ७५). हा मलिकंबरचा जांवई होता. तसाच मुल्ला मुहम्मदाचाहि जांवई होता. शहाजी कैद झाल्यावर जिंजीचा वेढा चालू असतां हा मृत्यु पावला.

मुहकमसिंग—हा हुसेन अलीचा दिवाण होता. हुसेन अलीनें २६-१२-१७१८ त उज्जयनी सोडली तेव्हां रस्त्यांत त्याला हा सरदार येऊन मिळाला. हा बुंदेला सरदार सय्यदांचा साह्यकर्ता असून औरंगजेबाचे वेळेपासून बादशाही फौजेंत नोकर होता.

" जाजवच्या लढाईत रामसिंग बांडे यांनीं तलवार चालविली त्यांत कित्येक लोक मेले व जखमी झाले. ते समयीं मुहकमसिंग यांनीं बांड्यावर वार केले, तेणेंकरून शीर उडालें. धड राहिलें तें सबंध कांहीं वेळ नाचूं लागलें, लोकांस आश्चर्य जालें. " (भा. गोविंद खंडोकृत शा. म. ब. ४२ रा. खं. २, पृ. ३५). हुसेन अलीचा खून झाला तेव्हां हा त्याजजवळ होता. सय्यदाचे (हुसेनअली) पश्चात् हा वजीर अमीनखानास शरण गेल्यामुळें यास त्यानें सहाहजारी मनसब दिली, आणि निजामाकडे मदतीस दक्षिणेंत पाठविलें. तेव्हां हा व चंद्रसेन यांनीं शाहूच्या प्रदेशावर चाल केली असतां शाहूनें यांचा पराभव केला (१७२०).

मुहणोत नैणसी—(जन्म स. १६१०–मृत्यु स. १६७०) हा मारवाडचा राजा पहिल्या जसवंतसिंगाचा दिवाण. हा मोठा विद्याप्रेमी होता. यानें राजपुतान्यांतील रजपुतांच्या राज्याचा इतिहास मारवाडी भाषेंत लिहिला आहे. तो राजपुतान्यांत 'मूता नैणसी की ख्यात' या नांवानें प्रसिद्ध आहे. यानें आपल्या या इतिहासांत पुष्कळ ठिकाणीं आपल्याला असलेली माहिती कोठून मिळाली हें लिहिलें आहे.

हा शूर होता. प्रारंभीं हा जोधपूरच्या राज्यांत नोकर होता, पण मागाहून जसवंतसिंगाचा दिवाण झाला (स. १६५७). जसवंतसिंगाचा मुक्काम औरंगाबादेस होता. तेव्हां त्याच्याबरोबर हा व याचा भाऊ सुंदरदास असे दोघेहि होते. तेथें जसवंतसिंग या दोघांवर कांहीं कारणानें अप्रसन्न झाला, व यांना कैद करण्यांत आलें. पुढें लाख रुपये दंडावर सोडण्यांत आलें, पण यांनीं दंड देण्याचें नाकारलें, म्हणून पुनः कैद करण्यांत आलें. कैद करून यांना जोधपूरला रवाना केलें. वाटेंत दंड वसूल करण्याकरितां यांच्यावर सक्ती सुरू झाली. तेव्हां या दोघां भावांनीं पाटांत कट्यार खुपसून घेऊन आत्महत्या केली. असा या ऐतिहासिक पुरुषाचा अन्त झाला.

मुहम्मद—(मृत्यु स. १५३५) काश्मीरचा राजा. हा हसनचा मुलगा. हा अल्पवयी असल्यानें याला कैद करून फत्तेखानानें राज्य बळकावलें, पण पुढें यानें सिकंदर लोदीची मदत घेऊन फत्तेखानाचा पराभव केला व राज्य मिळविलें.

२. (स.१७४१सुमार) भोपाळच्या दोस्त मुहम्मदाचा औरस पुत्र.

मुहम्मद अमीनशाह—(स.१७००सुमार) काबूलचा सुभेदार. हा मीरजुम्लाचा मुलगा. यास औरंगजेबानें मीरबक्षीगिरी दिली होती.

मुहम्मदअली—(स. १७४९–९५) अर्काटचा नबाब. यानें फ्रेंचांविरुद्ध इंग्रजांस मदत केली. फ्रेंचांनीं याचा पराभव करून त्रिचनापल्लीस वेढा दिला, तेव्हां यानें इंग्रजांकडे मदत मागितली. इंग्रजांनाहि पुणें दरबारशीं तह करण्याकरितां कोणी मनुष्य पाहिजेच होता. त्यांनीं याला मदत करून वेढा उठविला.

मुहम्मद अलीशाह—(स. १८३७–४२) हा अयोध्येचा राजा. याचें मूळ नांव नासिरुद्दौला असें होतें. पण याला इंग्रजांनीं ' मुहम्मद अलीशाह ' असा किताब दऊन गादीवर बसविलें. हा नासिरुद्दीनचा पुतण्या.

मुहम्मद आदिलशाह—(स. १६२६–५६) हा विजापूरच्या दुसऱ्या इब्राहीम आदिलशाहाचा मुलगा. यानें गादीवर येतांच शाहाजादा दर्वीशचे डोळे काढून,सुलेमानास कैदेंत ठेविलें. निजामशाहानें याच्यावर दोन वेळां स्वाऱ्या केल्या, पण त्याचा दोन्हीहि वेळां पराभव झाला. यानें शहाजी भोसल्यावर मुरार नांवाचा सरदार पाठवून आदिलशाहीचा गेलेला मुलूख परत मिळविला. याची व निजामशाहीचा कारभारी फत्तेखानाची लढाई झाली, तींत त्याचा पराभव झाला. शहाजहान बादशहानें यास मांडलिकत्व पत्करण्यासाठीं पत्र लिहिलें असतां, यानें उलट मोठ्या खुबीनें त्याला पत्र लिहून मित्रत्वाचें नातें मानण्यास लावलें. विजापूरचा प्रसिद्ध गोल घुमट याच्या हुकुमानें बांधला व त्यांत याचें प्रेत दफन केलें. यानें मुल्ला नहुर बिन मुल्ला नहुरी नांवाच्या मुसलमानास आपल्या कारकीर्दीचा तारीखवार ग्रंथ लिहिण्यास सांगितलें व त्यास 'मुहम्मद-नामा' असें नांव दिलें. हा जरी विलासी व रंगेल मनुष्य होता तरी प्रजासंरक्षणाकडे याचें सर्वोत्तम लक्ष असे.

याची कारकीर्द भरभराटीची झाली. कारण याच्या राज्यांत यानें पुष्कळ सुधारणा करून राज्य वाढविलें. यानें जीं युद्धें केलीं त्यांत यास यश आलें. एकंदरींत हा विजापूरच्या आदिलशाही घराण्यांतील एक कर्तबगार राजा झाला.

मुहम्मद आदिल सूर—(राज्यकाल स. १५५२-५३) दिल्लीचा बादशहा. याचा कारभार हिमू नांवाचा हिंदु प्रधान पाहत होता. हा राज्यास नालायक असल्यानें इब्राहीम सूरनें गादी बळकाविली.

मुहम्मद करीमशाह—(राज्यकाल स. १४४२-५१) गुजराथचा राजा. अहमदशाहाचा मुलगा. ईडरच्या राजानें यास मुलगी देऊन तंटा मिटविला. चांपानेरच्या गंगादासाचा यानें पराभव केला (स. १४४९). याला विष घालून दरबारी लोकांनीं ठार केलें.

मुहम्मद कुत्बशाह—(स.१६१२-३५) मुहम्मद अमीन कुत्बशाहाचा पुत्र. यानें गोवळकोंड्याच्या किल्ल्याचा तट बांधला व कांहीं कांवताहि केल्या आहेत.

२. (स.१५८१सुमार) हा इब्राहीम कुत्बशाहाचा पुत्र.

मुहम्मद कुली कुत्बशाह—(स. १५८१-१६१२) हा गावळकोंड्याच्या इब्राहीम कुत्बशाहाचा पुत्र. यानें विजयनगरच्या दुसऱ्या वेंकटराय आरविदूवर स्वारी केली, पण याला अपयश आलें. यानें पुनः पेणुकोंड्यावर स्वारी केली, पण तेव्हांहि याला अपयश आलें. यानें गोवळकोंड्याच्या नदीस धरण बांधून शहरभर पाणी खेळविलें. याच्या वेळीं ७८ लाख होन लोकोपयोगी कामांत खर्ची पडले. याची पत्नी भागावती, इतच्या नांवानें शहर वसाविलें, त्यास भागानगर असें म्हणत.इतच्या हैदर नांवाच्या मुलाच्या नांवावरून त्यास पुढें हैद्राबाद म्हणूं लागले.

मुहम्मद खल्जी—(स. १२०६) बंगालचा सुभेदार. यास इझ्झुद्दीन व मुहम्मद शीरान खल्जी अशीं दुसरीं नांवें आहेत.

मुहम्मदखान—(स. १४५८ सुमार) हा दुसऱ्या अलाउद्दीन बाहामनीचा भाऊ. यानें विजयनगरच्या राजाचा पराभव केला.

मुहम्मदखान सूर—(स. १५४५-५५) बंगालचा राजा.

मुहम्मद गझनवी—(स. १०३०-१०४२) हा याचा बाप मरण पावल्यावर गझनीच्या गादीवर बसला. पुढें याचा भाऊ मसूद हा याच्यापेक्षां अधिक कर्तबगार असल्यामुळें गझनीवर चालून आला; तेव्हां दरबारांतील लोकांनीं यास मसूदचे स्वाधीन केलें, व नंतर त्यानें याचे डोळे काढून बाल्ख येथें नजरकैदेंत ठेवलें. पुढें मसूदची सल्जुक लोकांबरोबर लढाई होऊन, तींत मसूदचा पराभव झाला (स. १०४०). तेव्हां तो आपल्या खजिन्यासह यास घेऊन लाहोरास पळून गेला. तेव्हां याच्या सैन्यांतील लोकांनीं मसूदचा खजिना लुटून, त्यास याच्या पुढें उभें केलें. मसूदला याचे पुढें उभें केलें असतां यानें औदार्यानें त्यास जीवदान दिलें. पुढें मसूदच्या मुलानें याच्यावर स्वारी करून यास व याच्या मुलास ठार केलें (स. १०४२).

मुहम्मद गुलाम—(स. १२८५) मुलतानचा सुभेदार. हा गुलाम घराण्यांतील घियासुद्दीन बल्बनचा मुलगा. हा स्वभावानें फार शांत व धैर्यशील होता. याला कलेची फार आवड असे. हा बल्बनचा फार आवडता मुलगा होता व त्यास असें वाटे कीं आपल्या पाठीमागें दिल्लीच्या गादीवर यानें बसावें, पण त्याची इच्छा पुरी झाली नाहीं. स. १२८५ मध्यें मोगल सरदार तमारखानानें मुलतानवर स्वारी केली, तेव्हां यानें त्याचा पराभव केला. परंतु कांहीं दडून बसलेल्या मोगल सरदारांनीं याजवर हल्ला हल्ला करून यास ठार मारलें. या वेळीं बल्बनला फार पुत्र-शोक झाला. तरी पण तो राज्याचीं कामें फार शांतपणें चालवी.

मुहम्मद घोरी—(स.१४३४-३६) हा माळव्याच्या गजनीखान घोरीचा मुलगा.

२. (शिहाबुद्दीन घोरी पाहा).

मुहम्मद तकी—(स. १७४० सुमार) ओरिसा प्रांताचा सुभदार. हा पहिल्या मुर्शीदकुलीखानाच्या जांवयाचा मुलगा.

२. (मीर पाहा).

मुहम्मद तातारखान—(स. १२६१-७५) बंगालचा सुभदार.

मुहम्मद तुघ्लक—(स. १३२५-१३५१) दिल्लीचा बादशहा. हा घियासुद्दीन तुघ्लकाचा वडील मुलगा. याच्या बापानें यास 'उलूघखान' असा किताब दिला. यानें बाप जिवंत असतांच गादी मिळण्याबद्दल स. १३२० त प्रयत्न केला; पण तो फसला (प्रतापरुद्र काकतीय पाहा). पण पुढें याचा बाप बंगालच्या मोहिमेवरून येत असतां यानें निजामुद्दीन अवलियाच्या संमतीनें बापाचा खून केला (स. १३०१) (निजामुद्दीन अवलिया पाहा).

यानें गादीवर आल्याबरोबर आपल्या भावास, तो देखणा असून फार लोकप्रिय होता म्हणून ठार मारलें.

स. १३२६ मध्यें याच्या बहिणीचा मुलगा बहाउद्दीन गुश्शास्पानें सागरकडे बंड केलें. तें याच्या सरदारानें मोडून, त्यास पकडून याच्या पुढें उभें केलें. यानें त्याचा उपहास करून त्याच्या अंगाचें कातडें काढून, त्याचें मांस त्याच्या बायकामुलांकडे पाठवून दिलें.

गुश्शास्पाच्या दक्षिणेकडील बंडामुळें राज्याच्या मध्यावर राजधानी असल्यास सर्व राज्याचें संरक्षण करण्यास सोपें जाईल असें याच्या लक्षांत आलें. लागलींच स. १३२७ मध्यें देवगिरी शहरास दौलताबाद असें नांव देऊन तें शहर राजधानी केल्याचें यानें जाहीर केलें व बळजबरीनें सर्व लोकांस तेथें राहण्यास नेलें. याचे कारकीर्दीत स. १३२८ मध्यें मुलतानचा सुभेदार मलीक ऐबा किश्लूखानानें बंड केलें; पण यानें तें बंड मोठ्या युक्तीनें मोडलें व त्यास ठार मारलें.

मोगलांनीं स. १३२९ मध्यें लाहोरवर हल्ला केला असतां, यानें त्यांना पळवून लाविलें. अयोध्येच्या सुभेदारानें बंड केलें असतां तें यानें मोडलें व परत मोठ्या औदार्यानें त्यास अयोध्येचा सुभेदार नेमलें (ऐनुन्मुल्क पाहा) व तेथेंच दुष्काळनिवारणार्थ स्वर्गपूर नांवाचें शहर वसविलें. यानें खजिन्यांतील पैशाचा तुटवडा भरून काढण्यासाठीं सोन्यारुप्याच्या ऐवजीं तांब्याचीं नाणीं पाडलीं, पण त्यामुळें फायदा न होतां, खजिन्यांत तांब्याचे डोंगर सांठले व परदेशांत त्याला मुळींच किंमत नसल्यामुळें याच्या राज्यांत फारच अंदाधुंदी झाली.

याच्या कारकीर्दीत एक भयंकर दुष्काळ पडला होता, व त्यामुळें याच्या राज्यांत लोक अन्नावांचून मरूं लागले, तेव्हां यानें दुष्काळनिवारणार्थ एक योजना आंखून त्यावर एक अधिकारी नेमला व त्या अधिकाऱ्यास 'अमीर-ई-कुही' असें नामाभिधान दिलें. ती योजना मुख्यतः शेतकी सुधारणेसंबंधीं होती. ती योजना अशीः सर्व राज्याचे १८०० चौरस मैलांचा एक असे विभाग पाडून, त्यांत एक वीतभरहि जागा नापेर न राहील अशी व्यवस्था अमीर-ई-कुहीचे खात्यांतील अंमलदारांनीं सक्तीनें अथवा जमेल तेथें लोकांची समजूत करून करावयाची. जमिनीची लागवण करतांना शेतकऱ्यांना सालोसाल एकच पीक करूं द्यावयाचें नाहीं. दरसाल पीक नवीन काढलेंच पाहिजे. हुकुमाच्या अंमलबजावणीकरितां मुकदम वगैरे लोक देखरेखीकरितां ठेविले. इतकी सर्व व्यवस्था केली तरी या खात्याला कांहींहि करितां आलें नाहीं. याच वेळेस हा मरण पावला म्हणून बरें झालें, नाहींतर सर्व कामगारांस यानें यमसदनास पाठविलें असतें.

यानें चीन देशावर स्वारी करण्याकरितां एक लाख सैन्य पाठविलें, पण थंडीमुळें त्या सैन्यांतील फक्त दहा लोक परत आले.

शेवटीं हा सिंधच्या स्वारीवर जात असतां ठठ्ठा येथें मरण पावला.

एकंदरींत याची कारकीर्द लोकांस फारच तापदायक झाली. यानें राज्यांत सुधारणा करण्याचे फारच प्रयत्न केले, पण राज्यांत सुधारणा न होतां बजबजपुरी माजून गेली. यानें कोणतीहि नवीन योजना आंखली व ती ताबडतोब अमलांत आली नाहीं तर हा लोकांचे फार हाल करीत असे. याच्या अर्धवट ज्ञानानें यास कांहींच करतां आलें नाहीं. म्हणून यास 'वेडा मुहम्मद' किंवा 'अचाट कल्पनांचा पुरुष' असें म्हणतात.

२. (राज्यकाल स. १३८९–९४) दिल्लीचा बादशाहा. याच्या पित्याचें नांव फीरूज तुघ्लक.

मुहम्मद फारुकी—(स. १५२०–३५) हा तिसऱ्या आदिल फारुकीचा पुत्र. इमादशाहाच्या वतीनें बुर्‍हाण निजामावर स्वारी केली असतां याचा पराभव झाला (स. १५२६). हा दीव येथें मरण पावला. हा गुजराथचा सुद्धां राजा होता.

२. (स. १५६६–७६) हा मुबारक फारुकीचा मुलगा. याचा गुजराथच्या स्वारींत पराभव झाला. अकबरशाहाच्या मीर्झा नांवाच्या भावानें खानदेशांत शिरून खूप लुटालूट केली. पुढें मुर्तझा निजामानें अशीरगडास वेढा दिला व बुर्‍हाणपुरावरून खानदेश लुटला. तेव्हां यानें त्यास चार लक्ष रुपये दिले (स.१५७४). पुढें दोन वर्षांनीं हा मेला.

मुहम्मद बकीर निजाम—अहमदनगरच्या पांहिल्या बुर्‍हाण निजामचा पुत्र.

मुहम्मद बंगश—(स. १७२९ सुमार) बुंदेलखंड वगैरे भागाचा मोगलांचा सुभेदार. हा एक अफगाण सरदार असून, यानें फर्रुखसियर बादशाहाच्या नांवानें फर्रुखाबाद शहर वसवून तेथें बंगशांचें राज्य स्थापिलें. स. १७३१ त माळव्याचा कारभार दिला. हा चार पांच हजार अफगाण सैन्य नेहमीं जवळ ठेवून स्वतंत्र राहत असे व जरूर त्या पक्षास मदत करीत असे. याचें सबंध नांव गझन फर्जंग असें होतें (१ बाजीराव पेशवे पाहा).

मुहम्मद बाहमनी—(स.१३५८–७५) बाहमनी राजा हसन गंगू ऊर्फ अलाउद्दीन शाहाचा मुलगा. याच्या कारकीर्दीत विजयनगर व तेलंगण येथील राजे एकत्र होऊन याच्यावर चालून आले. पण त्यांना यश आलें नाहीं. यानें आपल्या राज्यांतील बंडें मोडलीं. हा फार

प्रजाहितदक्ष होता. यानें आपल्या राज्याचे चार सुभे करून प्रत्येक सुभ्यावर एक सुभेदार नेमला. यानें राज्यांत प्रधानांच्या नेमणुका केल्या.

२. पहिल्या अहमदशाहा बहामनीचा मुलगा. हा गादीवर आला नाहीं.

३. (स. १४६३-८२) हा हुमायून बाहमनीचा मुलगा. याला उत्तम शिक्षण मिळाल्यामुळें हा विद्वान् झाला. याच्याच कारकीर्दीत महमूद गवान नांवाचा हुशार कारभारी होऊन गेला. त्याच्याच सल्ल्यानें यानें आपल्या राज्याचा कारभार केला. पण कांहीं लोकांनीं महमूद गवानाच्या विरुद्ध याचें मन वळवून, त्याचा याच्याकडून खून करविला. शेवटीं याला केलेल्या गोष्टीचा पश्चात्ताप झाला. यानेंच विजापूरची आदिलशाही स्थापणाऱ्या युसुफची कर्तबगारी पाहून, त्यास विजापूरची सुभेदारी दिली.

मुहम्मद बिन कासिम—(स. ७११ सिंधवर स्वारी) सिंध प्रांत काबीज करून खिलाफत राज्यास जोडणारा मुसलमान सेनापति. वलीद खलीफा बगदाद येथें खिलाफतीवर असतां, त्याची हद्द सिंध प्रांतास पोंचून हिंदुस्थानांत त्याच्या कलागती चालू झाल्या. या वेळीं सिंधच्या उत्तर भागावर दाहर नामक रजपूत राजा होता. तेव्हां त्याजवर चालून जाण्यासाठीं याची नेमणूक त्या फौजेवर झाली. यानें प्रथम देवल येथील देवालय काबीज करून, सर्रास सर्व लोकांची कत्तल केली. पुढें यानें दाहरवर स्वारी करून, त्याचा देश काबीज केला. दाहरशीं झालेल्या लढाईंत त्याच्या दोन मुली पकडून यानें खलीफा वलीदास नजर पाठविल्या. यानें जाट लोकांचा पराभव करून त्यांचा किल्ला हस्तगत केला, व तो खिलाफतच्या साम्राज्यांत समाविष्ट केला. परंतु यास ह्या विजयाबद्दल मानसन्मान मिळण्याऐवजीं भयंकर मृत्यूचा योग आला. सिंधच्या विजयाबद्दल अहेर म्हणून यानें दाहीर राजाच्या सूर्यदेवी व परमलदेवी ह्या दोन सुंदर मुलींना खलीफाकडे पाठविलें. खलीफानें सूर्यदेवीजवळ निकाह लावण्याची इच्छा प्रगट केली, तेव्हां तिनें त्यास असें खोटेंच सांगितलें कीं, मुहम्मदानें आपणास भ्रष्ट केलें असल्यामुळें आम्ही दोघीहि ह्या मोठ्या मानास अयोग्य आहोंत. त्यामुळें खलीफा रागावून त्यानें यास मरणाची शिक्षा सांगितली, व ती यानें अक्षरशः पाळली. शेवटीं खलीफास त्या मुलींची लबाडी कळून आल्यावर त्यांना ठार मारण्यांत आलें. अशा प्रकारें त्या मुलींनीं आपल्या बापाचा सूड घेण्यासाठीं व आपलें शील राखण्यासाठीं खलीफास खोटेंच सांगितलें. अशी याच्या मृत्यूची हकीगत बखरींत सांपडत आहे.

मुहम्मद मुईझुद्दीन—(जहांदरशाहा पाहा).

मुहम्मद (अजम) मोगल—(मृत्यु स. १६७६) औरंगजेबाचा थोरला मुलगा. यावर विषप्रयोग होऊन हा ठार झाला.

२. (मृत्यु स. १७०७) औरंगजेबाचा दुसरा मुलगा.

३. (राज्यकाल स. १७१९-१७४८) बहादूर व रोशनआरा यांचा पुत्र. हा फर्रुक्सियरानंतर गादीवर आला. हा कर्तव्यशून्य होता. स. १७३९ मध्यें नादरशाहानें दिल्लीवर चाल करून यास अठ्ठावन्न दिवस कैदेंत ठेवलें. याच्या वेळीं बहुतेक प्रांत स्वतंत्र झाले.

मुहम्मद युसुफ गारदी—(मृत्यु स. १७७५) रघुनाथराव पेशवे यांचा एक साथीदार.

मुहम्मद लोदी—(स. १४५१ सुमार) हा मलीक बहराम लोदीचा मुलगा.

मुहम्मद सय्यद—(राज्यकाल स. १४३४-४३) दिल्लीचा बादशहा.

मुहम्मद संजर बाहमनी—(स. १३९६ सुमार) दाऊदखान बाहमनीचा मुलगा.

मुंज परमार—(स. ९७४-९३) माळव्याच्या परमारांपैकीं श्रीहर्षाचा पुत्र. यानें वाक्पतिराज, अमोघवर्ष, उत्पलराज, पृथिवीवल्लभ, श्रीवल्लभ अशीं बिरुदें धारण केलेलीं आढळतात. यानें कर्नाटक, लाट, केरळ, व चोल राजांना जिंकलें होतें (एंप. इंडि. भा. १ पृ. २२७). यानें चेदिदेशचा कलचुरि (हैहय) राजा युवराजदेव दुसरा याला जिंकून त्याच्या सेनापतीला ठार केलें आणि त्याची राजधानी त्रिपुरी लुटली. तसेंच राजा शक्तिकुमार गुहिलोतच्या वेळीं मेवाडवर स्वारी करून आघाटपूर (आहाड) लुटलें आणि चितोडगड आणि माळवा यांना जोडून असणारा प्रदेश आपल्या राज्याला जोडला (ना. प्र. प. ३. ५). तसेंच कर्नाटकच्या दुसऱ्या तैलप चालुक्यावर स्वारी केली, पण तेथें हा कैद झाला व तेथेंच मारला गेला (सोलंकियो का प्राचीन इतिहास, प्रथम भाग, पृ. ७५-७७).

मेरुतुंगानें आपल्या प्रबंधचिंतामणी नांवाच्या ग्रंथांत लिहिलें आहे कीं, 'मुंजानें आपल्या आज्ञेच्या विरुद्ध वागतो म्हणून सिंधुराजाला राज्यांतून घालवून दिलें होतें, व गुजराथमध्यें कासहृद येथें राहत होता. कांहीं दिवसांनीं

तो माळव्यांत आला असतां मुंजानें त्याचे डोळे काढले आणि पिंजऱ्यांत कैद करून ठेवलें व त्याचा पुत्र भोज यास त्याला मारण्याची आज्ञा दिली.' इत्यादि (प्रबंध-चिंतामणी, पृ. ५५-५८). ही कथा कल्पित दिसते. मुंज आणि सिंधुराज यांच्या वेळीं हयात असणारे कवि पद्मगुप्त (परिमल) रचित नवसाहसांकचरित आणि धनपालरचित तिलकमंजरी या पुस्तकांवरून कळतें कीं, मुंजाची आपल्या भावाचा मुलगा भोज याच्यावर अत्यंत प्रीति होती. तो योग्य झाल्यावर यानें त्याला दत्तक घेऊन गादीवर बसविलें. हा जेव्हां तैलपावर चालून गेला तेव्हां यानें आपल्या राज्याचा भार सिंधुराजावरच सोंपविला होता. पुढें हा त्या लढाईंत मारला गेला आणि भोज बालक असल्यामुळें सिंधुराज राजा झाला.

हा विद्वान् आणि विद्वानांना आश्रय देणारा होता. याच्या दरबारांत धनपाल, नवसाहसांकचरितकर्ता पद्मगुप्त (परिमल), दशरूपकाचा कर्ता धनंजय, दशरूपकावर दशरूपालोक नांवाची टीका करणारा धनंजयाचा भाऊ धनिक, पिंगलसूत्रावर मृतसंजीवनी नांवाची टीका करणारा हलायुध आणि 'सुभाषितरत्नसंदोह' या ग्रंथाचा कर्ता अमितगति इत्यादि प्रसिद्ध विद्वान् होते. मुंजानें केलेला असा ग्रंथ अद्यापि मिळालेला नाहीं, पण यानें केलेले श्लोक सुभाषितसंग्रहांत आढळतात.

याच्या वेळचीं दोन दानपत्रें वि. सं. १०३१ व १०३६ (स. ९७४ व ९७९) मधील मिळालीं आहेत (इंडि. अँटि. भा. ६, पृ. ५१-५२. भा. १४, पृ. १६०). वि. सं. १०५० मध्यें अमितगतीनें सुभाषितरत्नसंदोहाची रचना केली. त्या वेळीं हा राज्यावर होता.

वि. सं. १०५०-१०५४ (स. ९९३-९९७) मध्यें हा तैलपाकडून मारला गेला. याच्या मुख्य प्रधानाचें नांव रुद्रादित्य हातें.

मुंजाल—(स. ९३२) एक भारतीय ज्योतिषी. गोत्र भारद्वाज. बृहन्मानसाचा संक्षेप लघुमानस यानें केला. हा दक्षिणात्य होता.

मुम्मदंबा—ही रुद्रम्मा काकतीयाची मुलगी व महादेवाची पत्नी. हिचा पुत्र रुद्र.

मूलदेव—चौर्यशास्त्राचा कर्ता.

मूलघटिककेतन—(स. १२५० सुमार) यानें दंडीच्या संस्कृत भाषेंतील दशकुमारचरित्राचें तेलगू भाषेंत भाषान्तर केलें, म्हणून याची 'अभिनवदंडी' अशी प्रसिद्धि झाली. हें तेलगू भाषान्तर तिक्कन सोमयाजी या आंध्रमहाकवीच्या सांगण्यावरून यानें केलें, आणि तसें त्यांत लिहिलें.

मूलराज सोलंकी—(स. ९६०-९९५) गुजराथमध्यें सोलंकींचें राज्य स्थापन करणारा पुरुष. याच्या पित्याचें नांव राजि असें होतें. चावडावंशांतील शेवटला राजा अनहिलवाड (पाटण) येथें गुजराथेंत राज्य करीत होता, त्याचें नांव सामंतसिंह. तो सामंतसिंह याचा मामा होता. यानें त्याला ठार करून त्याचें राज्य घेतलें. ही गोष्ट स. ९६० मध्यें झाली (ना. प्र. प. १ पृ. २१४-१५). यानें गुजराथच्या उत्तरेस आपला अधिकार वाढविण्यास सुरुवात केली आणि आबूच्या धरणीवराह परमारावर स्वारी केली. त्या वेळीं हथुंडीच्या (जोधपूर राज्यांतील) राष्ट्रकूट (राठोड) धवल राजानें याला आश्रय दिला होता. मूलराजाचे वि. सं. १०५१ (स. ९९४) मधील दानपत्रावरून समजतें कीं, यानें जोधपूर राज्यांतील सत्यपूर (साचोर) जिल्ह्यांतील करणक गांव दान दिलें होतें. परमाराच्या राज्यांतील यानें दान दिलें आहे त्यावरून परमारांचें राज्य यानें वरील शकांत ताब्यांत घेतलें होतें असें दिसतें. पण हें पाहून सांभरचा दुसरा विग्रहराज (वीसळदेव) चौहान यानें याच्यावर स्वारी केली, तेव्हां हा आपली राजधानी सोडून कच्छांतील कंथादुर्ग(कंथकोट) येथें पळून गेला. विग्रहराज वर्षभर गुजराथेंत राहिला व याला त्रस्त करून परत फिरला. याच वेळीं कल्याणचा तैलप सोलंकीच्या बारप नांवाच्या सेनापतीनें याच्यावर स्वारी केली, पण या युद्धांत बारप मारला गेला. तैलपानें या बारपाला लाटदेश जहागीर दिला होता. यानें काठेवाडांतील सोरठच्या चूडासमा (यादव) ग्रहरिपु राजावरहि स्वारी केली. ग्रहरिपूच्या मदतीला त्याचा मित्र कच्छचा जाडेजा (जाडेचा यादव) राजा लाखा फुलाणी (फुलाचा मुलगा) आला होता. ग्रहरिपु कैद झाला व लाखा मारला गेला (बॉबे. गॅ. व्हा. १ भा. १, पृ. १५६-६०). या लढाईंत आबूचा राजा याच्या सैनेंत राहून मोठ्या शौर्यानें लढला, असें हेमचंद्रानें द्याश्रय काव्यांत लिहिलें आहे. तो धरणीवराह असावा. यानें सिद्धपूर येथें रुद्रमहालय नांवाचें विशाळ शिवालय बांधलें. आणि त्याची प्रतिष्ठा करण्याकरितां कनोज ठाणेश्वर येथून ब्राह्मण बोलावले. आणि गांवें वगैरे उपजीविकेकरितां देऊन त्यांना तेथेंच राहून घेतलें. हे ब्राह्मण उत्तरेकडून आल्यामुळें त्यांना औदीच्य म्हणूं लागले; आणि गुजराथेंत राहिल्यामुळें मूळ गौड असूनहि द्रविडांत यांची गणना झाली. या वेळपर्यंत ब्राह्मणजाति एकच असून त्यांच्यांत

गौड व द्रविड असा भेद पडला नव्हता. हा भेद याच्या पुष्कळ पुढें झाला. मूलराजानें स. ९६०-९९५ पर्यंत राज्य केलें. याच्या वेळचीं तीन दानपत्रें मिळालीं आहेत. तीं वि. सं. १०३० ते १०५१ पर्यंतचीं आहेत (व्हिएन्ना ओरिएंटल जर्नल, भा. ५, पृ. ३००; एपि. इंडि., भा. १०, पृ. ७८-७९).

याच्या पूर्वीची कांहीं माहिती मिळत नाहीं. यानें वि. सं. १०४३ (स. ९८७) माघ वद्य अमावास्येच्या दानपत्रांत आपणास महाराजाधिराज श्रीराज याचा पुत्र असें म्हटलें आहे (इंडि. अँटि. ६, पृ. १९१). प्रबंधचिंतामणि व कुमारपालप्रबंध या ग्रंथांत निराळी माहिती आढळते. छत्तीस लाख गांव असलेल्या कान्यकुब्ज देशांत कल्याणकटकनगरचा राजा भूदेवा(भूयगडदेवा)चा वंशज मुंजाळदेव यास तीन पुत्र होते. त्यांचीं नांवें:— १ राज, २ बीज, ३ दंडक. हे सोमनाथाच्या यात्रेहून परत येत असतां, चावडावंशांतील शेवटला राजा भूयडदेव (सामंतसिंह) राजाची अश्वविद्यानिपुणता पाहून आपली बहीण लीलादेवीचें त्याच्याशीं लग्न करून दिलें. लीलादेवी अकालीं मेल्यामुळें तिचें पोट चिरून मूल बाहेर काढलें. मुलाचा मूळ नक्षत्रावर व अप्राकृतिक जन्म झाल्यानें मूळराज असें नांव ठेवलें (गुजराथचे राजे पाहा).

२. (स. ११७६-७८) गुजराथच्या सोलंकीपैकीं अजयपालाचा पुत्र. हा बालपणीं राजा झाल्यामुळें यास बाल मूळराजाहि म्हणतात. याच्या वेळीं शहाबुद्दीन घोरीनें गुजराथवर स्वारी केली. याच्याशीं लढाई आबूच्या खालीं कायद्रा गांवीं झाली. या लढाईत शहाबुद्दीन जखमी झाला व पराजित होऊन परत गेला (ना. प्र. प. १. १७६). फार्सी इतिहासलेखक ही लढाई भीमदेवाच्या वेळीं झाली असें लिहितात. पण संस्कृत ग्रंथकारांनीं मूळराजाच्या वेळीं झाली असें लिहिलें आहे. याचें कारण हा मृत्यु पावून याच वेळीं भीमदेव गादीवर आला होता हें होय. स. ११७६-७८ पर्यंत यानें गुजराथेवर राज्य केलें. याची आई नैकीदेवी याचा कारभार पाही. हा दोन वर्षांतच मेला. नंतर याचा धाकटा भाऊ भीमदेव गादीवर आला.

मूसा—(मृत्यु स. ८३६) सिंधचा सुभेदार. याच्या नंतर याचा मुलगा सुभेदार नेमला गेला.

मूसा मूतीन—(स. १७७८-८८) हा एक फ्रेंच वकील होय. स. १७७८ त फ्रेंच वकील सेंट ल्यूबीन पुण्याहून निघून गेल्यावर मूसा मूतीन नांवाचा दुसरा वकील पुण्यास कांहीं वर्षे येऊन राहिला.

मूसा नारज—हा व सिनोर नरोना एकच असावेत. हा कार्ल्याच्या लढाईत होता. हा भीमराव पानसे यांच्या हाताखालीं असे.

मूसा लोदी—बहलोल लोदीचा एक पुत्र.

मूसीकेनो—(ख्रि. पू. स. ३२७ सुमार) सिंध प्रांतांतील अरोर येथें राज्य करणारा राजा. हा मोठा पराक्रमी व शक्तिशाली राजा होता; म्हणूनच सिकंदर झेलममधून जलमार्गानें सिंधमध्यें आला असतां यानें त्याच्याशीं युद्ध केलें, पण त्यांत याचा पराजय झाला (मौर्य साम्राज्यका इतिहास, पा. ११७).

मूंजा—(हंमीर, अजयसिंह पाहा).

मृगावती—कौसंबीच्या शतानिकाची पत्नी.

मृगेशवर्मन् कदंब—(स. ४७१-७८) हा शांतिवर्मन् कदंबाचा पुत्र. याला विजयशिव असें म्हणत. याच्या पत्नीचें नांव कैकेय प्रभावती. हा कदाचित् स. ४७१ मध्यें गादीवर आला असावा. कारण याच्या कारकीर्दीच्या तिसऱ्या वर्षांतील लेखाचा काल स. ४७३ असा आहे (इंडि. अँटि. १८७८, पृ ३५). यानें गंग व पल्लव यांना जिंकलें. हा जैन होता. याच्या कारकीर्दीच्या तिसऱ्या वर्षास पौष व आठव्यास वैशाख म्हटलें आहे.

२. हा बनवासीच्या विष्णुवर्मा कदंबानंतरचा राजा.

मृत्युंजय ब्राह्मणी—(स. १५२८-१५५८) याचे 'प्रकाशदीप' व 'स्वरूपसिद्धि' हे दोन ग्रंथ किंवा प्रकरणे महाराष्ट्र कवींतून प्रसिद्ध झालीं आहेत.

भक्तविजयाच्या ४१ व्या अध्यायांत शांत ब्राह्मणी नामक बेदरच्या बादशहाचें चरित्र वर्णिलें आहे. या नांवाचा किंवा वर्णनाचा कोणीच यवन राजा बेदरास किंवा दुसऱ्या कोणत्याहि दक्षिणेकडील जुन्या मुसलमानी राजांत आढळत नाहीं. महिपती लिहितो—उपरति होऊन तो पंढरपुरास आला. तेथें कल्याणच्या सहजानंदाकडून उपदेश घेण्याचा त्यास स्वप्नांत दृष्टांत झाला. तेव्हां शांतब्राह्मणी सहजानंदास भेटला, तेव्हां त्यानें यास उपदेश केला आणि शांतब्राह्मणीचें नांव मृत्युंजय असें ठेवलें. कल्याणापासून एक कोसावर असणाऱ्या नारायणपुरास हा जाऊन राहिला. सहजानंदावरून याचा वरील काल ठरतो. हा कदाचित् बेदरचा आश्रित असेल. भक्तलीलामृतांत याला मृत्युंजय महायोगी असें म्हटलें आहे (मं. बा. इ. १८३४ ले. ६८).

याला 'मुंताजी' असें म्हटलेलें आढळतें. ग्रंथ—१ अनुभवसार, २ गुरुलीला, ३ अमृतसार, ४ अद्वैतप्रकाश,

५ सीताबोध, ६ पंचीकरण, ७ स्वरूपसमाधान व ८ सिद्धांतसंकेतप्रबंध वगैरे.

मेकोपा—हा चौऱ्यांशी सिद्धांपैकी त्रेचाळिसावा सिद्ध होय. हा जातीनें वणिक असून मंगलदेशचा (भागलपूर जिल्हा) राहणारा होय. याचा चित्तचैतन्यशमनोपाय (तं. ४८।६९) हा ग्रंथ प्रसिद्ध आहे.

मेखलपा (योगिनी)—ही चौऱ्यांशी सिद्धांपैकी सहासष्टावी सिद्ध होय. ही जातीनें गृहपतिकन्या ही कण्हपाची शिष्या होय.

मेगोती तिम्म नायडू—विजयनगरच्या आरविदु घराण्यांतील श्रीरंगाचा प्रधान.

मेगॅस्थनीस—(ख्रि. पू. ३२७ सुमार) सीरियाचा राजा सेल्यूकस निकेटर याचा पाटलिपुत्र येथें चंद्रगुप्त मौर्याच्या दरबारी असणारा वकील. हा प्रथम सिकंदरच्याबरोबर हिंदुस्थानांत आला. हा पुष्कळ वर्षे पाटलिपुत्र येथें राहिला. हा येथें असतां आपला रिकामा वेळ या देशाचें भौगोलिक वर्णन, पीक, संस्था यांच्या वर्णनांत घालवी. ज्या गोष्टी यानें स्वतः पाहून लिहिल्या आहेत, त्या प्रामाणिक आहेत. याचा ग्रंथ मूळ ग्रीक भाषेंत होता, पण तो सध्यां उपलब्ध नाहीं. त्या ग्रंथाचें नांव इंडिका असें होतें. त्यांपैकीं स्ट्रेबो, आर्यन, प्लीनी आदि ग्रंथकारांनीं उद्धृत केलेले उतारे तेवढे सध्यां मिळतात. त्यावरून यानें स्वतः पाहून लिहिलेला भाग प्रामाणिक दिसतो (मेघाक्ष पाहा).

मेघचंद—(स. १६७८) 'यक्षदेववृद्धान्वय' ग्रंथ लिहिणारा महानुभाव (मं. त्रै. १२. २. ले. ६).

मेघाक्ष—हा पारसीक देशाचा राजा. चंद्रगुप्ताच्या विरुद्ध हा मलयकेतूच्या बाजूला होता. पण मलयकेतूनें द्रोही म्हणून याला ठार केलें, असें मुद्राराक्षस नाटकावरून समजतें. हा चंद्रगुप्ताला मगधसाम्राज्य मिळवून देणारांपैकीं असावा. हा मेघाक्ष म्हणजे कांहींच्या मतें नामसाम्यावरून मेगॅस्थनीस असावा. पण दुसऱ्या कांहींच्या मतें हें नांव शैलाक्ष म्हणजे सेल्यूकस असून विशाखदत्तानें चुकीनें मेघाक्ष लिहिलें आहे. पण हे सर्व तर्क आहेत.

मेदिनीपा—हा चौऱ्यांशी सिद्धांपैकी पन्नासावा होय. जात शूद्र. ग्रंथ सहजाम्नाय.

मेदिनीराय—(२ महमूद खल्जी पाहा).

मेटकाफ, सर चार्लस—(स. १८०९-३६) हा एक हिंदुस्थानचा गव्हर्नर जनरल होता. हा प्रथम ईस्ट इंडिया कंपनीच्या नोकरींत शिरला. लॉर्ड मिंटोनें रणजितसिंगाशीं जो पहिला तह केला (स. १८०९) तो याच्याच मार्फत केला. पुढें बेंटिकच्या वेळीं हा वायव्य सरहद्दीवरील प्रांताचा ले. गव्हर्नर झाला. बेंटिकनंतर हा एक वर्ष (स. १८३५-३६) हिंदुस्थानचा गव्हर्नर जनरल झाला. बेंटिकनें छापखान्याचा कायदा करून (प्रेस ॲक्ट) मुद्रणस्वातंत्र्य दडपून टाकलें होतें, तें यानें तो कायदा रद्द करून खुलें केलें. हें याचें कृत्य कंपनीच्या डायरेक्टरांना सहन झालें नाहीं. त्यांनीं याच्या विरुद्ध ठराव केले. तेव्हां यानें राजीनामा दिला. यानंतर यास जमेकाचा गव्हर्नर व पुढें कानडाचा गव्हर्नर जनरल नेमण्यांत आलें होतें. हा स. १८४६ मध्यें मेला.

(जनरल) मेडोज—स. १७९१-९२ सालीं इंग्रज व निजाम यांनीं टिपूवर स्वारी केली तेव्हांचा इंग्रजांचा प्रमुख सेनापति. तसेंच हा मुंबईस स. १७८८ पासून स. १७९० पर्यंत गव्हर्नरच्या अधिकारावर होता. श्रीरंगपट्टणवर ६ फेब्रुवारी १७९२ रोजीं इंग्रजांनीं रात्रीं हल्ला केला. त्यांत वाट चुकून याची तुकडी भलतीकडे गेली, त्यामुळें यावर थोडा दोष आला. परंतु लॉर्ड कॉर्नवॉलिस यानें सावधपणानें बाजू राखली. पण याला ही गोष्ट फार लागली, व यानें मनांत पुढें हाणाऱ्या हल्ल्यांत निकराचा हल्ला करून विजयी होण्याचें, नाहींतर युद्धांत मरून जाण्याचें ठरविलें. पण पुढें २८ फेब्रुवारी १७९२ रोजा तह ठरून टिपूचीं दोन मुलें ओलीस आलीं. तेव्हां यानें डोकें फिरून यानें पिस्तुलानें आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. पण त्यांतून हा वांचला. गोविंदराव काळे यानें नांव मेडूस असें लिहितात, व याचें वय या वेळीं पासष्ट अधिकच असें लिहितात (इतिहाससंग्रह. ३.२). हरिपंत फडक्यानें आपल्या पत्रांत ही माहिती दिली आहे (इतिहाससंग्रह २. १२. ले. १३. ऐ. कि. प्र. पा. ९६).

मेधातिथि—(स. ८२५-९०० सुमार) एक ग्रंथकार. यानें मनुस्मृतीवर फार मोठी टीका (भाष्य) केली आहे. याच्या भाष्याचें इंग्रजींत भाषांतर झालेलें आहे. याच्या बापाचें नांव वीरस्वामिन्. हा दाक्षिणेंत किंवा उत्तरेकडील भागांत होऊन गेला याबद्दल मतभेद आहे. यानें 'स्मृतिविवेक' नांवाचें पुस्तक लिहिलें आहे, व धर्मावर पुष्कळ गोष्टी श्लोकबद्ध लिहिल्या आहेत.

मेधाविन् किंवा मेधाविरुद्र—(स. ६०० सुमार) हा अलंकारशास्त्रावरील ग्रंथकार आहे, पण याचा ग्रंथ प्रत्यक्ष उपलब्ध नाहीं. भामहानें लिहिलेल्या काव्यालंकारांत उपमालंकारांतील सात दोष दाखविणाऱ्या याचा दोन वेळ उल्लेख आहे (काव्या. २.४०). रुद्रटाच्या काव्यालंकार ग्रंथावर टीका लिहिणारा नमिसाधु देखील

मेधावीचा उल्लेख करतो. कांहीं ठिकाणीं मेधाविरुद्र असा शब्द येतो. तेथें मेधावि व रुद्र असे दोन ग्रंथकार मानावयाचे कां एक मानावयाचा, याचा बोध होत नाहीं. नमिसाधूच्या उताऱ्यावरून त्याच्यापुढें मेधाविरुद्राचा एखादा ग्रंथ असावा असें दिसतें. त्रिकांडशेषांत मधारुद्र व कालिदास हीं नांवें समानार्थक म्हणून दिलीं आहेत. काव्यमीमांसाकार राजशेखरानें मेधाविरुद्र कवि जन्मांध होता अशी माहिती दिली आहे (श्री. पां. वा. काणेकृत साहित्यशास्त्राचा इतिहास).

मेनन्द्र—(मिलिंद पाहा).

मेप्पतूर नारायण भट्टतीरी—(नारायणभट्टतीरी पाहा).

मेरुकवि—शके १५३५ च्या सुमारास यानें अवधूतगीतेवरील टीका लिहिली.

मेरुतुंगाचार्य—(जन्म स. १३४६) प्रबंधचिंतामणि ग्रंथाचा कर्ता. यानेंच नाभिवंशसंभवकाव्य, यदुवंशसंभवकाव्य व नेमिदूतकाव्य हीं रचिलीं. महापुरुषचरितम्, थेरावली (स्थविरावली) व षड्दर्शनविचार हे याचे ग्रंथ होत. प्रबंधचिंतामणि व थेरावली करणारा कवि एकच होय.

मेरुशास्त्री गोडबोले—याच्या पित्याचें नांव अनंतशास्त्री. मोठे नैयायिक. वाक्यवृत्ति ग्रंथाचे कर्ते.

मेलांबा—ही चवथ्या विजयादित्य चालुक्याची पत्नी.

मेवक क्षत्रप—हा मथुरेच्या शकमित्र क्षत्रपाचा पुत्र. याचीं कांहीं नाणीं सांपडलीं आहेत.

मेवाडचे राजे (गुहिलोत)—

गुहिल (स. ५६६), भोज (स. ५८६), महेंद्र पहिला (स. ६०६), नाग (६२६), महेंद्र दुसरा (६८८), कालभोज बापा (७३४), खुम्माण (७५३), मत्तट (७७३), भर्तृभट [भर्तृपट्ट] (७९३), सिंह (८१३), खुम्माण दुसरा (८२८), महायक (८५३), खुम्माण तिसरा (८७८), भर्तृभट दुसरा (९०३), अल्लट (९५१-७७), नरवाहन (९७१), शक्तिकुमार (९७७), अंबाप्रसाद (९९३), शुचिवर्मा (१००७), नरवर्मा (१०२१), कीर्तिवर्मा (१०३५), योगराज (१०५१), वैराट (१०६८), हंसपाल (१०८८), वैरिसिंह (११०३), विजयसिंह (११०७), अरिसिंह (११२७), चोडसिंह (११३८), विक्रमसिंह (११४८), रावल रणसिंह [कर्णसिंह] (११५८), क्षेमसिंह (११६८), सामन्तसिंह (११७२), कुमारसिंह (११७९), मथनसिंह (११९१), पद्मसिंह (१२११), जैत्रसिंह (१२१३), तेजसिंह (१२६१), रावल तेजसिंह (१२६५), समरसिंह (१२७३), [उलग्रखां (१२९९),] रावल समरसिंह (१३०२), रत्नसिंह (१३०३), [अलाउद्दीन (१३०३),] हंमीरसिंह (१३२६), क्षेत्रसिंह (१३३६), लक्षसिंह (१३८२), मोकल (१४२१), कुंभकर्ण [कुंभा] (१४३३-६८),उदयसिंह(१४६८ ७३), रायमल (१४७३-१५०९), संग्रामसिंह (१५०९-२७), रत्नसिंह दुसरा (१५२८-३१), विक्रमसिंह (१५३१-३६), उदयसिंह दुसरा (१५३७-७२), प्रतापसिंह (१५७२-९७), कर्णसिंह (१५९७-१६२७), जगत्सिंह (१६२८-५२), राजसिंह (१६५२-८०), जयसिंह (१६८०-९८), अमरसिंह दुसरा (१६९८-१७१०), संग्रामसिंह दुसरा (१७१०-३४), जगतसिंह दुसरा (१७३४-५१),प्रतापसिंह दुसरा (१७५१-५३), राजसिंह दुसरा (१७५४-६१), अरिसिंह दुसरा (१७६१-७३), हम्मीरसिंह दुसरा (१७७३-१७७८), भीमसिंह (१७७९-२८), जवानसिंह (१८२८-३८), सरदारसिंह (१८३८-४२), सरूपसिंह (१८४२-६१), शंभुसिंह (१८६१-७४), सज्जनसिंह (१८७४-८४), फत्तेसिंह (१८८४-१९३०), सर भूपालसिंह [विद्यमान] (१९३०-३१) (राजपुतानेका इतिहास, पा. १४४९).

मेळलादेवी—सहाव्या विक्रमादित्य पश्चिम चालुक्याची मुलगी. ही गोव्याच्या दुसऱ्या जयकर्दंबाला दिली होती. हिला मैललदेवी असेंहि म्हणत.

मेहेरजीराणा—या नवसरीच्या पारशी गृहस्थापासून अकबरानें पारशी धर्माची माहिती घेतली.

मेंठक—(स.५३०सुमार) हा हयग्रीववर्ध नाटकाचा कर्ता. राजतरंगिणींत हा काश्मीरच्या मातृगुप्तानंतर होता असे म्हटलें आहे (३.२०७). विक्रमादित्य व हा यांनी हें नाटक लिहिलें असावें. राजशेखरानें आपल्या बालरामायणांत म्हटलें आहे कीं, वाल्मिकी हा भर्तृमेंठ झाला, नंतर भवभूति व आतां राजशेखर झाला आहे. याचा रामायणावरील ग्रंथ आतां उपलब्ध नाहीं. मेंठ शब्दाचा अर्थ महान् असावा.

मैत्रेय—(स. ४०० सुमार) एक बुद्ध तत्त्वज्ञ. याच्या दोन ग्रंथांचें चिनी भाषांतर उपलब्ध आहे.

मैत्रेयरक्षित—धातुपाठप्रदीप ग्रंथाचा कर्ता.

मैनाबाई आंगरे—येसाजी आंगऱ्याची मुलगी व दौलतराव शिंद्याची माता.

मैनाबाई पवार—धारच्या आनंदराव पवाराची पत्नी. ही बडोद्याच्या गायकवाड घराण्यांतील होती. हिला तारुण्यांतच वैधव्य प्राप्त झालें. हिच्या चरित्रावर

मैनाचरित्र नांवाचा काव्यग्रंथ श्री. नारायण गणेश शिरसाळकर यांनीं केला आहे. तसेंच माळव्याच्या तवारिखेंत मुंशी करीमअलीनें बरीच माहिती दिली आहे. तसेंच मुंशी देवीप्रसादनें ना. प्र. सभेच्या त्रैमासिकांत हिचें चरित्र दिलें आहे (४. ५९-७३).

मैनाबाई भोसले—(मृत्यु स. १८१६) ही व्यंकोजी ऊर्फ मन्याबापू भोसल याची कन्या व आपासाहेब भोसल्याची पत्नी.

मैनाबाई होळकर—(स. १८१५) यशवंतराव होळकराची पत्नी.

मैनावती—कांचनपूरच्या त्रैलोक्यचंद्र राजाची पत्नी व गोपीचंद राजाची माता. ही भर्तृहरि व विक्रमादित्य राजा याची धाकटी बहीण. जालंधरनाथास हिनें गुरु केलें. ही मोठी विचारवान् व ज्ञानी होती.

मोइझ्झुद्दीन कैकूबाद गुलाम—(कैकूबाद पाहा).

मोइझ्झुद्दीन बहराम गुलाम—(स. १२४०-४२) दिल्लीचा बादशाह. याचा इखत्यार उद्दीन नांवाच्या दिवाणानें खून केला.

मोकल गुहिलोत—(स. १४२१-३३) हा मेवाडचा राणा लक्षसिंह ऊर्फ लाखा याचा हंसाबाईपासून झालेला मुलगा. लक्षसिंहाचा पहिल्या संबंधाचा वडील मुलगा चूंडा याच्या परम स्वार्थत्यागामुळें व पितृभक्तीमुळें हंसाबाईचें लक्षसिंहाशीं लग्न झालें आणि हा मेवाडचा राणा झाला. भारतांतील भीष्माच्या तोडीचें हें इतिहासांतील उदाहरण आहे. लाखा स्वर्गवासी झाल्यावर हंसाबाई सती जाण्यास तयार झाली व तिनें चूंडास विचारलें कीं, 'आतां मोकलला कोणती जहागीर देणार?' तेव्हां पितृभक्त चूंडानें उत्तर दिलें, 'आई, मोकल मेवाडचा मालक आहे. त्याला जहागीर कोण देणार? मी त्याचा नोकर आहें.' तेव्हां हंसाबाईनें त्याची खूप प्रशंसा केली. चूंडानेंहि तिला सती जाण्यापासून निवृत्त केलें. मोकल हा अल्पवयी होता. त्याला सिंहासनावर बसवून चूंडानें त्याला सर्वांच्या आधीं नजराणा दिला. राजमातेनेंहि राज्याचा सर्व भार चूंडावर सोंपविला. चूंडा न्यायी व प्रजावत्सल असल्यानें त्यावर सर्वांचें प्रेम होतें. पण मोकलचा मामा व हंसाबाईचा भाऊ रणमल्ल याला राज्यांत हात घालतां येत नसल्यामुळें समाधान नव्हतें. त्यानें हंसाबाईचे कान भरून मोकलच्या प्राणाला धोका आहे असें भासविलें. तेव्हां चूंडाला मेवाड सोडण्यास सांगितलें. त्याप्रमाणें तो मांडूच्या सुलतानाकडे जाऊन राहिला. तेव्हां रणमल्लाचा हात राज्यकारभारांत शिरला व त्यानें राठोड जवळ करण्यास सुरुवात केली.

या वेळीं शम्सखां नांवाचा नागोरचा जहागिरदार होता. तो मेल्यावर फीरोजखा नागोरच्या गादीवर आला. त्याच्यावर मोकलनें स्वारी करून त्याला सहज जिंकलें, असें चितोडच्या शिलालेखांत म्हटलें आहे (एपि. इंडि. २ पृ. ४१७). फार्शी तवारिखांत याचा पराजय झाला असें लिहिलें आहे तें समकालीन लेखकांनीं लिहिलेलें नसल्यामुळें शिलालेखाइतपत विश्वासार्ह नाहीं.

यानें सपादलक्ष देश उध्वस्त केला. सपादलक्ष देश म्हणजे सांभरचा प्रदेश. तसेंच जालंदरवाल्यांना कंपित केलें. जालंदर म्हणजे त्रिगर्त (कांगडा पंजाब), पण येथें जालोरचा भाग हा अर्थ दिसतो. यानें गुजराथचा सुलतान पहिला अहमदशाह याचाहि पराभव केला होता. शृंगीऋषी येथील शिलालेखांत हा उल्लेख बरोबर आहे, पण कुंभलगडच्या प्रशस्तींत अहमदच्या जागीं चुकीनें महम्मद लिहिलें आहे. तसाच जहाजपुरच्या युद्धांत जय मिळवला होता. जहाजपुरचा किल्ला बम्बावदाच्या हाडांच्या ताब्यांत होता. तो यानें घेतला.

यानें चितोडवर जलाशय व द्वारिकानाथ (विष्णु) यांचें मंदिर बांधलें, समिद्धेश्वराचा जीर्णोद्धार केला, व त्याला धनपूर गांव दिला. समिद्धेश्वर म्हणजे समाधीश्वर होय. एकलिंगजीच्या मंदिराभोंवतीं चौफेर तीन दारें असलेला कोट बांधला. वाघेला वंशांतील आपली राणी गौरांबिका स्वर्गवासी झाली म्हणून शृंगीऋषीच्या जागीं कुण्ड बांधलें, व आपला बंधु बाघसिंह याच्याकरितां बाघेला तलाव तयार केला. विष्णुमंदिराला सोन्याचा गरुड व देवीमंदिराला सर्व धातूंचा सिंह भेट दिला. यानें सोनें व चांदी यांच्या पंचवीस तुला केल्या. त्यांतील एक सुवर्णतुला पुष्करच्या आदिवराहमंदिरांत केली. यानें बांधनवाडा (अजमेर जिल्हा) व रामागांव (एकलिंगजीच्या जवळचा) एकलिंगजीला दिला. शेतकरी झालेल्या ब्राह्मणांच्या शिक्षणाची व्यवस्था म्हणून सांग वेद शिकण्याची व्यवस्था केली.

स. १४३३ मध्यें अहमदाबादचा सुलतान पहिला अहमदशहा डुंगरपूर राज्यांतून जीलवाड्याकडे चालून आला व तेथील मंदिरें फोडूं लागला. ही बातमी ऐकतांच हा तिकडे निघाला. बरोबर महाराणा खेताच्या उपपत्नीचे पुत्र चाचा व मेरा हेहि होते. एक दिवस यानें सहज त्यांना एका झाडाचें नांव विचारलें. त्या वेळीं आपल्या वंशाच्या हीनपणामुळें उपरोधिकपणें हा विचारतो असें वाटून त्यांनीं याला ठार मारलें.

याचे पुत्र कुंभा, खींवा (क्षेमकर्ण), शिवा (सुत्रा), सत्ता, नाथसिंह, वीरमदेव आणि राजधर होत. यानंतर कुंभा गादीवर आला.

मोखसिंग—भरतपूर संस्थानचा जो पुरामन त्याचा हा मुलगा होय. पण याच्या चुलत भावानें सवाई जयसिंगाच्या मदतीनें यास पदच्युत केलें व आपण डीगचा राजा झाला (बदनसिंग पाहा).

मोग्गलान थेर—एक सिंहलद्वीपनिवासी बौद्ध भिक्षू. पराक्रमबाहु नांवाच्या राजाच्या कारकीर्दीत होता (स. ११५३). हा तेथें पोलोन्नरुवा नांवाच्या नगरांत जेतवनविहारांत राहत असे. यानें अभिधानप्पदीपिका नांवाचा पाली भाषेचा अमरकोशासारखा कोश लिहिला. हा कोश गुजराथ पुरातत्त्वमंदिरनें मुनि जिनविजयजीच्या संपादकत्वाखालीं प्रसिद्ध केला आहे.

मोग्गलीपुत्र तिष्य—मौर्यसम्राट् अशोकाचा गुरु. हा अशोकानें भरविलेल्या तिसऱ्या बौद्धमहासभेचा अध्यक्ष होता. त्या सभेंत यानें केलेला 'कथावत्थु' हा ग्रंथ प्रामाणिक म्हणून मान्य करण्यांत आला. सांची येथें एक प्राचीन अवशेष सांपडला आहे त्यावर 'मोगलिपुत्र' असे शब्द लिहिलेले आहेत ते यालाच उद्देशून असावेत. अशोकाच्या वेळीं तिसरी बौद्धसभा भरून धर्मप्रसाराकरितां जें अद्भुत संघटन व योजना करण्यांत आली त्याचें श्रेय अशोकापेक्षां यालाच अधिक आहे. हा भगवान् बुद्धाच्या तीन प्रधान शिष्यांपैकीं एक होय. हा मूळ मगध देशांतील ब्राह्मण होय.

मोप्पमा—काकतीय प्रोळी राजाची पत्नी (हनुमत्कुंडा येथील प्राचीन सहस्रस्तंभमंदिरांतील शिलालेखावरून).

मोरया गोसावी—(स. १३७५-६१) महाराष्ट्रांतील एक प्रसिद्ध सत्पुरुष. यांच्या पित्याचें नांव वामनभट्ट व मातेचें नांव पार्वतीबाई. हे देशस्थ ऋग्वेदी हरितसगोत्री ब्राह्मण. हे कर्नाटकांत शाली गांवचे राहणारे. त्यामुळें यांचें उपनांव शालिग्राम होय. पुढें या घराण्यांत अनेक सिद्धपुरुष उत्पन्न झाल्यानें देव या नांवानें हें घराणें ओळखलें जाऊं लागलें.

वामनभट्ट गणेशोपासक होते. त्यांना वयाचीं पन्नास वर्षे झालीं तरी पुत्रसंतति नव्हती. तेव्हां त्यांनीं पुत्रप्राप्तीकरितां मोरगांवीं तपश्चर्या केली. श्रीच्या कृपेनें पुत्ररत्न झालें, तेच मोरया गोसावी होत. यांचा जन्मदिन शके १२९७ माघ शु. ४ हा होय. पुढें वामनभट्ट वयाच्या एकशेंतिसाव्या वर्षी मृत्यु पावले (शके १३३२).

यांचें आठव्या वर्षी उपनयन झाल्यावर यांनीं जटाघनापर्यंत साग्र वेदाचें अध्ययन केलें. नंतर योगिराज नांवाच्या सिद्धाचा गुरूपदेश घेतला आणि थेऊर येथें घोर तपश्चर्या केली, व मंगलमूर्तीचा अनुग्रह संपादन केला. येथून पुढें हे चिंचवड येथें राहूं लागले.

तेथें राहत असतां गोविंदराव कुलकर्णी यांची मुलगी उमाबाईशीं यांचें लग्न झालें आणि शके १४०३ माघ व. ४ स यांना मुलगा झाला. त्याचें नांव चिंतामणी असें ठेवण्यांत आलें.

प्रथम हे दर चतुर्थीस मोरगांवीं वारी करीत, पण पुढें यांना साक्षात्कार झाला. कऱ्हा नदींत स्नान करीत असतां हातांत एक गणपतीची मूर्ति (तांदळा) आली. तेव्हां यांनीं तेथें नदीकाठीं त्याची पूजा करून सर्वशाखभाजी व पोळी याचा नैवेद्य दाखविला. ज्या जागेवर पूजन करून नैवेद्य दाखविला ती जागा तेथें (पोळी) या नांवानें प्रसिद्ध आहे. तेथें त्या दिवसापासून आजपर्यंत ब्राह्मणापासून चांडाळापर्यंत सर्वांना प्रसाद वांटण्यांत येतो.

नंतर यांनीं ती मूर्ति चिंचवड येथें नेऊन ठेवली व आजहि वाड्यांत ती पाहावयास मिळते.

पुढें यांची कीर्ति फार वाढली व लोकांपासून दूर राहण्याची यांना इच्छा झाली. म्हणून यांनीं जिवंत समाधि घेतली (शके १४८३ मार्गशीर्ष वद्य ६). हे महायोगी असल्यानें यांचा हा १८६ वर्षांचा आयुष्यक्रम अशक्य नाहीं. यांची पुण्यतिथि चिंचवड येथें मोठ्या समारंभानें होत असते.

यांचीं गणपतीवर केलेलीं पदें फार प्रसिद्ध आहेत. तीं चिंचवड, कसबा गणपति, रांजणगांव गणपति वगैरे ठिकाणीं ऐकावयास मिळतात. प्रत्येक पदांत श्रीमोरयाला निस्सीम भक्तीनें व घरगुती नात्यानें आळविलें आहे. यांनीं केलेल्या पदांपैकीं 'सासूर', 'माहेर' व 'कामधेनू' हीं पदें आकर्षक वाटतात.

तुकाराम, रामदास यांसारख्या संतांत यांची गणना आहे. प्रथम यांचें घराणें अगदीं विरक्त स्थितींत राहीं, पण पुढें यांच्या वंशजांस आदिलशाह, संभाजी, राजाराम, शाहू वगैरेंनीं अनेक इनामें दिलीं. या घराण्याचा मराठेशाहींत अत्यंत सन्मान ठेवण्यांत येत असे (पु. द. ३, पा. ११२). यांच्या घराण्यांतील लोकांनींहि सदाचारानें राहून धर्मसंरक्षण केलेलें दिसतें. यांचा वंश-१वामनभट्ट,मृ.स.१४१०, २ श्रीमोरया गोसावी, ३ थोरले श्रीचिंतामणमहाराज, ४ श्रीनारायणमहाराज, (यांना भाऊ तीन–विनायक, दिगंबर व मोरोबा), ५ धाकटे श्रीचिंतामणमहाराज

(यांना भाऊ-विश्वेश्वर, गजानन, विश्वनाथ व बाबाजी), ६ श्रीधरणीधरमहाराज, ७ धाकटे श्रीनारायणमहाराज (यांचे भाऊ-गणपतदेव-सिद्धटेकघराणें, मोरोबादेव-रांजणगांवघराणें, बाप्पाजीदेव-ओझरघराणें), ८ श्रीचितामणमहाराज तिसरे, ९ श्रीधरणीधरमहाराज, १० श्रीगणपतदेव.

मोरेश्वरभट्ट—अहमदनगरामध्यें हा ब्राह्मण राहत असे. हा चांगला विद्वान् वैद्य होता. याच्या बापाचें नांव माणिकभक्त होतें. यानें वैद्यकावर शके १६०३ मध्यें वैद्यामृत नांवाचा ग्रंथ लिहिला. हल्लीं तो ग्रंथ मराठींत अर्थ लिहून मूळासहित छापला आहे (क. च.).

मोरेश्वरसुत काशी—चंद्राची आरती लिहिणारा मराठी कवि (सं. श. १८३७ वार्षिक ले. १५१).

मोरो गिरमाजी—हा पेशव्यांचा कारकून असून इंदुरास होळकरांकडे होता. इंदुरास असतां सरदारांच्या दादाशीं ज्या वाटाघाटी झाल्या, त्यांची हकीगत ता. १३-६-१७७४ च्या पत्रांत यानें हरिपंत फडक्यांस लिहिली ती वाचण्यासारखी आहे (म. रि. उ. १, पा. ११).

मोरो त्रिमल पिंगळे—(मृत्यु स. १६८० आक्टो.) थो. शिवाजीचा एक प्रमुख मदतगार व मुख्य प्रधान. देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण. याचे शिक्क्यांत नांव पुढीलप्रमाणें आढळतें: 'श्रीशिवचरणीं तत्पर त्र्यंबकसुत मोरेश्वर'. याचा बाप कर्नाटकांत शहाजीकडे होता. पुढें हा शिवाजीकडे राहिला (स. १६५३). प्रथम हा पुरंदरचा कारभारी होता. पुढें यानें प्रतापगड बांधला. यानें अफजलखानाच्या स्वारीच्या वेळीं त्याचें पार येथील सैन्य पराभूत केलें (स. १६६२). सिद्दी जोहरच्या स्वारीच्या वेळीं यानें मुलखाचें संरक्षण केलें.

शिवाजी आग्र्यास निघाला तेव्हां तिघांवर राज्यभार सोंपविला होता त्यांत हा मुख्य होता. तिकडे शिवाजीस पकडलें असें कळतांच इकडे यानें मोहीम सुरू केली आणि पुरंदरच्या तहानें गेलेले किल्ले परत घेतले व जयसिंगानें नादुरुस्त केलेले किल्ले पुनः दुरुस्त केले (स. १६६७).

यानें त्रिंबकचा किल्ला घेतला (स. १६७० आक्टो. २५); औंढा, पट्टा, रावळाजावळा वगैरे कांबीज केले. मराठ्यांच्या साल्हेर किल्ल्यास दिलीर व महाबत यांनीं वेढा दिला. यानें वीस हजार फौजेनिशीं हल्ला करून पराक्रमाची शर्थ केली व त्यांस वेढा उठवून जाणें भाग पाडलें (स. १६७२ फेब्रु.).

साल्हेरच्या नंतर यानें लगेच मुल्हेर घेतलें; आणि तेथील व्यवस्था करून खालीं कोंकणांत उतरला. जव्हारच्या विक्रमशाहाचा पाडाव करून (स. १६७२ जून ६) रामनगरच्या सोमशाहाचा पराभव केला (ता. १९). साल्हेर-मुल्हेर असलेला बागलाण प्रांत व त्याखालील सुरतेच्या वाटेवरील कोंकणभाग जिंकण्याचें सर्व श्रेय याला आहे. जगदेवराव जाधव व सिद्दी हिलाल हे नाशिकत्र्यंबक व वणी-दिंडोरीचे ठाणेदार पराभूत झाल्यावर शिवाजीला मिळाले (जुलै). पुढें शिवाजी कर्नाटकांत गेला तेव्हां त्यानें आपल्या पश्चात् यास राज्याची कुलमुखत्यारी दिली व अण्णाजी दत्तोस याच्या हाताखालीं सचीव नेमिलें (स. १६७७). यामुळें या दोघांत विरोध उत्पन्न झाला. जालना लुटून आल्यावर पट्टा किल्ल्याच्या आसपासच्या २७ किल्ल्यांपैकीं शक्य तेवढे घेण्याकडे याची योजना होतांच यानें ते सर्व घेऊन सर्व खानदेश जिंकला. शिवाजीच्या मृत्यूनंतर हा सोयराबाईच्या पक्षास मिळाला म्हणून संभाजीनें यास कैद केलें, पण लवकरच बंधमुक्त करून पेशवाईवर कायम केलें. पण शिवाजीनंतर सहा महिन्यांच्या आंत हा मेला. मोगलांशीं लढण्यांत यानें अजब पराक्रम गाजविला. शिवाजीचें धोरण व हेतु यांशीं हा तन्मय झाला होता.

याचा व शामराज रांझेकराचा नातेसंबंध असावा. युद्ध व नीति यांत हा पुरा निष्णात होता. यानें मराठी राज्याची पहिली जमीनधारापद्धति अमलांत आणली. कायदे यानेंच तयार केले. याचा बंधु केशव व मुलगा निळोपंत.

वर दिलेल्या याच्या शिक्क्याशिवाय खालील दोन आणखी आढळतातः ' श्रीशिवराजेंद्र हर्षनिधान, त्र्यंबकसुत मोरेश्वर मुख्य प्रधान', ' श्रीशिवराजेंद्र मुख्यामात्यस्य सत्यधृक् । मुद्रा मोरेश्वरस्यास्तां भद्रा सद्रागदायिनी '.

मोरो तानदेव होनप—पुण्याचे देशपांडे. कर्यात मावळांतील ३६ गांवचें देशकुलकर्ण याजकडे होतें. मलीकअंबरच्या मृत्यूनंतर निजामशाही सत्ता ढिली पडल्यामुळें पुणें भागांत उत्पन्न झालेला एक बंडखोर. यानें चाकणचा किल्ला बळकावला आणि स्वार व शिपाई ठेविले. ' सोड आऊत आणि हो मोरोबाचा राउत' अशी त्या वेळीं म्हण तोंडीं होण्याइतकी मोठी याची दंगल होती. स. १६३० मध्यें याचें बंड मोडण्याकरितां आदिलशाहीतर्फे मुरार जगदेवानें याच्यावर स्वारी केली. याचा वाडा पाडून टाकून त्यास आग लावून दिली. चाकणचाहि कोट पाडला आणि रायाराव यास शिरवळ परगण्याचा अधिकारी नेमिलें. सबंध प्रांतावर अंमल चालवितां यावा म्हणून

जेजुरीजवळ भुलेश्वराच्या डोंगरावर सुभानमंगळ नांवाचा किल्ला बांधला. या गडबडींत हा दडून बसला. तेव्हां यास मोठ्या मेहनतीनें पकडलें. 'नखीं सुया टोचून मार देऊन कैदेंत होते.' पुढें हा कैदेंतून सुटला व कांहीं दिवस गडबड न करितां स्वस्थ होता. स. १६३८ मध्यें वरील प्रदेश पूर्णपणें शहाजीच्या ताब्यांत आला. आणि शहाजीचा कारभारी दादोजी कोंडदेव कारभार पाहूं लागला. स. १६३१मध्यें दुष्काळानें मुलूख वैराण झाला होता. त्यामुळें लोकांशीं वागतांना दादाजीस कधीं धाकानें तर कधीं प्रेमानें वसती करवावी लागे. बोलावलें तरी हा न येणारा होता. त्यामुळें दादाजीनें यावर शस्त्र धरलें. तेव्हां हा रंगभट मळेकराच्या येथें लपून बसला. रंगभटाची आई फुलाई हिनें सहा महिनेपर्यंत याची खबर लागूं दिली नाहीं. तिचा नातू अनाजी रंगनाथ हा शिवाजीच्या पदरीं राहिला होता. त्यानें मोरोपंत तानदेवास शिवाजीच्या पायावर घातलें. शिवाजीनें यास क्षमा करून देशपांडेपण दिलें.

मोरो धोंडाजी— (स. १७६५) निजामाचा एक सरदार.

मोरो बापूजी— (स. १७७४) पेशव्यांचा एक सरदार. हा बाणकोटास असतां इंग्रजांस तोंड दिलें.

मोरोपंत—(स. १७२९–१७९४) हा एक प्रसिद्ध महाराष्ट्रीय कवि. पराडकर घराण्यांत मोरोपंत जन्मास आला. या घराण्याचें मूळ ठिकाण रत्नागिरी जिल्ह्यांत राजापूरप्रांतीं सौंदल हें होय. मराठेशाहींत कोंकणांतील पुष्कळ घराणीं देशावर आलीं त्याचप्रमाणें हें घराणें पन्हाळ्यास आलें. या ठिकाणींच मोरोपंताचा जन्म झाला. याचें तत्कालीन शिक्षण याच्या वडिलांनीं पूर्ण करून घेतलें होतें. गणेश पाध्ये यांचेजवळ पंतांनीं संस्कृत शिकण्यास सुरुवात केली व थोड्याच काळांत संस्कृत काव्यें, नाटकें व अलंकारशास्त्र यांचें अध्ययन केलें. यांनीं निरनिराळे ४० संस्कृत ग्रंथ लिहून काढले.

मोरोपंत आपला अभ्यासक्रम आटोपून बारामतीस आपल्या वडिलांबरोबर गेले. मोरोपंतांची विद्वत्ता दृष्टीस पडून बाबूजी नाईकांनीं यांना वाड्यांत पुराण सांगण्यास नेमलें. येथें असतांनाच यांचा विवाह झाला. लक्ष्मीबाई व आनंदीबाई अशा दोन बायका यांस होत्या. ते प्रथम शिवभक्त होते, परंतु पुढें प्रसिद्ध रामभक्त बनले. नाईकांच्या आश्रयावर संतुष्ट राहून यांनीं आपला सर्व काळ कविता रचण्यांत घालविला व शके १७१६ मध्यें चैत्र शु॥ १५ स देह ठेविला.

मोरोपंतांची काव्यरचना—पंतांची काव्यरचना महाराष्ट्रभाषेंतील इतर कवींच्यापेक्षां संख्येनें फारच मोठी आहे. ती अजमासें पाऊणलाख आहे. त्यांपैकीं ६०००० कविता उपलब्ध आहेत.

महाभारत, रामायणें, हरिवंश, कृष्णविजय ऊर्फ बृहद्दशम, मंत्रभागवत इत्यादि यांचीं मोठीं काव्यें होत. शिवाय काशीप्रकरणें, संतप्रकरणें, भागवती प्रकरणें, गीतार्थ, गाणीं, स्तोत्रें, संशयरत्नावली, केकावली इत्यादि अनेक छोटीं काव्यें पंतांनीं लिहिलीं आहेत. निरनिराळ्या वृत्तांमध्यें यांनीं फारच चतुराईनें काव्यें रचिलीं आहेत. मराठी भाषेवरील यांचें प्रभुत्व अलौकिक होतें. 'मराठी भाषा शब्दचमत्कार, अनुप्रास, श्लेष इत्यादि साधण्याला पात्र नाहीं' या आक्षेपाला मोरोपंतांचें काव्य हें उत्कृष्ट उत्तर आहे यांत शंका नाहीं. पंतांच्या भाषेंतील प्रमुख विशेष म्हटला म्हणजे यमकप्राचुर्य हा होय. पंतांच्या काव्याचें अध्ययन वाढविण्याकरितां पुण्यास 'मयूरमंडळ' स्थापन झालें आहे.

शिवाय श्री. ल. रा. पांगारकर व प्रो. श्री. ना. बनहट्टी यांचे ग्रंथ, यांच्या काव्याचा दीर्घ काळ व्यासंग करून लिहिलेले आहेत.

मोरोबादादा फडणीस—(जन्म स. १७४०–मृत्यु स. १८०३) याचा पिता बाबूराव फडणीस. हा नाना फडणीसाचा चुलत भाऊ.

पहिल्या माधवरावानें याला फडणीशी दिल्यावर (स. १७६३ आक्टो.) नाना पुण्यांत व हा स्वारीवर अशी व्यवस्था असे. पण याचा अर्थ यानें भलताच घेतला, आणि फारच घमेंडखोर झाला. पण माधवरावानें मरतेसमयीं याला न विचारतां नाना व बापू यांवर राज्याचा भार सोंपविला, तेव्हां याचा भ्रम दूर झाला व हा नानाचा हेवा करूं लागला. बारभाईंच्या कारस्थानांत नाना व बापू प्रमुख झाले आणि हा बाजूला पडला. शेवटीं दादास पेशवा करून नानास कैद करण्याचें यानें भयंकर कारस्थान रचलें आणि नानाची सोडचिठ्ठी घेऊन तें यशस्वीहि करीत आणलें. या बाबतींत इंग्रज वकील मॉस्टीन हाच याला पुढें करून कामें करी असें दिसतें. पण शेवटीं यालाच नाना व महादजी यांनीं कैद केलें (नाना फडणीस पाहा). पुढें पंचवीस वर्षे याचें आयुष्य कैदेंत गेलें. नगरच्या किल्ल्यांत कैदेंत असतां यानें फितुरीहि केली. पण माधवराव नगरकरानें याचा बंदोबस्त केला. नाना मेल्यावर दुसऱ्या बाजीरावानें यास समारंभानें पुण्यास आणून कारभारांत घेतलें. पण बाजीरावाला पदच्युत करण्याचे कारस्थानांत

हा असल्याचें ठरल्यानें याला पुनः धनगड येथें कैदेंत ठेवण्यांत आलें (स. १८०२). पुनः यशवंतराव होळकरानें यास कारभार सांगितला, पण हा ता. २८-८-१८०३ रोजीं मेला.

याची पत्नी चिमाबाई. याचा पुत्र नाना. त्यानें पुढें इंग्रजी अमलांत बंड केलें.

मोरो रघुनाथ फडणीस—(स. १७६० सुमार) मुधोजी भोसल्याचा फडणीस. मुधोजीनें चंद्रपूरवर हल्ला केला असतां हा जखमी होऊन मेला.

मोरो व्यंकटेश—राघोबादादाचा हा एक कारकून असून स. १७७४ मध्यें दादानें महादजीस एक पत्र लिहून तें याच्याबरोबर महादजीस पाठविलें होतें (म. रि. उत्तर वि. १ ला, पृ. ५).

मोहनांगी—ही कृष्णदेव रायल्लूची कन्या. ही विद्वान् असून हिनें 'मरीचिपरिणय' नांवाचें नाटक लिहिलें आहे. हिचा नवरा ऐन तारुण्यांत मरण पावल्यामुळें हिनें सहगमन केलें.

मोहनदास—हनूमान् नाटकाचा टीकाकार.

मोहकर्मसिंग—चूडामण जाटाचा मुलगा (बदनसिंग पाहा).

मोक्षाकर गुप्त—(स. ११०० सुमार) बौद्ध तर्कज्ञ. ग्रंथ–तर्कभाषा (संस्कृत. अनुपलब्ध).

मौखरीवंश—

क्षत्रवर्मन् (स. २६०–२८३)
⋮
सुंदरवर्मन् (स. २८३–३१९)
|
कल्याणवर्मन् (स.३२६)–पत्नी कीर्तिमती.

बल मौखरि महासेनापति.
|
बलसिंह बलवर्धन् सोमदेव

(टीप—या तिघांनीं कृत म्हणजे विक्रमसंवत् २९५ (स. २३९) च्या फाल्गुन शुद्ध ५ स त्रिरात्र नांवाचा यज्ञ कोटा संस्थानांतील बडवा गांवीं केला, असें तेथील डॉ. अ. स. आळतेकर यांना उपलब्ध झालेल्या शिलालेखांवरून दिसतें). (मं. त्रै. १७. १. पा. १७).

यज्ञवर्मन् (स. ४००–४२५).
|
शार्दूलवर्मन् (स. ४२५–४५०).
|
अनंतवर्मन् (स. ४५०–४७५).
|
हरिवर्मन् (स. ४७५-५००)–पत्नी-जयस्वामिनी.
|
आदित्यवर्मन् (स. ५००–५२५)–पत्नी हर्षगुप्ता.
|
ईश्वरवर्मन् (स. ५२५–५५०)–पत्नी उपगुप्ता.
|
ईशानवर्मन् (स. ५५०–५७६)-पत्नी लक्ष्मीवती.
|
सूर्यवर्मन् शर्ववर्मन् (स. ५७६–५७९).
⋮
अवंतिवर्मन् (स.५७९-६००).
|
२ | १ |
पूर्णवर्मन्(स.६१२–६२८). गृहवर्मन् (स.६००–६०६). (याचें लग्न प्रभाकरवर्धनची कन्या राज्यश्रीशीं झालें होतें).
⋮
भोगवर्मन् (स.६८५–७१५).
|
वत्सदेवी यशोवर्मन् (स.७२९–७५३).
(हिचें लग्न नेपाळच्या शिवदेवाशीं झालें).
|
जयदेव

(मौखरी By E. A. Pires, M. A., वरून).

यास आधार—कौमुदीमहोत्सव नांवाचें संस्कृत नाटक कल्याणवर्मन्चे कारकीर्दीत लिहिलें गेलें तें व थोडे उपलब्ध शिलालेख यांचे आधारें या घराण्याची माहिती मिळते.


मौदूद गझनवी—(स. १०४१–४९) हा मसूदचा मुलगा व महमूदचा नातू (महीपाल व मुहम्मद गझनवी पाहा).

मौनि—या उपनांवाचें काशींत एक महाराष्ट्रीय पंडित घराणें होतें.

मौनीबाबा—(समाधि स. १६८६) एक मराठी साधु. हे रांगणा ऊर्फ प्रसिद्धगड किल्ल्यापासून चार मैलांचे अंतरावर असलेल्या पाटगांवचे राहाणारे. शिवाजी महाराजांची यांच्यावर फार भक्ति होती. हे मूळचे कोण, याचा पत्ता लागत नाहीं. यांची समाधि पाटगांव येथें आहे. तेथें दरसाल रथसप्तमीपासून सहा दिवस बाबांच्या पुण्यतिथीचा समारंभ होत असतो. सिंधुदुर्ग किल्ल्यांतील मंदिरांत शिवाजीमहाराजांचीं मूर्ति असून गाभाऱ्याचे

बाहेर यांची मूर्ती बसविली आहे. शिवाजीनें यांची भेट स. १६७६ त घेतली होती. शिवाजी दक्षिण-दिग्विजयास निघाला तेव्हां त्यानें सात तास उभें राहून यांचा आशीर्वाद मिळविला. यांच्या शिष्याचें नांव तुकगिरी. यांच्या शिष्यांचीं नांवें 'गिरी' संज्ञक आहेत. यांचे शिष्य मूळ मराठा जातींत जन्मलेले पण पुढें संन्यास ग्रहण करून गोसावी झाले. हे समाधिस्थ झाल्यावर संभाजीनें यांचा शिष्य तुकगिरीस यांचे पदावर बसविलें (मं. त्रै. १३. ४. ले. १९). सध्यांचे क्षात्रजगद्गुरु यांचे विद्यमान शिष्य आहेत.

मौर्यवंशवृक्ष—



(मौर्य साम्राज्यका इतिहास, पा. ६६१).

मौर्य--

चित्रांग (चित्रांगद), मान (चितोडजवळील मानसरोवराचा निर्माता).

माहेश्वर
|
भीम
|
भोज
|
मान

(वि. सं. ७७०–स. ७१३) शिलालेख टॉडला मिळाला होता.

या मानापासूनच गुहिलवंशी बापा (काळभोज) यानें चितोड घेतला.

राजा धवल (वि. सं. ७९५–स. ७३८).

पूर्णवर्मा मौर्याचें वर्णन हु–एन–त्संगानें केलें आहे.

कोंकणांतील आठव्या शतकांतील मौर्य मोरे होत.

मौल्ली—कृष्णदेवराय तुलुवाच्या दरबारांतील एक प्रसिद्ध तेलगू कवयित्री.

म्हालरदारखान—(स. १६३३–३४) त्रिंबकचा निजामशाही किल्लेदार. हा मोगलास मिळाला होता. शहाजीनें मोगलांविरुद्ध लढाई सुरू केली तेव्हां यानें बढती मिळविण्याकरितां भेटण्याकरितां जाऊन जिजाबाईस जुन्नर येथें कैद केलें. तिनें प्रसंग जाणून शिवाजीस आधींच गुप्तपणें शिवापुरास धाडलें होतें. हिला कोंडाण्यास ठेवलें असतां जगदेवराव जाधवानें हिला सोडविलें व गांडापुरांत ठेवलें.

म्हाळोजी घोरपडे—संभाजी बंडखोरी करून स. १६७८ मध्यें पेडगांव येथें दिलीरखानास मिळाला. त्यास पकडून आणून पन्हाळ्यावर बंदोबस्तानें ठेवलें. आणि म्हाळोजीस किल्ल्याची सरनोबती दिली. संभाजीच्या वेळींहि हा तेथला सरनोबत होता. २८।१२।८८ रोजीं संभाजीला पकडतांना झालेल्या चकमकींत हा कामास आला. यास संताजी, बहिरजी व मालोजी असे तीन पुत्र होते.

य

यकरंग—याचें सगळें नांव गुलाम मुस्तफा कुलीखान यकरंग असें आहे. हा दिल्लीचा प्रसिद्ध कवि होय. हा मोठा मिजासखोर होता. याला गायनवादनाचा शोक असे. रंगेल म्हणून याची ख्याति होती. याचा दीवाण (कवितासंग्रह) प्रसिद्ध आहे (क. कौ. भा. ४).

यघ्रशाखान खल्जी—(फांशी स. १३१८) हा मलीक खल्जीचा मुलगा. हा जलालुद्दीनचा भाऊ होय. यास असदुद्दीन नांवाचा मुलगा होता.

यजकेशिन् कदंब—(स. १०५२) हा गोव्याच्या कदंबांपैकीं षष्ठदेवाचा पुत्र. हा पश्चिम चालुक्यांचा मांडलिक होता. यानें कापर्दिकद्वीपाच्या राजाला ठार मारलें असें म्हणतात.

यमाजी शिवदेव मुतालिक—(मृत्यु स. १७६३) हा सातारा जिल्ह्यांतील जावळी तालुक्यांत बामणोली गांवांत राहत असे. राजारामाचे कारकीर्दींत परशुराम त्रिंबक प्रतिनिधीचे हाताखालीं हा कारकुनी करूं लागला. पुढें याला प्रतिनिधीची मुतालिकी मिळाली (स.१७४२–४३). हा मुत्सद्दी असून शिपाईहि होता. शाहूच्या पूर्वीच्या अमदानींत उदयास आलेल्या लोकांना छत्रपति सोडून पेशव्यांचा अंमल मानणें जिवावर येई. पण सैन्याच्या जोरावर पेशवे अशा लोकांची खोड मोडीत. हा कैदेंतहि होता (स. १७५१–पु. रो. ६१). प्रतिनिधीचा विरोध शमला तरी याचा विरोध चालूच होता. पानपतावर वाताहात झाली आणि नानासाहेब वारले. तेव्हां यानें आपला व्याही विठ्ठलसुंदर याच्या द्वारां निजामाकडून पेशव्यांवर चढाई केली. पण हा विठ्ठलसुंदरसुद्धां त्या लढाईंत पडला.

ययातिकेसरी—(स. ४७४ सुमार) ओरिसाच्या केसरी घराण्यापैकीं एक प्रमुख राजा. यानें यवनांना ओरिसांतून हाकलून दिलें (रक्तबाहु पाहा).

यमारि—(स. १०५० सुमार) बुद्ध तर्कज्ञ. हा व्याकरणज्ञहि होता. याला एका योग्याच्या कृपेनें विक्रमशिला येथील विद्यापीठांत बहुमानाची पदवी मिळाली. पद्माकरगुप्ताच्या प्रमाणवार्तिकालंकारावर यानें टीका लिहिली. त्याचें फक्त तिबेटी भाषांतर उपलब्ध आहे (हि. आ. इ. लॉजिक, पा. ३४३–४४).

यमीनउद्दीन मुहम्मद हसन ऊर्फ **अमीर खुस्रव**—(खुस्रव पाहा).

यमुनाबाई शिंदे—(मृत्यु स. १८१४) ही रामसिंग राऊळ दंवडाईकर यांची बहीण व महादजी शिंदे यांची पत्नी. ही महादजीच्या मृत्यूनंतर हयात होती. दौलतरावास विरोध करणाऱ्या शिंदे बायांपैकीं ही एक होय (दौलतराव शिंदे पाहा). सर्जेरावाकडून हिचा मारेकऱ्यामार्फत खून करण्याचा प्रयत्न झाला, पण त्यांत ही फक्त जखमी झाली (१४-१-१८००). हिचा मृत्यु १-२-१८१४ रोजीं झाला.

यशवंत गंगाधर चंद्रचूड ऊर्फ **दादाजी**—(स. १७६३ सुमार) हा गंगाधर यशवंत चंद्रचूडास पार्वतीबाई ऊर्फ काकू नांवाच्या दुसऱ्या बायकोपासून झालेला पुत्र. याला माधवराव ऊर्फ रावसाहेब नांवाचा दुसरा एक पुत्र होता. राक्षसभुवनच्या लढाईनंतर गंगोबा मुलींचें लग्न आटोपून उत्तरेस गेला तेव्हां त्यानें सर्वांत धाकट्या मुलास म्हणजे माधवरावास बरोबर नेलें, व याला अहल्याबाईकडे दरबारी काम संभाळण्यास ठेवलें. हा चांगला व्युत्पन्न व बुद्धिमान् पुरुष होता. सावत्रपणाच्या नात्यामुळें उत्पन्न झालेल्या घरगुती तंट्याचा निकाल लावण्याचें काम याच्याकडे असे (चंद्रचूडदप्तर ले. १५५). हा विद्वान् व व्यवहारज्ञ होता. दादासाहेबांनीं उत्तर हिंदुस्थानांतून परत आल्यावर माधवरावाशीं तंटा सुरू केला तेव्हां गंगोबानें माधवरावाचा पक्ष सोडून दादासाहेबांचा पक्ष स्वीकारला. हें करणें चुकीचें आहे, शेवटीं माधवरावाचाच पक्ष विजयी होणार, हें यानें स्पष्टपणें वाडिलांस कळविलें होतें. यामुळेंच धोडपच्या युद्धानंतर अडचणींतून यानें आपलें घराणें ऊर्जित दशेस आणलें (चंद्रचूडदप्तर १ प्रस्तावना १५–१६).

यशवंत महादेव पोतनीस—(स. १७२२–३२ सुमार) हा महाडचा प्रभु देशपांडे मुसेखोरेकर. हा भोरप येथें राहत असे. हा शाहूमहाराजांच्या वेळीं उदयास आला आणि शेवटीं त्यांच्या अत्यंत विश्वासांतल्या मंडळींत होता. याची खासनीस म्हणून (स. १७२२) सही आहे (रा. खं. २०.४४). उदाजी चव्हाणावर हा गेला असतां याला दंड भरून सोडवावें लागलें (स. १७३२). रायगड घेण्यास याचा उपयोग झाला म्हणून याला तेथील सुभेदार नेमलें. पुण्याच्या पोतनिसांचे हे पूर्वज होत.

यशवंतराव पवार—(स. १७३६–६१) धारच्या आनंदराव पवाराचा हा पुत्र. माळव्याबाहेरील मराठी

राज्याचा विस्तार करणाऱ्या मल्हारजी होळकर, राणोजी शिंदे, पिलाजी जाधव, यांमध्येंच हाहि होता. स. १७३४ -३५ च्या माळव्याच्या मोहिमेंत हा होता. या वेळीं पठारी, लालगड इकडील बंदोबस्त यानें केला. हल्लींच्या धार संस्थानांतील निमनपूर परगणा म्हणजे लालगड होय. पुढल्या सालीं चिमाजी आपाबरोबर हा कोंकणांत गेला (स. १७३६). बाप वारल्यामुळें याला पुण्याचीं सरदारीचीं वस्त्रें मिळालीं (ऑगस्ट स.१७३६) व नियमाप्रमाणें परमुलखांतली शेंकडा १६ रक्कम यास मिळूं लागली. झीलतलावावरील लढाई (नवंबर स. १७३६), वसईची मोहीम (स. १७३९), भोपाळची लढाई (डिसेंबर स.१७३७) या प्रसंगीं यानें चांगलाच पराक्रम दाखविला.

स. १७४४-४६ सालीं पेशव्यांनीं बुंदेलखंडावर स्वाऱ्या केल्या यांत हा होता. पुढील सालीं याची व सदाशिवराव भाऊसाहेबांची कांहीं बोलाचाली होऊन यानें त्याच्या डेऱ्यावर तोफा डागल्या. त्यामुळें याच्या सर्व सरंजामाची जप्ती झाली (स. १७४७) व ती स. १७५१ मध्यें मोकळी झाली. पण मध्यंतरीं याला फार कर्ज झालें म्हणून यानें निजामाकडे संधान बांधलें. परंतु पुढें याचा व पेशव्यांचा समेट झाला. श्रीरंगपट्टण (स. १७५७), शिंदखेड, उदगीर (स. १७६०) वगैरे लढायांतहि यानें चांगलाच पराक्रम दाखविला. त्या वेळच्या लुटींत पेशव्यांनीं याला एक जरीपटका, राजराजेश्वराची एक मूर्ति, चौघडा व २५ शें स्वारांचें पथक दिलें. याच्या वंशांत राजा हें पद प्रथम यासच मिळालें. शेवटीं पानपतांत हा गारद झाला (स. १७६१). यानें २७ वर्षें कारभार केला. हा शूर, दयाळू, व साहसी होता. शरिरानें हा काटकुळा व उंच असून डोळे मोठे होते, मुद्रा क्रूर व शिपाईबाण्याची होती. याला अपमान बिलकुल सहन होत नव्हता.

यशवंतराव भवानीशंकर काळो—(स. १८०१ सुमार) हा भवानी काळो याचा ज्येष्ठ पुत्र होय. दु. रघूजीनें बिंबाजीची बायको आनंदीबाईकडून छत्तिसगडचा ताबा घेण्यासाठीं, यास सैन्यासह पाठविलें होतें. परंतु बाईचे कारभारी महिपतराव काशी व कृष्णभट यांनीं तिची व याची सफाई करून दिली; व यास रघूजीबरोबर पुण्यास जाणें असल्यामुळें रघूजीनें महिपतराव दिनकर यांस आपले तर्फेनें छत्तिसगडास रवाना करून यास परत आणलें. पुढें यानें बंडखोर गाजीखानाचा बंदोबस्त केला (स. १८०१) व जामोदचा किल्ला घेतला.

यशवंतराव भाऊ—(स.१८१०सुमार) हा दौलतराव शिंद्याचा एक पराक्रमी सरदार. शेवटीं दौलतरावाची यावर इतराजी झाल्यामुळें यानें आत्महत्या केली (म. रि. उ. ३, पृ. ३९५).

यशवंतराव डफळे—जत संस्थानच्या सटवोजीचा हा नातू. सटवोजीची सून व याची चुलती येसूबाईनंतर हा जतच्या गादीवर आला. स. १७४४ मध्यें शाहूनें याला गादीचा वारस कायम केलें. यानें पेशव्यांकडून बहिणाबाईची तजवीज केली. कारण ती याच्या जहागिरींत गडबड करीत असे. याच्या मागून याचा पुत्र अमृतराव गादीवर आला.

यशवंतराव दाभाडे—(मृत्यु स. १७५४ मे १८) हा खंडेरावाचा मुलगा. त्रिंबकरावानंतर यास सेनापतिपद मिळालें. प्रथम हा अल्पवयी असल्यानें याची आई उमाबाई कारभार पाही. सुरत व अहमदाबादेस यानें जय मिळविले. हा कर्नाटकच्या स्वारीहून परत येत असतां मिरजेजवळ दगदगीनें वारला (उमाबाई दाभाडे पाहा).

यशवंतराव माने—(स. १७७८ सुमार) म्हसवडकर मान्यांच्या घराण्यांतील यशवंतराव हा पेशव्याकडे लहानसा सरदार होता. हा मल्लविद्येंत फार पटाईत होता. हा कांहीं दिवस सवाई माधवरावास तालीम शिकविण्यास होता. एक दिवस यानें नाना फडणीसाला मुजरा केला नाहीं. म्हणून एका अजिंक्य ठरणाऱ्या पहिलवानाच्या आखाड्यांत कुस्ती करावयास सांगून नानांनीं याचा अपमान केला आणि हा अपमानाचा सूड घेईल म्हणून यास दुसऱ्या दिवशीं दग्यानें ठार केलें (भा. व. खं. ३, ऐ. गो. पा. ४७).

पण हैदरवरील स्वारींत मानाजी फाकड्याच्या फितुरींत सांपडल्यानें यास तोफेच्या तोंडीं दिलें, असा दुसरीकडे निर्देश आहे (म. रि. उ. १, पृ. १०१).

यशवंतराव शिंदे कोल्हापूरकर—(येसाजी कुसाजी पाहा).

यशवंतराव होळकर—(मृत्यु स. १८११ ऑक्टो. २८) हा तुकोजीचा दासीपुत्र. याची माता यमुनाबाई ही स. १८०८ पर्यंत जिवंत होती. यास तिघे भाऊ होते. त्यांचीं नांवें-काशीराव, मल्हारराव, विठोजी. यांपैकीं पहिले दोघे औरस असून तिसरा दासीपुत्र होता. तुकोजी मेल्यावर या भावांत गादीकरितां तंटे सुरू झाले. तेव्हां काशीराव यानें पेशव्यांचा आश्रय केला आणि मल्हारावानें सर्जेरावाचा आश्रय केला. चिमाजीच्या दत्तकप्रकरणांत यानें परशुरामभाऊचा जुन्नरजवळ पराजय केला

(स. १७९६ ऑक्टो.). शिंद्याकडून पुणें येथें मल्हारराव भांबुर्ड्यास ठार मारला गेल्यावर (स. १७९७ सप्टें.१४) हा व विठोजी हे मात्र पळून गेले. हा नागपुरास आला असतां भोसल्यांनीं शिंद्याच्या सांगण्यावरून यास कैद केलें. परंतु तेथून हा युक्तीनें निसटला. पुढें कांहीं दिवस एका भिल्लाकडे राहून धारच्या पवाराकडे गेला. तेथील दिवाण ओढेकर दौलतराव शिंद्याचा पक्षपाती असल्यानें याचा जम तेथें बसला नाहीं. नंतर यानें आपला भाऊ काशीरावाबरोबर युद्ध पुकारलें. याच सुमारास बडगोदा गांवीं शिकार करीत असतां याचा बंदुकीच्या गोळीनें उजवा डोळा गेला. नंतर महेश्वरास येऊन तेथील अहल्याबाईचें द्रव्य लुटलें व विठ्ठल महादेव ऊर्फ तात्या जोगास फडणीस नेमिलें. जाटाचा एक किल्ला घेतला व तेथील द्रव्य लुटलें (स. १८०० मार्च २२). याला दौलतरावाच्या आया सामील होत्या व यानें शिंद्यांचा मुलूख घेण्यास सुरुवात केली.

तेव्हां दौलतरावाचा व याचा नर्मदेवर उघड सामना सुरू झाला (स. १८०१ जून). रघूजी भोसले दौलतरावाच्या मदतीस होता. प्रथम यानें शिंद्यांचे पुष्कळ लोक कापले, पण इंदूर येथें याचा पराभव झाला. तथापि यानें फितुरी करून त्याचा पराभव केला. अशा अनेक लढाया झाल्या.

याच वेळीं दक्षिणेंत विठोजीनेंहि बंड सुरू करून जागोजाग अमृतराव पेशव्याच्या नांवानें खंडणी वसूल करण्यास सुरुवात केली. त्याला बाळकृष्ण गंगाधर बावनपागे याचें साहाय्य होतें. शेवटीं त्यास बापू गोखल्यानें पकडून आणलें, खूप मार दिला आणि हत्तीच्या पायीं दिलें (स. १८०१ एप्रिल १६). पण या भयंकर कृत्यानें याच्या तळपायाची आग मस्तकापर्यंत गेली आणि हा पुण्यावर चालून येऊन यानें पुणें बेचिराख केलें आणि हडपसरावर बाजीरावाचा पराभव केला. तेव्हां बाजीराव घाबरून वसईस गेला आणि त्यानें इंग्रजांशीं तह केला. त्यामुळें मराठेशाही नाममात्र शिल्लक राहिली (स. १८०२). यानें वानवडीस शिंद्यांचे वाड्यांत मुक्काम ठेवून शिंद्यांचे लोक पळून जाऊं नयेत म्हणून पुण्याची नाकेबंदी केली. बरीचशी लूट करून अमृतरावाला पुण्यास आणलें. अमृतरावानें याला एक कोट रुपये देऊं केले होते. त्यांपैकीं पन्नास लक्ष पुण्यांतील लोकांकडून उकळून त्यानें याची भर केली. याच सुमारास याचा शूर सरदार पराशर दादाजी वाघ वारला (१८०२ नवं. १८). पुढें से. वेलस्लीच्या हालचालीमुळें याला पुणें सोडणें भाग पडलें. यानें औरंगाबादेहून अकरा लक्ष खंडणी वसूल केली व पैठण आणि जालना हीं शहरें लुटून जाळलीं (स. १८०३ मे). नंतर चांदवड, नंदुरबार, सुलतानपुराकडे गेला. दौलतराव व बाजीराव याच्याशीं तह करण्यास राजी नव्हते. त्यामुळें शिंद्याचा दिल्लीकडे पाडाव होत असतां हा मजा पाहत स्वस्थ राहिला. शेवटीं सुरजी अंजनगांवला शिंदे भोसल्यांशीं तैनाती फौजेचा तह करून इंग्रजांनीं त्यांचे बाह्य संबंध बंद पाडले. नंतर हा एकटा पडला. याच्या जवळ सैन्य व धमक असल्यानें हा इंग्रजांविरुद्ध उठावणीची भाषा बोले. हा तह करण्यास तयार होता. पण तो मान्य झाला नाहीं. तेव्हां यानें गव्हर्नर जनरलला पुढीलप्रमाणें धमकावणीचें पत्र लिहिलें: 'तुमच्या तोफखान्यापुढें समरांगणावर जरी माझा इलाज नसला तरी शेंकडों मैलांच्या दौडी मारून अल्पावकाशांत दूरदूरचे प्रदेश जाळून लुटून टाकण्याचें सामर्थ्य मला आहे. तुम्हांस एक क्षणाचीहि विश्रांति मी घेऊन देणार नाहीं. एकदां आमच्या समुद्रलाटेप्रमाणें फौजा पसरल्या म्हणजे लाखों माणसें मरतील. मग त्याजला विरोध करण्याची छाती कोणासहि होणार नाहीं.'

शिंदे-भोसल्यांची रिकामी झालेली फौज यानें नोकरीस ठेवली. इंग्रजांनाहि तहाची इच्छा असून युद्ध जाहीर करावें लागलें (स. १८०४ एप्रिल १६). यानेंहि इंग्रजांशीं युद्ध करण्याचें नाकारणाऱ्या आपल्याकडील इंग्रजांचीं डोकीं उडविलीं व दिल्लीच्या बादशहाकडून 'महाराजाधिराज राजराजेश्वर अलिजाबहादूर' अशी पदवी मिळविली; आणि यानें अफगाणिस्थानापर्यंत सर्व राजेरजवाड्यांना पत्रें धाडून इंग्रजांविरुद्ध उठावणी केली. या हालचाली पाहून इंग्रजांनीं यास कळविलें कीं, 'काशीराव हा दौलतीचा खरा मालक आहे. होळकरांचे दौलतीवर तुमचा हक्क नाहीं.' तेव्हां हा फारच चिडला. या दीड वर्षाच्या युद्धांत इंग्रज अगदीं टेकीस आले. मुकुंदरा खिंडींत धावपळीचें युद्ध करून यानें मान्सनला अगदीं जेरीस आणलें; आणि त्याची सर्वस्वी वाताहत होऊन तो कसातरी जीव बचावून आग्र्यास पोंचला (स. १८०४ ऑग.). यामुळें याचा लौकिक वाढला व जाठ वगैरे लोक यास सामील झाले. नंतर यानें मथुरा, दिल्ली व नंतर डीगपर्यंत लेकशीं असाच धांवपळीचा सामना केला. डीग येथें रणजितसिंग जाठ यास सामील झाला. भरतपूरच्या किल्ल्यावर लेकनें अठरा हल्ले केले. अठराहि हल्ले आंतून जाठ व बाहेरून हा यांनीं मारून काढले. इंग्रज फलटणांचा नुसता शेणसडा झाला. होळकराकडील सोमाजी लांबहाते केवळ कलींतला अर्जुन मारला गेला

(स. १८०५). यानंतर इंग्रजांनीं जाठाला फोडलें व त्याच्याशीं तह केला, पण शिंदे वगैरे लोक याला सामील होऊन मराठ्यांची जूट होण्याचा संभव उत्पन्न झाला. पण या वेळीं युरोपांत नेपोलियनच्या चढाईनें वातावरण बदललें आणि वेलस्लीच्या ऐवजीं कार्नवालिस येऊन त्यानें सामोपचाराचें धोरण स्वीकारून युद्धास पायबंद घालण्याचें ठरविलें.

नंतर इंग्रज होळकरांकडे वळले. सप्टेंबरांत यानें पंजाबकडे कूच केलें. कारण शीख व अफगाण यांच्या साह्यानें इंग्रजांशीं सामना करण्याचा याचा तिकडे उद्देश होता. शेखावटींतून माचेडीकराचे मुलुखांस ओलांडून कित्येक संस्थानिकांस सामील करून हा पत्याळा येथें गेला. मागून लेकनें रेवाडी व नार्नाल येथें आपलीं ठाणीं बसवून याचा पाठलाग चालविला.

शेवटीं याचा व त्यांचा तह ठरला. युद्धारंभीं याच्याकडे फौज सत्तर हजार असून शिवाय १०० तोफा होत्या, पण शेवटीं पंधरा हजार फौज व २० तोफा एवढी काय ती शिल्लक राहिली. हा तह व्यास नदीच्या काठीं राजपूरघाट येथें (ता. २४-१२-१८०५) रोजीं कायम झाला. तहाच्या कलमांवरून याचा पूर्वीचा सर्व प्रदेश याजकडे कायम राहिला. याच्या मुलीस भीमाबाईस बुंदेलखंडांतील कुंचचा जिल्हा जहागीर म्हणून देण्यांत आला.

काशीरावाला यानें खानदेशांत बीजगड येथें बंदोबस्ताकरितां पाठविलें. तेथें तो दंगलींत मारला गेला (स. १८०८). शेवटीं अतिश्रमामुळें याला दारूचें व्यसन लागलें होतें. स्वतःच्या नांवाचा रुपया यानें पाडला होता. मराठी व फार्सी लेखनवाचन यास येत असे. हा रंगानें काळा असून ठेंगू होता. शेवटीं शेवटीं यास वेड लागलें.

याच्या पत्रांत धर्माभिमान व्यक्त केलेला दिसतो. उत्कृष्ट सेनापति म्हणून याचें नांव चिरकाल टिकेल. स्वभावानें विनोदी असून सैन्याला हा आपलासा वाटे. इंग्रजांची खोड जिरविण्याची याची मनीषा अपुरीच राहिली. त्यामुळें व पैशाच्या अडचणीमुळें हा लहरी व उतावळा झाला. यानें तोफा ओतण्याचा कारखाना सुरू केला होता. होळकरांची दौलत टिकविण्याचें श्रेय सर्वस्वी याला आहे. मराठ्यांच्या लढाऊ वृत्तीचें असामान्य प्रदर्शन यानें शेवटीं शेवटीं पुनः एकदां जगाला दाखविलें. शेवटीं भानपूर येथें हा मृत्यु पावला (ता. २८-१०-१८११).

यशवंतसिंग—(अजितसिंग पाहा).

यशःकर्णदेव कलचुरी—(स. १०८०-११२४) हा कर्णदेव कलचुरीचा पुत्र. याचे कांहीं प्रांत कनोजच्या गोविंदचंद्रानें घेतले (जबलपूर ताम्र.). तसेंच लक्ष्मणदेव परमारानें खुद्द त्रिपुरीवर मोहीम केली (नागपूर प्र.). यानेंहि आंध्रराजाचा पराभव करून चंपारण्य उध्वस्त केलें होतें (भेडाघाट शिला.). याचा पुत्र गयःकर्ण.

यशःपाल प्रतिहार—(स. १०३६ सुमार) रघुवंशी प्रतिहारांपैकीं एक राजा. याच्या वेळचा एक शिलालेख वि. सं. १०९३ (स. १०३६) मधील मिळाला आहे. याच्यानंतर वि. सं. ११३५ (स. १०७८) च्या सुमारास गाहडवाल महींचंद्राचा पुत्र चंद्रदेवानें कनोजच्या प्रतिहाराचें राज्य घेतलें. हा अखेरचा प्रतिहार होय. याच्यानंतरहि कांहीं प्रतिहार आढळतात, पण ते स्वतंत्र राजे नसून जहागिरदार असावेत.

यशोदानंदन—(जन्म स. १७७१) 'बरवैनायिकाभेद' या हिंदी काव्याचा कर्ता.

यशोदामन् क्षत्रप—(स. २३९) हा दामसेन क्षत्रपाचा मुलगा. याचीं शा. श. १६१ मधील चांदीचीं नाणीं मिळालीं आहेत.

२. (स. ३१७-३२) दुसऱ्या रुद्रसिंहाच्या नंतर पश्चिम क्षत्रप म्हणून हा स. ३१७ मध्यें गादीवर आला. यानें स. ३३२ पर्यंत राज्य केलें. याच्यानंतर याच घराण्यांतील दुसऱ्या रुद्रसेनापर्यंत (म्हणजे ३४८ पर्यंत) या क्षत्रप घराण्यास उतरती कळा लागली.

यशोधवल परमार—(स. ११४५) आबूच्या परमारांपैकीं विक्रमसिंहाच्या बहिणीचा मुलगा. यानें कुमारपालाचा शत्रु जो माळव्याचा राजा बल्लाळ त्याला ठार मारलें (एपि इंडि. भा. ८, पृ. २१०-११). पण या बल्लाळाचें नांव माळव्यांतील परमारांच्या शिलालेखांत मिळत नाहीं. कदाचित् हा त्या वंशापैकीं कोणीतरी असावा. सोलंकीनें घेतलेलें आपलें राज्य त्यानें परत घेण्याचा प्रयत्न केला, त्यांत तो मारला गेला, किंवा बल्लाळ हें कोणाचें उपनाम आहे, हें अद्यापि समजलें नाहीं. याला धारावर्ष व प्रल्हादनदेव असे दोन पुत्र होते.

यशोवर्धन प्रतिहार—हा भोज प्रतिहाराचा पुत्र. याचा पुत्र चंदुक.

यशोवर्मा—(स. ५३३-३४) याला विष्णुवर्धन व हर्ष विक्रमादित्य असेंहि म्हणत असत. हा अत्यंत पराक्रमी राजा होता. पण याचा वंश किंवा मातापिता यांची अद्यापि माहिती उपलब्ध झालेली नाहीं. याचे शिलालेख मंदोसर व तेथून दोन मैलांवर असलेल्या सौंदणी गांवीं मिळाले आहेत. त्यावरून याची राजधानी

मंदोसर असावें असें अनुमान निघतें. सौंदणी येथें दोन विजयस्तंभ यानें उभारले, ते खूप विशाल आहेत, पण सध्यां पडलेले आहेत. त्यावर एकच लेख खोदलेला होता. एकावरचा अर्धवट मिळतो, पण दुसऱ्यावरचा संपूर्ण उपलब्ध आहे. त्याचा सारांश—' जे देश गुप्त राजे व हूण राजे यांच्या अधिकाराखालीं आले नव्हते तेहि यानें आपल्या ताब्यांत आणले. लौहित्य (ब्रह्मपुत्रा) नदीपासून महेन्द्रपर्वतापर्यंत व हिमालयापासून पश्चिम समुद्रापर्यंतच्या राजांना यानें आपले सामंत केलें. तसेंच शिवाशिवाय कोणापुढें मस्तक न झुकविणाऱ्या राजा मिहिरकुलानें याच्यापुढें आपलें मस्तक नमाविलें.' विजयस्तंभावरच्या दोनहि लेखांवर संवत् नाहीं. तथापि मंदोसरचा याचा लेख वि. सं. ५८९ (स. ५३२) चा आहे (फ्लीट गु. इं. पृ. १५२–५४). मंदोसरच्या लेखांत पूर्वपश्चिम अनेक राजांना जिंकल्याचा निर्देश आहे, पण मिहिरकुलाला जिंकण्यापूर्वी तो जयस्तंभ उभा केला असावा (गौरीशंकर हिराचंद ओझाकृत उदेपूर राज्यका इतिहास) यावरून हा व मिहिरकुल यांच्यांत झालेल्या युद्धाचा काल स. ५३३–५३४ हा ठरतो. निदान तें युद्ध स. ५३२ नंतर झालें एवढें तरी नक्की ठरतें. हें युद्ध मुलतानजवळ कोरूर येथें झालें.

याचें मूळचें नांव यशोधर्मन् असून यास विष्णुवर्धन असेंहि म्हणत. यशोधर्मदेव असाहि याचा निर्देश येतो.

पुराणांत यालाच विष्णुयशस् असें म्हटलें आहे असें दिसतें. 'वर्धन' ही एक पूर्वकालीन वीरत्वज्ञापक पदवी असून, प्रायः ती सम्राटाच्या नांवाला जोडण्याचा प्रघात असे. केवळ विष्णु अशीं अक्षरें कोरलेलीं नाणीं सांपडलीं आहेत. तीं याचींच असावींत. स्टेननें आपल्या राजतरंगिणीच्या भाषांतरांत कल्हणाच्या 'हर्ष विक्रमादित्या' चा काल सनाचे सहाव्या शतकाचा प्रथमार्ध निश्चित केला आहे व तोच याचा काल होय.

वायु, मत्स्य, ब्रह्माण्ड व कल्कि हीं चार पुराणें, वंगकवि चंडिदास याची कृष्णकीर्तनपोथी, केशवकृत 'कल्किशरीर अष्टपदी' व जितसेनविरचित 'जैनहरिवंश' यांत वर्णिलेला कल्किराजा हाच होय. नेमिचंद्राच्या मतानुसार याचा जन्मकाळ स. ४७२ हा असून जिनसेनाच्या जैनहरिवंशावरून याचा अन्तकाळ सुमारें स. ५३८ असावा असें दिसतें. जिनसेनाचा शिष्य गुणभद्र यानें याचें आयुष्य सत्तर वर्षांचें दिलें आहे. वरील सनाप्रमाणें याचें आयुष्य ६६ वर्षांचें येतें. याचा जन्म संभलग्रामीं (शाकंभरी-राजपुताना) व मृत्यु गंगायमुनांच्या दुआबांत.

याचा जन्म पराशरगोत्री ब्राह्मणकुलांत झाला होता, असें पुराणावरून दिसतें. मंदोसरच्या शिलालेखावरूनहि हा क्षत्रियकुलांतील होता असें दिसत नाहीं (फ्लीट, कार्पस इन्स्क्रि. इंडि., भा. ३, पा. १५५–१५६). याच्या घराण्याचा संस्थापक शशिदत्त हा एक नृपभृत्य होता. बौद्ध व्याकरणकार चंद्रगोमिन्नें आपल्या चांद्रव्याकरणांत हा जातीनें जरट होता असें म्हटलें आहे. कीलहॉर्ननें त्या शब्दाचा अर्थ जाट असा केला आहे. 'औलिकर' हें याच्या वंशाचें चिन्ह होतें. याच्या मुलाचें नांव जिनसेनानें अजितंजय दिलें आहे. पण कल्हण व हू-एन्त्संग यांनीं शिलादित्य दिलें आहे. प्रतापशील असेंहि त्याचें एक नांव होतें (प्रोथेरोकृत प्री-मुसलमान पीरियड ऑफ इंडि. हिस्टरी, पा. ११०).

हा स्वतः पराक्रमानें उदयास आलेला दिसतो. कांहीं काळ हा गुप्तांचा मांडलिक मात्र दिसतो. याच्या उपलब्ध तीनहि शिलालेखांचें स्थान मंदोसरच्या आसपास असल्यामुळें याची राजधानी मंदोसर असावी असें ठरतें. मंदोसर हें गांव मूळ दशरथानें आपलें नांव देऊन वसविलें, त्याचा अपभ्रंश रजपुतांच्या वेळीं दसौर असा झाला व आतां त्याला मंदोसर असें म्हणूं लागले. मंदोसर किल्ल्यांतील लेखांत याचा दशपूर असा निर्देश आहे. संस्कृत कवींनींहि याचा दशपूर असाच निर्देश केला आहे.

यानें एकंदर ४२ वर्षे राज्य केलें, असें जिनसेन म्हणतो. मिहिरकुलासंबंधी वर आलेला उल्लेख जरा काव्यमय म्हणजे अतिशयोक्तिपूर्ण आहे, असें पुष्कळांचें म्हणणें आहे (वि. वि. ५७. ३. पा. १२५–१३०; नरसिंहगुप्त पाहा).

यशोवर्मा (लक्षवर्मन्) चंदेल्ल–(स. ९३०–५४) जेजाभुक्ति येथील चंदेल्ल घराण्यांतील जो हर्ष त्याचा हा मुलगा होय. स. ९४८ मध्यें यानें गौड, खश, कोसल, काश्मीर, मिथिला, माळवा व गुर्जर वगैरेंवर स्वाऱ्या करून जय मिळविला. त्याचप्रमाणें यानें चेदी येथील कलचुरी घराण्यांतील राजांचा पराभव केला, आणि कालंजर कार्बीज केलें.

याचा मुलगा धंग हा याच्यानंतर गादीवर आला. याचें लक्षवर्मन् असें दुसरें नांव मावेल डफनें दिलें आहे. यानें चेदीच्या राजाचा पाडाव केला. यानें कनोजच्या सम्राटाचा पराभव केला व त्यापासून वैकुंठाची म्हणजे विष्णूची मूर्ति मिळविली. याच्या राणीचें नांव पुष्पा असें होतें. यालाहि बापाप्रमाणेंच परमभट्टारक व परमेश्वर अशीं विशेषणें लावलेलीं आहेत.

यशोवर्मा परमार—(स. ११३४-३५) माळव्याच्या परमारांपैकीं नरवर्म्याचा पुत्र (सिद्धराज). जयसिंहाशीं सुरू असलेली लढाई यानें पुढें चालविली. पण जयसिंहानें हत्तीकडून दक्षिण दरवाजा पाडून धारा नगरींत प्रवेश केला; आणि याला याच्या राणीसह कैद केलें व हा बारा वर्षांनीं आपल्या राजधानीस परत गेला. या युद्धांत विजय मिळाल्यावर जयसिंहानें अवन्तिनाथ असें बिरुद धारण केलें. हा विजय वि. सं. ११९२ ते ११९५ च्या मध्यें केव्हांतरी झाला असावा. कारण वि. सं. ११९२ मार्गशीर्ष वद्य ३ चें यांचें एक दानपत्र मिळालें आहे (इंडि. अँटि., भा.१९, पृ.३४९). तसेंच (सिद्धराज) जयसिंहाचा एक शिलालेख उज्जयनीच्या म्युनिसिपालिटींत आहे. तो पूर्वी एका दरवाजाशीं उलटा बसविला होता. तो दरवाजा पडल्यावर लेख उजेडांत आला. वि. सं. ११९५ ज्येष्ठ वद्य १४ चा तो लेख आहे. त्यांत जयसिंहानें यशावर्म्याला जिंकलें, तसेंच अवन्तिमंडलाचा शासक नागर जातीचा महादेव झाल्याचें लिहिलें आहे (शिलालेख अप्रकाशित). याचीं दोन दानपत्रें मिळालीं आहत. एक वि. सं. ११९१ (इंडि. अँटि. भा. १९, पृ. ३५३) व दुसरें वि. सं.११९२ मधील (इंडि. अँटि. भा. १९, पृ. ३४९). याला तीन पुत्र होते- १ जयवर्मा, २ अजयवर्मा व ३ लक्ष्मीवर्मा.

यशोवर्मा मौखरी—(स. ७२९–५३) कान्यकुब्जचा राजा व भवभूतीचा आश्रयदाता. यानें रामकथेवर प्रतिकूल टीका लिहून 'रामाभ्युदय' नांवाचें नाटक लिहिलें. आनंदवर्धन यानें आपल्या ध्वन्यालोकांत, धनिकानें आपल्या दशरूपकांत (१. ४२) आणि साहित्यदर्पणांत (६. १४२) या नाटकाचा उल्लेख केलेला आहे. परंतु त्याची हस्तलिखित प्रत अद्याप उपलब्ध झाली नाहीं.

काश्मीरचा राजा ललितादित्य यानें याचा पराभव केला होता, असें राजतरंगिणीवरून दिसतें. याच्या दरबारांत वाक्पतिराज नांवाचा कवि होता. यानें यशोवर्मपूर नांवाचें शहर वसविलें (इंडि. अँटि. १७, ३०७); व तेंच आपलें राजधानीचें शहर केलें. हा वाङ्मयप्रिय लोकांचा भोक्ता होता. याच्या कारकीर्दींत कनोजच्या राजानें चीनच्या राजाकडे आपला वकील स. ७३१ च्या सुमारास पाठविला होता. दक्षिणेकडील चालुक्य राजांनीं याच्यावर स्वाऱ्या केल्या होत्या. याला सारखीं युद्धें करावीं लागल्यामुळें याची कारकीर्द सुखावह व शांततेची अशी झाली नाहीं. यानें गौड राजाचा पराभव केल्याचा बऱ्याच ठिकाणीं उल्लेख आला आहे. हर्षाप्रमाणें सर्व उत्तर हिंदुस्थानांत आपलें वर्चस्व असावें असें यास वाटून व त्याप्रमाणें निश्चय करून यानें शेजारील राजांवर स्वाऱ्या करण्यास सुरुवात केली. पण त्यांत याला यश न येऊन याच्या मरणानंतर याच्या घराण्याचा नाश झाला.

हा मौखरी घराण्यांतील भोगवर्मनचा मुलगा होय. याच्यानंतर वज्रायुध या नांवाचा दुसऱ्या एका घराण्यांतील राजा कनोजच्या गादीवर आला. याच्या मरणानंतर कनोज येथील मौखरी वंश नष्ट झाला. E. A. Pires यानें याचा काल स. ७२९–७५३ असा दिला आहे (मौखरी by E. A. Pires; p. 136-146).

यशोविग्रह गाहडवाल—कनोजच्या गाहडवाल घराण्यांपैकीं पहिला उपलब्ध पुरुष.

यशोविजयगणि—(स. १६८०) एक श्वेतांबरपंथी जैन. याचे ग्रंथ–न्यायप्रदीप, तर्कभाषा, न्यायरहस्य, न्यायामृततरंगिणी, न्यायखंडनखाद्य, अनेकांतजैनमतव्यवस्था. यानें दिगंबरपंथी अष्टसहस्री ग्रंथावर वृत्ति लिहिली आहे. हा डभई येथें परलोकवासी झाला. याचीं जैनयशोविजयग्रंथमाला बनारसहून प्रसिद्ध होत असे ती आतां भावनगरहून प्रसिद्ध होते. जैनांच्या नव्यन्याय शास्त्रज्ञांतील हा एक प्रमुख आचार्य होय.

यक्षदास—(२ अवनिवर्मन् पाहा).

यक्षगुप्त—हा नेपाळच्या गोपाळ घराण्यांतील विष्णुगुप्ताचा मुलगा. हा निपुत्रिक वारल्यानंतर अहीर घराणें सुरू झालें.

यज्ञवर्मन् मौखरी—(स. ४००–४२५) मौखरी वंशांतील कल्याणवर्मनानंतरचा हा राजा होय. कल्याणवर्मनानंतर मौखरींच्या सत्तेचा नाश झाला होता. ती सत्ता पुनः यानें प्रस्थापित केली, व मगध येथें फिरून मौखरी वंश राज्य करूं लागला. याच्यानंतर याचा मुलगा शार्दूलवर्मन् हा गादीवर आला.

यज्ञश्री शातकर्णि—(स. १६६–२०२) याला गौतमीपुत्र यज्ञश्री असें म्हटलेलें आहे. यानें स. १६६ पासून २९ वर्षें राज्य केलें. यानें युद्धें करून दुसऱ्या पुलुमायीनें घालविलेले सर्व प्रदेश पुन्हां मिळविले व जिंकलेल्या प्रदेशाची राज्यव्यवस्था केली. याच्या नाण्यांवर जहाजाचें चित्र खोदलेलें असे, यावरून याच्या ताब्यांत समुद्रावरील मुलूख असावेत असें वाटतें (V. Smith, p. 223).

कोल्हापूर येथील एका जुन्या बुद्ध-स्तूपांत कांहीं तांब्यांचीं व शिशांचीं नाणीं सांपडलीं आहेत. त्यांवर या राजाचें नांव गौतमीपुतसा वीलीवायकुरसा असें लिहिलें आहे. यानें महाराष्ट्रांत पैठण येथें स. १७२ पर्यंत राज्य केलें व हा पुढें तेलंगणांत राज्य करून स. २०२ मध्यें मरण पावला (Bhandarkar, p. 49). जुनागडच्या शिलालेखांत रुद्रदामनानें याचा दक्षिणाधिपति असा उल्लेख केला आहे (Bhandarkar, p. 37).

विलियाकुर हा शब्द पुरीकसेनादि चार राजे व यज्ञश्री यांच्या वेळच्या नाण्यांवर येतो. तो शब्द तेलगू किंवा तामील सारख्या प्रांतिक भाषेतला असावा व प्रांताधिकाऱ्याला लावीत असावेत (भांडारकर, पा. ४१२-१४). याची राजधानी धनकटक (जि. गंतूर). त्याला सध्या धरणीकोट म्हणतात.

यज्ञसेन शातकर्णि—(अग्निमित्र पाहा).

यज्ञेश्वरभट्ट—कुमारिलभट्टाचा बाप.

याकंबे—ही बेट त्रिभुवनमल्लाची पत्नी. हिचाच मुलगा परगंद बेट हा होता.

याकूब लोदी—बहलोल लोदीचा पिता.

याचप्पा नाईक—(खून स. १६९४ सप्टें.) एक रजपूत. प्रथम कुत्बशाहींत नोकर. नंतर मराठ्यांकडे. पुढें झुल्फिकारखानानें ठार केला.

याचम्मा नायडू—कालाहस्ती येथील चक्काप्पा कवि याचा आश्रित होता.

याकूब बिन तारिख—एक ज्योतिषी. याचे ग्रंथ अल्बेरूनीपाशीं होते. यानेंहि ज्योतिषशास्त्रावर बरेच ग्रंथ लिहिले आहेत.

याकूब-इ-लोस—(स. ९१२) एक तांब्यापितळेचें काम करणारा कासार. बुखाऱ्याच्या सईद राजाच्या कारकीर्दीत हा उदयास आला. ह्या धाडसी व उपद्व्यापी वीरानें उनाड लोकांची टोळी जमवून हिंदुस्थानावर स्वारी केली. यानें प्रथम हिरात घेतलें (स.९१२). झाबूल व काबूलहि घेतलें. तेव्हां जो काबूलचा किल्ला मुसलमानांचे ताब्यांत गेला तो अद्यापपर्यंत आहे. यानें गझनी शहराचा पाया घातला आणि जवळच एक किल्ला बांधिला. अफगाणिस्थान म्हणजे मूळचा रजपुतांचा देश होय. यानें तेथील रजपुतांना हिंदुस्थानांत हाकून दिलें. परंतु हा धुमकेतूप्रमाणें लवकरच नाहींसा झाला (हिं.भा. अं. पृ. १६).

यातकादखान—(झुल्फीकारखान पाहा.)

यादवराव मुनशी—(स. १७१९) शाहूचा सख्यदांकडे गेलेला एक वकील. याचें नांव यादवराव बाजीप्रभु पारसनीस.

यादो गोपाळ खटावकर—(स. १७३० सुमार) शाहूनें ताराबाईस कैद केल्यावर तिच्या कारभारावर यास नेमलें. याच्याकडे खालशाच्या उत्पन्नाची बाब असल्यानें खालशे असेंहि याचें नांव पडलें. साताऱ्यास याच्या नांवची एक पेठ आहे.

यामा—(पार्श्वनाथ पाहा).

यामुनमुनि—यानें गीतेच्या प्रत्येक अध्यायाचें तात्पर्य एका श्लोकांत सांगितलें आहे. ते श्लोक बरेच लोकप्रिय आहेत. हा रामानुजसांप्रदायी असून यानें आपल्या मताप्रमाणें गीतेचें तात्पर्य भक्तिपर दाखविलें आहे. गुजराथ प्रिंटिंग प्रेसनें अनेक टीकांसह छापलेल्या गीतेंत याचा तात्पर्य-श्लोक दिला आहे.

यार मुहम्मद—(स. १७५० सुमार) भोपाळराज्यसंस्थापक दोस्त मुहम्मदाचा दासीपुत्र. दोस्त मुहम्मदाच्या मुहम्मद नांवाच्या मुलास पदच्युत करून हा गादीवर आला.

युद्धमल्ल (पूर्व) चालुक्य—(स. ९२५) हा पांचव्या विष्णुवर्धनाचा पुत्र. याला ताल म्हणत.

२. (स. ९२७-३४) हा पहिल्या युद्धमल्लाचा पुत्र. यानें दुसऱ्या भीमाला पदच्युत करून राज्य घेतलें.

युद्धमल्ल (पश्चिम) चालुक्य—(१ विनयादित्य (पश्चिम) चालुक्य पाहा).

युवराज—'रससदन' भाणाचा कर्ता. हा केरळमधील कोटिलिंग गांवचा राहणारा.

युवराज कलचुरि—(केयूरवर्ष कलचुरि, महीपाल व राजशेखर पाहा).

२. (स. ९८०-१०००) लक्ष्मणदेवाचा पुत्र. याचा मुंजानें पराभव केला.

युसुफअलीखान—(मृ. स. १५१०) दौलताबादचा अधिकारी. यानें विजयनगरच्या राजाशीं लढाई करून त्याचा पराभव केला. हा शियापंथी होता. यानें कांहीं दिवस विजापुरास राज्य केलें.

युसुफखान—हा काश्मीरच्या मुसलमानी वंशांतील बहरामखानाचा मुलगा.

युसुफ तुर्क—हा विजापूरच्या इस्माईलचा पालक. यानें कमालखान नांवाच्या सरदाराचा खून केला, व त्याचा खून करीत असतां हा स्वतः मारला गेला.

युसुफ आदिलशाहा—(स. १४३५-१५१०) विजापूरच्या आदिलशाही घराण्याचा संस्थापक. हा

आघामोवाडा नांवाच्या टर्कीच्या एका सुलतानाचा पुत्र. यांची आई यासह याच्या थोरल्या भावाच्या भीतीनें तुर्कस्थानांतून पळून हिंदुस्थानांत आली. या वेळीं याचें रूप, प्रौढत्व व शहाणपण पाहून खाजा मुहम्मद गुरजीस्तानीया नांवाच्या व्यापाऱ्यानें याला बेदर शहरीं नेलें व तेथें मुहम्मद गवाननें यास त्याजपासून विकत घेतलें.

हा आपल्या अंगच्या गुणांच्या जोरावर वाढत जाऊन प्रथम विजापूरचा अधिकारी व शेवटीं विजापूरचा स्वतंत्र राजा झाला व यानें अहमद निजामशाहाच्या सल्ल्यानें 'शाहा' ही पदवी धारण केली (स. १४८९). याच्या मृत्यूनंतर याचा मुलगा इस्माईल विजापूरच्या गादीवर आला (स. १५१०). हा शिया पंथाचा होता. याची पत्नी बुबूजीखानूम ही मूळची हिंदु होती.

युसुफशाह—(राज्यकाल स. १४६०–७४) बंगालचा सुलतान. रुक्नुद्दीन बार्बक फीरूजनंतर बंगालच्या गादीवर आला.

यूडीमौस—(ख्रि. पू. ३१७) सिकंदर परत गेला तेव्हां त्यानें याच्या नेतृत्वाखालीं सिंधूनदीच्या तीरावर एक सैन्याची छावणी ठेवली होती. फिलिप्पोस या क्षत्रपाचा खून झाल्याची बातमी ऐकून सिकंदरानें याला त्याचें काम करण्याबद्दल लिहिलें होतें. पण चंद्रगुप्त मौर्य व चाणक्य यांचें बळ सारखें वाढत असल्यामुळें व याच्याजवळ सैन्य बेतायेंच असल्यामुळें याला फक्त निरीक्षकाचें काम करावें लागलें. पुढें सिकंदर पुसा येथें मृत्यु पावला. ॲंटिगोनस व सैल्यूकस या दोघां सेनापतींत वारसासंबंधीं तंटा लागला. तेव्हां हा ॲंटिगोनसला साहाय्य करण्याकरितां निघून गेला.

येसाजी कुसाजी ऊर्फ **यशवंतराव शिंदे कोल्हापूरकर**—(मृत्यु स. १७८३ मे १) कोल्हापूरच्या छत्रपति संभाजीची राणी जिजाबाई इच्या माहेरचा हा असून संभाजीच्या मृत्यूनंतर कोल्हापूरचा कच्चा कारभार पाहत असे.

नारायणरावाचे वधानंतर पेशवे व कोल्हापूरकर यांचे जे व्यवहार घडले त्यांत या येसाजीचाच भाग आहे. याला 'सेनासाहेब सुभेदार' असा हुद्दा होता. हा वारल्यावर रत्नाकरपंत आपा यास 'राजाज्ञा' पद मिळून तो सर्व कारभार पाहूं लागला (म. रि. उ. वि. १ ला, पृ. ४५६).

येसाजी कंक—(मृत्यु स. १६८९ नंतर) शिवाजीचा एक विश्वासूक मित्र व सरनोबत (स. १६७२). हा शिवाजीबरोबर कर्नाटकच्या स्वारीवर गेला होता (कृष्णाजी कंक पाहा). राजारामाच्या वेळींहि हा होता.

येसाजी मल्हार—ता. २७।१०।१६६७ रोजीं झालेल्या तहान्वयें औरंगजेबानें खानदेश व वऱ्हाड हे प्रांत शिवाजीस दिले. प्रतापराव गुजर सरनोबत व त्याचा कारभारी हा यांस तिकडे पाठविलें.

येसूबाई डफळे—(मृत्यु स. १७५७) ही जतच्या बाबाजीची पत्नी व सटवोजीची सून. हिचा नवरा आधींच वारला व सासरा मागाहून वारला. तेव्हां मुलें अज्ञान असल्यानें ही कारभार स्वतः पाही. हिला सच्छील म्हणून फार मान आहे. हिला संतति नव्हती. पुतण्या यशवंतराव गादीवर आल्यावर हिनें देह ठेवला. ही शाहूच्या आश्रयानें असे.

येसूबाई भोसले—(जन्म स. १६५७–मृत्यु स. १७२० नंतर) संभाजीची पत्नी. ही पिलाजी शिर्के यांची मुलगी. संभाजी दिल्लीहून परत आल्यावर त्याच्याशीं हिचें लग्न झालें (स. १६६७) आणि पुढें हिला मुलगा झाला (स. १६८० डिसें.). त्याचें नांव जरी शिवाजी असलें तरी पुढें तो शाहू नांवानें प्रसिद्ध झाला. हिचें दुसरें नांव जिऊबाई असें होतें. लग्नाच्या वेळीं हिचें वय दहा वर्षांचें होतें (रा. खं. ३, पृ. १५४).

नवरा असल्यापासूनच हिला राजकारणांत लक्ष घालावें लागलें. बाळाजी आवजीला संभाजीनें हत्तीच्या पायीं दिल्यावर खंडोबल्लाळाला हिनेंच वांचवून विश्वासांत घेतलें. कलुषा व संभाजी शिक्क्याचा दुरुपयोग करतील म्हणून तो हिनें ताब्यांत ठेवला होता. त्यामुळें प्रत्येक आज्ञापत्र हिनें पाहिल्याशिवाय सुटत नसे असें दिसतें. संभाजी मारला गेल्यावर रायगडला वेढा पडला तेव्हां हिनें रायगड लढविण्यास सुरुवात केली. आठ महिने किल्ला लढविल्यावर सूर्याजी पिसाळाच्या फितुरीमुळें हिला शेवटीं शाहूसह कैद व्हावें लागलें (स. १६८०). औरंगजेब यांना सारखें बरोबर बागवींत असल्यामुळें हिचे हालहि बरेच झालेले दिसतात (मं. वा. इ. श. १८३७, पृ. २९८). तथापि हिनें तेथें आपले दिवस मोठ्या चातुर्यानें काढले; आणि जोत्याजी केसरकर वगैरे विश्वासूक लोकांकडून पत्रव्यवहार करून राजकारणाचा संदर्भ ठेवला.

शाहू सुटला (स. १७०७) तरी ही व इतर माणसें बाळाजी विश्वनाथ पेशवे दिल्लीस गेला तेव्हां त्यानें सोडवून आणलीं (स. १७१९). शाहूला सोडून हीं महत्त्वाचीं माणसें गुंतवून ठेवण्याचा उद्देश शाहूनें बादशाहीविरुद्ध गडबड केल्यास त्याला शह देण्याचा दिसतो.

हिची मान्यता मोठी होती. संभाजी व शाहू हिला अत्यंत सन्मानानें बागवींत. संभाजीसारखा संतापी पुरुष

हिच्या पूर्ण ताब्यांत होता. नानाप्रकारचीं संकटें भोगून शाहूस शेवटीं सुखाचे दिवस लाभले याचें श्रेय हिला आहे.

हिच्यावरील कांहीं प्रसंगांचीं वर्णनें आजहि अंगावर शहारे उत्पन्न करतात. त्या प्रसंगांना तोंड देऊन हिनें मराठा स्त्रियांच्या पुढें वीरपत्नी व वीरमाता कशा असतात यांचा आदर्श उत्पन्न केला आहे (खंडो बल्लाळ चिटणीस पाहा).

योग—(२ अवनिवर्मन् पाहा).

योगराज गुहिलोत—(स. १०५१) मेवाडच्या गादीवर हा कीर्तिवर्म्यानंतर आला. कुंभलगडच्या शिलालेखावरून दिसून येतें कीं, हा जिवंत असतांच याचें राज्य अल्लटाच्या संततीपैकीं वैरटानें घेतलें.

योगानंद—(समाधि स. १८६६) हा सोनपेठचा देशस्थ ब्राह्मण. यानें पंचदशीवर मराठी ओवीबद्ध टीका लिहिली आहे.

योग्लोक—(स. ९५०-१०५०) संस्कृत धर्मशास्त्रकार. यानें बृहद्योग्लोक व लघुयोग्लोक असे दोन ग्रंथ लिहिले. यानें काळ व व्यवहार यांवर विशेष लिहिलें. जीमूतवाहन व रघुनंदन यांनीं याचा विशेषतः खंडनार्थ निर्देश केला आहे. हा श्रीकराच्यानंतर झाला.

योनक धम्मरक्खित—अशोकाच्या प्रेरणेनें भरलेल्या तिसऱ्या बौद्धमहासभेंत याला अपरांत भागांत मुख्य प्रचारक नेमलें होतें. अपरांत म्हणजे दक्षिण हिंदुस्थानांतील कोंकणप्रांत होय. यानें तेथें 'अग्गिक्खन्धोपमसुत्त' या ग्रंथाचा उपदेश केला. हा धर्म व अधर्म चांगल्या प्रकारें जाणत असे.

यौवनश्री—(स. १०५० सुमार) ही बिहारच्या तिसऱ्या विग्रहपालाची पत्नी. ही कर्ण कलचुरीची मुलगी. हिची बहीण वीरश्री ही जतवर्माला दिली होती.

र

रक्तबाहु—(स. ३१० सुमार) ओरिसा प्रान्तांत बौद्धधर्माचा पाडाव करणारा राजा. याचा वंश स. ४७४ पर्यंत ओरिसांत नांदत होता. हा यवन (ग्रीक) होता. तथापि याच्यावर बौद्धधर्माचें वर्चस्व होतें. या परदेशी घराण्याचा ययातिकेसरी नांवाच्या राजानें पाडाव करून केसरी घराण्याची स्थापना केली (म. यु. भा. १, पा. २४३).

रखुमाबाई—निवृत्तिज्ञानदेवादिकांची माता.

रखुमाबाई पेशवे—त्रिंबकराव पेठे यांची कन्या, व चिमाजी आप्पा पेशवे यांची पत्नी.

रघवाम्बा—विजयनगरच्या दुसऱ्या वेंकटपतिदेवराय आरविदूची पत्नी.

रघु कदंब—(स. ४१०-२५) हा बनवासीच्या भगीरथ कदंबाचा पुत्र.

रघुनाथ—(स. १५६२) एक ज्योतिषी. याचा 'सुबोधमंजरी' नांवाचा एक ग्रंथ ब्रह्मपक्षाचा आहे. त्यांत ग्रहसाधन अहर्गणावरून आहे.

२. (स. १५६५) सोमभट्टात्मज रघुनाथ याचा 'मार्गप्रदीप' या नांवाचा करणग्रथ आहे. 'भास्करकृत सर्व ग्रंथ पाहून सूर्यमतानें ग्रहसंक्षेपानें सांगतों' असें यानें म्हटलें आहे. ह्या ग्रंथांत विशेष कांहीं नाहीं, असें सुधाकर कृत गणतरंगिणीमध्यें लिहिलें आहे.

३. प्रख्यात जो मुकुंदराज त्याचा हा गुरु.

४. एक रजपूत संस्कृत कवि. 'लौकिकन्यायसंग्रह' ग्रंथाचा कर्ता.

५. (स. १७३३-५३) एक हिंदी कवि. हा काशिराज बरिवंडसिंहाच्या दरबारीं होता. याचे ग्रंथ-काव्यकलाधर, रसिकमोहन, इष्कमहोत्सव. याची बिहारी सत्सईवर एक टीका आहे. याला काशीराजानें चौरा नांवाचें गांव दिलें.

रघुनाथ आरविदु—(स. १५६१ सुमार) हा विजयनगरच्या तिरुमल्ल व व्यंगलम्बा यांचा पुत्र. यानें राक्षसतागडीच्या लढाईंत फार पराक्रम केला.

रघुनाथ चिमणाजी सचीव—(स. १७८७-९१) सदाशिव चिमणाजीस संतति नसल्यानें हा गादीवर आला. याचा जन्म स. १७३७ झाला. याला सचीव पदाचीं वस्त्रें मिळण्याकरितां एक लाख नजराणा भरावा लागला.

२. (स. १८२७-३६) जन्म स. १८०७. याच्या सावत्र भावाचा मुलगा बळवंतराव यास दत्तक घेऊन चिमणाजी रघुनाथ असें नांव ठेविलें. बंड, दत्तकपरवानगी

वगैरेमुळें खजिना रिकामा झाला. स. १८३० मध्यें मोबदल्याचा तह होऊन सुधागड तालुका मिळाला व तुटक प्रांतावरील अंमल बंद झाला.

रघुनाथ तिमाजी हणमंते—हा तिमाजीचा मुलगा. भोसल्यांचा पिढीजाद नोकर.

रघुनाथदास—(स. १७७९) गुजराथी कवि. अहमदाबादेजवळ गोमतीपूरचा राहणारा. जात लेवा कुळंबी. श्रीमद्भागवत, रामायण, ध्रुवाख्यान, अभिमन्यु-विवाह, चक्रव्यूहवर्णन, छप्पा इत्यादि याची कविता आहे (का. दो.).

रघुनाथ नायक—(स. १६३० सुमार) हा तंजावरच्या अच्युत नायकाचा पुत्र. यानें दुसऱ्या वेंकटपति-देवराय आरविदूला फार साहाय्य केलें. हा मोठा रामोपासक होता. यानें श्रीरंगम्, विजयराघवपुरम् व कुंभकोणम् येथील प्रसिद्ध राममंदिरें बांधलीं. यानें तेलंगी व संस्कृत भाषेंत अनेक ग्रंथ केले: १ पारिजातहरण, २ नलाभ्युदय, ३ अच्युताभ्युदय, ४ रामायणसारसंग्रह, ५ महाभारतसारसंग्रह. शिवाय तेलंगी रामायण आहे.

रघुनाथ नारायण राजेबहादर—(स. १७७५ सुमार) हा नारो शंकराचा मुलगा होय. याचा बाप वारल्यावर यास ता. २०-४-१७७५ रोजीं जहागिरीची सनद देण्यांत आली. पण भावांत तंटे उपस्थित होऊन भयंकर बखेडे माजले. त्याचे कागद पुष्कळ छापलेले आहेत. हा दादाचे बाजूचा असून त्याच्यासाठीं भयंकर खटपट करीत होता (म. रि. उत्तर वि. १ ला, पृ. ४७-२०७).

रघुनाथ नारायण हणमंते—(स. १६५३-१६८३) याच्या बायकोचें नांव सिताबाई असें होतें. हा एक शहाजी व शिवाजी यांच्या समकालीन स्वामिनिष्ठ मुत्सद्दी. हणमंते हे भोसल्यांचे पिढीजाद नोकर होते. रघुनाथ नारायण यांस शहाजीनें आपल्या कर्नाटकांतील जहागिरीचा स. १६५३ मध्यें दिवाण केलें. हें काम यानें आपल्या मरणकालपर्यंत केलें. व्यंकोजीच्या जुलमास कंटाळून शेवटीं शिवाजीस कर्नाटकावर स्वारी करण्यास यानेंच प्रवृत्त केलें. व या स्वारींत शिवाजीला याचें अप्रतिम साहाय्य झालें. त्यामुळें खुष होऊन शिवाजीनें जिंकलेल्या प्रांताचा यालाच कार-भारी केलें; आणि याचा भाऊ जनार्दनपंत यास पंत सुमंत हा अधिकार दिला. शिवाजीमहाराज कर्नाटकांतून महा-राष्ट्रांत परत आल्यानंतर स. १६७७-८१ पर्यंत तिकडील राज्यकारभार व मुलकी वसुलाची व्यवस्था यानें फार दक्षतेनें केली.

यानें 'राज्यव्यवहार' कोश शिवाजीच्या सांगण्या-वरून तयार करविला. शिवाजीनंतर संभाजीच्या वेळींहि यानें आपल्या प्रांतापुरता उत्तम बंदोबस्त ठेवून खजिन्यांत बराच पैसा शिल्लक ठेविला होता. संभाजीच्या गैरवर्तनामुळें हा त्यास उपदेश करण्याकरितां रायगडीं गेला. याच्या उपदेशाचा संभाजीच्या मनावर थोडातरी परिणाम होऊन जुन्या प्रधानमंडळास त्यानें मोकळें केलें; व त्याप्रमाणें बंधु जनार्दनपंत हणमंते व पेशवे मोरोपंत पिंगळे यांना ताबड-तोब सोडून दिलें.

यास दोन पुत्र असून त्यांचीं नांवें अनुक्रमें नारोबा व त्रिमल अशीं होतीं.

हा संभाजीचा निरोप घेऊन कर्नाटकांत जाण्यास निघाला, परंतु वाटेंतच वलण मुक्कामीं याचा अंत झाला (स. १६८३). रघुनाथपंताचा भाऊ जनार्दनपंत याजकडे राजारामाचे कारकीर्दीत अमात्यपद होतें. यांचे वंशज तंजावरकडे असावेत. रघुनाथपंत यांच्या शहाणपणाचा लौकिक कर्नाटकप्रांतीं अद्यापि सुद्धां ऐकूं येतो.

रघुनाथ गणेश नवहस्त—रामदासांचा शिष्य. तंजावराकडे राहत असें. याचे ग्रंथ-दर्शपूर्णमासप्रायश्चित्त, प्रयोगरत्नभूषा, प्रायश्चितकुतूहल (कांहीं प्रकरणें) व नरकवर्णन (मराठी).

रघुनाथपंडित—(स. १६६६-९० सुमार) हा प्रसिद्ध मराठी कवि. चंदावरचा राहणारा. हा शिवाजी-जवळ होता. आणि जयसिंगाकडे शिवाजीतर्फे बोलणें करण्यास रघुनाथ कोरडे गेला नसून विद्वान् संस्कृतज्ञ म्हणून यास पाठविलें असावें. हा अरणीकर आनंदतनयाचा व्याही होता. याचा पुत्र मोरेश्वर मुख्य दानाध्यक्ष होता. हे दोघेहि पुढें चंदावरास कायम राहूं लागलें, तेव्हां श्रीकरा-चार्य यास राजारामानें पंडितराव पद सांगितलें. याचे ग्रंथ-दमयंतीस्वयंवर, रामदासवर्णन, गजेंद्रमोक्ष.

रघुनाथ बल्लाळ कोरडे—(स. १६४०-७४ सुमार) शहाजीनें शिवाजीच्या बरोबर दिलेल्या विश्वासूक लोकां-पैकीं एक. पुढें सैन्याची सबनिशी याच्याकडे आली. वकील म्हणूनहि हा मोगलाकडे गेला होता (स. १६५७). जयसिंगाकडे शिवाजीतर्फे बोलणें करण्याचें काम याच्या-कडे असावें (स. १६६५). तसेंच शिवाजीबरोबर दिल्लीस गेलेल्या मंडळींत हा होता. शिवाजी आग्र्याहून गेल्या-नंतर याला कैद करून याचे हालहि करण्यांत आले. शिवाजीशीं एकरूप होऊन काम करणाऱ्या माणसांपैकीं हा एक हाता.

रघुनाथ बल्लाळ मेंडजोगी—(स. १६५६ सुमार) हा शिवाजीचा पायदळाचा सबनीस. यानें चंद्रराव

मोरे प्रकरणांत विशेष कामगिरी केली (बाळाजी हरी मेंडजोगी पाहा).

रघुनाथभट झिपरे (पटवर्धन)—(स. १७५० सुमार) पहिला रघूजी भोसले नागपूरकर याचा एक मुत्सद्दी.

रघुनाथ यादव चित्रगुप्त—(स. १७०८-६०) याची शिवाजीच्या कालाची बखर प्रसिद्ध आहे. परंतु ती स्वतंत्र नसून कृष्णाजी अनंत सभासदांच्या बखरीचा अनुवाद आहे. सभासदी बखरीचें मूळ घेऊन त्यांत यानें स्वतः रचलेल्या कविता अधूनमधून घुसडून दिल्या आहेत. सभासदी बखरीतील एका वाक्याच्या ऐवजीं त्याच अर्थाचीं तीनचार वाक्यें यानें बनविलीं आहेत. याचा चुलत आजा काकाजी प्रभु होय. काकाजी प्रभु म्हणजे बाळाजी आवजी चिटणीस ऊर्फ चित्रे हा होय. बाळाजी आवजीस संभाजीनें विनापराध ठार मारलें हें प्रसिद्ध आहे. त्याच्या चिमणाजी व शामजी या दोन भावांपैकीं हा कोणाचा वंशज हें सांगतां येत नाहीं. यमाच्या दरबारीं जसा चित्रगुप्त तसें आपण कोल्हापूरकरांचे दरबारीं, असें सुचविण्याकरितां यानें चित्रे या आडनांवाचे ऐवजीं चित्रगुप्त असें आडनांव लावलें. छत्रपति राजाराम व जिजाबाई यांचा संभाजी याच्या कोल्हापूरच्या दरबारीं यानें चाळीस वर्षे चिटणिसी केली.

हा शके १६३० च्या सुमारास जन्मला असून यानें १६४२ च्या सुमारास चिटणिसी करण्यास सुरुवात केली असावी. स. १६८२ त संभाजी राजे वारले, आणि याची चिटणिसीहि गेली. शेवटीं चिकोडीस मनोळी या तालुक्यांत राहून शाहूच्या प्रांतांत दंगा करणाऱ्या यशवंतराव शिंद्याचा आश्रय याला मिळाला, व तेथें यानें ही बखर लिहिली. याला ऐकीव माहिती सपाटून असून हा कथानक रंगवून लिहितो. कांहीं व्यक्तींचीं नवीं नांवें व आडनांवेंहि याचे बखरींत उपलब्ध होतात. ही बखर शके १६८२ ते १६९२ च्या दरम्यान केव्हांतरी लिहिली असावी (राजवाडे प्रस्तावना, पा. २१६).

रघुनाथ रणचोड—(स. १७८५-१७९७) हा रणचोड कृष्णाचा मुलगा असून मुंबईच्या संझगिरी घराण्यांतील सारस्वत ब्राह्मण होय.

हा फक्त सैन्याच्या हालचालीविषयींच माहिती देत नसून इंग्रजांच्या मुंबई येथें असलेल्या खजिन्याची आर्थिक परिस्थिति काय होती, मुंबई येथें येणाऱ्या निरनिराळ्या गव्हर्नरांचे व्यक्तिशः स्वभाव कसे होते वगैरेंचा फार बारकाईनें खुलासा करी. नाना फडणिसाला विलायती (युरोपियन) माल घेण्याची फार हौस होती, असाहि उल्लेख याच्या एका पत्रांत आला आहे.

याच्या पदरीं असलेल्या कांहीं लष्करी शिपायांच्या खर्चासुद्धां याला सरकारांतून सालीना ५४२ रु. चें वेतन मिळे. हा स. १७९७ पर्यंत वकिलीचें कामावर होता. याच्यानंतर दुसऱ्या बाजीरावानें रामचंद्र कृष्णाची नेमणूक याचे जागीं केली.

रघुनाथराव गुजर—(स. १८२९ सुमार) प्रतापराव गुजराचा वंशज. हा चतुरसिंग भोसल्यास मदत करी. प्रतापसिंगानें आपली मुलगी याच्या मुलास दिली होती. याला उपळणें गांव इनाम होतें.

रघुनाथराव बाजी घाटगे—(स. १७९५-९९) हा लढाऊ मराठा प्रथम जानोजीचे कारकीर्दीत पुढें आला.

नर्मदेच्या दक्षिण व उत्तर कांठांवर पेंढाऱ्यांचा बंदोबस्त करण्याकरितां दुसऱ्या रघूजीनें विठ्ठल बल्लाळ सुभेदार, बेनिसिंग जमादार, रघुनाथराव बाजी घाटगे व महमद अमीनखान शिवणी छपरेवाले यांना नर्मदेच्या उत्तरेस पाठवलें (स. १७९९). अमीरखान पेंढारी हा सागरावर चाल करून आला, तेव्हां यानें बाळाजी खेराशीं संगनमत करून त्याचा बचाव केला.

रघुनाथराव बाजीराव ऊर्फ दादासाहेब पेशवे—(जन्म स. १७२९-मृत्यु स. १७८३ डिसें. ११) थोरल्या बाजीरावाचा तिसरा मुलगा. नानासाहेबानें यास लिहिलें कीं ' नुसती घोडी न फिरवितां रघुवंश, विदुरनीति, चाणक्यनीति, यांचीं नेमपूर्वक चितानिका करून थोडेबहुत शास्त्री याजवळ म्हणत जावे. जेवणास भाऊच्या पंक्तीस असावे ! '

हा स. १७५० नवंबरांत एकदां उत्तरेकडे गेलेला दिसतो व गुजराथेवर यानें दोन स्वाऱ्या केल्या. पहिली स्वारी स. १७५१ आक्टोबर ते स. १७५२ जुलैपर्यंत व दुसरी अहमदाबाद काबीज केलें तीं होय (स. १८५३ एप्रिल).

सुरजमल्ल जाटानें दिल्ली लुटली म्हणून बादशाहाकरितां व ईश्वरसिंगाला मदत करतों म्हणून मल्हाररावाकरितां यानें कुंभेरीला वेढा दिला आणि शेवटीं तीस लक्ष रुपये घेऊन तह केला (स. १७५४ मे १७). सुरजमल्लाला मदत करण्याकरितां गाजीउद्दीनास विरोध करण्याच्या उद्देशानें बादशहा व वजीर (खानाखाना) निघाले तेव्हां यानें त्यांचा पराभव केला, अहमदशाहास कैद केलें, आजुजुद्दीनला (आलमगीर दुसरा) बादशहा केलें, गाजीउद्दीनचे पुत्रास वजिरी दिली आणि साडे-

ब्यायशीं लक्ष खंडणी मिळवली (पे. द. २१. ६०). नंतर हा पुण्यास आला. त्या वेळीं याची पहिली बायको मरून दुसरें आनंदीबाईशीं लग्न झालें.

दुसऱ्या स्वारींत (स. १७५६ नवं.–१७५८ आक्टो.) यानें उठत चाललेला आपला अंमल आपल्या सखारामबापूसारख्या लोकांच्या मार्फत पुनः बसाविण्याचा क्रम सुरू केला. अबदालीच्या पाठोपाठ यानें दिल्ली काबीज केली. नजीबाचा फितुर नाहींसा केला. मथुरा, वृंदावन, गया, कुरुक्षेत्र वगैरे घेतलें. पंजाबांत जाऊन अबदालीचे लोक हाकलून देऊन व कांहीं पकडून अटकेपार झेंडे लावले (पे. द. २. ८४). पण नानासाहेबांचें घाईचें बोलावणें आल्यामुळें याला लवकर परत यावें लागलें. हा डोइजड होईल म्हणून यास परत बोलावलें असावें. या दोन्ही स्वाऱ्यांच्या वेळीं कारभारी म्हणून सखारामबापू सर्व व्यवहार पाहत असे.

पुढें हा उदगीरच्या लढाईंत हजर होता (स.१७६०). तेथें याला मुद्दाम मागें ठेवून सदाशिवरावाला पानपतावर पाठविण्यांत आलें. हा मेदकच्या स्वारीहून आल्यावर पुणें येथें नानासाहेब वारले आणि निजामाशीं केलेल्या तहावरून हा व माधवराव यांचें बिघडून धोडनदीस लढाई होऊन माधवराव याच्या स्वाधीन झाला. पण राक्षसभुवनच्या लढाईंत निजामाचा पराभव झाला आणि माधवरावाचा जम बसत चालला. तेव्हां यानें अर्धे राज्य मागितलें, पण माधवरावानें सर्वच तुमच म्हणून याला स्वस्थ बसविलें. पण याचें समाधान नव्हतें. शेवटीं धोडपच्या लढाईंत याला कैद करून माधवरावानें यास शेवटपर्यंत कैदेंत ठेवलें (स. १७७२). आणि मरतेसमयीं नारायणरावाला संभाळण्याविषयीं यास सांगून नाना व बापू यांवर सर्व भार सोंपविला. पण नारायणरावानें याला कैदेंत ठेवल्यानें यानें त्याला धरण्याचा कट केला. पण शेवटीं नारायणराव मारला गेला आणि चौकशींत याचेवर आरोप सिद्ध झाला. तेव्हां निजामवर स्वारी करण्याच्या निमित्तानें याला पुण्याबाहेर काढून प्रथम नारायणरावाची पत्नी व नंतर तिचा मुलगा सवाई माधवराव यांच्या नांवानें राज्यकारभार सुरू केला.

हा कर्नाटकांत असतां पुण्यास बारभाईचें कारस्थान झालें (स. १७७४ फेब्रु.). हें याला कळतांच हा हैदरशीं कल्याणदुर्गचा तह करून परत फिरला. त्यांत यानें माधवरावानें तीन स्वाऱ्या करून कमावलेला ५० लक्ष उत्पन्नाचा कर्नाटकचा मुलूख जुजबी नजराण्याच्या मोबदल्यांत हैदरला देऊन त्याचा लोभ सांभाळण्याचा यत्न केला. तसेंच स्वराज्यापैकीं कृष्णा व तुंगभद्रा या नद्यांमधला सुमारें पाऊणकोट रुपये उत्पन्नाचा मुलूख फक्त दरसाल सहा लक्ष खंडणी देण्याच्या करारावर यानें शत्रूंस कायमचा देऊन टाकला. यांत पेशवे, सावनूरकर नबाब, नरगुंदकर भावे, गजेन्द्रगडकर घोरपडे व मनोळीकर शिंदे व विशेषतः याला विरोध करणारे पटवर्धन व रास्ते यांचा मुलूख होता.

यानें जमखिंडी, मिरज घेण्याचा इरादा केला. पण सैन्य मागें आहे असें पाहून हा विजापूरकडे वळला. पण कासेगांवापाशीं लगट होऊन त्रिंबकराव पेठे पडला (स. १७७४ एप्रिल ४). पण हा पुण्याकडे वळला नाहीं. हा सांगोला, तुळजापूर, अजंठा, बन्हाणपूर, इंदुर असा पुढें व हरिपंत फडके मागें असा पळ सुरू झाला. इंदुरास राहून बोलण्यास सोयीचें पडत नाहीं म्हणून बन्हाणपुरास उभयतांनीं येण्याचें ठरलें. पण दादा कैदेच्या भीतीनें मालेगांवाहून पळाला व धारला आनंदीबाईस ठेवून बडोद्याहून अहमदाबादेस इंग्रजांच्या आश्रयाला गेला. आणि तेथून सुरतेस येऊन इंग्रजांशीं तह केला. तहांत २५०० स्वारांनिशीं यास मदत करून पुण्याची गादी मिळवून देण्याचें आश्वासन मुख्य होतें. शिवाय साष्टी, सुरत, भडोच वगैरे भाग इंग्रजांस दिला होता. पण थोड्या युद्धानंतर पुरंधरचा तह झाला (स. १७७६ मार्च १).

पुरंधरच्या तहांत 'राघोबानें एक महिन्यांत सैन्यास रजा द्यावी, २५ हजार रुपये पेन्शन, १ हजार स्वार व कांहीं नोकर यांसह गोदावरीतीरीं राहावें. इंग्रजांनीं दादा किंवा त्यांच्यातर्फे कोणीं बंड केल्यास त्यास मदत करूं नये. साष्टी किंवा ३ लक्ष रुपये, भडोच शहराजवळचा मुलूख व १२ लक्ष रुपये लढाईखर्च इंग्रजांस द्यावा,' हा भाग होता. पण हा तह आपणास न विचारतां झाला म्हणून यानें तक्रार केली आणि त्याचा परिणाम सुरतेच्या तहास महत्त्व देऊन याला इंग्रजानें मुंबईस पुनः आश्रय दिला.

यानंतर मास्टीनच्या साहाय्यानें मोरोबा फडणीसानें कारस्थान उभारून याला पेशवा करून स्वतःकडे कारभार घेण्याचें ठरविलें. हा त्याकरितां निरोपाची वाट पाहत राहिला. पण नानानें तें सर्व मोरोबाचें कारस्थान धिमेपणानें हाणून पाडलें (स. १७७८).

इंग्रजांचा तळेगांवावर पराजय केल्यानंतर (स. १७७९) या इंग्रजमराठे युद्धाची कायमची तहकुबी महादजी शिंद्यांच्या जामिनगिरीनें झालेल्या सालबाईच्या

तहामुळें झाली आणि याचा इंग्रजांचा आश्रय पूर्णपणें सुटला (स. १७८३).

सालबाईचा तह झाल्यानंतर यानें कोणाकडे जावें हा प्रश्न उपस्थित झाला. नानाचें म्हणणें कीं, याला इंग्रजानें आपल्या ताब्यांत द्यावें. पण इंग्रजानें कोणाच्याहि ताब्यांत याला देण्याचें नाकारलें. तसेंच हा स्वेच्छेनें कुठेंहि गेल्यास आम्हीं हरकत करणार नाहीं असें कळवलें. शिंद्याचें म्हणणें, हा पुण्यास जात नसेल तर यानें आपल्याकडे यावें. हा तह झाल्यानंतर हा सुरतेस होता. इंग्रजानें याला नेमणूक देण्याचें नाकारलें व पुणें दरबारशीं कसातरी समेट करून आपले राज्यांत जाऊन राहण्याचा यास सल्ला दिला. तेव्हां निरुपाय होऊन यानें गोदावरीतीरीं राहण्याचें ठरविलें. केवळ नानावर न विसंबतां परशुरामभाऊ पटवर्धन, हरीपंत फडके, तुकोजी होळकर यांच्याकडून पृथक्‌पणें, इमानपत्रें, बेलभंडार घेऊन हा खानदेशांत आला (जुलै). होळकर, फडके, रास्ते सामोरे गेले होते. दरमहा पंचवीस हजारांची नेमणूक घेऊन कोपरगांवीं राहण्याचें ठरलें. पुढें आजारी पडून तेथेंच डिसेंबर ११।१७८३ राजीं हा वारला. तेव्हां याचें वय ५४ वर्षांचें होतें (ऐ. ले. सं., पा. ३६०).

याच्या आयुष्याचे तीन भाग पडतात. नानासाहेबानें याचे गुणदोष ओळखून याला जरूर तेवढा वाव देऊन खूष ठेवलें होतें. त्यामुळें पानपतच्या लढाईपर्यंत यानें मराठ्यांचा दरारा वाढविण्याचेंच काम चोखपणें केलें. पण माधवरावाला याला ताब्यांत ठेवतां आलें नाहीं. केवळ त्याच्या याच्याशीं झालेल्या वर्तनामुळेंच हा त्याचा व राज्याचा सर्वनाशक पापग्रह झाला. तेंच धोरण आंतबाहेर सुरू झाल्यानें नारायणरावाचा खून झाला आणि बेहोष झालेल्या याला इंग्रजांचा आश्रय करणें भाग पडलें.

यानें बर्कला लिहिलेल्या पत्रांत पुढील वाक्यें आढळतातः 'इंग्रजांची फौज लढाई देण्यास लायक आहे हें मला कबूल आहे. पण मराठ्यांच्या सैन्याची व शत्रूला नामोहरम करण्याच्या मराठ्यांच्या युक्त्यांची इंग्रजी फौजेला माहिती नसल्यामुळें इंग्रजी फौजेंत तितका कमीपणा आहे. जरूर त्या युद्धविषयक सूचना मीं इंग्रजास दिल्या. पण माझ्या सूचनांकडे दुर्लक्ष केलें' (वि. वि. ५८. ५ पा. १९१). नारायणरावाचा वध यानें करवला आणि शेवटीं त्याचा स्पष्ट उच्चार करून प्रायश्चित्तहि घेतलें (स. १७८३ आगष्ट ६). पण त्यामुळेंच हा हल्लारी स्वकीयांत जवळ करण्याच्या लायकीचा राहिला नाहीं. मग हलक्या दर्जाच्या लोकांशिवाय याच्या भोंवतीं कोण असणार ? (अमृतराव पेशवे, आनंदीबाई पेशवे, अहल्याबाई होळकर, गोपिकाबाई पेशवे, तुळ्या पवार, रामशास्त्री प्रभुणे पाहा).

याची पहिली पत्नी बवें घराण्यांतील जानकीबाई व दुसरी आनंदीबाई. आनंदीबाईला बाजीराव व चिमाजी असे दोन मुलगे व गोदूबाई व दुर्गाबाई अशा दोन मुली झाल्या. याला भास्करराव नांवाचा आणखी एक मुलगा होता. तो अल्पवयीं वारला असें मराठी लेखक लिहितात, पण तो विरक्त होऊन हिंदी कवि म्हणून प्रसिद्ध झाला अशी माहिती आहे (भास्करराव रघुनाथ पेशवे पाहा). तो लेकावळा असावा. शिवाय याच्या अनेक रखेल्या होत्या.

हा थोरल्या बाजीरावाचा पुत्र व अनेक मनसुबे करण्याचा हिम्मत करणारा असल्यामुळें याच्या कच्छपीं लहानमोठे सर्व लोक होते. अनेक प्रसंगीं लोकांत मिसळून यानें कामें केलीं आणि लोकांनाहि वागवून घेतलें. त्यामुळें तत्कालीन व्यक्तिप्रधान राजकारणांत याच्या भोंवतीं अनेक प्रकारचे लोक एकत्र झाले होते. त्यांपैकीं कांहीं प्रसंग पाहून सुटले. पण चिंतो विठ्ठल रायरीकर, गंगाधर यशवंत चंद्रचूड यांना भरपूर अद्दल घडली. कित्येक जमीनदोस्त झाले. आबाजी महादेव (ब्राह्मण), सदाशिव रामचंद्र शेणवी (सारस्वत), सखाराम हरि गुप्ते (प्रभु), आणि मानाजी फाकडे (मराठा), हे चार इसम मात्र शेवटपर्यंत दादाला चिकटून राहिले. हाहि चंचल असला तरी कोणत्याहि संकटांतून मार्ग काढण्यास किंवा पेशवाई मिळविण्याकरितां प्रयत्न करण्यास कधींच मागें सरला नाहीं. शिंदे-होळकरांप्रमाणें याला स्वतंत्र केला असता तर कदाचित् इतिहास वेगळा झाला असता.

रघुनाथशास्त्री पर्वते—(मृत्यु स. १८२० सुमार) पेशवाई बुडाल्यावर जीं जुनीं विद्वान् मंडळी महाराष्ट्रांत होती त्यांपैकीं हा एक होता. हा कोणास न जुमानणारा होता. पुणें येथील धर्मासंबंधीं व खाजगी जीं जीं खटलीं उत्पन्न होत त्यांत हा कोणत्यातरी एका पक्षाचा अभिमानी पुरस्कर्ता असावयाचाच. एके वेळीं शास्त्री लोकांत देशस्थ, कोंकणस्थ व कऱ्हाडे ह्या पोटजातींतून शरीरसंबंध व्हावे किंवा नाहीं असा वाद निघाला. तेव्हां ते होऊं नयेत असें कित्येकांचें मत होतें. याचें मत होतें कीं तसें झाल्यास हरकत नाहीं.

यानें आपल्या मताप्रमाणें लागलीच देशस्थ व कऱ्हाडे यांच्या मुली पाहून आपण स्वतःच त्यांशीं लग्नें केलीं.

पुण्यांत हसबनिसांच्या घराण्यांत एक मोठा तंटा त्या वेळीं चालूं होता; पण दोहों पक्षांत दांडगाई होऊन यावर फौजदारी खटला झाला. हा मोठा विद्वान् गृहस्थ म्हणून ह्यास साध्या कैदची कित्येक वर्षांची शिक्षा झाली. मग ह्या चंचल वृत्तीच्या पुरुषास निवांत वेळ मिळाला. तो वेळ यास कंटाळवाणा वाटूं लागला. त्या वेळांत कांहीं करमणूक व्हावी म्हणून यानें भगवद्गीतेवर 'शंकरपादभूषण' या नांवाची सुंदर टीका लिहिली (भा. व., खं. ३, जु. पे. गो. पृ. १९). 'शंकरपादभूषण' आतां पुण्यांतील आनंदाश्रम संस्थेनें प्रसिद्ध केला आहे.

यानें 'गदाधरीपंचवाद' या ग्रंथावर टीका लिहिली. यानें 'न्यायरत्न' नांवाचा ग्रंथ लिहिला. हा प्रसिद्ध राघवाचार्यांचा शिष्य होता.

रघुनाथ शिरोमणि—(स. १४७७–१५४७) प्रसिद्ध न्यायशास्त्रज्ञ तत्त्वचिंतामणिदीधितीचा कर्ता. याचा जन्म नडिया येथें झाला. याच्या गुरूचें नांव वासुदेव सार्वभौम होतें. हा घरचा अतिशय गरीब असल्यामुळें व लहानपणींच बाप मरण पावल्यामुळें याच्या आईनें यास मोठ्या प्रयासानें लहानाचा मोठा केला. परंतु याची हुषारी पाहून याच्या गुरूनें याचा सांभाळ करण्यासाठीं आपणाजवळ ठेवून घेतला व यास व्याकरण, शब्दकोश वगैरे अभ्यास शिकवला. पुढें हा त्यांच्याजवळ तर्कशास्त्राचा अभ्यास करूं लागला. हा आपल्या गुरूच्या सांगण्यावरून मिथिला येथें गेला व आपल्या तर्कशास्त्राच्या अभ्यासावर तेथें सर्व विद्यार्थ्यांवर मात केली व प्रत्यक्ष तेथील शिक्षक पक्षधराचा वादांत पराभव केला. त्यामुळें त्यानें चिडून जाऊन याच्या तोंडांत मारली. त्यामुळें हाहि चिडून जाऊन झालेल्या अपमानाचा सूड घेण्याच्या निमित्तानें रात्रीं पक्षधराच्या घरीं हातांत तलवार घेऊन गेला, पण तेथें त्यानें याची स्तुति त्याच्या बायकोजवळ केलेली ऐकून एकदम पुढें जाऊन यानें त्याची क्षमा मागितली; व अशा प्रकारें नडिया विद्यापीठाला पदव्या देण्याचा जो अधिकार नव्हता तो यानें मिळवून आणिला. हा एका डोळ्यानें आंधळा होता. याचे ग्रंथः—

(१) तत्त्वचिंतामणिदीधिती ही गंगेशाच्या तत्त्वचिंतामणीवरील टीका, (२) बुद्धधिकारशिरोमणि. उदयनाचार्याच्या आत्मतत्त्वविवेकावरील टीका, (३) पदार्थतत्त्वनिरूपण अथवा पदार्थखण्ड, (४) किरणावलीप्रकाशदीधिती, (५) न्यायलीलावतीप्रकाशदीधिती अथवा विस्तारिका, (६) अवच्छेदकत्वनिरुक्ति, (७) नयवाद, (८) आख्यातवाद, (९) खण्डनखण्डखाद्यदीधिती (हिस्टरी ऑफ इंडियन लॉजिक, पा. ४६३–६५).

रघुनाथ हरि नेवाळकर—(स. १७७०–९४) हा कऱ्हाडा ब्राह्मण झांशीचा सुभेदार होता. हा कान्होजी आंग्र्याचे हाताखालीं तयार झाला. यानें कांहीं विद्युतयंत्रें तयार केलीं होतीं.

रघुपति महाराज—(स. १७५८–१८४४) हा पुणतांब्याचा ब्राह्मण. बाप हरिशास्त्री व माता रुक्मिणी. कोल्हापूरच्या नारायणमहाराजांचा शिष्य. हा बडोद्याच्या फत्तेसिंगराव गायकवाडाची पत्नी आनंदीबाईस भागवत सांगे, उत्तम कविता करी व कीर्तनांत म्हणे (म. क. च. भा. ४ पा. ११९–३८).

रघूजी आंगरे—(जन्म स. १७५८ सप्टें. –स. १७९३ मार्च २७) मानाजीचा दासीपुत्र. यानें उंदेरी बेट शिंद्यांकडून घेऊन पेशव्यांना दिलें. सदाशिवरावाचा तोतया बेलापुराहून मुंबईस इंग्रजांच्या आश्रयास जात असतां यानें पकडला (ता. ४–११–१७७६). याला शिंद्याचें पाठबळ असे.

२. (मृत्यु स. १८३८) मानाजीचा मुलगा. राज्य खालसा.

रघूजी करांडे—(स. १७५७–६३) हा प. रघूजीचा मराठा सरदार होता. यानें रघूजीस राज्यविस्ताराचे कामांत फार मदत केली. हा मुत्सद्दी व लढवय्या होता. हा कांहीं दिवस मुधोजीसहि मिळाला होता. हा भोसल्यांच्या प्रत्येक हालचालींत प्रमुख असे.

जानोजीनें पुण्यावर चाल केली असतां रघूजी करांड्यानें सिंहगड व पुरंदर या किल्ल्यांभोंवतालचा सर्व मुलूख लुटला व पुरंदर किल्ल्याच्या पायथ्याशीं असलेल्या सासवड या गांवीं पेशव्यांचा जामदारखाना व इतर कारखाने होते तेहि लुटले. शिवाय महत्त्वाचे सर्व कागदपत्र तेथें नेले होते तेहि जाळून टाकले (स. १७६३).

रघूजी थोरात—(स. १७६३) हा जनकोजी शिंदे यांचा तोतया म्हणून सैन्य जमवून गडबड करूं लागला. सखारामबापूचे चुलतबंधु गिरमाजी याचे कारभारी होते.

रघूजी भोसले—(मृत्यु स. १७५५) हा नागपूरच्या बिंबाजी भोसल्याचा मुलगा. हा पहिला रघूजी होय. हा पांडववाडीच्या राजाजीपंत कोल्हटकरांच्या वरानें झाला अशी समजूत होती. बाप लवकरच वारल्यानें हा आपली आई काशीबाईपाशीं बाईजवळ पांडववाडी येथें राही.

नंतर हा आपली चुलती साबाजीची बायको रमाऊकडे राहण्यास गेला. नंतर राणोजी नांवाच्या चुलत्याच्या लष्करांत राहिला. नंतर कान्होजीकडे व तेथून चांद सुलतानाकडे गेला. तेथूनहि एलिचपूरच्या नबाब इस्माईलखानाकडे गेला, व तेथून शाहूकडे आला. कर्नाटकच्या स्वारींत फत्तेसिंग भोसल्याबरोबर यानें उत्तम काम केलें. नंतर यानें कान्होजीजवळून सरंजामाची वांटणी घेतली (स. १७२७).

शाहूनें यास सेनासाहेब सुभ्याचीं वस्त्रें व बंगालपर्यंत चौथाईचे हक्क वाढविण्याचा निर्देश करून सनद दिली. नंतर कान्होजीस पकडून शाहूकडे पाठविलें (स. १७३०); व शाहूच्या नांवें चौथाईच्या वसुलीस सुरुवात केली. हा चिमाजी पेशव्याबरोबर माळव्याच्या स्वारींत होता (स. १७२८).

नंतर यानें देवगडच्या रतनकुवर राणीस बलीशाहाविरुद्ध मदत करून त्याचा पराभव केला. पवनी, भंडारा घेऊन देवगडावर स्वारी केली. बलीशाहास कैद करून रतनकुवरचे मुलास गादीवर बसविलें. तिनें यास राज्याचा तिसरा हिस्सा व खर्चाबद्दल १० लक्ष रुपये दिले (स. १७३७). नंतर यानें आपलें ठाणें नागपूर येथें ठेवलें. पण देवगडच्या गोंडांच्या राज्यांत बंडाळी झाल्यामुळें यानें तें गोंडांचें राज्य आपणाकडे घेतलें.

यानंतर शाहूनें यास पुढील सुभ्यांवर मराठ्यांचा अंमल स्थापण्याचा अधिकार दिला: लखनौ, बेदर, बंगाल, बुंदेलखंड, अलाहाबाद, पाटणा वगैरे (स. १७३८).

भोपाळच्या लढाईंत बाजीराव पेशव्यास यानें मदत केली नाहीं, तेव्हां त्यानें आवजी कवडे नांवाच्या सरदारास पाठविलें. पण यानें शाहूकडे तक्रार करतांच त्यानें पेशव्यांना याच्या मुलुखांत सरदार न पाठविण्याविषयीं सांगितलें.

हा कर्नाटकच्या स्वारींत अर्काटच्या दोस्तअलीचा पाडाव करण्यास हजर होता (स. १७४१). याबद्दल यास कान्होजीच्या वेळचा सर्व सरंजाम वगैरे देण्यांत आला.

यानें बंगालवर एकंदर चार स्वाऱ्या केल्या (स. १७४२–५१). बादशाही मुलुखावर स्वाऱ्या झाल्यामुळें नानासाहेब पेशवे बादशहातर्फे याच्याशीं लढले. पुढें देवगड व चंद्रपूर हीं संस्थानें घेतल्यावर हा पोटदुखीनें मेला (स. १७५५ डिसें. १४). तेव्हां याच्या सहा स्त्रिया सती गेल्या.

रघूजी हा त्या वेळच्या मराठे सरदारांत अत्यंत शूर होता. नागपूरकर भोसल्यांचे घराण्यांत ह्याच्याइतका कर्तृत्ववान् पुरुष दुसरा झाला नाहीं. शिपाईगिरी हा याचा मुख्य गुण होता, व त्याच मानानें हा मोकळ्या मनाचा व दिलदार मनुष्य होता. याच्या स्वभावांत मानीपणा व स्वतंत्र वागण्याची प्रवृत्ति जास्त होती.

छत्रपतीस हा ठरलेली खंडणी केव्हांहि पाठवीत नसे. यास दारू पिण्याची संवय होती. परंतु तीं याच्या कर्तृत्वाच्या आड आली नाहीं.

शाहूनेंहि एका रागाचे प्रसंगीं "दारूपायीं राज्य बुडविलें" असे उद्गार याचेसंबंधीं काढले आहेत (खरे ३२९२). हा धार्मिक असून रामभक्त होता. रामटेकचें राममंदिर व घाट यानें बांधला.

रघूजीचा शिक्का रघुनाथभटाच्या बायकोच्या हातांतील पाटल्यांचा केला होता, अशी आख्यायिका आहे. तो खालीं लिहिल्याप्रमाणें होता:—

शाहुराजपदांभोजभ्रमरायितचेतसः ।
बिंबात्मजस्य मुद्रैषा राघवस्य विराजते ॥

परंतु सेनासाहेब सुभा हें पद मिळण्यापूर्वी याचा शिक्का खालीलप्रमाणें होता:—

पार्वतीकांताविश्रांतमनसोतियशस्विनः ।
बिंबात्मजस्य मुद्रैषा राघवस्य विराजते ॥

रघूजीस जानोजी, मुधोजी, साबाजी व बिंबाजी असे चार पुत्र होते (नागपूर प्रांताचा इतिहास, पा. ५०-१०५).

अलिकडे कांहीं वर्षांपासून नागपूर येथें पहिला रघूजी ऊर्फ बाबासाहेब भोसले यांचा स्मृतिदिन मोठ्या हौसेनें व उत्साहानें पाळण्यांत येतो.

रघूजीनें 'झाडीच्या' प्रांताला सुव्यवस्थित राज्यव्यवस्था प्राप्त करून दिली, इतकेंच नव्हे, तर भंडाऱ्यापासून रायपूरपर्यंत अनेक तलाव व कालवे बांधून शेतकीच्या धंद्यास ऊर्जितावस्थेस आणलें; चंद्रपूर व नागपूर अशा ठिकाणीं संस्कृत विद्येला उत्तेजन दिलें. त्यामुळें या प्रांतांत पंडितांची एक परंपरा उत्पन्न झाली. कापडाच्या धंद्याला उमरखेड, नागपूर, एलिचपूर, बाळापूर वगैरे ठिकाणीं उत्तेजन मिळून तो धंदा ऊर्जितावस्थेस आला.

बाळाजी बाजीराव पेशवे व रघूजी भोसले यांच्या भांडणाची कटकट प्रत्यक्ष बंगालमध्यें झाली नसती तर खुद्द बहार व बंगाल प्रांतांत महाराष्ट्रराज्य स्थापन झालें असतें.

२. (जन्म स. १७५७–मृत्यु स. १८१६) हा नागपुरकर मुधोजी भोसल्याचा मुलगा. जानोजी भोसल्यास मुलगा नसल्यामुळें त्यानें यास दत्तक घेतलें होतें. जानोजीची बायको दर्याबाई हिनें ह्या दत्तकपुत्रास गादी न देतां ती स्वतः कारभार पाहूं लागली. नंतर ती दोर साबाजीच्या

पक्षास मिळाली व तिनें त्याचें नांवानें माधवराव पेशव्याकडून वस्त्रें आणिलीं. शेवटीं स. १७७३ त कुंभारीच्या लढाईनंतर साबाजा व मुधोजी यांचा समेट होऊन रघूजीस गादी प्राप्त झाली. रघूजीच्या लहानपणीं मुधोजी व साबाजी हेच कारभार पाहत असल्यामुळें याचें कांहींच तेज पडलें नाहीं. पुढें सवाई माधवरावाचे कारकीर्दींत याच्या नांवें सेनासाहेब सुभ्याचीं वस्त्रें व नेमणूक ता. २४-६-१७७५ रोजीं रीतसर होऊन आली व रघूजी कायदेशीर रीतीनें सेनासाहेब सुभा झाला.

यास खंडोजी (चिमणाबापू) व व्यंकोजी नाना (मन्याबापू) असे धाकटे भाऊ होते.

हा व याचा भाऊ खंडोजी यांचें कधींच पटलें नाहीं, याचा फायदा घेऊन हेस्टिंग्जनें खंडूजीस वश करून घेतलें. या कलहानें दौलतीचें नुकसान होऊं नये म्हणून मुधोजीनें या दोघां मुलांकडून शपथाक्रियेचीं करारपत्रें ता. २९।१०।१७७९ रोजीं लिहून घेतलीं.

यानें पेशव्यांची मर्जी संपादून व्यंकोजीस सनाधुरधरीचीं वस्त्रें मिळविलीं (स. १७८९). पुढील वर्षी खंडोजी एकाएका वारला. त्या वेळीं छत्तीसगडाकडे जमीनदारांनीं बंड उभारलें तें यानें मोडलें, व टिपूवरील मोहिमेंत हरिपंत फडक्याबरोबर आपलें सैन्य पाठवलें.

रघूजीच्या कारकीर्दीचें सर्व धोरण आपण काणत्याहि लढा त न पडतां आपल्या स्वार्थावर टपून असावें असें होतें.

सवाई माधवरावाच्या मृत्यूनंतरहि यानें नाना फडणीसास मदत केली, यामुळें नानानें याशीं नवीन करार करून पंधरा लक्ष रुपये नगदी देवविले व गढामंडला प्रांताचा ताबा दिला.

इंग्रजांशीं लढतांना गाविलगड येथें लढाया होऊन तेथेंहि भोसल्यांचा पराभव झाला. गड व त्यांतील भोसल्यांची सारी दौलत इंग्रजांच्या हातीं लागली.

स. १७९५ त खर्ड्याचे लढाईंत हा स्वतः हजर होता.

ता. १७-१२-१८०३ रोजीं इंग्रज व भोसले यांचा तह झाला. या तहानें ओरिसाप्रांत इंग्रजांस कायमचा दिला गेला व छत्तीसगड भोसल्यास परत मिळाला.

पुढें २४ ऑगस्ट १८०६ रोजीं रघूजीनें सर जॉन शोअरशीं निराळा तहनामा केला; त्यांत पाटणा व संबळपूर हीं संस्थानें यास परत मिळालीं. पण एकंदर भानगडीमुळें हा फार कर्जबाजारी झाला व खंडण्या बंद होऊन याची सर्व सत्ता संपुष्टांत आली.

रघूजी ता. २२-३-१८१६ त मरण पावला. त्या वेळेस याचे अंथरुणाखालचे गालिचास एक यंत्र बांधलेलें सांपडले. त्यावरून यास व्यंकोजीचा मुलगा अप्पासाहेब यानें मारविलें असाहि प्रवाद त्या वेळीं निघाला होता. रघूजीस परसोजी ऊर्फ बाळासाहेब नांवाचा मुलगा होता. त्यास पुढें से. सा. सु. चीं वस्त्रें मिळाला.

याचा बांधा ठेंगणा असून हा जरा लठ्ठ होता. आपल्या मुलीवर व पुतण्यावर हा अतिशय प्रेम करी. हा अत्यंत मातृभक्त होता. काम करण्यांत हा अतिशय वाकबगार असून मेहनती होता. प्रत्येक गोष्टींत हा स्वतः लक्ष घालीत असे. तासांचे तास हा हिशेबांचे आंकडे मोडण्यांत घालवी. हा अत्यंत धार्मिक असून हिंदुधर्माचा नित्य कृत्यें फार काळजीनें करी. हा कांहींसा लोकप्रिय होता व एखादी गोष्ट घडवून आणण्याचे कामीं चतुर होता; परंतु पैशाचा संबंध आला म्हणजे याचें वर्तन कृपण असे. यानें चिन्नूर येथें ' सोमयाग ' केला होता.

रझिया गुलाम—(स. १२३६-३९) ही दिल्लीचा बादशहा शम्सुद्दीन अल्तमशची मुलगी. हिच्या बापानें हिला गादीवर बसविण्याविषयीं सरदारांस सांगितलें होतें, पण स्त्रीस गादीवर बसविणें अपमानास्पद आहे असें ठरवून त्यांनीं फीरूझ नांवाच्या मुलास तख्तावर बसविलें. पण पुढें त्याचा खून होऊन हिला गादी मिळाली. ही लोकप्रिय असल्यामुळें प्रथम सरदारांनीं गादीवर बसण्याची संमति दिली. पण पुढें स्त्रीचें आधिपत्य दुःसह वाटूं लागलें व हिच्याविरुद्ध कट होऊं लागले. हिनें जलालुद्दीन याकूब नांवाच्या एका आफ्रिकेंतून आलेल्या गृहस्थास घोडदळावरील मुख्य सेनापति नेमिलें. परंतु सरदारांना हिनें नेमलेल्या आफ्रिकन मनुष्याची बढती झालेली न खपून, त्यांनीं दिल्लीच्या सिंहासनास यापुढें आपण राजनिष्ठ राहणार नाहीं असें जाहीर केलें. सरदारांना पुढें असें वाटलें कीं हिचा व याकूबचा कांहींतरी नाजूक प्रेमसंबंध असावा. म्हणून अल्बूनियस नांवाच्या सरदारानें हिच्याविरुद्ध बंड केलें व हिला कैद करून याकूबचा खून केला, व शम्सुद्दीन अल्तमशचा तिसरा मुलगा मुइझुद्दीन बहरामास गादीवर बसविलें. पण पुढें मुलतानचा सुभेदार अल्तूनियास मानसन्मानाची जागा दिल्लीच्या राजकारणांत न मिळाल्यामुळें त्यानें हिच्याशीं लग्न करून, मोठें सैन्य जमा केलें व आपल्या नूतन बायकोस दिल्लीचे तख्तावर पुन्हां बसाविण्याचे उद्देशानें दिल्लीवर स्वारी केली. पण तींत त्याचा मोड होऊन तो मारला जाऊन हिचा खून झाला. ही पुरुषी वेष घालून दरबारांत राजकारणाचें काम पुरुषांत बसून करीत असे.

रणचोड कृष्ण—(स. १७५८–८४) मराठ्यांचा वकील म्हणून हा मुंबईच्या इंग्रजांकडे होता. जातीनें सारस्वत ब्राह्मण असून मुंबईच्या संझगिरी घराण्यांतील होय. हा शिवाजी रणचोडाचा पुतण्या असावा.

याची पत्रव्यवहाराची पद्धत फार निराळी होती. आपला पत्रव्यवहार जर यदाकदाचित् दुसऱ्याचे हातीं पडला, तर त्याला त्या पत्राचा खरा अर्थबोध होऊं नये, म्हणून यानें कांहीं गोष्टींना संक्षिप्त नांवें दिलेलीं होतीं. डेव्हिड स्कॉट, थॉमस गॉर्डर्ड, जनरल ड्रेपर व मुंबईचा गव्हर्नर हॉर्नबी यांना ओळखण्याकरितां अनुक्रमें शुक्र, शनि, राहु आणि केतु या ग्रहांचा हा उपयोग करी. तसेंच हा राशी व तिथि यांचा उपयोग करीत असे. उदाहरणार्थ, सिंह, कन्या, तूळ आणि कुंभ म्हणजे पुणें, मद्रास, सुरत आणि इंग्लंड. त्याचप्रमाणें सप्तमी म्हणजे फत्तेसिंग गायकवाड होय. तसेंच यानें मुंबई, व घोडेस्वार यांचा अर्थबोध होण्यासाठीं अनुक्रमें शोणितपूर, वज्रयोग आणि मृत्युयोग यांसारखे नवीन शब्द शोधून काढले. याच्यानंतर याचा मुलगा रघुनाथ हा इंग्रजांकडील वकिलीचें काम करूं लागला.

रणछोडजी दिवाण—(जन्म स. १७६८–मृत्यु स. १८४१) हा कवि काठेवाडमध्यें फार प्रसिद्ध आहे. हा मूळचा जरी नागर ब्राह्मण होता तरी ह्यास युद्धकलेविषयीं बरीच माहिती असल्याचें दिसतें. कर्नल वॉकरनें ज्या वेळीं काठेवाडांतील बंडाळी मोडली, त्या वेळीं यानें आपल्या शिपाईगिरीचा राजीनामा देऊन लेखणी हातीं धरली. हा बुद्धिवान् व विद्वान् यांचा आधार होता. यानें 'तारीख-इ-सोरठ' व 'रूकात-इ-गुणागुण' नांवांचे दोन ग्रंथ लिहिले. शिवरहस्याचें यानें व्रजभाषेंत भाषांतर केलें आहे. यांखेरीज यांचीं 'चंडीपाथना गर्भा', 'शिवगीता' इत्यादि काव्यें प्रसिद्ध आहेत.

रणछोड भगत—एक गुजराथी कवि. गुजराथेंतील तोरणा गांवचा राहणारा. जात गूहवाणी. यानें गुजराथींत सीता-मारुतीसंवाद व रावणमंदोदरीसंवाद लिहिला आहे (का. दो.).

रणजितसिंग—(जन्म स. १७८०–मृत्यु स. १८३९) पंजाबांतील शीख लोकांचा राजा. स. १७८० च्या सुमारास याचा जन्म झाला. अहमदशाहा अबदालीनंतर पंजाब प्रांत पुन्हां शिखांच्या ताब्यांत आला. परंतु त्याचीं लहान लहान राज्यें निर्माण होऊन त्यांत नेहमीं मारामाऱ्या व तंटे लागत.

महासिंगानंतर त्याचा मुलगा रणजितसिंग हा वयाच्या १३ व्या वर्षीं गादीवर आला. यानें आपल्या शौर्यानें आपल्या वयाच्या १९ व्या वर्षीं सर्व शीख राजांचें आधिपत्य आपणाकडे घेतलें. यानें स्वतःस राजा ही पदवी मिळविली. स. १८०२ सालीं अमृतसर जिंकलें. यमुनेपर्यंत आपला राज्यविस्तार व्हावा या इच्छेनें यानें स. १८०६ सालीं लुधियाना घेतलें. नाभा व पतियाळा या दोन संस्थानांमधील भांडणाचा फायदा घेऊन यानें सतलज ओलांडून सरहिंद प्रांतीं खडणी गोळा केली. इंग्रजांसहि याची भीति वाटत होती. तेव्हां मेट्काफ यास पाठवून त्यांनीं रणजितसिंगाशीं तह केला. या तहानें त्यांची हद्द सतलज नदी ठरली; व इंग्रजांचें लुधियानास लष्कर राहिलें. यानें हा तह शेवटपर्यंत पाळला. म्हणून इंग्रज याला आपला जिवलग दोस्त म्हणत. यानें स. १८२३ त पेशावर प्रांत जिंकला. परंतु हा प्रांत परत देण्याबद्दल दोस्तमुहंमदानें इंग्रजांजवळ मागणी केली. परंतु इंग्रज यास भीत असल्यामुळें त्यांनीं यास तो प्रांत देण्याबद्दल आग्रह केला नाहीं. यानंतर या दोघांनीं दोस्त मुहंमदावर स्वारी करून शहासुजास काबूलच्या गादीवर बसविलें. यानंतर दोन वर्षांनीं हा वारला (स. १८३९). यानें ४० वर्षें अव्याहत श्रम करून शिखांत लष्करी सामर्थ्य उत्पन्न केलें व त्यांचें राष्ट्र उत्तम भरभराटीस आणलें. हा वारला असतां इंग्रजांच्या दिल्ली, आग्रा, अलाहाबाद व इतर मुख्य छावण्यांतून याच्या वयाच्या संख्येइतक्या (५९) तोफा याच्या सन्मानार्थ सोडण्यांत आल्या. याच्या राण्यांपैकीं चौघीजणी व सात नाटकशाळा या सतीं गेल्या. याला शेवटीं अर्धांगवायूचा झटका झाला. याच्या शेवटच्या मरणाच्या वर्षांत पूर्वीसारखा दरारा राज्यांत राहिला नाहीं. हा फार शूर, मुत्सद्दी व युद्धशास्त्रांतील जाणता होता. सर लॉवेल ग्रिफीन म्हणतो, " रणजितनें आपलें राज्य लष्करी दराऱ्यावर व शिस्तीवर स्थापन केलें; याचा राज्यकारभार व्यवस्थित होता. परंतु याच्यामागें हे गुण कोणाच्याच अंगीं नसल्यानें, याचा एकट्याचा पाठिंबा गेल्याबरोबर, सहा वर्षांत शिखांचें राज्य ढांसळून पडलें." यानें या शिखखालसा (सैनिक)मध्यें उत्तम पायदळ, सुव्यवस्थित घोडदळ व चांगला तोफखाना यांची भर घातली. याचे बहुतेक सर्व लष्करी अम्मलदार इटालियन अथवा फ्रेंच असत. वेंचुरा, अलार्ड व ॲव्हिटेबिलो हे तीन सेनापति तर प्रसिद्ध नेपोलियनच्या हाताखालीं शिक्षण घेतलेले होते. स. १८४५ मध्यें ८८६६२ शीख सैन्य असून त्यांत ४८४ तोफा व ३०८ उंटांवरील जेजाला होत्या.

हा आपले अधिकारी कोणच्याहि जातींतून निवडी. केवळ लायकी हेंच याच्याकडे नोकरी मिळण्याचें साधन असे.

याची जमाबंदी, मुलकी व्यवस्था, जकात किंवा इतर राजकीय व्यवस्था तात्त्विक पद्धतीवर उभारलेली नव्हती. केवळ लष्करी बळावर याचें राज्य चाललें होतें.

रणाजितसिंगमहाराज हे अटक नदी उतरून पलीकडे जाऊं लागले तेव्हां त्यांचा गुरु येऊन म्हणूं लागला कीं, 'अटकेपर्यंत मात्र हिंदूंस जाण्याची मर्यादा आहे.' तेव्हां यानें उत्तर दिलें कीं,

सब भूमि है गोपालकी, इसमें अटक कहा ।
जिसके मनमें खटक रहीं, वोही अटक रहा ॥

सारांश–'सर्व पृथ्वी देवाची असून तिच्यांत कोठेंहि जाण्यास हरकत नाहीं. ज्याच्या मनांत संशय आहे तोच थांबून राहिला आहे.' असा जबाब यानें दिला आणि सर्व अफगाणिस्थान जिंकलें (लोकहितवादी २९४).

२. (चरणदास पाहा).

रणदुल्लाखान—(मृत्यु स. १६४३) हा विजापूरच्या आदिलशाही घराण्यांतील मुहम्मद आदिलशाहाचा प्रसिद्ध सरदार. याच्या पित्याचें नांव फरादखान (शि. भा. ९. ३२). हा कर्नाटकाचा सुभेदार होता. यानें बंगलोरच्या वीरभद्र राजाचा पराभव केला व त्या जहागिरीची व्यवस्था शहाजीकडे सोंपविली (वीरभद्र पाहा). याच्या हाताखालीं शहाजीनें पुष्कळ पराक्रम करून बंगलोर प्रांत विजापूरच्या बादशहाकडून जहागीर मिळविला (स. १६३७–३९). रहिमतपूर येथें कबरीवर याच्या मृत्यूचें सालहि आहे (प. सा. ४८८). याच्या मुलास धाकटा रणदुल्ला किंवा रुस्तुमजमा असें म्हणत.

२. (रुस्तुमजमा पाहा).

रणदेवी—परबल राष्ट्रकूटाची मुलगी व धर्मपालाची पत्नी.

रणधरसिंह—(स.१८२०–१८९४) एक हिंदी कवि. हा संग्रामसिंहाचा नातू असून गजराजसिंहाचा पुत्र होय. स.१८५७सालच्या बंडांत यानें इंग्रजांना मदत केली म्हणून याला राजाबहादूर किताब मिळाला. हा धाडसी, उदार आणि प्रजाहितैषी होता. यानें पांच ग्रंथ केले. नामार्णव, काव्यरत्नाकर, सालीहोत्र, भूषणकौमुदी व रामसाला हे ते पांच ग्रंथ होत. याच्या भूषणकौमुदी आणि काव्यरत्नाकर या दोन ग्रंथांची विशेष प्रशंसा आहे. हा अयोध्या येथें मरण पावला (क. कौ. भा. १).

रणराग (पश्चिम) चालुक्य—(स. ५२५ सुमार) पश्चिम चालुक्यांपैकीं पहिल्या जयसिंहाचा धाकटा पुत्र. याचा पुत्र पुलकेशी किंवा पुलिकेशी. हा पुलकेशी बदामीच्या चालुक्य घराण्याचा संस्थापक होय.

रणसिंह गुहिलोत—(स. ११५८–६८) हा विक्रमसिंहानंतर मेवाडच्या गादीवर आला. याला कर्णसिंह किंवा कर्ण असेंहि म्हणत. आबूच्या शिलालेखांत याचें नांव सोडलें आहे. पण राणपूर व कुंभलगड येथील शिलालेखांत याचें नांव रणसिंह असें मिळतें. राणा कुंभकर्णाच्या वेळीं एकलिंगमाहात्म्य तयार झालें. त्यांत याचें नांव कर्ण असें दिलें आहे. आणि पुढें म्हटलें आहे कीं याच्यापासून रावळ व राणा अशा दोन शाखा सुरू झाल्या. रावळशाखेंत जितसिंह (जैत्रसिंह), तेजसिंह, समरसिंह व रत्नसिंह, तसेंच राणाशाखेंत माहप व राहप आदि झाले. रावळशाखेचे लोक मेवाडचे राजे झाले व राणाशाखेचे लोक सीसोदें येथील जहागिरदार झाले. ते सीसोदें येथें राहत होते म्हणून सीसोदीये असें म्हणवूं लागले. रावळशाखेची समाप्ति अलाउद्दीन खल्जीनें वि. सं. १३६० (स. १३०३) मध्यें रत्नसिंहापासून चितोड घेतल्यावर झाली. याच्यानंतर बऱ्याच वर्षांनीं सीसोदियांपैकीं राणा हंमीरानें चितोड घेऊन मेवाडमध्यें आपलें राज्य स्थापन केलें.

एकलिंगमाहात्म्यांत यानें आहोरच्या पर्वतावर एक किल्ला बांधल्याचें लिहिलें आहे. याच्यामागून क्षेमसिंह गादीवर आला.

रतन कवि—(जन्म स. १७४१-कविताकाल स. १७७३) हा हिंदी कवि श्रीनगर (गढवाल) फत्तेशाहाच्या पदरीं होता. फत्तेभूषण व अलंकारदर्पण हे याचे साहित्यावरील ग्रंथ होत.

रतनकुवर—(स. १६३७) देवगडच्या चांद सुलतान नांवाच्या गोंड राजाची पत्नी. हिनें रघूजी भोसल्याच्या मदतीनें दासीपुत्र वलीउल्लास पदच्युत करून आपला मुलगा बुर्हाणशाहास गादीवर बसविलें.

रतनचंद—(खून स. १७२० नवं. २३) सय्यद बंधूंपैकीं अबदुल्ला सय्यदाचा साहाय्यक मुत्सद्दी.

रतनसिंग—(मृत्यु स. १६५८) हा रतलाम या संस्थानचा संस्थापक होय. हा उदेसिंगाचा पणतू होय. यानें एकदां दिल्लीच्या रस्त्यांत नुसत्या एका कट्यारीनें एक मस्त हत्ती मारला. तेव्हांपासून शहाजहान बादशहाची याच्यावर फार मर्जी बसली, व बादशहानें यास ५३ लक्षांची जहागीर दिली. याच वेळेस रतनासिंगास मुख्य सेनापति करून महाराजा ही पदवी दिली. पुढें हा

स. १६५८ त धरमतपूर (फत्तेहाबाद) येथील लढाईत मारला गेला.

२. (स. १६२४) बुंदी संस्थानचा राजा. शहाजहानने बंड केलें तेव्हां यानें जहांगीरला मदत केली.

रत्नकंठ—(स. १६८० सुमार) युधिष्ठिरविजयटीका व स्तुतिकुसुमांजलिटीका यांचा कर्ता.

रत्नकीर्ति—(स. ९४०–१००० सुमार) हा विक्रमशिला विश्वविद्यालयांत अध्यापक होता. हा रत्नाकरशांतीचा गुरु. विमलचंद्र राजाचा आश्रित असलेला रत्नकीर्ति याहून भिन्न होय (स. ६६०). ग्रंथ–अपोहसिद्धि, क्षणभंगसिद्धि, स्थिरसिद्धिदूषण, चित्ताद्वैतासिद्धि.

रत्नचंद्र—(स. १६१२–२७) शांतिचंद्राचा शिष्य. रघुवंश व नैषध या काव्यांवरील टीकाकार. याचे ग्रंथ–नैषधीयनिवृति (रचनाकाल स. १६१२), रघुवंशटीका (स. १६१२–२७), हितोपदेश (स. १६२१), भक्तामरस्तोत्र (स. १६२७ च्या पूर्वी), अध्यात्मकल्पद्रुमवृत्ति (स. १६१८).

रत्नधर—काशीमाहात्म्य ग्रंथाचा कर्ता.

रत्नप्रभसूरि—(स. ११८१) जैन श्वेतांबर तत्त्वज्ञ. यानें ' प्रमाणनयतत्त्वालोकालंकार ' या ग्रंथावर 'स्याद्वादरत्नावतारिका' टीका लिहिली. शिवाय 'उपदेशमालावृत्ति' नांवाचा ग्रंथ लिहिला. १ मुनिचंद्रसूरि, २ देवसूरि, ३ भद्रेश्वरसूरि व ४ रत्नप्रभसूरि अशी गुरुपरंपरा यानें दिली आहे (हिस्टरी ऑफ इंडियन लॉजिक, पा. ५०).

रत्नवज्र—(स. ९७९–१०००) बुद्धतर्कज्ञ. काश्मीरी ब्राह्मण. पिता–हरिभद्र. विक्रमशिला येथें विद्वान् म्हणून याचा बहुमान झाला. ग्रंथ–युक्तिप्रयोग, फक्त तिबेटी भाषांतर उपलब्ध आहे (हि. इं. लॉ. पा. ३३९–४०).

रत्नमंडनगणि—(मृत्यु स. १४६०) एक जैन यति. यानें ' सुकृतसागर ' नांवाचा ग्रंथ लिहिला आहे. त्यांत धारचा शेवटला जयसिंह परमाराचा प्रधान पृथ्वीधर किंवा पेथडकुमार या जैन गृहस्थाच्या सत्कृत्यांचें वर्णन केलें आहे.

रत्नसिंह गुहिलोत—(स. १३०३) समरसिंहानंतर त्याचा पुत्र रत्नसिंह गादीवर आला. हा गादीवर येऊन सहा महिने होतात तों अलाउद्दीन खल्जीनें चितोडवर स्वारी केली. सहा महिने लढल्यानंतर अन्नसामग्री संपल्यामुळें चितोड शत्रूच्या हातीं लागला. याची स्त्री सुप्रसिद्ध पद्मिणी होय.

(ता. २८ जानेवारी स. १३०३) रोजीं अलाउद्दीन निघाला आणि (ता. २६ ऑगस्ट स. १३०३) किल्ला सर झाला. राजा पळाला पण मागाहून शरण आला, म्हणून वांचला, असें तारिख–इ–अलाईचा कर्ता अमीर खुसरो लिहितो. तो स्वतः लढाईत होता.

पद्मिणीचा महाल व तलाव अद्यापि दाखविण्यांत येतात. पण तिच्या संबंधींच्या कथा ऐतिहासिक स्वरूपापेक्षां काव्यस्वरूपांत विशेष आल्या आहेत.

हा लढत असतां धान्य संपल्यामुळें याला किल्ला खाली करण्याची वेळ आली. या गडबडींत हा मारला गेला. तेव्हां पद्मिणी वगैरे कांहीं स्त्रियांनीं पावित्र्यरक्षणार्थ आपला देह अग्नीला अर्पण केला.

पण काव्य, ख्यात किंवा ऐतिहासिक म्हणून समजल्या जाणाऱ्या ग्रंथांत पद्मिणीचें सौंदर्य, अलाउद्दीनाची तिच्याबद्दलची अभिलाषा, रत्नसिंहाचा तुरुंगवास व त्यांतून सोडविण्याकरितां पद्मिणीचा त्याग व चातुर्य यांसंबंधीं अनेक कथा आढळतात. त्याबद्दल ऐतिहासिक पुरावा विश्वास बसेल असा उपलब्ध नाहीं.

अलाउद्दीनानें चितोड घेतल्यानंतर तो आपला थोरला मुलगा खिजरखां यास देऊन किल्ल्याचें नांव खिजराबाद असें ठेविलें. तेथें खिजरखां एक वर्षपर्यंत होता, असें फिरिश्ताच्या लिहिण्यावरून दिसतें. पण इतर पुराव्यावरून सुमारें दहा वर्षें चितोडला तो राहिला आणि नंतर जालोरच्या मालदेवाच्या ताब्यांत चितोड देऊन तो दिल्लीला निघून गेला. ही गोष्ट स. १३१३–१६ पर्यंत झाली असावी.

२. (स. १५२८–३१) मेवाडच्या सांगा राण्याचा पुत्र. हा त्याच्या मृत्यूनंतर गादीवर आला (स. १५२८ फेब्रु. ५). याची आई (हाडी) कर्मवती ही आपला पुत्र विक्रमादित्य यास राज्यावर आणूं इच्छीत होती. उलट राणा सांगानें त्याला रणथम्भोरचा किल्ला व पन्नाससाठ लाखांची जहागिरी दिली. याबद्दल याच्या मनांत आढी होती. म्हणून यानें राज्यावर आल्यावर त्यांना चितोडला बोलावलें. पण त्यांनीं चितोडला येण्याचें नाकारलें व दहशत बसण्याकरितां बाबरशी वाटाघाटी सुरू केल्या. पण याचा परिणाम विरोध वाढण्यांत झाला.

याच वेळीं गुजराथच्या बहादुरशहानें मांडूवर स्वारी करून महमूदला कैद केलें व माळव्याचें राज्य आपल्या राज्यांत सामील केलें. याला आधींच नजराणा देऊन त्यानें गप्प बसविलें होतें. याच्या वेळीं याचा प्रधान कर्मसिंह (कर्मराज) यानें शत्रुंजयाचा सातवा उद्धार केला. तसेंच पुंडरीकाच्या मंदिराचा उद्धार करून त्यांत आदिनाथाच्या मूर्तीची स्थापना केली. याच्या तांब्याच्या नाण्यावर

'राणा श्रीरतनसिंह' असा लेख आहे. याला हाडी कर्मवतीचा भाऊ सुरजमल्ल यानें दग्यानें मारलें असें मुहणोत नैणसी म्हणतो.

रत्नाकर—काव्यालोचन ग्रंथाचा कर्ता.

२. (स. ८०० सुमार) काश्मीरच्या चिप्पड जयापीडाचा आश्रित. पिता अमृतभानु. यास बालबृहस्पति म्हणत. अवन्तिवर्म्याच्या वेळीं याची विशेष प्रसिद्धि झाली. याचे ग्रंथ–रामचरित, कादंबरीकथासार, ध्वनिशास्त्र–टीका व हरविजयकाव्य. हरविजयावर अलकाची संस्कृत टीका आहे.

३. बत्तीस–लक्षण–टीकेचा कर्ता. एक महानुभाव.

या बत्तीस–लक्षण–टीका ग्रंथांत, सूत्रपाठांतील व वेदांतावरील बत्तीस सूत्रांचा संग्रह केला आहे. मूळ चक्रधरांचें सूत्र, त्यावर भीष्माचार्यांचें भाष्य आणि त्यानंतर रत्नाकराची टीका, अशी या ग्रंथांची संगती आहे (मं. त्रैमासिक, श. १८४२, अ. २।३, पृ. २३).

रत्नाकरपंत राजाज्ञा—(स. १७८३–१८१२) हा एक कोल्हापूरकर छत्रपतींचा कारभारी होय. याच्या पूर्वीचा कारभारी येसाजी कुसाजी. तो स. १७८३ ध्यें मरण पावल्यावर कोल्हापूरचा कारभार हा पाहूं लागला.

हा रामाजीपंताचा मुलगा. याचें उपनांव सरवळे असून मूळ ठिकाण वाळवें तालुक्यांतील (जि. सातारा) ऐतवडें गांव होय. हा देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण असून भारद्वाजगोत्री होता. याचा वंश कोल्हापुरांत विद्यमान आहे.

याला 'राजाज्ञा' पद मिळून हा सर्व कारभार पाहूं लागला. ता. २४-४-१८१२ रोजीं कोल्हापूरचा छत्रपति शिवाजीमहाराज वारला, तोंपर्यंत हा कारभारावर होता. अनेक अडचणींतून कोल्हापूर राज्याचा निभाव लागल्याबद्दल याची वाहवा झाली आहे. हा निरिच्छ व स्वामिहितदक्ष असून यजमान इनाम देत होते तें सुद्धां यानें घेतलें नाहीं. याबद्दल रामशास्त्र्याप्रमाणें याचा लौकिक कोल्हापूरांत गाजतो. असले बाणेदार पुरुषच कोणत्याहि राष्ट्राचे आधारस्तंभ होत. रत्नाकरपंत कोल्हापूरकर तिसरे शिवाजीमहाराजांचे पदरीं उदयास आला.

रत्नाकरशान्ति—(स. १०४० सुमार) बुद्ध तर्कज्ञ. याचें दुसरें नांव कलिकालसर्वज्ञ. हा ओदन्तपूर व विक्रमशिला येथील शाळांवर शिक्षक व व्यवस्थापक म्हणून होता. यानें जेतारि व रत्नकीर्ति यांच्यापासून सूत्रांचें व तंत्रांचें अध्ययन केलें. सिलोनमध्येंहि यानें धर्मप्रसार केला. याचे ग्रंथ–छंदोरत्नाकर, विज्ञप्तिभागसिद्धी व अंतर्व्याप्ति (हिस्टरी ऑफ इंडियन लॉजिक, पा. ३४२–४३).

रत्नाकरस्वामी—(समाधि स. १७१९) 'दीपरत्नाकर' ग्रंथाचा कर्ता. याचें उपनांव सदाव्रते असून गोत्र भार्गव. याच्या बायकोचें नांव सावित्रीबाई. हा चंडीपूरचा राहणारा. हा प्रथम अविंधाच्या नोकरीस राहिला होता. परंतु याला रामानंदाच्या सांप्रदायाचा अनुग्रह झाल्यामुळें यानें ती नोकरी सोडून हा संन्यस्त झाला; व पुढें यानें पानखेड या गांवीं आपल्या गुरूच्या सन्निध समाधि घेतली. याच्या गुरूचें नांव सिद्धानंद. नाशिक जिल्ह्यांतील कळवण येथें याच्या परंपरेचा एक मठ आहे.

स्वामींनीं रचिलेल्या ग्रंथांपैकीं कांहीं खालील होत:

१ सिद्धान्तरत्नाकर, २ वैराग्यरत्नाकर, ३ उपदेशरत्नाकर, ४ प्रकाशरत्नाकर, ५ निश्चयरत्नाकर, ६ निःसंदेहरत्नाकर, ७ भिक्षुगीत, ८ विश्वरूपनमन, ९ ब्रह्मानुभावस्तोत्र, १० सद्गुरु–अष्टक, ११ संगमचरित्र, १२ ॐकारवर्णन, १३ रत्नाकरउपदेश (मं. अहवाल शके १८३४).

रन्न—(जन्म स. ९४९–१००० सुमार) कानडी कवि. जैनधर्मी होता. बेळगुरी देशांतील मृदु वोळल हें याचें गांव होय. जन्म स. ९४९. हा बांगडया विकणारा कासार (वैश्य) होता. आई–अब्बलब्बे, पिता–जिनवल्लभेंद्र, गुरु–अजितसेनाचार्य, आश्रय–चामुंडराय. यास दुसऱ्या तैलपाश्चिम चालुक्यानें(स.९७३–९९७) कविचक्रवर्ति अशी पदवी दिली होती. याला तैल–पुत्र सत्याश्रयाकडून आश्रय होता (स. ९९७–१००९). ग्रंथ–अजितपुराण,साहसभीमविजय,रत्नकंद (कोश) (स.९९३). परशुरामचरित, चक्रेश्वरचरित, असेहि दोन ग्रंथ यानें लिहिले, असें अजितपुराणाच्या शेवटल्या भागावरून दिसतें. साहसभीमविजयामधील एका निर्देशावरून चक्रेश्वरचरित हा ग्रंथ गंगाचा सेनापति चामुंडराय याचा याला आश्रय असावा व त्याला उद्देशूनच तें काव्य यानें केलें असावें. पण शेवटले दोनहि ग्रंथ उपलब्ध नाहींत (क. क. च. भा. १, पा. ६२). याची कविता मधुर व प्रवाही आहे. साहसभीमविजय हें काव्य चंपूरूप आहे. यांत भीमानें दुर्योधनाशीं केलेल्या गदायुद्धाचें वर्णन आहे. यानें सत्याश्रयाचें भीमाशीं साम्य वर्णिलें आहे. हा कवि वीररसाबद्दल प्रसिद्ध आहे.

रफीउश्शान मोगल—(मृत्यु स. १७१२) दिल्लीच्या बहादुरशहाचा हा मुलगा होय. याला जहानदारशाहा अझीमुउश्शान व जवानबख्त असे भाऊ होते.

रफी-उद-दर्जत मोगल—(मृत्यु स. १७१९) दिल्लीच्या पहिल्या बहादुरशहाचा नातू व रफीउश्शानचा मुलगा. याला रफिउद्दौला व मुहम्मद इब्राहिम असे दोन भाऊ होते.

रफीउद्दौला—(रफी-उद-दर्जते पाहा).

रमाऊ—(मृत्यु स. १७५७) साबाजी भोसल्याची बायको. हिला रघूजीचा लळा होता.

रमाबाई—(स. १४९७ सुमार) मेवाडच्या कुंभराण्याची मुलगी व सोरठच्या मंडलिक यादवाची पत्नी.

रमावल्लभदास—(जन्म स. १६१०) हा दौलताबादच्या अंबाजीपंत ऊर्फ ममाजीपंत राळेरासकराचा पुत्र असून ह्याचें प्रथम तुकोपंत हें नांव होतें. पुढें विरक्त होऊन लक्ष्मीधराचा अनुग्रह घेतल्यावर वरील नांव यास प्राप्त झालें. याचे ग्रंथ-दशकनिर्धार, शंकराचार्यांच्या बृहद्वाक्यवृत्तीवर ' वाक्यवृत्ति ' व गीतेवर ' चमत्कारी ' नांवाच्या टीका (स. १६३३ ते ३६). श्रीकृष्णजयन्तीव्रतकथा. यांशिवाय वैष्णवगीत वगैरे कांहीं अभंग व पदें आहेत. याचा संप्रदाय गोमांतकांत फार आहे. याची प्रमुख शिष्या आवडाबाई उभयकर. याचा मठ व परंपरा कारवार जिल्ह्यांत मौजे चंदावर येथें अजून आहे (महाराष्ट्रसारस्वत, भा.१, पा. ३०९-१०). याचे प्रसिद्ध तीन शिष्य-लक्ष्मीदास, कृष्णदास व कान्हायी.

२. मराठी साधु व कवि. रामजोशांचा पूर्वज व सोलापूरच्या रायरासकरांचा मूळ पुरुष. हा मोठा सावकार व कृष्णभक्त होता.

रवळोव्यास—(स. १३३२) हा महानुभावपंथी असून हिरांबा या विदुषीचा पट्टशिष्य होता. यानें सह्याद्रिवर्णन हा ग्रंथ लिहून तिला अर्पण केला. या ग्रंथांत श्रीदत्तात्रेयचरित्र, व सह्याद्रीतील कांहीं स्थलांचें धार्मिक माहात्म्य वर्णिलें आहे.

रविकीर्ति—(स.६३४) एक जैन कवि. हा दुसऱ्या पुलकेशीच्या पदरीं होता. यानें त्याचा ऐहोळ शिलालेख लिहिला. हा आपणांस कालिदास व भारवि यांच्या बरोबरीचा मानतो. ऐहोळ याचा कानडी उच्चार 'अय्यावोळे' असा आहे. हें स्थळ बदामीपासून ईशान्येस पंधरा मैलांवर आहे. येथील शिलालेख एका जैनमंदिरावरील शिलाखंडावर स. ६३४ मध्यें कोरलेला आहे.

रविगुप्त—(स. ७२५ सुमार) या बुद्ध तर्कज्ञाचा व कवीचा जन्म काश्मीरांत झाला. तंत्रशास्त्र यास उत्तम अवगत होतें. यानें काश्मीरांत व मगधांत एकंदर १२ पाठशाळा स्थापन केल्या. वारेंद्र येथील हर्ष राजाचा हा समकालीन असून न्यायमंजरीचा कर्ता जयंताच्या पूर्वी होऊन गेला. याचा शिष्य सर्वज्ञमित्र होय. स. ७५४ मधील वसंतसेनाच्या शिलालेखांत यास सर्वदण्डनायक व महाप्रतिहार असें म्हटलें आहे. यानें ' प्रमाणवार्तिकवृत्ति ' नांवाचा तर्कशास्त्रावर एक ग्रंथ लिहिला. या ग्रंथाची मूळ संस्कृत प्रत उपलब्ध नाहीं. परंतु तिबेटी भाषांतर मात्र उपलब्ध आहे (हिस्टरी ऑफ इंडियन लॉजिक, पृ. ३२२-२३).

रविवर्मा कदंब—(स. ५००-५३७) मृगेश कदंबाचा पुत्र. हा बापानंतर गादीवर आला. यानें कांचीच्या चण्डदण्ड पल्लवाला हांकून देऊन पचाशिका येथें घराण्याची पुन्हां स्थापना केली.

रविवर्मा कुलशेखर—(स. १२७५-१३१० सुमार) केरळ प्रांतांतील एक राजा व जयसिंह यदूचा पुत्र. गादीवर आल्यावर कुलशेखर पांड्यानें याचा जिंकलेला मुलूख यानें परत मिळविला (हिस्टरी ऑफ केरल).

२. मलीक काफूरच्या स्वारीचा फायदा घेऊन यानें पांड्यांचा पराभव केला व कांजीवरम घेतलें. पुढें स. १३१६ त यास प्रतापरुद्र काकतीयानें तेथून हाकून दिलें व तेथें मानवीर यास ठेविलें.

रविसूनु—'त्रिपुरदहन' या संस्कृत काव्याचा कर्ता.

रसखान—(स. १५८३-१६२८) दिल्लीचा पठाण सरदार व हिंदी कवि. हा कृष्णभक्त असून गोस्वामी विठ्ठलनाथाचा शिष्य होय. याचे ग्रंथ-' प्रेमवाटिका ' व ' सुजानरसखान. ' याच्या सुंदर कवित्वामुळें हिंदी भाषेंत उत्तम कविता या अर्थानें रसखान हा शब्द रूढ आहे.

रसनिधि—(स. १६६० सुमार) दतिया येथील जमीनदार व एक हिंदी कवि. मूळ नांव-पृथ्वीसिंह. यानें शृंगारप्रधान ' रतनहजारा ' हा ग्रंथ लिहिला. यांत ' बिहारी सत्सई'चें अनुकरण केलेलें दिसतें.

रसभनन्दि—(स. ८५० सुमार) दिगंबरपंथी जैन तर्कज्ञ. यानें बुद्ध तर्कज्ञ धर्मकीर्तिच्या ' समबंधपरीक्षा ' या ग्रंथावर ' समबंधोद्योत ' या नांवाची एक टीका लिहिली आहे (हिस्टरी ऑफ इंडियन लॉजिक, पृ. १९४).

रसलीन—(जन्म स. १६८९) बाबरचा पुत्र व बिलग्राम (जि. हरदोई) येथील हिंदी कवि. मूळ नांव

सैयद गुलाम नबी. याचे ग्रंथ-'अंगदर्पण' (स. १७३७) व 'रसप्रबोध' (स. १७४१). शिवाय यानें व्रजभाषेंत सुंदर कविता केली आहे.

रसिक गोविंद—हिंदी कवि व कृष्णभक्त. याचे ग्रंथ-जुगलम्, माधुरी, अष्टदेशभाषा, गोविंदानंदघन, कलियुगरासो, पिंगल, समयप्रबंध व श्रीरामायण-सूचनिका.

रसिक मुरार—सायन (प्रांत मथुरा) येथील ब्राह्मण साधु व दयार्णव बैरागयाचा शिष्य (भ. वि. अ. ३७).

रसिकसुमति—(स. १७२८ सुमार) ईश्वरदासाचा पुत्र व एक हिंदी कवि. ग्रंथ-अलंकारचंद्रोदय.

रहिम (अबदुलरहीमखान खाना)—(स. १५५३-१६२५) अकबराचा सरदार बहरामखानाचा पुत्र व एक हिंदी कवि. हा अकबराचा मुख्य सेनापति, मंत्री व त्याच्या नवरत्नांपैकी एक होय. जहांगीरानें याची मालमत्ता जप्त करून यास कैद केलें होतें. हा तुलसीदासाचा मित्र होय. हा कृष्णभक्त असून यानें रहिमदोहावलि किंवा सतसई, बरवै, नायिकाभेद, शृंगारसोरठ, मदनाष्टक, रासपंचाध्यायि, बगरशोभा, रहिम काव्य व रहिमरत्नावली हे ग्रंथ केले. यांशिवाय यानें ज्योतिषावर संस्कृतमध्यें 'खेट-कौतुकम्' हा ग्रंथ व 'वाकयात बाबरी' या तुर्की ग्रंथाचें भाषांतर केलें.

रक्षित—अशोकाच्या प्रेरणेनें भरलेल्या तिसऱ्या बौद्ध महासभेंत याला बनवासी प्रांतांतील मुख्य प्रचारक नेमिलें होतें. बनवासी म्हणजे उत्तर कानडा होय. यानें तेथें 'अनमतग्ग' या उपदेशाचा प्रचार केला (महावंश).

रंग तुलुव—(स. १५२५ सुमार) नरसा नायक तुलुवाचा मुलगा. याचा पुत्र सदाशिव. याची पत्नी तिम्मांबा. कृष्णदेवराय तुलुव याचा सावत्र भाऊ होता.

रंगराजाध्वरि—अप्पय्य दीक्षिताचा पिता व गुरु. हा तोतारम्बी नांवाच्या ब्राह्मणेतर स्त्रीपासून झालेला विद्वान् मुलगा. यानें अद्वैतविद्यामुकुर, विवरण, दर्पण वगैरे अनेक प्रबंध केले.

रंगम्मा—तिरुमल्ल आरविदूची पत्नी.

२. वेंकटाद्रि आरविदूची पत्नी.

रंबोल्ड—(स. १७८०) मद्रासचा गव्हर्नर.

रंगनाथ—(स. १६७५ सुमार) कानडी कवि. ब्राह्मण असावा. पिता-सहवासी वंशांतील महालिंगदेव, गुरु-सहजानंद. ग्रंथ-अनुभवामृत.

याला रंगावधूत, श्रीरंग अशींहि नांवें आहेत. यानें आपले ग्रंथ श्रीगिरीचा मल्लिकार्जुन देवापाशीं लिहिले. याचा ग्रंथ नीतिप्रधान असून कानडींत लोकप्रिय आहे. त्यांत 'तत्त्वमसि' या वाक्याचा अर्थ दिला असून इतरहि तत्त्वज्ञान चांगलें सांगितलें आहे. याच्याच ग्रंथाच्या धोरणावर चिदानंदावधूत (स. १७५० सुमार) यानें आपला ज्ञानसिंधु नांवाचा ग्रंथ लिहिला आहे (क. क. च. भा. २, पा. ४९१).

२. (जन्म स. १६१२ सुमार) हा गोलग्रामचा ज्योतिषी. यानें सिद्धांतशिरोमणीवर मितभाषिणी नांवाची टीका लिहिली. सिद्धांतचूडामणी हाहि ग्रंथ याचाच होय.

३. (ग्रंथकाल स. १६०३) यानें काशीक्षेत्रांत सूर्यसिद्धांतावर गूढार्थप्रकाशिका नांवाची टीका लिहिली.

४. (मुनीश्वर पाहा).

५. (स. १७६५) हा 'विचारसुधाकर' नांवाच्या ग्रंथाचा कर्ता. हा पुणें जिल्ह्यांतील जुन्नरचा. यानें आपला ग्रंथ रघुनाथराव पेशव्यांच्या सांगण्यावरून लिहिलेला दिसतो.

रंगनाथ मोगरेकर—(ग्रंथकाल स. १६०८) हा गोदावरी कांठी राहणारा असून अनंताचा पौत्र व अपेराज ऊर्फ आप्पारावाचा पुत्र होय. गोत्र कपि. गुरुपरंपरा-सिद्धानंद ऊर्फ वासुदेवानंद-परमानंद-वैकुंठानंद-कृष्णानंद. याचे ग्रंथ-चित्सदानंदलहरी (गीतेवरील टीका), योगवासिष्ठ, पंचरत्न. हे आणि निगडीकर यांचा घोटाळा योगवासिष्ठाच्या शेवटीं घातलेल्या कांहीं ओव्यांमुळें झाला, पण त्या ओव्या मागाहूनच्या आहेत. याचा पुत्र किंवा शिष्य काशिराज (म. सा. १, पा. २७९-८०).

रंगनाथस्वामी निगडीकर—(जन्म स. १६१२-१६८४) रामदास पंचकांपैकीं एक साधु. याच्या पितृपरंपरेंतील मूळ पुरुष राघोपंत. उपनांव खडके व पुढें घोडके. हा बापाजीपंतांचा पुत्र असून मोगलाईंतील चौसाळ प्रान्तांतील खडकीचा राहणारा. यास शिपाईगिरीची हौस फार असे. यानें बद्रिकाश्रमास जाऊन अनेक विद्या संपादन केल्या. याच्या वडिलांनीं पुढें संन्यास घेऊन निजानंद हें नांव धारण केलें. त्यांचाच यानें उपदेश घेतला. याचा सर्व थाट ऐश्वर्याचा असून याच्याबरोबर लंगोटबंद शिष्यसमुदाय आणि भागम्मा व चंद्रम्मा या शिष्यिणी नेहमी असत. याच्या घोड्याचें नांव मनोहर. त्याचा रंग निळा होता. रामदास याला रंगाबा म्हणत असत.

१ बृहद्वाक्यवृत्ति, २ निजानंदसाधन, ३ श्लोकपंचक, ४ रंगाष्टक, ५ मार्तंडाष्टक, ६ करुणाष्टक, ७ रामजन्म, ८ भगवद्गीता, ९ निजानंदसाधन, १० मिथ्यामायास्वरूप, ११ एकाखडी, १२ बद्धमोक्षविवरण, १३ गरुडसत्यभामागर्वपरिहार, १४ संतमालिका (?). यांखेरीज गुरुगीता, सुदामचरित्र, शुकरंभासंवाद, पंचीकरण, भानुदासचरित्र वगैरे अनेक ग्रंथ लिहिले आहे. यांच्या वंशजांचें कुलदैवत सध्यां दत्त आहे. नाझरेकरांच्या घरांत विठ्ठल आहे. निगडीच्या मठांत कृष्ण आहे.

या ग्रंथांशिवाय यांचीं शेंकडों उत्कृष्ट पदें म्हटलेलीं ऐकूं येतात. यांची बरीच कृती पूर्वी निगडी येथील मठ जळाला तेव्हां अग्निमुखीं पडली असें यांचे वंशज सांगतात. हे आपले वयाचे बहात्तरावे वर्षी शके १६०६ रक्ताक्षी संवत्सरीं मार्गशीर्ष वद्य १० स समाधिस्थ झाले.

रंगो बापूजी—(शेवट स. १८५७) सातारच्या प्रतापसिंहाच्या कारकीर्दीत ब्राह्मण व प्रभू यांमध्यें ग्रामण्यासंबंधीं वाद उपस्थित झाला असतां प्रतापसिंहांनीं प्रभूची बाजू घेतली होती. परंतु शेवटीं त्यांना पदच्युत व्हावें लागलें. तेव्हां त्यांचें म्हणणें ब्रिटिश पार्लमेंटपुढें मांडण्याकरितां जे लोक विलायतेंत गेले होते त्यांतील हा प्रमुख होय. हा तेथें चौदा वर्षें होता. प्रथम यास इंग्रजी मुळींच येत नव्हतें. परंतु यानें आपलें सर्व काम एका मध्यस्थामार्फत केलें. यानें विलायतेंतील सर्व हकीकत मोडी लिपीत २२५ पानी पुस्तक लिहून तेथेंच प्रसिद्ध केली (स. १८४७). या पुस्तकांत यानें प्रतापसिंहाचें सर्व चरित्र दिलें आहे (प्रतापसिंह छत्रपति भोंसले पाहा). लंडनला गेल्यावर याला पुष्कळ दिवस तक्रारीची दाद लागण्याची आशा दिसेना, तेव्हां याच्याबरोबरचे लोक परत आले; परंतु हा मात्र तेथेंच राहिला. यानें तेथें सुमारें २५ सभा भरवून तेथील लोकांना प्रतापसिंहावर कसा जुलूम होतो हें समजावून सांगितलें. त्यामुळें तेथें फार खळबळ उडाली. परंतु यास फारसें यश आलें नाहीं. ह्याचें सबंध नांव 'रंगोजी बापूजी रोहिडखोरेकर गुप्ते देशपांडे' असें होतें. शेवटीं स. १८५७ सालच्या बंडाच्या वेळीं याच्यावर कटाचा आरोप येऊन हा परागंदा झाला व याचा पुत्र सिताराम फांसी गेला. याच्या पूर्वजांनीं शिवाजीला स्वराज्यस्थापनेस फार मदत केली होती. राजारामाच्या कारकीर्दीत याचें वतन सचिवांनीं बळकावलें होतें तें परत मिळण्याकरितां यानें व याच्या चार पूर्वजांनीं पराकाष्ठा केली, पण यश आलें नाहीं. याच्या घराण्यांतील दोन पुरुष पानपतावर गेले होते. शेवटीं शेवटीं याला अज्ञानदशा प्राप्त झाली.

राजसुंदरी—ही राजेन्द्र चोलाची मुलगी व राजराज गंगाची पत्नी.

राजा अली फारूकी—(स. १५७६-९६) हा दुसऱ्या मिरान मुहम्मद फारूकीचा भाऊ. हा अकबरास मिळाला, व मुरादच्या निजामावरील स्वारींत सोनपतच्या लढाईत मेला.

राका कुंभार—(स. १५०० सुमार) एक मराठी संत. हा जातीनें परदेशी कुंभार. याच्या बायकोचें नांव बाका अथवा बंका असें होतें. याला देऊबाई नांवाची एक कन्या होती. हा गोरोबा कुंभाराप्रमाणें कुंभार मंडळींत वैष्णव म्हणून प्रसिद्ध होता.

राघव आपापंत खांडेकर—(ग्रंथकाल स. १८१०-१८) हा तापी-तटाकी पारोळें येथील रहिवाशी. हा पुढें गोदातीरीं पुणतांबें येथें राहत असे. यांचे खेटकृति, पंचागार्क आणि पद्धतिचंद्रिका वगैरे ग्रंथ प्रसिद्ध व उपलब्ध आहेत (भा. ज्यो.).

राघव गंग—(स. ११५२-६७) हा त्रिकलिंगाच्या प्राच्य गंगांपैकीं अनंतवर्मन् ऊर्फ चोलगंगाचा पुत्र. हा आपल्या कामार्णव नांवाच्या सावत्रभावानंतर गादीवर आला. याचा पराभव बंगालच्या विजयसेनानें केला. हा विजयसेनाचा काल निश्चित असल्यामुळें ही कटक गॅझेटियरमधील माहिती बरोबर आहे याविषयीं शंका नाहीं.

राघवचैतन्य—(स. १५५० सुमार) केशव चैतन्याचे गुरु. यांचें पूर्वीचें नांव रंगनाथ. हे गिरनार पर्वताच्या पायथ्याशीं राहत असत. पुढें जसजसा उत्तरेकडील प्रदेश यवनांनीं पादाक्रांत केला, तसतसे त्यांच्या जुलमी अमलाला त्रासलेले व अत्याचाराला भिऊन गेलेले शेंकडों हिंदु खालीं दक्षिणेंत उतरूं लागले. त्यांच्या तोंडून हिंदुधर्मियांच्या हालअपेष्टांचीं करुण वर्णनें ऐकून यांना यवनांबद्दल अत्यंत चीड आली. तेव्हां यांनीं आपल्या बापास यवनाची चाकरी सोडून देण्यास सांगितली; पण त्यानें न ऐकल्यामुळें हे घरांतून बाहेर पडले, व हिंदुधर्मावरील हें संकट नाहींसें करण्यासाठीं यांनीं गिरनार पर्वतावर घोर तपश्चर्या केली. व नंतर जुन्नरजवळील अंकुशधार पर्वतावर तपश्चर्या केली; त्या वेळेस व्यासांनीं प्रत्यक्ष दर्शन देऊन यांना उपदेश केला.

यांनीं एकंदर नऊ ग्रंथ लिहिले ते पुढीलप्रमाणें:—

१ ब्रह्मस्वरूप, २ मायाविचार, ३ योगनिद्रा, ४ सनातनधर्मविचार, ५ बुद्धिविकास, ६ इंद्रियदमन, ७ त्रिगुणलीला, ८ निराकारमन, ९ जितेपणीं मरण. हे सर्व ग्रंथ प्राकृत आहेत. हे विरक्त झाल्यावर दक्षिणेंत येऊन गुलबर्ग्यास कांहीं दिवस राहिले, व त्यामुळें चैतन्य नामक परंपरेचें कलम महाराष्ट्रीय भक्ति-संप्रदायाच्या परंपरेंत दाखल झालें असें अनुमान निघतें. यांची समाधि मोंगलाईंत गुलबर्ग्यानजीक दीड योजनावर 'आळंद गुंजोटी' या गांवीं असल्याचें निरंजन नामक कवीनें शके १७०९ या वर्षी लिहिलेल्या 'केशवचैतन्य-चरित्र' या नांवाच्या ग्रंथांत लिहिलें आहे.

राघवांक—(स. ११६५ सुमार) कानडी कवि. तुंगभद्रेच्या कांठीं पंपापुरीं याचा जन्म झाला. पिता–महादेवभट्ट, माता–रुद्राणी. ग्रंथ–हरिश्चंद्रकाव्य, सोमनाथचरित, सिद्धरामपुराण, वीरेश्वरचरित, शरभचरित्र, हरिहरमहत्त्व. यांपैकीं फक्त पहिलीं तीन मिळालीं आहेत.

याचा गुरु हरीश्वर. हाच याचा मामाहि होता. मामानें हरिश्चंद्रकाव्य करून आपल्या भाच्यानें मनुष्याची स्तुति केली म्हणून याच्या तोंडांत मारली. त्यामुळें याचे पांच दात पडले. पण पुढील शिवस्तुतिपर चार काव्यें केल्यावर याचे पांच दांत पुनः आले, अशी आख्यायिका पद्मणांकाच्या पद्मराजपुराणांत दिली आहे. सिद्धनंजेशन नांवाच्या कानडी कवीनें याचें चरित्र कानडींत काव्यमय लिहून ठेवलें आहे. त्याचा लेखनकाल स. १६५० आहे. पंपापूरच्या देवराज राजाच्या दरबारांत याच्या हरिश्चंद्र काव्याबद्दल वाहवा झाली होती. पण ही गोष्ट मामा व गुरु यांना सहन झाली नाहीं हें वर आलेंच आहे.

नंतर हा नरसिंह बल्लाळाचा मंत्री कैरेय पद्मरस-दीक्षा बोधे या कानडी ग्रंथाचा कर्ता, याला भेटण्याकरितां होयसळनगरला म्हणजे द्वारसमुद्राला गेला. ओरुगल्लच्या प्रतापरुद्र राजाच्या सभेंतील कवींनाहि यानें हरविलें होतें, असें शांतिलिंगदेशिककृत भैरवेश्वर काव्यावरील कथासूत्र रत्नाकरांत लिहिलें आहे. कथासूत्ररत्नाकराचा लेखनकाल स. १६७२ आहे. वाङ्मयदृष्ट्या हा कवि प्रसिद्ध आहे. षट्पदी वृत्त यानें कानडींत प्रथम सुरू केलें असें कांहीं म्हणतात. हा बेलुरु येथें मृत्यु पावला. हा हंपीच्या विरूपाक्षाचा भक्त होता.

राघवेंद्राचार्य गजेंद्रगडकर—(स. १७७० सुमार) सातारच्या गजेंद्रगडकर घराण्याचे पूर्वज. नामांकित पंडित. हे माधवराव पेशव्यांच्या वेळी होते. यांनीं केलेले ग्रंथ–१ परिभाषेंदुशेखरावर 'त्रिपथगा' नांवाची टीका, २ लघुशब्देंदुशेखरावर विषमी नांवाची टीका, ३ मनोरमाशब्दरत्नावर 'चंद्रिका' नांवाची टीका, ४ पिष्टपशुमीमांसा, ५ विष्णुसहस्रनामटीका, ६ गीताभाष्य,७ उपनिषद्भाष्य. महाभाष्यावर कैयटाच्या मंडनार्थ व नागोजी भट्टाच्या खंडनार्थ प्रदीपोद्योतप्रभा नांवाचा ग्रंथ करण्याचें यांच्या मनांत होतें (शब्दरत्नावरील टीकेंत तसें म्हटलें आहे). परंतु यांचे कनिष्ठ पुत्र वामनाचार्य एकाएकीं वारल्यामुळें तो ग्रंथ झाला नाहीं.

राघो बल्लाळ अत्रे—(स. १६९०–८०) हा व याचे चुलतभाऊ विठ्ठल शिवदेव व निळोराम हे शिवाजीच्या पदरी होते. हा पुणें, पन्हाळा, राजापूर, कल्याण वगैरे प्रांतांचा सुभेदार होता. यानें सीद्दयाच्या लढायांत लौकिक मिळविला. चंद्रराव मोऱ्याचा पराभव करण्यांत हाच प्रमुख होता. याचें शौर्य पाहून आपल्या पठाण पलटणीच्या आधिपत्याचा पहिला मान यास शिवाजीनें दिला. शिवाजीनंतरहि हा हयात होता.

राजकेसरीवर्मन् ऊर्फ **राजादित्य चोल**—(स. ९४७–४९) हा पहिल्या परांतकाचा पुत्र. यानें उत्तरेकडे राष्ट्रकूटाच्या प्रांतावर स्वाऱ्या केल्या. तेव्हां तिसऱ्या कृष्ण राष्ट्रकूटाच्या मेव्हणा बुतुग गंगानें याच्यावर चढाई करून तक्कोलम येथें याला ठार केलें. याच्या मागून याचा धाकटा भाऊ गंडरादित्तन हा राजा झाला.

राघो भारती—(स. १८४८) आपासाहेब भोसले नागपूरकरांचा तोतया.

राज-अच्युतमणि मखिन्—(स. १६३०) हा तंजावरच्या रघुनाथ नायकाचा प्रधान. यानें स. १६३० मध्यें 'तत्त्वचिंतामणिदर्पण' नांवाचा तर्कशास्त्रावर ग्रंथ लिहिला.

राजकुवर ऊर्फ **नानीबाई**—ही शिवाजीची मुलगी होती. हिच्या आईचें नांव सगुणाबाई असें होतें. ही गणोजी राजे शिर्के मळेकर यांस दिली होती (शि. नि.१, पृ. २२५).

हिच्या नवऱ्यास शिवाजीनें दाभोळची देशमुखी देऊं केली होती (रा. खं. ३ रा, प्रस्तावना, पा. १).

राजगंभीर पांड्य—(स. १२०० सुमार) हा राजेश पांड्याचा मुलगा.

राजगी यादव—(स. १५० सुमार) हा पहिल्या भिल्लम यादवाच्यानंतर गादीवर आला. याला श्रीराज म्हणत.

राजचूडामणि—(जन्म स. १५५० नंतर) हा रत्नखेट श्रीनिवास दीक्षिताचा पुत्र. हा मद्रास-कडील अर्काट जिल्ह्यांतील राहणारा. रत्नखेट अप्पय्य दीक्षिताचा जांवई, याचा थोरला भाऊ अर्धनारीश्वर. ग्रंथ–कमलिनीकलहंस (नाटक), तंत्राशिखामणि, युद्धकांड चंपू (हि. का. ६, ६२९-३०). यांशिवाय आनंद-राघ नाटक व शृंगारसर्वस्वभाण यानें लिहिला.

राजनरेंद्र—(स. ४००) शार्ङ्गधर पंडिताचा पिता. राजमहेंद्रीचा राजा (नन्नयभट्ट पाहा).

२. (कविराक्षस पाहा).

राजपाल—(स. ९५६-९८०) हा बंगालच्या नारायणपालाचा मुलगा. यानें जगत्तुंग राष्ट्रकूटाच्या मुलीशीं लग्न केलें.

राजब तुघ्लक—(स.१३२५ सुमार) हा घिया-सुद्दीनचा भाऊ. यास सिपाहसालार अशी पदवी होती. याचा पुत्र फीरूज हा दिल्लीचा बाहशहा झाला.

राजमल्ल (पश्चिम) गंग—(स. ९७४-८४) हा मरुलदेवाचा नातू व इंद्राचा पुत्र. हा तिसऱ्या मारसिंहा-नंतर गादीवर आला. या घराण्यांत हा चवथा राजमल्ल होय, पण पहिले तीन गादीवर आले नव्हते. याचाच प्रधान चामुंडराय होय. प्रांतभेदानें राजमल्लचा उच्चार राचमल्ल असा करतात (चामुंडराय व मारसिंह पाहा).

राजमहेन्द्र चोल—(स. १०६३) राजेन्द्र नांवाच्या चोलाचा पुत्र. हा अतिशय न्यायी असून यानें श्रीरंगम् येथील देवास वर्षासन नेमून दिलें होतें. यानें राजमहेन्द्री हें शहर वसविलें. मल्ल चालुक्यानें याचा पुष्कळ प्रांत काबीज केला. कारण या वेळीं चोलांच्या राज्यांत बंडाळी झाली होती, व राजघराण्यांत सिंहा-सनावर कोणी बसावें याबद्दल यादवी सुरू झाली होती. चोल राजघराण्यांत या वेळीं बरेचसे राजपुत्र व राज-संबंधी लोक आपला हक्क प्रस्थापित करूं पाहत होते. याच्या मागें याचा चुलता वीरराजेन्द्र हा राजा झाला.

राजराज गंग—(स.१०७०-७८) हा त्रिकलिंगाच्या प्राच्य गंगांपैकीं वज्रहस्तानंतरचा राजा. त्याची राणी प्रसिद्ध राजेंद्र चोलाची मुलगी रूपसुंदरी होय. याला जयवर्मन् (अवंतिवर्मन्) व अनंतवर्मन् असे दोन पुत्र होते. अवंतिवर्मन् यानें केलेले पराक्रम याच्याच कारकीर्दीतील होत (अवंतिवर्मन् पाहा).

२. (स. ११६७-९२) हा राघवानंतरचा राजा. चोड गंगाचा पुत्र.

३. (स.१२०२-१९) हा अनियंक भीमानंतरचा राजा.

राजराज (पूर्व) चालुक्य—(स. १०२२-६३) हा विमलादित्याचा मुलगा.

राजराज चोल—(स. ९८५-१०१६) हा दुसऱ्या आदित्याचा धाकटा भाऊ होता. या वेळीं चालुक्य व गंग यांची यादवी जुंपल्यामुळें यानें त्याचा फायदा घेऊन आपलें राज्य वाढविलें. हा सर्व चोल राजांमध्यें श्रेष्ठ झाला. यानें प्रथम आपल्या राज्याची अन्तःस्थिति सुधारली व मग मुलूखगिरीस प्रारंभ केला. यानें प्रथम चेर आरमारावर स्वारी करून कांडलूरजवळ त्याचा परा-भव केला (स. ९९५). नंतर गंगप्पाडी, नुळंबप्पाडी, तळिगैवळी व वेंगैनाडु हे प्रान्त स. ९९७ पर्यंत काबीज केले, व विमलादित्य चालुक्य राजास कुंदब्बा ही आपली मुलगी दिली. याच सुमारास (स. ९९५) यानें पांड्यांचाहि पराभव करून कोलूम व कलिंग दश जिंकले. ईळम(सिलोन)वर स्वारी करून तेथें आपली सत्ता स्थापली (स. १००३). यानंतर तीनचार वर्षांत यानें साडेसात लाख वसुलाचा रट्टपाडी प्रदेश जिंकून सत्याश्रय चालुक्याचा पराजय केला (स. १००७). तंजावर येथील देवळांत राजराजानें आपण, आपल्या राण्या व बहीण यांनीं दिलेल्या एकंदर धर्मादाय देणग्यांची यादी शिलालेखानें खोदून ठेविली (स. १०१०), व तंजावर शहर पुनः वसविलें. कारण मध्यंतरीं चालुक्यांनीं त्या शहराचा नाश केला होता. आयुष्याच्या शेवटीं यानें समुद्रांतील बारा हजार बेटें जिंकल्याचा उल्लेख आढळतो (स. १०१२). याप्रमाणें आपलें साम्राज्य वाढवून हा चोल सम्राट् बनला. यानें आपली सरहद्द कावेरीच्या उगमाजवळील येडतोरेनाड गांवापासून थेट कृष्णेच्या मुखापर्यंत भिडविली. तसेंच याची दर्यावरील सत्ता रामनादपासून विजगापट्टमपर्यंत होती. याला राजाश्रम, अरुमोळीदेव, मुम्मूडीचोल, जयैमगोंडा वगैरे पदव्या होत्या. याच्यामागून त्याच्याचसारखा याचा पराक्रमी पुत्र गंगईकोंड ऊर्फ मुडिगोंड निगरिली उत्तम चोल राजेन्द्र हा राजा झाला.

२. (स. ११४६-६३). हा दुसऱ्या कुलोत्तुंग चोलाचा मुलगा.

३. (स. १२१६-४६) हा चोलांपैकीं तिसऱ्या कुलोत्तुंगाचा पुत्र. याला त्रिभुवनचक्रवर्ति व राजकेसरीवर्मा या पदव्या होत्या. पांड्यराजा याच्यावर चालून आला असतां नरसिंह होयसळानें याला मदत देऊन पांड्यांचा पराभव केला (स. १२२३). पुढें काडव पल्लव यानें राज-राजास पकडलें असतां पुनः नरसिंहानें याला सोडविलें,

व याच्या राज्यांतील बंडाळी मोडली (स.१२३२). परंतु पुढें सर्वत्र बंडें उद्भवलीं. तेलगूचोल हा नेलोरहून, सुंदरपांड्य हा दक्षिणेकडून व काडव पल्लव हाहि दक्षिणेकडून चालून आला; आणि याचें राज्य काबीज केलें. शेवटीं याच्या नंतर याचा पुत्र तिसरा राजेन्द्र राजा झाला.

राजशेखर—(स. ९१७ सुमार) हा संस्कृत पंडित महाराष्ट्रांतील रहिवासी होता, असें दिसतें. बालरामायण नांवाच्या नाटकांत यानें अकालजलद नांवाच्या पुरुषापासून आपण चवथे पुरुष आहों असें सांगितलें असून त्या अकालजलदाला महाराष्ट्रचूडामणि म्हटलें आहे. याच्या पित्याचें नांव दुर्दुक व मातेचें नांव शीलवती असें होतें. आपल्याला यायावर असें हा विशेषण लावून घेतो. यायावर हें याचें कुलनाम असावें. हा जातीचा ब्राह्मण असून याची एक पत्नी अवन्तिसुंदरी ही चव्हाण कुलांतील होती. यावरून याच्या वेळेपर्यंत अनुलोम विवाह उघडपणें चालू होते असें दिसतें. अवन्तिसुंदरीच्या इच्छेवरूनच याचें 'कर्पूरमंजरी' हें नाटक रंगभूमीवर आलें (१. ११).

आपल्या अंगीं असलेल्या काव्यशक्तीविषयीं याला पूर्ण विश्वास होता म्हणून हा आपणास वाल्मीकीचा अवतार म्हणवून घेतो. कर्पूरमंजरींत यास बालकवि व कविराज असेंहि म्हटलेलें आहे. 'काव्यमीमांसा' हा याचा अलंकारशास्त्रावरील ग्रंथ सुप्रसिद्ध आहे. 'कर्पूरमंजरी', 'विद्धशालभंजिका', 'बालरामायण' व 'बालभारत', किंवा 'प्रचंडपांडव' हीं याचीं नाटकें प्रसिद्ध झालीं आहेत. याशिवाय 'हरविलास' (महाकाव्य) नांवाचाहि याचा एक ग्रंथ असल्याचा उल्लेख यानें स्वतः (बा. रा. १·१२) व हेमचंद्राचार्यानें आपल्या काव्यानुशासनांत केला आहे आणि त्यांतील दोन श्लोक उद्धृतहि केलेले आहेत (पान ३३५). तसेंच उज्वलदत्तानें अर्धा श्लोक हरविलासांतून उद्धृत केला आहे. पण हरविलास अद्यापि प्रसिद्ध नाहीं, व कुठें उपलब्ध असल्याचेंहि दिसत नाहीं. याशिवाय आठवा यानें 'भुवनकोश' नांवाचा भूवर्णनात्मक ग्रंथ केला असल्याचा काव्यमीमांसेंत निर्देश आहे.

हा महामंत्रिपुत्र व रघुकुलांतील निर्भय किंवा महेंद्रपाल प्रतिहार राजाचा उपाध्याय अथवा गुरु असेंहि याचें वर्णन आढळतें (बा. रा. १. ५; १. १८; कर्पूरमंजरी १. ५; १. ९). अवन्तिसुंदरी हीं क्षत्रियकुमारी याची पत्नी असून तिच्या मताचा काव्यमीमांसेंत यानें निर्देश केला आहे. त्यावरून तिच्या अधिकाराची कल्पना येते.

प्रचंडपांडव किंवा बालभारत या नाटकांत राजशेखरानें महेंद्रपालाचा पुत्र महीपाल प्रतिहार या राजाचा उल्लेख केला आहे. तो किंवा याचे पूर्वज मूळ स्थान सोडून कनोज येथें गेले असावेत असें दिसतें. कारण बालभारताचा प्रयोग महोदय येथें म्हणजे कान्यकुब्ज देशांत झाल्याचें वर्णन आहे. दिशा सांगावयाच्या त्या कनोजला उद्देशून सांगाव्या, असें काव्यमीमांसेंत यानें म्हटलें आहे. हा शेवटीं पुनः प्रतिहाराकडे गेला. कारण याच्या शेवटच्या अपुऱ्या नाटकांत त्याचा उल्लेख आहे. पण तसेंच याच्या विद्धशालभंजिकेचा प्रयोग युवराज केयूरवर्ष कलचुरीच्या आज्ञेवरून झाला आहे. त्यावरून हा त्रिपुरीच्या राजाच्या आश्रयासहि होता असें दिसतें.

२. (ग्रंथसमाप्तिकाल स.१३४८) हा व कर्पूरमंजरी वगैरे नाटकांचा कर्ता राजशेखर भिन्न होत. हा जैनधर्मी होता. याचा 'चतुर्विंशतिप्रबंध' नांवाचा एक ग्रंथ आहे. त्याच्या शेवटीं यानें आपल्या ग्रंथसमाप्तीचा काल दिला आहे.

जैन राजशेखर अभयदेवसूरीच्या (मलधारी) शिष्यपरंपरेंतील तिलकसूरीचा शिष्य होता. यानें दिल्लीस राहून शाह महणसिंहाच्या प्रेरणेनें वरील चतुर्विंशतिप्रबंध केला. शाह महणसिंह हा जगत्सिंहाचा पुत्र होय.

याची प्रमाणन्यायतत्त्वालोकावर रत्नावतारिकापंजिका नांवाची उपटीका, स्याद्वादकलिका व श्रीधराच्या न्यायकंदलीवर पंजिका हे न्यायशास्त्रावर ग्रंथ केले.

राजशेखर पांड्य—पांड्य घराण्यांतील विक्रमाचा पुत्र. हा राजा विद्वान् होता.

राजशेखर संगम—विजयानगरच्या संगमवंशांतील मल्लिकार्जुनाचा पुत्र. हा गादीवर बसला नाहीं.

राजसबाई भोसले—(स. १७१४) राजारामाची पत्नी. हिचा पुत्र संभाजी हा गादीवर आला. दुसरा शिवाजी वेडसर होता. त्याला व ताराबाईला हिनें तुरुंगांत ठेवलें.

राजसिंह गुहिलोत—(राज्यकाल स. १६५२-८०) मेवाडचा राजा. हा जगतसिंहाचा मुलगा. जन्म स. १६२९. यानें प्रथम औरंगजेबाशीं मिळतें घेतलें होतें, पण औरंगजेबाचा धर्माभिमान पाहून यानें त्यास छळण्यास सुरुवात केली व त्यास जर्जर करून सोडलें. शेवटीं याला ता. २२ ऑक्टोबर १६८० रोजीं विषप्रयोगानें मृत्यु आला. याला एकूण नऊ मुलगे व एक मुलगी इतकीं अपत्यें होतीं.

२. (स. १७४३-६१) मेवाडचा राजा. हा दुसऱ्या प्रतापसिंहाचा मुलगा. याच्या कारकीर्दीत मराठ्यांनीं स्वारी करून याचा पराभव केला. हा निपुत्रिक मरण पावला.

राजसिंह पांड्य—(स. ७१०-४०) हा पांड्यांपैकीं कोच्चदैयन याचा पुत्र होय. हा अरिकेसरी, परान्तक,

नेदुजदैयण, टेर-मरन, नेदुमारण, परांकुश अशा पदव्या धारण करीत असे. चेर व चोल यांच्यावर याला वर्चस्व मिळालें, आणि यानें कुडाळ (मदुरा), वंजी, कोली (उरैपूर) या गांवांना तट बांधले.

यानें पुष्कळ तुला, गोसहस्र व सुवर्णदानें केल्याचा निर्देश आहे. यानें माळव्याच्या राजकन्येशीं विवाह केला होता आणि तीपासून यास जटिल नांवाचा मुलगा झाला होता. याची पत्नी सुंदरी.

याच्या पित्यानें गंग व कांगू राजांशीं युद्धें सुरू केलीं होतीं. तीं यानें पुढें चालविलीं व त्यांचा अनेक ठिकाणीं पराजय केला. शिवाय यांचे मुख्य शत्रू पल्लव यांना त्यानें अगदीं समुद्राच्या तीरापर्यंत पिटाळून लावलें. याच्या मागून जटिल हा गादीवर आला.

२. कुलभूषण पांड्याचा पुत्र.

राजा ओडियर—(स. १५७८-१६१७) म्हैसूरचा राजा. हा दोद्द चामराजाचा मुलगा. हा आपला भाऊ बेत्तदानंतर गादीवर बसला. वास्तविक हाच या घराण्याचा संस्थापक होय. यानें लहान संस्थानें व श्रीरंगपट्टणच्या राम आरविदूस जिंकून राज्य वाढविलें.

राजादित्य चोल—(स. ९४७-४९) एक चोल.

२. (२ आदित्य चोल पाहा).

राजाधिराज चोल—(स. १०४३-५२) हा राजेंद्रचोलानंतर गादीवर आला.

यानें दक्षिणेकडील मानाभरण, वीर-केरल, सुंदरपांड्य, पश्चिम चालुक्य राजा सोमेश्वर १ ला आणि त्याचे सुभेदार, विक्रमादित्य ६ वा आणि विष्णुवर्धन विजयादित्य, या सर्व राजांचा पराभव केला. कंपिली येथील चालुक्यांच्या ठाण्याचा यानें नाश केला. यानें चालुक्य, चेर, पांड्य, गंग, पल्लव, सिलोन आणि कनोज वगैरे राज्यांवर आपले सुभेदार नेमले व अशा रीतीनें आपण राज्य करूं लागला. स. १०५२ मध्यें पश्चिम चालुक्य राजा सोमेश्वर १ ला याचा यानें पराभव कोप्पम येथें केला. कोप्पम येथील पश्चिमचालुक्य राजाशीं झालेल्या लढाईत हा मारला गेला, तरी पण याचा भाऊ राजेंद्रदेव यानें ती लढाई जिंकली.

स. १०५२ मध्यें याचा भाऊ राजेंद्रदेव हा याच्या नंतर गादीवर आला.

हा शैव असल्यामुळें, यानें श्रीरामानुजास आपल्या राज्याच्या हद्दपार केलें. याला तीन राण्या होत्याः १ दीनचिंतामणी, २ इळीशैवळभी, ३ महादेवी. यानें मानाभरण पांड्याला ठार मारलें.

२. (स. ११६३-७८) हा चोलांपैकीं दुसऱ्या राजराजाचा मुलगा. याच्या व याच्या मागच्या तीन राजांच्या कारकीर्दीत शांतता असल्यानें वाङ्मय बरेंच वाढलें. शेक्कीलार, कंबन, ओट्टक्कुटन, पुगळेंदी वगैरे अनेक वाङ्मयभक्त या वेळीं झाले. याच्या कारकीर्दीत पाण्ड्य राजघराण्यांत यादवी माजली. एका पाण्ड्य राजपुत्राला यानें व एकाला सिलोनच्या पराक्रमबाहु राजाची मदत होती. त्यामुळें पराक्रमबाहु व चोल यांच्यांत युद्ध उपस्थित झालें. पराक्रमबाहूनें रामेश्वर लुटून कुलशेखर (चोलमित्र) पांड्याचाहि पराभव केला, परंतु यानें शौर्यानें त्याचा पराभव करून मदुरेवर स्वारी केली. पराक्रमबाहूचा मित्र असणाऱ्या वीर पांड्याला यानें कुटुंबासह ठार करून तेथें एक विजयस्तंभ उभारला; व आपला मांडलिक तेथें स्थापिला. याच्या मागून याचा पुत्र कुलोत्तुंग तिसरा गादीवर आला (स. ११८६).

राजानक गोपाल— प्रद्युम्नशिखरपीठाष्टक व शिवमाला या दोन ग्रंथांचा कर्ता.

राजानक महिमभट्ट—(स. १०२०-६०) याच्या पित्याचें नांव श्रीधैर्य आणि गुरूचें नांव श्यामल. याचा पुत्र भीम. या भीमाच्या मुलाकरितां यानें 'व्यक्तिविवेक' नांवाचा ग्रंथ लिहिला. मुलांचीं नांवें बहुधा योग, क्षेम आणि भाज अशीं असावींत. याशिवाय 'तत्त्वोक्तिकोश' नांवाचाहि याचा साहित्य-शास्त्रावर ग्रंथ असावा असें व्यक्तिविवेकांतील दुसऱ्या विमर्शांतील एका श्लोकावरून दिसतें. याच्या राजानक या पदवीवरून हा काश्मीरी असावा. हा 'बृहती' नांवाचा ग्रंथ लिहिणार असल्याबद्दल यानें लिहिलें आहे. व्यक्तिविवेकांतील मतांचें सार रुय्यकानें अलंकारसर्वस्वांत दिलेलें असल्यामुळें महिमभट्ट स. ११०० च्या पूर्वी होऊन गेलेला असला पाहिजे व हा स्वतः बालरामायणांतील उतारे घेणारा व वक्रोक्तिजीवित आणि लोचन यांच्यावर टीका करणारा असल्यामुळें स. १००० नंतरचा असला पाहिजे, असें उघड होतें. मम्मटानें पांचव्या उल्लासांतील चर्चेत महिमभट्टाचें नांव घेतलें नसलें तरी याच्या व्यक्तिविवेकांतील सिद्धान्ताचेंच खंडन केलें आहे, असें सरस्वतीतीर्थादि काव्यप्रकाशावरील टीकाकारांचें मत आहे; आणि याच्या उपलब्ध प्रतीशीं ताडून पाहतां तें शब्दसाम्यानें जुळतें. काव्यप्रकाशांतील दोषविवेचन व्यक्तिविवेकाला धरून केलें असावें असें वाटतें.

राजाराम (छत्रपति)—(जन्म ता. २४. २. १६७० –मृत्यु ता. २. ३. १७००) थोरल्या शिवाजीमहाराजांस शिर्के घराण्यांतील सोयराबाईपासून झालेला हा मुलगा होय. याचा जन्म राजगडावर झाला. प्रतापराव गुजराच्या मुलीशीं याचें लग्न शिवाजीच्या निधनापूर्वी तीन वार झालें. तिचें नांव जानकीबाई. ती पुढें लवकरच मेली. पुढें संभाजीनें याचीं दोन लग्नें केलीं. सोयराबाईच्या बाजूच्या मंडळींनीं याला शिवाजीनंतर १८ व्या दिवशीं गादीवर बसविलें. परंतु दोन महिन्यांनीं संभाजीनें याला नजरकैदेंत टाकून राज्यसूत्रें हातांत घेतलीं. संभाजीच्या वधापर्यंत हा नजरकैदेंतच होता. पुढें येसूबाईच्या सल्ल्यानें संभाजीचा मुलगा शाहू हा वयांत येईपर्यंत यानें कारभार पाहावा असें ठरलें; व त्याप्रमाणें याचें दुसरें मंचकारोहण ता. ९।२।१६८९ रोजीं झालें. या वेळीं मराठी राज्याची फार शोचनीय स्थिति झाली होती. खजिना रिकामा होता. सैन्यांत शिस्त नव्हती. अशा प्रसंगीं प्रल्हाद निराजी वगैरे मंडळींच्या सल्ल्यानें यानें आपलें आसन रायगडीं स्थिर न ठेवतां रायगड ते विशाळगडापर्यंत कोणत्याहि किल्ल्यांत ठेवावें व मराठी फौजेनें याच्यापासून जवळच असावें, असें ठरलें.

प्रल्हाद निराजीच्या सांगण्यावरून यानें निळोपंत पिंगळ्यास पेशवाई देऊन जिंजीचा किल्ला आपल्या बाजूचा करून घेतला. नंतर हा, प्रल्हाद निराजी, धनाजी जाधव, संताजी घोरपडे वगैरे २५ मंडळींसह कापडी व गोसावी वेषांत सोंध्यावरून जिंजीकडे जावयास निघाला. परंतु वाटेंत याचे पाय धुतांना पाहून मोगलांकडील एका हेरास यांचा संशय आला. हें बरोबरच्या मंडळींच्या ध्यानांत येतांच हा, संताजी व धनाजी ताबडतोब तेथून निघाले. लवकरच मोगलांनीं राहिलेल्या मंडळीस पकडलें व त्यांचा फार छळ केला.

पुढें पानसबळ मरण पावला तेव्हां संताजीस मुख्य सेनापति नेमलें. आणि प्रतिनिधीची एक जागा निर्माण करण्यांत येऊन त्या जागेस प्रल्हाद निराजीच योग्य आहे असें सर्वानुमतें ठरलें; व त्याप्रमाणें ती जागा त्यास देण्यांत आली; आणि जिंजीस यास राजा करण्यांत आलें. पण शाहूचा प्रतिनिधी म्हणून हा राज्य करीत असल्यानें राज्याभिषेक झाला नाहीं (रामचंद्र नीळकंठ अमात्य, शंकराजी नारायण सचीव, संताजी घोरपड, धनाजी जाधव, खंडो बल्लाळ चिटणीस पाहा).

जिंजीचा वेढा ७ वर्षें मधून मधून चालू होता. शेवटीं हा मोगलांच्या हातांत तुरी देऊन प्रथम वेलोरास व नंतर विशाळगडास आला. पुढें यानें पुष्कळ सैन्य घेऊन वऱ्हाड खानदेशांत चौथाई व सरदेशमुखी उकळण्यास प्रारंभ केला. जालना शहरची खंडणी वसूल करीत असतां झुल्फिकारखान अचानक याच्यावर चालून आला. त्यानें मोठ्या नेटानें याचा पाठलाग केला. परंतु हा कसा तरी सिंहगडास येऊन पोंहचला. पुढें नवज्वराचा विकार होऊन हा स. १७०० मध्यें सिंहगडावर वारला. याचा स्वभाव शांत असून याच्या अंगीं कोणताहि दुर्गुण नव्हता. हा धाडसी होता. यास याच्या अधिकाराची जाणीव होती. हा हें राज्य स्वतःचें न समजतां शाहूचेंच आहे असें समजत होता, व त्याप्रमाणें हा वागला. याच्या या स्वार्थत्यागी वृत्तीचा परिणाम भोवतालच्या लोकांवर फार झाला. यानंतर याचा पुत्र दुसरा शिवाजी गादीवर आला.

मोगलांशीं युद्ध चालू असल्यामुळें याच्या वेळीं प्रसंग बिकट होता अशा वेळीं वतन मागणारास जसें जमलें तसे कागद करून दिले. त्यांत परस्परविरुद्ध कागदहि कांहीं दिले गेले. तेव्हां दिलेलीं वतनपत्रें एखाद्याच्या वतनास बाध आणणारीं असतील किंवा दुसऱ्या कांहीं भानगडी असतील असें वाटल्यावरून यानें पुढीलप्रमाणें हुकूम काढला—(१९ फेब्रु. १६९९) " तरि चंदीच्या प्रसंगें व मसलतेच्या प्रसंगें व समजाविशी निमित्यें वतनाचे कागद ज्यानें जसे मागितले त्यास तसे दिल्हे. कांहीं प्रमाण नाहीं...नूतन वतन एकंदर कोणाकडे न चालविणें. कैलासवासी स्वामीचे वेळेस ज्याचें वतन चाललें असेल त्यास बिनाकुसूर चालविणें " (रा. खं. ३.१४४).

राजाराम (चिदंबरदास)—हा चिदंबर दीक्षित नामक एका महान् सिद्ध पुरुषाचा शिष्य. याचा जन्म गोदावरीतीरीं बाभुळगांवीं एका रघुवंशीय रजपूत क्षत्रियकुलांत झाला. बालपणीं द्वारकादास बैरागी, पुढें बाळेश्वर व शेवटीं चिदंबर दीक्षित असे तीन गुरु यानें केले. यानें लिहिलेल्या सहस्रावधि अभंगांशिवाय निजात्मबोध, ब्रह्मानंदलहरी, महानुभाव, ज्ञानगर्भ, ब्रह्मानुभव, सद्गुरूपदेश, गुरुगम्यठेव, अद्वैतसार हे याचे ग्रंथ बेळगांव येथील 'रामतत्त्वप्रकाश' छापखान्याच्या मालकांनीं प्रकाशित केले आहेत (महाराष्ट्रकविचरित्र, भा. ५, पृ. १४५–१५९).

राजाराम गोविंद—(स. १७५५) रघुनाथराव पेशव्यांचा हस्तक.

राजाराम दुंढीराजभट्ट—याची सप्तशतीवर दंशोद्धार नांवाची टीका आहे. यानें अनेक गद्यपद्यात्मक ग्रंथ केले आहेत, असें याला लावलेल्या विशेषणावरून दिसतें.

राजाराम पंडित—(स. १७७७–८१) हा चिमणाबापू भोसल्याचा कारभारी व ओरिसाचा कारभारी.

राजाराम प्रासादी—(ग्रंथकाल स. १८३४) हा रामदासी पंथांतील सिद्धेश्वरमहाराजांचा शिष्य. यानें महीपतीनंतरच्या शंभर वर्षांत महाराष्ट्रांत जे सत्पुरुष व कवि होऊन गेले त्यांचीं चरित्रें महीपतीच्या धर्तीवर लिहिलीं आहेत. याच्या या ग्रंथाचें नांव 'भक्तमंजरीमाला' असें असून याचे १०९ अध्याय व १३००० ओव्या आहेत (मं. चतुर्थ सं. १८३८, पा. ८१). यांतील माहिती जरी प्रयासानें मिळवलेली दिसते तथापि ती जपून चौकशीपूर्वक स्वीकारली पाहिजे असें बारीक तपासणीवरून मत होतें (मं. तृतीय सं. श. १८३७,पा. ११९). याचीं पदें प्रसिद्ध आहेत व तीं चांगलींहि आहेत.

राजुल क्षत्रप—(ख्रि. पू. १०० सुमार) राजुल हें नांव रजुबुल, राजुबुल, किंवा राजुवुल असें लिहिलेलें आढळतें. क्षत्रप हा शब्द संस्कृतोद्भव असल्यासारखा दिसत असला तरी तो मूळचा तसा नाहीं. क्षत्रप हा शब्द इराणी आहे; आणि त्याचा अर्थ देशाचा स्वामी किंवा जिल्ह्याचा अधिकारी असा आहे. पण हे अधिकारी पुढें स्वतंत्र झाले. तेव्हां हा शब्द त्यांचा वंशवाचक बनला. प्रथम क्षत्रपांचें राज्य पंजाब व मथुरा या प्रांतांवर होतें. पण पुढें राजपुताना, गुजराथ, काठेवाड, कच्छ व दक्षिण हिंदुस्थानांतील अनेक भागांवर पसरलें. क्षत्रपांपैकीं पहिल्या दोघांना उत्तरेकडचे क्षत्रप व बाकीच्यांना पश्चिमेकडील क्षत्रप असें म्हणत असत.

राजुल क्षत्रप हा उत्तरेकडील क्षत्रपांपैकीं पहिला असून याचें मथुरेवर राज्य होतें आणि दुसरा सोडास होय. हा प्रथम शक राजाचा अधिकारी म्हणून या प्रांतावर असावा. याच्या नाण्यांवर महाक्षत्रप अशी पदवी धारण केलेली आढळते. याच्या अग्रमहिषीचें नांव ' नदसी अकसा '. हिनें मथुरेंत एक बौद्ध स्तूप व मठ बांधला होता. त्यावरील लेखांत हिच्यासंबंधीं अधिक माहिती मिळते. स्तूपाच्या उत्सवाच्या वेळीं राजा व राणी यांचे अनेक संबंधी लोक उपस्थित होते. त्यांचीं नांवें तेथें सिंहाकृती चिऱ्यावर कोरलेलीं आढळतात. तेथेंच एक ' साऱ्या शकस्थानाच्या सन्मानाकरितां ' असें लिहिलेला लेख आढळतो. त्यावरून हे शक होते असें ठरतें (रा. इ. पा. १००).

राजेंद्र चोल—(स. १०१६–४३) हा पहिल्या राजराज चोलाचा मुलगा. याच्या वेळीं चोल साम्राज्य वैभवाच्या शिखरास पोंचलें.

यानें इंदिरदन (इंद्र–रथ), धर्मपाल, रणशूर (लात राजा), गोविंदचंद्र (बंगालचा), महीपाल (पाल घराण्यांतील महीपाल १ ला ?) वगैरे राजांशीं लढाया केल्या. यानें बनवासी, मण्णै व सिलोन वगैरे प्रांत जिंकले.

यानें गंगाकिनाऱ्यापर्यंत मुलूख जिंकून गंगैकोंड ही पदवी कारण केली; आणि त्रिचनापल्लीजवळ ' गंगैकोंडचोलपुरम् ' नांवाचें शहर वसविलें. यानें त्रिचनापल्लीजवळ सोळा फूट उंचीचा बंधारा घालून ' जयस्तंभतडाग ' बांधला. यास पंडित चोल म्हणत.

२. (कुलोत्तुंग (चोल) चालुक्य पाहा).

३. (स. १२४६–६७) हा चोलांपैकीं तिसऱ्या राजराजाचा पुत्र. याच्या वेळीं एक तोतया उत्पन्न होऊन त्यानें दंगल माजविली, तेव्हां सोमेश्वर होयसळानें यास मदत करून थोडी शान्तता स्थापन केली. परंतु चोल साम्राज्याचे तुकडे व्हावयाचे थांबले नाहींत. अनेक मांडलिक स्वतंत्र बनले. शेवटीं वरंगळच्या गणपति काकतीय राजानें याचें सर्व राज्य जिंकून घेतलें. त्यामुळें पेन्नार नदीच्या उत्तरेकडील सर्व चोल साम्राज्य नामशेष झालें. याच्यानंतर त्रिभुवन वीरदेव राजा झाला.

राजेंद्रदेव चोल—(स.१०५२–६३) हा पहिल्या राजाधिराज चोलाचा धाकटा भाऊ. हा त्यानंतर गादीवर आला. याची मुलगी मदुरान्तकी. याला परकेसरीवर्मन् ही पदवी होती.

राजोपाध्ये घराणें—हे भोसल्यांचे कुलोपाध्ये होत. हे देशस्थ ऋग्वेदी शाकल्यगोत्री ब्राह्मण. यांचें मूळ गांव आवीं (ता. श्रीगोंदे, जि. नगर). भोसल्यांचा वंश जेथें आहे, तेथें यांच्या शाखा दिसतात. शिवाजी महाराजांच्या घराण्याशीं संबंध असलेल्या पुरुषांचा वंशक्रम पुढीलप्रमाणें आहे. १ मल्हारभट–लक्ष्मणभट–मल्हारभट (स. १६७४–८९ सुमार)–मुद्गलभट (जन्म स. १६३१–मृत्यु स. १७३०)–रघुनाथराव (मृत्यु स. १७५९)–रामचंद्रराव (स. १८०८ सुमार)–रघुनाथराव–रामचंद्रराव. वरील लक्ष्मणाचा धाकटा मुलगा शामभट ऊर्फ सामराजापासून कोल्हापूरची शाखा सुरू झाली (सामराज पाहा).

२. रामेश्वरभट बिन नारायणभट–प्रभाकरभट (मृत्यु स. १६७२ सुमार)–बाळंभट (स. १६८७–१६९०)–रामेश्वरभट (स. १६८७–१७०९)–रघुनाथभट–धोंडभट ऊर्फ गोपाळभट–हैबतराव (स. १७६५ सुमार)–अमृतराव ऊर्फ दाजीबा (स. १८०८) कृष्णराव (प्रतापसिंहाबरोबर काशीस गेला).

३. रघुनाथराव (पंडितराव, स. १६७४–९०)- मोरेश्वर (पंडितराव स. १६८१) हे तंजावरपैकीं होत.

राज्ञिल प्रतिहार—हा मंदोरच्या हरिश्चंद्राचा पुत्र.

राज्ञिल—(स. ६२५) हा वज्रभटा(सत्याश्रया)-चा पुत्र. याचें राज्य अर्बुद देशावर म्हणजे अबूच्या पहाडाच्या आसपासच्या प्रदेशावर होतें. हा भीनपालच्या वर्मलात राजाचा सामंत होता. ही माहिती सिरोही राज्यांतील वसंतगडच्या शिलालेखावरून मिळते. हा शिलालेख वि. सं. ६८२ (स. ६२५) मधील आहे (एपि. इंडि. भा. ९, पृ. १९१–९२).

राज्यदेवी—बाणभट्टाची माता.

राज्यपाल—(स. ९००–२५सुमार) हा बंगाल्यां-तील पालघराण्यापैकीं नारायणपालाचा उत्तराधिकारी. याचा विवाह राष्ट्रकूटांपैकीं तुंग किंवा जगत्तुंग राजाची कन्या भाग्यवती नांवाच्या कन्येशीं झाला होता (म. यु. भा. २, पा. २१३).

२. (११०० सुमार) पालांच्या घराण्यांत रामपालाला या नांवाचा एक मुलगा होता. हा त्याच्या हयातींत राज्यकारभार पाहत असे. पण हा रामपालाच्या हयातीतच मेला (हि क्रा. मार्च १९२९).

राज्यपाल गाहडवाल—(स. ११७० सुमार) हा गोविंदचंद्र गाहडवालाचा पुत्र.

राज्यपाल प्रतिहार—(मृत्यु स. १०२०) हा रघुवंशी प्रतिहारांपैकीं विजयपालाचा पुत्र. गझनीच्या महमूदानें कनोजवर स्वारी केली. उत्बीनें आपल्या 'तारीख यामीनी' मध्यें पुढीलप्रमाणें लिहिलें आहे. 'मथुरा घेतल्यावर महमूद कनोजकडे वळला (स. १०१८). तेथील राजा जैपाल (राज्यपाल) याच्याजवळ अगदीं थोडी सेना होती. म्हणून हा गंगापार पळून गेला. महमूदानें सातहि किल्ले फोडले आणि जे लोक पळून गेले नव्हते त्यांची कत्तल केली (इलियट हिस्टरी ऑफ इंडिया, भा. २, पृ. ४५).

फिरिश्ता लिहितो—स. १०१८ मध्यें महमूद १०००० चुनंदा स्वार व वीस हजार पायदळासह कनोजवर आला. तेथील राजा कुंवरराय (हें नांव चूक आहे, राज्यपाल असें पाहिजे) मोठें राज्य आणि संपत्ति यांचा स्वामी होता. पण एकाएकीं स्वारी झाल्यामुळें सामना देणें किंवा सैन्य एकत्र करणें त्याला शक्य झालें नाहीं. त्यानें शत्रूच्या अफाट सैन्याला भिऊन तह केला व महमूदाचें स्वामित्व स्वीकारलें. महमूद तीन दिवस तेथें राहून मेरठकडे निघून गेला. स. १०२१ मध्यें महमूदाला खबर आली कीं मुसलमानांशीं तह केला व त्यांची सत्ता स्वीकारली म्हणून भोंवतालच्या राजांनीं याच्यावर हल्ला केला आहे. महमूद ताबडतोब निघाला, पण तो पोंचण्या-पूर्वीच कालिंजरचा राजा नंदराय (गंड चंदेल्ल) यानें कनोजच्या राजाला ठार केलें.' फिरश्ता कनोजच्या राजाचें नांव कुंवरराय लिहितो, पण त्याच्या पूर्वी सहाशें वर्षे उत्बी राय जैपाल असें राज्यपाल शब्दाचें अपभ्रष्ट रूप लिहितो. राज्यपालाला मारण्यांत विद्याधराबरोबर दुबकुंड येथील कच्छपघात (कच्छवाहा) सामंत अर्जुनहि होता. दुबकुंडाहून मिळालेल्या कच्छपघात (कच्छवाहा) वंशी सामंत विक्रमसिंहाच्या वेळीं वि. सं. ११४५ (स. १०८८) च्या शिलालेखांत त्याचा प्रपितामह अर्जुनच्या वर्णनांत लिहिलें आहे कीं, त्यानें विद्याधरदेवाच्या सेवेंत राहून मोठ्या युद्धांत राज्यपालाला ठार मारलें (इंडि. ॲंटि. भा. २, पृ. २३७).

राज्यवर्धन—(स. ६०५–खून स. ६०६) बैस-वंशांतील रजपुतांपैकीं प्रभाकरवर्धनाला यशोमतीचे ठिकाणीं झालेला पुत्र. हा प्रभाकरवर्धन मेला तेव्हां उत्तरेकडे हूणाशीं लढण्याकरितां गेला होता. हा त्या युद्धांत घायाळ झाला पण तशाहि स्थितींत विजय मिळवून परत आला. पण प्रेमळ पित्याच्या मृत्यूमुळें यास इतका खेद झाला कीं यानें सिंहासन स्वीकारण्याचें नाकारून भदन्त (बौद्ध साधु) होण्याचा विचार केला व आपला धाकटा भाऊ हर्षवर्धन याला राज्यावर बसविण्याचें मनांत आणलें. हर्षानेंहि भदंत होण्याची इच्छा प्रगट केली व राज्य स्वीकारण्याची अनिच्छा प्रदर्शित केली. याच वेळीं माळ-व्याच्या राजानें राज्यश्रीच्या नवऱ्याला म्हणजे ग्रहवर्म्याला ठार करून राज्यश्रीला शृंखलाबद्ध करून तुरुंगांत टाकल्याची बातमी याच्या कानावर आली. त्याबरोबर यानें भदन्त होण्याचा विचार सोडून देऊन दहा हजार स्वारांसह माळव्याच्या राजावर स्वारी केली. लढाईत विजय मिळवून त्याचे पुष्कळ हत्ती, घोडे, रत्न, अलंकार, छत्र, चामर, सिंहासन वगैरे राज्यचिन्हें लुटून आणलीं. तसेंच अन्तःपुरांतल्या अनेक सुंदर स्त्रिया, तसेंच माळ-व्यांतले अनेक राजे यांना कैद केलें. पण परत येतांना बंगालच्या नरेंद्रगुप्ता(शशांका)नें आपल्या महालांत नेऊन विश्वासघातानें यास ठार मारलें (हर्षचरित, उच्छ्वास ६, पृ. १८६). याचप्रमाणें हर्षवर्धनाच्या दानपत्रांत राज्य-वर्धनाचें बौद्ध होणें, देवगुप्त वगैरे राजांचा पराभव करणें, तसेंच विश्वासघातानें मृत्यु वगैरे गोष्टी आलेल्या आहेत

(एपि. इंडि. भा. ४, पृ. २१९). याच्या नंतर याचा धाकटा भाऊ हर्षवर्धन हा गादीवर आला.

२. बैसवंशांत आणखी एक राज्यवर्धन झाला आहे, पण त्याची विशेष माहिती नाहीं (बैसवंश पाहा).

राणूबाई जाधव— ही शिवाजीची मुलगी होती. हिच्या आईचें नांव सईबाई असून तिची ही दुसरी मुलगी. हीस जाधवांचे घरीं दिलें (शि. नि. पा.२२४).

राणूबाई ठोसर—श्रीसमर्थ रामदासांची माता.

राणेखान भाई—(मृत्यु स. १७९१) पानपतच्या युद्धांत पळ झाल्यावर जखमी झालेल्या महादजी शिंदे यांना यानें वांचविलें, व सुरक्षित दक्षिणेंत आणलें. हा भिस्ती होता. याचा हा उपकार महादजी जन्मभर विसरला नाहीं. याला तो भाई म्हणे आणि हाहि त्याला योग्य सल्लामसलत देई. नाना फडणीसासारखे महादजीपुढें कुंठित झाले म्हणजे याला मध्यस्थी घालीत. याचा पुत्र हसनखानानें योद्धा म्हणून नांव मिळविलें. यांचें घराणें शिंदेशाहींत नांदत आहे.

राणोजी करांडे—(स. १७६५-६६) हा रघूजी करांड्याचा पुतण्या. हा माधवराव पेशवे यांचे बाजूचा होता म्हणून यास जानोजी भोसल्यानें कैद केलें होतें.

राणोजी घोरपडे—(स. १६९९) हा संताजीचा पुत्र. हा धनाजी जाधव, वगैरेप्रमाणें मोंगलांना जेरीस आणणारा एक होता. याची पत्नी संतूबाई. याचा चुलत भाऊ हिंदुराव यानें साताऱ्याबाहेर इखलासखान व त्याचा पुत्र यांना ठार केलें.

२. (स. १७२३-८३) संताजीचा पुत्र पिराजी. त्या पिराजी कापशीकराचा हा पुत्र (मं. वा. इ. १८३६, पृ. ६०).

हा पेशव्यांच्या हुकमावरून कोल्हापूरकर संभाजीच्या मुलुखांत शिरला असतां शाहूनें (स. १७३० चे सुमारास) चिमाजी आपाला लिहिलें, ' संभाजी राजांची अमर्यादा केली. त्यांच्या मुलखांत राऊत पाठविले. ही गोष्ट बिलकूल उपयोगी नाहीं. पत्रदर्शनी फौज माघारी आणणें. नाहीं तर आम्ही त्यांचें साह्य करूं ' (ऐ. टि. १. २२).

राणोजी भोसले—(मृत्यु स. १७७३ सुमार) हा उमरावतीच्या बापूजी भोसल्याचा मुलगा. हा बाळाजी विश्वनाथाबरोबर दिल्लीस गेला असतां याचा भाऊ संताजी मारला गेला. तेव्हां यास सवाई संताजी अशी पदवी देण्यांत आली.

२. जिजाजी भोसले उमरावतीकराचा हा मुलगा.

राणोजी लोखंडे—(फत्तेसिंग भोसले पाहा).

राणोजी शिंदे—(मृत्यु स. १७४५) हा साताऱ्याजवळील कन्हेरखेडचा राहणारा. हा बाळाजी विश्वनाथाच्या पदरीं साधा शिपाई म्हणून होता. बाजीरावाच्या ब्रह्मणपुरच्या सुभेदाराशीं व माळव्यांतील दाऊदखानाशी झालेल्या लढायांत यानें नांव कमावलें (स. १७२४). फौजेच्या खर्चासाठीं यास माळव्याची अर्धा मोंदासा तोडून मिळाली व चौथाईवसुलीचे कामावर यास नेमलें. हा भोपाळच्या लढाईंत होता (स. १७३८). हा शूर, कर्तबगार व स्पष्टवक्ता होता (ऐ. टि. २. ३५).

राधाबाई पेशवे—(मृ. स. १७५३) बाळाजी विश्वनाथाची पत्नी. हिला बाजीराव व चिमाजी असे दोन मुलगे व भिऊबाई आणि अनुबाई अशा दोन मुली होत्या. ही राजकारणांतहि लक्ष घाली. हिचें वजन दरबारांतील सरदारांवर बरेंच होतें. हिला परराष्ट्रीय दरबारांत बराच मान होता, हें ही काशीयात्रेस जात असतां उदेपुरास हिचा जो आदरसत्कार झाला त्यावरून दिसून येतें (पे. द. ९. १३).

स. १७५१ त नानासाहेब पेशव्यांनीं हिची तुला रुपये घालून केली होती. ही स. १७५३ त मरण पावली.

राधाबाई भावे—ही रामदुर्गसंस्थानांतील नारायणरावाची बायको. स.१८२७ त हिचा नवरा मेल्यानंतर हिनें इंग्रजांच्या आग्रहास्तव नरगुंदकर 'हरिहर' नांवाच्या मुलास दत्तक घेतलें (स. १८५७).

राधाबाई माने—(स. १६९७) म्हसवडकर नागोजी मान्याची बायको. आपल्या भावास संताजीनें ठार केलें म्हणून सूड घेण्याच्या भावनेनें कारखाळ्याच्या रानांत हिनें संताजीशीं मारामारी केली व संताजी ठार झाला.

राधाबाई शिंदे—ही पद्मसिंग राऊळाची बहीण व महादजी शिंद्याची बायको.

राम—(खोलेश्वर पाहा).

२. (कविताकाल स. १६७४) एक हिंदी कवि. शृंगारसौरभ व हनुमन्नाटकाचा कर्ता.

राम आरविदु—(स. १५७७ सुमार) हा विजयनगरच्या तिरुमल्ल आरविदूचा तिसरा मुलगा. याचे पहिला श्रीरंग व दुसरा व्यंकट हे दोनहि भाऊ गादीवर बसले. हा कर्नाटकचा सुभेदार असे. पण बंडामुळें याची सत्ता दुबळी होती. यानें एकदां निजामशाहाचा पराभव केला होता, असें रामराजीयम्मध्यें म्हटलें आहे. याची पत्नी नरसिंगमा. याचे पुत्र दोन. दुसरा तिरुमल्ल व दुसरा श्रीरंग.

पण ते अल्पवयी असल्यामुळें याचा भाऊ व्यंकट कर्नाटकची व्यवस्था पाहूं लागला. हा स. १५७७ पर्यंत जिवंत होता (राजा ओडियर पाहा).

२. (स. १६१४-३०) विजयनगरच्या राजघराण्यापैकीं तालिकोट-युद्धानंतर पहिल्या व्यंकटपतीच्या मागून गादीवर आलेला राजा. हा आरविदु घराण्यांतील पहिल्या श्रीरंगाचा पुत्र. याच्या मातेचें नांव कृष्णमा. याला रंगप्पा नांवाचा एक भाऊ होता.

रामकृष्ण—विद्यारण्याच्या पंचदशीवरील टीकाकार.

२. (ग्रंथकाल स. १६८८ सुमार) एक ज्योतिषज्ञ. यानें गणितामृतलहरी व बीजप्रबोध हे दोन ग्रंथ व बीजप्रबोधावर टीका लिहिली. पिता लक्ष्मण. गुरु सोमनाथ. गांव पश्चिम घाटावरील जळपूर.

रामकृष्णभट्ट—(स. १६००) हा काशीच्या भट्ट घराण्यापैकीं नारायणभट्टाचा पुत्र. ग्रंथः—जीवत्पितृककर्तव्यनिर्णय, कोटिहोमादिपद्धति, अनंतव्रतोद्यापनप्रयोग, उत्सर्जनोपाकर्मप्रयोग, तत्त्वविचार, ज्योतिष्टोमपद्धति, मासिकश्राद्धनिर्णय, वास्तुशांतिप्रयोग, शिवलिंगप्रतिष्ठाविधि. निर्णयसिंधूकार कमलाकरभट्ट हे याचे पुत्र होत. याचा भाऊ शंकरभट्ट.

रामकृष्णभट्टाचार्य चक्रवर्ति—(स. १५६० सुमार) हा रघुनाथशिरोमणीचा शिष्य व पुत्र. ग्रंथः—गुणशिरोमणिप्रकाश, न्यायदीपिका.

रामकृष्णसूरि—संस्कृत भाषेंतील प्रभावतीप्रद्युम्न नाटकाचा कर्ता.

रामगुप्त—(स. ३८०) समुद्रगुप्ताचा मुलगा. चंद्रगुप्तापूर्वी हा गादीवर आला होता. कुशानावर यानें स्वारी केली असतां पराभूत होऊन शत्रूच्या अंतःपुरांत राणी पाठविण्याच्या अटीवर यास आपली सुटका करून घ्यावी लागली. चंद्रगुप्तहि बरोबर होताच. शेवटीं चंद्रगुप्तच स्त्रीवेषानें गेला आणि शत्रूचा फडशा पाडला. या रामगुप्ताचा शोध नवीन लावला आहे (जे. बी. ओ. आर. एस्. १. १४, पा. २२३).

रामचंद्र अनंत बडवे—(स. ८०० सुमार) हे प्रल्हाद शिवाजी बडवे यांचे पणतू होत. 'सुश्लोक वामनाचा, अभंगवाणी प्रसिद्ध तुकयाची। ओवी ज्ञानेशाची किंवा आर्या मयूरपंताची ॥' ही आर्या याची होय. यानें आपल्या चोवीस आर्यांत पंताच्या काव्याची पारख फार नामी केली आहे. हा विठोबादादा चातुर्मासे यांचा शिष्य असून त्यांजवरहि याचे दहा-बारा श्लोक आहेत. विठोबादादा चातुर्मासे हे मोरोपंताचे समवयस्क होते.

रामचंद्र कविभारती—(स. १०४५ सुमार) एक बंगाली ब्राह्मण. हा सिलोनच्या पराक्रमबाहूच्या आश्रयाला गेला, व तेथें हा बौद्ध झाला. यानें 'भक्तिशतक' काव्य संस्कृतांत लिहिलें. त्यांत यानें रामकृष्ण देवाप्रमाणें गौतमबुद्धाची भक्तिपूर्वक प्रार्थना केली आहे.

रामचंद्र गणेश कानडे—(मृत्यु स. १७८०) उत्तर पेशवाईंत हा एक प्रसिद्ध सेनापति व मुत्सद्दी होता. शाहूनें याला इनाम दिलें होतें. यानें हिंदुस्थानच्या सर्व भागांत मोहिमा केल्या होत्या. याचें लढाईचें शिक्षण सदाशिवभाऊच्या हाताखालीं झालें होतें. जानोजीच्या वरील थोरल्या माधवरावांच्या स्वारींत याच्यावर श्रीमंतांचा मुख्य भरंवसा होता. त्यानंतर उत्तरेच्या स्वारीचा सर्व अखत्यार याजकडेच दिला होता. रोहिले, रजपूत, जाठ वगैरेंची खोड यानें शिंदे होळकरांच्या मदतीनें चांगली मोडली.

इंग्रज व सुजा यांच्या तडाक्यांतून शहाअलम बादशाहास सोडवून दिल्लीची पातशाही पेशव्यांच्या हाताखालीं घालण्याचें काम यानेंच केलें. बिनीवाले व कानडे यांच्यांत तंटा झाला तेव्हां श्रीमंतांनीं पंतास दक्षिणेंत परत बोलाविलें. परंतु हा अपमान यास सहन न होऊन यानें संन्यास धारण करण्याचा बेत केला, परंतु श्रीमंतांनीं याची समजूत घातली, (विसाजी कृष्ण बिनीवाले पाहा).

यानंतर बारभाईंच्या कामांत यानें बरींच वर्षें कामगिरी केली. शेवटीं खंडाळ्याच्या लढाईंत इंग्रजांशीं लढत असतां पंतांनीं धारातीर्थीं देह ठेविला (१२।१२।१७८०). यांचा पुत्र माधवराव यानेंहि मराठेशाहींत बरींच कामगिरी केली. पंताचा वाडा पुण्यास शनवारवाड्याच्या उत्तरेस नदीच्या काठीं होता. या वाड्याचें नक्षीकाम फारच सुंदर होतें. स. १९२४ सालीं शनवारवाड्यापुढें नवा पूल झाला तेव्हां हा वाडा पाडण्यांत आला.

हा कोंकणस्थ ब्राह्मण. गोत्र शांडिल्य. याचे वडील शाहू छत्रपतीचे वेळीं उदयास आले. यांचेकडे जरीपटका संभाळण्याचें काम असे. याचे वडील गणेश केशव यांस श्रीशाहूनें राज्याभिषेक शक ५१ क्रोधीसंवत्सरे फाल्गुन शु. ६ रोजीं सोनोरी येथें ६० बिघे जमीन दिली. पुढें यांनीं सातवणें खुर्द, ब्रह्मवाकडी (ता. पाथ्री, जि. परभणी) व भिलवडा (ता. पाटोदे, जि. बीड) हीं तीन गांवें जहागीर मिळवलीं व शिवाय पंढरपूर तालुक्यांतील गोपाळपूर येथील जमिनी, जमखिंडी संस्थानापैकीं मौजे मुढवी येथील इनाम जमीन १०० एकर व नेवासें जि. नगरपैकीं माळवडगांव येथील पाटिलकी येणेंप्रमाणें वतन

संपादन केलें. याचे चिरंजीव माधवराव यांनींहि चांगला लौकिक मिळवला. सध्यां याचे वंशज सातवणें, सवंदगांव (जि. औरंगाबाद) इकडे राहतात (मं. वार्षिक श. १८३७, पा. १४१).

रामचंद्र जाधव--(खून स. १७६९) चंद्रसेन जाधवाचा पुत्र. स. १७६१ मधल्या स्वारींत निजामानें देवळें जाळलीं, तेव्हां हा पेशव्यास मिळाला. तेव्हां सेनापतिपद व गुजराथ यास देऊं केलीं. पण ती न दिल्यानें यानें रघुनाथरावावर मारेकरी घातले. तेव्हां यास दौलताबादच्या किल्ल्यावर ठेवलें. तेथून सुटल्यावर हा मोगलांकडे गेला. शेवटीं हा निजामाकडून मारला गेला.

रामचंद्र दैवज्ञ—(स. १८२७) छंदोमंजरीचा कर्ता (मं. वा. इ, १८३६ ले. ६६).

रामचंद्र नाईक परांजपे--(स. १७७६) रत्नागिरीचा किल्लेदार व भाऊसाहेबांच्या तोतयाचा पुरस्कर्ता.

रामचंद्र नीळकंठ अमात्य—(जन्म स. १६५० -मृत्यु स. १७३३ सुमार) हा निळो सोनदेव बहुतकराचा मुलगा व शिवाजीचे मुख्य प्रधान मोरोपंत पिंगळे यांचा जांवई.

निळो सोनदेव शिवाजीचा अमात्य असतां स. १६७२ मध्यें मृत्यु पावला आणि त्याचे जागीं याची नेमणूक झाली. तेव्हांपासून हा राजकारणांत वावरूं लागला. अण्णाजी दत्तोनंतर सचीवपद याच्याकडे आल्याचाहि निर्देश आहे (स. प. पृ. १८६).

यावरून हा शिवाजीच्या हाताखालीं तयार झालेल्या मंडळींपैकीं होय. संभाजीच्या मृत्यूमुळें उत्पन्न झालेल्या बिकट परिस्थितींत यांचें कर्तृत्व प्रगट झालें आणि याच्या कर्तबगारीनेंच मराठी राज्याला पुनः जोरदारपणा प्राप्त झाला.

संभाजी मारला गेला, फितुरीमुळें रायगड, येसूबाई आणि बाल शाहू, यांसुद्धां शत्रूच्या ताब्यांत गेला, राजारामालाहि सुरक्षितपणाकरितां महाराष्ट्र सोडून कर्नाटकांत जिंजीस जावें लागलें, तेव्हां औरंगजेबासारख्या बादशहापासून मराठेशाहीचें संरक्षण करण्याचें काम या पुरुषानें यशस्वीपणें पार पाडलें. महाराष्ट्रांत सैन्य उभारून बादशाहाला यशस्वीपणें तोंड दिलेंच. शिवाय जिंजीस सात वर्षें वेढा पडला असतां इकडून सैन्य पाठवून आणि त्यांची रसद तोडण्याचा प्रयत्न करून आणि शेवटीं तर राजारामास वेढ्यांतून सुरक्षित बाहेर पळवून यानें मोगलांवर मात केली. राजा व खजिना हे दोन्ही जागेवर नसतां महाराष्ट्र व कर्नाटक या दोन प्रांतांत सारखी युद्धाची धुमश्चक्री चालू ठेवून आपला लष्करी पत्रव्यवहार बिनचूक चालवणें केवढ्या चातुर्याचें काम आहे!

राजाराम जिंजीस पोंचल्यावर अष्टप्रधानांच्या नेमणुका झाल्या; त्यांत हणमंत्याला त्याच्या विशेष कामगिरीमुळें अमात्यपद द्यावें लागलें. तेव्हां याला वैषम्य वाटूं नये म्हणून सर्वाधिकारी अशा अर्थाचें हुकमतपन्हां हें पद निर्माण करून त्याचीं वस्त्रें जिंजीहून विशाळगडावर याच्याकडे पाठविण्यांत आलीं (स. १६९१). पुढें हणमंते वारला, तेव्हां दोनहि पदें याच्याकडे आलीं (स. १६९७).

यानें आपल्या अधिकाराचा नेकीनें उपयोग करून लोक राजी राखले, खजिन्यांत तूट पडूं दिली नाहीं आणि मोगलांना त्रस्त करून सोडलें. केसो त्रिमल पिंगळ्यासारखीं कर्तबगार माणसें कर्नाटकांतून एक लाख होन व फौज महाराष्ट्राला पुरवीत होते आणि इकडूनहि तिकडे लाखों सैनिक दाखल झाले (रा. खं. ३४७-३४८). असा राष्ट्रीयदृष्ट्या मोठ्या वैभवाचा काळ या वेळीं यानें निर्माण केला (स. १६९०).

संभाजीच्या वधानें लोक चिडले होते, शाहूच्या कैदेनें लोकांना चेव आला होता; आणि संताजी-धनाजीच्या पराक्रमानें लोकांत आत्मविश्वास उत्पन्न झाला होता. त्यांतच यानें वतनाचें आमिष लोकांच्या पुढें केलें. तेव्हां मराठा खडबडून रोज नवा पराक्रम करूं लागला आणि जिंजीहून वतनेंहि सुटूं लागलीं. तेव्हां 'सनदेंत किंवा फर्मानांत असेल त्याच्या निमे हिश्शानें द्यावें' (स. १७००). असा निर्णय करावा लागला (रा. खं. ८. ५२). राजारामाच्या मृत्यूमुळें उत्पन्न झालेल्या अडचणींसहि यानें मोठ्या धिमेपणानें तोंड दिलें.

राजारामानें वास्तविक संभाजी-पुत्र शाहू राज्याचा मालक म्हणून स्वतःला राज्याभिषेक करून घेतला नव्हता. तसेंच पुढें चालवावें, असें याचें मत होतें. पण ताराबाईचा आग्रह आणि दुहीची भीति यांमुळें यानें ताराबाईचा पुत्र शिवाजी याची मुंज करून त्याला राज्याभिषेक करविला.

पण असे मताविरुद्ध कांहीं प्रकार घडले कीं, विरुद्ध वागावयास सुरुवात करण्याचा याचा स्वभाव नव्हता. प्रत्यक्ष औरंगजेबानें कपटविद्येचे प्रयोग करूनहि आपसांत भांडणें लावण्याचा प्रयत्न केला. पण हे सर्व डाव या राजकारणी पुरुषाच्या परिचित होतें.

राजारामाच्या मृत्यूची हकीगत यानें शाहूस कळविली तेव्हां त्यानें यास लिहिलें कीं, 'राजारामाचे ठिकाणीं आम्हांस तुम्ही आहां. त्यांनीं राज्य रक्षिलें तें आपण रक्षावें.'

औरंगजेबाच्या मृत्यूनंतर शाहू आला तेव्हां त्याचें राज्य त्यास द्यावें व दुहीचा प्रादुर्भाव होऊं देऊं नये असें यांचें मत दिसतें. पण युद्धाचाच प्रसंग आला तेव्हां यानें ताराबाईचा पक्ष सोडला नाहीं. पण इतरांनीं ताराबाईला सोडल्यामुळें शाहूची सत्ता महाराष्ट्रांत स्थापन झाली. आणि ताराबाई व हा बाजूला पडले. पुढें ताराबाईची सवत राजसबाईनें आपला मुलगा संभाजीला गादीवर बसवून ताराबाई व शिवाजी यांस अटकेंत ठेवलें (स. १७१४). तेव्हां संभाजीचा हा तांबेदार झाला. याचें शेवटलें राजकारणी काम संभाजीला उद्देशून लिहिलेलें राजनीतीचें आज्ञापत्र होय (स. १७१६ नवं. १९). यानंतर मात्र हा राजकारणांतून निवृत्त होऊन संन्यास घेऊन अलीबागेच्या उत्तरेस श्रीकनकेश्वर येथें शेवटपर्यंत राहिला. तेथें कान्होजी आंगरे याची व्यवस्था करीत असे (रा. खं. ८. १५२). हे स. १७३०-३३ च्या दरम्यान मृत्यु पावले असें दिसतें. यांना भगवंतराव, मोरेश्वर व शिवराम असे तीन पुत्र होते (अमात्यांची वंशावळ पाहा).

हे एक दोन वेळांखेरीज प्रत्यक्ष युद्धावर गेल्याचें दिसत नाहीं. यांचा 'राजनीति' किंवा 'आज्ञापत्र' हा ग्रंथ यांच्या राजनीतिनैपुण्याची व दूरदर्शीपणाची आठवण चिरकाल टिकविल.

रामचंद्र पंडित—(स. १८१७) यानें माध्यंदिन शाखेच्या ईशावास्य उपनिषदावर 'ईशावास्य रहस्यविवृत्ति' नांवाची टीका लिहिली आहे. हा कृष्णात्रेय गोत्रांतील असून याच्या बापाचें नांव सिद्धराज (सिद्धेश्वर). वरील टीका यानें शके १७३९ मध्यें लिहिली.

२. (स. १८२४) 'वृत्ताभिराम' नांवाच्या संस्कृत ग्रंथाचा कर्ता. याचें नांव बाबामहाराज. गांव नरसिंगपूर.

रामचंद्रपंत भानु—श्रीमंत बाळाजी विश्वनाथ पेशवे यांचा फडणीस.

रामचंद्र बाबाजी महाडकर—हा प्रभु जातीचा असून कोल्हापूरचा सुमंत होता. शंभु छत्रपतीनें यास हल्याळ परगणा इनाम करून दिला (म. रि. म. १, पा. ४३३).

रामचंद्रबाबा शेणवी—(मृत्यु स. १७५४ ऑक्टो. ४) याच्या वडिलांचें नांव मल्हारराव असून, हा सावंतवाडी संस्थानांतील आखली गांवचा कुलकर्णी होता. एकदां गांवच्या वसुलाचा सरकारांत भरणा न झाल्यानें हा घर सोडून साताऱ्यास पळून आला. तेथें यानें राजगुरु कचेश्वर ओतूरकर यांचे येथें नोकरी धरली. पुढें त्यांच्या शिफारसीवरून पेशव्यांनीं याला आपल्या पदरीं ठेविलें.

पुढें हा या जागीं उत्तम मुत्सद्दी म्हणून लवकरच प्रसिद्धीस आला. राज्यव्यवस्था ठरविल्यानंतर थोरल्या बाजीरावास याचा फार उपयोग झाला. यानें पेशवे, शिंदे, होळकर व पवार यांमध्यें माळव्याची वांटणी मोठ्या कुशलतेनें केली. याच्याजवळच नानासाहेब व भाऊसाहेब यांचें राज्यकारभाराचें शिक्षण झालें. पेशव्यांनीं याला पुढें राणोजी शिंद्यांच्या दिवाणगिरीची जागा दिली. तेथें बाबानें "आपली तुंबडी चांगलीच भरून घेतली. राणोजीस अखेर पावेतो पैशाची जी टंचाई भासत होती ती कांहीं अंशीं याच कारणानें" (डफ). परंतु पुढें जयाप्पाच्या कारकीर्दीतहि दिवाणगिरी आपणांसच द्यावी असें यानें पेशव्यास कळविलें. परंतु जयपुरच्या गादीसंबंधींच्या तंट्यांत याचें वर्तन जयाप्पास पसंत न पडल्यामुळें जयाप्पा व हा यांचें बरें नव्हतें; व जयाप्पाचा ओढा मल्हाररावाकडे होता म्हणून त्यानें याला काढलें. तेव्हां हा पुढें पेशव्यांचा द्वेष करूं लागला. भाऊसाहेबानें ३६ लाख रुपये घेऊन यास आपला दिवाण नेमिलें. स. १७५० त रामराजा व पेशवे यांच्यांतील सांगोल्याचा करार याच्या मार्फतच ठरला.

बाबानें जमीनमहसूल व दप्तर या खात्यांत बऱ्याच सुधारणा केल्या होत्या. याला मराठी राज्याच्या हिशोबाचें ज्ञान उत्कृष्ट होतें. नानासाहेब नेहमीं बाबाच्याच सल्ल्यानें अनेक बाबतींत निकाल देत असत.

सावंतवाडी संस्थानचा तंटा याच्याच वतीनें पेशव्यांनीं मोडला. पेशव्यांचें कर्ज वारण्याची युक्ति म्हणून मोठमोठ्या सरदारांवर पट्टी बसविण्याची सूचना बाबाचीच होय. हा स्वभावानें फार तापट होता. नवज्वर होऊन ता. ४-१०-१७५४ रोजीं हा पुण्यास वारला. याची स्त्री द्वारकाबाई सती गेली. मरणसमयीं याच्याजवळ पुष्कळ संपत्ति होती. यानें पुष्कळ दानधर्म केला. यास सदाशिव नामक दत्तकपुत्र होता.

रामचंद्र बाळकृष्ण बेकार—(स. १६४५) प्रदोषव्रतमाहात्म्य ग्रंथाचा कर्ता. कपिलगोत्री ब्राह्मण.

रामचंद्रभट्ट—(स. १५००-१५४०) हा रेवाच्या

वीरसिंह देवाचा समकालीन. ग्रंथ–राधाचरित्र, रोमावली-शतक व रसिकरंजन.

२. कृत्यारत्नावली नांवाच्या संस्कृत नाटकाचा कर्ता.

रामचंद्र महादेव जोशी चासकर—हा थो. बाजीराव पेशव्याचा मेहुणा.

रामचंद्र मुमुक्षु—यानें 'पुण्यश्रवणकथाकोष' नांवाचा ऐतिहासिक दृष्ट्या फार महत्त्वाचा ग्रंथ केला आहे. या ग्रंथाचें श्रीनाथूराम प्रेमी यांनीं हिंदींत भाषांतर केलें आहे. हा ग्रंथ जैनधर्मीयांचा आहे.

रामचंद्र वाघ—(स. १८०३–२९) हा प्रथम दुसऱ्या रघूजी भोंसल्याचे कारकीर्दीत पुढें आला. स. १८०३ सालीं दुसऱ्या इंग्रज-मराठा युद्धांत रघूजीतर्फे हा हजर होता. रामचंद्र वाघाचें अप्पासाहेबांशीं बरेंच मेतकूट होतें व त्यांचीं कारस्थानें नेहमीं चालत. रघूजीसहि ही गोष्ट माहित होती, पण तो बाहेरून कांहीं दिसूं देत नसे.

हा अप्पासाहेबांच्या मुख्य सल्लागारांपैकीं एक होता. पुढें अप्पासाहेबांचे इंग्रजांशीं झालेल्या युद्धांत हा अप्पासाहेबांकडून हजर होता, त्याचप्रमाणें १८१७ सालीं सक्करदऱ्याचे लढाईंतहि हा हजर होता.

स. १८१८ त इंग्रजांनीं अप्पासाहेबांस कैद केल्यावर त्यांनीं यासहि कैद केलें व प्रयागास पाठवलें. परंतु यानें रेसिडेंटास पत्र लिहून अप्पासाहेबांचे कटांत आपला कांहीं संबंध नाहीं असें कळविलें. यास यानंतर (१८२४ नंतर) सोडून दिलें असावें असें दिसतें. कारण स. १८२९ मध्यें हा जबलपुरास राहत असतांना यास नर्मदा–विभागांतून बाहेर काढून दिल्याबद्दल पत्रव्यवहार आढळतो.

सक्करदऱ्याचे लढाईंत रामचंद्र वाघ मनापासून लढला व शेवटपर्यंत इंग्रजांस शरण न जातां यानें आपणांवर संकट ओढून घेतलें. परंतु सीताबर्डीचे लढाईंत यानें कुचराई केली. हा मनापासून लढला असता तर सीताबर्डीचा परिणाम कदाचित् तात्पुरता तरी निराळाच झाला असता.

रामचंद्र वाघेल—(स. १५५५–९२) हा वीरभानु वाघेलाचा पुत्र. याच्या पदरीं फार विद्वान् होते. प्रथम तानसेन गवई याच्याच दरबारीं होता. याला रामनृपति असेंहि म्हणतात.

रामचंद्र संगम—(स. १४०७–१६) पहिल्या देवराय संगमाचा पुत्र. राजधानी उदयगिरी.

रामचंद्र सावंत—(स. १७३७–५५) हा फोंड सावंताचा नातू होय.

याचा सर्व कारभार याचा महापराक्रमी व कर्तबगार चुलता जयराम हा पाहत असे. पण पुढें चुलत्यापुतण्यांत भांडणें लागलीं. त्याचा फायदा पोर्तुगीजांनीं घेतला. याच्यानंतर याचा पुत्र खेम सावंत गादीवर आला.

२. (स. १८०३–८) हा तिसऱ्या खेमसावंताचा पुत्र.

रामचंद्राचार्य—प्रक्रियाकौमुदीचा कर्ता.

रामजी पाटील—(स. १७८२–१८००) महादजी व दौलतराव शिंदे यांचा एक वकील. पुढें हा नानास फितुर झाला.

रामजोशी—(स. १७६२–१८१२) पेशवाईच्या शेवटच्या कालांतील पोवाडे व लावण्या करणारा प्रसिद्ध शाहीर. हा यजुर्वेदी ब्राह्मण असून सोलापूरचा राहणारा. याच्या वडील भावाचें नांव मुद्गल होतें, व तो नांवाजलेला शास्त्री व पुराणिक होता. याच्या बापाचें नांव जगन्नाथ. याचें उपनांव तासे. गोत्र वत्स, सूत्र कात्यायन, शाखा वाजसेनेय. हा प्रथम पंढरपुरांतील धर्मसिंधुकार काशीनाथ बाबा पाध्ये या गृहस्थांकडे संस्कृत शिकण्यास गेला; परंतु याला लावण्या व तमाशे पाहण्याचा फार नाद आहे, असें कळल्यावर त्यांचें व याचें न पटून हा तेथून निघाला व कर्नाटक प्रांतीं गेला. तेथें यानें कानडी भाषेचा अभ्यास केला, व संस्कृतहि शिकला, व फिरून पहिल्या गुरूकडे आला. तेथें यानें गुरूशीं संस्कृतांत वाद करून आपली ओळख करून दिली. तेव्हां गुरूनें याची पाठ थोपटली. पुढें । सोलापुरास येऊन कांहीं दिवस पुराण सांगत असे. तेथें हा आपल्या विद्वत्तेनें सर्व लोकांत प्रसिद्ध झाला. याच्या घरापुढें एक मठ होता. तेथील मठाधिकारी शुभराय महाराज याचा फार तिरस्कार करी. तेव्हां एकदां हा मठापुढें कीर्तन करीत असतां यानें त्याच जागेवर 'भला जन्म हा तुला लाधला। हटातटानें पटा रंगवुनि जटा धरिशि कां शिरी । मठाची उठाठेव कां तरी ।। ' ही प्रसिद्ध लावणी ताबडतोब रचून म्हटली; व तेथील मठाधिकाऱ्याला लाजावयास लाविलें. याला कीर्तन करण्याचा व पोवाडे व लावण्या रचण्याचा नाद असे. कविवर्य मोरोपंत व हा या दोघांचा फार स्नेह होता. मोरोपंत याला आपल्या आर्या दाखवीत असत व हा त्यांच्या आर्या कीर्तनांत उपयोगांत आणी, व त्यामुळेंच त्या सर्वतोमुखीं आहेत. हा लावण्या रचीत व तमाशे करीत असे म्हणून याला वाळीत टाकण्याचा कांहीं लोकांनीं प्रयत्न केला; व याच्यावर हा संध्या करीत नाहीं व चिमा नांवाच्या नायकिणीशीं उघड व्यवहार ठेवितो असे

आरोप केले होते. मरण्याच्या अगोदर यानें महाराष्ट्रभर कथाकीर्तनें केलीं, व शेवटीं, पुण्यास येऊन राहिला. यानें पंढरपूरवर्णन, तुळजापूरवर्णन, गिरीच्या व्यंकटेशाचें वर्णन, पुणेंवर्णन, व शनवारवाड्याचें वर्णन वगैरे लावण्या रचिल्या.

तमासगीर व कीर्तनकार या दोनहि नात्यांनीं पेशवाईंत गाजलेल्या शाहीरांत याची गणना होते. याचें मूळ उपनांव तासे होतें, परंतु याला मिळालेल्या वृत्तीवरून जोशी हें पडलें. हा फार उधळेपणानें वागे, म्हणून यास नेहमीं पैशाची याचना करण्याचा प्रसंग येई. हा मद्यहि पीत असे. याच्या लावण्या कथेकऱ्यांनीं म्हणण्याची पद्धत ठेवल्यानें व सरसहि असल्यानें याची ख्याति अद्यापिहि टिकून आहे. हा पुण्यास मरण पावला.

रामदास—(स. १६०८–८२) महाराष्ट्रांत नवें युग उत्पन्न करणारे सत्पुरुष. यांचा जन्म शके १५३० मध्यें रामनवमीस रामजन्माच्या वेळींच झाला. हे निजामहद्दीतील जांबगांवीं कुलकर्ण करणाऱ्या सूर्याजीपंत ठोसरांचे चिरंजीव. यांचें नांव नारायण. मातेचें नांव राणूबाई. यांना गंगाधरपंत नांवाचे एक वडील बंधु होते. तेच श्रेष्ठ किंवा रामीरामदास या नांवानें प्रसिद्ध आहेत. वडील सातव्या वर्षी वारल्यानें यांचें उपनयन श्रेष्ठांनींच केलें. हे माध्वसांप्रदायसंबद्ध देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण असल्यानें कर्मठपणा आणि करारीपणा उपजतच यांच्या अंगीं बाणलेला होता.

बाराव्या वर्षीं भाचीशीं लग्न ठरलें, पण 'सुमूर्ते सावधान' म्हणतांच लग्नमंडपांतून यांनीं पलायन केलें. श्रेष्ठांना यांनीं मंत्र मागितला असतां त्यांनीं तो देण्याचें नाकारलें म्हणून हे नाशिकजवळ टाकळीस निघून गेले, अशी दुसरी एक आख्यायिका आहे. टाकळीस यांनीं बारा वर्षें तीव्र तपश्चर्या केली. दुपारपर्यंत गायत्रीपुरश्चरण व रामनामजप करावा, दुपारीं मधुकरी सेवन करावी आणि सायंकाळीं कथापुराण श्रवण करावें, असा क्रम ठेवून यांनीं साक्षात्कार संपादन केला. श्रीराम हेच यांचे गुरु होत. पुढील बारा वर्षें तीर्थयात्रेंत घालवून सर्व भरतखंड अवलोकन केलें. याचें थोडें वर्णन यांच्या 'तीर्थावळी' या प्रकरणांत यांनींच लिहिलेलें मिळतें (विविधविषय खं. २).

पुढें पैठणास आले असतां वृद्ध मातोश्रींची अवस्था कळली तेव्हां हे तिच्या दर्शनास गेले. गोदावरीतीरापेक्षां कृष्णातीर राहण्यास यांनीं पसंत केला. आणि आपल्या धर्मप्रचाराच्या व लोकजागृतीच्या कार्यास यांनीं सुरुवात केली.

प्रथम मसूरला मारुतीची स्थापना करून उत्सवास सुरुवात केली आणि आंगापूरच्या डोहांत सांपडलेल्या श्रीरामाची चाफळास स्थापना केली. आप्तइष्टांचीं बुद्धिमान् मुलें जवळ करून त्यांना युक्तिबुद्धीच्या गोष्टी सांगून समुदाय वाढविण्यास प्रारंभ झाला. 'श्रीराम जयराम जयजय राम' या तेरा अक्षरी मंत्राचा उपदेश करून जागोजाग शिष्य पेरण्यास सुरुवात केली. या मंत्राचा तेरा कोटी जप केल्यास देवाचें दर्शन होईल असें यांनीं अभिवचन दिलें आहे. याच वेळीं चाफळनजीक शिंगणगांवीं यांनीं शिवाजीला अनुग्रह दिला (स. १६४९). हीच शिवाजीमहाराजांची व यांची पहिली भेट होय. पण पहिली भेट पुढें स. १६७२ (श. १५९४) सालीं झाली असें म्हणणारा एक पक्ष आहे.

याच वेळीं यांचा शिष्यसमुदाय विशेष वाढलेला दिसतो. यांच्या राजकारणी शिष्यांत श्रीशिवराय, बाळाजी आवजी चिटणीस, प्रल्हाद निराजी, नीळो सोनदेव, रामचंद्र नीळकंठ इत्यादि शिष्य प्रमुख होत. धर्मकारणी शिष्यांत उद्धव, कल्याण, दिवाकर, वासुदेव, स्वानुभवदिनकरकर्ते दिनकर, भीम, वेणु व अक्का या प्रमुख होत. यांनीं गुप्तरूपें अगणित शिष्य केले होते, असें कल्याण समर्थप्रतापांत म्हणतात.

शिवाजीनें रामदासांना करून दिलेली एक सनद उपलब्ध आहे (स. १६७८). त्या सनदेंत चाफळास श्रीरामाची स्थापना केल्यापासूनचा वृत्तांत थोडक्यांत दिला आहे. त्याचा सारांश–१ चाफळची स्थापना, २ राजकारण व धर्मस्थापनेचा उपदेश, ३ संपादलेल्या राज्याचें रामदासचरणीं समर्पण, ४ राजकारणाचा पुनः उपदेश, ५ साम्राज्यप्राप्तीनंतर चाफळास इनाम. यावरून या दोघांचा संबंध पुष्कळ जुना ठरतो. आणि राजकारणाशीं यांचा असणारा प्रत्यक्ष संबंध नाकारतां येत नाहीं.

प्रतापगडच्या तुळजा भवानीची स्थापना यांच्या हस्तें झाली (स. १६६१-शके १५८३). पुढें हे सज्जनगडावर राहूं लागले आणि शिवाजी व संभाजी हे यांच्या सान्निध्यांत तेथेंच येऊन राहिले होते. शेवटीं हे तेथेंच समाधिस्थ झाले. सज्जनगडावरील यांची समाधि यांच्या दहनस्थानीं बांधली आहे. यांच्या अस्थि पुढें काशीस पाठविण्यांत आल्या.

हे अत्यंत विरक्त होते आणि कडक वैराग्याचा यांनीं उपदेश केला आहे. तथापि यांचें वाङ्मय अत्यंत स्फूर्तिप्रद आहे. परमार्थ व व्यवहार यांची सांगड यांच्यापाशीं उत्कृष्ट दिसते. सामाजिक दोषांवर यांनीं केलेली झणझणीत

टीका आजहि ताजी आहे. व्यक्ति किंवा समाज यांचा उद्धार करण्याकरितां अशाच थोर व्यक्ति निर्माण व्हाव्या लागतात. श्रीरामचंद्राचें आदर्श चारित्र्य आणि मारुतीची उदात्त तत्त्वनिष्ठा यांचा निष्ठेनें प्रचार करून यांनीं नवराष्ट्र निर्माण केलें आणि अव्वल मराठेशाहींत महाराष्ट्रांत सत्ययुगाचा भास उत्पन्न केला.

यांच्या वाङ्मयांत दासबोधाला अग्रस्थान आहे. रामदासाच्या वेळेसच या ग्रंथाच्या तीन वाढविलेल्या आवृत्त्या निघाल्या असाव्या असें वाटतें. एकवीस समासी जुना दासबोध आपणांस पाहावयास मिळतो. नंतर सत्तर समासांत दासबोध वाढविण्याची कल्पना सुचलेली दिसते. नंतर वाढवीत वाढवीत हल्लींचा दासबोध झाला. देव व पांगारकर यांनीं कल्याणस्वामी व त्यांचे बंधु दत्तात्रेय (शिरगांवमठ) यांनीं लिहिलेल्या प्रती शोधून काढल्या आहेत. श्री. शंकर श्रीकृष्ण देवांनीं तर सर्व जन्म समर्थसेवेंत खर्च करून त्यांचें वाङ्मय धुळें येथें समर्थ वासुदेवता-मंदिर उभारून लोकांपुढें ठेवलें आहे व जांब येथें समर्थ-मंदिर उभारलें आहे. मनाचे श्लोक, पंचसमासी, मानपंचक, निर्गुणध्यान, जनस्वभावगोसावी, करुणाष्टकें, दासबोधाचा सोलीव अर्थ, यांशिवाय यांचीं अनेक स्फुट प्रकरणें आहेत. त्यांत मनाचे श्लोक, भीमरूपी स्तोत्र व 'सुखकर्ता दुःखहर्ता' ही आरती हीं घरोघर म्हटलीं जातात.

२. (स.१५८१) नानकाच्या गादीवरील अमरदासाचा शिष्य. यानें आपल्या बायकोच्या (बिबीभानी) नांवें असलेल्या जमिनींत एक मोठा तलाव खोदून त्यास अमृतसर हें नांव दिलें. याजवर बादशहाची (अकबराची) विशेष मर्जी होती. हा शीखांचा चौथा गुरु होय.

३. 'रामसेतुप्रदीप' या संस्कृत काव्याचा कर्ता.

४. 'स्वरोदय' ग्रंथाचा कर्ता (मं. १८३६ वा.इ.५२).

रामदासपंत—(मृत्यु ता. ७.४.१७५२) शाहूच्या पश्चात् नानासाहेब पेशव्यानें निजामशाही नाहींशी करण्याचें ठरविलें. या वेळेस हा विलक्षण मनुष्य निजामशाहींत कारभारावर होता. नानासाहेबासारख्या चाणाक्ष व राजकारणकुशल मुत्सद्यालासुद्धां यानें कित्येक दिवस नुसत्या थापांवर झुलविलें. यावरूनच याच्या धूर्ततेची परीक्षा होते. हा शिकाकोलचा ब्राह्मण असून प्रथम नासिरजंगाजवळ होता. डुप्लेच्या नासिरजंगाला नाहींसें करण्याच्या कटांत हा सामील होऊन यानें त्याचा विश्वासघात केला. नंतर हा मुजफरजंगाचा दिवाण झाला. तेव्हां यास 'राजा रघुनाथदास' ही पदवीहि मिळाली. मुजफरजंगाच्या मृत्यूनंतर यानें व फ्रेंचांच्या बुसीनें मिळून सलाबतजंगास निजामी दिली. याच वेळेस नानासाहेब पेशव्यांनीं निजामावर स्वारी करण्याचें ठरविलें. तेव्हां यानें पेशव्यांच्या वकिलामार्फत आपल्याविषयीं त्यांचा ग्रह चांगला करून दिला व नानासाहेबांस त्याचें सर्व कर्ज निवारण्याचें आश्वासन दिलें. या सर्व गोष्टींमुळें याची नानासाहेबांवर चांगलीच छाप पडली व त्यानें याच्या विश्वासांतल्या जानोजी निंबाळकरास कायमचें पुण्यास ठेवून घेतलें. ताराबाईच्या वतीनें दमाजी गायकवाडानें नानासाहेबांवर स्वारी केली असतां यानें फौज देऊन पेशव्यास मदत केली होती. यामुळेंहि नानासाहेबांस याजविषयीं भरंवसा वाटे. उत्तरेकडून पेशव्यांचा ५ लक्षांचा खजिना पुण्यास येत असतां वाटेंत यानें बुसीच्या पलटणीच्या साहाय्यानें तो खजिना लुटला. आपण ह्या प्रकरणापासून अलिप्त आहोंत असें पेशव्यास भासविलें व आपण नुकसानभरपाई करून देऊं असें त्यास आश्वासन दिलें. परंतु पुढें याच्या थापा पेशव्यांच्या लक्षांत येऊन, पेशवे व निजाम यांचें युद्ध ता. २१-११-१७५१ रोजीं कुकडी नदीवर (जि. नगर) झालें. लढाई चालू असतां चंद्रग्रहण आलें तेव्हां पेशव्यांकडील मंडळी नदीवर गेली असतांना यानें त्यांच्यावर ही संधि साधून मारा केल्यामुळें पेशव्यांचा पराभव झाला. शेवटीं तह झाला, पण त्यांत याचाच वरचष्मा राहिला. तेव्हां नानासाहेबानें शिंदे-होळकरांच्या मदतीनें याचा पूर्ण मोड करण्याचें ठरविलें. परंतु याचा शेवटीं खून झाला. यास उत्तमराव व अच्युतराव नांवांचे दोन पुत्र होते (वाकसकरकृत अप्रसिद्ध ऐ. चरित्रें).

रामदेव—(चिरंजीव भट्टाचार्य पाहा).

२. (स. १४२२ सुमार) यालाच व्यास श्रीरामदेव म्हणत. सुभद्रापरिणय, पांडवाभ्युदय हीं यांचीं नाटकें आहेत.

रामदेव चिरंजीव—(स. १७०० सुमार) या तर्कज्ञाचे ग्रंथ—१ विद्वन्मोदतरंगिणी, २ काव्यविलास, ३ माधवचंपू, ४ वृत्तरत्नावली. हा चिरंजीव नांवानें ओळखला जातो (हि. सं. लॉ. पा. ४८३).

रामदेव परमार—आबूच्या परमारांपैकीं एक राजा. याचा पूर्णपाल किंवा कृष्णराज याच्याशीं काय संबंध होता हें सांगतां येत नाहीं.

रामदेवराव यादव—(स. १२७१-१३०९) हा कृष्ण यादवाचा मुलगा. हा महाराष्ट्रांतील एक वैभवशाली सम्राट् होय. हा देवगिरी (सध्यां दौलताबाद) येथें राज्य करीत होता. अलाउद्दीन खल्जीनें प्रवासी

म्हणून याच्या राज्यांतून प्रवास केला आणि एकंदर पाहणी करून याचा मुलगा सैन्यासुद्धां परप्रांतांत असतां देवगिरीला वेढा दिला. अनेक प्रयत्न करूनहि किल्ला सर होईना. पण यास असें आढळून आलें कीं किल्ल्यांत धान्य म्हणून मिठाचीं पोतीं भरलेलीं आहेत. तेव्हां धान्याच्या अभावीं युद्ध करणें अशक्य आहे, शिवाय फितुरीचाहि संशय आल्यानें यानें घाईनें अलाउद्दीनशीं पुष्कळ द्रव्य देऊन तह केला. इतक्यांत सैन्यासह पर प्रान्तांत असलेला याचा शूर मुलगा शंकरदेव आला आणि यानें केलेल्या तहास न जुमानतां त्यानें मोठ्या जोमानें युद्धास सुरुवात केली. मुसलमानांचा अगदीं समूळ नाश होण्याची वेळ आली होती. पण मुसलमानांना दिल्लीहून कुमक आली अशी अफवा उठली. आणि त्यामुळें यांच्या सैन्याची पांगापांग होऊन मुसलमानांना जय मिळाला, आणि याला सर्वस्व देऊन आपला कसाबसा बचाव करावा लागला (स. १२९४ फेब्रु. ५).

खंडणी घेण्याकरितां स. १३०६ मध्यें मलीक काफूर पुनः दक्षिणेकडे आला. तेव्हां हा लढाई न करितां त्याच्या स्वाधीन झाला आणि त्याबरोबर दिल्लीस गेला. तेथें अलाउद्दीननें यास सन्मानानें वागविलें. एक छत्र, राजाधिराज किताब आणि एक लाख रुपये देऊन यास प्रतिष्ठेनें स्वदेशीं रवाना केलें. यानंतर यानें दिल्लीच्या बादशहाशीं विरोध केला नाहीं. उलट त्यांना मदत केली. आणि त्यामुळें काफूरच्या दक्षिणेकडच्या स्वाऱ्या यशस्वी झाल्या. हा स. १३०९ मध्यें मृत्यु पावला. स. १३१२ मध्यें काफूर देवगडास आला तेव्हां हा मरण पावला होता (शंकरदेव यादव पाहा).

याच्या वेळीं ज्ञानेश्वर नामदेवादिकांनीं महाराष्ट्रांत धर्माची पताका उभारली आणि प्रचार सुरू केला. ज्ञानेश्वरानें आपल्या ज्ञानेश्वरींत यास ' सकळकलानिवास ' व 'न्यायानें पृथ्वी पालन करणारा' असें म्हटलें आहे.

महानुभाव पंथाचा चक्रधर कृष्ण व हेमाद्रिसारखे धुरंधर पंडित ह याच्याच राज्यांत होते. खोलेश्वरासारखे ब्राह्मण सेनापति आणि भास्कराचार्यासारखे जागतिक पंडित याच सुमारास महाराष्ट्रांत उदयास आले. यावरून तत्कालीन महाराष्ट्राचा सांस्कृतिक श्रेष्ठ दर्जा दिसून येतो.

अलाउद्दीन खल्जीनें याचा पराभव करीपर्यंतचे शिलालेख उपलब्ध आहेत. त्यानंतरचे नाहींत. या कालांतील बहुतेक शिलालेख कानडींत व संस्कृतांत आहेत. उनकेश्वर (तहसील किनवट, निजाम) येथील शिलालेख मराठींत आहे. पंढरपूरच्या देवळाच्या जीर्णोद्धारासहि यानें व हेमाद्रि यानें देणगी दिल्याचा निर्देश तेथील चौऱ्यांशीच्या लेखांत आहे.

रामदेव वाघेल—(स. १२७५ सुमार) हा बघेल वंशांतील अर्जुनदेवाचा पुत्र. यानें थोडे दिवस राज्य केल्यानें कोणी याचा निर्देश करीत नाहीं.

रामनाथ विद्यावाचस्पति—(स. १६२२) याचे ग्रंथः—संस्कारपद्धतिरहस्य, स्मृतिरत्नावली, काव्यप्रकाश-रहस्य, त्रिकांडविवेक, अभिज्ञानशाकुंतलवित्तिः, लिंगादि-संग्रहटिप्पणी, लीलावतीरहस्य, धार्मिककर्मरहस्य, सामग-मंत्रव्याख्यान. यांशिवाय धार्मिककर्मरहस्यामध्यें परि-भाषाविधान, समयरहस्यविधान या दोन स्वतःच्या ग्रंथांचा निर्देश केलेला आहे. तसेंच त्रिकांडविवेकांत वर्णविवेक-धातुचिंतामणिटीकेचा निर्देश आहे. यानें सुमारें शंभरपेक्षां कमीच मंत्रांचें भाष्य लिहिलें आहे. त्यांत गुणविष्णु, हलायुध व सायण इत्यादिकांच्या भाष्यांचें खंडण आढळतें. संस्कारपद्धतिरहस्याच्या शेवटीं त्या ग्रंथसमाप्तीचा काल दिलेला आहे. तसेंच धार्मिककर्मरहस्याच्या प्रारंभीं राजा गंधर्वरायाच्या सांगण्यावरून ग्रंथ लिहिला असें म्हटलें आहे.

रामपाल—(स. १०९८–११४०) हा बंगाल्यांतील पाल घराण्यापैकीं तिसऱ्या विग्रहपालाचा मुलगा. महीपाल गादीवर आल्यावर त्यानें यास तुरुंगांत टाकलें, पण बंड होऊन तो मारला गेला व हा राजा झाला. मागील राजांना ज्यांचा विशेष त्रास झाला होता त्या वरेंद्रांतील म्हणजे उत्तर बंगालमधील कैवर्तांचा पुढारी दिव्योकपुत्र भीमाला यानें ठार केलें आणि तेथें आपली सत्ता स्थापन केली. ही माहिती संध्याकरनंदीच्या एका द्व्यर्थी काव्या-वरून मिळते (JRASB १९०० पा. ७३). याचा उत्कर्ष याचा मामा मथन (अंगदेशचा राजा) यानें पीथीचा (वेंगीदेशांतील पीठापूरचा) राजा देवरक्षित याचा पराभव करून केला. देवरक्षित हा राष्ट्रकूट (राठोड) होता (हिं. भा. अ. ३४६–३४७). याच्या हयातींतच कुमारपाल व राज्यपाल वारले म्हणून नातू गोपाल याला राज्य मिळालें. पण तो लवकरच साप चावून मेला. मग याचा तिसरा मुलगा मदनपाल हा गादीवर आला (हि. का. मार्च १९२९).

मथनच्या मृत्यूमुळें हा अत्यंत दुःखी होऊन यानें गंगेंत देह समर्पण केला (हि. का. मार्च १९२८).

रामप्रसाद—(जन्म स. १७१८) एक धार्मिक बंगाली कवि. हा वैद्य जातीचा असून रायरामाचा पुत्र होय. जन्मस्थळ–कुमारट्टा. प्रथम हा मुन्शीचें काम करीत असे. परंतु याची काव्यशक्ति पाहून मालकानें यास

३० रु. दरमहा पेन्शन देऊन परत पाठविलें. नंतर स. १७२८ मध्यें कृष्णचंद्रराजानें यास २० रु. मासिक वेतन व १०० बिघे जमीन देऊन याचा गौरव केला. ह्याची कविता फार मधुर व चित्ताकर्षक आहे.

रामभट—(स. १५९०) नीळकंठ ज्योतिष्यांचा हा भाऊ होय. यास अकबराचा प्रधान रामदासाचा आश्रय होता. यानें 'रामविनोद' म्हणून एक करणग्रंथ लिहिला आहे. ह्याचा दुसरा ग्रंथ म्हणजे मुहूर्ततचिंतामणि. तो बराच प्रख्यात आहे. हा ग्रंथ काशीक्षेत्रीं तयार केला व तेथें त्यावर 'प्रमिताक्षरा' नांवाची टीकाहि यानेंच लिहिली आहे. शिवाय याचा पुतण्या गोविंदानें 'पीयूषधारा' नांवाची टीका लिहिली आहे. ह्या दोन्हीहि छापून प्रसिद्ध झाल्या आहेत (भा. ज्यो. पा. २७८).

रामभद्र दीक्षित—(स. १६९३) महादेवाचा समकालीन व कौंडिण्यगोत्री यज्ञरामाचा पुत्र. जन्मस्थळ–कंडरमाणिक्य (कुंभकोणमूनजीक). शहाजी राजानें शहाजीराजपुराचा कांहीं भाग यास दिला होता. हा नीलकंठमखिनपासून काव्यशास्त्र, चोक्कनाथापासून व्याकरण व महादेवाचा गुरु बाळकृष्णापासून भक्तिज्ञान शिकला. हा चोक्कनाथाचा जांवई असून यानें शृंगारतिलकभाण, जानकीपरिणय इत्यादि नाटकें, व्याकरण, शब्दकोश व रामगुणवर्णनपर अनेक काव्यें लिहिली.

रामभद्र प्रतिहार—(स. ८३० सुमार) रघुवंशी प्रतिहारांपैकीं दुसऱ्या नागभटाचा पुत्र. याच्या आईचें नांव ईसटादेवी. याला राम किंवा रामदेव असेंहि म्हणत. यानें फारच थोडे दिवस राज्य केलें. हा सूर्याचा भक्त होता. याला आपादेवी नांवाच्या राणीपासून भोज नांवाचा पुत्र झाला.

रामभद्र सार्वभौम—(स. १६०० पूर्व) हा भवनाथ व भवानीचा पुत्र असून याला बापाविषयीं फार आदर वाटे. याच्या शिष्यशाखेंत जयराम न्यायपंचानन व जगदीश तर्कालंकार हे विद्वान् तर्कज्ञ उदयास आले. याचे ग्रंथः—(१) 'दीधितिटीका', (२) 'न्यायरहस्य', (३) 'गुणरहस्य', (४) 'न्यायकुसुमांजलीकारिकाव्याख्या', (५) 'पदार्थविवेकप्रकाश'–रघुनाथशिरोमणीच्या पदार्थखंडनावरील टीका, (६) 'सत्चक्रवर्मदीपिका' (हि. इं. लॉ., पा. ४०८).

रामभद्र सिद्धांतवागीश—(स. १६६० सुमार) हा जगदीश तर्कालंकाराचा नातू असून यानें जगदीशाच्या 'शब्दशक्तिप्रकाशिका' या ग्रंथावर 'सुबोधिनी' नांवाची टीका लिहिली. हा स्वतःस नवद्वीपीय असें म्हणतो (हिस्टरी ऑफ इंडियन लॉजिक, पृ. ४८०).

रामभारती अक्कलकोटकर—(समाधि स. १८७८) अक्कलकोटचे प्रख्यात स्वामी. यांचा मूळ मठ कर्नाटकांत आहे. यांना चंचळभारती असेंहि म्हणत. हे पुष्कळ वर्षें मोहळास होते. यांची अंगकाठी उंच, भव्य व तेजःपुंज होती. हे लोकांच्या मनांतील गोष्टी सहज सांगत. यांनीं चैत्र वद्य १३ मंगळवार शके १८०० मध्यें अक्कलकोटासच समाधि घेतली.

राममाणिक कविराज—यानें माधव व सुलोचना यांची कथा संस्कृतांत आपल्या 'कृतार्थमाधव' नाटकांत वर्णिली आहे.

रामराज—(स. १८२५ सुमार) हा तंजावरचा एक प्रसिद्ध पंडित होता. यानें शिल्पशास्त्रावर निबंध लिहिला आहे. त्यांत अगस्त्यकृत मानसार, मयमत, काश्यप, वैखानस, सकलाधिकार, विश्वकर्मा, सनत्कुमार, सारस्वत्य, वगैरेंचा समावेश केलेला आहे (हि. का. १·७१).

२. केलडीच्या सदाशिव नायकाचा हा नातू. हा दोद्द संकन्न आणि चिक्क संकन्न या दोघांपैकीं कोणाचा तरी मुलगा असावा.

रामराजभूषण—हा जातीचा भाट. याचे प्रख्यात ग्रंथः—वसुचरित्र, नरसभूपालीय, वगैरे होत. काव्य श्लेषप्रधान असून आल्हादकारक आहे. हा विजयनगरच्या दरबारांत होता.

रामराजा—हा शृंगवेरपूरचा राजा. शेखरकार नागेश भट्टाचा यजमान.

रामराजा भोसले—(स. १७४९–१७७७) हा सातारच्या शिवछत्रपतीच्या घराण्यांतील दुसऱ्या शिवाजीचा मुलगा. याच्या आईचें नांव भवानीबाई. हा बापाच्या मरणापूर्वी थोडे दिवस जन्मास आला (स.१७१२). याचा चुलता दुसरा संभाजी व चुलती जिजाबाई. संभाजी व जिजाबाई हीं दोघें याला ठार मारण्याचा प्रयत्न करीत म्हणून याला गुप्तपणें पळवून बावड्याजवळ पानगांव येथें गुप्तपणें ठेवण्यांत आलें. तेथें पंत अमात्यांच्या देखरेखीखालीं यानें पंधरासोळा वर्षें काढलीं. शाहूच्या पश्चात् याचें अस्तित्व लक्षांत घेऊन ताराबाईनें याला गादीवर बसविण्याबद्दल विनंति केली आणि शाहूनें याला गादीवर बसविण्याबद्दल नानासाहेब पेशव्याला सांगितले तेव्हां त्यानें हरप्रयत्नानें याला गादीवर बसविलें (ता.४–१–१७५०). शाहूनें दिलेल्या मुखत्यारपत्राप्रमाणें येथून पुढें पेशवे पुण्यास राहण्यास गेले आणि स्वतंत्रपणें राज्यकारभार करूं लागले.

तथापि हा कर्तबगार असता तर राज्यकारभारांत उघडपणें याला दूर सारण्याचें धाडस पेशव्याला झालें नसतें. रघूजी भोसले, दर्याबाई निंबाळकर व ताराबाई ही प्रमुख मंडळी व त्यांच्या भोंवतीं असणारे इतर लोक छत्रपतीचें महत्त्व टिकविण्याचा प्रयत्न करीत होते. त्यांना पेशव्याच्या हातांत गेलेली सत्ता बिलकुल पसंत नव्हती. पण रघूजी भोसले पेशव्याला मिळाला आणि ताराबाई-शींहि याचें जमेना, तेव्हां तिनें सातारा सोडला. फक्त याची बहीण दर्याबाई निंबाळकर याला सल्लामसलत देत राहिली, पण तिलाहि पेशव्यानें सक्तीनें साताऱ्यांतून बाहेर काढिलें (पे. द. ६. ६४–६५).

शाहूनें पेशव्याला फक्त सर्वाधिकार दिले होते. राज्यावरील मालकी आपणाकडेच ठेवली होती. पण सदाशिवराव भाऊ व रामचंद्रबाबा, प्रतिनिधीचें बंड मोडण्याकरितां यासह सांगोल्यास आले आणि तेथें सर्व सत्ताहि याच्याकडून त्यांनीं लिहून घेतली. आतां छत्रपति केवळ पासष्ट लाखांच्या नेमणुकीचा व साताऱ्याचा धनी होऊन राहिला, ही गोष्ट ताराबाईस बिलकूल आवडली नाहीं. याला वळविण्याच्या बाबतींत जेव्हां तिला अपयश आलें तेव्हां तिनें याला सातारच्या किल्ल्यांत भेटीस बोलावून कैद केलें. ती मरेपर्यंत हा तिच्या कैदेंतच होता (ता. २३. १०. १७५०–२८. ३. १७६३).

ताराबाई वारल्यावर याला मोकळेपणा मिळाला. पण याचें उमेदीचें आयुष्य वांया गेलें होतें. याला देवदर्शनाला सुद्धां परवानगी मिळण्यास त्रास होई. अशा स्थितींत हा काय करूं शकणार ?

याला दुर्गाबाई व सगुणाबाई अशा दोन बायका होत्या. त्यांना प्रत्येकीं आठ आठ हजारांची नेमणूक असे. याच्या तीन मुलींनाहि अशाच नेमणुका असत.

याचें काम म्हणजे नजरकैदेंतल्याप्रमाणें राहणें आणि निरनिराळ्या पेशव्यांना वस्त्रें देणें.

हा वारल्यावर याची राणी सगुणाबाई हिच्या मांडीवर वावीकर भोसल्यांपैकीं दत्तक देण्यांत आला आणि त्याचें नांव शाहू असें ठेवण्यांत आलें. तो धाकटा शाहू या नांवानें प्रसिद्ध आहे.

याचें व पेशव्याचें बिलकुल जमत नसे. हा वेडा होता हेंहि म्हणणें बरोबर नाहीं. पण पैसा व सत्ता यांच्या अभावीं हा वेड्यासारखा झाला होता. 'ब्राह्मणानें माझ्या राज्याचा खेळ केला आहे' असें हा वारंवार म्हणे (पे. द. ६.५०).

राजा होईपर्यंत याचें आयुष्य अज्ञातवासांत गेलें, आणि तेंहि प्रथम देवडीवाल्या पुरभय्याच्या घरीं. नंतर पानगांवीं दर्याबाई निंबाळकरणीच्या घरीं आणि शेवटीं तुळजापुरच्या भोप्याच्या घरीं. शाहूच्या हयातींत सकवारबाई व कोल्हापूरची राजसबाई व जिजाबाई यांच्या भीतीनें ताराबाईनें अज्ञातवासांत हें मूल वाढविलें. हा प्रथम राजा होण्यासच तयार नव्हता. पण कसेंतरी आणून कांहींतरी दत्तविधान केलें. पण शेवटीं ताराबाईनेंच याला कैद दाखविली. आणि हा माझा नातू नव्हे असें ती म्हणूं लागली. अशा स्थितींत छत्रपतीचा वचक नाहींसा होऊन पेशव्यानें पराक्रमानें आपल्याकडे सर्वांचें लक्ष वेधून घेतलें.

रामराय आरविदु—(मृत्यु स. १५६५) हा विजयनगरचा सम्राट् कृष्णदेवराय तुलुवाचा जांवई व त्याच्या मागून गादीवर आलेल्या सदाशिवरायाचा सर्वाधिकारी मुख्य प्रधान होय. हा श्रीरंग व तिरुमलांबा यांचा पुत्र. याला तिरुमल्ल व वेंकटाद्रि असे दोन भाऊ होते.

कृष्णदेवराय तुलुवाच्या वेळेपासून हा राज्यकारभारांत होता. कृष्णदेवरायानंतर पहिला अच्युतराय गादीवर आला. प्रथम तो कारभारांत लक्ष घाली, पण पुढें त्याचे दोघे मेहुणे सकलम् (सलाकम) तिम्मराजु याच नांवाचे होते ते कारभार पाहत. तो कारभार आपल्या हातीं यावा म्हणून यानें कारस्थानें केलीं तेव्हां याला भावांसह विजयनगर सोडावें लागलें. पण यानें सैन्य जमवून त्यावर स्वारी केली. तो जुलमी कारभारामुळें अप्रिय झाला होता. त्याच्या सैन्यांत फितुरी होऊन तो मारला गेला आणि हा मुख्य प्रधान झाला. यानें अल्पवयी सदाशिवरायाला गादीवर बसविलें. सदाशिवराय वयांत आला तरी हाच मुखत्यारीनें राज्यकारभार पाही. सदाशिवरायाचें दर्शनसुद्धां प्रजाजनांना वर्षांतून एकदांच घडे !

हुसेन निजामशाहाविरुद्ध मदत मागण्याकरितां विजापूरचा अलीआदिलशाह विजयनगर येथें गेला होता. तेव्हां अलीची व्यवस्था यानें फार उत्तम ठेविली. हाहि सरहद्दीला लागून असणाऱ्या विजापूर, अहमदनगर व गोवळकोंडा येथील आपसांत भांडणाऱ्या राजांना मदत करी. पण शेवटीं हाहि चढेल झाला. पण याचा वाढत चाललेला वरचढपणा मुसलमानांना असह्य होऊन हुसेन निजामशाहाच्या नेतृत्वाखालीं मुसलमानांचा संघ तयार झाला; आणि तालिकोटच्या लढाईत हा व याचा भाऊ व्यंकट मारला जाऊन विजयनगरची सहा महिने लूट झाली. तेव्हांपासून विजयनगरच्या राज्याला उतरती कळा लागली.

याला चार बायका व पांच मुलगे होते. तिरुमलांबा, अप्पलंबा, कोंडम्मा व लक्ष्मम्मा या याच्या चार बायका होत. कृष्ण, पेद्द, तिम्म, कोंद व तिम्मराज हीं याच्या मुलांचीं नांवें होत.

स. १५४२-६५ पर्यंत राज्यकारभार सर्वस्वीं याच्या तंत्रानें चाले. तरी हा प्रधान म्हणूनच कारभार पाही. ह्या वेळचीं जीं आज्ञापत्रें किंवा सनदा उपलब्ध आहेत त्यांत सदाशिवरायाचें नांव राजा म्हणून आहे. पण पुढें मात्र याचा भाऊ तिरुमल्ल हा आरविदु घराण्याचा पहिला राजा झाला.

रामराव जिवाजी चिटणीस—(स.१७४३-७९) खंडो बल्लाळ चिटणीसाचा नातू. याचा पुत्र मल्हारराव.

रामराव दादाजी भावे—(मृत्यु स. १७४०) रामदुर्ग संस्थानचा मूळपुरुष. यानें नरगुंद व रामदुर्ग हे दोन किल्ले मोठ्या युक्तीनें मोगलांपासून हस्तगत केले. ते छत्रपतीनें याच्या दिमतीस दिले. पुढें कोल्हापूरकर संभाजीनें याला पंतसचीव केलें.

रामरुद्र तर्कवागीश—(स. १७०० सुमार) हा भवानंद सिद्धांतवागीशाचा नातू असून श्रीराम अथवा रामेश्वर याचा पुत्र होता. तसेंच हा मधुसूदनाचा शिष्य होता. यानें खालील ग्रंथ लिहिले आहेतः—

(१) तत्त्वचिंतामणि-दीधिति-टीका, (२) व्युत्पत्तिवादव्याख्या, (३) कारकाद्यर्थनिर्णयटीका, (४) दिनकर्यप्रकाशतरंगिणी, (५) तत्त्वसंग्रहदीपिकाटिप्पणी, (६) सिद्धांतमुक्तावलीटीका.

रामवर्मन्—(मृत्यु स. १७९८) त्रावणकोरचा राजा. हा मार्तंडवर्मानंतर गादीवर आला. यानें इंग्रजांशीं तैनाती फौजेचा तह केला.

२. (स. १७३५-१७८५) 'रुक्मिणीपरिणय' नाटकाचा कर्ता. कर्पूरमंजरीशीं या नाटकाचें फार साम्य आहे. हा कांची (त्रावणकोर संस्थानांतील कुरुर)-चा राजा रामवर्मन्च्या बहिणीचा मुलगा. यानें 'शृंगारसुधाकरभाण' नांवाचें दुसरें एक नाटक लिहिलें आहे.

राम वाजपेयि—हा भारद्वाजगोत्री ऋग्वेदी ब्राह्मण होता. हा माळव्यांतून नैमिषांत म्हणजे पंजाबांत आला. यानें कुंड रामवाजपेयी नांवाचा कुंडावर संस्कृतमध्यें ग्रंथ लिहिलेला आहे. यानें हा ग्रंथ (स. १४४९) मध्यें लिहिला. याला गल्लपुराधिपाचा आश्रय होता.

रामसहायदास—एक हिंदी कवि. याच्या पित्याचें नांव भवानीदास. यानें शृंगारसत्सई नांवाचा ग्रंथ लिहिला. या ग्रंथाची स. १८३५ (सं. १८९२) मधील हस्तलिखित प्रत उपलब्ध आहे. याचा काल स. १८०० (सं. १५७७) असा मानला जातो. याशिवाय यानें वृत्ततरंगिणी, ककहरा, रामसप्तशतिका आणि वाणीभूषण या नांवांचे ग्रंथ लिहिले. शृंगारसत्सई यामध्यें ७०० दोहे असून हा ग्रंथ बिहारीसत्सईच्या तोडीचा आहे (क. कौ. १).

रामशास्त्री प्रभुणे—(स. १७२०-१७८९) पेशवाईतील एक प्रख्यात न्यायाधीश. हा माहुलीचा राहणारा असून देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण होय. सुमारें २० वर्षांपर्यंत हा निरक्षर होता. प्रथम हा सातारच्या अनगळ सावकाराकडे शागीर्द होता, परंतु तेथें एक दिवस सावकाराने मर्मभेदक शब्दानें याची हजेरी घेतल्यामुळें यानें विद्याभ्यास करण्याचा निश्चय केला. याची इच्छा पाहून सावकारानेंहि याची काशीस रवानगी केली. तेथें यानें आपलें शिक्षण बाळंभट पायगुंडे यांच्या पाठशाळेंत घेण्यास सुरुवात केली. बाळंभटाचा जांवई अनंतभट्ट यानेंहि अपमान झाल्यामुळें याच वेळेस शिक्षण घेण्यास सुरुवात केली होती. हा व अनंतभट्ट दोघेहि समवयस्क असल्यामुळें लवकरच त्यांची गट्टी जमली. पुढें हा ज्याप्रमाणें धर्मशास्त्री म्हणून प्रसिद्धीस आला तसा अनंतभट्टहि वेदान्ती म्हणून प्रसिद्धीस आला. रामशास्त्र्यानें स. १७५१ मध्यें पेशव्यांचे दरबारीं प्रथम धर्मखात्यांत नोकरी धरली, व नंतर स. १७५९ मध्यें हा मुख्य न्यायाधीश झाला. हा अत्यंत निःस्पृह असून याची न्यायदानांत फार प्रसिद्धि आहे. थोरले माधवराव याच्याच तंत्रानें वागत. माधवराव ब्रह्मकर्मांत फार वेळ घालवीत असत, त्यापासून यानेंच त्यांना परावृत्त केलें, नारायणरावाच्या खुनाबद्दल राघोबास यानेंच निर्भयपणें देहान्तप्रायश्चित्त घेण्यास सांगितलें, व नोकरी सोडून हा तावडतोब माहुलीस निघून गेला. पुढें सवाई माधवरावाच्या जन्मानंतर हा पुन्हां न्यायाधीश झाला. परशुरामभाऊ पटवर्धनाच्या मुलीचा पुनर्विवाह करण्यास यानें संमति दिली होती, अशी दंतकथा आहे. तसेंच प्रभूंच्या ग्रामण्याच्या बाबतींत यानें प्रभूंच्यातर्फे निकाल दिला, या गोष्टी याच्या निर्भयपणाची साक्ष देतात. जोशी व पाध्ये वादांतील यानें जोश्यांच्या बाजूनें दिलेलें निवाडपत्र प्रसिद्ध आहे. यास दरमहा सुमारें १२० रु. पगार मिळे. याच्या चाळीस वर्षांच्या नोकरींत अनेक बाबती मिळून ५५९६८ रु. याच्या नांवावर खर्च पाडल्याचें पेशवे दप्तरांत नमूद आहे. यानें सुमारें साठाव्या वर्षी दुसरें लग्न केलें. हा ता. २५ आक्टो. स. १७८९ रोजीं मरण पावला.

याचा मुलगा गोपाळशास्त्री विशेष विद्वान् नव्हता. याची मुलगी भोरचे सचीव शंकरराव रघुनाथ यांस दिलेली होती. याचे वंशज सांप्रत पुणें जिल्ह्यांत जेजुरीजवळ राखी म्हणून गांव आहे तेथें राहतात.

हे पु : नाना फडणीसाच्या कारकीर्दीत नानाच्या विनंतीवरून न्यायाधीश म्हणून काम करूं लागले (४.७.१७७४). तेव्हां बहुतेक नाना, बापू, हरिबा आणि परशुरामभाऊ यांच्याकडून वजन पाडून मनाप्रमाणें काम करण्यास व्यत्यय येऊं लागला. तेव्हां नाना व बापू यांनीं शपथपूर्वक पत्र लिहून ' आमची व दरबारांत चार मातब्बर आहेत त्यांची भीड न धरितां न्याय करण्याविषयीं ' लिहिलें आहे (पे. द. ५.५५-५८). यावरून या निःस्पृह गृहस्थानें पुनः जागा सोडून जाऊं नये, म्हणून हा प्रयत्न असावा.

रामसिंग—(ग्रंथकाल स. १८३९-१८६०) एक हिंदी कवि व नरवळगडचा राजा. याचे ग्रंथ–अलंकारदर्पण, रसनिवास व रसविनोद.

रामसिंग कच्छवाह—(स. १६६८-९९) जयसिंगाचा मुलगा. हा दिल्लीसच होता, दक्षिणेंत आला नव्हता. औरंगजेबाच्या दरबारीं २५०० चा मनसबदार होता. यासच जयसिंग ' शिवाजीच्या केसास धक्का न लागूं देण्याची ' खबरदारी घेण्यास वरचेवर लिही. शिवाजी निसटून गेल्यानंतर औरंगजेबानें रामसिंगावर वहीम घेऊन त्याची मनसब जप्त केली. या प्रसंगानंतर ११ महिन्यांनीं जयसिंग मेला. तेव्हां औरंगजेबानें जसी उठवून रामसिंगास चार हजारी नेमिलें. तदनंतर त्याची आसामच्या स्वारीवर नेमणूक झाली आणि तेथेंच हा हालअपेष्टेंत मेला (सरकार–शिवाजी).

२. औरंगजेब दारा शुकोहवर गेला तेव्हां मुराद व रामसिंग यांची गांठ पडली. हा दाराच्या बाजूनें लढत होता. त्या युद्धांत हा मारला गेला (मु. रि. भा. १, पृ. २३२).

रामसिंग बांडे—(मुहकमसिंग पाहा).

रामसिंग मालम—(स. १७५०) कच्छ संस्थानची राजधानी भूज येथील एक कल्पक कारागीर. तेथील राजा राव लाखाजीनें यास कल्याणपूर नांवाचा गांव जहागीर दिला. यानें तेथें बंदुका, रेशीम, कांच, घड्याळें, पुतळे, वगैरेंचे कारखाने काढले. भूज येथें यानें बांधलेला राजवाडा प्रसिद्ध आहे. त्यास ३०,००,००० रु. खर्च आला. हा हॉलंडला जाऊन आला होता (इ. सं. १.६ जु. ऐ. गो. १३).

रामाई पंडित—(स. ९७५-१०२५ सुमार) एक बंगाली कवि. हा राढ प्रांतांतील द्वारका गांवीं राहत असे. याच्या बापाचें नांव विश्वनाथ. यानें वयाचे ८० व्या वर्षी केशवती नांवाच्या स्त्रीशीं विवाह केला. यानें ' शून्यपुराण ' नांवाचा ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ बंगाली-साहित्यपरिषदेनें प्रकाशित केला आहे.

रामाचरण—हा रामानुजाच्या गळता येथील गादीवरील अधिकारी. यानें केलेल्या नवीन व्यवस्थेंत निरंजन व रामस्नेही असे हल्लीं दोन पंथ झाले आहेत.

रामाचार्य राघवेंद्राचार्य गजेंद्रगडकर—एक सुप्रसिद्ध पंडित. यांनीं पुण्याच्या विष्णुशास्त्री भटांनीं लिहिलेल्या राघवेंद्राचार्याच्या ' त्रिपथगा ' परिभाषेन्दुशेखरावरील टीकेवर सुंदर टीका लिहिली.

रामाजनार्दन—याची अनंतभुजाची व ज्ञानेश्वराची आरती प्रसिद्ध आहे.

रामाजी कामत—(मृत्यु स. १७२८) मुंबई शहरांतील एक प्रसिद्ध व्यापारी. हा शेणवी गृहस्थ होता. हा अंतःकरणानें उदार असून धार्मिक होता. यानें मुंबई शहरांत पुष्कळ देवळें बांधलीं. त्यांपैकीं वाळकेश्वराचें देवालय अद्यापि प्रसिद्ध आहे. यानें तंबाखूची लागवड करून तंबाखूचा व्यापार प्रामाणिकपणें केला. याच्यासंबंधीं इंग्रजी अधिकाऱ्यांचें मत प्रथम अनुकूल होतें. व यास सैन्याचें आधिपत्य दिलें होतें. पण पुढें जेव्हां कान्होजी आंग्र्याचें व इंग्रजांचें वांकडें आलें, त्या वेळेस इंग्रजांनीं हा आंग्र्यांच्या बाजूचा आहे असा पुराव्याशिवाय संशय घेऊन राजद्रोहाचा आरोप ठेवून याची चौकशी केली. अखेर यास दोषी ठरवून जन्मठेपेची शिक्षा होऊन हा आठ वर्षांनीं मरण पावला. याच्यावर जो खटला भरण्यांत आला तो बनावट होता, असें उघडकीस आलें.

रामाजी केशव तिखे—दे. ऋ. ब्राह्मण. हा मूळ पुण्याकडील राहणारा. यास मुधोजी भोसल्यानें महिपतराव दिनकर याचेमार्फत गायकवाडाकडून आणलें, व चंद्रपुरास दिवाण केलें.

रामाजी नाईक—(स. १७४२) अंतोबा नाईक भिडे यांचा मुलगा.

रामाजी महादेव बिवलकर—(मृत्यु स. १७७२) हा तुळाजी आंग्रे यांचा कारभारी असून पेशव्यांना फितुर झाला. नंतर हा पेशव्यांचा कोंकणांतील सुभेदार असून, नानासाहेबांच्या अत्यंत विश्वासांतला होता. आपसांत याच्यामार्फत फितुरी करवून किल्ला (स. १७५६)

घेतल्याबद्दल अनेकांनीं नानासाहेब पेशव्यांना दोष दिला आहे. याच्या ताब्यांत साष्टी, वसई, ठाणें व कुलाबा हे प्रांत असून यांचें वास्तव्य कल्याणास होतें. ठाणें येथील कौपीनेश्वराचें देऊळ यानेंच बांधिलें. हल्लींचें ठाण्याचें जजकोर्ट हाहि याचाच वाडा होता. तुळाजीच्या विरुद्ध इंग्रजांचें कारस्थान घडवून आणणारा हाच होता. पेशव्यांनीं यास पाठवून शके १६७७ त (स. १७५५) आंग्र्यांपासून अंजनवेल घेतली. पेशव्यांनीं यास हबशावर स्वारी करण्यासाठीं सांगितलें म्हणून यानें जलमार्गानें जाऊन राजापुरी लुटून जंजिऱ्याजवळ मोर्चा वळविला. हा स. १७७२ ऑगस्ट मध्यें मरण पावला.

चिमाजी आपानें ठाणें-साष्टीवर मोहिमा केल्या, त्यांत हा खंडोजी माणकराबरोबर कल्याण येथें फौजेंत होता.

रामानंद—(जन्म स. १३००-समाधि स.१४११) याच्या मातेचें नांव सुशीला. रामानंदाचें पहिलें नांव रामदत्त असें होतें. हा बुद्धीचा अत्यंत तीव्र असून यानें शास्त्राध्ययन बाराव्या वर्षी पुरें केलें. विशेष अध्ययनाकरितां लवकरच हा काशी येथें आला. प्रथम यानें एका शांकरमतानुयायी आचार्याकडे अध्ययनास सुरुवात केली. पण याची एकदां सहज राघवानंदाशीं भेट झाली. राघवानंदानें याला पाहतांक्षणीच याच्या अल्पायुषीपणाबद्दल खेद प्रदर्शित केला, आणि ईश्वरभक्ति करण्यास सांगितलें.

यानें त्यांचा उपदेश ग्रहण केल्यावर त्यानें याचें नांव रामानंद असें ठेविलें. पुढें जेव्हां मृत्यूची वेळ आली तेव्हां हा समाधि लावून बसला. समाधि उतरल्यावर मृत्यु टळला असें याच्या ध्यानीं आलें आणि राघवानंदावर याची श्रद्धा दृढ झाली. योगाभ्यास व समाधि यांचें शिक्षण राघवानंदानेंच याला दिलें होतें. श्रद्धापूर्वक गुरूची सेवा बरेच दिवस केल्यावर हा यात्रेकरितां बाहेर पडला. यात्रेहून परत आल्यावर सध्यां पंचगंगा घाटावर जेथें याच्या पादुका आहेत तेथें हा राहूं लागला. श्रीवैष्णवसंप्रदायांत ब्राह्मणच आचार्यपदावर अधिष्ठित होतो. खाण्यापिण्याचे नियमहि कडक रीतीनें पाळले जातात. यात्रेकरितां हा प्रवासांत असतां यानें खाण्यापिण्याच्या बाबतींत नियम पाळले नव्हते. राघवानंदानें प्रायश्चित्त घेण्यास सांगितलें असतां यानें ती गोष्ट मानिली नाहीं. तेव्हां याला राघवानंदानें आपल्या संप्रदायांतून बाहेर काढिलें आणि यानेंहि आपला स्वतंत्र संप्रदाय स्थापन केला. 'जातिपाँति पूछै नहि कोई। हरिको भजै सो हरिका होई॥' खानपान व जातिपाति या नियमांना महत्त्व न देतां केवळ रामभक्तीला याच्या संप्रदायांत महत्त्व देण्यांत आलें. राधाकृष्णाच्या उपासनेला प्रतिस्पर्धी असा याचा हा रामसीतेच्या उपासनेवर आधारलेला पंथ होता, आणि याच्या शिष्यांनीं त्याबद्दल चांगलीच प्रगति केली. या वेळीं हिंदुस्थानांत मुसलमानांनीं जें आक्रमण चालविलें होतें त्याचें सिंहावलोकन केलें असतां रामानंदाच्या संप्रदायाचें स्वरूप चांगलें ध्यानांत येतें. रामानंदानें आपले ग्रंथ संस्कृत भाषेंत लिहिले. त्यामुळें याच्या विचाराचा प्रसार त्याच्या हयातींत लोकांत विशेष झाला नाहीं. याचीं फक्त दोन हिंदी पदें उपलब्ध झालीं आहेत. एक शिखाच्या ग्रंथसाहेबांत आहे, आणि दुसरें श्री. ग्रियर्सन यांच्याकडून मिळालेलें व श्री. बाबू श्यामसुंदरदास, काशी, यांनीं प्रसिद्ध केलेलें माझ्तीची आरती असलेलें.

याचे शिष्य—१ अनंतानंद, २ सुखानंद, ३ सुरसरानंद, ४ नरहरियानंद, ५ पीपा, ६ कबीर, ७ भावानंद, ८ सेना, ९ धना, १० रैदास, ११ पद्मावती, १२ सुरसरी. यांपैकीं शेवटल्या दोन स्त्रिया आहेत. त्यांपैकीं पद्मावतीची कांहींच माहिती नाहीं. सुरसरी ही सुरसरानंदाची पत्नी होय. यांत निकृष्ट वर्गाचेहि शिष्य दिसतात.

आपल्या पहिल्या १२ शिष्यांसमवेत तीर्थयात्रा करीत व मायावादी, जैन व बौद्ध यांच्याशीं वादविवाद करून आपलें विशिष्टाद्वैत मत स्थापून लोकांस आपल्या मताकडे वळवून आपले शिष्य करीत करीत हा सर्व देश हिंडला. याच्या शिष्यांनींहि गोपालकृष्णोपासनेशीं चांगल्या रीतीनें टक्कर देत देत रामोपासनेचा प्रसार केला.

हिंदुसमाजाच्या निकृष्ट वर्गाविषयीं कळकळ हें वैष्णव धर्माचे आरंभापासूनच विशिष्ट लक्षण आहे. जन्माच्या फेऱ्यांतून वर चढतां चढतां ब्राह्मणकुलांत जन्म घेतल्यावरच मोक्ष मिळविण्याच्या मार्गाचा अवलंब करतां येतो, असें कट्टे वेदांती प्रतिपादीत. रामानुजाचार्य वगैरेंनीं ब्राह्मणाकडेच या मार्गाचा अवलंब करण्याचा अधिकार ठेवला होता. परंतु यानें आमूलाग्र सुधारणा घडवून आणून ब्राह्मण व इतर वर्ग यांत मुळींच भेद ठेविला नाहीं. जे जे विष्णुभक्त अगर भगवद्भक्त असतील, मग ते कोणत्याहि वर्णाचे असोत, त्यांनीं एके ठिकाणीं जेवण्यास सुद्धां हरकत नाहीं, असें हा म्हणे. नवीन धर्माच्या प्रसारास मातृभाषेचा उपयोग करणें या सुधारणेसहि यानेंच आरंभ केला. रामानंदानें महत्त्वाची अशी केलेली तिसरी सुधारणा म्हणजे कृष्ण व राधा यांच्या ऐवजीं शुद्ध राम व सीता यांच्या पूजेचा प्रघात पाडला.

रामानंदाच्या चरित्रावर हिंदींत बरेंच वाङ्मय आहे. पैकीं नाभादासाचें भक्तमाला हें विश्वसनीय दिसतें.

रामानुजाचार्य—(जन्म स. १०१७–समाधि स. ११३७) विशिष्टाद्वैतमताचे प्रमुख आचार्य. याचा पिता असुरी केशव भट्टर. तो श्रीपेरुम्बुमूरचा राहणारा. मामानें याचें नांव लक्ष्मण असें ठेवलें.

यानें कांजीवरम् येथें यादवप्रकाशापाशीं अध्ययन केलें. हा कांचीच्या देवराजाचा भक्त होता. याच्या आईचा पणजोबा अलबंदर म्हणून होता.

पुढें यानें परियनम्बी यास आपला गुरु केलें, पण याचें व त्याचें फार दिवस पटलें नाहीं. पुढें यानें बायको माहेरीं गेली असतां संन्यास घेतला. पुढें याच्या ज्ञानीपणामुळें यास श्रीरंगम् येथील अलबंदरच्या जागीं नेमण्यांत आलें.

अलबंदरला दिलेल्या वचनाप्रमाणें यानें ब्रह्मसूत्रावरील टीका, भगवद्गीताटीका, वेदांतसारम्, वेदांतसंग्रह आणि वेदांतदीप हे ग्रंथ लिहिले.

याची भाष्यकार म्हणून सर्वत्र कीर्ति पसरली आणि हा काश्मीरांत जाऊन आला. याचा शिष्य 'कुरथल्वर' याचें नांव पराशर ठेवून यानें त्याकडून सहस्रनामावर टीका लिहिली.

कुलोत्तुंग चोलानें यास शैव तत्त्वावर वाद करण्याकरितां बोलावलें. हा वैष्णव असल्यानें गेला नाहीं, पण आपला शिष्य कुरथल्वर यास संन्यासाचा वेष देऊन पाठविलें. पण त्याचा तेथें वध करण्यांत आला. हा गृहस्थाचा वेष घेऊन बिट्टीदेव होयसळाच्या राज्यांत गेला. तेथें बिट्टीदेवाच्या मुलीच्या अंगांतील भूत काढल्यानें त्याची याच्यावर श्रद्धा बसली. पुढें श्रीरंगम् येथें आला. 'कुरथल्वर' च्या मृत्यूबद्दल दुःख प्रदर्शित केलें. नंतर यानें आपल्या विशिष्टाद्वैत मताचा सर्वत्र प्रचार केला व वयाला एकशें बीस वर्षें झाल्यावर समाधि घेतली. याची समाधि होयसळ येथें आहे. याचें तत्त्वज्ञान म. म. वासुदेवशास्त्री अभ्यंकर यांनीं संस्कृतमध्यें खंडनासह 'अद्वैतामोदः' या ग्रंथांत दिलें आहे. आणि तो ग्रंथ आनंदाश्रम-ग्रंथमालेंत प्रसिद्ध झाला आहे.

रामाश्रम—याचे पित्याचें नांव भट्टोजी. हा वत्सराजाचा गुरु होय. या वत्सराजानें स. १६४१ मध्यें वाराणशीदर्पण नांवाचें पुस्तक संस्कृतमध्यें लिहिलें. अमरकोशावरील प्रसिद्ध रामाश्रमी नांवाची टीका यानें लिहिली (C. C.). याचें नांव भानु दीक्षित असें होतें.

रामिल—एक प्राचीन नाटककार (मालविकाग्निमित्र).

रामीरामदास—(स. १६०५–१६७७) हा रामदासस्वामींचा ज्येष्ठ बंधु असून याचें दुसरें नांव गंगाधर असें होतें. हा रामदास-सांप्रदायांत जरी 'श्रेष्ठ' या नांवानें प्रसिद्ध आहे, तरी सर्वसामान्य लोक याला 'रामीरामदास' या नांवानेंच ओळखतात व स्वतः यानेंहि आपल्या कवितेंत 'रामीरामदास' असाच स्वनामोल्लेख केला आहे.

शके १५९९ च्या फाल्गुन वद्य १४ स यानें दहीफळ येथें आपला देह ठेवला. याची पत्नी सती गेली. यास रामचंद्रबाबा व शामजीबाबा असे दोन पुत्र होते. याचें वृंदावन दहीफळ येथें असून त्यास मोगलाईंतून ८० रु. वर्षासन आहे (म. क. च. भा. ५, पृ. १–२३). याचे ग्रंथ—सुगमोपाय व भक्तिरहस्य.

रामेश्वरभट्ट—(स. १५१३ सुमार) काशींतील भट्ट घराण्याचा मूळ पुरुष. हा गोविंदभट्टाचा पुत्र. याच्यापासून या घराण्याचा लौकिक फार वाढला. या देशस्थ ऋग्वेदी आश्वलायन ब्राह्मणाच्या घराण्यांतील एकानें गाधीवंशचरित नांवाचा एक ग्रंथ लिहिला आहे. या घराण्याचें गोत्र विश्वामित्र असल्यानें वरील ग्रंथांत या घराण्यांतील माणसांची माहिती दिली आहे. यांत याच्या पैठणच्या विद्यापीठाला श्रीरामचंद्राच्या सैन्याची उपमा दिली आहे. हा मीमांसा, व्याकरण, न्याय व वेदांत या चारहि शास्त्रांत निष्णात होता. हा चमत्कार करून दाखवीत असे. या याच्या कीर्तीमुळें निजामशाहीच्या बादशहानें रामेश्वरभट्टाला एकदां सुवर्णमुद्रांकित निमंत्रण पाठवून आपल्या दरबारीं बोलाविलें व याचा बहुमान केला, असा उल्लेख सांपडतो. तेथून हा विद्यानगर येथें गेला. पुढें हा द्वारकेस यात्रेस जात असतां वाटेंत यास नारायणभट्ट नांवाचा पुत्र झाला (स. १५१३). तेथें गेल्यावर यानें महाभाष्य व सुरेश्वरवार्तिक यांचें अध्ययन अनेक शिष्यांकडून करविलें. नंतर पैठणास येऊन हा काशीस गेला.

पुढें हा काशीसच कायम झाला. रामकृष्ण, कमलाकर आणि दिनकर हे याचे बाकीचे मुलगे तेथेंच झाले. त्यांच्या सोयरिकी वगैरे तेथेंच झाल्या. याची शिष्यपरंपरा फार मोठी होती. याच्या शिष्यांमध्यें अनंतभट्ट चितळे, दामोदरसरस्वती, माधवसरस्वती, गुजराथेंतील गोविंद द्विवेदी, दक्षिणेंतील वेदांताचे अध्यापक आचार्यभट्ट, विश्वनाथ तुळशी, गीतगोविंदाचा टीकाकार कनोज येथील शंकरमिश्र शर्मा वगैरे होत. वरील माधवसरस्वती हा मधुसूदनसरस्वतीचा गुरु होय. हल्लींच्या दर्भंगा राज्याचा मूळ संस्थापक, व दर्पण या ग्रंथाचा कर्ता, मिथिला येथील रहिवाशी, महेश ठक्कर हाहि

रामेश्वरभट्टाचाच शिष्य होय. सर्वच प्रांतांतील लोक याच्या शिष्यवर्गांत होते, असें वरील ग्रंथांत म्हटलें आहे.

रामेश्वरभट्ट वाघोलीकर—(स. १६४० सुमार) पुण्याजवळ वाघोली म्हणून एक गांव आहे तेथील हा राहणारा, मोठा विद्वान् ब्राह्मण होता. तुकारामाचे अभंग इंद्रायणींत बुडविणारा तो हाच. पुढें तुकारामाच्या वह्या शाबूत निघाल्यावरून हा तुकारामाच्या मागें टाळकरी होऊन राहिला.

रामोजी शेणवी कोठारी—हा गोवें प्रांतांतील डिचोलीचा राहणारा. स. १६६२ च्या मे महिन्यांत शिवाजीचा मुक्काम वेंगुर्ल्यास होता. त्या वेळींहि शिवाजीनें मोगलांविरुद्ध मिळविलेल्या जयाबद्दल अभिनंदन करण्यासाठीं गोवेकर अधिकाऱ्यांनीं याला वकील म्हणून धाडलें होतें. बरोबर मौल्यवान् नजराणाहि दिला होता. पण आधींच शिवाजी निघून गेला असल्यामुळें याला भेट घेतां आली नाहीं. पुढें आग्ऱ्याहून शिवाजी सुखरूप सुटून आल्यावर हा रायगडीं शिवाजीला जाऊन भेटला व तहाची वाटाघाट करून परत आला. याच्याबरोबर शिवाजीनें आपला 'सकोपंत' नांवाचा वकील गोव्यास पाठविला; व त्याबरोबर गोव्याच्या सरकारला एक घोडा व पोषाखहि नजराणा म्हणून पाठविला. तेथें दोघांचा मित्रत्वाचा तह झाल्यावर सखोपंताबरोबर फादर गोंसाळू मार्तीस ह्या माणसास ३२२ असुर्फ्या किंमतीचा नजराणा देऊन शिवाजीकडे पाठविलें. तेव्हांच्या तहांत गोमांतकांत पळून आलेल्या वाडीकर सावंतानें 'जुनें' गोवें या शहराबाहेर जाऊं नये; व शिवाजीशीं लढाई करूं नये असें ठरलें. तहाची तारीख ५ डिसें. स. १६६७ (श. १५८९ मार्ग. ३०); (शिवचरित्रप्रदीप, पा. १७९-१८०).

राय ईश्वरीप्रताप नारायणराय—(जन्म स. १८०२) निम्बार्कसांप्रदायी. पडरौना राजवंशांत जन्म. प्रसिद्ध हिंदी कवि. ग्रंथ-रहस्यकाव्यशृंगार. हिंदी व संस्कृत कवि.

रायनी भास्कर—(स. १३००सुमार) तैलंगणांतील कौंडविदू येथील ब्राह्मण. तेलंगींत रामायणाचें यानें भाषांतर केलें. हा शालिवाहनाच्या तेराव्या शतकांत होता.

राय पिठोरा—पृथ्वीराज चौहान याला हें दुसरें नांव आहे.

रायबागीण—(स. १६५८-७०) ही शूर स्त्री जगजीवनराम उदारामाची पत्नी. नवरा मेल्यावर हरचंदराय रजपुताची स्वारी झाली तेव्हां हिनें 'बहिणीची लज्जा राखा' असा जाहीरनामा काढून व चोळीचें निशाण करून ती परत फिरविली. तेव्हां औरंगजेबानें 'पंडिता,' 'राजव्याघ्री' म्हणजे 'रायबागन' असे हिला किताब दिले. स. १६७० सालीं शिवाजीनें सुरत लुटली हें कळतांच महाबतखानाबरोबर हिलाहि शिवाजीवर त्यानें पाठविलें. पण तेव्हां ही कैद झाली. पण शिवाजीनें हिचा सन्मान करून हिला परत धाडलें व हिनेंहि त्याची धर्मकन्या म्हणवून घेतलें (सप्तप्रकरणात्मक शि. ब.). हिचा पुत्र बाबूराव.

रायमल्ल गुहिलोत—(स. १४७३-१५०९) हा कुंभकर्णाचा पुत्र. याचा थोरला भाऊ उदयसिंह. उदयसिंहापासून यानें राज्य घेतलें (उदयसिंह पाहा). याचा पुत्र संग्रामसिंह ऊर्फ संगराणा. ज्वरतिमिरभास्कर-कार कायस्थ चामुंडाला याचा आश्रय होता.

रायसिंग—(स. १५००) बिकानेरच्या कल्याणसिंगचा मुलगा. हा अकबराचा सेनापति. याची मुलगी जहांगिरास दिली.

रायसिंग सिसोदिया—(स. १६६६) औरंगजेबाच्या दरबारांतील पंचहजारी महाराणा भीमसिंहाचा मुलगा. 'याच्या लष्कराच्या पाठी माझ्या लोकांनीं पाहिल्या असतील. याचे खालीं आपण उभें राहावें म्हणजे काय?' असें औरंगजेबाच्या दरबारांत शिवाजीनें रायसिंगास म्हटलें (सभा. ब. पृ. ४७). बखरींत जसवंतसिंगाचा उल्लेख आहे. पण तो पंचहजारी नसून सहाहजारी होता. म्हणजे शिवाजीपासून तो बऱ्याच वरच्या रांगेंत असला पाहिजे (सरकारकृत शिवाजी १५९).

रायसिन्हा—(कुत्बुद्दीन लंगा पाहा).

रायाजी कान्होजी भोसले भापकर—(स.१७३९-४७ सुमार) हा कान्होजी भोसल्याचा मुलगा. कांहीं ठिकाणीं याचें नांव रामजी असेंहि दिलें आहे तें चुकीचें आहे. रायाजी हेंच नांव खरें आहे (पे. द. २०. २३). बापाप्रमाणेंच याच्याहि क्रूरपणाचा फार बोभाटा होता. रघूजी व हा यांचा शेवटपर्यंत सरंजामाकरितां तंटा होता. हा निपुत्रिक मरण पावला.

रावण—याचें वेदावर भाष्य आहे (c.c.). त्यांतील कांहीं उतारे शतश्लोकीवरील आनंदगिरीच्या टीकेंत घेतले आहेत. याशिवाय याचा ऋग्वेदाचा पदपाठहि अर्धवट उपलब्ध झाला आहे. यावरून रावणानें वेदाचीं खंडें केलीं ही आख्यायिका उत्पन्न झाली असावी.

रावसुरजन—(स. १५५४ राज्यारोहण) बुंदी संस्थानचा राजा. हा गादीवर आल्यापासून संस्थानास नवें वळण मिळालें. यानें रणथंभोरचा किल्ला आपल्या

ताब्यांत घेतला, पण तो पुढें अकबरानें घेतला. यानंतर बुंदीचे राजे मुसलमानी अमलाखाली गेले.

राष्ट्रकूट घराणें—१ दंतिवर्मन् १ ला, २ इंद्र १ ला, ३ गोविंद १ ला, ४ कर्क १ ला, ५ इंद्र २ रा (कर्काचा पुत्र), ६ दंतिदुर्ग (स. ७४५-५८ सुमार), ७ कृष्ण १ ला (कर्काचा पुत्र. स. ७६८-७२), ८ गोविंद २ रा (स. ७७२-७८३), ९ ध्रुव (कृष्णाचा पुत्र व गोविंदाचा भाऊ. स. ७८३), १० गोविंद ३ रा (दुसऱ्या गोविंदाचा पुत्र. जगत्तुंग (?) स. ७८३-८१४), ११ अमोघवर्ष १ ला (स. ८१४-७७), १२ कृष्ण २ रा (स. ८७७-९३. अमोघवर्षाचा पुत्र), १३ जगत्तुंग (स. ९१३ सुमार याची मुलगी भाग्यवती), १४ इंद्र ३ रा (स. ९१३-२२), १५ अमोघवर्ष २ रा (स. ९२२), १६ गोविंद ४ था (स. ९२२-३४), १७ अमोघवर्ष ३ रा (स. ९३४-३७ हा तिसऱ्या इंद्राचा भाऊ), १८ कृष्ण ३ रा (स. ९३९-६५), १९ खोत्तिग (जगत्तुंग. स. ९६५-७३), २० कर्क २ रा (अमोघवर्ष ४ था. स. ९७२-७३), २१ इंद्र ४ था (तिसऱ्या कृष्णाचा नातू, मृत्यु स. ९८२).

वरील काल अगदीं निश्चित नाहींत. या घराण्याचे विवाहसंबंध गंग, कलचुरी, चालुक्य व चेदी घराण्यांशीं दिसतात. सुमारें दोनशें वर्षे यांचें राज्य भरभराटींत होतें (स.७५३-९७३). महाराष्ट्रांतील लोकांपैकीं कांहीं आपणास रठ्ठी व भोज म्हणवीत. त्यांच्या संघाचें नांव राष्ट्रकूट दिसतें. याचा अपभ्रंश राठोड होय. यांपैकीं दंतिदुर्गानें पहिल्या कीर्तिवर्म्याला जिंकून बदामीस (वातापी) राजधानी केली; आणि कांची, कलिंग, कोसल, मालव, लाट (गुजराथ) व टंक (पंजाब) देश जिंकले.

शिलालेखावरून हे यादवांपैकीं सात्यकीच्या घराण्यांतील होते. यांच्या एका मूळ पुरुषाचें नांव रठ्ठ होतें. म्हणून यास राष्ट्रकूट हें नांव मिळालें.

दंतिदुर्गाचा पुत्र कृष्णानें वेरूळचें कैलासमंदिर खोदवून आपल्या कलाप्रियतेचें अद्वितीय स्मारक करून ठेवलें आहे. तिसऱ्या गोविंदानें विरोधी बारा राजांचा पराभव केला. आणि आपल्या राज्याला साम्राज्याचें स्वरूप आणलें. याचा भाऊ इंद्रराजानें गुजराथची शाखा सुरू केली. तिसऱ्या इंद्रानें कनोजच्या महीपालाला जिंकलें व सुराष्ट्र (काठेवाड) आपल्या राज्याला जोडलें. दुसऱ्या कर्काच्या वेळीं दुसऱ्या तैल चालुक्यानें याची सत्ता घेतली. हे अरब राजांशीं व व्यापाऱ्यांशीं चांगले संबंध ठेवीत, त्यामुळें यांचे राज्याबद्दल त्यांनीं धन्योद्गार लिहून ठेवले आहेत.

राष्ट्रकूट राजे हिंदुधर्मीय होते. यांच्या कारकीर्दीत बुद्धधर्म अधोगतीला गेला तरी ह्यांच्यापैकीं अमोघवर्षानें जैनांच्या दिगंबरपंथाचा पुरस्कार केला. जिनसेन, गुणभद्र वगैरे ९ व्या शतकांतील जैन लोकाग्रणींना राष्ट्रकूट राजांनीं मुक्तहस्तानें मदत केल्यामुळें जैनधर्माचा प्रसार झाला व कदाचित् जैनधर्माच्या प्रसारामुळेंच बुद्धधर्माचा ऱ्हास होण्यास मदत झाली असेल. परंतु जैन व वैदिकांमध्यें मात्र कलह उत्पन्न झाला. स. ९४९ मध्यें कृष्ण (३ रा राष्ट्रकूट) व चोलराजा राजादित्य यांच्यामध्यें जो घनघोर संग्राम झाला त्यास जैन व वैदिक यांमधील द्वेषाग्नीच मुख्यतः कारणीभूत होता.

संस्कृत ग्रंथरचनेस या राजांनीं चांगलें प्रोत्साहन दिलें. मात्र या काळांतील संस्कृत ग्रंथांची भाषा कृत्रिम सौंदर्यानें नटलेली दिसते. यांचे लेख कानडी व संस्कृत भाषेंत आहेत.

राहप गुहिलोत—(स. ११५० सुमार) मेवाडच्या राजघराण्यांपैकीं हा रणसिंहाचा पुत्र. रणसिंहाला कर्णसिंहहि म्हणत. हा एकदां शिकार करीत असतां सोडलेला बाण चुकून कपिलदेव नांवाच्या ब्राह्मणास लागला. तेव्हां याला पश्चात्ताप होऊन प्रायश्चित्त म्हणून केळवड्याला यानें कपिलकुंड बांधलें (वीरविनोद, भा. १, पृ.२८८-८९).

याला कुष्ठरोग होता. त्यावर उपाय जोधपूरराज्यांतील सांडेराव येथील यतीनें केला. तेव्हांपासून त्याच्या शिष्यांचा सन्मान या राजघराण्यांत होऊं लागला. त्या यतीच्या सांगण्यावरून त्याचा एक शिष्य सरसल म्हणून होता त्याला यानें आपला पुरोहित केलें. सरसल पल्लीवाल जातीचा ब्राह्मण होता. तेव्हांपासून या घराण्याचें पौरोहित्य चौबीसे ब्राह्मणांकडून पल्लीवाल ब्राह्मणांकडे आलें. डुंगरपूर व बांसवाडे येथील घराण्यांत अद्यापि चौबीसे ब्राह्मण पुरोहित आहेत.

राहिल चंदेल—(स. ८९०-९१०) विजयानंतर राहिल यानें राज्य केलें. याची पराक्रमाविषयीं बरीच ख्याति होती. याची राजधानी महोबा होय. राहिल राजाच्या पराक्रमाचें वर्णन पृथ्वीराज चव्हाणाच्या चंदभाटानेंहि केलें आहे. याच्या कन्येचा विवाह तत्कालीन चेदीच्या गादीवर असलेल्या कोकल राजाशीं झाला.

राहुल—गौतमबुद्धाच्या पुत्राचें नांव. याला बुद्धदेवानें कपिलवस्तु येथें सारिपुत्राकडून प्रव्रज्या दिली होती. हा वैभाषिक नांवाच्या दर्शनाचा आचार्य होता. हा प्रव्रज्या न घेतलेल्या ब्रह्मचाऱ्यांचा अग्रगण्य व पूज्य मानला जातो. प्रव्रज्या न घेतलेल्या ब्रह्मचाऱ्यांना सामनेर असें म्हणतात.

राहुलपा—हा चौऱ्यांशी सिद्धांपैकीं सत्तेचाळिसावा सिद्ध होय. हा जातीनें ब्राह्मण होता. याचा देश कामरूप. हा सरहपाच्या चवथ्या पिढींतील होय. यासच राहुलभद्र असें म्हणतात. यानें अचिन्त्यपरिभावना हा ग्रंथ लिहिला (तं. ४८-७३).

राक्षस—पाटलिपुत्र येथील नंद घराण्याचा मुख्य प्रधान. हा जातीनें ब्राह्मण असून राजनीतींत अत्यंत निपुण होता. पण चाणक्यानें यावरहि विजय मिळवला. चंद्रगुप्ताला नंदाची गादी मिळवून दिली व याला चंद्रगुप्ताचा प्रधान होण्यास भाग पाडलें, असें विशाखदत्ताच्या मुद्राराक्षसावरून दिसतें.

रिचर्ड केग्विन—(स.१६८३) इंग्रज आरमारावरील एक अधिकारी. यानें स. १६८३ त मुंबईच्या डेप्युटी गव्हर्नरास कैद करून सर्व कारभार आपल्या ताब्यांत घेतला. यानें राजाच्या नांवानें जाहीरनामा काढून, आपण राजाचा मान राखीत आहों आणि बंडखोर कंपनीस शासन करीत आहों, असें जाहीर केलें. अशा रीतीनें एक वर्षभर यानें वाटेल तसा दंगा केल्यावर, कंपनीचा अधिकार अगदींच बुडतो कीं काय, असें लोकांस वाटूं लागलें. सुरतेच्या अधिकाऱ्यासहि कैद करण्याचा याचा इरादा होता. पण चार्लस राजानें स्वदस्तूरचा हुकूम पाठवून केग्विन यास पकडिलें. पुढें यास माफी देण्यांत आली (ब्रि. रि. पूर्वार्ध, पृ. ३०१).

रुक्नुद्दीन इब्राहीम खल्जी—(स. १२९६ खून) दिल्लीचा बादशाहा. हा जलालुद्दीन फीरूझचा मुलगा. हा गादीवर बसण्याची बापाची इच्छा नसतांना देखील, याच्या आईनें यास गादीवर बसविलें. याच वेळेस अलाउद्दीन खल्जीनें साठ हजार फौज जमा करून दिल्लीचें तख्त बळकाविलें व हा याचा भाऊ अर्कलीखानाकडे पळून गेला. तेथें अलाउद्दीनानें सैन्य पाठवून या दोघां भावांस पकडून आणून ठार मारलें.

रुक्नुद्दीन फीरूज गुलाम—(स. १२३६ खून) दिल्लीचा सुलतान. स. १२३६ त शम्सुद्दीन अल्तमश मरण पावल्यावर यास गादीवर बसण्याची इच्छा नसतांना देखील याला सरदारांनीं गादीवर बसविलें. यानें गादीवर बसल्यावर वाटेल तसा राज्यकारभार करण्यास सुरुवात केली. त्यामुळें यास प्रतिकार करण्यासाठीं पुष्कळ शत्रू उत्पन्न झाले. हा बंडें मोडण्यासाठीं दिल्लीच्या बाहेर पडला व तिकडेच याचा खून झाला (स. १२३६). याच्यानंतर रझिया नांवाची स्त्री गादीवर बसली.

रुक्नुद्दीन बार्बकशाह—(स. १४६०-७४) बंगालचा राजा).

रुक्नुद्दौला—(मृत्यु स. १७७५) निजामाचा दिवाण.

रुक्मिणी—एकनाथस्वामींची आई.

रुखरस्वामी—(स. १८१६ सुमार) हा एक साधुपुरुष होता. खैरागड संस्थानच्या टिकाइतरायानें या स्वामीस प्रथम एक झोंपडी बांधून दिली. पुढें त्याच झोपडीचें एक मोठें देऊळ बांधलें. या साधूस भविष्य चांगलें कळत असे, असा याचा लौकिक होता. पुढें हा स्वामी एकाएकीं नाहींसा झाला. पुढें ज्या वेळीं टिकाइत राजावर संकट आलें त्या वेळीं यानें पुन्हा प्रगट होऊन संकट टाळण्याविषयीं राजास उपाय सांगितले. यानें जिवंतपणींच समाधि घेतली असें म्हणतात.

रुचिदत्तमिश्र सोदरकुल—(स. १४७५ सुमार) हा पक्षधर अथवा जयदेवमिश्राचा शिष्य होय. याची आई रेणुका व बाप देवदत्त. यास शक्तिदत्त व मणिदत्त नामक दोन बंधु होते. ग्रंथ-गणेश उपाध्यायाच्या तत्त्वचिंतामणीवरील ' तत्त्वचिंतामणिपरीक्षा ' नांवाची टीका व न्यायकुसुमांजली-प्रकाशमकरंद नांवाच्या वर्धमानानें उदयनाचार्याच्या न्यायकुसुमांजलीवर लिहिलेल्या टीकेवरील टीका (हिस्टरी ऑफ इंडियन लॉजिक, पा. ४५७).

रुद्र—(स. १५९६) राष्ट्रौढवंशमहाकाव्याचा कर्ता. याचा आजा केशव व पिता अनंत. प्रतापगिरीचा नारायणशाहा व त्याचा मुलगा प्रतापशाहा यांचा हा आश्रित होता. नारायणशाहाच्या आज्ञेवरून वरील काव्य यानें लिहिलें. यानें संस्कृतांत ' जहांगीरशाहचरितम् ' हा ग्रंथ लिहिला, व त्याचे विभाग प्रतापशाहाचे सांगण्यावरून पाडले. त्याचा कांहीं भाग नाशिक येथें सांपडला आहे. राष्ट्रौढवंशमहाकाव्य बडोदा ओरिएंटल सीरीजमध्यें छापलें आहे.

२. (१६५० सुमार) कानडी कवि. वीरशैव. याचें गांव बोम्मूरु (श्रीरंगपट्टजवळ). यानें नागण्याचें चरित्र लिहिलें आहे. याचे ग्रंथ-करस्थळ, नागण्यचरित्र.

रुद्रट—(स. ८००-५०) याच्या पित्याचें नांव भट्टवामुक. हा सामवेदी ब्राह्मण होता. नांववरून हा काश्मीरी दिसतो. रुद्रटाला शतानंद असेंहि म्हणत. यानें ' काव्यालंकार ' नांवाचा ग्रंथ लिहिला. तो नमिसाधुकृत टीकेसहित काव्यमालेंत छापला आहे. हा ग्रंथ फार विस्तृत असून त्याचे सोळा अध्याय आहेत. त्यांत संपूर्ण साहित्याशास्त्राचें समालोचन केलें आहे. त्यांत बहुतांशीं आर्यावृत्तांची योजना केलेली असून मधूनमधून क्वचित व

विशेषतः अध्यायांच्या शेवटीं निराळीं वृत्तें योजलेलीं आहेत. त्यांतील सर्व उदाहरणें रुद्रटानें स्वरचितच दिलेलीं आहेत. काव्यालंकाराची श्लोकसंख्या ७३४ आहे. पण बाराव्या अध्यायांत त्या श्लोकांशिवाय आणखी १४ श्लोक दिले असून त्यांत आठ प्रकारच्या नायिका व त्यांचे आणखी उपप्रकार वर्णिलेले आढळतात. हे श्लोक प्रक्षिप्त असावे, असें काव्यमालेच्या विद्वान् संपादकांचें मत आहे. परंतु हें मत संपूर्णपणें बरोबर दिसत नाहीं. कारण तेथें चार नायिकांच्या व्याख्येची जरूरी आहे. म्हणून त्यांत ते मूळचे असून बाकीचे दुसरीकडून घेतले गेले. कांहीं निश्चित तत्त्वांना अनुसरून अलंकारांचें वर्गीकरण करण्याचा प्रयत्न रुद्रटानें प्रथम केलेला आढळतो. रुद्रटानें कोणत्याहि ग्रंथकाराचा स्पष्ट नांवानें उल्लेख केलेला आढळत नाहीं. पण भरताचें नाट्यशास्त्र व मयूरकवीचें सूर्यशतक यांचा उल्लेख अनुक्रमें आचार्यैः (१२·४), व रोगविमुक्ति (१·९) या शब्दांनीं केलेला असावा असें दिसतें. हा रुद्रट व शृङ्गारतिलककर्ता रुद्रभट्ट हे एकच होत, असें वेबर, आफ्रेक्ट, बुल्हर व पिशेल यांचें मत आहे. पंडित दुर्गाप्रसाद, याकोबी व काणे हे ते भिन्न मानतात.

रुद्रदामा क्षत्रप—(स. १४०–१५८) हा जयदामा क्षत्रपाचा पुत्र. कच्छमधील अंधौ गांवीं याचे चार शिलालेख मिळाले आहेत. ते शा. शक ५२ मधील आहेत (एपि. इंडि. भा. १६, पृ. २३–२५). त्यांमध्यें चष्टन व रुद्रदामन् या नांवांपुढें क्षत्रप या शब्दाऐवजीं राज्ञः असा शब्द घातला आहे. पण ष्टामोतिक व जयदामा या नांवांबरोबर तसा राज्ञः शब्दाचा प्रयोग नाहीं. यावरून या शकाच्या पूर्वीच हा राजा झाला असावा असें दिसतें. गिरनारजवळ अशोकाच्या चौदा आज्ञा कोरलेला खडक आहे. तेथेंच रुद्रदामन्चा एक शिलालेख कोरलेला आहे. त्यावरून युद्धाशिवाय मनुष्यवध करावयाचा नाहीं, अशी यानें प्रतिज्ञा केली होती असें दिसतें. हा आकारवंती (सर्व माळवा), अनूप, आनर्त (उत्तर काठेवाड), सुराष्ट्र (दक्षिण काठेवाड), श्वभ्र (उत्तर गुजराथ), मरु (मारवाड), कच्छ, सिंधुसौवीर, कुकुर, अपरांत, निषाद इत्यादि देशांचा राजा होता. याच्या राज्यांत चोरांचें भय नव्हतें. तसेंच याच्यावर याची प्रजा अनुरक्त होती. क्षत्रियांपैकीं वीर अशी पदवी धारण करणाऱ्या यौधेय लोकांना यानें नष्ट केलें होतें. दक्षिणपथाचा अधिपति सातकर्णी यास यानें दोनदां पराभूत केलें, पण जवळचा संबंधी असल्यामुळें त्याला ठार केलें नाहीं. पदच्युत केलेल्या राजांनाहि यानें पुनः त्यांच्या राज्यांवर स्थापन केलें. हा धार्मिक होता. व्याकरण, संगीत, तर्क वगैरे शास्त्रांचा ज्ञाता; अश्व, रथ व हत्ती यांच्यावर बसण्यांत पटाईत; तलवार व ढाल यांनीं लढण्यांत कुशल आणि उत्तम सेनापति होता. याचा खजिना अगणित संपत्तीनें भरलेला होता. गद्य व पद्य अशा दोनहि तऱ्हांनीं लिहिण्यांत हा कुशल होता. महाक्षत्रप हें पद यानें स्वतः स्वीकारलें होतें. अनेक राजकन्यांनीं याला स्वयंवरांत वरलें होतें. याच्या वेळीं शा. शक ७२ मार्गशीर्ष वद्य १ रोजीं अतिवृष्टि झाली; आणि ऊर्जयंत (गिरनार) पर्वतावरून निघणारी सुवर्णसिकता, पलाशिनी वगैरे नद्यांना पूर येऊन सुदर्शन तलावाचा बांध वाहून गेला. तो बांध ४२० हात लांब आणि ७५ हात उंच होता असें म्हणतात. तो पुनः बांधून काढणें कठीण होतें. पण याच्या आज्ञेनें आनर्त आणि सुराष्ट्र या प्रांतांचा राजा सुविशाख यानें पहिल्यापेक्षां तिप्पट मजबूत बांधून काढला. त्याचा सर्व खर्च प्रजेवर कर-रूपानें न लादतां राजानें आपल्या खजिन्यांतूनच केला (एपि. इंडि. भा. ८, पृ. ४२–४५; इंडि. अँटि. भा. ७, पृ. २२६–६१). या लेखावरून दिसून येतें कीं याची राजधानी काठेवाडांत नव्हती. याची राजधानी उज्जयनी असावी. याला दोन पुत्र होते. पहिला दामघ्सद (दामजदश्री), व दुसरा रुद्रसिंह. यांपैकीं पहिला मुलगा याच्यानंतर याच्या गादीवर आला.

स. १४५ मध्यें यानें आपला जांवई, आंध्र राज्यांतील राजा पुलोमायी याचा पराभव केला आणि काठेवाड, कच्छ, माळवा, सिंध, कोंकण वगैरे प्रांतांत स्वतंत्रतेनें राज्य करूं लागला. याशिवाय यानें, आंध्र राजा विलिवायकुर यानें नहपानापासून घेतलेल्या प्रांतांपैकीं, पुणें व नाशिक हे प्रांत खेरीज करून बाकीचे सर्व प्रांत परत मिळविले. यानें स. १५० पर्यंत राज्य केलें.

२. (स. ३४८ सुमार) हा कोणाचा पुत्र होता ही माहिती अद्यापि उपलब्ध झाली नाहीं. कारण याचीं नाणीं अद्यापि उपलब्ध नाहींत. याचें हें नांव व महाक्षत्रप ही अधिकारदर्शक पदवी याचा पुत्र स्वामि रुद्रसेन दुसरा याच्या नाण्यावर मिळते. याचा व स्वामि जीवदामा याचा कांहीं निकट संबंध म्हणजे ते पितापुत्र असावे. जीवदामाचा पुत्र रुद्रसिंह व नातू यशोदामा यांचीं नाणीं मिळालीं आहेत. त्यांवर त्यांना क्षत्रपच म्हटलें आहे.

रुद्रदेव—हा पैठणचा कवि. यानें धर्मशास्त्रावर 'संस्कारप्रतापनारसिंह' नांवाचा ग्रंथ संस्कृतांत लिहिला.

२. नेपाळच्या ठाकुरी घराण्यांतील राजा. हा नंददेवाच्या नंतर गादीवर आला व शेवटीं बुद्ध भिक्षु झाला.

३. हा रुद्रदेव व मेलांबिका (मेळलमहादेवी) यांचा पुत्र. नाथवाडीचा राजा (एपिग्राफिक कलेक्शन फॉर १९०९, नं. २२५).

रुद्रधर—(स. १४२५-१४६३) धर्मशास्त्रकार. हा मैथिल होता. याचे ग्रंथ-शुद्धिविवेक, श्राद्धविवेक, वर्षकृत्य, व्रतपद्धति. हा महामहोपाध्याय लक्ष्मीधर यांचा पुत्र व हलधराचा धाकटा भाऊ होय.

रुद्रन्यायवाचस्पति—(स. १६२५ सुमार) हा विद्यानिवास भट्टाचार्याचा पुत्र असून विद्यावाचस्पतीचा नातू होता. या विद्यावाचस्पतीचा गौडच्या राजानें बहुमान केला होता. विश्वनाथ सिद्धान्तपंचानन हा याचा धाकटा भाऊ असून, गोविंदभट्टाचार्य चक्रवर्ति हा याचा पुत्र होता. त्याच्या बापाच्या आज्ञेवरून शके १५१० अथवा स. १५८८ त लक्ष्मीधराच्या कल्पतरूची नक्कल (दानखंड) करण्यांत आली. भवसिंहावर लिहिलेल्या कवितेवरूनहि याचा काल ठरवितां येतो. या भवसिंहाचा बाप मानसिंह हा अकबराचे वेळीं स. १५९३ ते १६०५ पर्यंत बंगालचे सुभेदारीवर होता. उपरिनिर्दिष्ट रुद्रन्यायवाचस्पति व भवनाथ सिद्धान्तवागीशाचा नातू रुद्रराम तर्कवागीश हे दोघेहि भिन्न होत. ह्या रुद्रारामाचा तत्त्वज्ञानावरील ग्रंथ रौद्री या नांवानें संबोधिला जातो. रुद्रन्यायवाचस्पतीनें खालील ग्रंथ लिहिले आहेतः—

(१) तत्त्वचिंतामणिदीधितिपरीक्षा.

(२) किरणावली-प्रकाश-निवृत्ति-परीक्षा.

(३) पदार्थ-खण्डन-व्याख्या.

(४) भवविलास-उपरिनिर्दिष्ट भवसिंहाच्या सन्मानार्थ लिहिलेली कविता.

(५) भ्रमरदूतम्.

(६) वृन्दावनविनोदकाव्य.

(हिस्टरी ऑफ इंडियन लॉजिक, पा. ४७६-७७).

रुद्रप्रताप—बुंदेले घराण्यांतील एक पराक्रमी पुरुष. यानें आपल्या पराक्रमानें बुंदेले कुलास विशेष महत्त्व आणलें. यास बारा पुत्र झाले. ते एकापेक्षां एक पराक्रमी व शूर निपजले.

रुद्रभट्ट—' शृंगारतिलक ' ग्रंथाचा कर्ता. हा व रुद्रट एक नाहींत.

२. हा वैष्णव ग्रंथकार वीर बल्लाळ होयसळाच्या कारकीर्दींत होऊन गेला. यानें ' जगन्नाथविजय ' नांवाचा ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ जैन कवींच्या धर्तीवर आहे. यांत कृष्णजन्मापासून बाणासुरयुद्धापर्यंत इतिहास आहे.

रुद्रभूति—हा आभीर घराण्यांतील एक राजा. हा उत्तम सेनानायक होता. याचा पहिल्या रुद्रसिंह क्षत्रपाच्या कारकीर्दींत (स. १८१) सेनापति म्हणून निर्देश आला आहे.

रुद्रम्मा काकतीय—(राज्यकाल स. १२६१-९१) हिला रुद्रदेव महाराज असेंहि म्हणत. ही गणपतीला सोम राणीपासून झालेली मुलगी होय. गणपतीला मुलगा नसल्यानें त्यानें हिला राज्यकारभाराचें शिक्षण दिलें.

मार्कोपोलोनें हिच्याबद्दल म्हटलें आहे—४० वर्षे हा देश या राणीच्या ताब्यांत आहे. हिच्या मागच्या राजापेक्षां हिनें आपलें राज्य व्यवस्थित चालविलें. ही न्यायी व लोकप्रिय आहे.

कांहीं ठिकाणीं असा उल्लेख आहे कीं, या राणीला मुम्मादेवी नांवाची एकच मुलगी होती, व हिनें महादेवाशीं लग्न केलें होतें. हिचा मुलगा रुद्र हा वयांत आल्यावर हिनें त्यावर राज्य सोंपविलें.

दोन शिलालेखांत असें म्हटलें आहे कीं, वीरभद्रेश्वर चालुक्याशीं हिनें लग्न केलें होतें.

रुद्रराम—(स. १७५० सुमार) हा भवानंद सिद्धांतवागीशाचा पुत्र. याचे ग्रंथ-१ वादपरिच्छेद, २ कारकव्यूह, ३ चित्ररूप, ४ अधिकरणचंद्रिका, ५ वैशेषिकशास्त्रीयपदार्थनिरूपण (हि. इं. लॉ., पा. ४८४).

रुद्रसिंह क्षत्रप—(स. १८१-१९०) हा रुद्रदामा क्षत्रपाचा दुसरा मुलगा. हा आपल्या थोरल्या भावाच्या म्हणजे दामश्सदच्या मागाहून अधिकारावर आला असावा. याचीं चांदीचीं नाणीं शा. शक १०३-११० पर्यंतचीं मिळालीं आहेत (स. १८१-१८८). शा. श. ११०-११२ (स. १८८-१९०) मधील नाण्यांवर यास महाक्षत्रप लिहिलेलें नसून क्षत्रप असेंच लिहिलेलें आहे. त्याअर्थी हा कोणाचा तरी मांडलिक किंवा नोकर म्हणून त्या वेळीं कारभार करीत असावा. पण शा. श. ११३-११८ पर्यंतच्या नाण्यांवर पुनः महाक्षत्रप लिहिलेलें आहे. त्यावरून हा मधलीं दोन वर्षे कोणाच्या तरी ताब्यांत गेला असावा असें दिसतें. याला ताब्यांत घेणारा महाक्षत्रप ईश्वरदत्त हा असावा. त्याचीं फक्त पहिल्या व दुसऱ्या वर्षाचींच नाणीं मिळतात. त्यांवर शक किंवा संवत् नसल्यामुळें तर्कावर भिस्त ठेवावी लागते. याच्या वेळचा

एक शिलालेख जामनगर राज्यांतील गुंदागांवीं मिळाला आहे. त्याचा काळ शा. श. १०३ वैशाख शुद्ध पंचमी असा आहे. त्या शिलालेखांत आभीर जातीचा सेनापति वाहक याचा पुत्र सेनापति रुद्रभूति यानें एक तलाव खोदल्याचा उल्लेख आहे (भावनगर इन्स्क्रिप्शन्स, पृ. २२). याला तीन पुत्र होते:–१ रुद्रसेन, २ संघदामा, ३ दामसेन. याच्यामागून जीवदामा क्रमानें राज्याधिकारी झाला.

२. (स. ३०८–३१८ पर्यंत त्रुटित) हा (स्वामी) जीवदामन्‌चा मुलगा. याचीं फार थोडीं नाणीं मिळालीं आहेत व त्यांवर संवत् नाहीं.

३. (स. ३८८) हा (स्वामी) सत्यसिंह महाक्षत्रपाचा पुत्र. याचीं नाणीं शा. श. ३१० व त्यानंतरचींहि मिळालीं आहेत. पण शा. श. ३१० नंतरच्या नाण्यांवरील तिसरा अंक अस्पष्ट आहे. गुप्तवंशांतील महाप्रतापी राजा दुसरा चंद्रगुप्त यानें याचें सर्व राज्य जिंकून घेऊन क्षत्रपांचें राज्य समाप्त केलें. या चंद्रगुप्ताला विक्रमादित्य असें बिरुद होतें. राजपुतान्यांत यांची सत्ता याच्या वेळीं संपली. इतरत्रहि ती असल्याचा पुरावा नाहीं.

रुद्रसेन वाकाटक—(स. ३४४–४८) हा पहिल्या प्रवरसेनाचा नातू.

२. (स. ३९०–९५) हा पहिल्या पृथ्वीषेणाचा पुत्र. प्रभावती गुप्ता ही गुप्तांपैकीं दुसऱ्या चंद्रगुप्ताची मुलगी.

रुद्रसेन क्षत्रप—(स. १९८–२२२) हा पहिल्या रुद्रसिंह क्षत्रपाचा ज्येष्ठ पुत्र. याचीं चांदीचीं नाणीं शा. श. १२२–१४४ पर्यंतचीं मिळालीं आहेत. याच्या वेळचा एक शिलालेख काठेवाडांतील जसदण राज्यांत गढा या गांवीं मिळाला आहे. तो शा. श. १२७ भाद्रपद वहुल (कृष्ण) पंचमीचा आहे (भावनगर इन्स्क्रिप्शन्स, पृ. २२–२३). या शिलालेखांत मानसगोत्री प्रधानकाचा पुत्र आणि खराचा नातू यांनीं एक सत्र (अन्नछत्र) उघल्याचा निर्देश आहे. याला पृथ्वीसेन आणि दामजदश्री असे दोन पुत्र होते. रुद्रसेन महाक्षत्रप झाला, पण त्याचे पुत्र क्षत्रपच राहिले. याच्या नंतर याचा धाकटा भाऊ हा उत्तराधिकारी झाला. अशींच यांच्या कुळांत चाल होती.

२. (स. २५६–२७२) हा वीरदामन् क्षत्रपाचा पुत्र. याचीं नाणीं मिळालीं आहेत.

३. (स. ३४८–३७६) हा रुद्रदामन्‌चा मुलगा.

४. (३८२–८८) हा सिंहसेनाचा मुलगा.

रुय्यक किंवा **रुचक**—(स. ११५० सुमार) हा राजानक तिलकाचा पुत्र (पिशेलचीं शृंगारतिलकाची प्रस्तावना, पा. २८–२९ पाहा). अलंकारसर्वस्व, सहृदयलीला आणि काव्यप्रकाशसंकेत हे याचे ग्रंथ आहेत. शिवाय १ अलंकारानुसारिणी, २ नाटकमीमांसा, ३ व्यक्तिविवेकविचार, ४ श्रीकण्ठसार, ५ साहित्यमीमांसा, ६ हर्षचरितवार्तिक, हेहि याचे ग्रंथ आहेत. रुचकप्रणीत काव्यप्रकाशसंकेत नामक टीका अलंकारसर्वस्वकारानेंच रचलेली होय, असें विमर्शिनीकार जयरथ म्हणतो. काव्यप्रकाशसंकेताच्या प्रास्ताविक श्लोकांत यानें तिलकापाशीं काव्यशास्त्राचें अध्ययन केल्याचा उल्लेख केला आहे. हा मंखाचा गुरु होता. मंख हा काश्मीरच्या जयसिंग राजाचा सांधिविग्रहिक होता.

रुस्तुमजमान—(स. ५।६।१६४६) हा थोरल्या रणदुल्लाखानाचा मुलगा. याला धाकटा रणदुल्लाखान असें म्हणतात. हा मुस्तफाखानाबरोबर कर्नाटकच्या स्वारीस निघाला. पुढें गदग-लक्ष्मेश्वरपर्यंत गेल्यावर मुस्तफाला याच्या राजद्रोहाची बातमी समजली, आणि त्यानें याला विशेष रक्तपात न करितां कैद केलें, व याची मालमत्ता जप्त केली. पण नंतर लौकरच याला माफी देऊन मालमत्ता परत देण्यांत आली. तेव्हांपासून मुस्तफाच्या विरुद्धपक्षांतील हा विशेष सावधपणानें राहण्यास शिकला. शहाजी व नंतर शिवाजी यांच्याशीं मित्रत्वाच्या नात्यानें हा वागूं लागला. थोरला रणदुल्ला मेल्यानंतर विजापूर दरबारांत धुमसत असलेली खवासखान व मुस्तफाखान यांच्यांतील दुफळी उघडकीस आली. बादशाहानें मुस्तफाच्या पक्षास उचलून धरल्यामुळें विरुद्ध पक्षाच्या सरदारांना कैद करण्याचें धोरण त्यानें स्वीकारलें, त्यांत यालाहि कैद केलें (शि. च. नि., पा. ११८). अफजुलखानाच्या वधानंतर कोल्हापुरनजीक शिवाजीनें याचा पराभव केला, तेव्हां हा हुकेरीकडे पळून गेला.

रुस्तुमराव जाधव—याची मुलगी सावित्रीबाई शाहूस दिली होती.

रूप (गोस्वामिन्)—(स. १५००–६० सुमार) हा हुसेनशाहाचा मंत्री. पिता मुकुंद व पुत्र कुमार. सनातन, रूप व वल्लभ हे तीन बंधु असून परमवैष्णव होते. उज्ज्वलनीलमणीवर जीवगोस्वामिकृत लोचनरोचिनी नांवाची टीका आहे. तिच्या प्रारंभींच्या श्लोकांत ही माहिती दिली आहे. हा व सनातन हे बंगाल्यांतील महान् वैष्णवसाधु चैतन्यप्रभु याचे शिष्य व बहुतेक समकालीन होते, असें कवि कर्णपूर यांच्या चैतन्यचंद्रोदय या नाटकावरून समजतें. यानें आपलें ' विदग्धमाधव ' हें नाटक स. १५३३ मध्यें लिहिलें व उत्कलिकावल्लरी हा

ग्रंथ स. १५४९-१५५० मध्यें लिहिला असें डॉ. राजेन्द्रलाल यांच्या संस्कृत हस्तलिखितांचें समालोचन (व्हा.९, पान २४०, क्रमांक ३१९) यावरून दिसतें. याचा पुतण्या जीवगोस्वामि. याचे ग्रंथः-ललितामाधव, दानकेलिकौमुदी (थाणिका) ही प्रसिद्ध झाली आहे. पद्यावली ग्रंथ याचाच असावा. बाकीचे ग्रंथ वर आलेच आहेत.

रूपमती—(लग्नकाल स. १५५७) माळव्यांतील बाझबहादुराची राणी. हिचा जन्म उज्जयनीच्या ईशान्येस असलेल्या सारंगपूर नामक गांवीं झाला. ही एका रजपूत ठाकूराची मुलगी ही रूपानें सौंदर्यवान् असून हिला संगीतशास्त्राचें चांगलें ज्ञान होतें. हिचा आवाज इतका मधुर होता कीं, कोणीहि हिच्या मंजुळ आलापलहरी ऐकून मुग्ध होऊन जात असे. ही एकदां एका वृक्षाखालीं निसर्गदेवतेचें स्तवन करीत बसला असतां, तेथें बाझबहादुर नांवाचा एक मुसलमान राजा आला. त्यानें हिचें गोड गाणें ऐकून, तो हिच्यावर अगदीं अनुरक्त झाला. त्यानें हिच्या सौंदर्याला पाहून, हिला आपली पट्टराणी होण्याची विनंति केली. पण हिनें त्याला असें सांगितलें कीं, 'मी रजपूत वीराची कन्या असल्यामुळें मला मुसलमानाशीं लग्न करतां येत नाहीं.' परंतु त्यानें हिची नाना प्रकारानें विनवणी करून तिची संमति मिळविली व हिच्याशीं स. १५५७ त लग्न लाविलें (बाझबहादुर पाहा).

लग्न झाल्यानंतर बाझबहादुर राज्यकारभारांत लक्ष घालीनासा झाला. हें पाहून अकबर बादशाहानें आदमखान नामक सरदारास त्याच्यावर पाठवून त्याचा पराभव केला व आदमखानानें त्याचा खजिना, राजचिन्हें व जनानखाना हस्तगत करून हिलाहि पण पकडली. तेव्हां तो हिचें सौंदर्य पाहून हिच्यावर लुब्ध झाला. पण ही फार पतिनिष्ठ असल्यामुळें हिनें विषप्राशन करून आत्महत्या केली (आधमखान पाहा). ही स्वतः कवितांहि करीत असे. हिनें बाजबहादुरावर नाना प्रकारचीं प्रेमगीतें हिंदींत केलीं. तीं माळव्यांत कर्णप्रिय लोकगीतें होऊन राहिलीं आहेत. ज्या वेळीं बाझबहादुर मरण पावला असें कळलें, त्या वेळेस हिनें पुढील दोहा म्हणून प्राण सोडलाः

"तुम बिन जियरा रहतहत, मांगत है सुखराज ।
रूपमति दुखिया भई, बिना बहादुर बाज ॥ १ ॥"

ही गायनकलेंत निष्णात असल्यामुळें, हिनें प्रसिद्ध भूपकल्याण राग शोधून काढला. एकंदरींत ही एक अद्वितीय स्त्री होऊन गेली, व हिनें आपल्या संगीत कलेनें व अलौकिक पतिप्रेमानें आपलें नांव माळव्याच्या इतिहासांत अजरामर करून ठेविलें.

रूपराम—औरंगजेबाच्या वेळचा प्रसिद्ध चितारी (मं. १४. १. पा. ३-५).

रूपराम कटारी—(स. १७५० सुमार) हा कटारी जातीचा हिंदुस्थानी ब्राह्मण. हा सुरजमल्ल जाटाचा राजपुरोहित असून मुख्य सल्लागार होता. कुंमेरीच्या लढाईनंतर जाटांचा व मराठ्यांचा स. १७५४ त तह झाला, तो याच्याच मध्यस्थीनें झाला. पेशव्यानें यास सुरजमल्लाकडून तीस लक्षांची खंडणी काढून घेण्यासाठीं साठहजार रुपये शुद्ध रीतीनें दिले होते. हा मोठा कृष्णभक्त होता. यानें बरसाना येथें पुष्कळ देवळें बांधलीं. याला पैसा मिळविण्याचा फार नाद असे; पण तो पैसा हा दानधर्म, देवळें बांधणें वगैरेसारख्या धार्मिक कामांत खर्च करीत असे. यानें बरसाना येथें एक मंदिर बांधलें आहे, तें 'लाडिजीके मंदिर' (राधेचें मंदिर) म्हणून प्रसिद्ध आहे (जु. ऐ. गो. पृ. २).

रूपराम चौधरी—(मृ. स. १८१४) पेशव्यांचा एकनिष्ठ सेवक. हा पानशांचे तोफखान्यांत चौधरकीचे कामावर होता. यानें पेंढारी, भिल्ल व कोळी वगैरे लोकांचीं बंडें मोडलीं. हा नारायणरावाच्या वधापासून तों थेट शेवटच्या बाजीरावापर्यंत पेशव्यांच्या नोकरीस होता. हा मरण पावल्यावर याचा दत्तक मुलगा रामचंद्रराव याचें काम करूं लागला.

रूपसाही—(ग्रंथकाल स. १७५६) हा श्रीवास्तव कायस्थ असून पन्ना येथें राहत असे. यानें 'रूपविलास' नांवाचा एक हिंदी ग्रंथ लिहिला आहे.

रूपाजी भोजले—(मुधोजी भोसले पाहा).

रेझाबेग—(स. १६१५ सुमार) इराणचा वकील. हा जहांगीर बादशाहाकडे आला होता. येतांना यानें बादशाहास नजराण्यादाखल पुष्कळ मौल्यवान् वस्तु आणिल्या होत्या. परंतु हा ज्या कामासाठीं आला होता, तें काम न होतां यास परत जावें लागलें.

रेणुकाबाई—(मृ. स. १८२२) ही जत संस्थानांतील कान्होजीरावाची वडील बायको. ही कान्होजीनंतर संस्थानचा कारभार पाहूं लागली (स. १८१०). ही मरण पावल्यावर हिची सवत साळूबाई कारभार पाहूं लागली.

रेमती वेंकटराय—(स. १६०० सुमार) कर्नाटकचा कारभारी. विजयनगरच्या तिरुमल्लाचा मुलगा मरण पावल्यावर, त्याचीं मुलें अज्ञान असल्यामुळें हा कारभार पाहत असे.

रेवणसिद्ध—यानें शंकराचार्यांना चंद्रमौलीश्वर लिंग दिलें अशी प्रसिद्धि आहे. हे शंकराचार्य म्हणजे आद्य शंकराचार्य होत, असें कांहीं लोक म्हणतात.

२. ज्ञानेश्वरसमकालीन नाथपंथांतील या सिद्धाचें स्थान नेवासेनजीक मर्मरागिरीवर आहे.

३. हा जातीनें जंगम होता. हा रेवगी या गांवीं राहत असे. यानें 'परमरहस्य' नांवाचा ग्रंथ लिहिला. याची समाधि सातारा जिल्ह्यांतील रेणावी या गांवीं आहे.

रेवाशंकर—(स. १८१८) गुजराथी कवि. हा जुनागडचा नागर ब्राह्मण. यानें दशमस्कंधसार, डाकुरलीला, रामलीला, कृष्णलीला, चंद्रायणा व पेंदा इत्यादि ग्रंथ लिहिले.

रैदास—(स. १५२० सुमार) मीराबाईचा गुरु. याच्या बापाचें नांव रघू व आईचें नांव घुरविनिया. हा जातीनें चांभार असून याचा जन्म काशीस झाला. व रामानंदाचा शिष्य हा कबीराचा समकालीन होय. यानें आपला सर्व वेळ ईश्वरभजनांत घालविला. गुजराथ प्रांतामध्यें याचे पुष्कळ अनुयायी आहेत, ते स्वतःस 'रविदासी' असें म्हणतात. यानें कांहीं कविताहि केल्या. हा १२० वर्षें जगून मरण पावला (कविताकौमुदी).

यास कोणी रविदास असेंहि म्हणतात. दक्षिणेंतील प्रसिद्ध रोहिदास चांभार हाच असावा असें दिसतें. चितोडची राणी 'झाली' ही या रविदासाची शिष्या होती (मु. रि. भा. १, पृ. ३५६).

हा चांभार उत्तर हिंदुस्थानांतील राहणारा असून मोठा कृष्णोपासक होता. कबीराचा व याचा आपल्या उपास्याच्या श्रेष्टत्वाविषयीं झालेला संवाद कीर्तनकार उपयोगांत आणतात. तो खरा असल्यास हा कबीराचा समकालीन ठरतो. भक्तविजयांत महिपतीनें याचें चमत्कार-प्रधान चरित्र दिलें आहे (भक्ति. वि. अ. १५).

रविदास, रैदास व रोहिदास चांभार हे सर्व एकच दिसतात.

रोषनआरा—(स.१६१७-७१)शहाजहानची मुलगी. ही औरंगजेबाच्या पक्षाची होती. ही अविवाहित मेली.

रोहिदास चांभार—(रैदास पाहा).

ल

लखम सावंत—(स. १६५१-७५) आदिलशाहीचा कोंकण प्रांताचा अधिकारी. देशमुखी संपादन करून कुडाळ हें संस्थान निर्माण करणाऱ्या खेम सावंताचा हा पुतण्या. यानें शिवाजीची वाढती शक्ति पाहून शिवाजीस मिळण्याचें ठरविलें; आणि आपला वकील पितांबर शेणवी यास शिवाजीकडे पाठवून उभयतांत पांच कलमांचा तह झाला. त्यामध्यें प्रांताचा निम्मा ऐवज शिवाजीस द्यावा व तीन हजार फौज ठेवून शिवाजीस गरज पडेल तेव्हां मदत करावी असें ठरलें. हा करार ता. ५-३-१६५९ रोजीं झाला (का. सं. प. या. ४११). परंतु याच्याकडून हा करार पाळला गेला नाहीं. म्हणून शिवाजीनें याच्यावर स. १६६२ मध्यें स्वारी केली. तेव्हां यानें 'फौज घोडा राउत मिळवून शिवाजीवर चालून जातों आणि कोंकण सोडवितों' (सभा. पृ. ६८) असा निरोप विजापुरीं पाठविला. त्याप्रमाणें तिकडून खवासखान व बाजी घोरपडे हे याच्या मदतीस निघाले. पण ते येण्यापूर्वी शिवाजीनें यास पिटून लावलें व हा फिरंग्यांच्या आश्रयास गेला. पण त्यांनीं स्वतंत्र तह केल्यावर याला कोंडून राहणें अशक्य होऊन हा शिवाजीस शरण गेला. तेव्हां शिवाजीनें कुडाळची देशमुखी याजकडे कायम केली. शिवाय 'दरसाल सहा हजार होन द्यावे, वाडा बुरुजाचा बांधूं नये, कुडाळीं राहावें, जमाव करूं नये' अशाहि अटी घातल्या. सावंतांनीं यानंतर शिवाजीशीं विरोध केला नाहीं.

लखमसी—(लक्ष्मणसिंह गुहिलोत पाहा).

लगध—याचा ग्रंथ 'वेदांग-ज्योतिष' या नांवानें वैदिकांच्या म्हणण्यांत असून तो इसवी सनापूर्वी १३ शें वर्षांच्या सुमारास रचला गेला. यांत तिथि व नक्षत्रें काढण्याच्या म्हणजे सूर्यचंद्राचें गणित करण्याच्या तोंडी हिशेबाच्या रीति दिल्या आहेत. या रीति सुचण्यापूर्वी निदान पांचसहाशें वर्षें सूर्यचंद्रांच्या गतीचें अवलोकन होऊन चैत्रादि संज्ञा प्रचारांत आल्या होत्या. अवलोकन, तोंडी गणित, लेखी गणित या क्रमानें आमच्या देशांत गणितशास्त्राची वाढ झाली. त्यांपैकी लगधाची गणना तोंडी गणित करणाऱ्या अत्यंत प्राचीन ज्योतिष्यांत करावी लागेल (प्राचीन चरित्रकोश पाहा).

लघुसमंतभद्र—(स. १००० सुमार) यानें विद्यानंदाच्या 'अष्टसहस्रीवर' 'अष्टसहस्रीविषमपदतात्पर्यटीका' नांवाची एक टीका लिहिली. हा दिगंबर पंथाचा होता (हि. इं. लॉ.).

लज्जा—हैहयकुलांतील राजकन्या. बंगाल्यांतील पालांपैकीं विग्रहपालाची पत्नी.

लतीफखान—गुजराथच्या तातारखानाचा मुलगा.

२. (स. १५३०सुमार) गुजराथच्या निजामखानाचा मुलगा. याचा मुलगा दुसरा अहमद गादीवर आला.

३. (स.१५०० सुमार) गुजराथच्या दुसऱ्या मुजफरखानाचा मुलगा. याचा मुलगा तिसरा महमूद म्हणून गादीवर आला.

लद्धा—पंजाबमधील नामदेवाचा हा एक अनुयायी.

ललित (वज्र)—हा चौऱ्यांशी सिद्धांपैकीं होय. याचा महामुद्रारत्नगीति (तं. ४८।११२) नांवाचा एक ग्रंथ प्रसिद्ध आहे.

ललितादित्य (मुक्तापीड) कर्कोटक—(स. ६९९–७३५) काश्मीरच्या दुसऱ्या प्रतापादित्याचा हा मुलगा. हा स. ७४० मध्यें काश्मीर येथें राज्य करीत होता. यानें बांधलेल्या मंदिरांत मार्तंडमंदिर विशेष प्रसिद्ध आहे.

कनोजचा राजा यशोवर्मन् मौखरीस यानें राज्यावरून पदच्युत केलें असें म्हणतात. याशिवाय यानें तुर्क, तिबेटी आणि दर्द यांच्याशीं लढाया करून त्यांचा पराभव केला. परंतु सरतेशेवटीं याच्या उत्तरेकडील स्वाऱ्यांत मात्र याचा नाश झाला. याच्यानंतर याचा मुलगा कुवलयापीड हा गादीवर आला (B.). यानें माळव्याच्या गुप्तांपैकीं देवगुप्तास मारिलें (२ देवगुप्त पाहा).

ललितापीड—(चिप्पड जयापीड पाहा).

लल्ल—(स. ४९९ सुमार) याच्या एका ग्रंथांतील श्लोकाचें भास्कराचार्यानें खंडन केलें आहे. यावरून याचा 'पाटीगणित' नांवाचा ग्रंथ असावा. हा दक्षिणेचा राहणारा असावा.

धीवृद्धिदतंत्र नांवाचा याचा गणितग्रंथ आहे. तो सुधाकर द्विवेदी यांनीं शोधून छापला आहे (स.१८८६). याचा 'रत्नकोश' नांवाचा मुहूर्तग्रंथहि आहे.

लवणप्रसाद वाघेल—(स. १२४१ सुमार) गुजराथच्या दुसऱ्या भीम सोळंकीचा प्रधान. याचा पुत्र वीरधवल (२ अर्णवराज पाहा).

लवसेन—(स. ८०० सुमार) बंगाल्यांतील पालांपैकीं देवपालाचा सेनापति. यानें आसाम व कलिंग जिंकले.

लक्षसिंह गुहिलोत—(स. १३८२–१४२१ सुमार) मेवाडच्या क्षेत्रसिंहानंतर हा त्याचा ज्येष्ठ पुत्र गादीवर आला. याला लाखा असेंहि म्हणत. हा युवराज असतांनाच यानें लढाईंत जोगा दुर्गाधिपाला पराभूत केलें, व त्याची कन्या, आणि हत्तीघोडे जिंकून घेतले (भावनगर इन्स्क्रिप्शन्स, पृ. ११९). डोंगरांतील मेर लोकांना जिंकलें व त्यांचा वर्धन (बदनोर) नांवाचा प्रदेश ताब्यांत घेतला (कीर्तिस्तम्भप्रशस्ति श्लो. ३६, कुंभलगडप्रशस्ति २१२ श्लोक). याच्या कारकीर्दीत एक चांगली चांदीची खाण सांपडली. मगरा जिल्ह्यांतील जावर गांवीं सांपडलेल्या या खाणीमुळें राज्याची आर्थिक स्थिति फारच सुधारली व त्यामुळें काशी, प्रयाग व गया हीं क्षेत्रें पुष्कळसें धन मुसलमान राजांना देऊन यानें करमुक्त केलीं (भावनगर इन्स्क्रिप्शन्स्, पृ. ११९, शृंगीऋषि येथील अप्रकाशित शिलालेख).

ही करमाफी यानें पराक्रमाच्या जोरावर घडवून आणली नसून पैशाच्या जोरावर घडवून आणली, पण टॉडच्या लिहिण्याप्रमाणें यानें जरूर तर लढायाहि केलेल्या दिसतात. यानें अलाउद्दीन खल्जी व खिजरखां यांच्या वेळच्या लढायांत उध्वस्त झालेल्या इमारती दुरुस्त केल्या व तलाव, कुंड, किल्ले वगैरे अनेक इमारती नव्या बांधल्या. धनसंचय खूप झाला होता तरी त्याचा यानें चांगला उपयोग केला. दान, तुला वगैरेहि खूप केल्या (भावनगर इन्स्क्रिप्शन्स्, पृ. ११९). चीखागांव एकलिंगजीला दिला. सूर्यग्रहणांत झोटिंगभट्टाला पिप्पली (पीपली) गांव व धनेश्वरभट्टाला पंचदेवालय (पंचदेवळा) गांव दिला (एकलिंगजीच्या दक्षिणद्वारावरील प्रशस्ति). याची आई द्वारकेच्या यात्रेला गेली असतां काबो नांवाच्या लुटारू जातीनें तिला वेढा देऊन लढाई सुरू केली तेव्हां कालू व धवल या आपल्या पुत्रांसह शार्दूलगडचा रावसिंह डोडियानें याच्या मातेस मदत केली व तिला मेवाडच्या हद्दीपर्यंत सुरक्षित पोंचविलें. याबद्दल यानें धवलला आपल्याकडे बोलावून घेऊन पांच लाखांची जहागिर दिली. धवलच्या वंशजाकडे सरदारगड (लावा) हें स्थान आहे व ते उदेपूर दरबारचे पहिल्या श्रेणीचे सरदार आहेत.

मंडोवरचा राव चूंडा राठोड आपल्या गोहिवंशीय राणीवर अधिक प्रेम करीत असे. म्हणून तिचा पुत्र कान्हा याला आपलें राज्य त्यानें देण्याचें ठरविलें. तेव्हां त्याचा ज्येष्ठ पुत्र रणमल्ल पांचशें स्वारांसह याच्या आश्रयाला येऊन राहिला. यानेंहि त्याला चाळीस गांव देऊन

आपला सरदार बनविलें व त्याची बहिण हंसबाई हिच्याशीं लग्न केलें (मोकल गुहिलोत पाहा).

यानें आपल्या शेवटल्या दिवसांत मोकलच्या संरक्षणाची जबाबदारी चूंडावर सोंपविली, व त्याच्या स्वार्थत्यागाबद्दल त्याला व त्याच्या वंशजांना दरबारकडून जाणाऱ्या पट्टे, परवाने वगैरेच्या सनदांवर भाल्याचें चिन्ह करण्याचा अधिकार दिला. ती चाल अद्यापहि पाळली जाते.

याला चूंडा, राघवदेव, अज्जा, दूल्हा, डूंगर, गज, सिंह, लूणा, मोकल व बाघसिंह असे पुत्र होते.

लक्ष्मण—(स. ११३५ सुमार) शारदातनय नांवाच्या ग्रंथकारानें अलंकारशास्त्रावर 'भावप्रकाशन' नांवाचा ग्रंथ लिहिला आहे. त्यानें आपल्या मंगलचरणाच्या श्लोकांत आर्यावर्तदेशांत मेरूत्तर नांवाचा एक प्रान्त आहे. त्याच्या दक्षिणेला माठर नांवाचा गांव आहे. तेथील काश्यपगोत्री लक्ष्मण नांवाच्या ब्राह्मणानें वेदभूषण नांवाचें भाष्य लिहिलें आहे. तो लक्ष्मण शारदातनयाचा प्रपितामह होता. त्यावरून याचा एक काळ पंचाहत्तर वर्षें त्याच्याआधीं धरतां येईल.

२. यानें भोजाच्या रामायणचंपूचें 'युद्धकांड' लिहून तो अपुरा असलेला ग्रंथ पुरा केला. त्यामुळें यास भोजचंपू लक्ष्मण म्हणत. हा स्मार्त ब्राह्मण वाराणसीवारू कुळांत जन्मला. पिता व्यंकटेश. याची बदर सरकार ही जन्मभूमि.

३. प्रबंधराज नांवाच्या तेलगू ग्रंथाचा कर्ता.

४. तेलगू कवि. १ आंध्रनामसंग्रह, २ सुभाषितरत्नाकर हे याचे ग्रंथ होत.

लक्ष्मण आपाजी अंबेकर—(स. १७७५) राघोबा दादाचा एक कारभारी. याचा पत्रव्यवहार प्रसिद्ध आहे (रा. खं. १२). हा देशस्थ ऋ. ब्राह्मण. चिंतो विठ्ठल रायरीकरांमार्फत लागला. याला साकुरें गांव इनाम होतें.

लक्ष्मण गोविंद चिटणीस—(स. १७७९) गोविंदराव चिटणीसाचा मुलगा. यावर नाना फडणीसाची मर्जी होती.

लक्ष्मण चिंतामण धडफळे—(स. १७४०-७३) पुरंदरे रोजनिशींचीं मूळ स्मरणें लिहिणारा पुरुष. याचीं स्मरणें पेशवेदप्तरांत उपलब्ध आहेत. त्यावरून पुढें पुरंदरे रोजनिशी लिहिली गेली. स. १७४० पासून १७७३ पर्यंत याचीं स्मरणें उपलब्ध आहेत. आणि त्यांतील नोंदी तंतोतंत जुळतात. हा स्वयंस्फूर्तीने इतिहास लिहिण्याचा प्रयत्न फार महत्त्वाचा आहे (धडफळे घराणें पाहा).

लक्ष्मणदेव कलचुरि—(स. ९५० सुमार) हा केयूराचा पुत्र. यानें कोसल, कोंकण व गुजराथ जिंकलीं. याची मुलगी बोंथादेवी दुसऱ्या तैलप पश्चिम चालुक्याची पत्नी.

लक्ष्मण माणिक्य—(स. १५००-१६००) यानें 'विख्यातिविजय' या नांवाचें सहा अंकी नाटक लिहिलें.

लक्ष्मणराव लाडोजी शितोळे देशमुख—हा महादजी शिंदे यांच्या बाळाबाई नांवाच्या मुलीचा दुसरा मुलगा.

लक्ष्मण संभाजी—(स. १७८९) नाना फडणीसाचा वकील. हा जयपुरास होता.

लक्ष्मणसेन—(स. ११७०-१२००) (इख्तियारउद्दीन मुहम्मद खल्जी पाहा).

लक्ष्मदेव परमार—(स. ११०० सुमार) हा माळव्याच्या उदयादित्य परमाराचा पुत्र. यानें त्रिपुरीवर स्वारी करून शत्रूंचा नाश केला व मुसलमानांशीं लढाई केली. याला पुत्र नसल्यामुळें याच्या मागून याचा भाऊ नरवर्मा गादीवर आला.

लक्ष्मम्मा—रामराय आरविदूची चवथी बायको. हिचा पुत्र श्रीरंगराय.

लक्ष्मसिंह गुहिलोत—(स. १३०३ सुमार) सीसोदें येथील राणाशाखेपैकीं हा जयसिंहाचा पुत्र. याला लखमसी असें म्हणत असत. यानें राणपुरच्या शिलालेखांत माळव्याचा राजा गोगादेव याला जिंकल्याचा निर्देश आहे (राणपूर लेख-भावनगर इन्स्क्रिप्शन्स, पृ. ११४). हा आपल्या सात पुत्रांसह अलाउद्दीन खल्जीशीं झालेल्या चितोडच्या लढाईत मारला गेला. सर्वांत ज्येष्ठ पुत्र अरिसिंह (अरसी) हाहि वीरोचित गतीला तेथेंच गेला. अरिसिंहाचा पुत्र हंमीर. सर्वांत धाकटा अजयसिंह जखमी होऊन घरीं गेला व तो याच्या मागें गादीवर आला. याला 'भड लखमसी' असें म्हटलेलें आढळतें. भड व गढ हीं भट शब्दाचीं अपभ्रष्ट रूपें दिसतात.

लक्ष्मीदास—(स. १५००) एक ज्योतिषी. वाचस्पतिमिश्र व केशव हे यांचे अनुक्रमें बाप व आजे होत. सिद्धान्तशिरोमणीच्या गणिताध्याय व गोलाध्यायावर याची टीका आहे.

लक्ष्मीदेव रट्ट—(स. ११९०) हा रट्ट घराण्यांतील असून तिसऱ्या कार्तवीर्यानंतर गादीवर बसला. हा जैन होता. याला लक्ष्मीधर म्हणतात. याची पत्नी चंद्रिका किंवा चंदलादेवी.

२. (स. १२२८–२९) हा चवथ्या कार्तवीर्याचा पुत्र. हा रट्टांपैकीं मल्लिकार्जुनानंतर गादीवर आला. याला देवगिरीच्या सिंघण यादवाच्या वीचण नांवाच्या प्रतिनिधीनें मांडलिक बनविलें.

३. यादव घराण्यांतील कृष्णदेवाचा मंत्री.

लक्ष्मीदेवी—ही गोव्याच्या कदंब घराण्यांतील दुसऱ्या विजयादित्याची पत्नी. हिचा पुत्र जयकेशिन् तिसरा.

२. (बाळंभट्ट पायगुंडे पाहा).

३. दुसऱ्या सेन रट्टाची पत्नी.

लक्ष्मीधर—ज्योतिषी भास्कराचार्याचा पुत्र, व जैत्रपाल यादवाचा आश्रित पंडित.

२. (स. १०५० सुमार) हा एक बंगाली कवि. हा शांडिल्यगोत्री ब्राह्मण असून बंगालमधील भट्टकोसल येथील राहणारा होय. हा जरी बंगालमध्यें राहणारा होता, तरी यानें धारा येथील भोजराजाच्या पदरीं राहून आपलें नांव सर्वश्रुत केलें. याचा काल स. अकरावे शतकांतील होय. कारण याचा जो आश्रयदाता भोज त्याचा काल स. १०१०–१०५० असा आहे.

यानें भोजाचे आश्रयास असतां महाकाव्य किंवा 'चक्रपाणिविजय' हा ग्रंथ लिहिला. त्यामध्यें बाणासुराची मुलगी उषा हिच्या लग्नाची गोष्ट वर्णिलेली आहे. याच्या बापाचें नांव वैकुंठभट्ट आणि आजाचें नांव अजितभट्ट असें होतें (इंडियन कल्चर, एप्रिल १९३५, पृ. ७०१).

३. (स. १५५०–७२) हा विजयनगरच्या पहिल्या तिरुमल्ल आरविदूच्या पदरीं होता. भरतशास्त्र व श्रुतिरंजिनी या ग्रंथांचा कर्ता.

४. (स. ११०४-५४) याच्या पित्याचें नांव भट्टहृदयधर. हा गोविंदचंद्र या कनोजच्या गाहडवाल राजाचा युद्धमंत्री. यानें 'व्यवहारकल्पद्रुम (कल्पतरु)' नांवाचा ग्रंथ धर्म व व्यवहार या विषयांवर लिहिला. हा ग्रंथ संपूर्ण उपलब्ध नाहीं.

५. (स. १५२०) प्रतापरुद्र गणपतीच्या नांवावर प्रसिद्ध असलेला 'सरस्वतीविलास' यानें लिहिलेला आहे. कृष्णदेवराय तुलुवानें वरील राजाला जिंकल्यानंतर हा त्याच्याकडे गेला (एपि. इंडि. ६, २३०).

लक्ष्मीनाथ—पिंगलार्थप्रदीप ग्रंथाचा कर्ता.

लक्ष्मीबाई आंगरे—(स. १७३९ सुमार) ही कान्होजीची पत्नी व सेखोजीची माता होय. सेखोजी वारला तेव्हां थो. बाजीरावानें हिला समाधानाचें पत्र धाडलें. त्याच्या उत्तरांत ही म्हणते, ' माझ्या घराण्याचा लौकिक संभाळणें हा मी स्वधर्म समजतें. मला पुत्रापेक्षां स्वामीकार्याच्या यशःसिद्धीचें महत्त्व अधिक वाटतें ' (जु. ऐ. गो. ४५).

लक्ष्मीबाई झांशीवाली—(जन्म स. १८३५–मृत्यु स. १८५८ जून) ही मोरोपंत तांब्यांची मुलगी व झांशी संस्थानचा राजा गंगाधरराव नेवाळकर यांची पत्नी. गंगाधरराव वारल्यावर संस्थान खालसा झालें व हिला ५ हजार दरमहा पेन्शन मिळालें. स. १८५७ सालच्या बंडांत हिला इच्छा नसतां सामील व्हावें लागलें. हिनें दहा दिवस झांशीचा किल्ला लढवला, पण फितुरीमुळें इंग्रजांनीं किल्ला घेतला. तेथून निसटून काल्पीस ही पुरुषी वेषानें पेशव्यांना सामील झाली. हिच्याकडे सेनापतित्व येऊन हिनें ग्वाल्हेरचा किल्ला घेतला. तेथें निकरानें लढत असतां फितुरीमुळें, बंडवाल्यांच्या अव्यवस्थेमुळें व नेहमींचा घोडा नसल्यामुळें फळी फोडून पार जातांना ही शूर स्त्री इंग्रजांच्या समशेरीस बळी पडली.

लक्ष्मीबाई भोसले—ही शिवाजीमहाराजांची पांचवी पत्नी होती. हिचें लग्न शके १५७८ (स. १६५६) च्या सुमारास झालें. ही विचाऱ्यांची कन्या होय (शिवाजी–निबंधावली १, पृ. २०९–२२५).

लक्ष्मीबाई शिंदे—ही तुळजापूरकर भोंपे कदम याजकडील होती. महादजी शिंद्याची पत्नी. ही महादजीच्या मृत्यूनंतर हयात होती. हिच्या लग्नासंबंधीं खालील उल्लेख ब्राउटननें केला आहे. ' स. १७९२ च्या एप्रिलांत महादजी तुळजापुरास गेला असतां तेथील मंदिरांत सुमारें बारा वर्षें वयाची एक सुंदर पण गरीब स्थितींत वाढलेली व आईबाप नसलेली मुलगी त्याच्या दृष्टीस पडली. लगेच त्यानें तिच्या चुलत्यास दहा हजारांची जहागिर ठरवून दुसऱ्या दिवशीं तिच्याशीं लग्न लावलें. नंतर ती त्याजबरोबर असतां महादजी मरण पावला. कांहीं वर्षांनीं वांकडें पाऊल पडून अब्रू बचावण्यासाठीं दतिया येथें हिनें विषप्राशन करून जीव दिला ' (म. रि. उ. २, पा. ४११).

२. परशरामपंत प्रतिनिधीची बायको.

लक्ष्मीश—(स. १७०० च्या पूर्वी) कानडी कवि. रामानुजपंथी (श्रीवैष्णव). गोत्र–भारद्वाज. भ्राता–अण्णमांक. गांव–कडूरू तालुक्यांतील देवनुरु. यास लक्ष्मीपति असेंहि म्हणतात. संस्कृत जैमिनिअश्वमेधाच्या आधारें लिहिलेला ग्रंथ. याच्या ग्रंथाला कर्नाटकांत जितकी मान्यता आहे तितकी दुसऱ्या कोणत्याहि कवीच्या ग्रंथाला नाहीं. हा कवि अलीकडील असून याची भाषा

सोपी, मधुर व ललित असल्यामुळें लहानथोर सर्व दर्जाच्या लोकांना अत्यंत आवडते. हा कवि व याचें भारत माहीत नाहीं असा शिक्षित कर्नाटकी विरळा (क. क. च. भा. २, पा. ५२३).

लक्ष्मीवर्मा परमार—(स. ११४३–७९) माळव्याच्या परमारांपैकीं यशोवर्म्याचा धाकटा पुत्र. याचा थोरला भाऊ अजयवर्मा हा धारचा राजा झाला, व याची शाखा आपणास महाकुमार म्हणून राहूं लागली. याचें दानपत्र वि. सं. १२०० (स. ११४३) श्रावण शुद्ध १५ चें मिळालें आहे (इंडि. अँटि १९. ३५२–५३). याचा पुत्र हरिश्चंद्रवर्मा.

यानें माळव्यांत स्वतंत्र राज्य स्थापिलें. स. ११४५ मध्यें अनहिलवाडच्या कुमारपाल चालुक्यानें माळवा काबीज केला. स. ११७९ मध्यें याचा मुलगा गादीवर आला.

लाडी—(दाहर व मुहम्मद कासीम पाहा).

लाडोजी सिधोजी शितोळे देशमुख नरसिंगराव—(मृत्यु स. १७९३) याला महादजी शिंदे याची मुलगी बाळाबाई दिलेली होती. तिचें लग्न स. १७७६ मध्यें झालें. याला सिधोजी व लक्ष्मणराव असे दोन पुत्र होते. महादजीचा याच्या कर्तबगारीवर विश्वास होता असें दिसतें. महादजीनें दिल्लीच्या बादशहास ६५ हजारांची मासिक नेमणूक करून दिली व बादशहानें कांहीं गडबड करूं नये म्हणून शहानिजामुद्दीन फकीर व यास बादशहाचे बंदोबस्तासाठीं ठेवलें (फ्रँक्लिन, पृ. १३२–१३४).

पूर्वीपासून मोठें असणारें शितोळे देशमुखांचें घराणें महादजीच्या संबंधानें अधिक बलिष्ठ होणें स्वाभाविक आहे. पुण्याजवळ पाषाण वगैरे यांचीं जहागिरीचीं गांवें आहेत तेथें याचा एक धाकटा भाऊ राहत असे. त्यानें कांहीं कज्जा केल्यावरून पेशव्यांनीं त्यास सजा केली (स. १७८६). त्यासंबंधीं महादजीनें म्हटलें आहे, 'लाडोजी शितोळे आमचे आप्त. ते नानांचेहि आप्त. त्यांचे बंधु, वय लहान, पोक्त बुद्धि नाहीं. ऐसे असतां त्यांस नेऊन, उन्हांत उभे करून, पायाचे आंगठे धरून, डोकीवर दगड देऊन उभे केले. बेअब्रू केली. त्यांत आमचाच बदलौकिक झाला असें नाहीं. नानांचा आमचा भाऊपणा, तेव्हां जन त्यासच शब्द लावतील. गुन्हा केला तर गुन्हेगारी घ्यावी, तरी हे बेअब्रू धनीपणास उचित आहे कीं काय ?''

दिल्लीस गुलाम कादरच्या बंडाव्याच्या वेळीं हा दिल्लीस बादशहाच्या बंदोबस्तास होता. पण गुलाम कादरच्या बंडामुळें फूस मिळून याच्या दोन पलटणांनीं तलबेकरितां (पगाराकरितां) दंगा केला. पण यानें व निजामुद्दीनानें युक्तीनें दंगा मोडून बंदोबस्त केला. पण गुलाम कादरचा वर्चष्मा वाढत जाऊन फितुरीमुळें महादजीस माघार घ्यावी लागली. गुलाम कादरहि अंमल बसवीत शहादऱ्यापर्यंत आला. हें वर्तमान ऐकतांच हा व निजामुद्दीन दिल्लीहून बादशहास न विचारतां रातोरात पळाले. 'त्यासमयीं याचीं वस्तभाव वांस उंट दिल्लीच्या सोद्यांनीं लुटून घेतली' (हिंगणे पत्र १७८७ आगष्ट–डिसेंबर). जोधपुराजवळ मेडत्याच्या स्वारींतहि हा आगाऊ व्यवस्थेकरितां पुढें गेला होता.

हा स. ९-४-१७९३ रोजीं मरण पावला. याच्यामागें बाळाबाई हयात होती.

लाड्या न्हावी—हा परशुराम श्रीनिवास ऊर्फ थोटेपंत यांच्या लोभांतील होता. आपलेपेक्षां याचा इतमाम अधिक ठेवून सारा कारभार याच्याकडे त्यांनीं सोंपविला होता. याची वर्तणूक नीट नाहीं म्हणून, बापू गोखले यानें याला कैद केलें; व कांगोरीच्या किल्ल्यावरून लोटून याला ठार मारलें (म. रि. उ. ३, पा. ३६३).

लादिनी बेगम—ही नूरजहानला पहिल्या नवऱ्यापासून झालेली मुलगी.

लाय पाटील—(स. १६६१) शिवाजीच्या आरमारखात्यांतील एक नोकर. याचें घराणें कोळवाड (चौल–अष्टागर) येथें नांदत असे. सुभानजी खराडे सरनोबत आणि सुभानजी मोहिते हवालदार यांनीं याची चौकशी करून आदर करून सेवेशीं घेतलें. स. १६६१–६२ मध्यें शामराज नीळकंठ रोझेकर पेशवे व रोहिड्याचा पूर्वीचा किल्लेदार बाजी घोलप यांस जंजिरेकर सीदीवर रवाना केलें होतें, पण शामराजपंत स्वतः कैद होऊन ही मोहिम फुकट गेली. तेव्हां खुद्द मोरोपंत पेशव्यास ही कामगिरी सांगण्यांत आली (स. १६७६). तेव्हां त्यानें यास जंजिऱ्यास रात्रीं शिड्या लावण्याची कामगिरी सांगितली. ती यानें पार पाडली. पण मोरोपंताचे धारकरी तेथें येऊं शकले नाहींत. मोरोपंतानें स्वतःकडे दोष घेऊन याची शिवाजीकडे शिफारस केली. तेव्हां शिवाजीनें यास पालखीचा मान देऊं केला. पण फार मोठा मान म्हणून यानें तो स्वीकारला नाहीं. म्हणून शिवाजीनें यास पालखी नांवाचें गलबत बांधून दिलें. शिवाय बादशहानें दिलेली पाटिलकी होतीच, म्हणून सरपाटिलकी दिली (मं. त्रै. २, पृ. १२८–२९; प्रो. सरकारकृत शिवाजी, पृ. ३५१–आवृत्ति पहिली).

लॉर्ड लॉरेन्स—(स. १८११-७९) हिंदुस्थानचा गव्हर्नर जनरल. लेखणी कां तलवार अशा स्वरूपाचा याचा पुतळा लाहोर येथें आहे.

लालकवि—हा छत्रसालाचा आश्रित. याचें नांव पुरोहित. गोरेलाल यानें छत्रसालाच्या सांगण्यावरून त्याचें काव्यमय चरित्र लिहिलें, तें 'छत्रप्रकाश' या नांवानें प्रसिद्ध आहे. हा महोबाचा राहणारा. तेथें हे दोघे पुष्कळ वर्षे एकत्र राहिले होते. बुंदेलखंड ग्याझेटियरमध्यें याचें अल्पचरित्र दिलें आहे. हा हिंदीमधील कवि असून तुळशीदासानंतरच्या कालांतला पहिल्या प्रतीचा कवि गणला जातो. पुष्कळ लढायांत हा छत्रसालाबरोबर हजर असून छत्रसालाच्या बाजूनें लढत होता. स. १७०७ च्या पुढील हकीगती याच्या ग्रंथांत नाहींत. हा त्या सुमारास युद्धांत मारला गेला असें समजतें. मरणसमयीं हा पन्नास वर्षांचा होता (रा. गो. काटे).

लाल काऊंट—(स. १७०७-१७६६) हिंदुस्थानांतील फ्रेंच सेनापति.

लालकुंवर—(स. १७१२) एक नर्तकी. हिला एकदां जहांदरशाह दिल्लीचा बादशाहा यानें आपलें सर्व राज्य अर्पण केलें होतें.

लालदास—(स. १५२८-१५३०) हिंदी कवि. ग्रंथ- दशमस्कंद व हरिचरित्र.

२. गुजराथींतील कृष्णप्रभावकर्ता.

३. (स. १६५९) हा क्षत्रिय जातीचा गृहस्थ माळव्यांत जन्मास आला. हा जहांगीरच्या वेळीं जन्मास आला. शहाजहानचा पुत्र दारा शुकोह याचा हा वेदान्तांतील गुरु होता. या दोघांचा संवाद 'बाबा लालसे बातचीत' या नांवानें प्रसिद्ध झाला आहे. हा संवाद मूळ फार्सीमध्यें आहे. यालाच मुसलमानी रियासतींत बाबालाल असें म्हटलें आहे (मु. रि. भा. २, पा. ३६०).

लालाजी बल्लाळ—(मृत्यु स. १८१९) हा बाळाजी गुळगुळे कोटेकर याचा दत्तक पुत्र होय. याचें मूळ गांव कोंकणांत आचरें असून हा सारस्वत ब्राह्मण होय.

यानें व याच्या बापानें स. १७३० पासून १८२० पावेतों ९० वर्षे सर्व उत्तर हिंदुस्थानचीं कमाविशी संभाळून, शिवाय व्यापार व पेढ्या देशभर स्थापून पैसा व लौकिक मिळविला. यावरून याची लायकी दिसून येते.

लाला भवानीशंकर—(स. १८०० सुमार) यशवंतराव होळकरांचा एक मदतनीस. यानें आपल्या आठवणी फार्सींत लिहिल्या आहेत व त्यांचें रूपांतरहि इंदुरास प्रसिद्ध झालें आहे (म. रि. उ. ३, पृ. ३५२).

लाला सेवकराम—(मृत्यु स. १७९२) हा कलकत्त्याच्या इंग्रजांकडे मराठ्यांचा वकील म्हणून होता. उत्तर हिंदुस्थानांतील कायस्थ घराण्यांत याचा जन्म झाला. याच्या बापाचें नांव लाला तुळजाराम व आजाचें लाला कृपाराम असें होतें. हे दोघेहि मराठ्यांचे नोकरींत होते. याचा चुलता लाला भवानदास व चुलत आजा लाला भगीरथ हे सुद्धां सातारच्या शाहु छत्रपतीच्या पदरीं नोकर म्हणून होते. अशा रीतीनें याच्या पूर्वी याच्या घराण्याचा व मराठ्यांचा तीन पिढ्या संबंध आलेला होता.

बाप मेल्यावर जयपूर येथील मराठ्यांच्या वकिलीच्या कामावर याची नेमणूक झाली (स. १७७०). तें काम यानें स. १७७३ पर्यंत केलें. नंतर बारभाईचे कारस्थानाचे वेळीं हा पुण्यास आला. तेथें याच्याकडे शिलेदाराचें व पेशव्यांचे कचेरींतील कारकुनींचें काम आलें. पुढें याला कलकत्त्याच्या वकिलीच्या कामावर नेमलें. तेव्हां उंची व बहुमानाचा पोशाख, फत्तेह लष्कर नांवाचा हत्ती आणि एक घोडा असे वॉरन हेस्टिंग्जकरितां व तीन घोडे तीन कौन्सिलर्सकरितां, असा लवाजमा बरोबर घेऊन हा ता. १२ मार्च १७७७ रोजीं कलकत्त्यास जाण्याकरितां निघाला. स. १७७७ ते १७९० पर्यंत हा कलकत्ता येथें होता, त्या अवधींत यानें आपलें काम उत्कृष्ट रीतीनें बजावलें, असें प्रसिद्ध झालेल्या याच्या पत्रांवरून सिद्ध होतें (इतिहाससंग्रह). हा मराठींतून व मोडींतून उत्तम प्रकारें पत्रव्यवहार करीत असे. सुरवातीला याला सालीना ८०० रु. वेतन होतें. तें पुढें हळूहळू वाढत शेवटीं ३६०० रु. पर्यंत गेलें. परंतु हें सुद्धां वेतन पुरत नाहीं, असें हा आपले पत्रांत वरचेवर स्पष्ट लिहीत असे. कारण याला उच्च राहणीकरितां बराच खर्च करावा लागे. पालखी व अबदागीर वापरण्याचा हक्क याला बहाल केला होता.

याला चिमणलाल आणि गुलाबराम असे दोन मुलगे होते. चिमणलाल पुण्यास राहत असे व गुलाबराम बापाबरोबर कलकत्त्यास राहत असे. सेवकराम स. १७९२ चे सुमारास मरण पावला. याच्यानंतर याचा पुत्र गुलाबराम हा कलकत्त्याच्या वकिलीचें काम करूं लागला (श्री. डी. बी. डिस्कळकर, एम्. ए.).

लाल्हणदेवी—ही विग्रह प्रतिहाराची पत्नी व मलयवर्मची आई. हिच्या बापाचें नांव केल्हणदेव. तो नाडोळचा केल्हण चौहान असावा.

लाहिनी—(स. १०३२) अबूच्या परमारांपैकीं धुंधुकाची कन्या. ही चचपुत्र विग्रहराजाला दिली होती. ही विधवा झाल्यावर आपला भाऊ पूर्णपालापाशीं येऊन राहिली होती. हिनें वि. सं. १०९९ मध्यें वसिष्ठपुरांतील (सिरोहीराज्य) सूर्यमंदिर आणि सरस्वतीवापी यांचा जीर्णोद्धार केला. त्या विहिरीला अद्यापि लाणवाव (लाहिनीवापी) असें म्हणतात (एपि. इंडि. भा. ९, पृ. १२.१५).

लिंगराज—'मलयाद्रि नृसिंह चंडाशु' नामक ग्रंथाचा कर्ता. एक तैलंग.

लिंगण्णा—(स. १८०४) या कानडी कवीनें 'केळदिनृपविजय' नांवाचें कानडी काव्य केलें आहे. हें काव्य स. १८०४ मध्यें लिहिलें असून त्यांत स. १५०२–१७६५ पर्यंत आलेल्या केळदीघराण्यांतील राजांचीं चरित्रें वर्णिलीं आहेत.

लिंगनाथ योगी—(ग्रंथकाल स. १७२४) नाथसंप्रदायी मराठी कवि. चंदीचंदावराकडे होता. ग्रंथ-अमृतसार (योग व परमार्थ). गुरु कोनेरीनाथ (म. क. च. भा. ५, पृ. ८१–८६).

लिंगम्मा नायक—(स. १६५० सुमार) वेलोरच्या चिन्नबोम्मचा मुलगा. विजयनगरच्या तिसऱ्या वेंकटपतिदेव आरविदूनें याचें बंड मोडून वेलोर घेतलें.

लिंगय्या—काश्मीरच्या केयूरबाहूचा वृत्तान्त तेलंगींत लिहिणारा कवि.

लिंगवान—एक चिनी प्रवासी. हा चीनमधून आनाम येथें आला, व तेथून गयेला पोंचला. यानें महाबोधिवृक्षाच्या खालीं बुद्धदेव व बोधिसत्व यांच्या मूर्ति तयार केल्या.

लिंबराज दैठणकर—(स. १६०० सुमार) मराठी साधु व कवि. हे दैठण (जि. नगर) चे राहणारे. हे भजन करीत असतां यांच्या खांद्यावर विठोबा नाचला, अशी आख्यायिका आहे. पंढरीच्या काल्याचा मान यांच्या घराण्याकडे आहे. हे एकनाथस्वामींचे शिष्य.

लीलादेवी—भोजाची पत्नी.

लीलापा—हा चौऱ्यांशीं सिद्धांपैकीं दुसरा सिद्ध. याची जात कायस्थ. हा मगध देशांतील रहिवासी होय. यासच लीलावज्र असें म्हणतात. याचा विकल्पपरिहारगीति (तं. ४८।३) या नांवाचा एक ग्रंथ आहे.

लीलाबाई—(मुक्तेश्वर पाहा).

लुखजी जाधव—(खून स. १६२९) हा विठोजी जाधवाचा पुत्र. याच्या पत्नीचें नांव गिरजा. भाऊ जगदेवराव. लुखजीचे पुत्र रघूजी, दत्ताजी, अचलोजी, बहादुरजी (हा जगदेवरावाला दत्तक दिला). बहादुरजीचा नातू मानसिंग. त्याची मुलगी अंबिकाबाई शाहू छत्रपतीस दिली होती. याच्या मर्जीविरुद्ध याची कन्या जिजाबाईचा विवाह शहाजीशीं याला करावा लागला. शिवाजीच्या वेळीं जिजाबाई गर्भार असतां यानें मोंगलांच्या साहाय्यानें निजामशाहीवर स्वारी करून तिच्यातर्फे लढणाऱ्या शहाजीचा पाठलाग केला आणि पुढें जिजाबाईस शिवाजी झाला, अशी कथा जुन्या बखरींतून दिली आहे.

हा प्रथम निजामशाही सरदार होता. नंतर हा मोंगलांस मिळाला. ही गोष्ट स. १६१८ मध्यें झाली नसून स. १६२१ मध्यें झालेली आहे (प. सा. १४३; १४६).

निजामशाही दरबारांतून सर्व सरदार बाहेर पडत असतां खंडागळ्यांचा हत्ती पुढें निघाल्यावरून तंटा होऊन विठोजी भोसल्याचे पुत्र संभाजी व खेळोजी आणि याचे पुत्र दत्ताजी वगैरेंचें युद्ध होऊन त्यांत शहाजी मूर्च्छित झाला व संभाजी भोसले ठार झाला. तसेंच याचा पुत्र दत्ताजीहि मारला गेला. या वेळीं निजामशाहानें शहाजीची बाजू घेतल्यानें हा मोगलांना जाऊन मिळालेला दिसतो. शिवभारतांत वरील क्रमानें या गोष्टी दिलेल्या आहेत. पुढें हा दहा वर्षें मोंगलांकडे राहून पुनः निजामशाहाकडे आला. फत्तेखानास कैदेंत टाकल्यानें हा निजामशाहींत येण्यास तयार झाला. आणि तेव्हां याचा खून झाला. खुनाचें कारण, हा चांगल्या बुद्धीनें निजामशाहींत आला असतां दारूनें बेहोष झालेल्या निजामशाहानें याचा अपमान केला. तेव्हां हा बेहोष झाला. शेवटीं हमीदखान वगैरे सेनापतीनें भर दरबारांत यास ठार केलें (शके १५५१, श्रावण शु. १५).

लुचिकपा—हा चौऱ्यांशीं सिद्धांपैकीं छप्पनावा सिद्ध होय. जातीनें ब्राह्मण होता. याचा चंडविकाबिंदुस्फुरण (तं. ५८।८३) हा ग्रंथ आहे.

लुहिपा—एक सिद्ध. हा पहिला सिद्ध होय. याच्या वेळीं धर्मपाल राजा होता (स. ७६९–८०९). दारिकपा व डेंगिपा हे याचे शिष्य होत. याचे सात ग्रंथ व हिंदी कविता आहेत. हा शब्द लूहिपा असाहि लिहिलेला आढळतो.

लेस्ली—(मृत्यु स. १७७८ नवं. ३) हा एक इंग्रज सैन्याधिकारी होय.

लोकनाथ—मल्लप्रकाश ग्रंथाचा कर्ता.

लोकमहादेवी—पश्चिम चालुक्यांपैकी दुसऱ्या विक्रमादित्याची पत्नी.

लोकमहादेवी मधुरान्तकी—त्यागवल्लीचें नामान्तर.

लोकादित्य तुलुव—हा चंद्रसेनाचा मुलगा. मयूरवर्मा कदंबाची मुलगी कनकावती ही याची पत्नी.

लोलिंबराज—(स. १६३३) हा जुन्नरच्या दिनकरभट्ट जोशाचा पुत्र. यानें एका मुसलमान मुलीशीं लग्न केलें होतें. तिचें नांव रत्नकला. याचे ग्रंथ—वैद्यजीवन (वैद्यक), हरिविलास (भागवतटीका). याचीं पदेंहि आहेत. याचें नांव त्र्यंबकराज दिसतें. हा आपणांस 'कविपातशाहा' म्हणवून घेतो.

लौगाक्षि भास्कर—(स. १६००-१७००) एक महापंडित. पिता मुद्गल. कवि रुद्राचा हा पुतण्या. याचें नांव भास्कर व आडनांव लौगाक्षि. हा काशीचा असावा. याचा ग्रंथ–न्यायसिद्धान्तदीप व अर्थसंग्रह. अर्थसंग्रहाचें मराठी भाषांतरहि कै. प्रो. शि. म. परांजपे यांनीं मराठींत प्रसिद्ध केलें आहे.

लौजीनसरवानजी—(मृत्यु स. १७७४) सुप्रसिद्ध जहाजें बांधणारा पारशी गृहस्थ. हा प्रथम धनजीभाई नांवाच्या व्यापाऱ्याकडे नोकरीस होता. पुढें आपल्या अंगच्या हुशारीनें व मुंबई सरकारच्या परवानगीनें मुंबईस यानें गलबतें बांधण्याचा कारखाना सुरू केला. पुढें याचा धंदा फार भरभराटीस येऊन याजकडे सरकारी आरमारी जहाजांची दुरुस्ती करण्याचें काम येऊं लागलें; व त्यामुळें हा थोड्याच वेळांत प्रसिद्धीस आला. यानें आपल्या माणकजी व बमनजी नांवांच्या दोन मुलांस या धंद्यांत घातलें व पुढें तीं मुलें याच्याचप्रमाणें प्रसिद्धीस आलीं (इ. सं. ऐ. च. ११९-२६).

ल्युबीन—(स. १७७८) पुणें दरबारीं असणारा फ्रेंच वकील. इंग्रजांचें वर्चस्व झाल्यावर हा पुण्यांतून गेला.

व

वच्छराज—' रसमंजरी ' हें गुजराथी काव्य लिहिणारा जंबूसरचा कबीरपंथी कवि.

वजाहुल्मुल्क—(स. १३७५ सुमार) हा गुजराथच्या मुसलमान राजांचा मूळ पुरुष. हा रजपूत होता. नंतर मुसलमान झाला. याचाच मुलगा पहिला मुज्फरशाहा होय.

वज्जड शिलाहार—(स. १०१०-१७ सुमार) हा टाण्याच्या अपराजित शिलाहाराचा मुलगा. याचा स. १०१७ चा ताम्रपट सांपडला आहे. याच्यामागून याचा भाऊ अरिकेसरी गादीवर आला.

वज्र—(ख्रि. पू. १६९) खारवेलचा सासरा. धूसीचा पिता.

वज्रट—वेदभाष्यकार उवटाचा पिता.

वज्रदामन्—(स. ९७७) कच्छपघाट घराण्यांतील जो लक्ष्मण त्याचा हा मुलगा होय. यानें कनोजच्या राजाचा पराभव केला आणि ग्वाल्हेर काबीज केलें. याच्यानंतर मंगलराज हा गादीवर आला (B.).

वज्रपाणि—हा चौऱ्यांशीं सिद्धांपैकीं होय. हा दीपंकर विज्ञान याच्या मागून (स. १०६५) तिबेटांत गेला व तेथें पुष्कळ ग्रंथांचा यानें अनुवाद केला. याचा ' वज्रपद ' नांवाचा ग्रंथ आहे.

वज्रमित्र शुंग—हा घोष किंवा घोषवसूचा पुत्र.

वज्रहस्त (पूर्व) गंग—(स. ९८४-१०१८) त्रिकलिंगाच्या प्राच्य गंगांपैकीं पहिला राजा. हा कामार्णवाचा पुत्र.

२. (स. ८६३-७८) पूर्व गंगांपैकीं रणार्णवाचा पुत्र. यानें पंधरा वर्षे राज्य केलें.

३. पूर्व गंगांपैकीं दुसऱ्या गुणार्णवाचा पुत्र. विजगापट्टणच्या शिलालेखांत याचें नांव नाहीं.

४. (स. ९८३-१०१७) पूर्व गंगांपैकीं चवथ्या कामार्णवाचा पुत्र.

५. (स. १०३८-६८) पूर्व गंगांपैकीं सहाव्या मधुकार्णवाचा पुत्र. याच्या पत्नीचें नांव अनंगा.

याचा एक स. १०५८ चा दानलेख सांपडला आहे. त्यांत याच्या कुलासंबंधीं पुढील माहिती आढळते. ' हा चंद्रवंशी असून याचें गोत्र आत्रेय होतें. कुलास नांव देणारा राजा कोणी गांगेय नांवाचा

होता. मात्र हा गांगेय म्हणजे भीष्म नव्हे. हे महेंद्रावरील गोकर्ण महादेवाच्या कृपेनें सत्ताधीश झाले. हे प्रथम मांडलिक होते तेव्हां यांना पंचमहाशब्द (पांच राजकीय शब्द) मिळाले. यांच्या पांच शाखा झाल्या होत्या, त्या पुनः नवव्या शतकांत एकत्र झाल्या. यांना परमभट्टारक हें स्वतंत्र राजाचें उपपद लावलें आहे. त्यांपैकों याला राज्याभिषेक स. १०३८ मध्यें झाला. हा परममाहेश्वर होता. यानें वेंगी व ओरिसा येथील राजांचा पराभव केला. यानें तीस वर्षे राज्य केलें' (इंडि. अँटि. ४, पा. १७५-१८८). या लेखांत याचा राज्याभिषेककाळ वर्ष, महिना, चंद्रनक्षत्र व लग्न असा दिला आहे. हा लेख कलिंगनगराहून प्रसिद्ध झाला. हें ठिकाण म्हणजे गंजम जिल्ह्यांतील पालीकिमेडी तालुक्यांतील मुखलिंगम् होय. हें गांव समुद्र किनाऱ्यापासून कांहीं मैलांवर असून तेंच कलिंगनगर होय, असें आतां निश्चित झालें आहे (हि. भा. अ. पा. ३०८-३९९).

वज्रापीड कर्कोटक—(स. ७३६-४३) हा कुवलयापीडानंतर काश्मीरच्या गादीवर आला.

याच्यानंतर याचा पुत्र राजराज हा गादीवर आला. याच्या पत्नीचें नांव अनंगा. याला गुणार्णव व अनन्तवर्मन् असें म्हणत असत.

वडवानळ सिद्ध नागेश—(स. १३९१) हा सिद्ध पुरुष ज्ञानेश्वराचा समकालीन मानतात. याचीं कांहीं पदें, अभंग व 'संकटहरणी शिवग्रंथ' (१४१ ओव्या) प्रसिद्ध आहेत.

वणवीर—(२ उदयसिंह व पन्ना दाई पाहा).

वर्णगोजी निंबाळकर—जगपाळराव निंबाळकरांचें नामांतर.

वत्सदेवी—परगुप्ताची पत्नी.

२. ही भोगवर्मन् मौखरीची मुलगी. ही नेपाळच्या दुसऱ्या शिवदेव लिच्छवीची पत्नी. पुत्र जयदेव.

वत्सभट्ट—(भट्टि पाहा).

वत्सभट्टि—(स. ९६६) याच्या प्रशस्तीचा कुमारगुप्त व बंधुवर्मन् यांच्या मंदोसर येथील शिलालेखांत निर्देश आहे.

वत्सराज—(स. ११७५-१२२५ सुमार) हा जैन नाटककार होता. हा आपणांस कलिंजरचा राजा परमर्दिदेव चंदेल्लाचा प्रधान म्हणवितो. यानें पुढील नाट्यप्रकार लिहिले आहेतः-किरातार्जुनीय 'व्यायोग', रुक्मिणीहरण 'इहामृग', त्रिपुरवध 'डिम', समुद्रमंथन 'समवकार', कर्पूरचरित्र 'भाण' व हास्यचूडामणी 'प्रहसन'.

त्रैलोक्यवर्मा चंदेल्लाच्या अनुज्ञेवरून किरातार्जुनीय या नाटकाचा प्रथम प्रयोग झाला; व बाकीच्या पांच नाटकांचा प्रयोग त्रैलोक्यवर्मन्चा पिता परमर्दिदेव याच्या सांगण्यावरून झाला (नन्नुक पाहा).

वत्सराज प्रतिहार—(स. ७७०-८१४ सुमार) रघुवंशी प्रतिहारांपैकीं देवराजाचा पुत्र. यानें बंगालच्या राजावर विजय मिळवला. बंगालच्या राजाबरोबर झालेल्या लढाईत याचा सामंत मंदोरचा प्रतिहार राजा कक्कहि होता. जेव्हां यानें माळव्याच्या राजावर स्वारी केली तेव्हां याच्या मदतीला दक्षिणचा राष्ट्रकूट ध्रुवराज, आपला सामंत लाटदेशचा राठोड राजा कर्कराजसहित आला होता. त्या लढाईत याचा पराजय झाला, व याला मारवाडांत जावें लागलें. बंगालच्या राजाकडून दोन पांढरीं छत्रें यानें मिळवलीं होतीं. तींहि राठोडानें याच्यापासून घेतलीं (ना. प्र. पत्रिका भा. २, पृ. ३४४-४६ व ३४५ वरील टीप १). यानें भंडीचें राज्य जिंकून घेतलें. रा. चिं. वि. वैद्य यांचें मत असें आहे कीं, वत्सराजानें भंडीचें राज्य घेतलें म्हणजे भंडीकुलांतील इंद्रायुधाचें राज्य घेतलें. भोज राजाच्या सागरताल येथील लेखांत असें लिहिलें आहे कीं, वत्सराजानें भंडी कुलापासून कनोजचें साम्राज्य घेतलें. दिगंबर जैन जिनसेनानें हरिवंशपुराण शा. श. ७०५ (स. ७८३) मध्यें लिहिलें. त्यांत उत्तरेकडे कनोज येथें इंद्रायुध व मारवाडमध्यें याचें राज्य असल्याचें लिहिलें आहे (मुंबई ग्याझि. भा. २, पृ. १९७, टि. २). हा परममाहेश्वर होता. याच्या राणीचें नांव सुंदरीदेवी. तिच्यापासून याला नागभट झाला.

वत्सराज सोळंकी—(स. १०२५ सुमार) लाटदेशच्या सोलंकींपैकीं कीर्तिराजाचा पुत्र. याचा पुत्र त्रिलोचनपाल.

२. (स. १६४१) हा अमरकोशावरील टीकाकार. रामाश्रम याचा गुरु. यानें स. १६४१ मध्यें 'वाराणशीदर्पण' नांवाचा ग्रंथ संस्कृतमध्यें लिहिला. तसेंच वाराणशीदर्पण काशिकाहि यानेंच लिहिली (C. C.).

वनस्कर—(कुशानघराणें व विश्वस्फूर्जि पाहा).

वय्याम्मा—ही तंजावरच्या त्रिम्मप्पाची पत्नी व सेव्वाप्पाची आई. हिला वय्याम्बिका असेंहि म्हणत.

वरगुण पांड्य—(स. ८६२-७८) एक पांड्य राजा. स. ८७२ मध्यें यानें चोलांच्या राज्यावर स्वारी केली, व वेम्बिल येथील किल्ल्याचा नाश केला. पुढें स. ८७८ च्या सुमारास यानें गंगपल्लव अपराजित विक्रम-

वर्मन् याच्यावर स्वारी केली. याच सुमारास गंगबाण घराण्यांतील दिंडिक यानें याचा पराभव केला.

वरदराज—(स. ११५० सुमार) हा आंध्र प्रांतांतील तर्कशास्त्रज्ञ. याचा 'तार्किकरक्षा' नांवाचा ग्रंथ प्रसिद्ध आहे. या ग्रंथावर विष्णुस्वामीचा शिष्य ज्ञानपूर्ण अथवा ज्ञानदेव यानें 'लघुदीपिका' नांवाची टीका लिहिली (हि. ई. लॉ., पा. ३७३-७४).

वरदाचार्य—(स. १६०० सुमार) वेदांताचार्याचा शिष्य. यांचें गांव कांची. हा रामानुजपंथाचा होता. याचे ग्रंथ-रहस्यनयसार, सत्यत्रयनिरूपण, वेदांतविजय व संततिलकभाण. याचे ग्रंथ सरस आहेत (क. च.).

वरदादेवी अमाल—(१ व्यंकटपतिदेवराय आर-विदु पाहा).

वररुचि—(स. २०० सुमार) कात्यायन, कच्चायन व हा एकच असें कांहीं म्हणतात. पाणिनीच्या सूत्रावरील वार्तिकें लिहिणारा, व प्राकृतप्रकाश लिहिणारा हे भिन्न असावेत. प्राकृतप्रकाशावर याची टीकाहि आहे. याचा 'लिंगविशेषविधि' नांवाचाहि एक ग्रंथ आहे. बृहत्कथा सुद्धां याच्यापासून गुणाढ्याला मिळाली. हा पाणिनीच्या समकालीन असणें अशक्य नाहीं असें डॉ. श्री. व्यं. केतकर म्हणतात (प्राचीन महाराष्ट्र, १.१३५).

वराहमिहिर—(स. ४९०) यानें आपला काळ स्पष्टपणें कोठेंच सांगितला नाहीं. आर्यभट्टानंतर दुसरा नामांकित ज्योतिषी हाच होऊन गेला. विक्रमादित्याच्या नऊ रत्नांपैकीं हा एक होता, असें कांहींचें म्हणणें आहे. आदित्यदास हें याच्या वडिलांचें नांव होतें. कपित्थक या गांवीं यास सूर्यापासून वरप्रसाद प्राप्त झाला, अशी आख्यायिका आहे (आदित्यदासतनयस्तदवाप्तबोधः कापित्थके सवितृलब्धवरप्रसादः । बृहज्जातक उपसंहाराध्याय ९).

यात्रा, विवाहगणित, होरा आणि संहिता या विषयांवर यानें ग्रंथ लिहिले आहेत. पंचसिद्धांतिका, बृहज्जातक, लघुजातक, योगयात्रा, विवाहपटल, समाससंहिता व बृहत्संहिता हे ग्रंथ याचे आहेत. बृहत्संहिता व लघुजातक यांचें अरबींत भाषांतर अल्बेरूनीनें केलें आहे. भास्कराचार्यांनीं पुष्कळ ठिकाणीं याचीं वचनें आधारभूत घेतलीं आहेत.

ज्योतिषशास्त्रावर ग्रंथ पुष्कळांचे झालेले आहेत, परंतु याच्याइतका अनेक शास्त्रांवर विचार करणारा ज्योतिषी फक्त हाच झाला. याच्या जातकग्रंथाचा जसा उपयोग होतो तसा संहिताग्रंथाचा मात्र फारसा होत नाहीं. यानें आपल्या वेळच्या हिंदुस्थानांतील एकंदर २८३ प्रांतांची यादी दिली आहे.

वराहमिहिर सहाव्या शतकांत होऊन गेला हें मात्र निश्चित आहे. यानें दक्प्रत्ययानुसार अयनबिंदु निश्चित केले व याच्या वेळेपासूनच वर्षाऋतूची प्रवृत्ति आषाढाचे आरंभीं मानण्यांत येऊं लागली. तत्पूर्वी श्रावणांत दाक्षिणायनाचा व म्हणून वर्षाऋतूचा आरंभ मानला जात असे, असें याच्या ग्रंथांतील विधानावरून दिसतें.

वरुण—(स. १०४० सुमार) एक ज्योतिषी. हा काश्मीरांतील चारमार गांवचा राहणारा. ब्रह्मगुप्ताच्या खंडखाद्यावर याची टीका आहे.

वर्धमान उपाध्याय—(स. १२५०) हा गंगेश उपाध्यायाचा पुत्र होय. यास महोपाध्याय अथवा महामहोपाध्याय अशी पदवी होती. यानें खालील ग्रंथ लिहिले आहेतः—

(१) 'तत्त्वचिंतामणिपरीक्षा', तत्त्वचिंतामणीवरील टीका, (२) 'न्यायनिबंधपरीक्षा', 'न्यायवार्तिकतात्पर्यपरिशुद्धि' या ग्रंथावरील टीका, (३) 'न्यायपरिशिष्टप्रकाश', उदयनाचार्याच्या 'न्यायपरिशिष्टा'वरील टीका, (४) 'प्रमेयनिबंधपरीक्षा' (हा व 'प्रमेयतत्त्वबोध' हे दोन्ही एकच असावेत), (५) 'किरणावलिप्रकाश', (६) 'न्यायकुसुमांजलिप्रकाश', (७) 'न्यायलीलावतीप्रकाश', (८) 'खंडनखंडप्रकाश.'

माधवाचार्यानें आपल्या 'सर्वदर्शनसंग्रहा'त पाणिनीदर्शनांत याचा निर्देश केला आहे. जयदेवानें याच्या दोन ग्रंथांवर टीका लिहिली आहे.

वर्मलात—(स. ६२८) भीनपालच्या चावडावंशांतील एक राजा. वसंतगडचा राज्जिल याचा सामंत होता. भीनपाल येथें राहणाऱ्या माघ कवीनें आपला वडील बंधु सुप्रभदेव हा याचा सर्वाधिकारी (मुख्य मंत्री) होता असें सांगितलें आहे (शिशुपालवध, सर्ग २० कविवंशवर्णन १). यावरून हा भीनपालचा राजा होता असें दिसतें. पण याच्या वंशाची माहिती तेथें आढळत नाहीं. पण भीनपाल येथें राहणाऱ्या 'ब्राह्मस्फुटसिद्धांत' नांवाचा ग्रंथ करणाऱ्या ब्रह्मगुप्त ज्योतिषानें शा. श. ५५० (स. ६२८) मध्यें म्हणजे वर्मलातच्या वेळच्या वसंतगडच्या शिलालेखानंतर तीन वर्षांनीं लिहिलें आहे कीं, भीनपालचा राजा व्याघ्रमुख आहे (ब्राह्मस्फुटसिद्धांत ७।८). यामुळें व्याघ्रमुख हा वर्मलाताचा उत्तराधिकारी होता कीं वर्मलातालाच व्याघ्रमुख म्हणत असत कीं हीं पदवी होती हें समजत नाहीं. तथापि भीनपालच्या चावडा-

वंशाचें राज्य वि. सं. ७९६ (स. ७३९) पर्यंत होतें, यांत शंका नाहीं. कारण लाट देशच्या व सोळंकीचा सामंत असलेल्या पुलकेशी (अवनिजनाश्रय) च्या कलचुरी सं. ४९० (स. ७३९) च्या दानपत्रांत अरबांच्या चढाईचें वर्णन आहे; त्यांत चावडांचें राज्य नष्ट केल्याचा निर्देश आहे. या वेळीं चावडांचें राज्य फक्त भीनपाल येथेंच होतें. वढवाण व पाटण (अनहिलवाड) येथील चावडांच्या राज्याची स्थापना अद्यापि झाली नव्हती. 'फुतूहुलबुलदान' नांवाच्या फार्सी तवारिखेंत असें लिहिलें आहे कीं ही अरबांची चढाई खलीफा हशीमच्या वेळीं जुनैदनें केली होती. शेवटीं भीनपालच्या चावड्यांचें राज्य रघुवंशी प्रतिहारांनीं जिंकलें.

वली—(स. १७२३) आद्य ऊर्दू कवि. याचा कवितासंग्रह प्रसिद्ध आहे (क. कौ. भा. ४). हा मुहम्मदशाह मोगलचे कारकीर्दीत दिल्लीस गेला तेव्हां याचा तेथें सन्मान झाला. यापूर्वीचे कवि फार्सी भाषेंत लिहीत.

वलीउल्ला—नागपूरच्या चांद सुलतानाचा दासीपुत्र. याला पदच्युत करून बुर्हाण गादीवर आला.

वलीउल्ला बाहमनी—(स. १५२१) हा दुसऱ्या महमूदचा पुत्र. यास अहमद बेरीदनें गादीवर बसविला, पण लगेच विषप्रयोग झाला.

वलीद खलीपा—याच्या वेळीं सिंध जिंकला (सूर्यदेवी व परमलदेवी पाहा).

वल्लपदन्नायक—(स. १३४२) होयसळ घराण्यांतील जो बल्लाळ तिसरा त्याचा हा भाचा होय. याच्या बापाचें नांव सोमयदन्नायक. संगम घराण्यांतील पहिल्या हरिहरानें याला आपली मुलगी दिली होती.

तिसऱ्या बल्लाळानें यास स. १३०२ मध्यें आपला प्रधान केल्याचा उल्लेख आहे (Ep. Corn. IX, HK 90). मदुरेच्या सुलतानाविरुद्ध केलेल्या स्वारींत यानें तिसऱ्या बल्लाळाच्या बाजूनें चांगलें शौर्य गाजविलें.

वल्लभदेव—मेघदूत काव्याचा टीकाकार.

वल्लभभट्ट—(स. १०५३ सुमार) अहमदाबादचा मेवाडी गुजराथी ब्राह्मण. यानें गुजराथींत लिहिलेलें धनुर्धारीवर्णन, कालिका, चौसष्ट जोगिणीवर्णन व बहुचरादेवीचें वर्णन प्रसिद्ध आहे. याचे गर्भे प्रसिद्ध आहेत.

वल्लभलाल—यानें वल्लभमताला अनुसरून गीतेवर तत्त्वदीपिका नांवाची टीका लिहिली आहे. गु. प्रिं. प्रेसनें दुसऱ्या आवृत्तींत छापलेल्या गीताटीकांत ती टीका छापली आह.

वल्लभसेन सोळंकी—(स. १००९) अनहिलवाडच्या सोळंकी घराण्यांतील चामुंडाचा हा वडील मुलगा. यानें आपला मुलगा भीमदेव याच्यासह गझनीच्या महमूदाचा पराभव करून तीन हजार मुसलमान कापून काढले. तेव्हां महमूद सोमनाथ लुटून परत जात असतां त्यानें अनहिलवाडवर स्वारी करून भीमदेवाचा पराभव केला, व त्याचा चुलता दुर्लभराज यास गादीवर बसविलें. वल्लभसेनानें फक्त सहाच महिने राज्य केलें. यानें माळव्यावर स्वारी केली होती. याच्यामागून याचा भाऊ दुर्लभराज गादीवर आला.

वल्लभाचार्य—(स. १४७९–१५३१) वल्लभाचार्य हा पुष्टिमार्गाचा संस्थापक. तेलगु प्रांतांतील कांकरव (कंकरवाड) गांवीं राहणाऱ्या लक्ष्मणभट्ट नांवाच्या कृष्णयजुर्वेद पढलेल्या एका तेलंगी ब्राह्मणाचा हा मुलगा होय. लक्ष्मणभट्टाच्या बायकोचें नांव 'एलमागार' असें होतें. तिला घेऊन तो काशीयात्रेस जात असतां वाटेंतच विक्रम संवत् १५३५ (सन १४७९) वैशाख वद्य एकादशीस ती प्रसूत होऊन तिला मुलगा झाला. या मुलाचें नांव वल्लभ ठेविलें. वल्लभानें कांहीं दिवस वृंदावनास व कांहीं दिवस मथुरेस वसती केली. या सुमारास गोवर्धन पर्वतावर देवदमन (श्रीनाथजी) या नांवानें गोपाळकृष्ण प्रगट झाले असें सांगतात. "त्या ठिकाणीं येऊन माझें दर्शन घे." असें वल्लभास देवानें स्वप्नांत येऊन सांगितलें; व आणखीहि त्यास कळविलें कीं, "कृष्णावतारीं गोकुळांतील माझे सवंगडी असलेले गोप पुन्हां या युगांत अवतीर्ण झाले आहेत, व त्यांच्याशीं मला पुन्हां पहिल्याप्रमाणें क्रीडा करितां यावी एतदर्थ त्यांस माझे भक्त अगर उपासक बनव." त्याप्रमाणें तेथें जाऊन वल्लभानें श्रीनाथजीचें दर्शन घेतलें. तेव्हां श्रीनाथजीनें "माझें एक देवालय बांधून उपासनेचा प्रसार कर." अशी आज्ञा केली. तेव्हां वल्लभानें पुष्टिमार्गाची स्थापना केली; व श्रीनाथजी या नांवानें प्रसिद्ध असलेल्या कृष्णाच्या एका विशिष्ट अवताराशीं आपल्या पंथाची सांगड घालून दिली. वल्लभाच्या पूर्वीच्या काळीं होऊन गेलेला ग्रंथकार विष्णुस्वामिन् याचा व वल्लभाचा वेदान्तविषयक सिद्धांत एकच आहे.

वल्लभाचार्यांचा व त्याचप्रमाणें विष्णुस्वामीचाहि वेदान्तविषयक सिद्धांत पुढीलप्रमाणें आहः–आदिपुरुष अगर आत्मा एकटा असल्यामुळें त्यास बरें वाटेना; नाना रूपें धारण करावीं अशी त्यास इच्छा झाली. त्याप्रमाणें तो स्वतःच अचेतन सृष्टि, जीव (जीवात्मा) व अन्तर्यामिन् आत्मा झाला. "यथा सुदीप्तात्पावकाद्विष्फुलिङ्गाः

सहस्रशः प्रभवन्ते सरूपाः तथा" याप्रमाणें सर्व उत्पन्न झालें असून त्याचेच अंश होत. यानें आपल्या अतर्क्य शक्तीनें चित् व आनंद हे दोन गुण पहिल्यांत (म्हणजे अचेतन सृष्टींत) इंद्रियांना अगोचर किंवा अदृश्य अशा स्वरूपांत ठेविले; दुसऱ्यांत आनंद अगोचर स्वरूपांत ठेवला; व तिसऱ्याच्या ठायीं सर्वच गुण इंद्रियगोचर किंवा दृश्य स्वरूपांत ठेवले.

वल्लभानें आपल्या पंथाच्या प्रसारार्थ संस्कृत भाषेंत बरेच ग्रंथ रचिले आहेत. त्यांपैकीं तीन मुख्य होत. ते म्हणजे वेदान्तसूत्र-अणुभाष्य, सुबोधिनी व तत्त्वदीप-निबंध. याच्या १७ लहान पद्यग्रंथांपैकीं 'सिद्धान्तरहस्य' सुप्रसिद्ध आहे. वल्लभाचे चार व त्याच्या मुलाचे चार असे आठ शिष्य व्रज प्रदेशांत (मथुरा-वृंदावनाचा आसमंत भाग) राहत असून त्यांना 'अष्टछाप' अशी संज्ञा आहे. त्यांनीं व्रज किंवा हिंदी भाषेंत अनेक धार्मिक स्फुट कविता रचल्या आहेत. कृष्णकथेमधील अत्यंत शृंगारिक वाङ्मयहि या पंथांत आहे. त्यांपैकीं गोकुळनाथाचे 'चौरासीवार्ता' (स. १५५१) आणि व्रजवासीदासाचे 'व्रजविलास' (स.१७४३) हीं मुख्य आहेत. याच्या पंथाला पुष्टिमार्ग म्हणतात.

वसिष्ठी—ही गौतमीपुत्र शातकर्णीची बायको व पुलुमायीची आई. हिचा उल्लेख नाशिक आणि कार्ली येथील शिलालेखांत आढळतो. हिनें एक गांव बुद्ध-भिक्षूंना दिलें होतें. गौतमीपुत्राच्या पश्चात् हिचा मुलगा पुलुमायी हा महाराष्ट्रांत राज्य करीत असूनहि मद्रास प्रांतांतील धरणीकोट येथें कांहीं दिवस राज्य करीत असावा, असें भांडारकरांचें मत दिसतें (Bhand. p. 28-29).

वसिष्ठीपुत्र पुलोमायी—(२ पुलोमायी आंध्र पाहा).

वसुदेव—(वासुदेव पाहा).

वसुबंधु—(स. ४८० सुमार) एक बौद्ध आचार्य. याचा पिता कौशिक, थोरला भाऊ असंग व धाकटा भाऊ बिलिंचीवत्स. याचा जन्म पेशावर येथें झाला. त्या वेळीं पेशावर ही गांधारची राजधानी होती.

हा प्रथम सर्वास्तिवादीपंथाचा असून वैभाषिक तत्त्व-ज्ञानाचा अभ्यास करी. पण यानें पुढें असंगाच्यामुळें महा-यान पंथाची दीक्षा घेतली. यानें आपल्या आयुष्याचीं बरींच वर्षे शाकल, कोशांबी व अयोध्या येथें घालावलीं व शेवटीं हा अयोध्या येथेंच मेला. वैभाषिक पंडित मनोरथ व संघभद्र याचे समकालीन होते. याच्या संस्कृत चरित्राचें चिनी भाषांतर फक्त मिळतें.

तसेंच याच्या बौद्ध तर्कशास्त्राचें चिनी व तिबेटी भाषांतर फक्त उपलब्ध आहे. यानें अनुमानासंबंधीं पंचावयवी वाक्याऐवजीं द्व्यवयवी वाक्य सुरू केलें. हा दिङ्नागाचा गुरु होता. हा वामनाच्या काव्यालंकार सूत्रवृत्तीतील एका उल्लेखावरून चंद्रगुप्तपुत्र समुद्रगुप्ताचा सचीव होता.

याचे ग्रंथ-अभिधर्मकोश, विज्ञप्तिमात्रतात्रिंशक; शिवाय यानें अवतंसक, निर्वाण, सद्धर्मपुंडरीक. प्रज्ञापरमिता, विमलकीर्ति व इतर कांहीं सूत्रें यांवर टीका लिहिल्या.

अभिधर्मकोश, हा ग्रंथ नीति, मानसशास्त्र व अध्यात्म यांची चर्चा करणारा असून सूत्रकारिकाबद्ध आहे. तो हीन-यान पंथाचा ग्रंथ असला तरी महायानपंथाचेहि लोक तो ग्रंथ मानतात.

वसुमित्र—(ख्रि.पू.१३३-१२३) हा अग्निमित्राचा पुत्र. याचा बाप सिंध प्रांतांत राज्य करीत असल्यामुळें व आजोबा मगध येथें राज्यावर असून म्हातारा असल्यामुळें सैन्याची सर्व जबाबदारी याचेवरच होती. पुष्यमित्रानें यास अश्वमेध यज्ञाकरितां सोडलेल्या घोड्याचा रक्षक नेमलें होतें. यानें १०० निवडक रजपूत व इतर सैन्य बरोबर घेऊन सिंधुनदीच्या दक्षिणेकडील यवनांचा पराभव केला व अश्व सोडवून आणला (मालविकाग्निमित्र, अंक ५). हा सुज्येष्ठाच्या पश्चात् गादीवर आला (V. Smith, p. 214).

२. (स. १२० सुमार) कनिष्कानें बौद्धधर्मग्रंथांवर संस्करण करण्याकरितां विद्वानांची एक परिषद् भरविली होती. एकंदर पांचशें विद्वान् एकत्र झाले होते. त्यांचा हा नायक होता. त्या सभेंत सूत्रपिटकावर भाष्य लिहिलें गेलें (उपदेशशास्त्र). तसेंच विनय व अभिधर्मपिटकावरहि भाष्य लिहिलें. आणि तीं सर्व ताम्रपटावर खोदविलीं होतीं. त्याला महायानपंथाचें वाङ्मय म्हणतात (अश्वघोष व कनिष्क पाहा).

वसुरात—भर्तृहरीचा व्याकरणशास्त्राचा गुरु. याला व्याकरण चंद्राचार्यापासून मिळालें होतें.

वस्तुपाल—(मृत्यु स. १२४१) मंत्री आशराज (अश्वराज) याला कुमारदेवी नांवाच्या विधवेपासून हा झाला. याला तेजपाळ नांवाचा दुसरा एक भाऊ होता, असें मेरुतुंगाचार्यांनीं आपल्या प्रबंधचिंतामणींत लिहिलें आहे. वस्तुपालाच्या चरित्राची सामग्री अरिसिंहकृत 'सुकृत-संकीर्तन', जयसिंहकृत 'हम्मीरमदमर्दन', उदयप्रभकृत 'धर्माभ्युदय', व 'सुकृतकल्लोलिनी,' या ग्रंथांत मिळते. हे

ग्रंथ वि. सं. १२८६ पूर्वी झालें आहेत. तसेंच वस्तुपालाचा समकालीन असणारा बाळचंद्र यानें 'वसंतविलास' महाकाव्य लिहिलें. त्यांत व मेरुतुंगाचार्यकृत 'प्रबंधचिंतामणि,' राजशेखरकृत 'प्रबंधकोश' यांत याचें संक्षिप्त चरित्र आलें आहे. सगळ्यांत विस्तृत चरित्र जिनहर्षकृत 'वस्तुपालचरित्र' या ग्रंथांत दिलें आहे.

याचें शंखासह युद्ध झालें होतें. एकदां दिल्लीचा मुइज्जुद्दीन बहरामशाह पश्चिमेकडे रवाना झाल्याची बातमी राणा वीरधवलाकडे येऊन पोंचली. तेव्हां अबू पर्वतापाशीं यानें त्याचा पराभव करून मुसलमानांचीं लाखों मुंडकीं वीरधवलाकडे रवाना केलीं. पुढें कच्छांतील भद्रेश्वरचा भीमसेन किंवा भीमसिंह यानें जाबालिपुरच्या सामंतपाल, आणि त्रिलोकसिंह या तीन चव्हाणबंधूंच्या साहाय्यानें वीरधवलावर स्वारी केली. त्यांत यानें खूप पराक्रम केला.

हा वडिलापासूनच अत्यंत धनवान् होता. यानें उदार हस्तानें शेंकडों मंदिरें बांधलीं, विहिरी खोदल्या व धर्मशाळा बांधल्या. हा जैनधर्मी असून अबूच्या पहाडावर याची प्रशस्ति आहे. त्यावरून याची संपत्ति आणि व्यय यांची चांगली कल्पना येते.

हा लवणप्रसाद व वीरधवल वाघेलच्या वेळीं मंत्री होता. अबूच्या पहाडावर याच्या पुष्कळ प्रेक्षणीय इमारती आहेत.

वस्तो—(स. १५५० सुमार) शुकदेवाख्यान व सुभद्राहरण या गुजराथी काव्याचा कर्ता.

वंगसेन—हा गदाधराचा पुत्र. शार्ङ्गधर व भावमिश्र यांच्यामधील काळांत बंगालमध्यें झाला. याचे ग्रंथ-चिकित्सासारसंग्रह.

वंगहुएन्त्से—(स. ६४८ सुमार) चीनच्या बादशहानें दुसऱ्यांदा हर्षवर्धनाकडे पाठविलेल्या दूतदलाचा पुढारी. हा हिंदुस्थानांत येऊन हर्षाला भेटण्यापूर्वीच हर्षाचा देहांत झाला होता; व त्याचा सेनापति अर्जुन यानें राज्य ताब्यांत घेतलें होतें. अर्जुनानें यालाहि लुटून कांहीं चिनी सैनिक ठार केले. तेव्हां हा नेपाळांत पळाला. तेथें थोडक्याच दिवसांत चिनी व तिबेटी सैन्य जमवून यानें अर्जुनावर स्वारी केली. त्या युद्धांत अर्जुनाचा पराभव झाला तेव्हां यानें अर्जुनाला पकडून चीनमध्यें नेलें.

वंशशेखर पांड्य—(स. २०० सुमार) नदीच्या पुरानें मदुरा वाहवली. तिची वसाहत यानें पुनः केली. संगम नांवाची विद्वत्सभा स्थापिली, आणि चोलांचा पराभव केला.

वाकाटकांची वंशावळ—१ विंध्यशक्ति (स. २४८–२८४), २ (पहिला) प्रवरसेन (स. २८४–३४४) – गौतमीपुत्र (हा गादीवर आला नाहीं.), ३ (पहिला) रुद्रसेन (स. ३४४–४८), ४ (पहिला) पृथ्वीषेण (स. ३४८–३७५), ५ (दुसरा) रुद्रसेन (स. ३७५–३९५), ६ (पत्नी) प्रभावतीगुप्ता, (यांची दोन मुलें–) दिवाकरसेन (अज्ञान) (पालक–प्रभावतीगुप्ता) (स. ३९५–४०५), ७ दामोदरसेन (प्रवरसेन २ रा) (स. ४०५–४३५), ८ नरेंद्रसेन (स. ४३५–४७०), ९ (दुसरा) पृथ्वीषेण (स. ४७०–४८५), १० देवसेन (नरेंद्रसेनाचा दुसरा मुलगा) (स. ४८५–४९०), ११ हरिषेण (स. ४९०–५२०).

ही वंशावळ बॅ. काशीप्रसाद जयस्वाल यांच्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या 'नागवाकाटक साम्राज्य इतिहास' या ग्रंथावरून घेतली आहे. ही व प्रो. आयंगार यांच्या लेखांत दिलेल्या वंशावळींत फरक आहे. याचें कारण हें कीं देवसेन व हरिषेण यांचीं नांवें अजंठा येथील एका त्रुटित लेखांत येतात. त्यांचा नरेंद्रसेन व पृथ्वीषेण यांच्याशीं कोणता संबंध होता, याविषयीं विद्वानांत मतभेद आहे. वर दिलेलीं कारकीर्दींचीं वर्षें अनुमानावर बसविलीं आहेत. तपशिलाकरितां अधिक खोल विचार करावयास पाहिजे. वाकाटक व भोज एकच.

कुशान आणि आंध घराण्यांचें राज्य संपल्यानंतर गुप्तांचें राज्य येईपर्यंत नाग, भारशिव व वाकाटक अशा तीन घराण्यांनीं हिंदुस्थानावर साम्राज्य गाजविलें, आणि त्यानंतर गुप्त साम्राज्य उदयास आलें. या घराण्यांचा परस्पर संबंध विवाहानें जोडलेला दिसतो. भारशिवांपैकीं पुढील सात पुरुषांची माहिती मिळते– १ नवनाग (स. १४०), २ वीरसेन (स. १७०), ३ हयनाग (स. २१०), ४ त्रयनाग (स. २४५), ५ बर्हिणनाग (स. २५०), ६ चरजनाग (स. २६०), ७ भवनाग (स. २९०–३१५). यांपैकीं भवनागाची मुलगी विंध्यशक्तीच्या नातवास गौतमीपुत्रास दिली होती. त्याचा पुत्र शिशुक हा अज्ञान असतांच वाकाटकांच्या हातांत सर्व सत्ता गेली. तसेंच गुप्तांपैकीं प्रभावती गुप्ता ही या घराण्यांत आली व तिच्यामुळें वाकाटकांचें साम्राज्य गुप्तांच्या हातांत गेलें (किलकिलाराजवंश पाहा).

वाक्पति—'गौडवहो' या प्राकृत काव्याचा कर्ता व कनोजच्या यशोवर्म्याचा आश्रित.

वाक्पतिराज—(मुंज परमार पाहा).

वागीश्वर—मंख कवीच्या ग्रंथाची परीक्षा करणाऱ्या कवींतील एक.

वाग्भट—अष्टांगसंग्रहकार वाग्भट अष्टांगहृदयकाराहून वेगळा आहे.

२. (स. १५० सुमार) हा वैद्यकावरील बौद्ध ग्रंथकार. याच्या वेळीं शक राजे राज्य करीत होते. शक राजांना कांदे फार आवडत असें हा म्हणतो (अष्टांगहृदय, प्र. ४९). हा सिंहगुप्तसुनू होता. अष्टांगसंग्रहाचा उल्लेख व उतारे अष्टांगहृदयांत आहेत.

३ (स. ११२२–५६) हा जैन होता. याच्या पित्याचें नांव सोम आहे. प्राकृतांत वाग्भटाचें नांव बाहड असें येतें. हा कोणा राजाचा मंत्री होता. याचा अलंकारशास्त्रावरील 'वाग्भटालंकार' नांवाचा ग्रंथ सिंहदेवगणि याच्या टीकेसह काव्यमालेंत छापून प्रसिद्ध झाला आहे. हा ग्रंथ सविस्तर विवेचनात्मक असून त्यांत २६० पद्यें आहेत. या ग्रंथाचीं परिच्छेद नांवाचीं पांच प्रकरणें आहेत. या ग्रंथांत एकच स्थळ गद्यात्मक आहे (३. १४ नंतर). वाग्भटालंकारांत उदाहरणासाठीं दिलेल्या श्लोकांत अनहिलवाडच्या चालुक्य घराण्यांतील कर्णराजाचा पुत्र जयसिंह राजा याचा फार संबंध आलेला आहे. जयसिंहानें स. १०९३ पासून ११४३ पर्यंत राज्य केलें (इंडि. अँटि. ६, पा. १८० व २१३ आणि एपि. इंडि. १. २९३). यांतील वडनगरच्या लेखांत अनहिलवाडाच्या चालुक्यांचे वंशवृक्ष इत्यादि विषय आले आहेत. काव्यमालेच्या संपादकांनीं वाग्भटालंकाराच्या प्रस्तावनेंत प्रभाचंद्राच्या प्रभावकचरित्राच्या आधारें दाखविलें आहे कीं, वाग्भट हा स. ११२२ व ११५६ या वर्षीं विद्यमान होता.

४. (स. १३००–१४०० सुमार) हा जैन होता. याच्या पित्याचें नांव नेमिकुमार. हा मेवाडांतील राहडपुर व नलोटकपुर याच्या आसपासचा असावा. याचा 'काव्यानुशासन' नांवाचा ग्रंथ याच्या स्वतःच्या 'अलंकारतिलक' नांवाच्या टीकेसह काव्यमालेंत प्रसिद्ध झालेला आहे. ग्रंथाचा मुख्य भाग गद्य सूत्रात्मक असून त्याचें सोदाहरण विवरण टीकेंत आलेलें आहे. वाग्भटालंकारकर्ता वाग्भट आणि हा भिन्न होत. कारण वाग्भटालंकारकर्त्या वाग्भटाचा यानें आपल्या ग्रंथांत निर्देश केला आहे. हेमचंद्राचें ' काव्यानुशासन ' सर्वत्र प्रसिद्ध आहे.

वाघोजी तुपे—कान्होजी जेध्याच्या पदरच्या ' बारा मुळवे' म्हणून जिवास जीव देणाऱ्या साहाय्यकांपैकीं एक. कान्होजीच्या वतनाच्या भांडणांत याचा वडील भाऊ मारला गेला. कासारखिंडीच्या युद्धांत यानेंहि कामगिरी केली होती. अफजलखान प्रकरणीं याची उत्तम कामगिरी पाहून कान्होजीकडून शिवाजीनें याला आपल्या पदरीं घेतलें. याला पायदळावरील हजारी नेमून याची रवानगी कोंकणांत केली. तेथें मोगल सरदार नामदारखान आपली ठाणीं घालीत होता. त्यास पेणजवळच्या मिरे डोंगरावर गांठून शिवाजीनें निकरानें तोंड दिलें. या चकमकींत हा जखमी झाला.

वाचस्पति—(स. १७२५ सुमार) हा तत्त्वज्ञानी वाचस्पति आणि वाचस्पतिमिश्र या दोघांहूनहि निराळा होय. यानें ' स्मृतिसारसंग्रह ' हा ग्रंथ लिहिला.

२. यानें माधवनिदान या वैद्यकग्रंथावर ' आतंकदर्पण' नांवाची टीका संस्कृत भाषेंत लिहिली आहे. हा पंधराव्या शतकांत होता.

वाचस्पतिमिश्र—(स. ८४१ सुमार) धर्मकीर्ति आदिकरून बौद्ध तर्कज्ञांनीं वात्स्यायन व उद्योतकर या ब्राह्मण तर्कज्ञांवर टीकेची झोड उठवली. तेव्हां वात्स्यायन व उद्योतकर यांच्या समर्थनार्थ वाचस्पतिमिश्रानें ' न्यायवार्तिक ' या ग्रंथावर ' न्यायवार्तिकतात्पर्यटीका ' या नांवाची एक उत्कृष्ट टीका लिहिली.

हा जातीनें ब्राह्मण असून मिथिलेचा राहणारा होता. यानें ' न्यायवार्तिकतात्पर्य ' टीकेस सुरुवात करतांना ' न्यायसूत्रांत ' कोणींहि प्रक्षिप्त मजकूर दडपूं नये म्हणून सर्व सूत्रांची एक सूची तयार केली व तीस ' न्यायसूचीनिबंध ' असें नांव दिलें. ही सूची संवत् ८९८ म्हणजे स. ८४१ त लिहिली असें त्या सूचीवरच यानें दिलें आहे.

वाचस्पति हा नृग राजाच्या आश्रयास राहत असे. याच्या गुरूचें नांव त्रिलोचन असें होतें.

प्रत्यक्षाच्या, ' सविकल्पक ' व ' निर्विकल्पक ' या दोन भागांचें विवरण करतांना आपण वात्स्यायनाच्या टीकेचा अथवा उद्योतकराच्या उपटीकेचा आधार न घेतां आपला गुरु जो त्रिलोचन त्याच्या शिकवणीचाच फक्त आधार घेतला आहे, असें हा म्हणतो. हा त्रिलोचन वैभाषिक तत्त्वज्ञानावर लिहीत असे.

याचा तर्कशास्त्रावरील 'न्यायकणिका' या नांवाचा ग्रंथ आज मितीस उपलब्ध नाहीं. तत्त्वज्ञानाच्या सर्व विभागांतील ग्रंथांवर यानें टीका लिहिल्या होत्या असें म्हणतात. हिंदी तत्त्वज्ञानावरील ग्रंथांत याच्या शारीरभाष्यावरील ' भामतीटीका ' व सांख्यकारिकेवरील ' सांख्यतत्त्व-कौमुदी' ह्या दोन ग्रंथांस फार महत्त्व आहे. याला

तत्त्वज्ञानाच्या सर्व पद्धतींचें ज्ञान होतें. याला 'सर्वतंत्र-स्वतंत्र' असें नामाभिधान मिळालें होतें.

न्यायवार्तिकतात्पर्यटीकेंत यानें माध्यमिक, विज्ञानवाद, सौत्रांतिक, वैभाषिक, (वात्सीपुरीय) या चार तत्त्वज्ञानाच्या शाखांचा निर्देश केला आहे व सर्वत्र दिङ्नाग व धर्मकीर्ति यांच्यावर टीकेची झोड उठवली आहे (हि. इं. लॉ., पा. १३३-१३५).

ब्रह्माशीं जीवाचा संबंध प्रतिपादन करतांना गौडपादाचार्य व शंकराचार्य यांनीं आभास, प्रतिबिम्ब किंवा अवच्छेद यांपैकीं कोणत्याच वादाचा पुरस्कार केला नाहीं. पण यानें अवच्छेदवादाचा पुरस्कार केला आहे.

२. (स. १४५० सुमार) हा अभिनव वाचस्पतिमिश्र या नांवानें प्रसिद्ध आहे. हा धर्मशास्त्रकार म्हणून प्रसिद्ध आहे तरी आपण तत्त्वज्ञानावर १० ग्रंथ लिहिले आहेत असें स्वतःच हा आपल्या 'पितृभक्तितरंगिणी' या ग्रंथांत म्हणतो. हा राजा बहिरवेन्द्र व रामभद्र यांच्या दरबारीं होता. याच्या १० ग्रंथांपैकीं ४ उपलब्ध आहेत.

(१) अनुमानखण्डटीका (गंगेशाच्या ग्रंथावरील टीका), (२) खण्डनखण्डोद्धार (श्रीहर्षाच्या न्यायसूत्राच्या टीकेवरील टीका, (३) न्यायसूत्रोद्धार (न्यायसूत्रावरील टीका, (४) शब्दनिर्णय. शेवटच्या ग्रंथाची प्रत अद्याप उपलब्ध नाहीं, परंतु याच्या द्वैतनिर्णयांत त्याचा उल्लेख आहे (हि. इं. लॉ., पा. ४५९-६०).

याचा 'विवादचिन्तामणि' हा ग्रंथ फार प्रसिद्ध आहे. हिंदु कायद्याच्या बाबतींत हिंदुस्थानांतील हायकोर्टें या ग्रंथाचा उपयोग करितात. यानें ३० ग्रंथ (निबंध) स्मृतींवर लिहिले, असा उल्लेख केला आहे. 'चिंतामणि' याच नांवाचें याचें ११ ग्रंथ आहेत. 'आचारचिंतामणि', 'आह्निकचिंतामणि', 'शुद्धिचिंतामणि', 'कृत्यचिंतामणि', 'तीर्थचिंतामणि', 'द्वैतचिंतामणि', 'नीतिचिंतामणि', 'व्ययचिंतामणि', 'शूद्रचिंतामणि', 'श्राद्धचिंतामणि', हीं त्यांचीं नांवें होत. यांशिवाय यानें निर्णय या नांवाचे कांहीं ग्रंथ केले आहेतः 'तिथिनिर्णय', 'द्वैतनिर्णय', 'महादाननिर्णय'. यांशिवाय यानें मृताशौच आणि जननाशौच यांविषयींहि माहिती दिलेली आहे. याच्या 'महार्णवा'चे कृत्य, आचार, विवाद, व्यवहार, दान, शुद्धि आणि पितृयज्ञ असे सात भाग केलेले आहेत. यांपैकीं 'कृत्यमहार्णव' हा ग्रंथ उपलब्ध असून त्यामध्यें सण, उत्सव, आणि उपवास यांविषयीं माहिती आलेली आहे. यांशिवाय याचे गयाश्राद्धपद्धति, चंदनधेनुप्रमाण आणि दत्तकविधि असे ग्रंथ आहेत.

हा आपणास महामहोपाध्याय आणि मिश्र किंवा संमिश्र असें म्हणवीत असे. महाराजाधिराज हरिनारायण या राजाचा हा 'पारिषद' होता. यानें आपल्या आश्रयदात्या राजांची वंशावळ आपल्या ग्रंथांत दिलेली आहे. रामभद्रदेव या राजाचाहि हा 'पारिषद' होता. आश्रयदात्याच्या सांगण्यावरून यानें ग्रंथ लिहिल असा उल्लेख आहे. हा वर्धमानाचा गुरु होता.

वाचासुंदर—(आनंदराव काशी पाहा).

वाझेष्क—(वशीष्क पाहा).

वाडीकर महार—श्रीछत्रपति शिवाजीनें रोहिडा किल्ल्यावर यास अटकेंत ठेवलें होतें. नंतर सर्जा बुरुजाखालीं यास पुरून टाकण्याची सजा देण्यांत आली (वि. रा. शिंदेकृत अस्पृश्यतेचा उद्गम).

वाणीनाथ—(स. १५६९-१६०८) हा एक कवि असून यानें कच्छ आणि नवानगर येथील जाम घराण्याचा इतिहास काव्यात्मक लिहिला आहे. त्या काव्यात्मक ग्रंथाचें नांव 'जामविजय-काव्य' हें होय.

या ग्रंथांत यानें शत्रुशल्य किंवा सत्तर्सल आणि श्रीकंठ कवि यांचा उल्लेख केला आहे.

वात्स्यायन—(स. ३००-४०० सुमार) हा कामसूत्राचा कर्ता होय. स. च्या ३ ऱ्या शतकाच्या मध्यास यानें 'कामसूत्र' हा ग्रंथ लिहिला असें ठरविण्यांत आलें आहे. याच्या ग्रंथांत सामाजिक भाग असल्यामुळें तत्कालीन समाजस्थितीच्या दृश्याचा उत्तम नमुना म्हणून या ग्रंथाचा चांगला उपयोग होतो (I. H. Q, Vol. VI, p. 397-98). याचा 'न्यायसूत्रभाष्य' नांवाचा एक ग्रंथ आहे. तसेंच 'पुरुषसामुद्रिकलक्षण' नांवाच्या याच्या ग्रंथांतील उतारा 'लिंगविशेषविद्या' या ग्रथांत आढळतो (C. C.). याला वाचस्पति हेमचंद्र यांनीं पक्षिलस्वामिन् म्हटलें आहे. याचा निर्देश सर्वदर्शनसंग्रहांत 'पक्षिलस्वामिन्' या शब्दानें आला आहे.

याच्या न्यायसूत्रावरील भाष्यापूर्वी आणखीहि कांहीं भाष्यें असावींत असें एके, केचित्, अन्ये वगैरे शब्दांनीं केलेल्या निर्देशांवरून दिसून येतें. पण त्यांपैकीं एकहि आज उपलब्ध नाहीं. यानें कौटिल्याचें अर्थशास्त्र व पतंजलीचें महाभाष्य यांतील उतारा घेतला आहे.

याला द्रामिल, पक्षिलस्वामी वगैरे नांवें होतीं. हा दक्षिणेकडील कर्नाटकांतील असावा असें 'द्रामिल' या नांवावरून दिसतें. याचा कांचीशीं संबंध असावा. दिङ्नाग व धर्मपाल हे कांचीचेच होते. यानें द्राविड लोकांच्या

मुख्य खाण्याचा म्हणजे भाताचा निर्देश केला आहे. याच्या भाष्यावर भारद्वाजानें वार्तिक केलें आहे.

२. एक ज्योतिषी. याचा निर्देश हेमाद्रीनें परिशेष खंडांत (२.७९२) केला आहे (C. C.).

३. अलंकारसूत्रग्रंथाचा कर्ता.

वादुगी यादव—(स. १००० पूर्वी) हा राजगीच्या मागून गादीवर बसला असावा असें दिसतें.

वादिराज—याची महाभारतावर 'लक्षाभरण' नांवाची टीका आहे आणि ती नीलकंठाच्या पूर्वीची आहे.

२. (स. १०२६ नंतर) तिसऱ्या भिल्लम यादवानंतर गादीवर आला.

वानकी—चिनी प्रवासी. श्रीभोज येथें राहत असे.

वानयुन—चिनी प्रवासी. चीनमधून समुद्रद्वारा कलिंगांत गेला व तेथें मेला.

वामदेव—(चिरंजीव भट्टाचार्य पाहा).

वामदेव कवि—मुनिमतमणिमाला ग्रंथाचा कर्ता. हा ग्रंथ धर्मशास्त्रप्रकरणाचा आहे.

वामन—(स. ८०० सुमार) याचा 'काव्यालंकारसूत्र' हा ग्रंथ प्रसिद्ध आहे. यावरील वृत्तीहि यानेंच स्वतः केली आहे. याचा हा ग्रंथ प्राचीन सूत्रपद्धतीनें लिहिला असून यानें त्याचे भाग व पोटभाग दाखविणारी परिभाषाहि जुन्या सूत्रकारांची उचललेली दिसते. काव्यालंकारसूत्राचे त्या पद्धतीनुसार अधिकरण नांवाचे पांच भाग केले असून प्रत्येक अधिकरणांत दोन किंवा तीन अध्याय आहेत. एकंदर अध्यायसंख्या १२ असून सूत्रसंख्या ३१९ आहे. याच्या ग्रंथांत व्याससूत्राप्रमाणें अध्यायांत अधिकरणें नसून कौटिल्यकृत अर्थशास्त्राप्रमाणें अधिकरणांत अध्याय आहेत. वामनाच्या या ग्रंथावरील एक टीकाकार सहदेव यानें म्हटलें आहे कीं काव्यालंकार एकदां प्रचारांतून नाहींसा झाला होता, पण पुढें भट्ट मुकुलाला त्याची प्रत मिळाली असतां त्यानें तो संप्रदाय पुनः सुरू केला (राजशेखरकृत काव्यमीमांसा, बडोदेप्रत टिप्पणी पा. ५). हा जयापीड राजाचा मंत्री होता, असा निर्देश राजतरंगिणींत आहे. त्यावरून हा स. ८०० च्या सुमारास होता असें ठरतें. माधवकवींचीं कांहीं वाक्यें उद्धृत केलेलीं आहेत त्यांवरूनहि याचा काळ मिळण्यास मदत होते.

तसेंच हा नंतर जगत्तुंग राष्ट्रकूटाच्याकडेहि होता (लिंगानुशासन ९ टीका).

गायकवाडसीरीजमध्यें नुकताच वामनाचा 'लिंगानुशासन' नांवाचा ग्रंथ प्रसिद्ध झाला आहे. त्याच्या संपादकाच्या मतें काव्यालंकारसूत्रकार वामन, काशिकावृत्तीचा कर्ता वामन आणि लिंगानुशासनाचा कर्ता वामन हे सर्व एकच होत. यावरील सहदेवाच्या टीकेचा उल्लेख वर आलाच आहे. याशिवाय 'साहित्यसर्वस्व' नांवाची महेश्वराची टीका इंडिया ऑफिसमध्यें आहे (पा. ३२१). भट्टगोपालाचीहि एक टीका असावी, असें याच सूत्रावरील गोपेंद्रतिप्पभूपालाची टीका वाणीविलास प्रेसमध्यें छापली आहे त्यावरून दिसतें.

यानें तेहतीस श्लोकांचें 'लिंगानुशासन' स्वतःच्या टीकेसह गाय. ओ. सीरीजमध्यें सहावा ग्रंथ म्हणून प्रसिद्ध झालें आहे. याचा विद्याधरव्याकरण नांवाचा ग्रंथ आहे.

यानें 'श्रीभवन' नांवाच्या गांवचा उल्लेख केला आहे, व त्याच्याशीं जगत्तुंगाचाहि संबंध दिसतो (वणीदिंडोरी व राधनपूर शिलालेख).

काशिकावृत्तीपैकीं १।२।५।६ या अध्यायांवरील वृत्ति यानें लिहिली, असें बहुल्पार्थात् (पा. सू. ५. ४. ४२) या सूत्रावरील शब्दरत्नांत म्हटलें आहे. पण याविषयीं मतभेद आढळतो.

वामन पंडित—(स. १६३६–१६९५) प्रसिद्ध मराठी कवि. हे मूळचे विजापूरचे देशस्थ ऋग्वेदी वासिष्ठगोत्री माध्वसांप्रदायी ब्राह्मण. पित्याचें नांव नरसिंह (नरहरी) आणि मातेचें नांव लक्ष्मी. लक्ष्मीचें माहेरचें गोत्र शांडिल्य. पंडितांच्या पत्नीचें नांव गिराबाई. यांचें अध्ययन काशीस झालें. यांना फार्सी भाषा उत्तम येत असे. यांचा गुरु सच्चिदानंद. यांचें घराणें जरी द्वैतमताचें माध्वसांप्रदायी होतें तरी यांनीं अद्वैतमत स्वीकारलें. वामन शेष, वामन पंडित, वामन पार्थसारथी व वामन या चार व्यक्ति भिन्न किंवा एक हें निश्चित नाहीं.

हे प्रथम विजापूरच्या दरबारीं होते. पण यांच्यावर बाटण्याचा प्रसंग येऊं घातला तेव्हां यांनीं विजापूर सोडलें आणि भिक्षावृत्ति पत्करली. नंतर काशीस जाऊन पंडित झाले. नंतर पंडितांशीं वाद करून विजय मिळवीत हिंडूं लागले. पण यांचें समाधान झालें नाहीं. शेवटीं हे मलयाचल पर्वताकडे गेले असतां यांनीं अद्वैतमताचा उपदेश एका यतीपासून घेतला, असें 'निगमसार' ग्रंथांत प्रारंभीं लिहिलें आहे.

हे महाबळेश्वराकडे जात असतां वाईच्या पश्चिमेस गुऱ्हेघर येथें समाधिस्थ झाले. गुऱ्हेघर भूगांव या समोर आहे व दोन्ही गांवांच्या मध्यें कृष्णानदी वाहत आहे. महादेव ऊर्फ विश्वात्मक गोसाव्यानें यांची समाधि भूगांवीं कृष्णातीरीं खडकावर बांधली. नंतर शिरवळ कोरेगांवीं वृंदावन बांधलें. भूगांव व पांडववाडी जवळच आहेत.

यांनीं १२ लक्ष कविता लिहिली असें हनुमंतस्वामी रामदासचरित्रांत लिहितात. पण यांची उपलब्ध कविता ४०००० होईल.

यांचे अनेक शिष्य होते. त्यांपैकीं साम्राज्य वामन, विश्वनाथ वर्गरेनीं उत्तम काव्यें केलीं आहेत.

गिराबाई होत्या तोंपर्यंत यांचें अग्निहोत्र होतें, पण त्या निवर्तल्या तेव्हां यांनीं संन्यास घेतला.

यांचे प्रमुख ग्रंथ--(कृष्णाश्रयाच्या विनंतीवरून) यथार्थदीपिका (बावीस हजार ओव्यांची गीताटीका), निगमसार (वेदान्त स. १६७३), अपरोक्षानुभूति (स. १७७५) अनुभूतिलेश. आख्यानें—रामजन्म, कंसवध, हरिविलास, कात्यायनीव्रत, जलक्रीडा, जटायुस्तुति, भीष्मप्रतिज्ञा. भाषान्तरें--शतकत्रय (शृंगार, नीति व वैराग्य), गंगालहरी, समश्लोकी गीता (कृष्णाश्रयाच्या विनंतीवरून).

यांना लांबलांब यमकें साधण्याचा नाद असल्यानें 'यमक्या वामन' असें म्हणत. शतकत्रय व यथार्थदीपिका यांचा कर्ता वेगळा असावा, असें पुष्कळांचें म्हणणें आहे.

वामनभट्ट बाण—(स. १३७५–१४२५ सुमार) या संस्कृत कवीला 'अभिनव बाण' असेंहि म्हणतात. हा कोंडविडूचा राजपुत्र वेम याच्या दरबारीं होता. याचे ग्रंथ–पार्वतीस्वयंवर (नाटक), पार्वतीपरिणय (नाटक), शृंगारभूषणभाण, सर्वचरित व वीरनारायणचरित (यांत याच्या आश्रयदात्याचें चरित्र आहे). याचीं नाटकें चांगलीं आहेत. कुमारसंभव काव्याची त्यावर छाया आहे.

वामनराव पटवर्धन—(मृत्यु स. १७७५ नवं. २) पेशवाईतील एक सरदार. हा गोपाळराव पटवर्धनाचा भाऊ. हा हरिपंत फडक्याचा मदतनीस होता. याच्यामागें पांडुरंगरावाकडे सरदारी आली.

वाल्टर रेनहार्ट—हा जनरल सुमरू या नांवानें प्रसिद्ध आहे. बेगम सुमरू ही याची पत्नी होय.

वालीज—ही कर्वायत्री अव्हेयरची बहीण. हिला कारवार ज्ञातीच्या लोकांनीं वाढविलें. हिचें तामिळभाषेंत बरेंच काव्य आहे.

वासवदत्ता—उज्जयनीच्या चंद्र प्रद्योताची मुलगी व उदयनाची पत्नी.

वासिष्क—(स. १०२–१०६) हा कनिष्काचा मुलगा असावा. कनिष्क युद्धावर असतां हा उत्तर हिंदुस्थानांत राजप्रतिनिधी या नात्यानें काम करीत असे असें मानलें पाहिजे. याचीं नाणीं सांपडत नाहींत, यावरून हा बापाच्या पूर्वीच वारला असावा. याचे शिलालेख शा. श. २४ आणि २८ मधील मिळाले आहेत (आर्कियालॉजिकल सर्वे रिपोर्ट, स. १९१०–११, पृ. ४१–४२).

वासुदेव—(स. ९००–१०००) संस्कृत कवि. 'नलोदय' काव्याचा कर्ता. हा ग्रंथ कालिदासाचा नाहीं.

वासुदेव अनंत—हा प्रतिनिधींचा मुतालीक होय. हा पेशव्यांचे कैदेंतून पळून बाणकोटास इंग्रजांकडे गेला होता, सबब याच्या गांवाची बारभाईंनीं जप्ती केली.

वासुदेव कवि—'युधिष्ठिरविजयकाव्य' आणि 'न्यायसारपंजिका' या ग्रंथाचा कर्ता. हा कवि काश्मीराकडे राहत असे.

वासुदेव कुशान—(स. १५२–७६) हा हुविष्काच्या नंतर राज्य करूं लागला. यानें स. २२० पर्यंत राज्य केलें. हा कुशान घराण्यांतील शेवटचा राजा होय. कुशान घराणें स. २२६ चे सुमारास लुप्त झालें. याच्या वेळचीं नाणीं पाटलीपुत्र येथें सांपडलेलीं आहेत. याच्या वेळीं कुशानांचें राज्य बंगालचे उपसागरापर्यंत होतें. यमुनेपासून नर्मदा, काश्मीर, पंजाब, ते सिंध, गुजराथ बलुचिस्थान इ. मुलूखहि कुशानांच्या ताब्यांत होते. यानें कांहीं सोन्याचीं नाणीं पण पाडलीं होतीं. याचे कारकीर्दीत स. १६७ मध्यें बाबिलोनियांत प्रथम प्लेग सुरू झाला व तोच त्या वेळीं हिंदुस्थानच्याहि नाशास कारण झाला (V. Smith, 276, 288, 290, 291, 294). हा स. १७६ मध्यें मरण पावला. याच्यानंतर कुशान घराणें नष्ट होऊन अश्वमेधिन् भारशिव हा राज्य करूं लागला (Hist. of India, Jayswal, p. 7).

वासुदेव जनार्दन हणमन्ते—हे भोसल्यांचे पिढीजात नोकर. याचा पुत्र बाळकृष्ण.

वासुदेवमिश्र—(स. १२७५ सुमार) हा जयदेव मिश्राचा पुतण्या व शिष्य. आपल्या गुरूच्या ग्रंथांतील दोषसमर्थनार्थ यानें गंगेशोपाध्यायाच्या तत्त्वचिंतामणीवर टीका लिहिली (हि. इं. लॉ., पा. ४५६).

वासुदेव सार्वभौम—(स. १४५०–१५२५सुमार) याचा जन्म बंगाल्यांत नडिआ येथें झाला. याचा पिता महेश्वर विशारद. यानें न्यायशास्त्राचें अध्ययन मिथिला येथें पक्षधरमिश्राकडे केलें. याच्या पांडित्यावर खूष होऊन गुरूनेंच याला 'सार्वभौम' अशी पदवी दिली.

मिथिलेंतील पंडित आपल्या ग्रंथाची प्रत बाहेर जाऊं नये याची काळजी घेत म्हणून यानें 'तत्त्वचिंतामणि' व 'कुसुमांजलि' हे ग्रंथ तोंडपाठ केले. तसेंच वाटेंत कोणीं

धोका देऊं नये म्हणून नडिआस जाण्याचें निमित्त करून बनारसला गेला, व तेथें वेदान्ताचें अध्ययन केलें. नंतर हा नडिआस आला व वरील ग्रंथ स्मरणानें लिहून काढून यानें नडिआस पहिली तर्कशास्त्राची पाठशाळा सुरू केली. तेथें रघुनाथशिरोमणि (नव्यन्यायशास्त्रावरील ग्रंथकार) व वैष्णवपंथसंस्थापक चैतन्य हे दोन उत्कृष्ट शिष्य तयार केले. यानें आपलें शेवटलें आयुष्य ओरिसाच्या गजपति प्रतापरुद्राच्या आश्रयाखालीं घालविलें. यानें गंगेशाच्या ग्रंथावर ' सर्वभूषणनिरुक्ति ' नांवाची टीका लिहिली (हि. इं. लॉ., पा. ४६१-६३).

याशिवाय रघुनंदन भट्टाचार्य (धर्मशास्त्रकार) व कृष्णानंद आगमवागीश (तंत्रज्ञ) हे याचे शिष्य होते.

वासुपूज्य—जैनांचा बारावा तीर्थंकर (तीर्थंकर पाहा).

वास्को-द-गामा—(मृत्यु स. १५२४) कालिकतच्या झामोरिनच्या द्वारां याचा हिंदुस्थानांत प्रवेश झाला. पोर्तुगीज सत्तेचा पाया घालणारा हा पहिला इसम होय.

वांकोजी ढमढेरे—हा पेशव्यांतर्फे कांहीं दिवस पुण्याचे अमलावर होता. हा जातीचा मराठा असून तळेगांवच्या ढमढेरे या घराण्यांतील होय. यानें पेशव्यांच्या कारकीर्दीत पाबळचें ठाणें घेतल्याचा उल्लेख पेशव्यांचे शकावलींत आहे (मं. वा. इ. श. १८३७ ले. १११).

वांच्छेश्वर—(स. १८१६) सत्याषाढश्रौतसूत्राच्या चोविसाव्या प्रश्नावर 'वांच्छेश्वरी महालिंगाख्या' नांवाची टीका यानें लिहिलेली आहे. फक्त त्या प्रश्नांतील आठव्या प्रश्नावर टीका नाहीं. हा स. १८१६ मध्यें परशुरामभाऊ पटवर्धन यांच्या आश्रयाला होता.

विक्रम कदंब—हा दुसऱ्या जयवर्मा कदंबाचा पुत्र. यास विक्रमांक म्हणत.

विक्रम चोल—(स.१११८-११३५) हा चोलांपैकीं पहिल्या कुलोत्तुंगाचा चवथा पुत्र होय. युवराज असतां हा वेंगीचा सुभेदार होता. यानें एलोर व कलिंग यांवर स्वारी केली. यानें तेलगू राजा भीम याचा पराभव केला; व १७।१८ वर्षे शान्तपणें राज्य केलें. जयमगोण्ड कवीनें आपलें कलिंगत्तुप्परणी हें काव्य याला अर्पण केलें आहे. हा वैष्णव असल्यानें रामानुजाचार्य हा याच्या राज्यांत येऊन राहिला. याच्यामागून याचा पुत्र दुसरा कुलोत्तुंग गादीवर आला.

विक्रम गंग—(विष्णुवर्धन पाहा).

विक्रम पांड्य—हा कुलशेखराचा मुलगा. याचे लेख तंजावर, अर्काटच्या दक्षिणेस व चिंगलपट येथें सांपडतात.

२. हा अभिषेक पांड्यांनंतर गादीवर आला. हा जैन होता.

विक्रम (देव) चालुक्य—(स. १०१२-११२७) हा चालुक्यांपैकीं पहिला कुलोत्तुंग याचा पुत्र. यानें १५ वर्षे राज्य केलें. आपल्या भावाप्रमाणें हाहि युवराज असतांना वेंगी देशाचा राजप्रतिनिधी असावा.

विक्रमशाहा—(स. १६७२-७८) जव्हारचा राजा. मोरोपंत पिंगळे यानें याचा पराभव केला तेव्हां हा मोगलांकडे नाशिक जिल्ह्यांत पळाला. पुढें भिल्ल, कोळी वगैरे जमवून ठाणें जिल्ह्यांत उत्तर भागांत धामधूम करूं लागला, व मोगलांतर्फे युद्ध करूं लागला तेव्हां याचा मराठ्यांनीं वध केला.

विक्रमसिंह गुहिलोत—(स. ११४८-५८) मेवाडचा राजा.

विक्रमसिंह परमार—(स. ११४४) आबूच्या परमारांपैकीं रामदेवाचा उत्तराधिकारी. हेमचंद्र (हेमाचार्या)नें आपल्या द्व्याश्रय महाकाव्यांत लिहिलें आहे कीं, गुजराथच्या कुमारपाल सोलंकीनें आजमेरच्या आना (अर्णोराजा)वर चढाई केली त्या वेळीं आबूचा विक्रमसिंह त्याच्या बरोबर होता (द्व्याश्रयकाव्य, सर्ग १६ ३३-३४). जिनमंडनोपाध्यायानें आपल्या कुमारपालप्रबंधांत लिहिलें आहे कीं, हा लढाईत आनाच्या बाजूस सामील झाला म्हणून कुमारपालानें याला कैद करून आबूचें राज्य त्याच्या बहिणीचा पुत्र यशोधवल यास दिलें. आबूच्या मंदिरावर वास्तुपालाची प्रशस्ति लावली आहे तींत रामदेवानंतर यशोधवलाचें नांव दिलें आहे. पण हेमचंद्र कुमारपालाच्या वेळचा असल्यामुळें त्याचें म्हणणें निर्मूल म्हणतां येत नाहीं. कुमारपाल सोलंकीनें अजमीरवर दोनदां स्वारी केली, पण मागाहूनच्या जैन लेखकांनीं एकच समजून घोंटाळा केला आहे. पहिली स्वारी वि. सं. १२०१ (स. ११४४) च्या सुमारास झाली, त्या स्वारींत कुमारपाल विजयी झाला असें दिसत नाहीं. दुसरी स्वारी वि. सं. १२०७ (स. ११५०) मध्यें झाली तींत तो विजयी झाला. विक्रमसिंहाच्या वेळीं पहिली स्वारी झाली असावी. कारण सिरोही राज्यांतील अजारी गांवीं यशोधवलच्या वेळचा एक शिलालेख वि. सं. १२०२ (स. ११४५) मधील मिळाला आहे त्यांत याला महामंडलेश्वर लिहिलें आहे (राजपुताना म्युझियम, अजमेर).

२. (स. १२९९-१३११) आबूच्या परमारांपैकी प्रतापसिंहाचा उत्तराधिकारी. याच्या वेळचा एक शिलालेख वि. सं. १३५६ (स. १२९९) मधील सिरोही राज्यांतील वर्माण गांवीं मिळाला आहे. तो तेथें ब्रह्माणस्वामी नांवाच्या सूर्यमंदिराच्या खांबावर कोरला आहे. त्यावर याचा किताब महाराजकुल (महारावळ) असा लिहिला आहे. आबूवरील तेजपालाच्या मंदिरावरील वि. सं. १२८७ मधील दुसऱ्या प्रशस्तीमध्यें आबूच्या परमार राजा सोमसिंहालाहि राजकुल (रावळ) लिहिलें आहे. त्यावरून मेवाडच्या राजांप्रमाणें यांनाहि हे किताब धारण केले असें दिसतें. याच्या वेळीं जालोरच्या चौहाणानें याच्या राज्यांतील पश्चिमेकडील भाग घेतला व याच्या अंतसमयीं किंवा पुढें वि. सं. १३६८ (स. १३११) च्या सुमारास राव लुंभानें यांची राजधानी चंद्रावती घेऊन हें राज्य नाहींसें केलें. या वंशांपैकी कृष्णराज (कान्हडदेव) दुसऱ्याचे वंशज गुजराथेंत दांता येथें आहेत.

विक्रमांकदेव चालुक्य—(स. १०८०) दक्षिणेंतील कल्याणीचा चालुक्यवंशीय प्रसिद्ध राजा. याचाच मंत्री मिताक्षराकार विज्ञानेश्वर होय.

विक्रमादित्य—ख्रिस्तपूर्व पहिल्या शतकांत विक्रमादित्य नांवाचा राजा होऊन गेला, याला निश्चित प्रमाण सांपडत नाहीं. याचा एकहि शिलालेख अद्याप उजेडांत आला नाहीं. हालाच्या प्राकृत ' सत्तसई ' मध्यें विक्रमादित्याच्या दातृत्वाचा, कथासरित्सागर व बृहत्कथामंजरी यांमध्यें याच्या भूतवेतालादिकांवर मिळविलेल्या विजयाचा व जैनांच्या कालकाचार्य कथानकामध्यें यानें केलेल्या शकांच्या पराभवाचा उल्लेख आहे. पण हे सर्व ग्रंथ ख्रिस्तपूर्व पहिल्या शतकानंतर कित्येक शतकांनीं झाले आहेत. त्यामुळें त्यांचा पुरावा म्हणून महत्त्व कमी झालेलें आहे. आतांपर्यंत विद्वानांनीं तत्कालीन इतिहासाची जी संगति लावली आहे त्यांत विक्रमादित्याला कोठेंहि निश्चित स्थान लाभत नाहीं.

ख्रिस्तपूर्व पहिल्या शतकांत शकांनीं हिंदुस्थानावर स्वारी करून काठेवाड, माळवा, महाराष्ट्र, कोंकण इत्यादि प्रांत आपल्या अंमलाखालीं आणले होते यांत संशय नाहीं. कारण त्यांचा एक क्षत्रप नहपान व त्याचा जांवई ऋषभदत्त (उषवदात) याचे लेख नाशिक, कार्ले वगैरे ठिकाणीं सांपडले आहेत. त्यांत त्या प्रकारचें वर्णन आहे. पण या नहपानाचा पराभव करून ज्यानें शकांना या प्रांतांतून पिटाळून लावलें त्या गौतमीपुत्र सातकर्णीनें विक्रमादित्य ही पदवी धारण केल्यावें त्याच्या कोरीव लेखांवरून दिसत नाहीं. तसेंच एखादा संवत् स्वतःच्या नांवानें सुरू केल्याचेंहि दिसत नाहीं.

तसेंच प्रसिद्ध असलेल्या विक्रमसंवत्चा विक्रमकाल या नांवानें प्रथम उल्लेख नवव्या शतकांत आला. या ठिकाणींहि विक्रमपदानें ' विक्रमादित्य ' हा अर्थ विवक्षित आहे काय याबद्दल संशय आहे. वि. सं. १०५० मध्यें लिहिलेल्या अमितगतीच्या सुभाषितरत्नसंदोहांत प्रथम शकाच्या नांवांतील ' विक्रम ' हा शब्द विक्रमादित्य नृप या अर्थी निःसंदिग्ध रीतीनें योजिलेला आढळतो. प्रो. कीलहॉर्न यानें या शकाच्या अनेक मित्यांचें निरीक्षण करून असें अनुमान काढलें आहे कीं, हा शक कोणीं विक्रमादित्यानें सुरू केला नसून या शकाचा वर्षारंभ शरदृतूंत असल्यानें पराक्रमाचा काळ म्हणून विक्रमशक असें त्याचें नांव पडलें, असें हर्षचरितादि ग्रंथांत म्हटलें आहे (यशोधर्मदेव पाहा).

विक्रमादित्य गर्दभिल्ल—(ख्रि. पू. ५७) उज्जयनीचा जो गर्दभिल्ल राजा त्याचा हा मुलगा होय. हा आपल्या बापानंतर उज्जैनीच्या गादीवर आला. गादीवर आल्यावर यानें आपल्या बापाच्या वेळीं शक राजांनीं जिंकलेला प्रदेश परत मिळविला आणि उज्जयनी येथें आपल्या घराण्याची स्थिरता केली.

या वेळीं याच्या दरबारीं, जैनांचा वाङ्मयविशारद सिद्धसेन दिवाकर होता. त्यानें (सिद्धसेन दिवाकरानें) विक्रमादित्य राजाचें धर्मांतर केलें, असा जैनांनीं उल्लेख केला आहे. सिद्धसेन दिवाकरानें विक्रमादित्याचें महावीरानंतर ४७० वर्षांनीं धर्मांतर केलें व हळुहळूं याच्या कारकीर्दींत जैनधर्माचा फैलाव होऊं लागला. हा विक्रमसंवत् सुरू करणारा असण्याचा संभव आहे. पण याला समकालीन निर्विवाद आधार नाहीं.

विक्रमादित्य गंग—(स. १०५५) हा गंगांपैकी राजराजाचा पुत्र. बंकापूर शिलालेखावरून याचा काळ स. १०५५ हा निश्चित ठरतो. याला परमाडि (परमर्दि) असें म्हणत. हा बनवासी व गंगवाडी येथें राज्य करीत असे.

विक्रमादित्य गुप्त—(स. १२१३ सुमार) गुप्त घराण्यांतील आहवादित्य वीराचा पुत्र. याचें राज्य धार व म्हैसूर प्रांतांत होतं. या नांवाचे तीन राजे या घराण्यांत झाले.

विक्रमादित्य गुहिलोत—(स. १५३१–३६) रत्नसिंहाला मूल नसल्यामुळें हा त्याचा भाऊ त्याच्या मागून गादीवर आला. संग राण्यानें रणथंभोरची जहागिर याला दिली होती. हा वि. सं. १५८८ (स. १५३१) मध्यें गादीवर बसला. हा राज्य चालविण्यास अगदीं नालायक होता. यानें सात हजार पहिलवान नोकरीला ठेविले. त्यांच्या शक्तीवर याचा फार विश्वास होता. त्यामुळें हा सरदारांची थट्टा करी. अशा स्थितींत जवळचीं विश्वासूक व पराक्रमी माणसें नष्ट होणें स्वाभाविक आहे.

माळव्याचें राज्य गुजराथच्या बहादुरशाहाला मिळाल्यामुळें तो बलिष्ठ झाला होता. त्यानें आपल्या मांडू येथील अधिकाऱ्यांच्या साहाय्यानें चितोडवर स्वारी केली तेव्हां राजमाता कर्मवतीनें बराच मुलूख देऊन व मांडलिकता स्वीकारून तह घडून आणला. पण यामुळें याच्या वर्तनांत कांहींच सुधारणा झाली नाहीं. अनेक सरदार बहादुरशहाला जाऊन मिळाले. याच वेळीं मुहम्मद-जमा याला आश्रय देऊन त्यानें हुमायुनाशीं विरोध सुरू केला. तातारखानाच्या नेतृत्वाखालीं हुमायुनाशीं दिलेल्या लढाईंत त्याचा पराजय झाला. तेव्हां त्याला चितोडसारख्या सुरक्षित किल्ल्याची फार जरूरी वाटूं लागली म्हणून त्यानें चितोडवर पुनः स्वारी केली. तिकडून हुमायूनहि त्यावर ग्वाल्हेरपर्यंत चालून आला होता. त्याला धर्मयुद्धाच्या सबबीवर तेथेंच त्यानें थांबविलें. इकडे राजमाता कर्मवतीनें सर्व रजपुतांना चितोडच्या संरक्षणाविषयीं विनंति करून देशभक्तीनें प्रेरित केलें, याला सुरक्षिततेकरितां बुंदीला पाठवून दिलें व तात्पुरता रावत बाघसिंगाला महाराणा केलें. पण शत्रूचें बळ वाढल्यामुळें बीकाखोहच्या बाजूची पंचेचाळीस हात भिंत सुरुंगानें उडाली. राजमाता कर्मवतीसुद्धां सर्व स्त्रियांनीं जोहार केला. अनेक रजपूत कामीं आले व शेवटीं किल्ला बहादूरशहाच्या ताब्यांत गेला. पण हुमायून येतो आहे असें पाहतांच थोडी सेना चितोडवर ठेवून आपण सर्व सैनेसह हुमायूनकडे वळला. मन्दसोरपाशीं युद्ध होऊन बहादुरशाहा मांडूकडे पळाला व शेवटीं पाठलागामुळें दीव बेटांत पोर्तुगीजांच्या आश्रयाला गेला, व परत येतांना तो मारला गेला.

बहादुरशहाच्या पराजयाची बातमी ऐकतांच रजपुतांनीं पुनः चितोड ताब्यांत घेतला पण शेवटीं सांगाचा थोरला भाऊ पृथ्वीराज याच्या रखेलीच्या पोरानें याला विश्वासघातानें ठार केलें. उदयसिंहालाहि तो मारणार होता, पण पन्ना नांवाच्या दाईनें त्याला वांचविलें.

विक्रमादित्य (पश्चिम) चालुक्य—(स. ६५५–८१) हा पश्चिम चालुक्यांपैकीं दुसऱ्या पुलकेशीचा तिसरा पुत्र. दुसऱ्या पुलकशीनंतर पल्लव, पांड्य, चोल व केरल यांनीं बंड केलें. त्यांत कांहीं काळपर्यंत त्यांना जय मिळाला. पण यानें त्यांचा पराजय करून व कांची घेऊन आपल्या पूर्वजांची गादी मिळवली. याला सत्याश्रय व रणरसिक या पदव्या होत्या. सेन्द्रकाचा राजा याचा मांडलिक असल्याबद्दल एका शिलालेखांत निर्देश आहे. याचा पुत्र युद्धमल्ल (पहिला) ऊर्फ विनयादित्य (सत्याश्रय) हा बापामागून गादीवर आला.

२. (स. ७३३–४६) हा पश्चिम चालुक्यांपैकीं विजयादित्याचा पुत्र. हा आपण 'पल्लव राजास मारून कांचींमध्यें प्रवेश केला' असें म्हणतो व त्याचप्रमाणें एका शिलालेखांत यानें कांची येथील राजास तीन वेळ जिंकलें, असा उल्लेखहि आढळतो. यानें पांड्य, चोल, केरल व कदंब यांना जिंकलें होतें. याच्या म्हणण्याप्रमाणें यानें कांची येथील राजा नन्दिपोतवर्मा यास ठार मारून कांचींत प्रवेश केला होता. तेथें यास पूर्वीचा राजा नरसिंहपोतवर्मा यानें केलेलीं पुष्कळ कारागिरीचीं कामें आढळलीं, असें एका ठिकाणी म्हटलें आहे. याच्या राणीचें नांव लोकमहादेवी किंवा त्रैलोक्यमहादेवी असें होतें, आणि ती हैहयराजकन्या होती. याच्यानंतर याचा पुत्र कीर्तिवर्मा दुसरा गादीवर आला. याच्या वेळीं डळमळीत झालेली राजसत्ता पुढें दुसऱ्या तैलपानें पुनः सावरली.

३. (स. ९०० सुमार) पश्चिम चालुक्यांपैकीं पहिल्या तैलानंतरचा राजा व पहिल्या तैलाचा मुलगा.

४. (स. ९५० सुमार) पश्चिम चालुक्यांपैकीं पहिल्या अय्यणाचा मुलगा. चेदीचा राजा लक्ष्मण याची मुलगी बोंथादेवी ही याची पत्नी होय.

५. (स. १००८–१८) कल्याणीच्या पश्चिम चालुक्यांपैकीं दशवर्मा (यशोवर्मा) चा पुत्र. याच्या मातेचें नांव भाग्यवती. त्रिभुवनमल्ल असाहि हा आपणांस म्हणवीत असे. याचें मूळ नांव विभुविक्रम.

६. (स. १०७६-११२६) हा पश्चिम चालुक्यांपैकीं दुसऱ्या सोमेश्वराचा भाऊ व पहिल्या सोमेश्वराचा पुत्र. यास परमादिकलिविक्रम ऊर्फ दुसरा त्रिभुवनमल्ल विक्रम क म्हणत. यानें कदम्बांचा कांहीं मुलूख घेतला. यानें चालुक्यविक्रमशक फाल्गुन शुद्ध पंचमी शके ९९७ (तारीख १४ फेब्रु. स. १०७६) रोजीं चालू केला. यानें राज्यारोहण केल्यावर लगेच वरील आपला शक सुरू केला. पण

याच्या मृत्यूनंतर तो नाहींसा झाला. यानें आपली मुलगी मेललदेवी ही जयकेशी कदंब राजास देऊन आपण चोल-राजकन्येशीं विवाह केला. यानें पुष्कळ लढाया मारल्या. याला आपल्या शत्रूंप्रमाणें भाऊबंदांबरोबरहि नेहमीं युद्ध करावें लागलें. द्रविड, पांड्य, कोंकण, होयसळ या राजांचा यानें पराभव केला. याची राणी मलयमतीदेवी ही केरेयूर प्रांतावर स. १०९५ च्या सुमारास राज्य करीत होती, व राणी लक्ष्मीदेवी, याच्या सावलदेवी, जक्कलदेवी, चंदलदेवी आणि माळलदेवी इत्यादि बायका होत्या.

हा स. १०५५ च्या सुमारास आपल्या बापाच्या कारकीर्दीत बनवासीच्या सुभेदारीवर होता.

यानें यशस्वी अशा पुष्कळ स्वाऱ्या दक्षिणेंत केल्या. चोलांचा पराभव करून यानें वेंगी, चक्र-कोत्त (चक्र-कोट्ट) वगैरे प्रांत काबीज केले. यानें माळव्याच्या राजास मदत करून त्याचें राज्य ऊर्जितावस्थेस आणण्याचा प्रयत्न केला. याशिवाय यानें मध्य बंगाल व आसाम मध्यें मोहिमा केल्या असें म्हणतात (B.).

याच्याबद्दल बिल्हणकृत विक्रमांकदेवचरित या काव्यांत पुष्कळ माहिती मिळते. याच्या पदरीं मिताक्षराकार विज्ञानेश्वर होता.

विक्रमादित्य पूर्व चालुक्य—(स. ९२५-२६) चालुक्य-भीम पहिल्याचा हा मुलगा होय.

यानें (तैलपास) (चालुक्य-भीमाचा चुलता) ठार मारून आपण गादीवर बसला. यानें अकरा महिने राज्य केलें. स. ९२६ मध्यें पहिल्या अम्मराजाचा मुलगा भीम यानें याला राज्यावरून हाकून दिलें.

विगताशोक—(कुनाल पाहा).

विग्रहपाल—(स. ८५०-७५ सुमार) हा बंगालच्या पाल घराण्यांपैकीं राजा असून हा आपला चुलता देवपाला-नंतर गादीवर आला. कारण तो निपुत्रिक असावा. याचा विवाह हैहयकुलांतील लज्जा नांवाच्या राजकन्येशीं झाला असें भागलपूर लेखावरून दिसतें (म. यु. भा. ३, पा. २३३). याचा पुत्र नारायण.

२. (स. ९५०-७६ सुमार) हा दुसऱ्या गोपाळचा पुत्र. याचें गांगेय कलचुरीशीं युद्ध झालें व त्यानें मिथिला घेतली.

३. (स. १०५९-८०) हा बंगाल्यांतील पाल घराण्यांपैकीं नागपालाचा मुलगा. हा स. १०५९ मध्यें गादीवर आला. चेदीचा कर्ण, प्रतिहार सम्राटांच्या उत-रत्या काळांत आपली सत्ता बनारसच्या पूर्वेस विशेषतः चंपारण्यांत वाढवीत होता. त्याचा पराभव यानें केला. याचा 'आमगच्छी' येथील शिलालेख प्रसिद्ध आहे. त्यावरून पाल घराण्याची वंशावळ ठरते. तीन वंशावळ व वर्ष सर्वत्र आधारभूत आहेत. 'आमगच्छी' आतांपर्यंत दुरुस्त होत तीनदां प्रसिद्ध झाली आहे (इंडि ॲंटि. १४, पा. १६२; इंडि ॲंटि २१, पा. ९७,). यास कर्णानें आपली मुलगी दिली होती.

हा स. १०८० त मरण पावला. याला महीपाल दुसरा, सुरपाल दुसरा व रामपाल असे तीन मुलगे होते.

विग्रह प्रतिहार—(स. १२१० सुमार) याला लाल्हणदेवीपासून मलयवर्मा झाला. याचें म्लेच्छांशीं युद्ध झालें होतें तें कुतुबुद्दीन ऐबकशीं असावें.

विग्रहराज चौहान—चौहानवंशांतील एक राजा. यानें 'हरकेलि' नांवाचें नाटक लिहिलें आहे. हें दगडा-वर खोदलेलें 'ढाई दिनके झोंपडे' या जागेवर सांपडलें आहे. तें सध्यां राजपुताना म्युझियम, अजमेर, येथें सुरक्षित ठेवलें आहे. तें अपूर्ण आहे.

विजय—(स. २०२-२०८) एक राजा (भांडार-कर पा, ५०).

विजय चंदेल (स. ८७०-८९०) बुंदेलखंडांतील चंदेल्ल घराण्यांतील राजा. नन्नुकानंतर यानें राज्य केलें असावें. पण धंग राजाच्या लेखावरून नन्नुकानंतर जयशक्ति व विजयशक्ति यांनीं अनुक्रमें राज्य केलें व ते दोघेहि भाऊ होते. परंतु हर्षाच्या एका लेखांत नन्नुकाच्या पुढच्या राजाचें नांव जेज्जक (जयशक्ति) असें दिलें आहे.

२. (स. १३९९-१४२३) म्हैसूर संस्थानचा मूळ पुरुष. याच्यानंतर याचा मुलगा हिरेबेट्टाद चामराज (हिरे-बेत्तड चाम १ ला) हा गादीवर आला.

विजयजाट—(स. १५०० सुमार) भरतपूर संस्थानच्या बालचंदाचा हा पुत्र होय. हा व याचा भाऊ सिजय हे दोघेहि बालचंद यास एका जाट राखेपासून झाले होते. त्यामुळें रजपूत लोक त्यांना जातींत घेईनात. तेव्हां त्यांनीं सिनसिनीचे जाट हें नांव धारण केलें. हल्लीचे भरतपूरचे संस्थानिक याचेच वंशज होत.

विजयगुप्त—(जन्म स. १४४९) बंगाली कवि. बाकरगंज जिल्ह्यांतील फुलश्री गांवीं वैद्यकुलांत पिता सनातन व रुक्मिणी यांच्यापासून जन्म झाला. याचें 'मनसासंगल' (रयणी) काव्य फार पवित्र मानलें जातें. हें काव्य गाऊन रात्रीं जाग्रण केलें जातें (क. कौ. ७).

विजयगोंड चोल—(स. १२६६सुमार) एक राजा.

विजयचंद्र गाहडवाल—(स. ११५५-७०) हा कनोजच्या गाहडवाल घराण्यांपैकी गोविंदचंद्राचा मुलगा. पृथ्वीराजरासोमध्यें याचें नांव विजेपाळ असें दिलें आहे, व यानें दिग्विजय केला असें म्हटलें आहे. याचेंहि हम्मीराशीं स. ११६८ मध्यें युद्ध झाल्याचें वर्णन आहे. त्यांत यानें बापापेक्षांहि हंमीराची खोड अधिक जिरवली असें दिसतें. याच्या वेळीं हंमीर म्हणजे खुश्रु, हा घोरांच्या भीतीनें गझनी सोडून लाहोर येथेंच येऊन राहिला होता (स. ११५२). गझनीच्या राजवंशास या वेळीं उतरती कळा लागून तो अंताच्याजवळ पोहोंचला होता. याच्या मागून याचा पुत्र जयचंद्र गादीवर बसला. अजमीरच्या चाहमानांनीं कनोजच्या गाहडवालापासून याच्या वेळींच सम्राट्पणाचा मान हिसकावून घेतला असावा असें दिसतें. कारण, अजमीरच्या विग्रहपालानें दिल्ली जिंकून तेथें आपला लेख स. ११६३ मध्यें खोदविला आहे. त्यांत अशी फुशारकी मारली आहे कीं, विग्रहपालानें हिमालय व विंध्य यांतील प्रदेश जिंकून आर्यावर्तास म्लेच्छांपासून पूर्ण मुक्त केलें. याचा दिग्विजय स. ११६२ च्या पूर्वी झाला असावा. याचा राज्यारंभ स. ११५५ मध्यें होऊन याचे विस्तृत विजय स. ११५५-११६० पर्यंत मानले पाहिजेत (पा. ३३०).

विजयध्वज—(स. १५०० सुमार) भागवताचे संस्कृत भाषेतील द्वैतमताचे टीकाकार. हे मध्वाचार्यांनीं स्थापलेल्या आठ मठांपैकीं पेजावर मठाचे अधिपति. यांच्या टीकेचें नांव 'पदरत्नावलि'. ती 'विजयध्वजी' या नांवानें प्रसिद्ध आहे. आश्चर्य वाटण्यासारखी गोष्ट म्हणजे श्रीधरी भागवतापेक्षां यांचें भागवत मूळांतच फार वेगळें आहे. श्रीधरी भागवताच्या दशमस्कंधाचे नव्वद अध्याय असून ३९४६ श्लोक आहेत. पण विजयध्वजी भागवताच्या दशमस्कंधांतील अध्याय एकशेतीन असून एकंदर श्लोकसंख्या ४३७० आहे. श्रीधरी प्रतींतील पहिलाच अध्याय या प्रतींत दोन अध्यायांत विभागला आहे. श्रीधरी प्रतींतील १३, १४, १६ या अध्यायांतील ब्रह्मस्तुति, श्रीकृष्णकृत ब्रह्मदेव-गर्वपरिहार इत्यादि कथाभाग विजयध्वजी प्रतींत मुळींच आढळत नाहीं. गो-गोपांना पळवून कृष्णानें गो-गोपांचें रूप घेऊन एक वर्षपर्यंत वृंदावनांत वावरणें, पुढें ब्रह्मयाचा गर्वपरिहार होऊन त्यानें कृष्णाची स्तुति करणें वगैरे श्रीधरी प्रतींतील भाग या भागवतांत नाहीं. या भागवताचें समश्लोकी मराठी भाषांतर मल्हारी अंबाजी नांवाच्या कोणी गृहस्थानें केलें असून तें अर्धवट स्थितींत उपलब्ध आहे. या मल्हारी अंबाजीनें मध्वाचार्यांच्या 'भारत तात्पर्यनिर्णय' या संस्कृत ग्रंथाचें मराठींत भाषांतर केलें आहे. मल्हारी अंबाजी वामन पंडिताचा रामकालीन असावा. (ही माहिती 'महाराष्ट्र वाङ्मयांत वैष्णवग्रंथांचें अस्तित्व' या श्री. ना. बनहट्टी यांच्या रत्नाकरांतील (१९२७) लेखावरून घेतली आहे.)

विजयनगरचीं राजघराणीं

(१) **संगमवंश**—१ हरिहर १ ला (स. १३३६-१३५५), २ बुक्क १ ला (बायका जोम्मा, गौरी. स. १३५५-१३७७), ३ हरिहर २ रा (बायका : मल्हा, पम्मा. स. १३७७-१४०४), ४ विरूपाक्ष १ ला (स. १४०४-५), ५ बुक्क २ रा (बायको तिप्पाम्बा. स. १४०५-१४०६), ६ देवराय १ ला (बायका : हेमाम्बिका, मल्लयव्वी. स. १४०६-१४२२), ७ (बुक्क ३ रा ऊर्फ वीर) विजयराय (बायको : नारायणी, यानें कांहीं महिने राज्य केलें. स. १४२२), ८ देवराय २ रा ऊर्फ प्रौढदेवराय (बायका : सिद्धला, पोन्नला. स. १४२२-४६), ९ मल्लिकार्जुन (स. १४४६-१४६५), १० विरूपाक्ष २ रा (राज्याभिषेक स. १४६५-८६ याला साळुव नरसिंहानें पदच्युत केलें.)

(२) **साळुववंश**—१ साळुव नरसिंह १ ला (स. १४८६-१४९१), २ इम्मडी नरसिंह ऊर्फ तिम्म किंवा तिम्मय. स. १५०४ मध्यें नरस नायकानें पदच्युत केलें.

(३) **तुळुववंश**—१ नरसनायक (बायका : तिप्पाजी, नागला ओबाम्बिका, स. १५०४), २ वीर नरसिंह (स. १५०४-१५०९), ३ कृष्णदेवराय (स. १५०९-३०), ४ अच्युतराय (स. १५३०-४२), ५ व्यंकटराय (खून १५४२), ६ तिरुमल (स. १५४३ आत्महत्या). ७ सदाशिवराय (स. १५४३-१५७०).

(४) **आरविदुवंश**—श्रीरंग, १ तिरुमल १ ला (रामरायाचा भाऊ. स. १५७०-१५७२), २ श्रीरंग १ ला (बायका : तिरुमला, कृष्णा. स. १५७२-८६), ३ व्यंकटपति (स. १५८६-१६१४), ४ श्रीरंग २ रा (स. १६१४), ५ राम २ रा (स. १६१५-३३), ६ पेद्द व्यंकट २ रा (बायको : बंगारा. स. १६३३-४५?), ७ श्रीरंग ३ रा (स. १६४४-७५), ८ व्यंकट ३ रा (१६७८-९०), ९ श्रीरंग ४ था (स. १६९२), १० व्यंकट ४ था (स. १७०७-१७१६).

विजयपाल चंदेल्ल—(स. १०३०-४०) हा विद्याधरानंतर गादीवर आला. याच्या बायकोचें नांव भुवनदेवी असें होतें. याचा पुत्र देववर्मा होय.

विजयपाल प्रतिहार—(स. ९६०) रघुवंशी प्रतिहारांपैकीं देवपालाचा पुत्र. याच्या वेळचा एक शिलालेख अलवर राज्यांत राजोरगड येथें मिळाला आहे. तो वि. सं. १०१६ (स. ९६०) मधील आहे. त्या वेळीं याचा सामंत गुर्जर (गूजर) गोत्रांतील प्रतिहार तेथील स्वामी होता.

२. (स. ९५५–९९०) याच्या वेळीं कच्छवाह वज्रदामन् यानें देवपालाचा ग्वाल्हेर प्रांत घेतला. हा देवपालाचा भाऊ होय. याच वेळीं सबक्तगीनानें हिंदुस्थानावर स्वारी करून जयपाळाचा पराभव केला.

विजयरंग चोक्कनाथ—(मृत्यु स. १७११) तेलगू कवि. याच्या वेळीं स. १७०९ मध्यें दक्षिणेंत भयंकर दुष्काळ पडला व महापूर आले. हा निपुत्रिक मरण पावला.

विजयरक्षित—(स. १२२५) यानें 'माधवनिदान' नांवाच्या वैद्यकग्रंथावर एक टीका लिहिली आहे. यानें 'योगरत्नमालाकार' गुणाकर याच्या मताचा उद्धार केला आहे.

विजयराघव—(स. १६४० सुमार) तंजावरचा राजा. शहाजीकडे तंजावर येण्यापूर्वी याच्याकडे होतें. नंतर विजापूरकरांकरितां ते त्यानें जिंकून घेतले.

विजयराज पश्चिम चालुक्य—(स. ५७२ सुमार) बुद्धवर्म्याचा पुत्र. याला विजयवर्मा म्हणत.

विजयराज सोलंकी—(स. ६४०) गुजराथच्या मूळराज सोलंकीच्या पूर्वी हा होऊन गेला. गुजराथमधील खेडा येथें यांचें एक दानपत्र मिळालें आहे. त्यांत जयसिंहराजाचा मुलगा बुद्धवर्मा व बुद्धवर्म्याचा पुत्र विजयराज असा वंशक्रम दिला आहे. या विजयराजानें कलचुरि संवत् ३८४ (स. ६४३). वैशाख शुद्ध १५ ला जंबूसरच्या ब्राह्मणांना काशाकूलप्रदेशांतील (तापीच्या उत्तरकडील प्रदेश असावा) संधीयर गांवच्या पूर्वेकडील परियर गांव दिला, त्या दिवशीं त्याचा मुक्काम विजयपूर येथें होता (इंड. अँटि. ७. २४८–४९). हें विजयपूर म्हणजे सध्यांचें सुरत जिल्ह्यांतील ओरपाड तालुक्यांतील सांधिएर होय. गुजराथमधील लाट प्रदेशावर कलचुरींचें राज्य बराच काल असल्यामुळें तेथें कलचुरि संवत् प्रचारांत होता. त्यामुळें त्यांच्यामागून तेथें राज्य करणाऱ्या सोलंकी किंवा गुर्जर राजांच्या ताम्रपटांत पुष्कळ ठिकाणीं कलचुरिसंवत् वापरलेला आढळतो. विजयराज नांवावरून व लावलेल्या पदव्यांवरून हा सोलंकींपैकीं असावा असें दिसतें. पण वरील ताम्रपटांतील जयसिंहाचा बदामीच्या राजाशीं काय संबंध होता हें समजत नाहीं. पण कालदृष्ट्या बदामीच्या जयसिंहाहून हा अगदीं वेगळा आहे, हें स्पष्ट आहे. बदामीचा प्रसिद्ध राजा दुसरा पुलकेशी यानें गुजराथ जिंकली होती. तसेंच त्याच्याहि पूर्वी त्याचा पूर्वज मंगलीश यानें लाट देशावर राज्य करणाऱ्या कालचुरींचें राज्य घेतलें होतें. त्यावरून असें अनुमानितां येतें कीं, या दोघांपैकीं कोणीतरी आपल्या वंशजांना गुजराथेंत जहागीर दिली असावी. विजयराजानंतर झालेल्या पुरुषांची माहिती मिळत नाहीं.

जयसिंहराज–बुद्धेवर्मा–विजयराज.

विजयराय संगम—(स. १४२२) देवरायाचा मुलगा रामचंद्र उदयगिरीचा सुभेदार होता. परंतु या त्याच्या भावानें त्याचें राज्य लवकरच घेतले. हा आपणास तिसरा बुक्क असें म्हणवी.

विजयवर्मा कदंब—हा सत्यवर्म्याचा पुत्र.

विजयसिंह गुहिलोत—(स. ११०७–१११६) मेवाडच्या गादीवर हा वैरिसिंहानंतर आला. याचें नांव राणपूरच्या लेखांत वीरसिंह, कुंभलगडच्या प्रशस्तींत वैरसिंह व रावळ समरसिंहाच्या आबूवरील प्रशस्तींत तसेंच भेराघाट व करणवेल येथील लेखांत विजयसिंह असें आढळतें. याला अल्हणदेवी नांवाची कन्या होती. तिचा विवाह चेदिदेशच्या कलचुरि गयकर्णदेवाशीं झाला होता. उदयपुरापासून चार मैल असलेल्या पालडी गांवीं कार्तिक स्वामीच्या मंदिरावर याच्या वेळचा एक शिलालेख वि. सं. ११७३ (स. १११६) ज्येष्ठ वद्य ३ चा आहे. तो बहुतेक आहाडहून आणून येथें लावला असावा (राजपुतांना म्यु. १५–१६ पृ. ३. १). तसेंच याचें दोन पत्र्यांवरील एक ताम्रपत्र मिळालें आहे. त्यांतील संस्कृत लेखांत गुहदत्तापासून विजयसिंहापर्यंत वंशावळ दिली आहे. त्यावरील वि. सं. ११६४ (११०७) हा असावा.

विजयसेन—(स. १११९–५८) हा बंगाल्यांतील सेन घराण्यापैकीं हेमंतसेन व यशोराणी यांचा पुत्र. याची मूळ राजधानी मयूरभंजसंस्थानांतील काशीपुरी. पण यानें पालांना जिंकल्यावर गोदावरीजवळील विजयनगर राजधानी केली. हा हिंदुधर्माचा अभिमानी व संस्कृत पंडितांचा आश्रयदाता होता.

विजयसेन क्षत्रप—(स. २३९–२५०) हा दामसेन महाक्षत्रपाचा तिसरा मुलगा. याचीं नाणीं शा. श. १६१–१७२ पर्यंतचीं मिळालीं आहेत. याच्यानंतर याचा धाकटा भाऊ दामजदश्री दुसरा हा अधिकारी झाला.

विजयादित्य कदंब–गोव्याच्या पहिल्या जयकेशीचा पुत्र. यानें पट्टीपोंबुच्यपुराच्या शांतरजगदेवाची आई विजलदेवीची बहीण चट्टलदेवीशीं लग्न केलें.

२. गोव्याच्या दुसऱ्या जयकेशीचा पुत्र. याचा भाऊ परमर्दि यानें लक्ष्मीदेव राजाची मुलगी लक्ष्मीदेवी हिच्याशीं लग्न केलें.

विजयादित्य पश्चिम चालुक्य—(स. ६९६-७३३) पश्चिम चालुक्यांपैकीं युद्धमल्ल ऊर्फ विनयादित्याचा मुलगा.

विजयादित्य पूर्व चालुक्य—(स. ७४६-६४) हा पूर्व चालुक्यांपैकीं तिसऱ्या विष्णुवर्धनाचा पुत्र. याला विजयादित्य भट्टारक असेंहि म्हणत.

२. (स. ७९९-८४३) पूर्व चालुक्य घराण्यांतील चवथ्या विष्णुवर्धनाचा पुत्र. यानें गंग व रट्ट (राष्ट्रकूट) राजे यांच्याशीं १०८ लढाया केल्या.

याचीं दुसरीं नांवें-त्रिभुवनांकुश व नरेंद्र, मृगराज. याचा समकालीन रट्ट राजा तिसरा गोविंद हा होता.

३. (स. ८४४-८८) पूर्व चालुक्यांपैकीं पांचव्या विष्णुवर्धनाचा मुलगा. यास गुणक असेंहि म्हणत. गंगाच्या मंगीराजाविरुद्ध यानें रट्टास मदत करून त्यास यानें लढाईंत ठार मारलें. तसेंच यानें मालखेडच्या (राष्ट्रकूट) दुसऱ्या कृष्णराजाचा पराभव करून त्याची राजधानी जाळली.

४. (स. ९१८) हा पूर्व चालुक्यांपैकीं पहिल्या भीमाचा पुत्र. याच्या बायकोचें नांव मेलांबा. यानें सहा महिने राज्य केलें. यानें कलिंगाच्या राजाला जिंकलें. याला कोल्लभिगंडहि म्हणत.

५. (स. ९२५) पूर्व चालुक्य घराण्यांतील पहिल्या अम्म-राजाचा हा मुलगा होय.

यानें अवघें सहा महिने राज्य केलें. याला ताह (तालप) यानें गादीवरून काढून टाकिलें. परंतु एक महिना राज्य केल्यानंतर ताह यालाहि चालुक्य-भीमाचा मुलगा दुसऱ्या विक्रमादित्यानें ठार मारिलें (B.). यानें दुसरें नांव बेट्ट. यानें पिठापुरम येथील घराणें सुरू केलें.

विजयादित्य शिलाहार—(स. ११३५-७०सुमार) कोल्हापूरचा शिलाहार. गंडरादित्याच्या मागाहून गादीवर आला.

विजयालय चोलराज—(स. ८४६-८०) गंग-पल्लव-बाण यांनीं वरगुण पांड्याचा पराजय केल्यावर या चोल जहागिरदारानें डोकें वर काढलें. यानें आपल्या चौतीस वर्षांच्या कारकीर्दीत तंजावर, कन्याकुमारी, कांची वगैरे प्रांत हस्तगत करून तंजावरास राजधानी केली. याला परकेसरीवर्मा अशी पदवी होती. याचा पुत्र पहिला आदित्य होय.

विठा रेणुकानंदन—(स. १५७८ सुमार) एक मराठी कवि. हा रेणुका देवीचा उपासक असून यास गोलटगांवकर असेंहि म्हणतात. याच्या गुरूचें नांव रेणुकानंदन असें असून तेंच नांव हा आपल्या नांवापुढें लावी. याचा उल्लेख दासोदिगंबराच्या संतविजयांत आहे. याची रामचरित्रावर भक्ति असून त्यावरच याचीं कांहीं पदें उपलब्ध आहेत (मं. श. १८२६ वार्षिक ले. ४१).

विठोजी होळकर—(२ बाजीराव पेशवे व यशवंतराव होळकर पाहा).

विठोजी बाबाजी भोसले—(जन्म स. १५५२) हा मालोजी भोसल्याचा कनिष्ठ भाऊ असून शहाजीचा चुलता होय. याचा जन्म वेरूळ येथें स. १५५२ त झाला. विठोजी व मालोजी पुढें देऊळगांव येथें राहूं लागले. तेथें असतांना याचे वडील बाबाजी मृत्यु पावले. कांहीं काळ हे दोघे बंधु आपलें पाटिलकीचें वतन सांभाळून होते. पुढें हा मातोश्रीचा निरोप घेऊन फलटणच्या निंबाळकरांकडे रोजगारास गेला. बरोबर याचा भाऊ मालोजी हा होता.

हे दोघेहि तरुण मर्द पाहून निंबाळकरांनीं यांस प्रथम बारगिरी सांगितली. निंबाळकर कोल्हापूर प्रांतीं मुलूखगिरीस गेले असतां बरोबर या बंधुद्वयासहि घेऊन गेले होते. या कोल्हापूरच्या स्वारींत या दोघां बंधूंनीं उत्कृष्ट कामगिरी केली; आणि केवळ बारगिराचे छोटे सरदार बनले. इतकेंच नव्हे, पण निंबाळकरांनीं मालोजीस आपला जांवई केलें व १५०० स्वारांची मनसब दिली.

विठोजीस आठ पुत्र होते. त्यांचा वंशविस्तार गंगातीरीं वावी, मुंगी, बनसेंद्रा, मंजेरी, कोराळे, भांबुरी, व कळस या गांवीं आहे (म. द. रु. १).

विठोबादादा चातुर्मासे—(रामचंद्र अनंत बडवे पाहा).

विठ्ठल—(स. १५६३) एक हिंदी कवि. हा वल्लभाचार्याचा मुलगा. यानें गादीवर आरूढ होऊन पुष्टिमार्गी कवींपैकीं आठ सर्वोत्तम कवींचीं निवड करून त्यांना 'अष्टछाप' ही संज्ञा दिली.

२. प्रसाद नांवाच्या संस्कृत ग्रंथाचा कर्ता.

३. निवृत्ति, ज्ञानदेव, सोपान, यांचे वडील.

४. नामदेवाच्या मुलांपैकीं एक.

५. तुकारामाच्या मुलांपैकीं एक.

विठ्ठल कवि—(स. १६८० सुमार) यांचें संपूर्ण नांव विठ्ठल अनंत क्षीरसागर. वामन पंडिताचा समकालीन असणारा हा मराठी कवि बीडजवळील गौरीपूर गांवचा राहणारा होता. हा देशस्थ आश्वलायन ऋग्वेदी ब्राह्मण. याचा धंदा व्यापाराचा, पण हा सालोसाल पंढरीची यात्रा करीत असे. यांचें कुलदैवत विठ्ठल; म्हणून हा आपणांस विठ्ठलदास हें टोपणनांव लावीत असे. यांचे रुक्मिणी-स्वयंवर, पांचालीस्तवन, सीतास्वयंवर, रसमंजरी, द्रौपदीवस्त्रहरण, विद्वज्जन व बिल्हणचरित्र असे सात ग्रंथ प्रसिद्ध आहेत. यानें प्रत्येक काव्याच्या शेवटीं काव्यांतील श्लोकसंख्या, रचनाकाल व नांव इत्यादि माहिती दिली आहे. निरनिराळीं वृत्तें, लांबलांब यमकें व अनुप्रास साधण्याची यास आवड होती. 'पांचालीस्तवन' व 'द्रौपदीवस्त्रहरण' यांत कांहीं कांहीं सबंध चरणच्या चरण सारखे आढळतात. म्हणून याला चित्रकवि असें म्हणतात. यांचें रसमंजरी हें काव्य संस्कृतचें भाषांतर आहे. रसमंजरी मूळ संस्कृतांत भानुदासानें लिहिली आहे.

यानें अनेक कूट श्लोक केले आहेत, असें मोरोपंतांनीं सन्मणिमालेंत याच्यासंबंधीं केलेल्या आर्येवरून दिसतें. शिवाय याचीं बरींच पदें आहेत.

२. (स. १६१४) हा वऱ्हाडांतील कळपूरचा असून श्रीवत्सगोत्री होता. याची रासक्रीडा प्रसिद्ध आहे.

३. (स. १३७५–१४५०) 'रससिंधु' ग्रंथाचा कर्ता. याचा पिता महादेव. यांचें नांव विष्णु महादेव असेंहि आढळतें.

विठ्ठल दीक्षित—यानें काशी येथें 'मंडपकुंडसिद्धि' नांवाचा संस्कृत ग्रंथ शा. श. १५४१ फाल्गुन महिना शुक्लपक्ष द्वादशी रविवार रोजीं लिहिला.

विठ्ठल नरसिंह विंचूरकर—(स. १८०८–३६) नरसिंह खंडेराव मृत्यु पावल्यावर त्याच्या बायकोनें यास दत्तक घेऊन पेशव्यांकडून सरदारीचीं वस्त्रें देवविलीं. दुसऱ्या बाजीरावानें व बापु गोखल्यानें इंग्रजांशीं लढाई करण्याचें ठरविलें तेव्हां 'लढाई करणें योग्य नव्हे' हें यांनीं परोपरीनें सांगितलें. यांचें म्हणणें ऐकलें नाहीं तरी यानें शेवटपर्यंत त्यांना सोडलें नाहीं.

हा जानेवारी स. १८३६ मध्यें माथेशूळाचे आजारानें मरण पावला. यास पांच बायका होत्या. पैकीं लक्ष्मीबाईस दोन पुत्र व तीन कन्या झाल्या. गंगाबाईस रघुनाथराव हा पुत्र झाला.

विठ्ठल नरसिंह (नाईक सांखोळकर)—(स. १७०० सुमार) एक मराठी कवि. हा गोव्यांतील केरीचा काश्यपगोत्री गौड सारस्वत ब्राह्मण. हा विद्वान् असून काशीच्या पंडितांकडून याला मानपत्र मिळालें होतें. याची कविता काव्यसंग्रहांत प्रसिद्ध झाली आहे: १ वामनचरित्र आर्या ९५, २ शुकरंभासंवाद आर्या ४९, ३ कबीरकथा, शिवाय सुमारें ६० पदें (म. क. च. भा.२, पा. ११७-१२२).

विठ्ठल पिलदेव अत्रे—(स. १६७० सुमार) हा ऋ. दे. ब्रा. होता. हा शिवाजीच्या पदरीं मोठ्या प्रतिष्ठेनें वावरत असे. हा फौजबंद असून 'सुभे मामले' करून असे. चंदीचा किल्ला घेतल्यानंतर तो किल्ला शिवाजीमहाराजांनीं याच्याकडे दिला. "पर्णालाख्यानां"तील याचा पराक्रम वाचकांना वाचण्यासारखा आहे. हा राघोबल्लाळाचा चुलत भाऊ होता (मं. त्रै. श. १८४६ व ५. ले. २).

विठ्ठल बल्लाळ सुभेदार (परांजपे)—(स.१८०३ पर्यंत) हा रघूजी भोसल्याचा सरदार होता. रघूजीच्या कारकीर्दीत ज्या अनेक सरदारांनीं पुढें येऊन त्यास राज्यविस्ताराचे कामीं मदत केली त्यांपैकीं हा एक होता. याचा मामा नरहर बल्लाळ रिसबूड. याचा मुलगा गणपतराव सुभेदार आप्पासाहेब भोसल्याच्या धामधुमींत प्रसिद्धीस आला.

विठ्ठल भालेराव—(स. १६७८) हा भूपाळगडचा सबनीस होय. ता. १३ डिसें. स. १६७८ रोजीं संभाजी दिलेरखानास जाऊन मिळाल्यावर संभाजीनें भूपाळगड घेण्याचें फर्मान सोडलें. भूपाळगडचा किल्लेदार फिरंगोजी नरसाळा व सबनीस विठ्ठल भालेराव यांनीं गड संभाजीच्या स्वाधीन केला. पुढें शिवाजी कडक शिक्षा करणार याचीं कुणकुण लागतांच दोघेहि पळून गेले. पण पुढें दोघेहि सांपडले. तेव्हां यास फार मारझोड केली आणि स्वराज्याच्या हद्दीबाहेर घालवून दिलें.

विठ्ठल महादेव किबे ऊर्फ तात्या जोग—(मृत्यु स. १८२६ मार्च २९) हा इंदूरच्या सरदार किब्यांचा पूर्वज. यशवंतराव होळकरांचा हा फडणीस होता. यशवंतराव मरण पावल्यावर तुळसाबाईचा हाच कारभारी होता. परंतु हा इंग्रजांस आंतून फितूर आहे अशी तुळसाबाईस शंका आल्यामुळें तिनें यास ता. २४।११।१८१८ रोजीं तुरुंगांत टाकलें. याच्या बायकोचें नांव रखमाबाई असें होतें.

विठ्ठल सुंदर परशरामी—(मृत्यु स. १७६३ आगष्ट) हा शुक्ल-यजुर्वेदी माध्यंदिन शाखेचा ब्राह्मण होता.

यांचें राहण्याचें गांव संगमनेर. स. १७६२ त सलाबतजंगास कैद करून निजामअलीनें हैदरची गादी बळकावली.

त्याच सुमारास यालाहि त्यानें आपला दिवाण नेमिलें. त्यापूर्वी निजामअलीकडे रामदासपंताच्या वशिल्यानें याचा प्रवेश झाला होता. राघोबा व माधवराव यांच्या भांडणाची संधि साधून मराठ्यांचें राज्य उलथून पाडण्याचा यानें प्रयत्न केला. ही गोष्ट साधण्याकरितां रामराजास नालायक ठरवून जानोजी भोसल्याच्या हस्तें मराठेशाहीचा राज्यकारभार चालवावा व पेशव्यांना हाकलून द्यावें असा बेत यानें योजिला. याची गणना साडेतीन शाहण्यांत होते. दुसरा शाहणा देवाजीपंत चोरघडे. याच्या मार्फत यानें जानोजीस फितविलें व आपला व्याही गमाजी भुतालिक याच्या मदतीनें प्रतिनिधीस फितविलें, व मोरोबा फडणीस, सदाशिव रामचंद्र शेणवी, आणि गोपाळराव पटवर्धन वगैरे असंतुष्ट मराठे सरदारहि निजामअलीस पेशव्यांविरुद्ध फितुर झाले. त्यांच्या बळावर निजामानें पुण्यावर चाल करून पुणें लुटलें व जाळलें. (मे १७६३). परंतु पुढें जानोजी प्रबल झाल्यास त्याला प्रतिस्पर्धी म्हणून यानें कोल्हापूरकरांशींहि राजकारण लावून ठेविलें. पण त्यामुळें जानोजीस बराच मुलूख देऊं करून राघोबादादाला त्यास निजामअलीच्या पक्षांतून फोडतां आलें. यानंतर पेशव्यांनीं निजामाशीं राक्षसभुवन येथें लढाई केली, तींत विठ्ठलसुंदर मारला गेला (आगष्ट १७६३). हा मोठा बुद्धिमान् व महत्त्वाकांक्षी होता. यानेंच निजामअलीस गादी मिळवून दिली. हा लष्करी डावपेचांतहि निष्णात होता. विठ्ठलपंतास राजाबहादूर प्रतापवंत हा किताब असून निजामशाहींत याची जहागीर ' गणेश ' या नांवानें ओळखली जाते.

विठ्ठल शामराज—(स. १७७९-९४) अहल्याबाई होळकर यांच्या दरबारी असलेला पेशव्यांचा वकील. यानें महेश्वर येथून अहल्याबाईच्या दिनचर्येची व राजकारणाचीं इत्थंभूत बातमीपत्रें पुण्यास पाठविण्याचा क्रम ठेवला होता. हा स. १७७९ पासून स. १७८३ व स. १७८४ पासून १७९४ पर्यंत महेश्वरदरबारीं होता. त्या वेळचीं उपलब्ध पत्रें कै. रा. ब. द. ब. पारसनीस यांनीं इतिहाससंग्रहांत दोन भागांत प्रसिद्ध केलीं आहेत. त्या पत्रांना 'महेश्वरदरबारचीं बातमीपत्रें' असें त्यांनीं नांव दिलें आहे. तीं त्यांना मेणवली येथील नाना फडणीसाच्या संग्रहांत सांपडलीं. हा पुणें दरबारच्या माहितीचा होता. हा प्रथम नाना फडणीसाकडून राघोबादादाच्या लष्करांतील बातमी आणण्याच्या कामावर होता. पुढें याची अहल्याबाईच्या दरबारीं नेमणूक झाली (महेश्वरदरबारचीं बातमीपत्रें प्रस्तावना).

विठ्या महार—(स. १५०० सुमार) हा मंगळवेढ्याचा महार. दामाजीपंत मंगळवेढेकर हा कमाविसदार असतांना दुर्गादेवीचा दुष्काळ पडला. त्या काळांत आपल्या प्रांतांतील गोरगरीबांच्या हालअपेष्टांनीं कळवळून जाऊन त्यानें सरकारी कोठारांतलें धान्य त्यांस देऊन त्यांचे जीव वांचविले. या त्याच्या कृत्याबद्दल तोहमत येऊन बादशाही धरणें आलें. अशा संकटांत दामाजीपंत असतां त्या गांवच्या या महारानें आपल्याजवळ होतें नव्हतें तेवढें सर्व द्रव्य सरकारांत भरून दामाजीपंताच्या नांवची रसीदीची पावती दिवाणांकडून आणून दिली व दामाजीपंताचे प्राण व अब्रू वांचविली.

बेदरच्या बादशाहानें महारांना त्यांच्या हक्काची सनद करून दिल्यानंतर त्याची पुनः उजळणी एकनाथाच्या वेळीं झाली.

राजवाड्यांना सांपडलेल्या महजरांत लिहिलें आहे कीं, ' हे देणें पाछाचें व दामाजीपंताचा हातचा कागद असे.' हा महजर सातारकर महाराजांच्या दप्तरांत सांपडला (मं. चतुर्थ सं., पा. ५३).

यावर मराठी कवींनीं रसभरित आख्यानें लिहिलीं आहेत.

वित्तेश्वर—(स. ८९९) हा एक भारतीय ज्योतिषी होता. यानें ' करणसार ' नांवाचा ग्रंथ शके ८२१ मध्यें लिहिला. अल्बेरुनीनें याचा उल्लेख केला असून त्याच्याजवळ करणसाराचें एक अरबी भाषांतरहि होतें. वित्तेश्वर काश्मीरकडचा असावा.

विदुलराय—रंगनाथस्वामींचे बंधु. यांना अत्यास्वामी म्हणत.

विद्याधर—(स. १३०० सुमार) याचा साहित्यशास्त्रावरील ' एकावलि ' हा ग्रंथ मुंबईसरकारच्या ग्रंथमालेंत प्रो. क. प्रा. त्रिवेदी यांनीं संपादिला आहे. एकावलीवर मल्लिनाथाची ' तरल ' नांवाची टीका आहे. कामशास्त्रावर ' केलिरहस्य ' नांवाचा ग्रंथहि यानें लिहिला आहे. उदाहरणें स्वतः विद्याधरकृत असून त्यांत ओरिसाच्या नरसिंह राजाची स्तुति आलेली आहे. हा नरसिंह म्हणजे केसरी नरसिंह (स. १२८२–१३०७) अथवा प्रताप नरसिंह (स. १३०७–१३२७) होय. यांतील कोणीतरी एक राजा विद्याधराचा आश्रयदाता होता, असें दिसतें.

विद्याधर गंधर्व शिलाहार—(स. ८००पूर्व सुमार) हा शिलाहारांचा मूळ पुरुष. तगर, ठाणें, व कोल्हापूर हे तीनहि वंश यापासून निघाले.

विद्याधर चंदेल्ल—(स. १०२०–३०) हा गंड चंदेल्लानंतर गादीवर आला.

विद्याधिराज—शंकराचार्यांचा आजा व शिवगुरूचा पिता.

विद्यानंद—(स. ८००) दिगंबर जैन आचार्य. ग्रंथ-१ आप्तमीमांसेवर आप्तमीमांसालंकृति टीका, २ अष्टसहस्रीवर टीका, ३ प्रमाणपरीक्षा, ४ श्लोकवार्तिक, ५ आप्तपरीक्षा. याला 'पात्र केसरी' म्हणत. जिनसेनानें आदिपुराणांत याची स्तुति केली आहे.

विद्यानाथ—(स. १३०० सुमार) यानें 'प्रतापरुद्रयशोभूषण' नांवाचा साहित्यशास्त्रावरील सुप्रसिद्ध ग्रंथ केला. तो कुमारस्वामिनच्या रत्नापण नांवाच्या टीकेसह मुंबईसरकारच्या संस्कृतग्रंथमालेंत प्रो. त्रिवेदी यांनीं छापून प्रसिद्ध केला आहे. यांत तेलंगणांतील काकतीय वंशांतील प्रतापरुद्रदेव नांवाच्या राजाच्या वर्णनपर उदाहरणें आहेत. या राजाचें नांव वीरभद्र किंवा रुद्र असेंहि असून एकशिला किंवा अलींकडचें वारंगळ हें त्याची राजधानी होतें. स. १३२३ या वर्षी मुहम्मद तुघ्लकानें त्याला बांदिवान केलें.

यानें नाटकांतील अनेक प्रसंगांचें स्पष्टीकरण करण्याकरितां प्रतापरुद्रावर एक नाटक करूनच आपल्या ग्रंथांत घातलें आहे. हा कविहि होता.

विद्यानिधि कवि—(स. १६३० सुमार) हा दाक्षिणी पंडित शहाजहान बादशहाचे वेळीं मोठा प्रसिद्ध असून संन्यासी होता. शहाजहाननें याला 'सर्वविद्यानिधान' अशी पदवी दिली होती. याचा ग्रंथसंग्रह फार प्रचंड होता. 'विद्यानिधान कवींद्र सरस्वती,' अशा ठळक व सुंदर अक्षरावरून काशीबाहेर पसरलेले याच्या संग्रहांतील ग्रंथ अद्यापि हुडकून काढतां येतात. हा जसा मोठा पंडित होता तसा कर्ता पुरुषहि होता. याच्या वेळेस काशी व प्रयाग येथें जाणाऱ्या यात्रेकरूंकडून कर वसूल केला जाई. त्या त्रासांतून यानें आग्रा येथें शहाजहान बाहशाहाची गांठ घेऊन व आपल्या उत्कृष्ट वक्तृत्वानें शहाजहान व त्याचा पुत्र दारा शुकोह याजकडून करमाफीचा हुकूम मिळविला. सर्व हिंदुस्थानांत त्याबद्दल आनंद झाला, व बादशहानें यास 'सर्वविद्यानिधि' अशी पदवी दिली. लोकांनीं याजवर मानपत्राचा वर्षाव केला. त्यांपैकीं शंभर मानपत्रांचा संग्रह कलकत्त्याच्या एशियाटिक सोसायटीच्या ग्रंथसंग्रहालयांत अद्यापि पाहावयास सांपडतो.

विद्यानिवास बानर्जी—हा विद्यावाचस्पति बानर्जी यांचा पुत्र. विद्यानिवासाच्या एका मुलानें हिंदुस्थानभर मान्य असलेला 'न्यायग्रंथभाषापरिच्छेद' हा ग्रंथ लिहिला.

अंबर नांवाचा आणखी एक मुलगा होता. हा राजा मानसिंगाचा मुलगा राणा भावसिंग याच्या दरबारांत वकील होता.

विद्यापति—(स. १३७५-१४५०) मैथिल ब्राह्मण व बंगाली कवि. याचे आजे जयदत्त हे संस्कृत पंडित असून त्यांना सदाचारीपणामुळें योगेश्वर म्हणत. याचा पिता गणपति. याला शिवसिंहानें बिस्कि गांव दिला होता. त्याचा व त्याची पत्नी लक्षिमां यांचा काव्यांत निर्देश आहे. याचे ग्रंथ-१ पुरुषपरीक्षा, २ शैवसर्वस्वसार, ३ दानवाक्यावली, ४ विवादसार, ५ गयापत्तन, ६ गंगावीक्ष्यावली, ७ दुर्गाभक्तितरंगिणी, ८ कीर्तिलता. हा संस्कृत कवितेमुळेंहि लोकप्रिय असे. याचा मुख्य विषय म्हणजे 'राधाकृष्ण-प्रेम.' इतका सरस कवि क्वचित् असेल (क. कौ. ७). चंडीदासाचें व याचें प्रेम होतें. याची भाषा बंगाली नसून हिंदी आहे. त्यांत थोडे मैथिली शब्द येतात असें कांहीं म्हणतात (क. कौ. १).

विद्यारण्य—(जन्म स. १२९६; संन्यास स. १३३१; मृत्यु स. १३८६) हा काशीक्षेत्रीं असतां स. १३५६ (शक १२७७ मन्मथ) साल उलटल्यानंतर लवकरच बुक्करायानें शृंगेरीचा स्वामी विद्यातीर्थ याच्या आज्ञेनें विजयनगरास येण्याबद्दल याला आदरपूर्वक पत्र धाडलें, व आल्यावर याला बरोबर घेऊन तो स्वतः शृंगेरीस गेला व तेथें याच्या मठाची व्यवस्था लावून त्यानें याचे शिष्य व इतर आश्रित यांच्या निर्वाहासाठीं जमीन दान दिली, असा मजकूर मठाच्या एका हिरेबाड्या वहींत आढळतो (ॲन्युअल रिपोर्ट ऑफ दि म्हैसूर आर्कीऑलॉजिकल डि. फॉर १९१६, नरसिंहाचारियर, बंगलोर १९१७ पा. ५७). स. १३८० मध्यें बुक्करायाचा मुलगा दुसरा हरिहर यानें विद्यारण्यास एक ताम्रशासन देऊन त्यांत याच्या पूर्वजांनी शृंगेरीमठास दिलेलीं पूर्वीचीं सर्व दानपत्रें कायम केलीं असल्याचा मजकूर होता व त्याचीच नकल वरील जमाखर्चांत आहे, असें म्हणतात.

माधवाचार्यांच्या एकदर ग्रंथांमध्यें यजमान या नात्यानें बुक्करायाचें नांव असून पहिला किंवा दुसरा हरिहर यांचा नामनिर्देशहि नाहीं. उलटपक्षी विद्यारण्याचे सर्व कोरीव लेख दुसऱ्या हरिहराच्या कारकीर्दीतील आहेत. विद्यारण्यकालज्ञान, शिवतत्त्वरत्नाकर, गुरुवंश वगैरे ग्रंथांतील याच्यासंबंधींच्या एकंदर आख्यायिकांत यानें पहिल्या हरिहरला सिंहासनावर बसविलें असें म्हटलें आहे, हें लक्षांत

ठेवल्यावर विद्यारण्य व माधवाचार्य या दोन्ही व्यक्ति जर एकच होत्या तर माधवाचार्याच्या ग्रंथांत पहिल्या व दुसऱ्या हरिहराचें नांव कां येऊं नये, हा प्रश्न उद्भवतो. त्याच्या गुरूंचा विचार केला असतां, माधवाचार्य आपल्या ग्रंथांत विद्यातीर्थ व भारतीतीर्थ या दोघां गुरूंला नमन करतो. विद्यारण्याच्या ग्रंथांत भारतीतीर्थाला नमन नाहीं.

याच्या वेळच्या किंवा याच्या मागून एक दोन शतकांत रचलेल्या ग्रंथांत माधवाचार्य व विद्यारण्य यांचें स्पष्टपणें सारूप्य दाखावलेलें आढळत नाहीं.

केळदीचा राजा बसवराज यानें स. १७०९ मध्यें लिहिलेल्या शिवतत्त्वरत्नाकरांत विद्यारण्याचें पूर्वाश्रमींचें नांव शिवधर्मन् होतें असें म्हटलें आहे. विद्यारण्याच्या आज्ञेनें भारतीकृष्णतीर्थ यतीनें रचली म्हटलेल्या विद्यारण्यकालज्ञान नांवाच्या ग्रंथमालेंतील विद्यारण्यवृत्तावरून समजतें कीं, विजयनगर राज्याची स्थापना होण्यापूर्वी कांहीं काळ, हंपीजवळच्या मतंग डोंगराच्या गुहेंत विद्यारण्य राहत असतां सायण व माधव नांवांचे दोघे पुरुष संततीच्या अपेक्षेनें याच्याजवळ आले. तेव्हां यानें त्यांना संतति होणार नाहीं म्हणून सांगून, आपले शिष्य करून त्यांजकडून सायणीय व माधवीय नांवाची ग्रंथरचना करून घेतली. शृंगेरी मठांतील पंडित लक्ष्मणशास्त्री यानें अठराव्या शतकाच्या अखेरीस रचलेल्या गुरुवंशांत अशीच आख्यायिका असून त्यांत सायणाऐवजीं माधव म्हटलें आहे. या तीनहि ग्रंथांवरून माधवाचार्य व विद्यारण्य हे एक नव्हत हें अगदीं स्पष्ट सिद्ध होतें (इंडियन हिस्टॉरिकल क्वा. व्हा. ६, नं. ४, पा. ७०२-१७).

विद्याविनोद—भट्टिकाव्यावरील टीकाकार.

विद्यासागर—याची महाभारतावर 'मोक्षधर्मटीका' आहे. याचें नांव आनंदपूर्णमुनींद्र असेंहि आहे. हा अभयानंदाचा शिष्य.

विनयविजय—(स. १६१३-८१) हा गुजराथी वैश्य. गुरु कीर्तिविजय. याचा 'जैनन्याय' हा ग्रंथ महत्त्वाचा आहे. तो यानें जुनागडजवळ गुरु विजयसिंहाकरितां स. १६५१ मध्यें लिहिला.

विनयाग्नि कवि—काश्मीराकडील राहणारा. 'खंडप्रशस्ति' वृत्तीचा कर्ता.

विनयादित्य गंग—कलिंगच्या पूर्वगंग घराण्यांतल्या तिसऱ्या वज्रहस्ताचा मुलगा. यानें फार दिवस राज्य केलें नाहीं. हा एखाद्या प्रांताचा सुभेदार असावा (इंडि. ॲंटि. १८८९-१७१).

विनयादित्य पश्चिम चालुक्य—(स. ६८१-९६) पहिल्या विक्रमादित्याचा हा मुलगा होय.

यानें कोंजेवरम् येथील पल्लव राजांवर विजय मिळविला, व चोल, पांड्य, हैहय, गंग वंगरे राजांचा पराभव केला. याला युद्धमल्ल असेंहि म्हणत. फ्लीटच्या मतें याला कुंकुममहादेवी नांवाची एक मुलगी होती. पण त्या विधानाबद्दल तोहि साशंक आहे.

विनयादित्य होयसल—(स. १०४८) हा होयसळ घराण्यांतील पहिला ऐतिहासिक राजा होय. हा पश्चिमेकडील चालुक्य विक्रमादित्य ६ वा याचा मांडलिक हाता. याचा काल स. १०४८ असा आहे. याला १ ला त्रिभुवनमल्ल या नांवानें देखील उल्लेखितात.

विनायक—हा दशकुमारचरिताचा व्याख्याकार.

विनायक काकतीय—(स. १३६४) हा कृष्ण काकतीयाचा मुलगा. याला नागदेव असेंहि म्हणत. स. १३६४ मध्यें मुहम्मदशाह बाहामनीनें याचा निर्दयपणें खून केला. या वेळीं दिल्लीच्या बादशाहानें मुसलमानांविरुद्ध याला मदत देण्याचें नाकारलें.

विनायकपाल प्रतिहार—(स. ९३१) रघुवंशी प्रतिहारांपैकीं महेन्द्रपालाला महीदेवीदेवीपासून झालेला पुत्र. याच्या वेळचें दानपत्र मिळाले आहे. स. ९३१ त याची राणी प्रसाधनादेवीपासून दुसऱ्या महेंद्रपालाचा जन्म झाला. याच्या कारकीर्दीच्या शेवटापासून कनोजच्या प्रतिहारांचें राज्य निर्बल होत चाललें.

विनायक रामचंद्र ऊर्फ दादा कुंटे—यांनीं बायजाबाई शिंदे यांचें प्रवासवृत्त लिहून ठेवलें आहे.

विनायकराव अमृतराव पेशवे--(जन्म स. १७९२-मृत्यु स. १८५६) अमृतराव पेशव्याच्या पहिल्या बायकोचा मुलगा. लग्न ता. २३।४।१८०३ संगमनेर मुक्कामीं. वडिलांची सात लाखांची नेमणूक यालाहि चालू होती. हा काशीस राहत असे. अमृतरावाच्या गणपतिमंदिराची व्यवस्था नमुनेदार समजण्यांत येते. हा सालाची १॥ लाख दक्षणा देत असे. मिशनऱ्यांच्या तोंडून ख्रिस्तीधर्माचें वर्णन ऐकण्यावा याला नाद होता. स. १८२९ मध्यें चित्रकूटाजवळ करवी येथें वाडा बांधून हा राहूं लागला. करवी हें बांद्यापासून ४५ मैलांवर पयोष्णी नदीजवळ आहे. याची बहिण मैनाताई. याची मुलगी जोगांच्या घरांत दिली. हा स. १८५६ सालीं मेला. याचा वंश हयात आहे (म. रि. उ. ३, पा. ५६३).

विनीतदेव—(स. ७०० सुमार) हा बुद्ध तत्त्वज्ञ ललितचंद्राच्या वेळीं होऊन गेला. माळव्याच्या भर्तृहरीची बहीण ललिताचा आजा विमलास दिली होती. त्यावरून याचा काल ठरतो. याचे ग्रंथ–न्यायबिंदुटीका (धर्मकीर्तीच्या न्यायबिंदूवर), हेतुबिंदु टीका, तर्कन्यायटीका, समयबंधपरीक्षाटीका, संतानांतरसिद्धिटीका. हे सर्व मूळ ग्रंथ धर्मकीर्तीचे असून याची फक्त त्यांवर टीका आहे. तसेंच दिङ्नागाच्या आलंबनपरीक्षेवर याची टीका आहे. हे सर्व ग्रंथ फक्त तिबेटी भाषेंत उपलब्ध आहेत.

विप्रनारायण—(स. १७५४ सुमार) एक मराठी कवि. यानें जैमिनिकृत अश्वमेधपर्वाचें मराठींत ओवीबद्ध भाषान्तर केलें आहे. याशिवाय श्रीधरकृत व नामापाठककृत असे दोन अश्वमेध मराठींत आहेत. कै. त्र्यं. गु. काळे यांना मिळालेलें याच्या ग्रंथाचें हस्तलिखित शा. श.१६७६ सालीं लिहिलेलें होतें. त्यावरून हा त्यापूर्वीचा ठरतो. हा यजुर्वेदी माध्यंदिन शाखेचा वसिष्ठगोत्री ब्राह्मण. नागनाथ–दादाजी ऊर्फ दामोदर-गोपीनाथ–गोपजी ऊर्फ नाथाजी–विप्रनारायण असा यानें आपला वंश दिला आहे. महीपतिकृत भक्तलीलामृताच्या ४७ व्या अध्यायांत एका नारायणभट्ट साधूचें चरित्र दिलें आहे. तो तापी नदीच्या तीरीं थारनेर नामक गांवीं राहत असे. प्रस्तुत चरित्रनायकहि तापीतीरवासीच होतें. हे दोघे एकच होते काय ? (म. क. च. भा. ४, पा. २०–२७). यानें हा ग्रंथ खानदेशांतल्या हाताळे क्षेत्रांत पूर्ण केला. तेथेंच याचे पूर्वज राहत होते (मं. त्रै. व. १४.२ ले. ५).

विभुविक्रम (पश्चिम) चालुक्य—(स. १००८–१८) हा दशवर्म्याचा पुत्र. हा दुसऱ्या सत्याश्रयानंतर राजा झाला. याला विक्रमादित्य पांचवा व त्रिभुवनमल्ल पहिला असेंहि म्हणत. याच्या मागून याचा भाऊ जगदेकमल्ल पहिला ऊर्फ जयसिंह तिसरा हा गादीवर आला.

विमल—यानें उणादिसूत्रें कात्यायनानें केलीं असें तेराव्या शतकांत लिहिलें.

२. पद्मपादाचार्याचा पिता.

विमलनाथ—(तीर्थंकर पाहा).

विमलबोध—याची महाभारतावर 'दुर्बोधपदभंजिनी' नांवाची टीका आहे. वैशंपायन व देवस्वामी यांची टीका पाहून हा लिहितो, असें यानें आरंभीं म्हटलें आहे.

विमलादित्य चालुक्य—(स. १०१५–२२) हा दानार्णव चालुक्याचा पुत्र, व शक्तिवर्म्याचा धाकटा भाऊ होय. याच्या बायकोचें नांव कुंदव्वा महादेवी असें होतें. चोलराज राजराजाची ही कन्या होती. यास विमलार्क असेंहि म्हणत.

विरप्पा नायक—(स. १५७३–९५) मदुरेचा नायक विश्वनाथ नायकाचा नातू. याचा पिता कृष्णप्पा नायक.

विरूपा—चौऱ्यांशीं सिद्धांपैकीं तिसरा सिद्ध.

विरूपाक्ष—(स. १५८४) कानडी वीरशैव कवि. याचा गुरु–सिद्धवीरेश.

ग्रंथ–चन्नबसवपुराण.

बसवाची बहिण नागलांबिके, तिचा मुलगा चन्नबसव. त्याचें चरित्र या ग्रंथांत आहे. याचें भाषाशुद्धि, छंद वगैरेकडे लक्ष कमी आहे. अनेक राजे व कवि यांच्या कालनिर्णयाला याच्या ग्रंथाचा फारच उपयोग आहे (क. क. च. भा. २, पा. ३०८).

विरूपाक्ष संगम—(स. १३५४–७८) हा पहिल्या बुक्करायाचा तिसरा मुलगा. हा गादीवर आला नाहीं.

२. (स. १४०६ सुमार) हा दुसऱ्या हरिहर संगमाचा पुत्र. यानें स्वतः गादी मिळावी म्हणून पुष्कळ खटपट केली.

३. (स. १४६५–१४८५) हा दुसऱ्या देवराय संगमाचा पुत्र. हा मल्लिकार्जुनानंतर गादीवर आला. याचा सेनापति नरसिंहराय साळुव, याला पदच्युत करून राजा झाला.

४. (स. १६६५) हा मल्लिकार्जुन संगमाचा मुलगा. याला राजशेखर नांवाचा भाऊ होता.

याच्या वेळीं राज्य नरसिंहराय साळुवाच्या ताब्यांत जाऊं लागलें होतें.

विरूबाई—(मृत्यु स. १७१९) शाहूमहाराजांच्या मर्जीतील एक दासी (फत्तेसिंग भोसले पाहा). हिचा घरांत व बाहेर दाब होता.

विलिवायकुर—(यज्ञश्री शातकर्णि पाहा).

विशाखदत्त—(स. ५७५ सुमार) संस्कृत भाषेंतील मुद्राराक्षस नाटकाचा कर्ता. हा अवंतिवर्मन् मौखरीच्या पदरीं होता.

विश्वनाथ—(स. १३५० सुमार) हा नारायणाचा नातू आणि चंद्रशेखराचा पुत्र होय. यानें कित्येक संस्कृत शब्दांच्या स्पष्टीकरणार्थ ओरिया भाषेतील पर्यायशब्द काव्यप्रकाशावरील टीकेंत दिले आहेत, असें वामनाचार्य झळकीकरांनीं काव्यप्रकाशाच्या प्रस्तावनेंत दाखविलें आहे (पा.२५). यावरून हा ओरिसा प्रांतांतील ठरतो. विश्वनाथ

आणि त्याचा पिता यांना 'सांधिविग्रहिक महापात्र' अशी पदवी लावलेली आढळते. त्यावरून हे राज्याधिकारी ठरतात. तसेंच पहिल्या व दहाव्या परिच्छेदाच्या शेवटल्या भागावरून हा वैष्णव ठरतो. हा स्वतः कवि होता व यानें साहित्यशास्त्राचे नियम स्पष्ट करण्यासाठी पदोपदी स्वतःचे संस्कृत व प्राकृत श्लोक दिलेले आहेत. साहित्यदर्पणाशिवाय दुसरे अनेक ग्रंथ यानें पूर्वी लिहिले असून त्यांतील 'राघवविलास' नांवाचें संस्कृत महाकाव्य, 'कुवलयाश्वचरित' नांवाचें प्राकृत महाकाव्य, 'प्रभावतीपरिणय' व 'चंद्रकला' या नाटिका आणि 'प्रशस्तिरत्नावली' नांवाचा सोळा भाषांतील करंभक हे साहित्यदर्पणांत सांगितले आहेत. 'साहित्यदर्पण' लिहिल्यावर 'नरसिंहविजय' हें काव्य व काव्यप्रकाशावरील काव्यप्रकाशदर्पण नांवाची टीका हे दोन ग्रंथ यानें लिहिले. हा चवदाव्या शतकांत झाला.

२. (स. १४२५-५०) संस्कृतधर्मशास्त्रकार. पिता भट्टपूज्य. हा श्रीमाली गुर्जर होता. मदनसिंहराजाचा यास आश्रय असे. यानें 'मदनरत्न' हा ग्रंथ लिहिला. रत्नाकर, गोपीनाथ व गंगाधर हेहि यला मदत करीत, असें म्हणतात.

३. (जन्म स. १५८६) एक भारतीय ज्योतिषी. गोलग्रामांतील एका विद्वान् घराण्यांतील दिवाकराचा हा मुलगा होता. याचे ग्रंथः—सूर्यसिद्धांतावर गहनार्थप्रकाशिका व आणखी कित्येक ग्रंथ व टीका मिळून १८ ग्रंथ आहेत. हे सर्व ग्रंथ विश्वनाथानें काशी येथें लिहिले.

४. 'मृगांकलेखा' या नाटिकेचा कर्ता. याचा पिता त्रिमलदेव. हा गोदावरीतीरचा होता. तरी बनारसला राहत असे.

विश्वनाथ नायक—(मृत्यु स १५६३) वीरप्पा नायकाचा पुत्र. हा मदुरेचा दिसतो.

विश्वनाथ न्यायपंचानन—(स. १६३४) हा तर्कज्ञ नवद्वीपचा राहणारा. याचा पिता विद्यानिवास व भाऊ रुद्रवाचस्पति. हा रघुनाथ शिरोमणीचा अनुयायी होता. यानें आपला 'भाषापरिच्छेद' स. १६३४ त लिहिला. यानें खालील ग्रंथ लिहिलेः-(१) अलंकारपरिष्कार, (२) नववादटीका, (३) न्यायसूत्रवृत्ति, (४) सुबर्थतत्त्वालोक अथवा कारकचक्र, (५) न्यायतंत्रबोधिनी अथवा न्यायबोधिनी, (६) पदार्थतत्त्वालोक, रघुनाथाच्या पदार्थखंडावरील टीका, (७) भाषापरिच्छेद (कारिकावली), (८) पिंगलप्रकाश (हि. इं. लॉ., पा. ४७९-८०).

विश्वनाथ पांडेत--'ज्ञानप्रबोध' या गीतेवरील टीकेचा हा कर्ता. हा लाडकामराज नांवाच्या एका श्रीमान् व्यापाऱ्याकडे कोशाध्यक्ष होता. पुढें यांचें व त्यांचें न पटल्यामुळें त्यानें यास कैद केलें. पण याच्या बायकोच्या सांगण्यावरून याच्या कमलाकर नांवाच्या गुरूच्या शिष्यानें यास कैदेंतून सोडविलें. कैदेंतून सुटल्याबरोबर यानें संन्यास घेतला व उरलेलें आयुष्य ईश्वरभजनांत घालविलें. यानें 'ज्ञानचंद्रिका' नांवाचा एक गद्य ग्रंथ लिहिला.

विश्वनाथभट्ट—(स. १६५० सुमारें) 'शृंगारवाटिका' या संस्कृत नाटकाचा कर्ता. हा महादेवपुत्र व धुंडिराजशिष्य चित्तपावन ब्राह्मण होता. याचें उपनांव रानडे असावें. हें नाटक रामसिंहाच्या आज्ञेवरून लिहिलें.

२. (स. १३०० सुमार) याचें संस्कृत 'सौगंधिकाहरण' नाटक प्रसिद्ध आहे. त्याला प्रेक्षणक व साहित्यदर्पणांत व्यायोग म्हटलें आहे. याचा आश्रयदाता प्रतापरुद्र काकतीय होय.

विश्वनाथसिंह--(जन्म स. १७८९) यानें 'आनंदरघुनंदन' नांवाचें व्रजभाषेंतील पहिलें नाटक लिहिलें. हा रीवाँ येथील राजा असून जयसिंहाचा पुत्र होता. यानें हिंदींत अनेक काव्यग्रंथ लिहिले (क. कौ. १).

विश्वरूप--(स. ८००-८२५ सुमार) याची याज्ञवल्क्यस्मृतीवरील टीका 'बालक्रीडा' नांवानें प्रसिद्ध आहे. हा शंकराचार्यांचा अनुयायी असून याची टीका फार महत्त्वाची आहे. त्यांत मीमांसापद्धतीनें चांगलाच विचार केला आहे. याची टीका गद्य व पद्य अशा स्वरूपाची आहे.

२. मंडनमिश्राचें नामांतर.

३. (मुनीश्वर पाहा).

विश्वरूपसेन--हा बंगाल्यांतील सेन घराण्यापैकी लक्ष्मणसेनाचा पुत्र होय. याच्या वेळीं सेन घराण्याचें राजकीय महत्त्व नष्ट झालें होतें.

विश्ववर्त--शृंगार, भंग, अलंकार व मंख यांचा पिता आणि मनोरथ ब्राह्मणाचा पुत्र.

विश्ववर्मा--(स. ४२३) अज्ञातवंशीय नरवर्म्याचा पुत्र. याच्या वेळचा गंगधार येथील शिलालेख वि. सं. ४८० (स. ४२३) चा मिळाला आहे (फ्लीट गु. इं. पृ. ७५७). याचा पुत्र बंधुवर्मा कुमारगुप्ताचा सामंत होता. कुमारगुप्त वि. सं. ४८० च्या सुमारास सम्राट् होता. गंगधारच्या शिलालेखावरून दिसून येतें कीं याचा मंत्री मयूराक्ष यानें विष्णूचें मंदिर, तांत्रिक शैलीचें मातृकागृह व विहीर बांधली.

विश्वशंभु--एकाक्षरनाममालेचा कर्ता. हा कवि काश्मीराकडील होता.

विश्वसिंह क्षत्रप--हा दुसऱ्या रुद्रसेन महाक्षत्रपाचा पुत्र. याचीं नाणीं उपलब्ध आहेत, पण त्यावरचा शकाचा आंकडा अस्पष्ट आहे. हा महाक्षत्रप होता.

विश्वसेन क्षत्रप--हा भर्तृदामाचा पुत्र. याचीं नाणीं उपलब्ध आहेत. पण त्यावर यास क्षत्रप म्हटलें आहे.

विश्वंभर--(स. १८०० सुमार) भोसल्यांचा इंग्रजांकडील वकील व वेणीरामपंडिताचा भाऊ.

विश्वंभरनाथ--(स. १७०८ सुमार) हा नाथसंप्रदायापैकीं नाथनिरंजनाचा शिष्य. याचे पांच अध्यायांचें हिंदी व मराठी गोपीचंदाख्यान उपलब्ध आहे (मं. वार्षिक १८३६, २३-२९).

विश्वासराव पेशवे--(जन्म स. १७४२ जुलै २२-मृत्यु स. १७६१ जाने. १४) बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब व गोपिकाबाई यांचा पुत्र. याची मुंज स. १७४९ च्या मार्चांत झाली, व स. १७५० च्या मेमध्यें दीक्षित पटवर्धनांच्या घराण्यांतील लक्ष्मीबाईशीं यांचें लग्न झालें. सर्व पेशव्यांत विश्वासराव फार सुंदर होता. शिंदखेडच्या स्वारींत याला सरदार केलें होतें. तेव्हा दत्ताजी शिंदे हा याचा कारभारी होता. जनकोजी हाहि या मोहिमेंत होता. तो व विश्वासराव हे समवयस्क मित्र होते. व त्यांची मैत्री अखेरपर्यंत होती. औरंगाबाद व शिंदखेड येथील या युद्धांत मराठ्यांनीं निजामाचा पूर्ण पराजय केला (स. १७५७ आक्टो.). उदगीर येथील लढाईंत हा भाऊसाहेबांच्या बरोबर हजर होता. यानें हत्तीवरून उत्तम प्रकारें तिरंदाजी केली. याच्या हाताखालीं दहा हजार स्वतंत्र फौज नेमून दिली होती (स. १७६०). भाऊसाहेब उत्तरेंत अबदालीवर निघाले तेव्हां हाहि त्याजबरोबर होता. भाऊसाहेबांनीं दिल्ली शहर स. १७६० त हस्तगत केलें त्या वेळेस तेथें त्यांनीं दरबार भरवून सर्वांकडून यास नजरा करविल्या. या वेळीं यानें लष्करी दृष्टीनें किल्ल्याची पाहणी केली.

या सालांत आलेला दसरा मराठ्यांनीं विश्वासरावाच्या नेतृत्वाखालीं साजरा केला. शेवटच्या दिवशीं (१४.१. १७६१) हा व भाऊसाहेब आपल्या सैन्याच्या मध्यभागीं प्रथम हत्तीवर बसून लढत होते. लढाईस सुरुवात सकाळीं ८ वाजतां झाली. दुपारीं विश्वासराव हत्तीवरून उतरून दिल्पाक घोड्यावर बसले. तिसऱ्या प्रहरीं गोळी लागून तत्काळ प्राणोत्क्रमण झालें. जवळच भाऊसाहेब होते. त्यांनीं रावाचें शव हत्तीवरील आंबारींत ठेवविलें. व ते वैतागून निराशेनें शत्रुसैन्यांत घुसले.

शेवटीं गणेश वेदांती, काशीराज वगैरे मुत्सद्यांनीं एक लक्ष रु. दंड भरून याचें शव सोडवून घेतलें. यानें नानासाहेबांना एक पत्र पानपताहून अखेरीच्या दिवसांत पाठविलें होतें. त्यांत म्हटलें होतें कीं, " फौज व खजिना पाठविणें. मी आपल्यासाठीं लिहीत नाहीं, माझ्यासारखे पुत्र आपल्यास आणखी आहेत, व होतील; परंतु भाऊसाहेबांसारखा बंधू मात्र मिळणार नाहीं. " विश्वासरावांची बायको पानतावर गेली होती ती पुण्यास आल्यावर दोन वर्षांनीं वारली.

विश्वेश्वर--एकनाथाचा समकालीन. अश्वचिकित्सेवरील मूळ संस्कृत ग्रंथावर यानें केलेली मराठी टीका आहे.

२. निर्णयकौस्तुभ नांवाच्या धर्मशास्त्रविषयक ग्रंथाचा कर्ता.

मदनपारिजात ग्रंथ मदनपाल राजाचा नसून तो याचा फक्त पुरस्कर्ता होता. त्याच्याच आश्रयानें यानें आपले मदनपारिजातादि ग्रंथ लिहिले. मिताक्षरेवरील सुबोधिनी मात्र स्वतःच्या नांवानें लिहिली. मदनपालावर दिलेल्या ग्रंथाशिवाय याचे कर्मविपाक, महादानपद्धति हे ग्रंथ आढळतात.

याचा पिता पेदिभट्ट, गोत्र कौशिक, व्यासारण्य मुनींचा हा शिष्य. पित्याच्या नांवावरून हा द्रविड असावा असें दिसतें.

विष्णु--(स. १६०८) गोलग्रामचा ज्योतिषी. गणेश दैवज्ञाच्या बृहच्चिंतामणीवर याची 'सुबोधिनी' टीका आहे. कमळाकर, विश्वनाथ व दिवाकर यांच्याच कुलांतील होत.

२. (विठ्ठल पाहा).

विष्णु गबाजी (तर्वाब) चित्राव--पुण्याच्या चित्राव घराण्याचा मूळ पुरुष (शिवरामभट चित्राव पाहा).

विष्णुगुप्त--(चंद्रगुप्त मौर्य पाहा). यालाच कौटिल्य, चाणक्य वगैरे नांवें आहेत.

विष्णुचित्त कदंब--(२ विजयादित्य कदंब पाहा).

विष्णुदास नामा--(नामा विष्णुदास पाहा).

विष्णुदास नामा पाठक--(नामा पाठक पाहा).

विष्णु नरहर--(स. १७७६ सुमार) राघोबादादाचा साहाय्यक.

विष्णु महादेव गद्रे--(स. १७७४ सुमार) पेशवाईंतील प्रमुख सावकार.

विष्णुवर्धन (पूर्व) चालुक्य—(स.६१५-६३३) (पहिला बिट्ट-अरस, कुब्ज विष्णु-वर्धन) याला विषम-सिद्धि, मकरध्वज व बिट्ट म्हणत. कदाचित् हा कुबडा असेल.

पश्चिम चालुक्य घराण्यांतील बातापीचा (बदामीचा) जो पुलकेशिन् २ रा त्याचा हा धाकटा भाऊ होय. याच्या पित्याचें नांव कीर्तिवर्मन् पहिला हें होय.

याला पुलकेशिन् २ रा यानें सुभेदारीवर नेमिलें होतें. पुढें स. ६१५ मध्यें यानें वेंगी येथील पूर्व चालुक्य घराण्याची स्थापना केली. हा स्वतंत्र होऊन राज्य करूं लागला. यानें स. ६३३ पर्यंत राज्य केलें.

याच्यानंतर याचा मुलगा जयसिंह १ ला हा गादीवर आला. जयसिंहानें एकंदर ३३ वर्षे राज्य केलें (B.) (दामोदर भारवि पाहा).

यानें वेंगीराज शालंकायण याचा पराभव करून आपलें राज्य स्थापिलें. यानें राजमहेंद्री ही राजधानी केली. यानें सर्व कलिंगदेश जिंकला. याच्या आज्ञेवरून दरबारी कवि ननय्यभट्ट यानें महाभारताचें तेलगू भाषांतर केलें.

२. (स. ६६३-६७२) हा इंद्र भट्टारकाचा मुलगा होय. याला 'सर्वलोकाश्रय' हें उपपद होतें. विषयसिद्धि हें बिरुद होतें. याचे दोन शिलालेख नेलोर व महेवाडा येथें आहेत.

३. (स. ७०९-७४६) हा कोक्कीलीचा वडील भाऊ. त्याला पदच्युत करून हा गादीवर आला.

४. (स. ७६४-९९) हा पहिल्या विजयादित्याचा मुलगा. यास विष्णुराजहि म्हणत.

५. (स. ८४३-४४) हा दुसऱ्या विजयादित्याचा मुलगा. याला कलि विष्णुवर्धनहि म्हणत.

६. तिसऱ्या भीमचालुक्याचें नामांतर.

विष्णुवर्धन वरीक—(स. ३७२) हा व्याघ्र-राताचा प्रपौत्र, यशोराताचा पौत्र, व यशोवर्धनाचा पुत्र. याच्या वंशाचें नांव वरीक असें होतें. भरतपूर राज्यांत बयानाच्या आसपास याचें राज्य होतें. बयाना येथील किल्ला विजयगड तेथें यानें पुंडरीक नांवाचा यज्ञ केला. त्याचा यूप येथें उभा असून त्याच्या वरील लेखांत वरील माहिती मिळते. तेथें दिलेला वि. सं. ४२८ (स. ३७२) फाल्गुन बहुल वदि, ५ काळ असा आहे (फ्लीट गु. ई., पृ. २५२-५३).

विष्णुवर्धन होयसल—(स. ११०६-४१) (बिट्टिदेव होयसल पाहा).

विष्णुवर्मा कदंब—पहिल्या नागवर्मा कदंबानंतरचा राजा.

विष्णुस्वामी—द्रविड देशांतील एका ब्राह्मण प्रधानाचा हा मुलगा होय. वल्लभाचार्यमार्गीय 'संप्रदायप्रदीप' ग्रंथांत असें लिहिलें आहे कीं, यानें शांकर सिद्धान्ताचें खंडन करून 'साकारसिद्धि' नांवाचा ग्रंथ लिहून एक नवीन वैष्णवसंप्रदाय काढला, व तो प्रचारांत आणिला. याच्या मतास बरेच लोक मिळाले. हा त्रिदंडी संन्यासी होता. संप्रदाय वाढूं लागतो न लागतो तों हा मरण पावला.

विष्णुस्वामीचें मत पुढें बरेच जणांनीं चालविलें. त्यांपैकीं ज्ञानदेव, केशव, हिरालाल, श्रीराम, श्रीधर आणि बिल्वमंगल वगैरे होत. परंतु बिल्वमंगल मरतांच ही गादी बुडाली. पुढें कांहीं वर्षांनीं वल्लभाचार्यांनीं तिचा जीर्णोद्धार केला. विष्णुस्वामीचा मतावलंबी गर्भश्रीकांतमिश्र नांवाचा होता यानें 'साकारसिद्धि' नामक ग्रंथ लिहिला, त्यावरून हा नृसिंह-उपासक होता. तो त्याचा आकार सच्चिदानंद रूपच मानणारा असे. परंतु नृसिंहाच्या जागीं पुरुषोत्तमास उभें केलें, आणि त्यास साकार सच्चिदानंद मानिलें.

विसाजी आपाजी आठवले—(स. १७७९) पेशव्यांचे एक सरदार.

विसाजी कृष्ण बिनीवाले—(मृत्यु स. १७८५) याचें मूळ ठिकाण कोंकणांतील राजापूर प्रांतांत तेरवण म्हणून गांव होतें. जातीचा हा कऱ्हाडा ब्राह्मण असून याचें आडनांव चिंचाळकर होय. विसाजीचा बाप कृष्णा-जीपंत पुरंदरास येऊन राहिला. त्याचा वडील मुलगा विठ्ठलपंत पुण्यास सावकारी करी, कनिष्ठ मुलगा विसाजी-पंत घोड्यांचा शोकी होता.

यानें नानासाहेब व भाऊसाहेब यांजकडे प्रवेश करून हुजरातींत दौलतराव काटे यांच्या पागेंत नोकरी मिळ-विली. नंतर यानें सन १७५७ पासून बळवंतराव मेहें-दळ्याचे हाताखालीं कर्नाटकांत कामें करून प्रसिद्धि मिळविली, तेव्हां, काटे याची पागा विसाजीस देण्यांत येऊन बिनीवर याची नेमणूक करण्यांत आली. तेव्हां-पासून पुढील स्वाऱ्यांत चांगलीं कामें करून यानें माधव-रावाकडून वाहवा मिळविली. सन १७६९ सालीं रामचंद्र गणेश कानडे याजकडे स्वारीचा मुख्य कारभार सांगितला तेव्हां त्याचे हाताखालीं याची नेमणूक झाली. तेव्हां-पासून पुढें त्या स्वारीतील मोहिमांत यानें निःपक्षपातानें व धूर्ततेनें वागून, सरदारांच्या भांडणांत न पडतां, केवळ राज्याचे हिताचा विचार ठेविला. या याच्या शहाणपणा-

बद्दल याजवर माधवरावाचा केवढा इतबार होता हें यास लिहिलेल्या पत्रावरून व्यक्त होतें. दोघांच्या भांडणांवरून रामचंद्र गणेशास परत बोलाविल्यावर स्वारीचा मुख्य अधिकार यास मिळाला.

यानें दिल्लीपर्यंत मराठ्यांचा अंमल बसवून व शत्रूंस पादाक्रांत करून, ता. ११ फेब्रुवारी स. १७७१ रोजीं दिल्लीच्या किल्ल्यावर मराठ्यांचें निशाण चढविलें, आणि शहाअलम बादशहास अनुकूल करून घेऊन त्यास अलाहाबादेहून दिल्लीस आणलें. बादशहानें ता. २ सप्टेंबर स. १७७१ रोजीं विसाजी कृष्ण बिनीवाले यास शिक्केकट्यार देऊन मराठ्यांस बादशाही वजिराचे सर्व अधिकार व बक्षिगिरीचा फर्मान हीं दिलीं. विसाजी कृष्ण व महादजी शिंदे यांनीं, दिल्ली येथील पठाण व रोहिले यांचा अंमल दूर करून व सर्व शत्रूंस आपल्या बाहुप्रतापानें दिपवून सोडून, ता. २५ डिसेंबर स. १७७३ रोजीं शहाअलम बादशहास दिल्लीच्या तक्तावर मोठ्या समारंभानें आरूढ केलें. या कर्तबगारीमुळें यांची सर्व हिंदुस्थानांत वाहवा झाली. या प्रसंगीं माधवराव पेशव्यांनीं यांस पत्र लिहिलें, तें फार महत्त्वाचें व वाचनीय असें आहे (इतिहाससंग्रह, सन १९११ अं. १-३, पृ. ११६).

विसाजी केशव लेले—(स. १७७४ सुमार) उत्तरपेशवाईंतील एक सरदार.

विसोबा खेचर—(समाधि स. १३०९) हा शुक्लयजुर्वेदी ब्राह्मण मोठा सत्पुरुष होता. याचें उपनांव चाटी (धंदा) दिसतें. हा पैठणजवळील मुंगीचा राहणारा. हा औंढ्या नागनाथ येथें खिस्तीचा (सराफी) उदीम करून राहत असे, असें दासो दिगंबर म्हणतात. हा आपला गुरु सोपानदेव असें लिहितो. शिवाय ज्ञानदेवांना गुरु म्हणतो. हा नामदेवाचा गुरु होता. याचें ' हरिश्चंद्राख्यान ' नांवाचें एक प्रकरण, कांहीं अभंग व पदें एवढेंच वाङ्मय उपलब्ध आहे. याची बार्शी येथें समाधि आहे. हा साधुपुरुष ज्ञानेश्वराच्या तीर्थयात्रेंत नामदेवादि मंडळीबरोबर हजर होता. नामदेव जेव्हां याच्या दर्शनास गेले तेव्हां सर्वाभूतीं परमेश्वर पाहणारा हा योगी पुरुष शिवलिंगावर पाय पसरून निद्रासुख भोगीत होता. याच्या अभंगांत पुढीलप्रमाणें नंदभाषा (व्यापारी) योजलेली दिसते. मुळु (पांच) वदनाचा । आंगळू (दहा) हाताचा । उदाणू (तीन) नेत्राचा । स्वामी माझा ॥ याच भाषेंत नामदेव व तुकोबा यांचेहि कांहीं अभंग आहेत. याला परमेश्वराबद्दल प्रथम अविश्वास होता म्हणून यास ज्ञानेश्वरानें उपहासानें खेचर असें नांव दिलें.

विज्ञानभिक्षु—'सांख्यसारविवेक' नांवाच्या ग्रंथाचा कर्ता. भावा गणेश दीक्षिताचा हा गुरु. याचे अनेक ग्रंथ प्रसिद्ध आहेत.

विज्ञानेश्वर—(स. १०७०-११००) हा याज्ञवल्क्यस्मृतीवरील सुप्रसिद्ध मिताक्षरा टीकेचा कर्ता. या टीकेंत प्रत्येक अध्यायाच्या शेवटीं यानें आपली माहिती दिलेली आढळते. तीवरून हा भारद्वाजगोत्री पद्मनाभ भट्टोपाध्यायाचा मुलगा व उत्तमपाद नामक गुरूचा शिष्य होता असें दिसतें. हा संन्यासी होता. सध्यांच्या हैद्राबाद संस्थानांतील कल्याणीनामक गांवीं याच्या काळीं सहावा विक्रमादित्य पश्चिम चालुक्य राजा राज्य करीत होता. त्याच्या पदरीं हा होता. त्या राजाची यानें फार स्तुति केली आहे. बंगालमधील दायविभागाची बाब खेरीज करून तसेंच मुंबई शहर व गुजराथ हे भाग सोडून देतां हिंदुस्थानांत ही टीका प्रमाण मानली जाते. या टीकेवर बाळंभट्ट, नंद पंडित, विश्वेश्वरभट्ट, मधुसूदन, गोस्वामी व हलायुधभट्ट इत्यादींनीं टीका लिहिल्या आहेत. यानें आशौचदशकटीका लिहिली. याच्या नांवावर त्रिंशच्छोकभाष्य नांवाचा ग्रंथहि प्रसिद्ध आहे.

विंध्यवर्मा परमार—(स. १३७५ सुमार) हा माळव्याच्या परमारांपैकीं अजयवर्म्याचा पुत्र. गुजराथेंत दुसरा भीमदेव गादीवर असतां हा स्वतंत्र झाला असावा. याचा नातू अर्जुनवर्मा याच्या वि. सं. १२७२ च्या दानपत्रांत विंध्यवर्म्याचा उल्लेख वीरमूर्धन्य व गुजराथच्या राजाचा उच्छेद करणारा असा आहे. सोमेश्वर कवीनें आपल्या 'सुरथोत्सव' नांवाच्या काव्यांत गुजराथच्या सेनापतीकडून पराभव झाला म्हणून हा रण सोडून गेला व त्या सेनापतीचें गोगास्थान नांवाचें शहर उध्वस्त केलें आणि त्याच्या महालाचे ठिकाणीं विहीर खोदल्याचें लिहिलें आहे. (सुरथोत्सव सर्ग १५). याचा सांधिविग्रहिक काश्मीरी बिल्हण याहून वेगळा असा दुसरा बिल्हण होता. तसेंच सपादलक्ष प्रदेशांतील मंडलकर (मांडलगड, उदयपुर राज्यांत) येथील राहणारा जैन पंडित आशाधर सपादलक्ष देशांतून मुसलमानांमुळें माळव्यांत येऊन राहिला व त्याची बिल्हणाशीं मैत्री झाली (आशाधरकृत धर्मामृतशास्त्राची शेवटली प्रशस्ति, श्लो. १-७.)

विंध्यशक्ति वाकाटक—(स. २४८-२८४) हा वाकाटक वंशाचा मूळ पुरुष विष्णुवृद्धगोत्री ब्राह्मण होता. हा वाकाट किंवा वागाट गांवचा राहणारा. हें गांव ख्रि. पू. १५० वर्षांइतकें जुनें आहे, असें अमरावतीच्या शिलालेखावरून ठरतें. हें गांव झाशी जिल्ह्यांतील चिरगांवच्या

पूर्वेस सहा मैलांवर ओच्छा संस्थानांत आजहि प्रसिद्ध आहे. याच गांवीं द्रोणाचार्यांचा जन्म झाला अशी प्रसिद्धि आहे. विदिशानागवंशाचे राजांच्या पडत्या काळांत यानें त्यांची सत्ता टिकविण्यास साहाय्य केलें. म्हणून कर्तृत्वदर्शक 'विंध्यशक्ति' असें यास नांव प्राप्त झालें.

हा ब्राह्मण होता. यानें 'बृहस्पतिसव' यज्ञ केला होता. तो यज्ञ ब्राह्मणांशिवाय इतरांना करितां येत नाहीं. प्रथम यानें भारशिवांना सत्ता टिकविण्यास मदत करून मान्यता मिळवली. नंतर नवनाग किंवा भारशिव घराण्यांतील भवनागानें आपली मुलगी याच्या नातवास म्हणजे प्रवरसेनपुत्र गौतमीपुत्रास दिली. गौतमीपुत्रास तिचे ठिकाणीं शिशुक नांवाचा मुलगा झाला. भवनागास पुत्र नसल्यामुळें शिशुकाला भारशिवांचें राज्य मिळालें. त्या वेळीं आजा प्रवरसेन सर्व कारभार पाही. या क्रमानें विंध्यशक्तीच्या वंशजांकडे भारशिवांचें साम्राज्य आलें (किलकिला राजवंश पाहा).

वीर केरल—(स. १३०४) केरलच्या चेरमाण पेरुमाल राजाचा मुलगा. याला दोन बहिणी होत्या त्या आस्तिंगल येथें प्रबल झाल्या.

वीरगंग होयसल--बिट्टिदेवाचें नामान्तर.

वीरचंप चोल—(स. १३१४) विजयनगरच्या इतिहासांत याचा निर्देश येतो.

वीरदत्त--मनोरथाचा मुलगा. पत्नी–गौरी. पुत्र–दंडिन् (हि. का. १०. ३२–३३)

वीरदामा क्षत्रप—(स. २३६) हा दामसेन क्षत्रपाचा पहिला मुलगा. दामाचे मागून यशोदामा उत्तराधिकारी झाला, त्याअर्थी हा अल्पवयी मेला असावा. याला रुद्रसेन दुसरा हा पुत्र होता.

वीरदेव पूर्व चालुक्य--(स. १०७८–११००) हा पहिल्या कुलोत्तुंगाचा दुसरा मुलगा. राजधानी जगन्नाथनगरी. याला विष्णुवर्धन म्हणत.

वीरधवल वाघेल—(स. १२५० सुमार) हा लवणप्रसादाचा मुलगा. यानें गुजराथच्या सोलंकींचें राज्य आपल्या पराक्रमानें कांहीं दिवस टिकविलें, आणि शेवटीं तें राज्य याच्या घराण्यांत आलें. याचा पिता दुसऱ्या भीमाचा मुख्य प्रधान होता आणि यानें तेंच काम अत्यंत प्रभावानें पुढें चालविलें. गुजराथच्या इतिहासांत याचें नांव आपल्याकडील बाजीराव पेशव्यासारखें आहे. अनहिलपट्टण हें याचें ठिकाण.

वीर नरसिंह होयसल—(१ व २ नरसिंह होयसल पाहा).

वीर नारणीयार—(गंडरादित्य पाहा).

वीर पांड्य—(कुलशेखर व पराक्रम पांड्य पाहा).

२. (मृत्यु स. ९७२–७३) एक राजा.

३. (स. १२९६–१३४२) हा बापाच्या खुनाबद्दल सूड उगविण्याकरितां सुंदर पांड्याशीं लढला. पण पराभव पावला तेव्हां दिल्लीच्या अलाउद्दीन खल्जीच्या आश्रयास गेला. पण मलीकाफूरनें द्वारसमुद्रावर स्वारी केली तेव्हां (स. १३१०) पांड्यांना लढावें लागलें. तेव्हां सुंदर पांड्य मदुरेहून पळाला (कुलशेखर २ रा पाहा).

वीर वल्लाळ होयसल—वीर हें सन्मानदर्शक उपपद लावून बल्लाळ नांव उच्चारीत (बल्लाळ होयसळ, जन्न व ५ भिल्लम यादव पाहा).

वीरभद्र—(स. १६२९–४५) बेदनूरचा राजा. हा भद्रापा नायकाचा पुत्र. बसवपट्टणाचा केंग हनुम हा वीरभद्राचा मांडलिक होता. परंतु केंग नायकानें वीरभद्राविरुद्ध बंडाचें निशाण उभारलें, त्यामुळें वीरभद्रानें त्याचा पराभव करून त्याची जहागीर काढून घेतली. अशा रीतीनें भणंग बनलेला केंगनायक वीरभद्राविरुद्ध मदत मागण्यासाठीं विजापूरदरबाराकडे गेला. त्या वेळीं रणदुल्ला व शहाजी हे आपापल्या सैन्यासह नुकतेच विजापुराकडे आले होते, व त्यांना कांहींतरी कामगिरी पाहिजेच होती. यामुळें केंगनायकाचें आमंत्रण त्यांच्या पथ्यावरच पडलें. त्यांनीं कर्नाटकांत स्वारी काढण्याचें ताबडतोब कबूल केलें. या स्वारींत मलीक रैहान हा चार हजार स्वारांसह सामील झाला, व सर्वांनीं मिळून बेदनूर ऊर्फ रायगिरी किल्ल्यास वेढा दिला. तेव्हां वीरभद्राचा निरुपाय होऊन यानें रैहानच्या मार्फत तहाचें बोलणें लावलें. अखेर तीस लाख होन खंडणीदाखल द्यावे अशा अटीवर तह झाला. त्यांपैकीं सोळा लाख रोख व बाकीचे चौदा लाख तीन हप्त्यांनीं घेण्याचें ठरलें. रोख मिळालेले सोळा लाख रणदुल्लानें बादशाही खजिन्यांत भरले तेव्हां त्याच्या राजनिष्ठेचें सर्वत्र कौतुक झालें. पुढल्या वर्षी यानें खंडणी देण्याची चालढकल चालविली व बसवपट्टणच्या केंगनायकावर पुनः हत्यार धरलें. तेव्हां विजापुराहून पुनः सैन्य रवाना होऊन वीरभद्राचा सर्व मुलूख जप्त करण्यांत आला. हा प्रथम इक्केरीचा राजा होता. इक्केरी हें स. १६३७ सालीं रणदुल्लाखान व शहाजी यांनीं घेतल्यानंतर हा बेदनूरास राहूं लागला (शिवभारत-प्रस्तावना १०५–६). हा निपुत्रिक मरण पावला.

२. (कृष्ण काकतीय पाहा).

वीरभद्र वाघेल—(स. १५९२–१५९३) वाघेल घराण्यांतील रामचंद्र राजाचा मुलगा. पुरें एक वर्ष सुद्धां हा गादीवर नव्हता.

हा फक्त विद्वानांचा आश्रयदाता नसून स्वतः मोठा विद्वान् आणि लेखक होता. वात्स्यायनाच्या कामसूत्राच्या आधारावर यानें ' कन्दर्पचूडामणि ' हा ग्रंथ लिहिला (स. १५७७). त्याचप्रमाणें याचा ' दशकुमारपूर्वकथासार ' हा दुसरा ग्रंथ होय. प्रद्योतन पद्मनाभमिश्र हा प्रसिद्ध कवि याचे पदरीं होता (Dr. Krishnaswami Aiyangar Commemoration Volume 1936, 50).

वीरभद्रेश्वर चालुक्य—याच्याशीं रुद्रम्मा काकतीय हिनें लग्न लावलें होतें.

वीरभानुदेव गंग—(स. १२५६–१२७५) हा कलिंग येथील पूर्व गंग घराण्यांतील पहिल्या नरसिंहाचा मुलगा. चालुक्य राजकन्या जाकल्ला हिच्याशीं यानें लग्न लाविलें होतें. याच्यानंतर याचा मुलगा नरसिंह २ रा हा गंगाच्या गादीवर आला.

२. (स. १३०६–२५) कलिंगच्या गंग घराण्यांतील दुसऱ्या नरसिंहाचा मुलगा. याच्या बायकोचें नांव लक्ष्मी. याचा मुलगा तिसरा नरसिंह याच्यानंतर गादीवर आला.

३. (स. १३५०–१३७८) कलिंगच्या गंग घराण्यांतील तिसऱ्या नरसिंहाचा मुलगा. याला तारा आणि हिरा या नांवांच्या दोन बायका होत्या. याच्यानंतर याचा मुलगा चौथा नरसिंह गादीवर आला.

४. (स. १३९७–१४३० सुमार) कलिंगच्या गंग घराण्यांतील चौथ्या नरसिंहाचा मुलगा. हा या घराण्यांतील शेवटचा राजा होय. याचा प्रधान कपिलेंद्र हा एका धनगराचा मुलगा. तो चढतां चढतां शेवटीं याचा प्रधान झाला. आणि पुढें याचें राज्य घेऊन त्यानें ओरिसा आणि कलिंग या देशांत गजपति घराण्याची स्थापना केली.

वीरभानु वाघेल—(रामचंद्र वाघेल पाहा).

वीर राजेन्द्र चोल—(स. १०६३-७०) हा चोल घराण्यांतील राजमहेन्द्राचा चुलता होय. हा त्याच्यानंतर गादीवर आला. याला पहिल्या सोमेश्वर पश्चिम चालुक्याशीं एकंदर पांचदां लढावें लागलें. प्रथम यानें त्याच्यापासून गंगवाडी प्रांत (सरकार प्रांत) जिंकला. नंतर वेंगीच्या राज्याचा बंदोबस्त करून कृष्णातुंगासंगमावर कुडळसंगम या ठिकाणीं चालुक्याचा मोठा पराभव केला. या वेळीं चालुक्यांच्या मदतीस चोलांचे सर्व बंडखोर मांडलिक आले होते. या लढाईंत यास अपरिमित लूट मिळाली. त्या काळीं हत्तीचा युद्धांत भयंकर उपयोग होई. त्यानंतर यानें उलगे येथें केरळ, पांड्य, गंग व नोळंब या राजांचा पराभव केला, व चालुक्यराजाच्या आह्वानावरून पुनः कुडळसंगम येथें जाऊन त्यांना पळवून लावलें व तथें एक जयस्तंभ उभारला. पुढें यानें पहिल्या सोमेश्वर चालुक्यास त्याच्या भावाविरुद्ध गादीवर बसण्यास मदत करून त्याला आपली मुलगी दिली. बेझवाडा येथें वेंगीदेशच्या सैन्याचा पराभव करून तो देश खालसा केला आणि कलिंगदेशावर स्वारी केली. यानें वेंगीदेश आपला आश्रित व जांवई विक्रमादित्य चालुक्य यास दिला आणि स्वतः राजाधिराज राजराज ही पदवी धारण केली. पुढल्या वर्षी यानें कुडलसंगम येथें पुनः सोमेश्वर चालुक्याचा पराभव करून करडक्किळ येथें जयस्तंभ उभारला, व कांपलीशहर जाळलें (स.१०६८). ब्रह्मदेशचा दक्षिणभाग (तलैंग नांवाचा) खालसा करून दर्यावर मोठा जय मिळविला (स.१०६९). लष्करी कामाप्रमाणें मुलकी कामांतहि हा मोठा प्रवीण होता. हा अखेरीस स. १०७० मध्यें मेला. याच्या मागें याचा पुत्र अधिराजराजेन्द्र हा गादीवर आला. यानें दुसऱ्या सोमेश्वर चालुक्यास पदच्युत केलें.

वीरविजय संगम—(स. १४२२–२३) हा विजयनगर घराण्यांतील पहिल्या देवरायाचा पुत्र होय. हा बुक्क ३ रा असेंहि आपणास म्हणवीत असे. याच्या बायकोचें नांव नारायणी असें होतें. यानें कांहीं महिने राज्य केलें.

वीरश्री—जतवर्मची पत्नी व कर्ण कलचुरीची कन्या.

वीरसिंह (पूर्व) गंग—(स. ७००) कलिंग नगर येथील पूर्व गंग घराण्याचा हा संस्थापक होय.

हा कोलाहल येथील अनंतवर्मन्चा वंशज होता असें म्हणतात. याला कामार्णव, दानार्णव, गुणार्णव १ ला, मारसिंह आणि वज्रहस्त १ ला असे एकंदर पांच मुलगे होते (B.).

२. (बिल्हण पाहा).

वीरसेन आभीर—(आभीर पाहा).

वीसलदेव वाघेल—(स. १२४३–६१) धोलक्याचा राणा वीरधवलाचा हा तिसरा पुत्र. याला विश्वमल्ल किंवा विश्वल असेंहि म्हणतात. गुजराथचें राज्य घेतल्यानंतर हा मेवाड व माळवा येथील राजा लढला. या वेळीं मेवाडचा राजा जैत्रसिंह किंवा त्याचा पुत्र तेजसिंह असावा. तसेंच माळव्याचा राजा जयतुगिदेव परमार किंवा दुसरा जयवर्मा असावा. माळव्याच्या राजाशीं झालेल्या लढाईवर गणपति व्यासानें ' धाराध्वंस ' नांवाचें

काव्य लिहिलें आहे. वि. सं. १३००-१८ (स. १२४३ १२६१) पर्यंत यानें गुजराथवर राज्य केलें. याच्यानंतर याचा थोरला भाऊ प्रतापमल्ल याचा पुत्र अर्जुनदेव हा गुजराथचा राजा झाला. हा वाघेलवंशांतील पहिला राजा होय.

वृत्तविलास--(स. ११६०) यानें अमितगतीच्या संस्कृत काव्याचें 'धर्मपरीक्षे' नांवानें कानडी रूपांतर केलें आहे.

वृषसेन मौर्य—(ख्रि.पू.२०७ सुमार) हा मौर्यवंशापैकीं संप्रतीचा पुत्र व शालिशूकाचा भाऊ. हा अफगाणिस्थान, कंदाहार व हिरात या भागांचा सुभेदार होता. पण पाटलिपुत्र येथें गृहकलह सुरू झाल्यानें हा वरील प्रांतांचा राजा होऊन स्वतंत्र झाला होता. याच्या वेळीं अँटियोकस दि ग्रेट याची स्वारी झाली. यानें थोड्या युद्धानंतर त्याच्याशीं तह केला. ग्रीक लेखकांनीं याला सोफागसेनस असें म्हटलें आहे. सुभागसेन असेंहि म्हटलेलें आढळतें. तारानाथाच्या मताप्रमाणें हा वृषसेन किंवा सुभागसेन हा गांधारचा राजा होता (राप्सन-केंब्रिज हिस्टरी, पा. ५१२). तिबेटांतील बौद्धग्रंथांत संप्रतीचा उत्तराधिकारी म्हणून याचेंच नांव लिहिलें आहे.

वृंद—(जन्म स. १६९५) हिंदी कवि. हा गौड ब्राह्मण. औरंगजेबाकडून अजीमुश्शानकडे गेला. याचे ग्रंथ-वृंदविनोदसत्सई, भावपंचाशिका. याचे वंशज जयपूरकडे आहेत.

वेदाजी किंवा वेदो भास्कर—(स. १६६० सुमार) हा अरणीचा महालकरी होय. हा महाल उत्तर अर्काटांत (कर्नाटकांत) आहे. वेदाजीच्या देखरेखीखालीं अरणी व वेणीदुर्ग हे दोन कोट असत. या महालाची पहिली सनद वेदाजी भास्करानें विजापूर दरबाराकडून शहाजीला पकडण्याच्या बाबतींत कामगिरी बजावून मिळविली; आणि पुढें कर्नाटकची जहागीर शहाजीकडे येतांच तो शहाजीसच मुख्य समजून त्यांस खंड-कमाविशी देऊं लागला.

यास श्रीनिवासराव, सुभाराव, कोनेराव, वगैरे आठ पुत्र होते (चि. २८९). परंतु कोनेरावानेंच पुढें आपल्या बापाचा कारभार चालविला.

(बाबा) वेणीमाधवदास—(स. १६२२ सुमार) यानें तुळशीदासचरित्र लिहिलें तें ऐतिहासिकदृष्ट्या जुळतें.

वेणीराम पंडित—(स.१८००सुमार) नागपूरच्या मुधोजी भोसल्याचा कलकत्त्यास इंग्रजांकडील वकील. याचा भाऊ विश्वंभर (चेतसिंग पाहा). यानें चेतसिंगच्या येथें हेस्टिंग्जला वांचविलें.

वेणूबाई--(स. १६२६-१६७८) ही समर्थ रामदासस्वामींची एक शिष्या होती. 'निवृत्तिराम' ग्रंथ मराठींत हिनें केला आहे. ही मिरज येथील देशपांड्यांची कन्या होय. लग्न लागलें त्याच दिवशीं नवरा मरून ही विधवा झाली. पुढें ही लवकरच समर्थांची शिष्या झाली व हिनें उरलेलें आयुष्य रामभजनांत व अध्यात्ममार्गांत घालविलें. शके १५७७ मध्यें हिनें मिरज येथें मठ स्थापन केला. हिचें शके १६०० च्या चैत्र वद्य १४ स सज्जनगडास देहावसान झालें. कौल, सीतास्वयंवर यांसारखे हिचे ग्रंथ उपलब्ध आहेत.

२. व्यंकटराव घोरपड्याची कन्या व त्रिंबकराव पेठ्याची पत्नी.

वेदप्रबोध--एक मोठा विद्वान्. कुमारपाल राजास जैनधर्मांतून पुनः वैदिक धर्मांत यानेंच आणलें. यास भट्टाचार्य असेंहि म्हणत.

वेदशेखर—दक्षिण हिंदुस्थानांतील एक राजा. अव्हेअरचा भाऊ जो तेव्वेल्लूवर त्याच्या वेळीं हा होता (कविचरित्र).

वेदांतदेशिक—(स. १२६९-१३७१) विशिष्टाद्वैतपंथाचा किडाम्बी अप्पूक्करचा शिष्य. जन्मस्थान तिरुवेल्लीपुर. यानें विशिष्टाद्वैतमतावर शंभरांपेक्षां जास्त ग्रंथ लिहिले. याचें विद्यारण्यास साहाय्य असे.

वेलस्ली (रिचर्ड कॉली, मार्किस)—(स. १७६०-१८४२) हा गॅरेटचा वडील मुलगा. हा हिंदुस्थानचा गव्हर्नर जनरल होता (स. १७९८-१८०५). हिंदुस्थानांत इंग्रजी साम्राज्याचा विस्तार क्लाइव्ह, हेस्टिंग्स व वेलस्ली यांच्यामुळें झाला.

हिंदुस्थानांत फ्रेंचांचा इंग्रजांनीं पाडाव केला तरी इंग्रजांचीहि स्थिति चांगली नव्हती. शिंदे, निजाम व टिपू यांच्याकडे फ्रेंच सैन्य पुष्कळ असून नेपोलियननें टिपूला मदत देण्याचें आश्वासन दिलें होतें. तेव्हां यानें पैशाच्या अभावीं तैनाती फौजेची पद्धत स्वीकारून राजेरजवाड्यांना ताब्यांत आणलें. हा नेपोलियनचा कट्टा द्वेष्टा होता. . नेपोलियननें टिपूला पत्र लिहून आम्ही तुमचे मदतीस निघालों आहों, असें इजिप्तच्यापुढें येऊन लिहिलें. तेव्हां यानें एकदम उठाव करून टिपूला ठार केलें (ता. ४-५-१७९९). नंतर यानें निजाम, गायकवाड, पेशवा, शिंदे, भोसले (असई-आडगांव तह), अर्काटचा

नबाब, तंजावरचा राजा, अयोध्येचा वजीर वगैरेंस ताब्यांत आणून नंतर हा पेशव्याला नष्ट करण्याच्या मार्गास लागला. हा मराठ्यांच्या भानगडींत पडला म्हणून यास ठपका देण्यांत आला, तेव्हां यानें राजीनामा पाठविला, पण पुढें कर्ज केल्याबद्दल यास परत बोलाविलें (स. १८०५). या वेळीं नेपोलियनच्या धुमाकुळामुळें इंग्लंड अगदीं चिंताग्रस्त होतें. अशा स्थितींत यानें हिंदुस्थानांत उत्पन्न केलेली परिस्थिति सर्वांना अवेळीं वाटली. म्हणून याला परत बोलावून हिंदुस्थानांत शांतता उत्पन्न करण्याकरितां कॉर्नवालीसला पाठविण्यांत आलें. पण इंग्लंडचा विजय झाल्यानंतर पुढें याच्या धोरणाचा गौरव करण्यांत येऊन यास बक्षीस देण्यांत आलें.

२. (आर्थर वेलिंग्टन)—(स. १७६९–१८५२) हा गॅरेट वेलस्लीचा चवथा मुलगा. हा सैन्यांत शिरल्यावर (स. १७८७) हिंदुस्थानांत आला (स. १७९७ फेब्रु.). याचा थोरला भाऊ वेलस्ली रिचर्ड कॉली मार्क्विस हा याच्यानंतर एक वर्षानें गव्हर्नर जनरल म्हणून हिंदुस्थानांत आला.

टिपूचा नाश केल्यावर यानें धोंडजी वाघाला ठार केलें (स. १८००). पुढें वसईचा तह झाला. तो पसंत नसल्यानें शिंदे-भोसले इंग्रजांविरुद्ध उठले. त्यांचा आसई (स. १८०३) येथें पराभव करून त्यांना यानें पेशव्यापासून फोडलें. बाजीराव पेशव्यासंबंधीं याचें अगदीं वाईट मत होतें. अमृतराव पेशवा लायक मनुष्य आहे असें हा मानी. होळकराच्या हल्ल्यापासून पेशवाईचा बचाव यानेंच केला. पुढें हा इंग्लंडमध्यें गेल्यावर (स. १८०५) नेपोलियनशीं युद्ध करण्यास यास पाठविण्यांत आलें. स. १८१४ ला हा पॅरिसमध्यें इंग्रजांचा वकील होता. वाटर्लूच्या लढाईंत हाच मुख्य सेनापति होता. नेपोलियनसारख्यावर जय मिळविल्यानें याचा मान फार वाढला. पुढें हा पार्लमेंटमध्यें शिरून मुख्य प्रधान झाला (स. १८२८–३०).

३. (हेन्री)—(स. १७७३–१८४७) हा गॅरेटचा सर्वांत धाकटा मुलगा. हा रिचर्डचा धाकटा भाऊ. हा आपल्या भावाचा कारभारी म्हणून काम करी. स. १८०० मध्यें इंग्लंडला गेला.

वेसुगि यादव—(स. १००० सुमार) हा दुसऱ्या भिल्लमानंतर गादीवर आला.

२. (स. १०५० सुमार) हा दुसऱ्या वादुगीनंतर गादीवर आला.

वैकय्या—(स. १५६१ सुमार) यानें 'नरपतिविजय' नामक काव्य रचिलें आहे. यांत कृष्णरायाचा जांवई रामराजा-जो तालिकोटच्या लढाईंत मेला-त्याचें पूर्वचरित्र आहे.

वैज—हा बेट त्रिभुवनमल्लाचा प्रधान होता. यानें पश्चिम चालुक्यांच्या मर्जीनें दिवस घालविले.

वैदुंब शांडयन तिरुवयन—हा कृष्ण (तिसरा) राष्ट्रकूटाचा मांडलिक होता.

वैदुंब श्रीविक्रमादित्य—हा राष्ट्रकूट कृष्ण तिसऱ्याचा मांडलिक होता.

वैद्यनाथ पायगुंडे—(स. १७०० नंतर) एक संस्कृत धर्मशास्त्रकार. हा बाळंभट्ट किंवा बाळकृष्णाचा पिता, व नागोजी भट्टाचा शिष्य. याचा पिता रामभट्ट. याचे ग्रंथः—चातुर्मास्यप्रयोग, वेदांतकल्पतरुमंजरी, शास्त्रदीपिका व्याख्या प्रभा. उदाहरण चंद्रिकाकार भिन्न असावा. याची पत्नी लक्ष्मी.

वैरट गुहिलोत—(स. १०६८–८८) हा मेवाडच्या गादीवर योगराजानंतर आला. यानें योगराजाकडून मेवाडचें राज्य घेतलें. हा अल्लटापासून उत्पन्न झालेल्या एका शाखेपैकीं होता, असें कुंभळगडच्या अप्रकाशित लेखावरून समजतें.

वैराजी सारंगी (दर्यासारंग)—हा एक शिवाजीचा आरमारी सेनापति होता. हा सुरतेवर निघाला होता (प. सा. १३५८, स. १६७० नवं. २१).

वैरिसिंह गुहिलोत—(स. ११०३–७) हा हंसपालानंतर मेवाडच्या गादीवर आला. याची अल्हणदेवी नांवाची मुलगी गयकर्णदेव कलचुरीची पत्नी होती. तिनें बांधलेल्या शिवमंदिरावरील लेखावरून याचीहि माहिती मिळते. तो लेख कलचुरि संवत् ९०७ (स. ११५५) मधील आहे. भेराघाटच्या लेखावरून हा अनेक सामंतांचा अधिपति आणि शत्रूंना डोंगरांत पळून लावणार होता असें कळतें (एपि. इंडि. भा. २, पृ. ११-१२). यानें आहाड (आघाट) नगराला तट बांधला. याला बावीस पुत्र होते (कुंभलगडचा अप्रकाशित लेख).

याच्यानंतर याचा पुत्र विजयसिंह गादीवर आला.

वैरिसिंह परमार—हा माळव्याच्या परमारांपैकी वाक्पतिराजाचा पुत्र. याला वज्रटस्वामी असेंहि म्हणत. हा शूर होता.

२. माळव्याच्या परमारांपैकीं कृष्णराजाचा पुत्र.

वैरोचन वज्र—चौऱ्यांशीं सिद्धांपैकीं एक. यानें वीर वैरोचनगीतिका नांवाचा ग्रंथ लिहिला.

वैष्णवाचार्य—(रामभद्र दीक्षित पाहा).

व्यंकट नरसी—शेवटल्या बाजीरावाच्या वेळची सुप्रसिद्ध नर्तकी. बाजीरावानें तीन दिवस हिचा अहोरात्र नाच करवून हिला सव्वीस हजार रुपये बक्षिस दिले. हिचें पहिलें नांव नरसी. विश्वगुणादर्शचम्पू काव्याचा कर्ता व्यंकटाध्वरि यानें हिच्या नाचांत कांहीं दोष काढून ते स्वतः हिला समजावून दिले. तेव्हांपासून ही त्याची शिष्या बनली. आणि त्याचें नांव हिनें आपल्या नांवापुढें जोडलें, अशी आख्यायिका भारतवर्ष खंड ३ जुन्या ऐतिहासिक गोष्टी पृ. २० वर दिली आहे. पण ती कालदृष्ट्या चुकीची दिसते. एक रामानुज नांवाचा पंडित डोक्याला सोन्याचा मुगुट घालून महाभाष्यखंडनकर्ता म्हणून रामशास्त्री प्रभुणे यांच्या वेळीं पुण्यांत मिरवत असे. शेवटीं वादविवादांत त्यानें अनंतभट्ट नांवाच्या प्रतिस्पर्ध्यावर अभिचार केला म्हणून रामशास्त्रीनें त्यावर बहिष्कार घातला तो कदाचित् वरील असावा.

व्यंकटनाथ—हा रामानुजाच्या विशिष्टाद्वैत मताचा असून यानें त्या मताला अनुसरून गीतेवर तात्पर्यचंद्रिका नांवाची टीका लिहिली आहे. ही टीका गीतेवरील रामानुजभाष्याचें विवरण करणारी आहे. गुजराथी प्रिं. प्रेसच्या गीताटीकांत ही दुसऱ्या आवृत्तींत छापली आहे.

२. हा शंकराचार्यांच्या अद्वैतमताचा असून यानें गीतेवर ब्रह्मानंदगिर्याख्यव्याख्यान नांवाची टीका लिहिली आहे. पण केवळ शांकरभाष्याचा विस्तार यांत नसून स्वतंत्रपणें पुष्कळ विवेचन केलें आहे. शिवाय अद्वैतमताचें समर्थन करतांना रामानुज व माध्व यांच्यावर बरीच कडक टीका केली आहे. तसेंच शांकराभाष्याला सोडूनहि स्वतंत्रपणें शब्दार्थ व विवेचन केलेलें आढळतें. गुजराथी प्रिं. प्रे. च्या गीताटीकांत दुसऱ्या आवृत्तींत ही टीका छापली आहे.

व्यंकटपति आरविदु—(स. १५८६-१६१४) विजयनगरच्या राजघराण्यापैकीं तालिकोट युद्धानंतरच्या पहिल्या श्रीरंगरायानंतरचा राजा. याच्यानंतर दुसरा श्रीरंग गादीवर आला. हा तिरुमल्ल आरविदूचा पुत्र. राज्यावर येण्यापूर्वी हा तामीळचा सुमेदार होता. याला राज्याभिषेक चंद्रगिरीस झाला. नंतर यानें आपली राजधानी पेनुकोंडा येथें नेली. यानें सदाशिवरायाचा खून केला अशी समजूत असल्यामुळें याच्याविरुद्ध लोकमत होतें. विजापूरकराच्या स्वारीमुळें यानें राजधानी चंद्रगिरीस नेली (स. १५९२). पुढें वेलोरच्या नायकाचें बंड मोडून वेलोरलाहि यानें राजधानीचें स्वरूप दिलें (स. १६०६).

हा व्यंकटेशाचा भक्त होता. याचा गुरु तातार्चार्य. यानें गोवळकोंड्याच्या मुहम्मदकुली कुत्बशाहाचा आणि दुसऱ्या इब्राहीम आदिलशहाचा पराभव केला.

याच्या कारकीर्दीत पोर्तुगीजांचा व इतर युरोपियनांचा संबंध विशेष आला. यानें त्यांना व विशेषतः पोर्तुगीजांना स्थिर होण्यास मदत केली. यानें दरबारांत कांहीं युरोपियन चित्रकार ठेवले होते.

याला ओबांबा, वेंकटाम्बा, रघवांबा वगैरे सहा बायका होत्या. तरी याला एकहि मुलगा नव्हता. यानें आपला भाऊ राम याचा मुलगा जवळ ठेवून त्याला चिक्कराय युवराज अशी पदवी दिली. पण याचा सासरा ओबराज व मेहुणा जगराय यांनीं त्याच्यासुद्धां सर्व घराण्याचा खून केला. पण याचमा नायकानें तिसऱ्या श्रीरंगाला वांचवून कसाबसा राजघराण्याचा बचाव केला (श्रीरंग पाहा).

याच्यानंतर याच्या राम नांवाच्या भावाचा मुलगा श्रीरंग हा गादीवर आला. हा स. १६१४ च्या आक्टोबर महिन्यांत मरण पावला. हा एक थोर राजा होता.

अप्पय्य दीक्षितानें कुवलयानंद व लक्षणरत्नावली हे दोन ग्रंथ याच्या आज्ञेवरून लिहिले.

हा शरिरानें सडपातळ, सुंदर डोळ्याचा व मोठा रूपवान् होता. याचा एक पुतळा तिरुपति येथें आहे.

साम्राज्यदृष्टीनें हा विजयनगरचा शेवटचा सम्राट् होय. यानें स. १६१२ मध्यें सम्राट् म्हणून राजा ओडेयरच्या म्हैसूर राज्याच्या स्वातंत्र्यास अनुमति दिली. तें राज्य अद्यापि परंपरा चालवीत आहे. पण याचेनंतर सरदार स्वतंत्र होऊं लागले.

२. (स. १६३३-४५ सुमार) हा विजयनगरच्या दुसऱ्या रामानंतरचा राजा. याला पेद्द व्यंकट म्हणत. याची पत्नी बंगारा.

३. (स. १६७८-९०) हा विजयनगरपैकीं तिसऱ्या श्रीरंग तुलुवानंतरचा राजा (लिंगय्या नायक पाहा).

४. (स. १७०७-१६) हा विजयनगरच्या चवथ्या श्रीरंगानंतरचा राजा.

व्यंकटपति रायसम—(स. १५८० सुमार) विजयनगरच्या पहिल्या श्रीरंग आरविदूचा राजकवि. यानें 'लक्ष्मीविलासम्' नांवाचें काव्य तेलगूंत लिहिलें.

व्यंकटप्पा नायडू—(स. १५८१) हा विजयनगरच्या श्रीरंग आरविदूचा सेनापति. हा ओबालानंतर सेनापति झाला. यानेंच तेलगींत वीररसप्रधान 'चित्रांगदचरित्र' लिहिलें असावें.

व्यंकट (राय) तुलुव—(खून स. १५०२)

याचें नांव व्यंकटाद्रि किंवा चिन्न व्यंकटाद्रि असून इतिहासामध्यें हा पहिला व्यंकट या नांवानें संबोधिला जातो. हा अच्युतरायाचा पुत्र. याच्या मातेचें नांव वरदादेवी अमाल किंवा वरदंबिका.

हा गादीवर आला तेव्हां अल्पवयी होता म्हणून याचा सर्व कारभार याच्या आतेचा नवरा सलाकम तिम्मराजू हा मुखत्यारीनें पाहूं लागला. पण त्याला रामराय व तिरुमल्ल आरविदु हे प्रतिस्पर्धी होते. ते अनेक दृष्टींनीं योग्य होते तरी त्यांना हा कैद करील म्हणून पळून जावें लागलें व गादीवर बसल्यापासून सहा महिन्यांच्या आंत याचा खून झाला. यानंतर थोडक्याच कालांत रामरायानें सदाशिवरायाला गादीवर बसविलें.

व्यंकटमाधव—(स. १०५०-११५० सुमार) याचें ऋग्वेदावर भाष्य होतें असें देवराजयज्वन्च्या निघण्टुभाष्यावरून दिसतें. डॉ. सरूप, डॉ. राज हे याला दहाव्या शतकाच्या सुमारास समजत असले तरी पं. भगवद्दत्ताच्या मतानें हा बाराव्या शतकांतील किंवा तत्पूर्वीचा आहे. पं. साम्बशिवशास्त्रींनें निघण्टुभाष्याच्या प्रस्तावनेंत स. १०५०-११५० हा याचा काळ मानला आहे. यानें निर्दिष्ट केलेले आपले समकालीन व नातेवाईक खालीलप्रमाणें होत. प्रत्येक अध्यायाच्या शेवटीं असणाऱ्या श्लोकावरून असें दिसतें.

पितामह—माधव
पिता—वेङ्कटार्य हा ऋग्वेदी होता.
मातामह—भवगोल आश्वलायन असावा.
माता—सुन्दरी
स्वगोत्र—कौशिक
मातृगोत्र—वासिष्ठ
अनुज—सङ्कर्षण
पुत्र—वेङ्कट अथवा गोविंद
निवास—दक्षिणापथांतील चोलदेश. कावेरीच्या दक्षिणतीरावरील गोमान् गांव.
समकालीन राजा—एकवीर.

व्यंकटराव काशी—(स. १७७३-७५) नागपूरकर भोसल्यांचा वकील. जात प्रभु. मुधोजीनें यास रघूजीकरितां सेनासाहेब सुभ्याचीं वस्त्रें आणण्याकरितां पुण्यास पाठविलें असतां हा नारायणरावाच्या खुनाच्या कटांत सामील झाला म्हणून कैद झाला. पण दादाचा पक्ष सोडण्याबद्दल करारपत्र घेऊन बारभाईंनीं यास सोडलें.

व्यंकटराव घोरपडे—(मृत्यु स. १७४५) हा इचलकरंजीच्या नारोपंताचा मुलगा व बाळाजी विश्वनाथ पेशव्याच्या अनूबाई नांवाच्या मुलीचा नवरा. कोल्हापूरचें सचीवपद याच्या वडिलांकडे होतें तें यांस मिळालें नाहीं म्हणून हा शाहूस मिळाला. शाहू-संभाजीचा तह झाल्यावर यास कोल्हापूर राज्यांत शाहूनें जहागीर देवविली. यानें गोव्यावर स्वारी करून पोर्तुगीजांना पराभूत केलें (स. १७३९). पुढें यानें इचलकरंजीस तट बांधला. याला पेशव्यांचा आधार असल्यानें हा शाहूशीं उद्धटपणें वागे. याची मुलगी वेणूबाई त्रिंबकराव पेठ्यास दिली होती. याचा मुलगा नारायणराव. साताऱ्यास याच्या नांवाचा व्यंकटपुरा प्रसिद्ध आहे.

२. (मृत्यु स. १७९५) हा नारायणरावाचा मुलगा. हा शूर असून यानें हरिपंत फडक्यांना गुजराथच्या स्वारींत मदत केली. पण हा व्यसनी असल्यामुळें कर्जबाजारी असे. याच्या मृत्यूनंतर याची पत्नी रमाबाईनें नारायणराव बाळासाहेब यास दत्तक घेतलें.

व्यंकटराव पिंगळे—(स. १८०७-१०) निजामाकडील पेशव्यांचा वकील. याचा पिता गोविंदराव. याच्यानंतर याचा भाऊ शामराव वकिलीचें काम पाहूं लागला.

व्यंकटराव भावे—(स. १७९१) हा रामदुर्ग संस्थानच्या भास्करराव्याचा दत्तक पुत्र. पेशव्यांनीं यास टिपूच्या कैदेतून सोडविलें व सरंजाम दिला.

व्यंकटाद्रि आरविदु—(स. १५६५) हा विजयनगरच्या रामराय आरविदूचा धाकटा भाऊ. तालिकोटच्या लढाईत व सलाकमच्या विरुद्ध यानें रामरायास फार मदत केली. पण सदाशिवरायाला कैदेंत ठेवणें, तिरुमल्लानें राजा होणें वगैरे याला पसंत नव्हतें, त्यामुळें यानें बंड केलें. पण त्याचा उपयोग झाला नाहीं. याला कृष्णम्मा व रंगम्मा अशा दोन बायका आणि रंगप्पा व राम अशीं दोन मुलें होतीं. तालीकोटच्या लढाईनंतर हा लवकरच मेला असावा.

व्यंकटाध्वरी—(ग्रंथकाल स. १६३०-४०) हा एक वैष्णव कवि होता. हा कांची-मंडलामध्यें फार प्रख्यात विद्वान् होता. त्यानें वाजपेयादिक मोठाले यज्ञ केले.

व्यंकटाध्वरी हा लक्ष्मीचा उपासक होता. त्यानें नीति, अन्योक्ति, राजवर्णन इत्यादि विषयांवर बरेच काव्यग्रंथ केले आहेत. त्यांत याचे पुढील ग्रंथ फार प्रसिद्ध आहेत. ते 'विश्वगुणादर्शचंपू', 'लक्ष्मीसहस्र', 'हस्तिगिरिचंपू', व 'उत्तररामचंपू' हे होत. या ग्रंथांत उत्प्रेक्षा, श्लेष, शब्दसौंदर्य आणि प्रास इत्यादि उत्तम काव्याचे गुण विशेष आढळतात. विश्वगुणादर्शांत दोन गंधर्वांचा संवाद असून ते विमानांत बसून फिरत एक गुण व दुसरा दोष वर्णन करितो.

याच्या काव्यांत मद्रासमधील ब्रिटिश वसाहतींतील लोकांचा निर्देश आला आहे (व्यंकट नरसी पाहा).

याच्या पित्याचें नांव रघुनाथ व आजोबाचें नांव अप्पय होय. यांचें गोत्र अत्रि दिसतें. कारण यानें आपणास आत्रेय म्हणवून घेतलें आहे. हा 'नीलकंठचंपू' (स. १६३६) करणाऱ्या नीलकंठाचा सहचर होता.

व्यंकटेश—याच्या तैत्तिरीयसंहिताभाष्याची प्रत बोलपुर येथें शान्तिनिकेतनांत आहे. तीं ग्रंथाक्षरांत आहे. त्यांत तीन शेवटलीं कांडें आहेत. याच्या भाष्याचें नांव 'वेदभाष्यसंग्रहसार' असें आहे. सायणाप्रमाणें सूत्रादिकांचा निर्देश यानें केला नाहीं. रुद्रभाष्यकार वेङ्कटनाथ व हा एक असण्याचा संभव आहे.

व्यंकोजी ऊर्फ मन्याबापू भोसले—(मृत्यु स. १८११ आगस्ट) हा नागपूरच्या मुधोजी भोसल्याचा तिसरा मुलगा. हा बदामीचे स्वारींत हजर होता (स. १७८६). याजकडे तेथें दिवाणाचा हुद्दा होता. मुधोजीनंतर चंद्रपूरचा व खंडोजीच्या मृत्यूनंतर छत्तीसगडचा सुभा यास मिळाला. हा इंग्रजांविरुद्ध वागतो म्हणून यास रघूजीनें कैदेंत ठेवलें होतें. याच्याकडे 'सेनाधुरंधर' हें पद होतें. मुलगा आप्पासाहेब हा गयावर्जन करून आल्यावर काशीस मेला.

व्यंकोबाशास्त्री—(स. १७९०) नागपूरच्या दुसऱ्या रघूजीनें चिन्नूर येथें याचेकडून सोमयाग करवला (ना. प्रां. इ. पृ. ३०८; बाबासाहेब भोसले पाहा).

व्यंगलम्बा—ही विजयनगरच्या तिरुमल्ल आरविडूची पत्नी. हिच्या बापाचें नांव कृष्णराय आणि आईचें नांव चिन्नादेवी असून ही सदाशिवरायाची बहीण होती.

व्याघ्रराज—(स. ३८०) अमरकंटकाजवळच्या मेखल देशांत हा राज्य करीत होता. अश्वमेधाच्या वेळीं समुद्रगुप्तानें याचा पराभव केला. पण त्यानें याचें राज्य यास परत देऊन मांडलिक केलें.

व्यासजी—(स. १५६३ सुमार) हिंदी कवि. सनाढ्य ब्राह्मण. हरिराम व्यास असें नांव. वैष्णव. हितहरिवंशजीचा शिष्य. याचा ग्रंथ रासपंचाध्यायी.

व्यासतीर्थ—(समाधि स. १५३३) हा मध्वाचार्याच्या शिष्यपरंपरेंतील होता.

पक्षधरमिश्र व हे यांचा वाद झाला. साळुव नरसिंह व कृष्णदेवराय तुलुव यांच्या दरबारीं हा राजगुरु होता.

श

शकमित्र—मथुरेचा एक क्षत्रप राजा. याचा पुत्र मेदक.

शकरखान—गुजराथच्या पहिल्या अहमदचा हा दुसरा मुलगा.

याला मुहम्मद १ ला या नांवाचा एक भाऊ असून तो गादीवर आला होता. निझामखान नांवाचा याचा एक पुत्र होता.

शक्तिकुमार गुहिलोत—(स. ९७७-९३) मेवाडचा शालिवाहनानंतरचा राजा. हा राजा प्रभु, मंत्र व उत्साह या तीनहि शक्तींनीं युक्त होता. तसेंच याची राजधानी आटपुर (आहाड) वैभवसंपन्न होती. नरवाहनराजाचा अक्षपटलिक श्रीपति होता. त्याचे दोन पुत्र मत्तट व गुंदल हे याच्या दोन हातांसारखे होते (इंडि. अँटि. ३९. १९१); आहाडच्या वि. सं. १०३४ (स. ९७७) वैशाख शुद्ध १ ल्या अप्रसिद्ध शिलालेखांत याला पुष्टि व थोडी अधिक माहितीहि मिळते. माळव्याच्या मुंजानें आहाडवर स्वारी केली व आहाड लुटलें. त्या वेळीं हर्थुंडीच्या धवळ राठोडानें मेवाडच्या राजाला साहाय्य केलें होतें. त्या वेळीं हाच मेवाडचा राजा असावा. त्या वेळीं मुंजानें मेवाडराज्यांतील चितोड व त्याच्या आसपासचा प्रदेशहि जिंकलेला दिसतो. कारण मुंजानंतर माळव्याचा राजा सिंधुराज(नवसासांक)चा पुत्र भोज चितोड येथें राहत असे व तेथें त्यानें 'त्रिभुवन नारायण' नांवाचें शिवमंदिर बांधलें. तें तेथें अद्यापि असून त्याला सध्यां 'मोकलजी' असें म्हणतात. पुढें माळव्याचा परमार राजा नरवर्मा याचा पराजय करून सिद्धराज जयसिंहानें मेवाडचा चितोड वगैरे भाग आपल्याकडे घेतला. पुढें कुमारपालानंतर पुनः चितोड मेवाडच्या राजाकडे आला. याच्या

वेळचे तीन शिलालेख मिळाले आहेत. एक वि. सं. १०३४ (स. ९७७) वैशाख शुद्ध १ चा आटपुर(आहाड)चा कर्नल टॉडला मिळाला. त्यांत गुहदत्त(गुहिल)पासून शक्तिकुमारपर्यंत पुरी वंशावळ मिळते हें त्याचें महत्त्व आहे. दुसरा लेख अल्लट, नरवाहन व शक्तिकुमार यांच्या अक्षपटलाधीशांचें वर्णन करणारा आहे. तिसरा एक संवत्-रहित आहे. याच्या नंतर अंबाप्रसाद गादीवर आला.

शक्तिवर्मा (पश्चिम) चालुक्य—(स. १००३-१५) हा चालुक्यांपैकीं दानार्णवाचा सर्वांत वडील मुलगा होता. याला चालुक्यचंद्र असें म्हणत. अनुपलब्ध माहितीचीं तीस वर्षें संपल्यावर हा राज्यावर आला.

शक्तिस्वामिन्—(स. ७२६) हा अभिनंद कवीचा पूर्वज काश्मीरच्या मुक्तापीडाच्या अमदानींत होता.

शठकोपमति—(स. १५५० सुमार) अहोबल मठाचा गुरु. 'वासंतिकापरिणय' नाटकाचा कर्ता.

शतधनुष मौर्य—(ख्रि. पू. १९९-९१) मौर्य-वंशांतील देववर्म्याचा पुत्र. याच्या वेळीं पश्चिमोत्तर भारतावर ग्रीकांची सत्ता पूर्णपणें स्थापित झाली होती. डेमेट्रियसनें ख्रि. पू. २०० मध्यें हिंदुस्थानावर स्वारी केली. त्याचें राज्य याच्या वेळीं हिंदुस्थानांत चांगलें विस्तृत असून स्थिर झालें होतें. पतंजलीनें निर्दिष्ट केलेली दात्तामित्रि ही नगरी त्याच्या नांवाची असावी. याच्या वेळींच विदर्भहि स्वतंत्र झाला असावा. कारण पुष्यमित्राच्या वेळीं तो या साम्राज्यांत नव्हता, असें मालविकाग्निमित्रावरून कळतें.

शत्रुघ्न--(स. १५२८-८५) याचा 'मंत्रार्थदीपिका' नांवाचा ग्रंथ आहे. यानें उवटाचें यजुर्वेदभाष्य, गुण-विष्णूचें छंदोगमंत्रभाष्य, हलायुधाचें कल्याणसर्वस्व, गौरधराची वेदविलासिनी हे वेदावरील ग्रंथ पाहून आपलें भाष्य लिहिलें होतें. यानें पूर्वीच्या भाष्यकारांचें भाष्य जरी घेतलें असलें तरी यानें कठीण स्थळें अत्यंत विशद केलीं आहेत. मंत्रार्थदीपिकेंत नित्यकर्म व संस्कार यांतील मंत्र आहेत. हा स. १५२८-८५ त जिवंत होता. याच्या षडङ्गशतरुद्रिय भाष्याचें वर्णन करीत असतां कै. महामहोपाध्याय हरप्रसादशास्त्रीनें हा संपूर्ण यजुर्वेदाचा भाष्यकार होता असा जो तर्क केला आहे तो बरोबर नाहीं. रुद्रभाष्य हा मंत्रार्थदीपिकेचाच एक भाग आहे. याला पंजाबमधील जालंदर येथील धर्मचंद्र राजाचा आश्रय होता.

शबर--उदयन पांड्याचें नामांतर.

शबरस्वामिन्--याबद्दल खालील परंपरागत श्लोक प्रसिद्ध आहेतः—

ब्राह्मण्यामभवत् वराहमिहिरो ज्योतिर्विदामग्रणीः ।
राजा भर्तृहरिश्च विक्रमनृपः क्षत्रात्मजायामभूत् ॥
वैश्यायां हरिचंद्रवैद्यतिलको जातश्च शंकुःकृती ।
शूद्रायाममरः षडेव शबरस्वामिद्विजस्यात्मजाः ॥

हा दीक्षस्वामीचा पुत्र. हा काश्मीरी होता. पूर्व-मीमांसा-भाष्यकार.

शबरिपा--(स. ८०० सुमार) हा चौऱ्यांशी सिद्धांपैकीं पांचवा सिद्ध. याचे ग्रंथ हिंदींत आहेत. या नांवाचे दोन सिद्ध झाले.

शम्सुद्दीन (बंगाल)—(स. १३८३-८६) बंगालचा सुलतान जो सुलतान-उस-सलातीन त्याचा हा मुलगा होय. हा बापानंतर स. १३८३ मध्यें गादीवर आला.

हा दुर्वर्तनी असल्यामुळें याचें राज्य कंस नामक एका हिंदु जमीनदारानें बळकाविलें. हा स. १३८६ सालीं मरण पावला.

२. (शाहामीर पाहा).

३. (स. १५३४-३५) काश्मीरच्या मुसलमानी वंशांतील जो मुहम्मदशहा त्याचा हा दुसरा मुलगा होय.

शम्सुद्दीन अल्तमश गुलाम—(स. १२१०-३६) गुलामवंशांतील दिल्लीचा बादशहा. कुतुबुद्दीन ऐबकचा पुत्र आरामशहा यास पदच्युत करून हा गादीवर आला. याचें मूळचें नांव अल्तमश असें आहे, पण गादीवर बसतांना शम्सुद्दीन असा यानें किताब धारण केला. याला सेनापति असतांना कुतुबुद्दीन ऐबकनें ' अमीरशिकार ' अशी पदवी दिली होती. त्या पदवीचा निर्देश ' हंमीरमदमर्दन ' या नाटकांत मीलच्छीकार या संस्कृत शब्दांत दिसतो. हा मूळ थोर घराण्यांतील असून हुषार, देखणा व बुद्धिमान असल्यामुळें द्वेषबुद्धीनें याच्या भावांनीं याला गुलाम म्हणून विकलें होतें.

परंतु याच्या धन्यानें याला उत्तम शिक्षण देऊन कुतुबुद्दीनला विकलें होतें. हळुहळूं हा कुतुबुद्दीनला इतका प्रिय झाला होता कीं, त्यानें याला आपली मुलगी दिली होती. पुढें यानें बऱ्याच लढाया केल्या. हा स. १२३६ त मरण पावला. यानेंच प्रथमतः अरबी नाणीं हिंदुस्थानांत सुरू केलीं.

शम्सुद्दीन दामघानी--(स. १३७४) फीरुझ तुघ्लकनें यास गुजराथचा सुभेदार नेमलें. यानें वसूल वाढविण्याचा प्रयत्न केला तेव्हां लोकांनीं यास ठार केलें.

शम्सुद्दीन पूर्वी—(मलीक अली मुबारिक पाहा).

शम्सुद्दीन बाहमनी--(स. १३९७ पदच्युत) हा पहिल्या महमूदचा धाकटा पुत्र. पण याचा चुलतभाऊ फीरूजनें यास पदच्युत करून याचे डोळे काढले (मु. रि. भा. १ ला, पृ. ३२०).

शम्सुद्दीन महमूदशाहा—(अहमद पाहा).

शय्यम्भव- (ख्रि. पू ४२९) याचा जन्म वात्स्य-गोत्रांत झाला. शांतिदेवीच्या साक्षात्कारामुळें यानें धर्माची दीक्षा घेतली. याचा मुलगा मनक याकरितां यानें दशवैकालिक सूत्र नांवाचा ग्रंथ रचिला. वयाच्या ६२ व्या वर्षी वीरनिर्वाणाब्द ९८ मध्यें हा मृत्यु पावला.

शरण—हा संस्कृतज्ञ पंडित बंगालच्या राजा लक्ष्मण-सेनाचा आश्रित होता.

शरणदेव—(स. ११७२) हा 'दुर्घटवृत्ति' ग्रंथाचा कर्ता होय. हा व्याकरणांतील कांहीं अवघड स्थलांचें स्पष्टीकरण करणारा ग्रंथ होय.

शरीफजी भोसले--(जन्म स. १५९५) हा शहाजीचा कनिष्ठ बंधु असून शिवाजीचा चुलता होय. याचा जन्म स. १५९५ त घृष्णेश्वर येथें झाला व लग्न स. १६०६ मध्यें दौलताबाद येथें झालें.

शहाजीप्रमाणेंच हा सुद्धां प्रथम निजामशाहींत नोकर होता. पण पुढें हा मोगलांस मिळाला (म. द. रु. १). याच्या ताब्यांत चाकणचौऱ्यांशी हा परगणा होता. पातशाही उमरावांत यांची गणना असे. याच्या वंशाचें वास्तव्य दौलताबाद येथें असे. याचा मुलगा त्रिंबकजी राजे हा होय. त्रिंबकजीचा मुलगा बाबाजी. त्रिंबकजीचा उल्लेख शहाजीनें अली आदिलशहास लिहिलेल्या पत्रांत आहे.

शर्ववर्मन्—कौमार, कालाप किंवा कातंत्र व्याकरणाचा कर्ता, कथासरित्सागरांत जरी शिववर्मा म्हटलें आहे तरी कथामंजरींत यास शर्ववर्माच म्हटलें आहे (शालि-वाहन पाहा).

शर्ववर्मन् मौखरी--(स. ५७३-५७९) मौखरी-वंशांतील ईशानवर्मनचा हा मुलगा होय. हा आपल्या बापानंतर कनौजच्या गादीवर आला. दामोदर-गुप्त याचा समकालीन असून दामोदरगुप्तानें याच्याशी लढाई केली होती. यानें हूणांचा पराभव केला होता. उत्तर हिंदु-स्थानांत हा एक मोठा राजा होऊन गेला. त्या वेळीं याला गुप्त व हूण हे राजे प्रतिस्पर्धी होते. परंतु त्यांचा यानें परा-भव करून त्यांना आपलें वर्चस्व मान्य करावयास लाविलें. याच्यानंतर कनोजच्या गादीवर अवंतिवर्मन् हा आला. परंतु याचें व अवंतिवर्मनचें नातें काय होतें हें मात्र उप-लब्ध नाहीं (मौखरी by E. A. Pires, p.89-94).

शशधर—(स. ११२५ सुमार) यास महामहो-पाध्याय अशी पदवी असून हा मिथिलेचा रहिवाशी होता. हा गंगेशाच्या पूर्वी परंतु उदयनाच्या मागाहून होऊन गेला असावा. कारण उदयनाच्या ग्रंथांतील उतारे यानें घेतले आहेत व त्याचा 'केचित्' असा उल्लेख केला आहे. बंगाली लोकांच्या म्हणण्याप्रमाणें शशधर व मणिधर ह्या दोन तर्कज्ञांच्या व्याप्तीच्या व्याख्येवर गंगेश उपाध्यानें स. च्या १२ व्या शतकांत 'सिंहव्याघ्रोक्तलक्षण' नांवाची टीका लिहिला.

शशांकमुद्रा—ही कल्याणपूरच्या वल्लभाची मुलगी. हिचें बनवासीच्या कदंबघराण्यांपैकीं मयूरवर्म्याशीं लग्न झालें.

शहरबानो—(स.१६७३सुमार) विजापूरचा बादशहा दुसरा अली यास शिकंदर व शहरबानो अशीं अनुक्रमें मुलगा व मुलगी अपत्यें होतीं. खवासखानानें हिला औरंग-जेबाच्या मुलास देऊन औरंगजेबाशीं मैत्री करण्याचा प्रयत्न केला, पण ती गोष्ट अबदुल करीम, बहलोलखान वगैरेंना न आवडून त्याचा खून झाला. तेव्हां औरंगजेबानें हिच्या-करितां विजापूरला वेढा घातला. लोक नाखूष होते, पण संकट टाळण्याकरितां हीच पुरुषवेषानें दिलेरखानाच्या गोटांत गेली, व त्यानेंहि हिला दिल्लीस पाठवून दिलें. विजापूरचा वेढा पुढें शिवाजीमुळें उठला.

शहाअलम—(स. १७०७-१२) (बहादुरशाहा पाहा).

२. (स. १७५९-१८०६) हा दिल्लीच्या मोगल घरा-ण्यांतील दुसऱ्या अलमगीराचा मुलगा होय. याचें मूळ नांव अलीगौहर.

बापाच्या खुनानंतर यानें शहाअलम नांव धारण करून बादशाहीपद स्वीकारलें. परंतु दिल्ली याच्या ताब्यांत नव्हती. हा प्रथम इंग्रजांच्या आश्रयास गेला. स.१७६५ त यानें इंग्रजांस बंगाल, बहार व ओरिसा या प्रांतांच्या दिवाणगिरीची सनद दिली. पण शेवटीं मराठ्यांनीं याला दिल्लीस आणलें (१७७०).

पुढें नजीबखानाचा नातू गुलामकादर यानें याच्या कुटुंबांतील बायकामुलांस लाथांनीं व चाबकांनीं बेदम मारून वृद्ध शहाचे डोळे काढिले (१७८८). अखेर शहानें महादजी शिंद्याची मदत घेऊन गुलामाचा वध करविला. तेव्हांपासून बादशाह व सर्व मोंगली साम्राज्य

मराठ्यांच्या हातीं आलें. हा स. १८०६ मध्यें ८६ वर्षांचा होऊन मरण पावला. हा राजकारणाला नालायक पण सज्जन व पापभीरु होता.

शहा कासम निजाम—(स. १५७० सुमार) हा अहमदनगरच्या हुसेन निजामचा मुलगा.

शहाजहान—(स. १५९३-१६५८) हा पांचवा मोगल बादशाहा होय. शहाबुद्दीन मुहमद किरान ऊर्फ शहाजहान हा जाहांगीर ऊर्फ सेलीमचा जोधपूरच्या राजकन्येपासून झालेला पुत्र होय. नूरजहान व आसफखान यांच्या खटपटीमुळें यास राज्य मिळालें. बाप जिवंत असतां यानें दोनतीन वेळेस अयशस्वी बंडें केलीं होतीं.

स. १६२८ त राज्यावर आल्यावर यानें सर्व आप्तांना ठार केलें. स. १६३७ त शहाजीचा पराभव करून यानें अहमदनगरचा सर्व मुलूख आपल्या ताब्यांत घेतला. युरोपियन लोकांनीं हिंदुस्थानांत न यावें, याकरितां हा विशेष खबरदारी घेई. हा त्यांना धार्मिक बाबतींत हात घालूं देत नसे. हुगळी नदीच्या कांठीं असलेली पोर्तुगीजांची वखार, ते धार्मिक बाबतींत जुलूम करतात म्हणून स. १६३२ त फौज पाठवून यानें लुटली व त्यांची सर्व मालमत्ता जप्त केली. इराणी लोकांपासून यानें कंदाहार घेण्याचा प्रयत्न केला, पण यास यश आलें नाहीं. असफखानाची मुलगी मुम्ताज ही शहाजहानची बायको. तिच्यापासून याला ८ पुत्र व ६ कन्या अशीं १४ अपत्यें झालीं, त्यांपैकीं ८ लहानपणींच मेलीं. या मुम्ताजच्या स्मरणार्थ जगप्रसिद्ध ताजमहाल कबर त्यानें बांधली. वृद्धपणीं वडील पुत्र दारा याच्या हातीं यानें राज्यकारभार दिला होता. पुढें औरंगजेबानें सर्व भावांवर जय मिळवून राज्य मिळविलें. शहाजहाननें ८ वर्षे मुलाचा कारागृहवास भोगिला, व हा त्यांतच स. १६६६ झालीं मृत्यु पावला. त्याची कारकीर्द शांततेची गेली, व मोंगल अमदानीचा भरभराटीचा कळस याच्याच कारकीर्दींत झाला. हा मोठा विलासी व रंगेल असे. याच्यावर याची प्रजा फार संतुष्ट होती. याच्या दरबारचा डामडौल मोठ्या भपक्याचा असे. हा स्वतः राज्यकारभार अगदीं थोडा पाही. पण हाताखालचे कामगार यास उत्तम मिळाल्यानें याची कारकीर्द सुरळीत पार पडली. हल्लींचें दिल्ली शहर यमुनेच्या तीरीं यानेंच वसविलें. याच्या वेळीं तेथील चांदणीचौकांत सर्व पृथ्वींत उत्पन्न झालेल्या जिनसांचा सौदा व हिंदुस्थानांतील एकंदर संपत्तीचा विनिमय चालू असे. जुम्मा-मशीद, मोती मशीद, दिवाणी आम, दिवाणी खास वगैरे यानें बांधलेल्या इमारती प्रेक्षणीय आहेत. यानें दानधर्महि बराच केला.

शहाजी भोसले—(स. १५९५-१६६४) याचा पिता मालोजी व आई उमाई. मालोजीला विठोजी नांवाचा भाऊ होता. त्याला मुलें झालीं तरी मालोजीस मूल नव्हतें. शहाशरीफ नांवाच्या फकीराच्या आशीर्वादानें मालोजीला तीन वर्षांच्या अंतरानें शहाजी व शरीफजी असे दोन मुलगे झाले. मालोजी इंदापूरच्या स्वारीवर गेला असतां तेथें तो लढाईत मरण पावला.

तेव्हां याचें पालनपोषण आई व चुलता विठोजी यांच्याकडे आलें. याचें लग्न १४।१५ व्या वर्षी निजामशाहींतील मोठा सरदार लुखजी जाधव याच्या जिजाबाई नांवाच्या मुलीशीं झालें.

नंतर एकदां दरबाराकरितां आलेले सरदार परत जात असतां खंडागळ्याचा हत्ती बेफाम झाला. त्याला आवरतांना लुखजी जाधवाचा मुलगा दत्ताजी, विठोजी भोसल्याचा पुत्र संभाजीकडून, मारला गेला. त्याचा सूड घेण्याकरितां लुखजी जाधवानें संभाजीस मारलें. यामुळें लुखजीवर निजामशाहाची गैरमर्जी होऊन तो मोगलांच्या आश्रयास गेला (स. १६२१).

पुढें भातवडीच्या युद्धांत मोगल व विजापूरकर यांचा पराभव मलिकंबरानें केला. तेव्हां यानें व विठोजीच्या मुलांनीं चांगलें शौर्य गाजविलें. परंतु त्यांच्यांत भाऊबंदीचे तंटे सुरू झाले आणि मलिकंबर याचा द्वेष करूं लागला. हें ओळखून हा विजापूरच्या इब्राहीम आदिलशाहाकडे गेला (स. १६२५). तेथें यास सरलष्कर हा किताब मिळाला. त्या वेळीं यानें कर्नाटकावर स्वारी केली. इब्राहीम आदिलशाह व मलिकंबर हे मेले, तेव्हां हा पुनः निजामशाहींत आला (स. १६२८). तेव्हां याची खानदेशांत दर्याखानावर रवानगी झाली. तेथून परत आल्यावर निजामशहानें लुखजी जाधवरावास मारविलें. आणि दरबार आपल्याहि विरुद्ध होत आहे असें पाहून हा सैन्यासह संगमनेरावरून पुण्यास आला आणि तेथें आदिलशाही मुलखास याचा उपद्रव पोंचला. तेव्हां मुरार जगदेवाने पुणें जाळून येथील वस्ती उठविली. या सुमारास याचा मुलगा संभाजी याचें लग्न शिवनेरीच्या विजयरावाच्या जयंती नांवाच्या मुलीशीं झालें. आणि गरोदर असणाऱ्या जिजाबाईस शिवनेरी येथें ठेवून हा दर्याखानाशीं लढण्यास गेला. नंतर हा मोगलांचा सरदार अजमखानाकडे गेला. त्यानें यास मनसब देऊन शिवनेरीकडील भाग घेण्यासाठी पाठविलें. तेव्हां यानें बालशिवाजीस प्रथम पाहिलें. नंतर

निजामशाही दरबारचा सूत्रचालक फत्तेखान याशीं मोगलांनीं तह केला आणि याची जहागीर त्याला देऊं केली. तेव्हां यानें मोगलांचा पक्ष सोडून विजापूरकरांच्या साहाय्यानें फत्तेखानाशीं लढण्याचें ठरविलें. फत्तेखानानें निजामशाही मोंगलांच्या ताब्यांत देऊन त्यांचा सरदार होण्याचें ठरविलें. तेव्हां यानें नाशिक, संगमनेर, जुन्नर वगैरे भाग ताब्यांत घेऊन पैमगिरी येथें नवी स्वतंत्र निजामशाही उभारली (स. १६३२). विजापूरकरांतर्फे मुरार जगदेवानें या राज्यास मान्यता दिली. ही निजामशाही तीन वर्षे टिकली. विजापूरला खवासखान व मुरार जगदेव यांचा पक्ष मागें पडून मुस्तफाखान सूत्रचालक झाला, आणि याची निजामशाही जिंकण्याकरितां त्यानें मोगलांना साहाय्य करण्याचें ठरविलें. तेव्हां मोंगल सेनापति खानजमान व आदिलशाही सेनापति रणदुल्लाखान यांनीं याचा पाठलाग करून यास माहुलीच्या किल्ल्यांत कोंडलें. तेव्हां हा निजामशाहास मोंगलांच्या ताब्यांत देण्यास तयार झाला व हा विजापूरकरांचा नोकर बनला. तेव्हांपासून याची योजना कर्नाटकच्या मोहिमांत झाली (स. १६३७).

रणदुल्लानें तीन वर्षे बसवापट्टण हस्तगत करण्यासाठीं जी मोहीम चालविली तिच्यांत हा प्रमुख सरदार होता. यास त्या कामगिरीबद्दल बंगळूरचा किल्ला बक्षीस देण्यांत आला. पुणें परगणा व मावळांतील कांहीं भागहि यास जहागिरीदाखल देण्यांत आला. हा बंगळूरास राही आणि इकडे दादाजी कोंडदेव व्यवस्था पाही. स. १६३९ मध्यें हा इकडे आला होता, व परत जातांना जिजाबाई व शिवाजी यांना बंगळूरास नेलें. नंतर कर्यात मावळामधील गांवांचा पोटमोकासा शिवाजीच्या नांवें करून (स. १६४१) त्याला आईसह इकडे धाडण्यांत आलें.

नंतर यानें कावेरीपट्टणच्या जगद्देवाचा पराभव करण्यांत आणि मदुरा व म्हैसूर येथील राज्यें जिंकण्यांत पुढाकार घेतला. बसवापट्टणच्या वीरभद्रास रणदुल्लानें राज्यभ्रष्ट केलें होतें. तरी त्याचा पक्ष घेऊन यानें निराळें धोरण सुरू केलें. विजापूरकरांचें अधिराज्य फैलावतांना कर्नाटकांतील हिंदु मांडलिकांना जगविण्याचें याचें धोरण असें. त्यामुळें मुस्तफाखान प्रभृति मुत्सद्यांना याच्या राजनिष्ठेबद्दल संशय येऊं लागला. चंदीच्या वेढ्यांत राचेवार मराठे विरुद्ध असतां हा त्यांच्याशीं घरोबा ठेवतो, अशी चाहडी अफजलनें मुस्तफाकडून विजापुरास लिहवली. तेव्हां यास पकडून विजापुरास नेण्यांत आलें. पण चौकशींत आरोप खोटा ठरल्यानें यास पांच लक्ष होनांचा बंगळूर प्रांत दिला.

इकडे शिवाजीनें बापूजी मुद्गल नऱ्हेकरामार्फत राजकारण करून कोंडाणा किल्ला घेतला. त्यामुळें यावर दरबारची पुनः गैरमर्जी झाली. शिवाय यानें गोवळकोंडेकराकडे पत्र पाठवून त्या दरबाराकडे जाण्याची इच्छा दर्शविली आणि जिंजीच्या वेढ्याच्या कामांत सेनापतीचा हुकूम न ऐकतां चालढकल करूं लागला. इत्यादि कारणांनीं यास विजापूरकरांनीं कैद केलें (स. १६४८ जुलै २५). यानंतर चार महिन्यांनीं मुस्तफा मेला व विजापुरास नेतांना अफजलनें याचा अपमान केला. नंतर सिंहगड व बंगळूर हे किल्ले विजापूरकरांच्या ताब्यांत देण्याच्या अटीवर याची सुटका झाली (स. १६४९ मे १६). 'महाराज' आणि 'फर्जंद' अशा पदव्या देण्यांत आल्या, व याला यानंतर चारपांच वर्षे जेनाखान पीरजादे या सरदाराच्या तंत्रानें वागावें लागे आणि शिवाजीलाहि शांत ठेवण्याची जबाबदारी यावर होती.

तथापि स. १६५४ च्या प्रारंभीं याची गणना विजापूरच्या राजनिष्ट सरदारांत होती (प. सा. ६६८). पण कनकगिरीच्या वेढ्यांत संभाजी तोफेचा गोळा लागून मेला, यांत अफजलचें कारस्थान असल्याचा यास संशय आला. त्यामुळें याला चंदावरची मसलत सांगून दूर रवाना केलें. तेव्हां शिवाजीकडेहि कोणी असावें म्हणून कान्होजी जेध्यास यानें पुण्यास रवाना केलें (जेधेकरीना शि. प्र. ४३). तेव्हांच 'मला मानानें वागविण्याची इच्छा नसेल तर रजा द्या' असा निरोप यानें दरबाराकडे पाठविला (प. सा. ७१०). यानंतर मुहम्मद आदिलशाह मरून बडेसाहेबिणीचा कारभार सुरू झाला आणि औरंगजेबानें विजापुरावर स्वारी केली. त्या वेळीं याची गणना रुस्तुम जमा व बहलोलखान या बंडखोर सरदारांत होती (प. सा. ७९२); आणि याचा औरंगजेबाशीं अंतस्थ पत्रव्यवहार चाले (प. सा. २६१६). तथापि औरंगजेबानें उत्तरेकडे जातांना 'हा व शिवाजी यांना मी नोकरींत घेणार नाहीं' असें विजापूरकरांना कळविलें होतें (प. सा. ७४४). इकडे स. १६५७ मध्यें यानें सद्रपट्टण येथील डचांचें ठाणें जबरदस्तीनें ताब्यांत घेतलें (प. सा. ८१२). पुढें याची गणना बंडखोरांत होती (स. १६६० डिसें.), व यानें तेगनापट्टणला वेढा घातला, आणि डचांचा व्यापार साफ बुडाला (प. सा. ८३९); व शेवटीं यानें तो किल्ला घेतला (स. १६६१ फेब्रु. ४, प. सा. ८४६). नंतर हा तंजावरच्या मुलखांत लूट करूं लागला, पण तेथील नायकानें यास परत फिरविलें. याच वर्षी यानें पोर्टोनोव्हो हें बंदर घेतलें. नंतर (स. १६६३

एप्रिल १) तंजावरच्या नायकानें विजापूरच्या सेनापतीशीं तह करून याच्या अरणी व बंगलोर या किल्ल्यांवर हल्ला करण्याचा करार केला. नंतर हा बंकापुरास गेला असतां याला कैद केलें. दोनच दिवसांनीं याची सुटका झाली आणि नव्या अधिकारारूढ पक्षानें याशीं संगनमत करून मदुरेच्या नायकाच्या ताब्यांतील, त्रिचनापल्लीच्या किल्ल्यावर यानें प्रथम हल्ला केला. तेव्हां तंजावरच्या राजानें यास मदत केली. या वेळीं हा व शिवाजी हे राजनिष्ठ लोकांत होते (स. १६६३ जुलै). पुढें हा होदेगिरी येथें शिकारीस गेला असतां घोड्यावरून पडून मृत्यु पावला (स १६६४ जानें. २३).

एकंदरींत शहाजी व शिवाजी यांच्यांत वितुष्ट होतें, हा रूढ समज खरा दिसत नाहीं. दोघेहि स्वाभिमानी असल्यामुळें दोघांवरहि विजापूरदरबारचा रोष झाला, व त्यांना स्वसंरक्षणार्थ बंडखोर बनावें लागलें. परंतु शिवाजीला सभोंवारच्या परिस्थितीचें जें आनुकूल्य होतें व तेथील लोकांत असलेली आपलेपणाची भावना जागृत करून स्वतंत्र राज्य स्थापण्याची जी कामगिरी करतां आली ती शहाजीला कर्नाटकांत राहून करतां येणें शक्य नव्हतें. तथापि शहाजी पराक्रमी व अभिमानी होता यांत शंका नाहीं (द. वि. आपटे).

२. (तंजावर)--(स. १६८४-१७११) हा एकोजीचा वडील पुत्र. याच्यावर अनेक युद्धप्रसंग आले पण त्यांतून हा कसाबसा बाहेर पडला. याच्याजवळ वडिलांच्या वेळचे मुत्सद्दी होते व याची आई दिपाबाई हिचें याला उत्कृष्ट साहाय्य असे. तसेच याचे दोघे भाऊहि मदत करीत.

हा कवींना आश्रय देई, व स्त्रिश्वन मुलांना राजवाड्यांत ठेवून त्यांना संगीत शिकविण्याची व्यवस्था करी. याला मुलगा नव्हता म्हणून याचा भाऊ सरफोजी गादीवर आला. याची पत्नी चिमाबाई.

यानें शिवकथेवर ' चंद्रशेखरविलास ' नांवाचें नाटक लिहिलें.

३. (अक्कलकोट)--(स. १८२८) हा मालोजी भोसल्याचा मुलगा. हा त्यानंतर गादीवर आला. तेव्हां हा आठ वर्षांचा होता. याच्या वेळीं बोरगांवच्या शंकरराव देशमुखानें बंड केलें, पण तें इंग्रजांनीं मोडलें.

४. (स. १८०० सुमार) हा खेलोजी भोसल्याचा (नांदनज व भांबोरें येथील) मुलगा होय. याला कक्काजी, रुस्तुमजी व सुभानजी या नांवांचे तीन भाऊ होते.

हा पेशव्यांचे लष्करांत नोकर असल्याचा खुलासा कांहीं पत्रांत आला आहे. हा नोकरीनंतर गांवीं येऊन नांदनज मुक्कामीं राहिला. याचे वेळचा पत्रव्यवहार बराच सांपडला आहे. परंतु त्याचें अद्यापि वाचन चांगल्या रीतीनें न झाल्यामुळें खात्रीलायक हकीकत लिहितां येत नाहीं (मं. सप्तम सं. वृ. श. १८४१ पृ. ६८).

शहाताहीर निजाम—हा पहिल्या बुर्हाण निजामचा पुत्र.

शहानवाजखान—(खून स. १७५८) निजामाचा अंमलदार. हा नासिरजंगास मिळाला. नासिरजंगास पकडल्यावर याला सात वर्षें अज्ञातवासांत राहावें लागलें. त्या वेळीं यानें ' मुआसिरउल्-अलम ' हा ग्रंथ लिहिला. हा निजामाचा दिवाणहि होता (स. १७५४ नंतर).

शंकर—हा यादव घराण्यांतील जैत्रपाळाचा सेनापति होता. हा ब्राह्मण जातीचा असून फार पराक्रमी होता.

२. हा 'हर्षचरितसंकेत' नामक संस्कृत ग्रंथाचा कर्ता.

३. (स.१७६६) हा वासिष्ठगोत्री ब्राह्मण होता. याच्या पित्रादिकांचीं नांवें शुक्र, धनेश्वर व राम अशीं आहेत.

यानें शक १६८८ मध्यें वैष्णवकरण नांवाचा ग्रंथ लिहिला. ' आपण विष्णुगुप्तमतानुसार ग्रंथ करतों ' असें यानें म्हटलें आहे; तरी हा भास्कराचार्याच्या मतानुसार असल्याचें दृष्टोत्पत्तीस येतें (भा. ज्यो.).

शंकरगण कलचुरी—(स. ६०० सुमार) हा कृष्ण कलचुरीचा पुत्र.

२. (स. ९७०) हा लक्ष्मणराज कलचुरीचा पुत्र.

शंकरतनय—प्रसिद्ध कवि अनंततनयाचा नातू. यानें आपल्या आजोबाच्या वळणावर कवित्व केलें होतें (मं. त्रै. ४. २ ले. ५०).

शंकरदास--(स. १७६०) मराठी कवि. निरंजनचरित्र (३५८ ओव्या), गणपतिस्वयंवर, गणपतिकार्तिकस्वामीभांडण (म. वा. इ. १८३७, २२, २५, २६).

शंकर दीक्षित-- (स.१७५० नंतर) प्रद्युम्नविजय-नाटककर्ता. याला सभासिंह बुंदेल्याचा आश्रय होता.

शंकरदेव-- (स. १०९२) नेपाळचा ठाकुरी राजा.

शंकरदेव जाधव--(स. १३०९-१२) हा देवगिरीच्या रामदेवरावाचा मुलगा. हा अत्यंत शूर होता. पण याचा क्षुल्लक कारणानें अलाउद्दीन खल्जीनें पराभव केला. पुढें मलीक काफूरनें हा खंडणी देईना म्हणून यास ठार मारलें. अनहिलवाडच्या सोळंकीची मुलगी देवलदेवी याला देणार होते.

शंकर नीळकंठ--याचा 'कुंडार्क' ग्रंथ म. म. वासुदेवशास्त्री यांच्या संस्कृत टीकेसह छापला गेला आहे.

शंकरभट्ट—(स. १५७५-१६२५) संस्कृतधर्मशास्त्रकार. याचा पिता नारायणभट्ट व पुतण्या कमलाकरभट्ट. याचे ग्रंथः--द्वैतनिर्णय, धर्मप्रकाश व शास्त्रदीपिकेवर टीका.

शंकरभट्ट भदे—दुसऱ्या नागपूरच्या रघूजीच्या वेळचा मांत्रिक.

शंकरमिश्र—(स. १४५० सुमार) याचा जन्म दरभंग्यांत सरिसव या गांवीं झाला. याच्या बापाचें नांव भवनाथमिश्र ऊर्फ अयाची दुबे असें होतें. हा जीवनाथाचा पुतण्या असून रघुदेव उपाध्याय अथवा कणाद व महेश ठक्कर यांचा शिष्य होता. हा नरेंद्रसिंहराय याचा समकालीन असून निरनिराळ्या विषयांवर बरेच ग्रंथ यानें लिहिले आहेतः

(१) पंडितविजय. (२) आत्मतत्त्वविवेककल्पलता (उदयनाचार्याच्या वादविवादावरील ग्रंथावरील टीका). (३) आनन्दवर्धन, (श्रीहर्षाच्या 'खण्डनखण्डखाद्य' या ग्रंथावरील टीका. याच ग्रंथावर प्रगल्भाचार्यानें लिहिलेल्या टीकेंत याच्या 'आनन्दवर्धन' ग्रंथाचा उल्लेख केला आहे). (४) तत्त्वचिंतामणिमयूख (गंगेशाच्या तत्त्वचिंतामणीवरील टीका). (५) त्रिसूत्रिनिबन्धव्याख्या (गोतमाच्या पहिल्या तीन सूत्रांवर उदयनाचार्यानें लिहिलेल्या टीकेवरील टीका). (६) न्यायलीलावतीकण्ठाभरण (वल्लभाचार्याच्या 'न्यायलीलावती'-वरील टीका). (७) भेदप्रकाश अथवा भेदरत्नप्रकाश. अद्वैतवाद वेदान्तावरील टीका. उलट सर्वज्ञात्ममुनी यानें आपल्या संक्षेपशारीरक या ग्रंथांत याच्या भेदप्रकाशावर टीका केली आहे. (८) गौरीदिगंबरप्रहसन (शिव व पार्वती यांच्या विवाहप्रसंगावर लिहिलेलें एक नाटक. या नाटकाचा प्रयोग याच्या बापाच्या सांगण्यावरून करण्यांत आला होता). (९) वैशेषिकसूत्रोपस्कार (कणादसूत्रावरील लोकप्रिय टीका). (१०) वेदिविनोद (न्यायाच्या कांहीं भागावरील खल यांत केला आहे). (११) बुद्धधिकार टीका. (१२) अभेदधिक्कार. यांखेरीज यानें स्मृतींवर तीन महत्त्वाचे ग्रंथ लिहिले आहेत.

स. १४६२ मध्यें भेदप्रकाशाची एक हस्तलिखित प्रत लिहिली गेली. तेव्हां हा १४६२ च्या पूर्वी होऊन गेला असला पाहिजे. परंतु हा वर्धमान उपाध्यायाचा गुरु होता (हि. इं. लॉ., पा. ४५८-५९).

शंकरराय--(स.१४५३) हा हिंदु राजा खेळण्यावर राज्य करीत होता. मलीक उत्तुजारनें यावर स्वारी केली तेव्हां यानें त्याचा पराभव केला व त्यास ठार केलें (स.१४५३). याच्याजवळ तीनशें गलबतांचें मोठें आरमार होतें. त्यासुद्धां मुहम्मद गवाननें याचा पराभव केला, व कोंकणांत बहामनी राजांचा प्रवेश झाला (स. १४६९).

शंकरराव रघुनाथ ऊर्फ बाबासाहेब—(स. १७९१-१७९८) यांचा जन्म स. १७६८ मध्यें झाला. धाकटे शाहूमहाराजांकडून यांस सचीव पदाचीं वस्त्रें मिळालीं. हे जात्याच भोळे होते. राज्यकारभार बरोबर चालत नाहीं असें पाहून पुणें दरबारनें नानाफडणीसाचा हस्तक बाजी मोरेश्वर यास व्यवस्थापक नेमलें. त्यानें स्वतःच सचीव होण्याकरितां यांचे फार हाल केले. त्या नराधमानें मोरेकरी घालून जेजुरीस यांस मारण्याचा घाट घातला परंतु यांच्या प्रथम कुटुंबाच्या दक्षतेनें तो प्रयत्न फसला. प्रथम कुटुंब म्हणजे सखारामबापू बोकिलांची कन्या होय. द्वितीय प्रसिद्ध न्यायाधीश रामशास्त्री प्रभुणे यांची कन्या. तृतीय वाईचे आंबेकरांची कन्या. वामन भटजी गाखल यानें महादजी शिंद्यास सर्व हकीकत सांगितली. ती खरी असल्याची खात्री झाल्यावर त्यानें नानाफडणीसाची भर दरबारांत फजिती केली व बाबासाहेब यांस मुक्त केलें. हे स.१७९८त कैलासवासी झाले. यांस औरस संतति नव्हती म्हणून यांनीं भाऊबंदांपैकीं काशीराव मोरेश्वर यांचा मुलगा दत्तक घेऊन त्याचें नांव चिमणाजी शंकर ठेविलें व त्याला भोरचे अधिपति केलें.

शंकरस्वामिन्--(स. ५५० सुमार) हा दिङ्नागाचा शिष्य. ग्रंथ-न्यायप्रवेशतर्कशास्त्र. हा नालंदा विद्यापीठांत मुख्य होता.

शंकराचार्य—(जन्म स. ७८८-गुहाप्रवेश स. ८२०) मलबार प्रांतांत कालडी गांवीं यांचा जन्म झाला. यांच्या पित्याचें नांव शिवगुरु आणि मातेचें नांव श्रीअंबिका होय. हे जातीनें कृष्णयजुर्वेदाच्या तैत्तिरीयशाखेचे नंबुद्री ब्राह्मण होते. नंबुद्री ब्राह्मणांची कर्मठपणाबद्दल विशेष ख्याति आहे. कालडी हें गांव सध्यां कोचीन-शोरनूर लाइनीवर असून अलव्हायपासून पूर्वेस ६ मैलांवर आहे. या गांवीं पूर्णानदी आहे. शंकराच्या कृपेनें हे झाले म्हणून यांचें नांव शंकर असें ठेविलें. वैशाख शुद्ध दशमीला मध्याह्नकालीं यांचा जन्म झाला व त्याच महिन्याच्या पौर्णिमेस यांनीं गुहाप्रवेश केला. पण आचार्यांच्या मठांत चैत्र शुद्ध प्रतिपदा ते पंचमी असा सांप्रदाय आहे.

यांची मुंज होण्यापूर्वीच यांचे वडील वारले. आईनें

यांचें उपनयन करविलें आणि हे वेदशास्त्रांत पारंगत झाले. यांनीं विवाह करून संसार थाटावा अशी मातेची इच्छा होती. पण यांना संन्यास घेण्याची उत्सुकता उत्पन्न झाली होती. एकुलता एक मुलगा संन्यास घेणार असें ऐकतांच आई खिन्न झाली आणि आपल्या मृत्यूनंतर आपली क्रियाहि धर्माप्रमाणें होणार नाहीं, याबद्दल तिला फार वाईट वाटलें. 'तेव्हां संन्यासी झालों तरी मी तुझी क्रिया करीन' असें यांनीं वचन दिलें.

एकदां मायलेक नदीवर स्नानास गेलीं असतां सुसरीनें यांचा पाय पकडला. तेव्हां हे आईला म्हणाले, 'मी आतां मरणारच, तर आतां मला संन्यास घेण्याची परवानगी दे.' आईनें तें कबूल केलें. तोंच सुसरीनें यांचा पाय सोडला. तेव्हां आईला क्रियेबद्दल पुनः वचन देऊन हे नर्मदातीरीं गोविंदयतीपाशीं शिष्य म्हणून दाखल झाले. भगवत्पूज्यपाद गोविंदयति गौडपादाचार्यांचे शिष्य असून विद्वान् म्हणून त्यांची ख्याति होती. गोविंदयतींनीं यांना खऱ्या ज्ञानाचा उपदेश करून धर्माचा प्रचार करण्याची आज्ञा दिली.

नंतर हे काशीस येऊन राहिले. तेथें शिष्य तयार करण्यास आणि ग्रंथलेखनास यांनीं सुरुवात केली. यांच्या प्रतिपादनशैलीची आणि भाषाप्रभुत्वाची इतकी छाप पडली कीं सर्व प्रांतांतील विद्यार्थी यांच्याकडे येऊं लागले. त्यांतच पुढें प्रसिद्धीस आलेले पद्मपादहि यांना येऊन मिळाले.

विष्णुसहस्रनाम, उपनिषदें, गीता व ब्रह्मसूत्र यांवर यांनीं भाष्यें लिहिलीं. यांशिवाय यांची किरकोळ रचनाहि यापूर्वीपासूनच चालू होती. यापैकीं कांहीं लेखन हे आपल्या विद्वान् शिष्यांवर सोंपवीत असत. मनीषापंचक व चर्पटपंजरी हीं कांहीं विशेष प्रसंगानें घडलेलीं दिसतात.

नेहमीं वादविवाद आणि चर्चा चाललेली असे. खुद्द व्यास ब्राह्मणरूपानें यांच्याशीं वादविवाद करण्याकरितां आले होते अशी आख्यायिका आहे. असे वादविवाद होऊनच 'तत्त्वमसि' हें यांच्या तत्त्वज्ञानाचें ब्रीदवाक्य ठरलें, आणि त्याचा सर्वत्र जयजयकार होऊं लागला. तेव्हां काशीबाहेर यांनीं आपल्या विजययात्रेस सुरुवात केली.

विजययात्रेंत यांचा मोठा शिष्यसमुदाय आणि ग्रंथसंभार असे. जागोजाग राजेरजवाड्यांकडून यांचा सन्मान होई. खुद्द काशींतहि रतनसिंग नांवाच्या काशीच्या राजाचा यांना आश्रय असे.

हे प्रथम प्रयागास कुमारिलभट्टाकडे गेले, पण त्या महापंडितानें अग्नीला देह अर्पण केला असल्यामुळें, त्याच्याच सांगण्यावरून हे माहिष्मतीस मंडनमिश्राकडे गेले. तेथें यांचा, संसारीं राहून यज्ञादि करावे कां सर्वत्याग करून संन्यास घ्यावा, याविषयीं वाद झाला; आणि यांचा जय झाला. तेव्हां मंडनमिश्रानें यांचें शिष्यत्व पत्करून संन्यास घेतला. तेव्हां त्याला सुरेश्वराचार्य असें नांव देण्यांत आलें. याच वेळीं यांनीं मंडनमिश्राची पत्नी भारतीशीं वाद करण्याचा प्रसंग आला असतां अमरु राजाच्या शरिरांत प्रवेश करून अनुभव मिळविला व तिचाहि वादांत पराजय केला. त्या वेळीं केलेलें अमरुशतक आनंदवर्धनाच्या वेळेपासून प्रसिद्ध आहे.

पुढें दक्षिणेत तुंगभद्रेपर्यंत प्रवास करून शारदेचें मंदिर बांधलें, आणि शृंगेरी मठाची स्थापना करून त्यावर सुरेश्वराचार्यांची योजना केली. आजहि शृंगेरीमठ, शारदामंदिर व तेथील आचार्यांची परंपरा आपणास प्रत्यक्ष पाहावयास मिळते.

याच वेळीं यांची माता मृत झाली आणि संन्याशाचे सर्व नियम बाजूस ठेवून या महापुरुषानें आपल्या मातेची यथासांग क्रिया केली. पण यामुळें तेथील कर्मठ नंबुद्री ब्राह्मणांनीं यांवर बहिष्कार घालून यांना क्रियाकर्मास, फार तर काय प्रेतवाहनासहि साहाय्य केलें नाहीं. यांनीं तिची खांडोळी करून परसांतच मातेचें दहन केलें. यामुळें यांनीं तेथील ब्राह्मणांचा वेदाधिकार व संन्याशाचा सत्कार करण्याचा अधिकार नाहींसा केला आणि खांडोळी करून परसांत प्रेत दहन करण्याची सक्ति केली. आजहि नंबुद्री ब्राह्मणांत या चालीचे अवशेष आहेत.

पुनः यांनीं विजययात्रा सुरू केली. धर्माच्या नांवाखालीं चालू असलेल्या अनिष्ट चाली बंद पाडल्या. शाक्तांचे प्रस्थ कमी केलें. याप्रमाणें सर्वत्र दौरे काढून शृंगेरीनंतर जगन्नाथपुरी, द्वारका, बद्रीकेदार अशा हिंदुस्थानच्या चारहि टोकांस चार मठ स्थापून धर्मप्रसार व धर्मसंरक्षण व्हावें म्हणून कायमची व्यवस्था आखून दिली. तींच 'मठाम्नाय' या नांवानें सध्यां छापलेलीं मिळते. या मठांची योजना वाचली असतां लोकांचा ताबा असलेली ही मठसंस्थेची योजना फार दूरदर्शीपणानें ठरविली आहे, आणि अत्यंत यशस्वी झाली आहे, असें दिसून येईल.

याचप्रमाणें काश्मीरांतहि यांचा जय होऊन शारदादेवीच्या सिंहासनावर यांचा सन्मान झाला. नंतर हे कामरूपांत गेले असतां पराजित झालेल्या पंडितानें यांच्यावर अभिचाराचा प्रयोग केला. व त्यामुळेंच यांना मूळव्याधीचा विकार जडला. तेथून बद्रीकेदारास गेले आणि तेथें यांनीं गुहाप्रवेश केला. यांची समाधि कोठेंहि नाहीं. यांनीं गुहा-

प्रवेश बत्तिसाव्या वर्षी केला किंवा अडतिसाव्या वर्षी केला अशी दोन मतें आहेत. प्रारंभी दिलेला काळ साधारणतः सर्वमान्य आहे.

शंकराचार्य यांचे कांहीं प्रमुख सिद्धांतः—१ सर्व सृष्टीच्या मूळाशीं एक तत्त्व आहे. त्याला ब्रह्म असें म्हणतात. २ ब्रह्मच तेवढें सत्य असून त्याशिवाय बाकी सर्व मिथ्या आहे. ३ जीव हा ब्रह्मच आहे. ४ जीव ब्रह्म होऊन जीवानें ब्रह्मस्वरूपांत राहणें यास मोक्ष असें म्हणतात. ५ (साहंकार) कर्म व (अपरोक्ष) ज्ञान एकत्र राहूं शकत नाहीं. (अविद्या, अध्यास म्हणजे माया यांच्या साहाय्यानें यांनीं अद्वैत सिद्ध केलें. परा व अपरा विद्या यांच्या विभागानें आणि प्रातिभासिक, व्यावहारिक आणि पारमार्थिक अशा तीन सत्ता मानून सर्व श्रुतिवाक्यांचा समन्वय केला.)

शंकराजी केशव फडके (हशमनीस)—(स. १७३३–६० सुमार). हा रत्नागिरीकडील कुर्धे गांवचा अत्रिगोत्री ऋग्वेदी ब्राह्मण. यानें वसईच्या मोहिमेंत पुढाकार घेऊन पराक्रम केला. म्हणून वसई जिंकल्यावर यालाच तेथें सुभेदार नेमले. यांचें घराणें सरदार हसबनीस या नांवानें पुणें येथें शनवार पेठेंत नांदत आहे.

शंकराजी नारायण पंतसचीव—(स. १६५८–१७०७) यांचें घराणें मूळ पैठणकडील गांडापूरच्या देशपांड्यांचें. गोत्र अत्रि. विठ्ठल-कोन्हेर-मुकुंद-नारायण-शंकराजी असा याचा वंश आहे. नारो मुकुंद हे इकडे येऊन पाइटगांवच्या जोशीकुलकर्ण्याचें काम करूं लागले. भिडे यांच्या इतिहासांत मुकुंदाच्या पित्याचें नांव प्रल्हाद असें दिलें आहे आणि हें घराणें प्रथम मांगदरीस आलें असें लिहिलें आहे. शिवाजीनें भोरप किल्ला घेतला तेव्हां जवळच पाइटगांवीं असणाऱ्या नारो मुकुंदाला त्यानें भोरप व सुधागड किल्ल्याची सबनिसी दिली. त्यामुळें मोरोपंत पिंगळ्याशीं परिचय होऊन त्यांनीं शंकराजीस आपल्याकडे ठेवून घेतलें.

संभाजीच्या वेळीं महत्त्वाचीं कामें केल्यानें राजारामाच्या वेळीं प्रथम यास राजाज्ञापद मिळालें. नंतर अष्टप्रधानांतील सचीवपद मिळालें (स. १६९०).

हे राजाज्ञा असतां साताऱ्यास सर्जाखानानें वेढा घातला. त्यास पकडून लाख रुपये घेऊन यांनीं त्यास सोडलें. प्रतापगड, राजगड व तोरणा हे किल्ले यांनीं मोगलांकडून सोडविले (जे. श. व स. प. १६७–१०). यांना मदारुल-महाल म्हणजे ' राज्याधार ' अशी पदवी होती.

राजारामाच्या वेळीं औरंगजेबाच्या स्वारीमुळें मराठी राज्याला अत्यंत बिकट वेळ आली होती. त्या वेळीं मराठी राज्याचें संरक्षण करणाऱ्या पुरुषांतील हे प्रमुख होत. या प्रांताची सर्व व्यवस्था राजारामानें हे व रामचंद्रपंत अमात्य यांच्यावर पूर्ण मुखत्यारीनें सोंपविली होती. यांनीं दिलेल्या सनदांस त्यांनीं मान्यता दिली होती (रा. खं. १५, पृ. ३८०). तसेंच साताऱ्याकडील व कोंकणपट्टींतील जो मुलूख काबीज होईल तोहि यांच्याकडे सोंपविला आणि त्याकरितां धनाजी जाधव यांच्या हाताखालीं दिला (ऐ. सं. सा. खं. १, पृ. ६६).

या प्रसंगीं जिंजीपासून साताऱ्यापर्यंतच्या मुलखावर नजर ठेवून बादशहाला तोंड द्यावयाचें आणि सर्व लष्करी दळणवळण कायम ठेवून जिंजीचा वेढाहि लढवावयाचा असें महत्त्वाचें कार्य राजा व पैसा यांशिवाय यांनीं पार पाडलें.

लहानमोठे अनेक प्रसंग उत्पन्न झालें त्यांना तोंड दिलें आणि देशांत व दरबारांत मोठेपणा मिळवल्यानें यांचें चारित्र्य मोठें उदात्त झालें आहे.

पुढें ताराबाईच्या वेळींहि बादशाहाला जेर करून मराठ्यांचें स्वतंत्र राज्य कोणत्याहि प्रसंगाला तोंड देण्यास समर्थ असल्याचें यांनीं सिद्ध केलें.

बादशाहाचा पाठिंबा घेऊन राज्य करण्यास आलेल्या शाहूमहाराजांस हे सामील झाले नाहींत. शिवाजीच्या तालमींत तयार झालेल्या पुरुषांचा प्रसंग पडेल तसें वागून कोणालाहि मिळण्याचा स्वभावच नव्हता. तीन पिढ्या एकनिष्ठेनें यांनीं राज्याची सेवा केली होती व एकनिष्ठ राहूं असें ताराबाईला वचनहि दिलें होतें.

शाहूनें भेटण्यास बोलावलें असतां यांना जातां आलें नाहीं. तेव्हां दुसऱ्या दिवशीं शाहू यांच्याकडे स्वतः निघाला. तेव्हां यांनीं हिरकणी खाऊन प्राण दिला. वचनाला बाध येण्यापेक्षां मरण बरें असें यांना वाटलें असावें. याची भोरजवळ आंबवडें येथें समाधि आहे.

यांची पत्नी येसूबाई. ती मांगदरी येथील शामाजीपंत महाशब्दे यांची कन्या होय. महादजीचे दत्तविधानानंतर यास दोन औरस पुत्र व एक कन्या झाली. औरस पुत्र नारो शंकर हे यांचे मागें सचीवपदाधिकारी झाले. नारोशंकर अल्पवयी असल्यानें येसूबाईनें सर्व कारभार पाहिला व शाहूस मिळून सर्व स्थिरस्थावर केलें.

शंकराजी मल्हार नरगुंदकर—(स १६९२-१७२०) हा राजारामाच्या कारकीर्दीत सचीवपदावर होता (स. १६९२-९७). पण जिंजीस वेढा पडला असतां हा सर्वसंगपरित्याग करून काशीस जाऊन राहिला. पण तेथें

असतां हा दिल्लीच्या राजकारणांत शिरला. हुसेन अलीबरोबर तहाच्या अटी ठरविण्याकरितां हा कारभारी म्हणून दक्षिणेंत आला होता. यानें बाळाजी विश्वनाथ व चिमणाजी दामोदर मोघे यांचे मार्फत शाहूशीं तहाची वाटाघाट केली (शाहूचरित्र, पा. ३८-३९). हा सय्यद व निजाम यांत बाळापूर येथें झालेल्या लढाईंत जखमी होऊन निजामाच्या हातांत सांपडला (स. १७२० आगष्ट १०).

शंकराजी हरजी महाडीक—हा शाहूच्या वडील बहिणीचा नवरा. याला दुर्गोजी व आबाजी असे मुलगे होते. हा प्रथम ताराबाईच्या पक्षांत होता. नंतर शाहूतर्फे कर्नाटकांत गेला (स. १७०९). यानें रयतेवर जुलूम केल्यावरून शाहूनें यास लिहिलें 'ऐसा वतनदारीचा पेशा नर्मदेपासून रामेश्वरापर्यंत नाही. रयत चोराची नव्हे.'

शंकरानंद—(स. १०५० सुमार) बौद्ध तर्कज्ञ. हा काश्मीरी ब्राह्मण होता. यानें धर्मकीर्तीच्या 'प्रमाणवार्तिक' ग्रंथावर टीका लिहिली. तसेंच धर्मकीर्तीच्या 'समबंधपरीक्षा' या नांवाच्या ग्रंथावर 'समबंधपरीक्षानुसार' या नांवाची टीका लिहिली. याचा तिसरा ग्रंथ 'अपोहसिद्धि' व चवथा 'प्रतिबंधसिद्धि' होय. या सर्व ग्रंथांचीं फक्त तिबेटी भाषांतरें उपलब्ध आहेत (हिस्टरी ऑफ इंडियन लॉ., पा. ३४४-४५).

२. याची ईशावास्यदीपिका नांवाची ईशावास्य उपनिषदावर टीका आहे.

शंकुक—या साहित्यज्ञाच्या मताचें भट्टतौतानें खंडण केलें आहे.

शंखधर—प्रहसन या संस्कृत नाटकाचा कर्ता.

शंखधर कविराज—(स. ११००) 'लटकमेलक' प्रहसनाचा कर्ता.

शंखा—पहिल्या अमोघवर्ष राष्ट्रकूटाची मुलगी व तिसऱ्या नंदीवर्मन् पल्लवाची पत्नी.

शंतनु तोमर--(स. १२०० सुमार) यानें सप्तशतीवर शांतनवी नांवाची टीका लिहिली आहे. याच्या पित्याचें नांव उद्धरण. यानें आपणास राजाधिराज व चक्रवर्ती म्हणवून घेतलें आहे.

शंभुनाथ—(स. १७४९ सुमार) हिंदी कवि. याचे ग्रंथ—रसकल्लोल, रसतरंगिणी व अलंकारदीपक. हा भगवंतराव खीचीच्या पदरीं होता.

शंभुराम- आत्मविलास नामक संस्कृतांतील वेदांत ग्रंथाचा कर्ता.

शंभुसिंग जाधव (मालेगांवकर)--(मृत्यु स. १७६०) हा धनाजी जाधवाचा मुलगा होता. धनाजी मेल्यावर याच्या थोरल्या भावास (चंद्रसेनास) शाहूनें सेनापतिपद देऊन यास त्याचा मुतालिक नेमलें होतें.

चंद्रसेनाचें व शाहूचें वांकडें असल्यामुळें शाहूनें त्याचें पद काढून त्याच्या (दुसऱ्या भावांस) संताजीस दिलें. त्या वेळीं हा चंद्रसेनाबरोबर निघून गेला होता, परंतु परत हा पळून शाहूकडे आला. त्या वेळीं शाहूनें यास लिहिलेलीं पत्रें ता. १४।१०।१७२९ व ५। १। १७३० चीं शा. रो. पृ. १६-१७ मध्यें आहेत.

शाहूनें संभाजीवर पन्हाळ्याकडे स्वारी पाठविली, तींत यानें चांगलीच मदत केल्यामुळें शाहूची मर्जी याजवर बसली. पुढें शाहू-संभाजीची भेट होऊन वारणेचा तह ठरला. त्या भेटींत हा दोघां राजबंधूंच्या मागें हत्तीवर खवासखान्यांत बसला होता. स. १७३२ ता. १७ रोजीं शाहूनें यास मालेगांवच्या इनामाची सनद करून दिली. हा गांव अद्यापि याच्याच घराण्याकडे चालत आहे. स. १७३९ च्या कर्नाटकाच्या स्वारींत फत्तेसिंग भोसल्याबरोबर हा होता. याला एकच मुलगा असून त्याचें नांव अमरसिंग असें होतें. हा स. १७६० त मरण पावला.

शाकटायन—याची कांहीं माहिती आमच्या प्राचीन चरित्रकोश या ग्रंथांत दिली आहे. त्याशिवाय माहिती पुढें देत आहों. यास्कानें निरुक्तांत व महाभाष्यांत पतञ्जलीनें सर्व शब्द धातुज आहेत असें यांचें मत दिलें आहे. धातूपासून शब्दांची सिद्धि करणारा उणादिसूत्रपाठ हा याचा ग्रंथ म्हणून प्रसिद्धी आहे. याचा उणादिसूत्रपाठ पाणिनीच्या पूर्वीचा असला पाहिजे. कारण याचा तीनदां व उणादींचा पाणिनीनें दोनदां आपल्या सूत्रपाठांत निर्देश केला आहे. तसेंच पाणिनिपूर्वकालीन चाक्रवर्मण या आचार्याचा पाणिनीनें व यानें निर्देश केला आहे. याची प्रकृतिप्रत्यय सांगण्याची पद्धति पाणिनीशीं जुळती आहे. तथापि पाणिनीनें साधलेले शब्द यानें दुसऱ्या पद्धतीनें साधलेले आढळतात. नारी वगैरे शब्द या दृष्टीनें पाहण्यासारखे आहेत. तथापि याचा सूत्रपाठ मूळ स्वरूपांत राहिला नसावा. कारण त्यांत मिहिर, दिनार, स्तूप या बुद्धोत्तरकालीन असंस्कृतोद्भव शब्दांची साधनिका आढळते. पण तीं सूत्रें कांहीं टीकाकारांच्या मतें मूळांत नव्हतीं, असें उज्वलदत्ताच्या टीकेवरून दिसतें. आफ्रेजनें उज्वलदत्ताची टीका प्रसिद्ध केली. तसेंच मद्रास युनिव्हर्सिटीनें श्वेतवनवासिन् व नारायण यांच्याहि टीका प्रसिद्ध केल्या आहेत. आणखीहि भोजाची टीका असावी. प्रो. पाठक यांनी उणादिसूत्रें पाणिनीचींच असावींत असें सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे.

२. (स. ८७५) एक जैन व्याकरणज्ञ. याचा ग्रंथ– 'शाकटायनप्रक्रियासंग्रह.' यानें स्वतःच आपल्या ग्रंथावर टीका केली असून तिचें नांव अमोघवर्ष राष्ट्रकूटाच्या स्मरणार्थ अमोघवृत्ति ठेवलें.

शाक्यबोधि—(स. ६७५ सुमार) हा बौद्ध तर्कज्ञ असून देवेंद्रबोधीचा शिष्य होता. यानें देवेंद्रबोधीच्या प्रमाणवार्तिकावर पंजिका लिहिली, असें तिबेटी ग्रंथावरून समजतें (हि. इ. लॉ.).

शाक्यश्रीभद्र—(स. ११२६-१२२४) हा विक्रमशिलेस मंत्री होता. इख्तियार मुहम्मदनें विक्रमशिलेचा नाश केल्यावर हा ओरिसांत गेला. नंतर नेपाळ व तेथून तिबेटांत गेला व लामाचा गुरु झाला. तेथें अनेक ग्रंथ लिहून जन्मभूमि काश्मीराकडे आला व मेला.

शातकर्णि आंध्र—(ख्रि. पू. १७७) हा आंध्रांपैकीं कृष्णानंतर गादीवर आला. याला श्रीशातकर्णि असें म्हणतात. याशिवाय शातकर्णि या नांवाचा आणखी एक राजा झाला आहे. याशिवाय सुंदर शातकर्णि, चकोर शातकर्णि, शिवस्कंद शातकर्णि, यज्ञश्री शातकर्णि व चंडश्री शातकर्णि अशीं नांवें आढळतात. यावरून शातकर्णि हा शब्द या घराण्यांत कुलनामासारखा दिसतो.

हा शिमुकाचा मुलगा होता. हा पुष्यमित्र शुंगाचा समकालीन होता. यानें एक अश्वमेध केल्याचा निर्देश आहे. यानें उज्जयिनी जिंकली. याचा खारवेलानें पराभव केला होता (ख्रि. पू. १७०). यानें कलिंगावर स्वारी केली तेव्हां त्यानें याचा पराभव केला, असें हाथीगुम्फेतील लेखावरून दिसतें. याचा पुतळा नानाघाटांत आहे. याला दोन पुत्र असून त्यांचीं नांवें अनुक्रमें, कुमार वेदिसिरी, आणि कुमार हकुसिरी. पुराणांत यानंतरच्या राजाचें नांव पूर्णोत्संग असें दिलें आहे तें वेदिसिरीचें बिरुद असावें. शक्तिकुमार व हकुसिरी हे एक असण्याचा संभव आहे (प्राचीन महाराष्ट्राचा इतिहास १. पा. ४२१).

शादीखान खल्जी—अलाउद्दीन खल्जीचा पुत्र. पुढें याला ग्वाल्हेर येथें तुरुंगांत ठेवलें आणि डोळे काढून ठार केलें.

शादीखान झैनुल आबिद्दीन—(स. १४२२–७२) हा सिकंदरचा पुत्र. हा आपला भाऊ अमीरखान दक्षिणेकडे गेला असतां गादीवर बसला. हा निःपक्षपाती व रसिक होता. यानें हिंदूंना उदारपणें वागविलें.

शामराज—(स. १८३९ सुमार) हा एक कवि व ग्रंथकार होऊन गेला. याच्या गुरूचें नांव एकनाथ असें होतें. यानें हरिचरित्र नांवाचा एक ग्रंथ लिहिलेला आहे. ग्रंथ ओंवीवृत्तांत असून ९० अध्यायांचा आहे. त्याचीं पृष्ठें २२७ आहेत, व ओंवीसंख्या एकंदर ४३४६ आहे. हा ग्रंथ शके १७६१ च्या सुमारास लिहिला. ग्रंथाचे भाषेवरून पाहतां हा यजुःशाखीय ब्राह्मण असावा असें दिसतें. यानें श्रीमत् भागवताचा नवमस्कंधहि लिहिला असावा, असें अनुमानितां येतें (मं. त्रै. व. १२·३ ले. २३).

२. (ग्रंथकाल स. १७४४) मराठी कवि. याचा पिता लक्ष्मणभट. याचीं 'मुद्गलाख्यान' व 'रुक्मिणीहरण' हीं दोन काव्यें प्रसिद्ध आहेत. हा सातारच्या राजोपाध्ये घराण्यापैकीं होता. याला सामराज असेंहि म्हणतात.

शामराज नीळकंठ पारसनीस रोझेकर—(स. १६४६-६२) हा दौलताबादजवळील रोझेगांवचा कुलकर्णी. वेरूळच्या भोसल्यांशीं याचा परिचय होता. तिकडून शहाजीनें याला जिजाबाईबरोबर पाठविलें, असें सभासदाच्या बखरींत आहे (पा. ३). याच्याकडे प्रथम सबनिशी होती. नंतर स. १६४६ त शिवाजीनें यास पेशवा केलें. याचा शिक्का 'श्रीशिवनरपति हर्षनिधान, शामराज मतिमत्प्रधान' असा आहे. यानें मुसेखोरें भागांतील कुलकर्णीवतन पेशवा असतां खरेदी केल्याचे कागद उपलब्ध आहेत. ते स. १६५२–५७ पर्यंतचे आहेत (पत्रसारसंग्रह ६२७; ६४५; ७२२). यांपैकीं तिसऱ्या कागदांत यास 'पेशवा' असें स्पष्ट म्हटलें आहे. स. १६६२ त शिवाजीनें यास सीदीवर पाठवून जंजिरा काबीज करण्याची कामगिरी सांगितली. त्यांत याचा पराजय झाला म्हणून पेशवेपद महादेव मतिमत्प्रधान याजकडे दिलें. याचें आडनांव रोझेकर किंवा करंजकर असेंहि लिहिलेलें आढळतें. पण तसा उच्चार पुणेंप्रांतांत रोझें गांव न सांपडल्यामुळें केलेला दिसतो. बखरींत यास पारसनीस म्हटलें आहे.

शामराव गोविंदराव पिंगळे—(स. १८१०) या सालीं यास पेशव्यांच्या निजामाकडील वकिलीचीं वस्त्रें मिळालीं. हा शेवटपर्यंत कामावर होता. याचा पुत्र नरहर.

शामराव महाडीक—(मृत्यु स. १८०२) होळकरांचा सरदार.

शामाराध्य कवि—(ग्रंथकाल स. १७३७ सुमार) मराठी भाषेंत ज्यांनीं बरीच मोठी ग्रंथरचना केली आहे असे जे कवी आहेत, त्यांपैकींच हा एक होय. यांनीं भारत, रामायण, भागवत, यांपैकीं बहुतेक आख्यानांवर रचना केली. किंबहुना भारत-रामायणादि ग्रंथ यांनीं रचले असावे. गीतेवर याची एक 'पदार्थमाला' नांवाची टीका आहे. ज्ञानेश्वरीवरहि त्या ग्रंथांतील कठीण शब्दांचा अर्थ

सांगणारा असा याचा कोश आहे. तसेंच (१) आश्वलायन-प्रश्नमाला, (२) नित्यानित्यविचार, (३) ज्ञानोदय-सिंधु, (४) कैवल्योपनिषद्भाष्य (मराठी) हे ग्रंथ यानें रचिलेले आहेत. त्याचें मूळचें नांव शामजी असें आहे. यांचें उपनांव आराध्ये हें होय. हा गाणगापुरास राहत असे. याचे सर्व ग्रंथ अप्रसिद्ध आहेत. 'पदार्थमाला' ही टीका शके १६५९ त लिहिलेली आहे (मं. वा. इ. श. १८३७, ले. १८५).

शार्ङ्गधर—(स. ११७२ सुमार) हा ब्राह्मण अनंग-भीम राजाच्या कारकीर्दीत होता. हा चांगला विद्वान् असल्यामुळें हम्मीर राजानें यास आश्रय दिला होता. यानें हम्मीरविजय, शार्ङ्गधर व सुभाषित शार्ङ्गधर असे तीन ग्रंथ लिहिलेले प्रसिद्ध आहे (क. च.).

२. (स. १२४७ सुमार) हा सिंघण यादवाचा कारभारी जो सोढल त्याचा पुत्र. यानें 'संगीतरत्नाकर' नांवाचा ग्रंथ सिंघणाच्या कारकीर्दीत लिहिला.

३. नन्नयभट्टाचा शिष्य व राजनरेन्द्राचा पुत्र.

४. (स. १३२५ सुमार) यानें शार्ङ्गधरपद्धति व शार्ङ्गधरसंहिता वगैरे वैद्यकावरील ग्रंथ केले. हा चौदाव्या शतकाच्या पूर्वार्धांत होऊन गेला, असें शार्ङ्गधरपद्धतीच्या प्रस्तावनेवरून दिसतें.

शार्दूलवर्मन् मौखरी—(स. ४२५-४५०) मौखरी वंशांतील जो यज्ञवर्मन् त्याचा हा मुलगा असून आपल्या बापानंतर हा गादीवर बसला.

हा पराक्रमी असून युद्धनिपुण होता. याच्याविषयींचे चांगले अभिप्राय शिलालेखांत सांपडतात. त्यावरून याची कारकीर्द लोकप्रिय झाली असावी असें दिसतें. हा देखणा असून याची राहणी उत्तम प्रकारची असे. याच्या अंगीं दातृत्व होतें, पण त्याचा उपयोग फक्त आप्तेष्ट व मित्र यांना झाला. याला कल्पतरूची उपमा दिल्याचें एका शिलालेखांत आढळून येतें. परंतु याची राज्यव्यवस्था चांगली नव्हती. कराचें ओझें जनतेवर फार असून तो सर्वांकडून सारखा वसूल केला जात नसे. न्यायाच्या बाबतींतहि तीच तऱ्हा असे. एकंदरींत याच्या अंगच्या शौर्यामुळें राज्यकारभारांतील अव्यवस्था झांकून गेली. याच्यानंतर याचा मुलगा अनंतवर्मन् हा गादीवर आला (मौखरी by E. A. Pires, pp. 48-50).

शालिवाहन—(ख्रि. पूर्व २३० ते ख्रिस्तोत्तर २२७) पुराणांतरीं ज्यांस आंध्रभृत्य म्हणून संबोधण्यांत आलें आहे, त्या आंध्र राजघराण्यांतील राजांनाच शातवाहन घराण्यांतील राजे म्हणून अनेक शिलालेखांत म्हटलें आहे. 'शातवाहन' शब्दाचें अपभ्रष्ट रूप शालिवाहन असें झालें, व प्राकृतांत तरी या घराण्यांतील राजांना शालिवाहन वंशाचे राजे असें म्हटलें गेलें आहे. या राजवंशाचें मूळ वसतिस्थान गोदावरी व कृष्णा या नद्यांच्या मुखांजवळील प्रदेश. चंद्रगुप्त मौर्याचे कारकीर्दीत म्हणजे ख्रि. पू. ३०० चे सुमारास गोदावरी व कृष्णा या नद्यांच्या मुखाजवळील प्रदेशांत चंद्रगुप्त मौर्याच्या सैन्याच्या खालोखाल बलाढ्य सैन्य असलेलें यांचें राज्य असल्याचें मॅगस्थिनीस यानें लिहून ठेविलें आहे. अशोकाच्या मृत्यूनंतर अशोकाच्या साम्राज्यांत जे घोंटाळे उत्पन्न झाले त्यांचा फायदा घेऊन आंध्राच्या सिमुक अथवा सिप्रक नांवाच्या राजानें आंध्रांचें स्वतंत्र राज्य स्थापन केलें असावें. स्वतंत्र राज्यस्थापनेनंतरहि ते विनयानें आपणांस आंध्रभृत्य असें म्हणवीत. शातवाहन हें या आंध्रराजांचें कुलनाम असावें. या घराण्यांतील राजे स्वतःचें नांव वगळून आपल्या कुलनामानेंच आपला निर्देश करीत असल्यामुळे या राजांसंबंधींच्या शिलालेखांत त्यांच्या वंशांतील कोणता राजा अभिप्रेत आहे हें ठरविणें कठीण होतें! या वंशांतील तीस राजांनी हिंदुस्थानांत राज्य केलें.

सिमुकानंतरच्या दुसऱ्याच राजानें आंध्रांच्या राज्याचा विस्तार गोदावरीच्या उगमाजवळील नाशिक शहरापर्यंत वाढविला. तिसरा राजा श्रीशातकर्णी याचे कारकीर्दीत कलिंगाच्या खारवेल राजानें शातवाहनांची सत्ता अमान्य करण्याचें धाडस केल्याचा उल्लेख आढळतो (ख्रि. पू. १७१). यानंतरच्या ख्रि. पू. २८ वर्षापर्यंतचा शातवाहनांचा इतिहास अद्याप अनुपलब्ध आहे. ख्रि. पू. २८ मध्ये एका शातवाहन राजानें काण्वांच्या सुदर्शन नांवाच्या शेवटच्या राजाचा वध करून आपलें साम्राज्य स्थापिलें व हिंदुस्थानांत आपली सत्ता अप्रतिहत केली.

महाराष्ट्राच्या उपलब्ध इतिहासांत या शालिवाहन अथवा शातवाहन राजवंशासच महाराष्ट्राचा आद्य राजवंश असल्याचा मान प्राप्त शाला आहे. महाराष्ट्रांतील शिलालेखांत या वंशांतील पुलुमायी (स. १३०-१५४), यज्ञश्री (स. १५४-१७२), चतुष्पर्ण (स. १७२-१८५), माठरीपुत्र (स. १९०-१९७) अशा चार राजांचा विशेषतः निर्देश येतो. नाशिक, कान्हेरी, येथील लेण्यांतील शिलालेखांत व कोल्हापूर येथें व इतर ठिकाणींहि सांपडलेल्या नाण्यांवर या घराण्यांतील राजांचा इतिहास सांपडतो. या इतिहासाचें संकलन केलें असतां असें दिसतें कीं शालिवाहन राजांची मुख्य राजधानी मद्रास इलाख्या-

तील हल्लींच्या गंतूर जिल्ह्यांतील धरणीकोट येथें होती व त्या काळीं या शहरास धनकटक असें म्हणत असत. जुन्नरास राजधानी असलेल्या नहपान नांवाच्या परकी क्षत्रपाचा पराभव करून गौतमीपुत्र आणि पुलुमायी यांनीं महाराष्ट्रांत आपलें राज्य स्थापन केलें. या नव्या राजकीय विभागावर राजघराण्यांतील कुमार पैठण येथील प्रांतिक राजधानींत राहून महाराष्ट्राचा राज्यकारभार पाहत. यांनीं परकी म्हणजे शक राजांचा समूळ उच्छेद करून महाराष्ट्रांत हिंदवी राज्याची परंपरा सुमारें २ शतकें चालू ठेविली.

शालिवाहन राजांच्या कालीं बुद्धधर्म व हिंदुधर्म, दोन्हीहि समसमान होते. प्रांतिक अधिकारीवर्गांत महारथी अथवा महारठ्ठी, महाभोज, महासेनापति वगैरे अभिधानें असलेले सरदार व संस्थानिक असत. दुय्यम दर्जाच्या अधिकारीवर्गांत व मानकऱ्यांत अमात्य, भांडागारिक, नैगम (व्यापारी), सार्थवाह, श्रेष्ठी वगैरे अभिधानांचे लोक असल्याच्या नोंदी आहेत. तिसऱ्या वर्गांत लेखक, वैद्य, हालाकीय (शेतकरी), सुवर्णकार, गांधिक (औषधें विकणारे), वर्धक (सुतार), लोहवणिज, मालाकार, दासक (कोळी) अशीं ज्यातिनामें आढळतात. चालू नाण्यांस कार्षापण हें नांव असे व तीं चांदीचीं व तांब्याचीं असत. शहराच्या व्यवस्थेकरितां निगमसभा असत. सार्वजनिक कार्याकरितां पैसा निगमसभेच्या स्वाधीन करीत व निगमसभा त्या पैशाचे हिशेब ठेवी. आंतर-राष्ट्रीय व्यापार भरभराटींत असावा असें दिसतें. सोपारा, कल्याण, भरुकच्छ अथवा भडोच, चौल, मंदगोरा (बाणकोटजवळील मदनगड), जयगड वगैरे बंदरांत परकीय देशांतून माल येई व तेथून हिंदुस्थानचा माल बाहेर जाई. टॉलेमीच्या भूगोलावरून पैठण व तगर हीं दोन मोठीं बाजारपेठेचीं केंद्रें असल्याचा दाखला उपलब्ध आहे.

या वंशांतील राजे आपल्या लेखांत शक वापरीत, त्यास शालिवाहनशक असें नांव पुढें प्राप्त झालें. शालिवाहनशकाची वर्षगणना शालिवाहनानें शकावर मिळविलेल्या पहिल्या जयापासून सुरू झालेली दिसते.

शालिवाहनासंबंधीं कांहीं आख्यायिका प्रसिद्ध आहेत. त्यांपैकीं कांहीं पुढें नमूद केल्या आहेत.

हा एक ब्राह्मणाच्या मुलीचा मुलगा. ही मुलगी आपले आईबाप निवर्तल्यामुळें दोन भावांसह फिरत फिरत पैठणला आली व तेथें एका कुंभाराच्या घरीं राहूं लागली. पुढें एकदां ती गोदावरी नदीवर गेली असतां तिच्यावर शेषाचें लक्ष गेलें व त्याच्यापासून जो मुलगा झाला तोच हा शालिवाहन होय. उज्जैनीच्या विक्रमादित्याला एका देवीनें सांगितलें कीं, 'तुझा मृत्यु एका दोन वर्षांच्या मुलीच्या मुलाकडून होईल.' तेव्हां त्यानें अशा मुलीच्या शोधार्थ वेताळाला पाठविलें. वेताळानें पैठणची सदर हकीकत राजास सांगतांच तो सैन्यासह त्याच्यावर चालून आला. पण या बालराजानें मातीचे घोडे, हत्ती, पायदळ खेळण्याकरितां केलेल्या सैन्यांत जीवन घालून विक्रमादित्याचा पराभव केला (कथासरित्सागर; Bhand, b. 53). हा शालिवाहन राजा म्हणजेच पुलुमायी आंध्र राजा असावा व विक्रमादित्य म्हणजे जयदामन् आणि रुद्रदामन् असावेत. कारण, पुलुमायीनें शकांचा पराभव करून आपल्या बापानें गमावलेले देश परत मिळविले होते (Bhand, p. 53). एकदां हा राजा बागेंतील एका तळ्यांत आपल्या सख्यांसहवर्तमान जलक्रीडा करीत असतां त्यांपैकीं एकीवर यानें पाणी उडविलें. ती अतिशय दमली असल्यामुळें राजाला 'अंगावर पाणी उडवूं नका' असें म्हणाली ('मोदकेन ताडय माम्'). परंतु राजाला संस्कृत न समजल्यामुळें त्यानें 'माउदक' याचा अर्थ मोदक असा घेऊन तो तिच्या अंगावर मोदक टाकूं लागला. त्यामुळें राणी हंसूं लागली. राजाला हंसण्याचें कारण समजल्यावर तो अतिशय लज्जित झाला. त्यानें ही हकीकत आपल्या शर्ववर्मन् नांवाच्या मंत्र्यास सांगून व्याकरण शिकण्याचा निश्चय केला, त्यामुळें शर्ववर्म्यानें प्रार्थना करून राजाला कातंत्र व्याकरण शिकविलें (कथासरित्सागर). याच गोष्टीचा उल्लेख तारानाथानें आपल्या बुद्धधर्माच्या इतिहासांत कांहीं नांवांचा फरक करून केला आहे. ह्युएनत्संग हाहि पण 'पाणीनीच्या व्याकरणांतून २५०० श्लोक काढून दक्षिणेंतील एका ब्राह्मणानें कातंत्र व्याकरण तयार केलें व तें शालिवाहनास अर्पण केलें,' असें म्हणतो.

शालिवाहन गुहिलोत--(स. ९७७ सुमार) मेवाडच्या गादीवर नरवाहनानंतर हा आला. या शालिवाहनाचा व दक्षिणेंतील शककर्ता शालिवाहन याचा कांहीं लोकांनीं घोंटाळा केला आहे. विशेषतः इतिहासाच्या अज्ञानामुळें व आपला संबंध मोठ्या माणसाशीं जोडण्याच्या मोहानें याच्या वंशजांनीं आपला संबंध दक्षिणेंतील शककर्त्या शालिवाहनाशीं जोडल्याचें दिसतें.

याच्या वंशजांच्या ताब्यांत जोधपूर राज्यांतील खेड नांवाचा भाग होता. तेथून कांहीं लोक अनहिलवाड्याच्या सोळंकींच्या वैभवकाळीं तिकडे गेले. गुहिलवंशी साहरचा पुत्र सहजिग (सेजक) हा सोळंकी राजाचा अंगरक्षक म्हणून नियुक्त झाला. हा सोळंकी राजा बहुतेक सिद्ध-

राज जयसिंह असावा. तेव्हां त्याला काठेवाडांत जहागीर मिळाली. सहजिगचे पुत्र मूलुक व सोमराज असे दोन होते. त्यांतला मूलुक उत्तराधिकारी झाला. त्यांच्या वंशांतील लोकांकडे काठेवाडांत भावनगर, पालीठाणा, रेवाकांठा व गुजराथेंत राजपिंपळा हीं राज्यें आहेत. पण यांनीं व खेडच्या लोकांनीं आपला पूर्वज गुहिल याचें नांव गोहिल असें केलें आणि अज्ञानानें आपला पूर्वज शालिवाहन पैठणचा ठरवला; आणि आपण चंद्रवंशी म्हणवूं लागले. वास्तविक हे सर्व सूर्यवंशी आहेत.

शालिशुक मौर्य—(ख्रि. पू. २०७–२०६) हा मौर्यवंशांतील संप्रतीचा पुत्र. याच्या वेळच्या अनेक गोष्टींची माहिती बृद्धगार्ग्यसंहितेंतील युगपुराणावरून सूचित होते. त्यांतच लिहिलें आहे कीं, संप्रति हा जैन साधु बनून निघून गेल्यावर गादीच्या वारसांत तंटे सुरू झाले. याला एक वडील भाऊ होता. त्याला ठार करून यानें गादी बळकावली (बृहत्संहिता, पा. ३७). यावरून त्या वेळची स्थिति कशी होती याची कल्पना येते.

अशोकाच्या मागें त्याचा पुत्र जालौक यानें काश्मीरचें राज्य आपल्या नेतृत्वाखालीं स्वतंत्र केलें होतें. तसेंच याचा एक भाऊ वृषसेन यानें सिंधूच्या पश्चिमेकडील प्रदेश म्हणजे अफगाणिस्थान, कंदाहार व हिरात या भागांवर आपलें स्वतंत्र राज्य स्थापित केलें होतें. म्हणजे हे त्या प्रांतांवर सुभेदार होते आणि मुख्य राजसत्ता कमजोर झाल्यावर हे स्वतंत्र झाले म्हणजे राज्य अलग अलग रीतीनें फुटून स्वतंत्र होऊं लागलें. शालिशुकानें जरी राज्य कसेंबसें मिळवलें तरी त्यास एक वर्षापेक्षां जास्त राज्य उपभोगतां आलें नाहीं. एक वर्षानंतर याचाहि खून झाला. ख्रि. पू. २०७–२०६ पर्यंत हा होता.

हा अत्यंत दुष्ट व अत्याचारी होता, असें युगपुराणांत लिहिलें आहे. याच्या वेळेस ग्रीकांचें हिंदुस्थानांत जोरानें आक्रमण सुरू होतें.

याच्या वेळीं अँटियोकस दि ग्रेटनें आपल्या सेनेसह भारतावर स्वारी केली, व त्यांत जय मिळविला. गार्ग्य-संहितेंत लिहिलें आहे कीं, साकेत, पांचाल, व मथुरासुद्धां ग्रीकांनीं घेतली. पाटलिपुत्र किंवा कुसुमध्वजहि त्यांनीं ताब्यांत घेतलें, पण आपसांतील कलहामुळें त्यांना एक वर्षापेक्षां अधिक दिवस इकडे राहतां आलें नाहीं. पण यांचें वर्चस्व जवळजवळ नष्ट झालें होतें.

शाल्व—एक जैन कवि. यानें 'शाल्व-भारत' लिहिलें. हा कोंकणांत नगर-नगरी येथें राज्य करीत असलेल्या शाल्वमल्ल-नरेंद्र नांवाच्या राजाच्या पदरीं होता. यानें जैन परंपरेस धरून आपलें भारत लिहिलें.

शाहाअली निजाम—पहिल्या बुऱ्हाणचा पुत्र. याचा पुत्र हुसेन गादीवर आला.

शाहा तुर्कान—(स. १२३६) शम्सुद्दीन अल्तमश-च्या अनेक बायकांपैकीं एक. हीं प्रथम दासी होती. नंतर राणी झाली. नवऱ्यानें रझिया बेगमला बादशाहा करण्याचा हुकूम केला असतांहि हिनें फीरूझ नांवाच्या आपल्या मुलास गादीवर बसवून आपल्या हातांत सत्ता घेतली व अकुलीन म्हणून अपमान केलेल्या सवतींचे सूड घेण्यास सुरुवात केली. सवतींची बेइज्जत केली. अज्ञ मुलांचे डोळे काढले व रझियेचा खून करण्याचें ठरविलें. तेव्हां बंड होऊन हिला पकडण्यांत आलें व हिचा मुलगा ठार मारण्यांत आला.

शाहा निजामुद्दीन फकीर—हा महादजीनें नेम-लेला बादशहाचा कारभारी. हा व लाडोजी शितोळे हे बादशहा गडबड करील म्हणून महादजीनें बंदोबस्ताकरितां ठेविले होते (लाडोजी शितोळे पाहा).

शाहाबुद्दीन खल्जी—(स. १३१६)खल्जी घराण्यां-तील अलाउद्दीनचा मुलगा. याचा धाकटा भाऊ उमरखानानें याचे डोळे काढून याला पदच्युत केलें (स. १३१६).

शाहामतखान—(अमानतखान व मुबारिजखान पाहा).

२. (मृत्यु स. १८१४) पठाण सरदार. उत्तम सैन्य ठेवून हा कोणाचींहि चाकरी करी. हा यशवंतराव होळ-कराच्या मर्जीतला होता.

शाहामीर—(स. १३३४–४९) हा काश्मीरच्या मुसलमानी राजघराण्याचा संस्थापक. सोनदेव नांवाच्या काश्मीरच्या राजाच्या येथें हा नोकर राहिला. त्याचा मुलगा रणचंदाच्या वेळीं हा मुख्य प्रधान झाला. शेवटी यानें आनंददेवाचा खून करून राज्य बळकावलें. आनंद-देवाच्या बायकोनें पुढें याच्याशीं लग्न लावलें (स. १३३४). तिचें नांव कवलदेवी ऊर्फ कोटा. राज्यावर येतांना याने शम्सुद्दीन हें नांव धारण केलें. यानें राजा म्हणून चांगले नांव कमावलें.

शाहामुनि—याचे पूर्वज मूळचे प्रयागांतील राहणारे होत. याचा पणजा रजपूत जातीचा शहाबाबा म्हणून होता. याच्या आजाचें नांव जानाजी व बापाचें नांव मनासिंग होतें. हा मोठा भगवद्भक्त होता. हा सिद्ध-टेकास बापापासूनच राहत होता. यानें केलेला मराठी भाषेंत सिद्धांतबोध नांवाचा ५० अध्यायांचा ग्रंथ वेदांत

विषयावर आहे. तो शके १७०० मध्यें सातारा जिल्ह्यांतील पठारी मंडळ गांवीं यानें रचला. हा ग्रंथ मोठा सुरस आहे (म. क. च. भा. २, पा. ७७-९४).

शाहासुजा—(रणजितसिंग पाहा).

शाहा हुसेन अर्घून—अर्घून घराण्यांतील मीर्झा शाहबेगचा पुत्र. यानें स.१५२४ मध्यें बाबरच्या सांगण्यावरून सर्व सिंध प्रांत जिंकला. याला केंब्रिज हिस्टरीमधील वंशावळींत मीर्झा हुसेन अर्घून असें म्हटलें आहे (मु. रि. भा. १, पृ. ३३१).

शाहा हैदर—अहमदनगरच्या निजामशाहींतील दुसऱ्या बुर्हाणचा मुलगा (कें. हि.).

शाहर्यार मोगल—जहांगीर मोगलाचा सर्वांत धाकटा मुलगा. याला आंधळा केलें होतें.

शाहिस्तेखान--(स. १६६५ एप्रिल ५) शिवाजीनें शाहिस्तेखानावर हल्ला केला, तेव्हां याच्या एका मुलाच्या प्रसंगावधानानें हा जगला. शिवाजीनें खानावर हल्ला केला असतां, याचा एक मुलगा याला उद्देशून म्हणाला, 'हे शिपाया, आपला जीव बचाबण्याचें सोडून तो धोक्यांत कां घालीत आहेस? हे लोक शोधीत आहेत ते तुला मारण्याकरितां नसून शाहिस्तेखानास शोधीत आहेत.' या शब्दांमुळें बोलणारा इसम खरा खान असें समजून ते लोक खऱ्या खानाला सोडून त्याच्यावर पडले, आणि खान निसटला (प. सा. ३. ९३८).

हा मोगलांचा दक्षिणचा सुभेदार होता. याचा औरंगजेबाच्या घरांत जिव्हाळ्याचा नातेसंबंध होता. यानें सत्त्याहत्तर हजार सैन्यानिशीं येऊन चाकणचा किल्ला घेतला आणि पुण्यास तळ दिला, आणि भोंवतालीं हल्ले सुरू केले. शिवाजीचें सामर्थ्य अत्यल्प असूनहि कादंबरीसारख्या अद्भुत घटना करून आणि जातीनिशीं साहसें करून याला त्यानें नामोहरम केलें.

शाहू (छत्रपति)—(जन्म स. १६८२ मे १८, राज्यारोहण स.१७०८ जाने. १२, मृत्यु स. १७४९ डिसें. १५) हा छत्रपति संभाजी व येसूबाई यांचा पुत्र. याचें मूळ नांव शिवाजी. स्वतःच्या मुद्रेंतहि हा आपणांस शिवाजी म्हणवितो. याचें शाहू हें नांव औरंजेबानें ठेवलें अशी दंतकथा आहे. संभाजीच्या मृत्यूनंतर सूर्याजी पिसाळ फितुर झाल्यामुळें रायगड औरंगजेबाच्या ताब्यांत आला. तेव्हां हा व याची माता येसूबाई हे त्याच्या हातीं लागले (स.१६९०). औरंगजेब मेल्यानंतर अजमशहानें मराठ्यांत दुफळी उत्पन्न करण्याकरितां बऱ्हाणपूरच्यापुढें गेल्यानंतर यास सोडून दिलें (स. १७०७ एप्रिल). एकूण सतरा वर्षे यानें बादशहाच्या कैदेंत काढलीं. त्या अवधींत उद्धव योगदेव राजाज्ञा आणि जोत्याजी केसरकर यांनीं यास लहानपणीं शिक्षण दिलें. राजारामानें यास दोनतीन वेळां सोडविण्याचा प्रयत्न केला, पण तो निष्फळ झाला. तेथील वातावरणांत हा विलासप्रिय झाला असला तरी राज्य वाढविण्याची कल्पना याच्या अंतःकरणांत होती.

आतांपर्यंत औरंगजेबानें स्वतः आणि शाहूकडून लिहवून मराठ्यांशीं तह करण्याचा प्रयत्न केला होता. पण मराठ्यांचा आपल्या पराक्रमावरचा विश्वास इतक्या दिवसांच्या अनुभवानें वाढला असल्यामुळें ते तहास तयार झाले नाहींत. मोगलांविरुद्ध स्वतंत्र राज्य उभारण्याची कल्पना त्यांच्यांत चांगलीच रुजली होती. म्हणूनच खुद्द गादीचा मालक शाहूनेंहि औरंगजेबाच्या कैदेंतून तह करण्याबद्दलच्या लिहिलेल्या पत्रास मराठे भाळले नाहींत आणि समक्ष तो आला असतांहि एकदम स्वागत करण्यालाहि तयार झाले नाहींत. शाहू आणि त्याचा बाप संभाजी यांचा त्याग लोकांना आदर दाखविण्यास भाग पाडीत होता. पण ज्या स्वातंत्र्याकरितां मराठे तीस वर्षे लढत होते तें गमावून म्हणजे मोंगलांचा मांडलिक म्हणून शाहू महाराष्ट्रांत येत होता. त्यामुळें महाराष्ट्रांत शाहूचें स्वागत मोकळ्या मनानें होणें शक्य नव्हतें (ताराबाई पाहा).

दिल्लीची पातशाही बुडविण्याकरितां उत्पन्न झालेली मराठेशाही तिला सावरींत असल्याचा देखावा याच्या वेळेपासून दिसूं लागला. याच्या सुटकेकरितां गमावलेलें निर्भेळ स्वातंत्र्य मराठ्यांना पुनः केव्हांहि मिळवितां आलें नाहीं.

खंडो बल्लाळ आणि धनाजी जाधव हे खेड येथें शाहूस मिळाले आणि परशुराम त्रिंबक प्रतिनिधि पराभूत होऊन परत आला. तेव्हां शाहूनें सातारा येथें आपणांस राज्याभिषेक करून घेतला (स. १७०८ जाने. १२). या वेळेपासून मराठी राज्यांत शाहू व ताराबाई असे दोन पक्ष निर्माण झाले. ते पक्ष मराठी राज्याच्या अखेरपर्यंत आपलें अस्तित्व व्यक्त करीत होतें. शाहूच्या गैरहजेरींत मराठी राज्याचें ज्यांनीं एकनिष्ठेनें रक्षण केलें होतें आणि एकनिष्ठ राहण्याबद्दल वचनहि दिलें होतें त्यांना याबद्दल आपलेपणा असला तरी ताराबाईला सोडून याला येऊन मिळणें शक्य नव्हतें. त्यामुळें आरंभापासून मदत करणाऱ्या बाळाजी विश्वनाथाला पेशवाई देणें याला भाग पडलें (स. १७१३ नवं.).

त्यानें सख्यदबंधूंशीं संगनमत करून दिल्लीदरबारवर छाप ठेवली. शंकराजी मल्हार नरगुंदकरानें शाहू व मोगल

यांच्यांत एक तह घडवून आणला आणि याला शिवाजीच्या स्वराज्याखेरीज खानदेश, गोंडवन, वऱ्हाड, हैद्राबाद व कर्नाटक हे प्रांत मिळाले आणि दक्षिणेतील मोगलाईत चौथाई व सरदेशमुखी मिळाली. त्यामुळें याचें वजन महाराष्ट्रांत वाढलें. राजमाता येसूबाईलाहि या वेळीं दिल्लीहून सोडविलें.

बाळाजी विश्वनाथाच्या मागें बाजीराव व बाळाजी बाजीराव यांना हाताशीं धरून त्यांच्याकडून यानें राज्यविस्तार करविला. कोल्हापूरच्या संभाजीवर चाल करून त्याला जहागीर दिली आणि त्याचा कायमचा खटका तोडला (स. १७३१ वारणेचा तह). ब्रह्मेंद्रस्वामीच्या सांगण्यावरून पेशव्याकडून जंजिऱ्याच्या सिद्दीवर मोहीम करून त्या प्रांतांतील हिंदूंना निर्भय केलें. हा जिवंत असे तोंपर्यंत यानें पेशव्यांना स्वतंत्रपणें वागूं दिलें नाहीं (ऐ. टि. पा. ३५-३६). पेशवेहि याची मर्जी संभाळून असत. शिवाय पेशव्यांच्या इतकी सैन्याच्या दृष्टीनें मातब्बर कोणी नव्हता. त्यामुळें याला मरतेसमयीं शिवाजीच्या गादीचा मान ठेवून राज्यकारभाराची सर्व जबाबदारी पेशव्यावर कुलमुखत्यारीनें सोंपविणें भाग पडलें. यामुळें थो. शिवाजीनें केलेली राज्यव्यवस्था मोडली. अष्टप्रधान नांवाला राहिले. राजमंडळ नामशेष झालें. शेवटीं तर राजशकहि नाना फडणीसानें बंद केलेला दिसतो. शाहूची इच्छा राजमंडळ चालवावें अशी होती.

याला पुत्र नव्हता. एका राणीनें रघोजी भोसल्यास दत्तक घेण्याचा तगादा लावला. दुसऱ्या राणीनें कोल्हापूरच्या संभाजीस वारस करण्याचा आग्रह धरला. पण ताराबाईनें दुसऱ्या शिवाजीचा पुत्र रामराजाला गादी देण्याविषयीं शाहूकडून व्यवस्था करविली.

हा कैदेंत असतां औरंगजेबानें याचें मोठ्या थाटानें लग्न केलें, व पांच परगणे जहागीर दिले. तीं अंबिकाबाई, दुसरी सावित्रीबाई, तिसरी सकवारबाई व चवथी सगुणाबाई. सकवारबाई याच्याबरोबर सती गेली. बाकीच्या पूर्वीच वारल्या होत्या. यांशिवाय तुरुंगांत असतां विरूबाई नांवाची एक दासी याच्या अगदी मर्जीतील होती. याला फक्त गजराबाई नांवाची मुलगी होती. ती मल्हार रघूजी बांड्याला दिली.

२. (राज्यकाल स. १७७७–१८०८) हा सातारच्या रामराजाचा दत्तक पुत्र होय. दत्तविधानापूर्वी याचें नांव विठोजी असून हा त्र्यंबकजी वावीकराचा मुलगा होय. रामराजानें याला ता. १५ सप्टेंबर १७७७ रोजीं विधिपूर्वक दत्तक घेतलें, पण राज्याभिषेक लगोलग झाला नाहीं. पुढें एक वर्षानें हा अभिषेक मार्गशीर्ष व. ८ (ता. ११-१२-१७७८) रोजीं साताऱ्यास मोठ्या समारंभानें झाला. अमृतराव पेठे व बाबूराव आपटे यांनीं सर्व सिद्धता केली. गोविंदराव व रामराव चिटणीस, अमात्य व मुत्सद्दी सर्व समारंभास आले होते. छत्रपतीच्या खर्चाची वगैरे व्यवस्था नीट बांधून कारभाऱ्यांनीं सर्व बंदोबस्त आपल्या हातांत ठेविला.

दत्तविधानसमयीं याचें वय १८ वर्षांचें होतें. याचीं एकंदर चार लग्नें झालीं. पैकीं शिर्के यांजकडील आनंदीबाई ऊर्फ माईसाहेब यांचे पोटीं ३ पुत्र झाले. वडील प्रतापसिंग राजे (ज. १८-१-१७९३), दुसरा रामचंद्र ऊर्फ भाऊसाहेब (ज. ८-६-१७९९) व तिसरा शहाजी उर्फ आप्पासाहेब (ज. २१-७-१८०१).

सातारकर व कोल्हापूरकर छत्रपति पेशव्यांवर कधींच संतुष्ट नव्हते. अलीकडील तीस वर्षांत नानानें दोघांसहि दाबून ठाकलें. तेव्हां कोल्हापूरकर व सातारकर छत्रपतींनीं पेशव्यांवर चाल करण्याचें ठरविलें, व त्याप्रमाणें यानें स. १७९८ मध्यें पेशव्यांवर चाल केली. त्यामुळें बाजीराव अत्यंत चिन्ताक्रान्त झाला. शेवटीं परशुरामभाऊनें हें प्रकरण मिटविलें (स. रि. उतर वि. १ व ३).

शांडिल्य—यानें भक्तिसूत्रें केलीं. याचा काल बाराव्या शतकांतला आहे. हा बंगाल्यांतील जयदेव कवीचा समकालीन होय.

शांत कदंब—(शांतिवर्मा कदंब पाहा).

शांत ब्राह्मणी—(मृत्युंजय ब्राह्मणी पाहा).

शांतरक्षित—(स. ७९) बौद्ध तर्कशास्त्रज्ञ. याचा जन्म लाहोरच्या राजकुलांत झाला. हा नालंदा विश्वविद्यालयांत पंडित होता. याला बोलावून तिबेटच्या राजानें एक विहार बांधला. तिबेटांत हा बोधिसत्व नांवानें ओळखला जातो. हा स. ७६२ पर्यंत तेरा वर्षे तेथें होता. याचे ग्रंथ—१ वादन्यायवृत्तिविपंचितार्थ (धर्मकीर्तीच्या वादन्यायावर टीका), २ तत्त्वसंग्रहकारिका. या ग्रंथांचीं फक्त तिबेटी भाषांतरें उपलब्ध आहेत (हिस्टरी ऑफ इंडियन लॉजिक, पा. ३२३-२७).

शांत लिंगपा—(समाधि स. १६२३) याचा कर्णहस्तिकी नांवाचा लिंगायत मताचा एक मराठी ग्रंथ आहे. गांव वडगांव (जि. सातारा) येथील गादीचे संस्थापक (म. सा.).

शांतिचंद्र—(स. १५८४ नंतर) हा जैन पंडित हीरविजयसूरीनंतर अकबराच्या दरबारांत होता. यानें अकबराची प्रशंसा करणारा 'कृपारस-कोश' नांवाचा ग्रंथ तयार

केला. अकबराच्या औदार्य व कारुण्यदर्शक साऱ्या सत्कार्यांचा या ग्रंथांत निर्देश आहे. हा जेव्हां फत्तेपुराहून पाटणकडे हरिविजयसूरीच्या दर्शनार्थ निघाला तेव्हां अकबरानें हिंसा न करण्याचें हीरविजयसूरीला कबूल केलेल्या दिवसांपेक्षां अधिक दिवस कबूल केलें आणि जिजिया कर उठवण्याचा हुकूम केला. हा स.१५८४ नंतर अकबराच्या दरबारी होता.

शांतिदास—गुजराथींतील कृष्ण-गोपी संवादाचा कर्ता.

शांतिनाथ—जैनांचा सोळावा तीर्थंकर (तीर्थंकर पाहा).

शान्तिपा—हा चौऱ्यांशी सिद्धांपैकीं बारावा सिद्ध होय. हा जातीनें ब्राह्मण असून मगध देशांतील राहणारा होय. याच्या वेळेस महीपाल नांवाचा राजा होता (स. ९७४-१०२६). हा जालंधर (४६) चा शिष्य होता. यासच रत्नाकरशान्ति असें म्हणत असत.

उदंतपूरी (बिहारजवळ) च्या विहारामध्यें हा सर्वास्तिवादसंप्रदायांत प्रव्रजित झाला. हा अध्ययन करून विक्रमशिलाविहारमध्यें जनारिके महापंडिताजवळ गेला. पुढें नाडीपा हाहि याच्या सत्संगतींत आला. यानें आपली विद्या संपवून सोमपुरी विहारामध्यें हा महंत झाला. पुढें माळव्यांत गेला व तेथेंच योगाभ्यासामध्यें यानें पांच सहा वर्षे घालविलीं. नंतर मंगल देशांत विक्रम-शिला या गांवीं गेला. त्याच वेळेस सिलोनच्या राजानें यास आग्रहपूर्वक बोलाविलें म्हणून हा सिंहलद्वीपांत गेला. पण जातांना रामेश्वर येथें यास एक साथीदार मिळाला, तोच पुढें कुटलिपा (सि. ४४) झाला. तेथें यानें सहा वर्षे धर्मप्रसार केला. नंतर परत आल्यावर राजा महीपालाच्या विनंतीवरून हा विक्रम-शिलाच्या पूर्वद्वारचा महा-पंडित झाला.

सर्व सिद्धांमध्यें याच्यासारखा जबरदस्त सिद्ध कोणीहि झाला नाहीं. याला " कलिकाल-सर्वज्ञ " असेंहि म्हणत असत. यानें १०० वर्षांपेक्षां अधिक आयुष्य घालवून नंतर देह ठेवला.

तन्जूरमध्यें दर्शन विषयावर याचे नऊशेंपेक्षां अधिक ग्रंथ आहेत. यानें छंदःशास्त्रावर " छंदोरत्नाकर " ग्रंथ लिहिला आहे. तंत्रावर २३ ग्रंथ यानें लिहिलेले सांपडतात, त्यांमध्यें सुखदुःखद्वयपरित्यागदृष्टि (४०।३७) हा ग्रंथ मागधी भाषेंत आहे.

चर्यागीतिमध्यें याच्या उत्कृष्ट गीति सांपडतात. हा विद्वान् गृहस्थ असल्यामुळें याच्या कविता सर्वमान्य होत्या. हा उत्कृष्ट हिन्दी कवि होता.

शांतिवर्मा कदंब—(स.४५०-७१) ककुत्स्थवर्मन् कदंबाचा पुत्र.

२. (स. ९२५ सुमार) हा बनवासीच्या नागवर्मा कदंबाचा पुत्र.

३. (स.१०८८) हा दुसऱ्या जयवर्मा कदंबाचा पुत्र.

शांतिवर्मा रट्ट—(स.१०७५सुमार) हा विट्टुगाचा पुत्र. हा दुसरा सोमेश्वर पश्चिमचालुक्य व सहावा सोमेश्वर यांचा मांडलिक होता. राजधानी हानगळ. पत्नी पांड्य कुलांतील सिरिया देवी.

शितिकंठ—हा जातीचा तैलंग स्मार्त ब्राह्मण होता. शालिवाहनाच्या १५ व्या शतकांत गंडीकोटा येथें याचा जन्म झाला. यानें पुष्कळ वय झाल्यावर काशीस जाऊन न्यायशास्त्राचें अध्ययन केलें, व तर्कसंग्रहावर तर्कसंग्रहदीपिका नांवाची टीका लिहिली. तिलाच कोणी शितिकंठी म्हणतात. न्यायशास्त्रांत पुष्कळ विद्यार्थी तयार केले व काशींतच हा मरण पावला (कविचरित्र; अन्नंभट्ट पाहा).

शिदनाक महार—(स. १६९०-१७०८ सुमार) सातारा जिल्ह्यांत तासगांव तालुक्यांत कळंबी म्हणून एक गांव आहे. तेथचा हा वतनदार महार. औरंगजेबाच्या हातून संभाजी राजा मारला गेल्यावर पुढें जी महाराष्ट्रांत बंडाळी माजली, त्या वेळीं ह्या शिदनाकानें महार लोकांचें एक पथक उभारून धामधूम केली. पुढें याचा मराठे लोकांस पुष्कळ उपयोग झाला. शाहू राजा मोंगलांच्या कैदेंतून सुटून ताराबाईपासून आपलें राज्य मिळविण्यासाठीं आला, तेव्हां जे लहानमोठे मराठे सरदार त्यास मिळाले, त्यांत हाहि मिळाला. शाहूस राज्यप्राप्तीनंतर ज्यांनीं मदत केली त्या सर्वांस त्यानें त्यांच्या योग्यतेप्रमाणें देणग्या दिल्या. त्या वेळीं ह्यास कळंबी गांव इनाम दिला. तो अद्यापि याच्या वंशाकडे चालत आहे (भा. व. खं. ३, ऐ. गो. पृ. ३८).

२. (स. १७९५-१८१८ सुमार) हा शिदनाक महाराचा नातू. हा खर्ड्याच्या लढाईत होता. खर्ड्याच्या मैदानावर जेव्हां मराठ्यांच्या फौजेचा तळ पडला तेव्हां सरदार आपापल्या लोकांसह मिसलीप्रमाणें उतरले. याच्या गोटाच्या आसपास दुसऱ्या ब्राह्मण व मराठे सरदारांचे गोट होते. सवाई माधवराव कचेरीचे डेऱ्यांत बसले असतां एकानें विनंति केली कीं, "महाराचा गोट मध्येंच आहे. तो बाजूस काढावा." पेशव्यानें विनंति ऐकून आपल्या बाजूस बसलेल्या हिरोजी पाटणकर नांवाच्या वयोवृद्ध सरदाराकडे पाहिलें. तेव्हां तो मराठा सरदार बोलला कीं, " ही कांहीं जेवणाची पंगत नव्हे म्हणून

मध्येंच महाराचा गोट असल्यास हरकत नाहीं. ही तरवार धरणाऱ्या शूरांची पंगत आहे. येथें जातीचा विचार नाहीं, ज्याची तरवार खंबीर तो हंबीर." पाटणकराचें बोलणें ऐकून पेशव्यानें मान डोलवली.

पुढें लढाईच्या दिवशीं सरदार लोक पेशव्यास मुजरे करून लढाईस चालले. तेव्हां हाहि मुजऱ्यास आला. मुजरा करून व हात जोडून पेशव्यास म्हणाला, "महाराज, मी शिदनाक महार आहें. मी महार म्हणून माझा तिरस्कार कांहीं लोक करीत आहेत. आज आपल्या पायाचा दास कामगिरी कशी करतो तीं पहावी." असें म्हणून हा युद्धास गेला.

पुढें लढाई चालू झाली. परशरामभाऊवर पठाणांनीं मोठी गर्दी करून भाऊस घोड्यावरून खालीं आणिलें. त्या वेळीं मराठे व पठाण यांची जी चकमक झाली तींत यानें अप्रतिम शौर्य दाखविलें. याची पटवर्धन मंडळींनीं मोठी तारीफ केली.

पेशवाई बुडाल्यावर हा शिदनाक बरींच वर्षे होता. चिंतामणराव आप्पा सांगलीकर दुखण्यानें फार आजारी असतां त्यांच्या भेटीस हा गेला होता. तेव्हां त्यांनीं मोठ्या समारंभानें ह्याची मुलाखत घेतली. आणि आपल्या पदरच्या मंडळीस याची माहिती करून दिली (भा. व. खं. ३, ऐ. गो., पृ. ३८-३९).

शिदोजीराव निंबाळकर सरलष्कर ऊर्फ आपासाहेब निपाणकर—हा कोल्हापूरच्या राजवाड्यांत एकदां भेटीस गेला असतां पुढील चौकांत तेथील राजानें वाघ सोडून दिला होता. हे पुढें जातात तों लोकांनीं वाघ मोकळा असल्याची वर्दी दिली. हे म्हणाले, "मी आतां मागें फिरणार नाहीं." हे पुढें जातात तों वाघ अंगावर येतो असें पाहून ह्यांनीं त्याचे पुढील पाय धरले, व मागील लोकांनीं तलवारीनें त्यास तोडलें. याच मनुष्यानें कोल्हापूरकर महाराजांची मुलगी मागितली होती. पण ती त्यांनीं दिली नाहीं म्हणून यानें स्वारी करून कोल्हापूर घेऊन जबरदस्तीनें मुलीशीं लग्न लावलें. असा हा उग्रकर्मा पुरुष होता (ऐतिहासिक गोष्टी व उपयुक्त माहिती, भाग १ ला, पृ. १५१).

शिधोपंत—आळंदी येथें राहणारा सुखवस्तु गृहस्थ. हा निवृत्ति इत्यादि भावंडांचा आजोबा होता.

शिमुक—(ख्रि. पू. २००-२२५सुमार) हा आंध्रांचा पहिला राजा होय. यानें अशोकाच्या मृत्यूनंतर आपलें स्वातंत्र्य जाहीर केलें व राज्य करूं लागला. जुन्नर येथील नानाघाटच्या शिलालेखांत याचें नांव आढळतें. याचा सीप्रक, सिंधुक, सिशुक इत्यादि नांवांनीं उल्लेख केलेला आढळतो (Bhan. p. 34). तेथें याचा पुतळाहि आहे. काण्वांचा पराजय करणारा म्हणून याचा काल पुढें धरावा लागतो. तथापि तो ख्रि. पू. २००-२२५ पर्यंत मागें असावा. काण्वांचा नाश पुलोमा किंवा आपीलक यानें केला असावा.

शिरसाद गझनवी—(स. १११५-१६) हा अला-उद्दौला मसूद तिसरा ऊर्फ अलकरीम याचा मुलगा. याला अर्सलानें पदच्युत केलें.

शिराळशेटी—(स. १३९६ सुमार) हा लिंगायत वाणी होता. श. १३१८ म्हणजे स. १३९६ या वर्षी दुर्गादेवीचा दुष्काळ पडला. तो १२ वर्षे होता. त्या वेळीं या श्रीमंत वाण्यानें गुजराथ व महाराष्ट्र ह्या देशांमध्यें हजारों बैल फिरते ठेवून देशांत धान्याचा पुरवठा केला, त्यामुळें देशाचा बराच बचाव झाला.

दुष्काळ संपल्यावर बेदरच्या बादशहानें यास बोलावणें पाठवून याचा मोठा सन्मान केला व 'तुला काय पाहिजे तें माग' म्हणून सांगितलें. स्वतःस जहागिरी वगैरे न मागतां यानें " साडेतीन घटका खावंदांनीं आपला अधिकार मला द्यावा " अशी बादशहाची प्रार्थना केली.

हें ऐकून बादशहास चमत्कार वाटला व तो आपल्या तख्तावरून खालीं उतरला व त्यावर बसण्यास शिराळशेटीस सांगितलें. यानें हात जोडून विनंति केली की "तख्तास पाय लावण्याची माझी योग्यता नाहीं. साडेतीन घटका आपला शिक्का माझे स्वाधीन असावा, व या अल्प काळांत मी जें जें करीन तें तें खावंदांनीं मंजूर करावें." बादशहानें याचें म्हणणें कबूल करून याच्या स्वाधीन शिक्का केला.

धर्मासंबंधीं ज्या देणग्या व इनामें ह्यापूर्वी बहामनी बादशहानें खालसा केलीं होतीं तीं सर्व यानें मोकळीं केलीं व आणखीहि देवस्थानांस वगैरे इनामें दिलीं. साडेतीन घटका भरतांच शिक्का बादशहापुढें ठेवून हात जोडून उभा राहिला. यानें लाखों रुपये उत्पन्नाच्या देवस्थानांच्या हिंदूंच्या देणग्या शिराळशेटीनें खुल्या केल्या आहेत व कित्येक तर नवीन दिल्या आहेत; परंतु स्वतःस कवडीचाहि फायदा करून घेतला नाहीं, हें पाहून याच्या निरपेक्षबुद्धीचें बादशहास व इतर सर्वांस मोठें आश्चर्य वाटलें. हा नको नको म्हणत असतांहि बादशहानें याच्या मुलास सरदारी दिली.

याच्या वंशांतील नामशेटी नांवाचा सरदार पुढें माणदेशांतील बंड मोडण्यास आला होता. त्याच्या

फौजेचा तळ वरकुटें नांवाच्या गांवाजवळ पडला होता. तेव्हांपासून त्या गांवास नामशेटींचें वरकुटें असें म्हणतात. हा गांव म्हसवडपासून दक्षिणेस चार कोसांवर आहे. ह्यावरूनच 'शिराळशेटींचें राज्य' असें अल्पकालपर्यंत मिळालेल्या अधिकारास म्हणतात. ही गोष्ट श्रावण शु. ६ स. घडली. म्हणून लोक याच्या नांवानें उत्सव करितात. तथापि लोक याची मूळची गोष्ट विसरले आहेत (भा. व. खं. ३, ऐ. गोष्टी, पृ. ४६-४७).

शिरोमणि कृष्णाचार्य—(स. १७३० सुमार) मोठे नैयायिक. यांनीं काशींच्या वज्रकंटक शास्त्र्याचा वादांत पराभव केला म्हणून शाहूंनीं यांस कालगांव इनाम दिला. हे मोठे विरक्त पंडित होते.

शिलादित्य गुहिलोत—(स. ६४६-७३४) उदेपूरच्या गादीवर नागानंतर हा आला. याला मेवाडच्या शिलालेखादिकांत शील म्हटलें आहे. याच्या वेळचा सामोली गांवीं एक शिलालेख मिळाला आहे. तो वि. सं. ७०३ (स. ६४६) मधील आहे (नागरी प्र. प. १. ३११-२४). त्यांत पुढीलप्रमाणें लिहिलें आहेः-' याच्या वेळीं वटनगरहून आलेल्या महाजनांच्या समुदायांत जेक (जेंतक) मुख्य होता, त्यांनीं आरण्यकागिरींत मिठाची खाण शोधली व महाजनांच्या आज्ञेनें जेंतक महत्तर (पदवी) नें देवीचें देऊळ बांधलें; शेवटीं देवबुक येथें अग्निकाष्ठें भक्षण केलीं. याचें एक तांब्याचें नाणें मिळालें आहे. त्यावर शील हीं अक्षरें स्पष्ट आहेत.' याच्यानंतर कालभोज (अपराजित) गादीवर आला. याला दुसरा महेंद्र म्हणत असावेत.

शिलादित्य धराश्रय—(स. ६७१) गुजराथेंतील चालुक्य घराण्यांतील एक प्रमुख पुरुष. हा जयसिंह धराश्रयाचा मुलगा. हा स. ६७१ मध्यें आपल्या बापाच्या राजवटींत युवराज असून एका प्रांताचा सुभेदार होता.

शिलादित्य मैत्रक--(स. ६०९) हा वलभीच्या दुसऱ्या धरसेनाचा पुत्र. याला 'परममाहेश्वर' असें विशेषण असलें तरी यानें बौद्धांनाहि देणग्या दिल्या होत्या. ह्यु-एन्-त्संगाच्या पूर्वी साठ वर्षें हा माळवा ऊर्फ मोलायोचा राजा दिसतो.

२. (स. ६६६-७५) हा खरग्रहाचा पुत्र. याला परमभट्टारक, महाराजाधिराज व परमेश या पदव्या होत्या. या वंशांतील प्रत्येकास शिलादित्य म्हणत असावेत.

शिलादित्य सोळंकी—(स. ६७०-८२) लाटदेशाचा जहागिरदार जयसिंहवर्मा सोळंकीचा हा पुत्र. यानें त्र्याश्रय असें बिरुद धारण केलें होतें. याचीं दोन दानपत्रें मिळालीं आहेत. त्यांपैकीं एक कलचुरि संवत् ४२१ (स. ६७०) माघ शु. १३ ला नवसरीहून दिलें आहे (बॉबे. ए. सो. ज. १६-२-३) व दुसरें कलचुरि संवत् ४४३ (स. ६८२) श्रावण शुद्ध १५ चे कार्मणेय (कामलेज सुरतजिल्ह्यांतील) च्या जवळ कुसुमेश्वर येथील छावणींतून दिलें आहे (व्हिएन्ना ओरिएंटल कांग्रेस रिपोर्ट, ऑर्यन् सेक्शन, पृ. २२५-२६). या दोहोंतहि याला युवराज म्हटलें आहे. यावरून या दान देण्याच्या कालांत जयसिंहवर्मा जिवंत होता. आणि हा त्याच्या प्रान्ताचा अधिकारी होता. पण हा युवराज असतांनाच मृत्यु पावला. म्हणून मंगळराज गादीवर आला.

शिव—(जन्म स. १५८८ सुमार) हा विष्णूच्या वर्णनांत दिलेल्या वंशांतील कृष्णाचा पुत्र, व नृसिंहाचा बंधु होय. यानें 'अनंतसुधारस' ग्रंथावर टीका लिहिली आहे, व 'मुहूर्तचिंतामणी' नांवाचा मुहूर्तग्रंथ केला आहे. याच्या पुतण्याच्या ग्रंथावरून जगद्गुरु गुरु असावा असें कळतें. याचा दुसरा पुतण्या रंगनाथ यानेंहि 'सिद्धांतचूडामणि' त याची फार स्तुति केली आहे. दुसरा एक शिवराम दैवज्ञाचा पुत्र. यानें 'जन्म-चिंतामणि' नांवाचा ग्रंथ लिहिला असें सुधाकर लिहितात.

२. (ग्रंथकाल स. १८१५) शिव हा विश्वामित्र गोत्राचा होता. हा लक्ष्मेश्वर येथें राहत असे. यानें 'तिथिपारिजात' नांवाचा ग्रंथ शक १७३७ त लिहिला. तो गृहलाघवानुसारी आहे. त्यांत तिथि साधनार्थ तिथिचिंतामणीसारख्या सारण्या आहेत.

शिवकल्याण—(टीकारचनाकाल स. १६३५) हा त्रिमलाचा (नित्यानंदाचा) पुत्र व शिष्य. यानें अमृतानुभवावर संस्कृत भाषेंत नित्यानंददीपिका नांवाची टीका लिहिली आहे (मं. वा. इ. १८३६, ले. ४३). यानें भागवतावर ओवीबद्ध टीका केली ती अतिशय विस्तृत आहे. हा जोगाईच्या आंब्याचा राहणारा. हा पंढरपूरच्या पांडुरंगाचा उपासक होता.

शिवचित्त कदंब—(स. १२४६-५०) हा गोव्याच्या त्रिभुवनमल्लाचा मुलगा.

२. (परमादि कदंब पाहा).

शिवदास—(स. १६०० सुमार) हा चांगल्या प्रतीचा एक ग्रंथकार होऊन गेला. याचा गुरु नीलग्रीव हा होय. गुरूनीं केलेला अपूर्ण ग्रंथ 'वेताळपंचवींशी' हा यानें पूर्ण केला. यानें वरील पूर्ण लिहिलेला ग्रंथ फारच जुन्यापैकीं होय. तो यानें रत्नागिरीस लिहिला (मं. १८३६, वा. इ. ले. ८७).

२. एक मराठी कवि. याच्या गुरूचें नांव भगवंत. यानें बरींच पदें व अभंग केलें आहेत. यानें आपल्या गुरूवर एक आरती केली आहे (मं वा. इ. शके १८३७, ले. १५८).

शिवदाससेन—हा गौडाल नांपालाचा पुत्र. याची चरकसंहितेवर एक टीका आहे. आणि 'चक्रसंग्रह' नांवाचा याचा एक ग्रंथ आहे. हा पंधराव्या शतकांतील दिसतो.

शिवदिनबाबा—(स. १६९८–१७७४) आईचें नांव सरस्वती व पित्याचें नांव कृष्ण यादव जोशी. हा एक मराठी कवि होता. केसरीनाथाचा शिष्य म्हणून यास शिवदिनकेसरी म्हणतात. हा पैठणचा राहणारा. वाजसनेयी ब्राह्मण, गोत्र कौशिक, आडनांव जोशी. याचा जन्म शके १६२० त झाला (वैशाख वद्य ७ भृगुवासरीं सूर्योदयीं). शके १६४४–४८ पर्यंत शिवदिनबाबानें हिंदुस्थानभर प्रवास केला. शके १६९६ माघ व. १३ पैठण येथें यांचा मृत्यू झाला. बाबांचा शिष्यसांप्रदाय फार मोठा असे. नरहरिनाथ हे यांचे पुत्र असून त्यांचीहि कविता उपलब्ध आहे.

यांचे ग्रंथः—विवेकदर्पण (१६९३), ज्ञानप्रदीप, व भक्तिरहस्य. शिवाय निरनिराळ्या देवांवरील बरींच प्रासादिक पदें आहेत. जर्जरीबक्ष नांवाच्या मुसलमान अवलियानें यांच्या कीर्तनावर संतुष्ट होऊन यांना दीन (धर्म) अशी पदवी दिली. तेव्हांपासून शिवनाथाचें शिवदीन असें नांव झालें. तसेंच पैठणच्या शहा दावल या यांच्या बैठकींतल्या मुसलमान अवलियावर ' वाहवा शहा दावल पीर जागते आवल ' असें यांचें एक पद आहे.

यांच्या पत्नीचें नांव उमाबाई. उमाबाईचें पत्र मठांत उपलब्ध आहे. यांचे पुत्र नरहरीनाथ व गदाधरनाथ. नरहरीनाथाचा मुलगा लक्ष्मीनाथ हा मोठा अधिकारी पुरुष असून त्याची समाधी आळंदी येथें केसरीनाथाच्या समाधीशेजारीं आहे.

यांच्या गुरुपरंपरेस पुढीलप्रमाणें सुरुवात होते—श्रीआदिनाथ, मत्स्येंद्रनाथ, गोरखनाथ, गैनीनाथ, निवृत्तिनाथ, ज्ञाननाथ, सत्यामलनाथ वगैरे.

शिवभट साठे—(स. १७५६–८७) हा नागपूरकर भोसल्यांचा ओरिसाचा सुभेदार.

हा जानोजी भोसल्याचे पक्षाचा असून मुधोजीच्या विरुद्ध होता. पण माधवराव पेशवे व जानोजी यांच्या भांडणांत हा माधवराव पेशव्यास मिळाला.

मीर कासीम व मीर जाफर यांशीं संधान ठेवून बंगाल्यांत इंग्रजांचा प्रवेश न होऊं देण्याचा याचा प्रयत्न होता.

, इंग्रजांनीं याच्याविरुद्ध जानोजीकडे लिहून यास सुभेदारीवरून कमी केलें व यास कैद करवलें (ता. २४-४-१७६४). दोघेहि मीर इंग्रजांच्या कच्छपी असल्यानें यांस चौथाई मिळेना.

शेवटीं यानें इंग्रजांशीं युद्धहि करण्याचा प्रयत्न केला. पण इंग्रजांपुढें याचा टिकाव लागेना. दिल्लीच्या बादशहानें बंगाल ओरिसाची सनद इंग्रजांना दिल्यानें व घरची मदत नसल्यानें याचे प्रयत्न फिके पडले. याचा भाऊ भास्करराव.

जानोजीस हा कटक प्रांत सरळ ताब्यांत देईना तेव्हां जानोजीनें यावर भवानी काळूस पाठविलें तेव्हां हा इंग्रजांच्या आश्रयास गेला. व इंग्रजानें याला ठेवून घेतलें.

यानंतर शिवभट पेशव्यांकडे जाऊन नोकर राहिल्याचा दाखला सांपडतो. त्याची पुढील हकीकत उपलब्ध नाहीं.

स. १७५६ पासून आठ वर्षे ओरिसाच्या सुभेदारीचें काम शिवभट करीत होता. याच्या कारकीर्दीतील बराचसा भाग हिंदुस्तान सरकारच्या रेकॉर्ड ऑफिसनें प्रसिद्ध केलेल्या पत्रव्यवहारावरून कळून येतो (Calendar of Persian Correspondence, Vols. I-V).

ओरिसांतील शिवभटाचा अंमल प्रजेस बराच सुखावह झाला. तो आला त्या वेळीं सर्व प्रांत उध्वस्त झाला असून सर्वत्र अव्यवस्था माजलेली होती. यानें सुव्यवस्था करून प्रांताची जमाबंदी उतरविली व त्यामुळें प्रांताचें उत्पन्नहि वाढलें. पुष्कळशा इंग्रज लेखकांनीं मराठ्यांच्या ओरिसांतील राज्यकारभाराविषयीं निंदा केली आहे परंतु शिवभटाच्या कारभारासंबंधानें त्यांनाहि स्तुतीच करावी लागली (ना. प्रां. इ.).

शिवमार गंग—(स. ६६८) हा पश्चिम गंग घराण्यांतील असून यानें आपला अंमल बऱ्याच प्रांतांवर गाजविला. अमोघवर्ष दिंडी कोजेरींग या राजाने याचा आश्रय घेतला.

२. (स. ८०५–८१०) हा पश्चिम गंगांपैकी दुसरा शिवमार होय. ध्रुव राष्ट्रकूटानें याला कैद केलें. सुटला तरी पुनः जिंकलें. तिसऱ्या गोविंदानें याला पुनः गादीवर बसविलें.

शिवरथ—काश्मीरच्या उच्चल राजाचा हा प्रधान होय.

२. (स. ५४१–४२) हा बनवासीच्या कदंबांपैकी मृगेशवर्म्याचा पुत्र व रविवर्म्याचा भाऊ.

शिवराम घोरपडे—हा मुरारराव घोरपडघाचा पुतण्या होय. हैदरानें मुरारराबास मुलाबाळांसह ठार मारल्यावर पुढें हा हैदराशीं लढतच होता. पण सावर्शाचे लढाईंत ता. ९।१।१७७७ रोजीं जखमी होऊन हैदराकडे पाडाव झाला, मात्र दंड भरून सुटला. कालांतरानें मुरारराबाचा दत्तक होऊन सोंडूरचा मालक झाला.

घोरपडघांची एक शाखा हैदराचे नोकरींत होती, त्यांत शिवराम घोरपडे याचें नांव येतें. यास कुंदगोळकर असें म्हटलेलें आहे (म. रि. उत्तर वि. १ ला पृ. ४४५-४४६).

शिवरामभट्ट चित्राव—(मृत्यु स. १७५१) हा पेशवाईंत अत्यंत थोर साक्षात्कारी पुरुष होता. पेशवे, बाबूजी नाईक बारामतीकर, भोसले नागपूरकर, पंतसचीव वगैरेवर यांचें अत्यंत वजन असे. नानासाहेब पेशवे व चिमाजीअप्पा यांचे दर्शनास जात (पु. द. १. १३४). यांनीं पाषाणचा सोमेश्वर, नागेश्वर (भारतवर्ष २.पा. १३; पे. द. २२-२९१), केदारेश्वर, उद्धरचा रामेश्वर वगैरे भव्य देवालयें बांधलीं; व कित्येकांचे जीर्णोद्धार केले. पुण्याच्या गणेशखिंडीतलें गणपतिमंदिरहि यानेंच बांधलें. पाषाणच्या शिवलिंगाची पुनः प्रतिष्ठा केली (पु. द. ३. १०८–११३). पण यांचें सर्वांत स्मरणीय व प्रेक्षणीय काम म्हणजे पुणें येथील ओंकारेश्वराचें विशाल मंदिर होय. त्या मंदिराचें काम यांनीं सुरू केलें, आणि यांचे पुत्र कृष्णभट यांनीं तें पुरें केलें. पेशव्यांनीं द. म. १००० रु. प्रमाणें ९ महिने पैसे दिले. बाकीचे पैसे यांनीं इतर राजेरजवाड्यांकडून मिळविले. मंदिराकरितां सुमारें १।। लक्ष रु. खर्च झाले, असें उपलब्ध हिशोबावरून लक्षांत येतें.

यांचा पाषाणच्या सोमेश्वरास नित्य जाण्याचा नियम असे. एकदां गणेशखिंडींत यांना विपुल भूमिगत द्रव्य सांपडलें. भूमिगत द्रव्य राजाचें म्हणून यांनीं तें पेशव्यांचे स्वाधीन केलें. पेशव्यांनीं त्या रकमेचें व्याज म्हणून यांना द. सा. १८८८ रु. देण्याचें ठरविलें आणि यानेंहि त्या रकमेंतून पाषाण व पुणें येथें दोन अतिरुद्राचे स्वाहाकार करण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें त्या वेळेपासून आतांपर्यंत सरकारांतून ते पैसे मिळत आहेत, व दरवर्षी शिवरात्रीचे वेळेस ते स्वाहाकार चालू आहेत. शेवटीं हे संन्याशी होऊन पाषाण येथें यांनीं जिवंत समाधि घेतली. त्याची मिती शके १६७४ चैत्र व. ५ गुरुवार अशी राजवाडे खं. ६पा. ६४ वर दिली आहे, पण त्यांची पुण्यातिथि मात्र फाल्गुन शु. १ ला होत असते. यांचें घराणें ओंकारेश्वरापाशीं नांदत आहे. ओंकारेश्वराचें मंदिर याच घराण्याचे ताब्यांत असून पूजेअर्चेकरितां सरकारी नेमणूक आहे. हे गणो गबाजीच्या घराण्यांपैकीं वासुदेवभटाचे पुत्र होत.

याच प्रसंगानें गणो गबाजी चित्राव यांच्या घराण्याची थोडक्यांत माहिती पुढें देत आहों.

चिंचवडकर चित्राव घराणें—शिवरामभटांचे बंधु गोविंद भट यांचेपासून ही शाखा सुरू झाली. या घराण्यांत गोविंद–वामन–चिंतामण–विनायक–शंकर असे लोक झाले. शंकराची पत्नी उमाबाई फक्त हयात आहे. गोविंदला आणखीहि सिदंभट, रघुनाथ व गणेश अशीं मुलें होतीं, पण त्यांचीहि आतां नकल झाली आहे.

कडूसकर घराणें—शिवरामभटांचा एक चांगदेवभट नांवाचा भाऊ होता, त्यापासून कडूसची शाखा सुरू झाली. त्या शाखेंत भटंभट–आपाभट–त्रिंबकभट व शंभुभट अशीं माणसें होऊन नकल झाली. त्यांची सर्व मिळकत व मंदिर त्यांचे उपाध्ये थिटे हे सध्यां कडूस येथें वहिवाटींत आहेत.

चित्राव घराणें—चित्राव आडनांवानें ओळखली जाणारीं चार घराणीं प्रसिद्ध आहेत. त्यांपैकीं तीन ऋग्वेदी असून चवथें शुक्लयजुर्वेदी काण्वशाखेचें आहे. चित्रावांपैकीं, वाई आणि पुणें येथील दोनहि कौशिकगोत्री आहेत आणि इंदापूरचे भारद्वाजगोत्री आहेत आणि काण्वशाखेपैकीं पुण्याचा सुभेदार श्रीपत बापूजी हा उत्तर पेशवाईंत प्रसिद्ध होता. पुणें आणि वाई येथील घराणीं देवता आणि गोत्र या दृष्टीनें एक असलीं तरी त्यांचा संबंध दाखवतां येत नाहीं. वाईच्या घराण्याचे कागद, कै. राजवाडे यांनीं 'शिवकालीन ऐतिहासिक घराणीं' (खं. २०) या खंडांत छापले आहेत. त्यावरून वाईच्या चित्राव घराण्याची थोडी माहिती मिळते. आजहि वाईस चित्राव घराणें नांदत आहे.

पुणें शाखा—पुण्यास गणो गबाजी चित्राव (तबीब) हा प्रथम आला. त्याचा धंदा शस्त्रवैद्यकीचा असून तो शहाजी राजांच्या विश्वासांतील माणसांपैकीं एक होता व त्याला शिवाजीमहाराजांबरोबर राहण्याकरितां दौलताबादेहून मुद्दाम धाडण्यांत आलें होतें असें दिसतें. त्यानें येथें आल्यानंतर पुण्यास जागा मिळवली ती जागा मुरार जगदेवानें पुणें जाळलें तेव्हां बेचिराख जाहली (स. १६२९), म्हणून गांवच्या प्रमुख हकदारांनीं स्वतंत्र व विस्तृत जागा दिली. तीच अमृतेश्वराजवळील सध्यांचा चित्रावांचा वाडा होय. त्याची शिवकालीन सनद उपलब्ध आहे. गणो गबाजीचा बराच शिवकालीन पत्रव्यवहार उपलब्ध असून त्यापैकीं कांहीं प्रसिद्धहि झाला आहे.

त्यापैकीं एका पत्रांत जिजाबाईनें शिवाजीमहाराजांना 'चिरंजीव शिऊबा' असें उल्लेखिलें आहे. हा पत्रव्यवहार स. १६१३-७७ सालापर्यंतचा आहे. त्यांत यास तबीब, इनामदार, पुरातन सेवक वगैरे शब्दांनीं संबोधिलें आहे. गणो गबाजीचा भाऊ विष्णु गबाजी. गणो गबाजीला संतति नव्हती. त्याचा भाऊ विष्णु गबाजी. याच वेळीं विष्णूचा चुलता आपदेवभट चित्राव हा विद्वान् म्हणून प्रसिद्धीस आला. मुरार जगदेवानें तुलापुरास सुवर्णतुला करून ज्या ब्राह्मणांस अग्रहार दिला (स.१६३३), त्या विद्वान् ब्राह्मणांत आपदेवभटाचें नांव आहे (प. सा. ३६३). शिवाय अनेक निर्णयपत्रांवर त्यांच्या सह्या आहेत. त्यांनीं लिहिलेले कांहीं ग्रंथहि असावेत. यानंतर विष्णु गबाजीचा पुत्र त्रिंबक. त्रिंबकचे मुलगे वीरेश्वर व मारेश्वर हे विद्वान् असून शलाढाली होते असें दिसतें. त्यांनीं शाहूमहाराज खानदेशांतून नाशकास येतांच त्यांची भेट घेतली व 'महाराष्ट्र राज्याचा हितचिंतक' म्हणून जमिनीची सनद मिळविली (स. १७०७-१७२८). महाराष्ट्रधर्म हा शब्द त्या वेळीं रूढ दिसतो. वीरेश्वराचा पुत्र रंगभट हा बराच कर्तृत्ववान् असून बारामतीकरांची त्यावर श्रद्धा होती. त्यामुळें भिऊबाई बारामतीकरांच्या पैशानें पुणें येथें सिद्धेश्वराचें देऊळ बांधलें गेलें. त्याची सर्व व्यवस्था वंशपरंपरेनें चित्राव घराण्याकडे देण्यांत आली (स. १७४९) असें सदाशिवराव भाऊ यांच्या शिफारशीची एक यादी उपलब्ध आहे तीवरून दिसतें.

मूळचें अमृतेश्वराचें देऊळ याच सुमारासचें असावें (स. १७५०). कारण त्याचीहि पूजा भाऊसाहेबांनीं (बाबूजी नाईक यांनीं) रंगभटांना सांगितल्याचा सनदेंत निर्देश आहे. फक्त तें देवळाखालीं असणाऱ्या नाल्यानें वाहून गेल्यामुळें सवाई माधवराव पेशव्यानें नाना व हरिपंत यांच्या सल्ल्यानें त्याची दुरुस्ती केली (स.१७९०). आणि त्यानंतर नीळकंठ आबूजीनाईक बारामतीकरांनीं पिंपरीच्या इनामाच्या पुनः सनदा करून दिल्या (स. १७९२). या वेळीं रंगभटाचा नातू व रघुनाथभटाचा पुत्र पांडुरंगभट होता. तेथील जमीन सध्यां चित्रावांकडे वहिवाटीस आहे. याच पांडुरंगभटानें विष्णूचें देऊळ व राममारुति वगैरेचीं देवळें बांधलीं. पांडुरंगाचा मुलगा रघुनाथ. रघुनाथ अज्ञात असतां त्याची आई रमाबाई घरचा कारभार पाहत होती, असें त्या वेळीं झालेल्या कांहीं हुकूमनाम्यांवरून दिसतें. पूजेकरितां ठेवलेल्या खरे, हातवळणे वगैरे लोकांनीं आपला वहिवाटीचा हक्क सांगितल्यानें दावे झाले. प्रथम त्यांचा चित्रावांविरुद्ध निकाल लागून नंतर अनुकूल निकाल लागल्याचे दाखले आहेत. रघुनाथाचा पुत्र नारायणभट याची कारकीर्द मोठी असून त्या वेळीं पेशव्यांची सत्ता संपून इंग्रजी अंमल सुरू झाला. शेवटीं वृद्धापकाळ झाल्यामुळें व संतति नसल्यानें नीळो सखाराम धडफळे यांचा नारायण नांवाचा आठ वर्षांचा मुलगा दत्तक घेऊन त्याचें नांव विष्णु असें ठेवलें (दत्तक पत्र स. १८५२). त्या वेळीं भाऊबंदांकडून परगोत्री दत्तक म्हणून प्रकरण कोर्टात गेलें, पण शेवटीं अनुकूल निर्णय होऊन सरकारी हुकुमांनीं देवस्थानची व्यवस्था विष्णु नारायणांच्या ताब्यांत आली. त्यांनाहि संतति नसल्यानें नीळो सखाराम धडफळे यांचे नातू रंगो वामन धडफळे यांचा मुलगा दत्तात्रेय यास दत्तक घेऊन त्याचें नांव सिद्धेश्वर असें ठेवण्यांत आलें. तेच या ग्रंथाचे कर्ते सिद्धेश्वर विष्णु चित्राव होत.

शिवराम लिमये—हे पेशव्यांचे खासगी कारभारी होते म्हणून यांस खासगीवाले म्हणत. यांनीं पंढरपुरास विठोबाचें मंदिर बांधलें. यांचा पिता कृष्ण.

२. (स. १७७३) हा शिवराम कृष्णाचा नातू. हा मोठा धाडसी व शक्तीचा पुरुष होता

शिवरामस्वामी—(स. १७४५ सुमार) निजाम राज्यांतील कल्याणीस यांचा मठ आहे. यांचा पिता नारायण ऊर्फ पूर्णानंद. काश्यपगोत्री दे. ऋ. ब्राह्मण. येकेहाळी व आपचंद मठांत यांचा बराच अप्रसिद्ध ग्रंथसंग्रह आहे. यांचे ग्रंथ-१ गंडिकाख्यान (काव्यसंग्रहांत प्रसिद्ध), २ नानासाहेब पेशव्यास उपदेश वगैरे तेरा ग्रंथ (म. क. च. ३, पृ. १०१-११०). हे मराठीतील भक्त कवि होत.

शिवराव पटवर्धन (कुरुंदवाड)—(रघुनाथराव पाहा).

शिवश्री पुलोमा—(स. १५८-१६५) आंध्रांपैकीं एक राजा. यालाच पुलोमा तिसरा असें म्हणतात. हा पुलुमायीचा भाऊ असून त्याच्यानंतर गादीवर बसला (Bhand. p. 34). यांचीं नाणीं तैलंगण जिल्ह्यांत सांपडलीं आहेत. यानें स. १५८-१६५ पर्यंत राज्य केलें (Bhand. p. 50).

शिवसहायदास—एक हिंदी कवि. हा जयपूरचा राहणारा. यानें शिवचौपाई आणि लोकोक्तिरसकौमुदी या नांवांचे दोन ग्रंथ लिहिले आहेत. यानें परवान असें नांव स्वीकारून नायिकाभेद सांगितला आहे.

शिवस्कंदवर्मन् पल्लव—(स. २५०-७५) हा पल्लव घराण्यांतील असून भारद्वाज गोत्री होता. हा आपणास 'धर्म-महाराजाधिराज' ही पदवी लावीत असे.

याची राजधानी कांची येथें होती. यानें अग्निष्टोम, वाजपेय आणि अश्वमेध हे यज्ञ केले. त्यामुळें हा आपणास धन्य समजत असे. यानें 'धर्म' ही पदवी महाराज याच्या अगोदर लावली. गोलशर्मन् नांवाच्या अत्रिगोत्री ब्राह्मणाला यानें एक गांव बक्षिस दिलें. या घराण्यांत अनेक स्कंदवर्मन् झाले आहेत. फक्त हाच शिवस्कंदवर्मन् या नांवानें ओळखला जातो.

शिवस्कंध शातकर्णि—यानें स. १६५-१७२ पर्यंत राज्य केलें (Bhand. p. 50).

शिवा—वैशालीच्या चेतक लिच्छवीची मुलगी. ही उज्जैनीच्या चंदप्रद्योताची पत्नी होय. हिला प्रभावती, पद्मावती, मृगावती, ज्येष्ठा, सुज्येष्ठा आणि चेलना अशा सहा बहिणी होत (Ct. Avasyaka Sutra, p. 677).

शिवाजी—(जन्म स. १६३०, राज्यारोहण स. १६७४, मृत्यु स. १६८०) या स्वराज्यसंस्थापक थोर पुरुषाचा जन्म जुन्नर नजीक शिवनेरी किल्लयावर स. १६३० फेब्रुवारी १९ (श. १५५१ फाल्गुन वद्य ३) रोजीं सूर्योदयानंतर ३० घटकांनीं सिंहलग्नावर झाला (शि. भा. पृ. ५६). त्या वेळीं बाप शहाजी दर्याखानावर स्वारी करण्यासाठीं उत्तरेकडे गेला होता. तो पंचहजारी मनसब मिळवून परत आला तेव्हां त्यानें प्रथम शिवाजीस पाहिलें. पुढें पांचसहा वर्षे तो स्वतंत्र निजामशाही स्थापण्यासाठीं लढत होता तेव्हां याचें राहणें शिवनेरीवरच होतें. सातव्या वर्षी याला व याची माता जिजाबाई हिला शिवनेरीहून सिंहगडानजीकच्या 'खेड' गांवीं दादाजी कोंडदेव याच्या देखरेखीखालीं ठेवण्यांत आलें (प. सा. २५९०). तेव्हां यास लिहिणें वाचणें शिकविण्यास सुरुवात झाली आणि तेथें जी पेठ वसविण्यांत आली तिला 'शिवापूर' असें याचें नांव देण्यांत आलें (प.सा.२५९०).

या वेळीं विजापूरकरांचा सरदार या नात्यानें शहाजी कर्नाटकांत रणदुल्लाबरोबर अनेक पाळेगारांना जिंकण्यांत गुंतला होता. आणि तिकडील कामगिरीबद्दल त्यास बंगळूर हें शहर बक्षीस मिळालें होतें, तेथें यांनाहि नेण्यांत आलें. शिवाजीस बारावें वर्ष लागलें तेव्हां (स. १६४१) शहाजीनें पुणें परगण्याचा पोट मोकासा याचे नांवें केला आणि नंतर जिजाबाईसह याची पुण्याकडे रवानगी केली.

देशीं आल्यावर दादाजीच्या देखरेखीखालीं याला पुस्तकी, लष्करी व व्यावहारिक शिक्षण मिळालें व निंबाळकर घराण्यांतील सईबाईशीं लग्न झालें. दादाजी हा कोंढाण्याचा सुभेदार व शहाजीचा पुणें मावळ प्रांतांतील व्यवस्थापक होता. व ही व्यवस्था लावण्यासाठीं दादाजी व शिवाजी यांनीं कसून मेहनत केली. तथापि ही व्यवस्था मनासारखी होण्याच्या कामीं अनेक अडथळे येत असत. एक तर मावळांतील सर्व भाग शहाजीच्या ताब्यांत दिलेला नव्हता. शिवाय शहाजीवर दरबारची गैरमर्जी झाल्यास त्याचा परिणाम याच्यावर होई.

पुढें दादाजी मरण पावला (स. १६४७). तेव्हां शहाजी कर्नाटकच्या स्वारींत गुंतला आहे असें पाहून यानें कोंढाणा ताब्यांत घेतला आणि पुणें परगण्याचा कारभार शिवाजी स्वतः पाहूं लागला. पुढें लवकरच कर्नाटकांत शहाजीस लष्करी हुकमाची अवज्ञा केल्याबद्दल मुस्तफाखानानें कैद केलें आणि फत्तेखानास कोंढाणा घेण्याकरितां शिवाजीवर रवाना करण्यांत आलें. त्यास कोंढाणा घेण्याच्या कामीं यश न आल्यानें तो शिरवळवरून पुरंदराकडे वळला. कावजीनें शिरवळच्या कोटाजवळ त्याच्या सैन्यास मागें हटविलें,पण पुरंदरावर शिवाजीनें बाणांचा व दगडांचा वर्षाव करून तलवारीचा असा हल्ला चढविला कीं, त्याला पराभूत होऊन विजापूरास परत जावें लागलें. शेवटीं शिवाजीनें सिंहगड व संभाजीनें बंगळूर देऊन बापाची सुटका करवली आणि शिवाजी खेडेबारे सोडून पुरंदरावर राहूं लागला. शहाजीच्या सुटकेसाठीं यानें दिल्लीला पत्र लिहून आदिलशाहाला शह देण्याचा प्रयत्न केला पण दिल्लीचा शह येण्यापूर्वीच शहाजीची सुटका झालेली दिसते. यानंतर शहाजी चार वर्षे देशीं होता. आणि दरबारहि शहाजीचा शह पत्रद्वारें शिवाजीस देऊन त्यास पड घ्यावयास लावी.

या अवधींत पुणें व सुपें येथील मोकासे शहाजीच्या नांवें व इंदापूर परगण्याचा शिवाजीच्या नांवें चालू होता. या चार वर्षांत जेनाखान पीरजादे हा पुणें परगण्याचा सर हवालदार असून स. १६५५ पर्यंत त्याच्या संमतीनें शहाजीस हुकूम द्यावे लागत. कनकगिरीच्या वेढ्यानंतर शहाजीची नेमणूक जिंजीकडे झाली. यामुळें बापलेकांच्या भेटी होणें कठीण झालें.

मावळांतील हालचालींना आळा घालण्याकरितां आणि तोरणा व राजगड येथें किल्ल्यांचें बांधकाम सुरू करून चाललेली तयारी थांबविण्याकरितां फत्तेखानास सैन्य देऊन विजापूर दरबारनें शिवाजीवर पाठविलें. परंतु हा सावध असल्यामुळें त्याचा पराभव करूं शकला.

विजापूरचा मुहम्मद आदिलशाह मरणास टेकल्यामुळें कोंकणांतील अधिकारी विजापूराकडे गेले. अशा संधींत यानें राज्यविस्तार करण्याचें ठरविलें. जावळीचा चंद्रराव मोरे अलीकडे याशीं विरोध करूं लागला. शिवाय त्याच्या घरांत भाऊबंदकीहि होती. यानें चाल करून जावळी ताब्यांत घेतली पण चंद्रराव पळून रायगडीं गेला. तेव्हां यानें तोहि किल्ला घेऊन कल्याण भिवंडीपर्यंतचा मुलूख हस्तगत केला. सुपें येथें शहाजीनें ठेविलेला संभाजी मोहिते हा हवालदार अन्यायानें वागूं लागला व शहाजीचेहि हुकूम मानीना, यासाठीं त्याला कैद करून यानें सुपें ताब्यांत घेतलें. निळकंठराव मेल्यावर (स. १६५४) त्याच्या मुलांत तंटे लागले हें पाहून यानें पुरंदर किल्ला ताब्यांत घेतला आणि त्याची व्यवस्था लावली. आठ वर्षांपूर्वी द्यावा लागलेला कोंढाणा किल्ला व त्या सभोवारचा खेडेवारे महालचा प्रदेश यानें ताब्यांत घेतला. आणि गडांचीं जुनीं नांवें बदलून नवीं ठेविलीं. कोंढाण्याचें नांव सिंहगड हें याच वेळीं ठेवण्यांत आलें.

तात्पर्य, शिवाजी सोळाव्या वर्षापर्यंत दादाजी कोंडदेवाच्या सल्ल्यानें वागे. पुढील नऊ वर्षें शहाजीच्या प्रतिनिधि म्हणून यानें काम केलें, पण सव्विसाव्या वर्षापासून मात्र स्वतःच्या जबाबदारीवर हालचाली सुरू करून विजापूरकरांचें आधिपत्य त्यानें उघड झुगारलेलें दिसतें.

या सुमारास विजापूर दरबारांत पक्षभेद माजून रुस्तुमजमा, सीद्दीजोहर वगैरे सरदारांनीं स्वतंत्र होण्याचा प्रयत्न चालविला होता त्यांतलाच याचा प्रकार भासला. विजापूरचें राज्य बुडविण्यास निघालेल्या औरंगजेबानें मात्र या प्रकारास उत्तेजन दिलें. 'विजापूरकरापासून मीं घेतलेले किल्ले व मुलूख मजकडे कायम ठेवण्यांत येत असतील तर मी मोंगलांची मनसबदारी पत्करण्यास तयार आहें' असें पत्र शिवाजीनें औरंगजेबाकडे धाडलें होतें. पण कांहीं अटींबद्दल मतभेद झाला आणि मोंगली सैन्य विजापूरकरांचें कल्याणी व बेदर घेण्यांत गुंतलें असतां यानें जुन्नर लुटून पुष्कळ संपत्ति मिळविली आणि अहमदनगरपर्यंत मोंगली मुलखांत धुमाकूळ सुरू केला. तेथें नौसीरखानाशीं गांठ पडल्यानें याला परत यावें लागलें. यानंतर जंजिऱ्याच्या सिद्दयावर मराठ्यांनीं स्वारी केली. अशा प्रकारें मोंगलांशींहि यानें विरोधास सुरुवात केली. औरंगजेबास दिल्लीच्या हुकमावरून विजापूरकराशीं तह करावा लागला. त्यांत मोंगलांना मिळणारा कांहीं मुलुख यानें आधींच काबीज केला होता. त्यामुळें शिवाजी व औरंगजेब यांचें युद्ध होण्याचा प्रसंग आला, पण शहाजहानच्या आजारीपणामुळें घाईनें औरंगजेबास दिल्लीकडे परतावें लागलें. त्या वेळीं यानें माफीचें पत्र पाठवून मोगलांचा विरोध तात्पुरता थोपवून धरला.

पुढें यानें अफजलखानाच्या ताब्यांतील कर्नाटकांतील मुलखावर चाल केली (स. १६५८ आक्टो.) याच्या सैन्याची संख्याहि तीन हजारांवरून दहा हजारांवर आली (स. १६५९). भोंवतालच्या मुलखावर दरारा वाढला. शहाजीची सुटका झाल्यावर यानें पहिलीं पांच वर्षें पड घेऊन पुढील चार वर्षें उघड चढावाचें धोरण स्वीकारलें. याच्या कसोटीची आतां वेळ आली.

गोपाळभट महाबळेश्वरकरास व समर्थांच्या चाफळच्या मठास या वेळीं यानें दिलेल्या देणग्या, या वेळची याची मनःस्थिति दर्शवितात. मक्केकडे जाणाऱ्या यात्रेकरूंची कोंकणांतील बंदरांत लूट व कल्याणभिवंडीकडील मशीद उध्वस्त केल्याची बातमी यानें 'हा मुसलमानावर आक्रमण करीत आहे' अशी समजूत झाली. मुसलमानांच्या लुटीचें कारण देऊन याचा 'निर्मूल फडशा' करण्याकरितां अफजलखानाची यावर रवानगी केली. अफजलखानानेंहि पंढरपूरादि क्षेत्रांस उपद्रव देऊन या स्वारीला धर्मयुद्धाचें स्वरूप आणलें. शेवटीं भेटींत अफजलखानानें शिवाजीची मुंडी खाकेंत दाबून हत्यार चालविण्याचा प्रयत्न केला. तेव्हां डोकें हिसडून घेऊन यानें त्याला देहान्त प्रायश्चित्त दिलें (स. १६५९ नवं. १०).

शिवाजीनें स्वतंत्र राज्याचा उपक्रम केला तो मोडून काढणें हें अफजलाच्या स्वारीचें उद्दिष्ट होतें. पण सामर्थ्य वाढविण्याकरितां राजकीय हेतूला धार्मिक भावनेचा आधार देण्यांत आला. पण त्यामुळें शत्रुपक्षाचें बल वाढून नेमका पराजय पदरीं आला. यापुढें मात्र विजापूरकरांच्या सेनापतीनें धार्मिक भावनेचा उच्चार केला नाहीं.

यानंतर याच्या हालचाली फार जोरानें सुरू झाल्या. दिल्लीकडे वकिलांमार्फत सलोख्याचें संबंध ठेवून आदिलशाही किल्ले व मुलूख घेण्याचा यानें सपाटा चालविला. पन्हाळा घेऊन गदग-लक्ष्मेश्वरापर्यंत खंडणी घेतली. रुस्तुमजमा व फाजलखान यांना शिवाजीशीं विरोध न करितां पळून जावें लागलें. शिवाजीनें पन्हाळ्यास ठाणें दिलें आणि नेताजीच्या द्वारा हुकेरी, धारवाड, अथणी, तिकोटें वगैरे भागांत धुमाकूट घातला. तेव्हां विजापूरकरांनीं आपली कुवत ओळखून मोगलांची मदत मागितली आणि सीद्दीजोहरास सलाबतखान पदवी देऊन यावर रवाना केलें. त्यानें शिवाजीला पन्हाळ्यांत कोंडलें, रसद बंद केली. नेताजी व सीद्दी हिलाल यांचे वेढा उठविण्याचे सर्व प्रयत्न संपले. अचानक शाहिस्ते-

खानाचीहि स्वारी याच वेळीं झाली. तेव्हां शिवाजीनें धाडस करून सहाशें शिपायांनिशीं फळी फोडून जाण्याचें काम केलें आणि बाजी प्रभूनें जिवाची तमा न धरतां शत्रुसैन्यास थोपवून धरलें, यामुळें हा पन्हाळ्याहून विशाळगडावर सुखरूप जाऊं शकला (स. १६६०, जुलै १३).

मागें त्रिंबक भास्कराच्या नेतृत्वाखालीं पुष्कळसें सैन्य पन्हाळ्यांत गुंतलें होतें. त्यांनाहि परत येण्याचा शिवाजीनें हुकूम धाडला. वास्तविक सीदीजोहर फितुर नव्हता. तथापि अली आदिलशहा संशयखोर असल्यामुळें जोहरला बंडाचें निशाण उभारावें लागलें.

इकडे शाहिस्तेखान ७७ हजार स्वारांनिशीं व अनेक प्रकारच्या युद्धसामग्रीनिशीं आला. वाटेंत अनेक गांवें उध्वस्त केलीं आणि त्यानें चाकणच्या किल्ल्यास वेढा देऊन तो घेतला.

या वेळीं पन्हाळा व चाकण हे किल्ले गेल्यानें त्याचा बचपा काढण्यासाठीं कोंकणांत कांहीं किल्ले घेणें व पैसा मिळविणें आणि सैन्य संभाळून वाढविण्याचें धोरण यानें स्वीकारलेलें दिसतें.

शाहिस्तेखानानें पुण्यास तळ देऊन राजगडाकडे कांहीं सैन्य रवाना केलें. त्यांना अडविण्याकरितां शिवाजी व नेताजी हे सैन्यासह लोहगडच्या बाजूस गेले. तेव्हां कारतबखान व रायबागीण वगैरे मोगली सेनापति सैन्यासह उंबरखिंडीनजीक एका अरुंद सुळक्यावरून उतरण्याच्या खटपटींत असलेले दिसले. त्यांना वेढा देऊन हल्ला केला आणि त्यांना शरण येणें भाग पाडलें. 'जवळची सर्व युद्धसामग्री व द्रव्य मराठ्यांच्या स्वाधीन करून मोगली सेनापतींनीं निघून जावें' या करारावर तह झाला.

पण शाहिस्तेखान या अपमानाचा सूड उगविण्याकरितां दुसरें सैन्य पाठवील असा संभव होता. त्याला तोंड देण्याकरितां नेताजीची नेमणूक करून शिवाजी कोंकणाकडे जावयास निघाला.

प्रथम यानें दाभोळ व चिपळूण हीं शहरें ताब्यांत घेतलीं. नंतर आदिलशाही अधिकारी पळून गेल्यानें संगमेश्वर ताब्यांत घेतलें आणि तेथें अर्धें सैन्य ठेवून शिवाजी राजापुरास गेला. आणि पन्हाळ्याच्या वेढ्याच्या वेळीं इंग्रजांनीं शत्रूला मदत केली म्हणून त्यांच्या वखारी लुटल्या आणि खणून जाळून त्यांचा मागमूसहि राहणार नाहीं इतका नाश केला. विजापूरकरांचा कोणीच सरदार शिवाजीविरुद्ध लढण्यास तयार न झाल्यानें शृंगारपूरच्या सूर्यराव सुर्व्याकडे तें काम सोंपवावें लागलें. त्यानें अचानकपणें याच्या सैन्यावर हल्ला केला तेव्हां पिलाजी निळकंठ घाबरला. पण तानाजीनें प्रसंगावधानानें पुढाकार घेऊन शत्रुसैन्यास पळावयास लाविलें. शिवाजीला यामुळें फार राग आला. प्रथम त्याला भेटीस बोलावून वळविण्याचा प्रयत्न केला पण शेवटीं तो येईना तेव्हां स्वारी करून प्रभावळी प्रांत ताब्यांत घेतला. पांच वर्षांपूर्वी जावळी व रायगड ताब्यांत आल्यानें ज्या शिवशाहीची प्राणप्रतिष्ठा झाली तिचा परिपोष लष्करीदृष्ट्या महत्त्वाचें असें हें शृंगारपूरचें राज्य हस्तगत झाल्यामुळें, करितां आला (स. १६६१ एप्रिल).

यानंतर दोन महिने याचा मुक्काम कोंकणांत पडला. या मुदतींत शिर्क्यामार्फत यानें लखम सावंताशीं तह केला. याप्रमाणें विजापूरकरांचा पुष्कळ मुलुख शिवाजीनें घेतला आणि त्यांचे सरदारहि फोडले. पण याच्याविरुद्ध त्यांना प्रयत्नहि करतां आला नाहीं. या वेळीं अली आदिलशहा कर्नूळकडे सीदी जोहारचें बंड मोडण्यांत गुंतला होता.

या पावसाळ्यांत यानें आपल्या अधिकाऱ्यांना पालख्या देणें, मुलकी व लष्करी भागांतील व्यवस्था निश्चित करणें वगैरे कामें केलीं. मोरोपंतास पेशवाई (स. १६६२ एप्रिल ३), निळोपंतास मुज्मु आणि अण्णाजी दत्तोस सुरनिशी दिली (१६ ऑगष्ट).

याशीं लढण्याची कल्पना सोडून विजापूरकरांनीं या वेळीं अंतस्थ तह केला असें दिसतें.

आतां मात्र यास फक्त मोगलांशीं लढण्यास अवसर सांपडला. यानें नामदारखान नांवाच्या मोगली सरदारास भिरे डोंगरावर गांठून त्याचा पराभव केला.

इकडे शिवाजीनें, पुण्यास तळ देऊन राहिलेल्या, शाहिस्तेखानावर, थोड्या लोकांनिशीं मध्यरात्रीं हल्ला करून त्याचीं बोटें कापलीं आणि त्याच्या मुलास ठार मारिलें (स. १६६५ एप्रिल ५). या अकल्पित हल्ल्यानें मोगली सैन्य आश्चर्यचकित होऊन गेलें असतां शिवाजीनें एकदम कोंकणांत उतरून कुडाळ प्रांत काबीज केला.

इकडे शाहिस्तेखानास परत बोलावून औरंगजेबानें दक्षिणच्या सुभ्यावर जसवंतसिंगाची नेमणूक केली. आणि त्यानें कोंढाण्यास वेढा घातला. तरी त्यास न जुमानतां शिवाजीनें सैन्यासह सुरतेवर जाऊन तें समृद्ध शहर चार दिवस लुटून कोट्यवधि रुपयांची संपत्ति मिळवली (स. १६६४ जाने. ६-१०). पुढें मराठ्यांनीं जसवंतसिंगाचा कोंढाण्याचा वेढा मारून काढला. यानंतर जयसिंग व दिलेरखान यांना मोठ्या सैन्यानिशीं याच्या पारिपत्याकरितां धाडण्यांत आलें. ते इकडे पोचण्याच्या पूर्वी यानें अहमदनगरकडील मोगली मुलखांत लुटालूट केली.

पण याच वेळीं विजापूरकरांनीं सलोख्याचा तह मोडला तेव्हां यानें कुडाळ प्रांतावर स्वारी केली. मुधोळच्या बाजी घोरपड्यानें त्यांना मदत करण्याची तयारी केली. तेव्हां यानें विजापूरकरांच्या खवासखानास पळून लावलें आणि बाजी घोरपड्यास युद्धांत ठार मारिलें. वाडीचा सावंत या वेळीं विरुद्ध झाला. त्यालाहि यानें शरण आणलें. पुढें वेंगुर्ला व हुबळी हीं शहरें लुटलीं.

यानंतर मालवण बंदरांत जहाजांत बसून हा बनसूरच्या स्वारीत गेला (स. १६६५ फेबु. ८). तेव्हां बरोबर २५ लहान व ३ मोठीं गलबतें घेतलीं असून गोवेकरांकडून विरोध न होतां हा बसनूरास गेला आणि लूट करून गोकर्णावरून परत कारवारास आला (२२ फेबु.). याचें आरमारी निशाण पांढरें होतें (प. सा. १९०२). तेव्हां तेथील सुभेदार शेरखानानें गांवांतील व्यापाऱ्यांकडून यांस नजराणा देविला. त्यांत इंग्रजी व्यापाऱ्यांनीं ११२ पौंड दिले.

या वेळीं जयसिंग व दिलेरखान दक्षिणेस पुण्यास येऊन पोंचले. त्यांनीं आपल्या सैन्याचा मुख्य तळ पुरंदरच्या बाजूस दिला. मोरेमंडळी हाताशीं धरून शिरवळकडे कांहीं सैन्य पाठविलें. विजापूरकर व गोवळकोंडेकर यांना शिवाजीला न मिळण्याविषयीं जरबेचीं पत्रें धाडलीं. मोगल व विजापूरकर यांनीं जुटीनें हल्ला केल्यास आपला निभाव लागणार नाहीं असें पाहून यानें पस्तीसांपैकीं २२ किल्ले देऊन जयसिंगाशीं तह केला (स. १६६५ जून १२).

शिवाजीची व्यवस्था लागतांच जयसिंगानें आपल्यास दक्षिणेस बोलावणाऱ्या विजापूरकरावर शस्त्र उपसलें. नेताजी प्रथम विजापूरकरास व नंतर जयसिंगास मिळाला. विजापूरकर व गोवळकोंडेकर यांचा तह झाला. तेव्हां शिवाजीनें उत्तरेकडे औरंगजेबाच्या भेटीस जावें अशी योजना जयसिंगानें घडवून आणली. हा संभाजीसह राजगडावरून निघाला (स. १६६५ मार्च ५) आणि आग्र्यास पोचला (१२ मे). दरबारांत आपला योग्य मान ठेवला गेला नाहीं म्हणून यानें तक्रार केली. त्याचें पर्यवसान याला नजर कैदेंत ठेवण्यांत झालें. पण प्रसंग जाणून यानें मिठाईच्या पेटाऱ्यांत बसून आपली व संभाजीची सुटका करून घेतली (आगष्ट २०) आणि हुलकावणी देऊन जगन्नाथपुरीवरून प्रथम हा गोसाव्याच्या वेषानें राजगडास परत आला (नवं. २०) आणि नंतर संभाजीहि सुरक्षित येऊन पोंचला. परत आल्यावर यानें सलोख्यानें वागण्याची आपली इच्छा असल्याचें औरंगजेबास कळविलें. त्याप्रमाणें तह होऊन प्रतापराव मोगलांच्या दिमतीस सैन्यासह औरंगाबादेस राहिला. याच वेळीं विजापूरकरांशींहि याचा सलोखा झाला. पण तीन वर्षांनीं औरंगजेबानें मराठी सैन्यास अटकाव करण्याचा बेत केला आहे असें समजल्यानें व त्यानें काशीचें देवालय पाडल्यानें तह मोडला आणि प्रतापरावास परत बोलावण्यांत आलें आणि मोगलांशीं युद्धास सुरुवात झाली.

मधल्या चार वर्षांच्या स्वस्थतेच्या काळांत यानें निकरानें तोंड देण्याची तयारी केलेली दिसते. मारूं किंवा मरूं अशा तडफेनें युद्धास तोंड लागलें. धर्मरक्षण आणि स्वतंत्र राज्याची स्थापना या भावनेनें शिवाजीचें यापुढील चरित्र रंगलेलें दिसतें. तानाजी मालुसऱ्यानें सिंहगड घेतांना दाखविलेला पराक्रम आणि उदात्त भावना हीं तत्कालीन मराठ्यांच्या वृत्तीचीं द्योतक होतीं (स. १६७० फेब्रु. ४). पुरंदर, लोहगड, माहुली, कर्नाळा, रोहिडा वगैरे अनेक किल्ले यानें सहा महिन्यांच्या आंत घेतले. चढाईवांचून खरा बचाव होतच नाहीं असें या वेळीं मराठ्यांना वाटून ते चढाईच्या कामासाठीं अहमहमिकेनें पुढें येऊं लागले. आणि शिवाजीनेंहि त्यांच्याकडून विश्वासानें कामें करून घेतलीं.

शत्रूच्या मुलखांत चालून जाऊन मराठ्यांनीं सुरत दुसऱ्यांदा लुटली आणि परत येतांना दिंडोरीपाशीं दाऊदखानानें आडविलें. तेव्हां त्याचा समोरासमोर सामना देऊन पराजय केला.

महाबतखान, बहादुरखान व दिलेरखान यांनीं मोठ्या सैन्यानिशीं खानदेश व बागलण येथें किल्ल्यांना वेढे देऊन मराठ्यांना आडविण्याचा प्रयत्न केला. पण त्यानें त्यांच्यावर हल्ले चढवून त्यांना वेढे उठविणें भाग पाडलें (मोरोपंत पाहा).

मराठ्यांची उमेद सारखी वाढत चालली. शिवाजी लुटारू नसून जबरदस्त राजा आहे ही गोष्ट भोंवतालच्या सत्ताधाऱ्यांच्या ध्यानांत आली. तेव्हां इंग्रज व्यापारी व्यापाराबाबत सवलती मागण्याकरितां रायगडावर खेपा घालूं लागले (स. १६७२). गोवळकोंड्याचा अबदुल्ला कुत्बशाह मेला तेव्हां त्यापुढील अबुल हसननें दरसाल एक लक्ष होन देण्याचें कबूल करून मोगलांना अडविण्याच्या कामीं मराठ्यांनीं पुढाकार घ्यावा या योजनेस मान्यता दिली (स. १६७२ एप्रिल २१).

विजापूरचा अली आदिलशाह मरतांच सिकंदर गादीवर आला. तेव्हां मराठ्यांच्या विरुद्ध असणारा जो खवासखान त्याच्या हातांत सत्ता आली. तेव्हां अण्णाजी दत्तोमार्फत यानें पन्हाळा घेऊन (पर्णालपर्वतग्रहणाख्यानम्) आक-

मणास सुरुवात केली (स. १६७३ मार्च ६). प्रतापरावानें उम्राणीनजीक बहलोलखानाचा पराभव केला (१५ एप्रिल). इतर सरदारांनीं हुबळी, बंकापूर वगैरे भागांत लुटालूट केली व सातारा, पांडवगड वगैरे किल्ले घेतले. महिमाजी शिंद्यानें सर्जाखानाचा पराभव केला. स्वतः शिवाजीनें कारवार प्रांतांत आपला अंमल बसविला. अशा प्रकारें स्वतः व स्वतःच्या हाताखालीं तयार झालेले मराठे सरदार एकाच वेळीं मोगल व विजापूरकर यांना तोंड देण्यास समर्थ असल्याचें दाखवून आपणास रायगडावर राज्याभिषेक करून घेण्याची यानें तयारी केली.

ही कल्पना बाळाजी आवजी व गागाभट्ट यांनीं यशस्वी केली. त्याप्रमाणें मुंज, सुवर्णतुला, वगैरे धार्मिक व लौकिक विधि होऊन शिवाजी महाराज छत्रपति झाले (स.१६७४जून६). हा समारंभ शके १५९६ ज्येष्ठ शु. १३ उजाडतां शनवारीं तीन घटका रात्र असतां झाला. पण तेराव्या दिवशीं राजमाता जिजाबाई निवर्तल्यानें तांत्रिक पद्धतीनें पुनः राज्याभिषेक करण्यांत आला (आश्विन शुद्ध पंचमी); (निश्चलपुरी पाहा).

यानंतरचें वर्ष खानदेशावर स्वारी, हबशाशीं युद्ध आणि फोंडा व कारवार प्रांतांत अंमल बसविण्यांत गेलें. जानेवारींत हा आजारी पडला व दुखण्यांतून उठल्यावर दसऱ्याच्या मुहूर्तावर कर्नाटकच्या स्वारीवर निघाला (स. १६७६).

कुत्बशाहाची भागानगरास भेट घेऊन छत्रपति आणि कुत्बशहा हे बरोबरीचे आहेत हें सर्वांच्या नजरेंत भरेल अशा रीतीनें दाखवून दिलें (स. १६७७ मार्च ४). आणि तेथूनच विजापूर दरबार दाक्षिणात्यांच्या जुटीच्या कल्पनेस मान्यता देत नसेल तर आम्हीं विजापूरचें राज्य बुडवून टाकूं अशी जाहीर घोषणा मालोजी घोरपडे यांना पत्र पाठविण्याच्या प्रसंगानें केली. नंतर हा जिंजीकडे गेला व तो किल्ला घेतला. आणि कर्नाटकांत आपल्या राज्याचा जम बसविला. आपला बंधु एकोजी याची समजूत घालण्याचा यानें प्रयत्न केला पण तो याच्या गोटांतून पळून गेला (स. १६७७ जुलै). तेव्हां संताजीराजे, रघुनाथपंत व हंबीरराव यांच्या हाताखालीं कांहीं सैन्य ठेवून हा तोरगळ व गदगवरून परत आला (स. १६७८ जुलै). या अवधींत मोरोपंत व अण्णाजी दत्तो यांनीं मोगलांचे हल्ले परतविण्याचें काम चांगलें केलें.

नंतर सावत्र आईच्या कारस्थानास कंटाळून असो किंवा बापाच्या गैरमर्जीमुळें असो, संभाजी परळीहून बायकोसह निघून मोगली सेनापति दिलेरखानास जाऊन मिळाला (स. १६७८ डिसेंबर). ही गोष्ट याच्या मनावर आघात करणारी झाली.

पुढें दिलेरखानानें विजापुरावर चाल केली तेव्हां मसुदखानानें याकडे मदत मागितली. यानें इंग्रजाशीं खांदेरी-उंदेरीकडे युद्ध चाललें होतें तरी दाक्षिणात्यांची जूट ही कल्पना धरून सैन्याचे दोन भाग केले व एकामार्फत जालनापुराकडील भाग लुटून जाळून फस्त केला. रणमस्तखान व जाबतेखान वगैरे मोगली सरदार १० हजार सैन्यानिशीं चालून आले पण त्यांना तोंड देत यानें पट्टागड गांठला. मोरोपंतानेंहि अहिवंत किल्ला घेऊन तिकडे धामधूम माजविली. स्वतःचा मुलूख सोडून विजापूरकडे गेला म्हणून औरंगजेबानें त्याला दोष दिला आणि तिकडेहि पराजय होऊन परत यावें लागलें (स. १६७९ डिसें.). संभाजीहि त्याला सोडून पन्हाळ्यास येऊन बापास भेटला (स. १६८० जाने. १३). राज्यावर कोणी बसावें, वाटणी करावी किंवा काय याबद्दल या वेळीं चर्चा झाली असावी. राजारामाची मुंज व लग्न करण्यासाठीं तो पन्हाळ्याहून रायगडास आला आणि तेथेंच दूषित ताप येऊन चैत्री पौर्णिमेस दोन प्रहरीं याचा अंत झाला (स. १६८० एप्रिल ३).

शिवाजीमहाराजांचीं बायकामुलें—

(१) सईबाई—१ पुत्र व ३ कन्या (संभाजी, सकवारबाई, राणूबाई, अंबिकाबाई). (२) सोयराबाई—१ पुत्र व १ कन्या (राजाराम, बाळीबाई ऊर्फ दिपाबाई). (३) सगुणाबाई—कन्या (राजकुवरबाई ऊर्फ नानीबाई). (४) पुतळाबाई. (५) लक्ष्मीबाई. (६) सकवारबाई—१ कन्या (कमलाबाई). (७) काशीबाई. (८) गुणवंताबाई. ह्या क्रमांकांप्रमाणें महाराजांचे विवाह झाले (शिवाजी निबंधावली १, पा. २१०-२२५).

यांशिवाय रामदासस्वामींच्या एका हस्तलिखित चरित्रावरून यास मनोहर व मनसंतोष नांवांच्या दोन विवाहित स्त्रिया होत्या असें दिसतें.

या असामान्य पुरुषाच्या कर्तबगारीनें मराठ्यांना स्वराज्य लाभलें. त्यांच्या धार्मिक व सांस्कृतिक भावनेस राजाश्रय मिळाला, शूर पुरुषांना राजकारणास धार्मिकतेची बैठक देऊन त्यांत पडण्याविषयीं यानें स्फूर्ति दिली, आणि पुढील मराठेशाहीचा हा जनक झाला.

महाराष्ट्रीयांच्या अंगांतील अनेक गुणांच्या वाढीस अनुकूल असें वातावरण, याच्यामुळें निर्माण झालें. राजव्यवहारकोश, करणकौस्तुभ (कृष्ण ज्योतिषीकृत) वगैरे

ग्रंथांची निर्मिति व राज्याची पद्धतशीर घडणी या गोष्टी याच्या चौरस बुद्धीची साक्ष देतात (द. वि. आपटे).

२. (राज्यकाल स. १७००-१७०७) हा छत्रपति राजारामास ताराबाईचे ठिकाणीं झालेला मुलगा. राजाराम मेल्यावर याला गादीवर बसाविण्यांत आलें. त्या वेळीं हा साडेतीन वर्षांचा बालक होता. याची मुंज करून यास पन्हाळ्यास राज्याभिषेक करण्यांत आला. नंतर बुंदकर घाडग्याच्या भवानीबाई नांवाच्या मुलीशीं याचें लग्न झालें. शाहू आल्यानंतर संभाजीला पन्हाळ्यावर गादीवर बसवून याला व ताराबाईला तुरुंगांत टाकण्यांत आलें. पुढें हा देवी येऊन मेला (स. १७१२). तेव्हां भवानीबाई गरोदर होती. तिचा पुत्र रामराजा. त्याच्या जिवावर सर्व उठले तेव्हां ताराबाईनें तो मेला असें उठवून त्याला पानगांवीं पाठवून दिलें.

३. (स. १८३३-५५) तंजावरचे राजे. सरफोजीचे पुत्र. हे गादीवर आल्यानंतर (स. १८३२ मार्च १७) नेमणूक मिळत होती. याची एक मुलगी मोहित्यांकडे दिली होती. तिची मुलगी सयाजीराव गायकवाडांना दिली. तिचा मुलगा फत्तेसिंग. फत्तेसिंगाची संतति हाच तंजावरकरांचा वंश होय.

शिवाजी एसजी दाभाडे—हा खंडेराव दाभाड्याचा धाकटा भाऊ. याला छत्रपतींनीं वऱ्हाडांत मोहिमेस पाठविलें होतें. तेथें युद्धप्रसंग होऊन देवलोकास गेले. याला संतान नाहीं (रा. खं. ३.१६७).

शिवाजी केशव टाळकुटे—(स. १७६० सुमार) रघूजी भोसल्याचा ब्राह्मण सरदार.

शिवाजीपंत मुत्सद्दी—(स.१६००सुमार)निजामशहाच्या राज्यकारभारांत सुधारणा करण्याच्या बाबतींत यानें मलीकंबरास मदत केली. मलीकंबरानें याच्या मदतीनें जमीन महसुलाचे बाबतींत उत्तरेंतील तोडरमल्लाची पद्धत दक्षिणेंत सुरू केली. वरील कामांत मदत करण्याकरितां साहाजी आनंदराव व सखाराम मोकाशी वगैरे मदतगार होते.

शिवाजी बल्लाळ जोशी—(स. १७३९) हा रमाबाईचा पिता व माधवराव पेशव्याचा सासरा.

शिवाजी भोसले (उमरावतीकर)—(स. १७७५) हा राणोजी भोसल्याचा नातू व सखोजीचा पुत्र होय. बारभाईनीं यास सेनासाहेब सुभ्याचीं वस्त्रें देण्याचें ठरवून मुधोजी भोसल्याविरुद्ध उठविलें होतें. पण मुधोजीनें याचा मोड केला.

शिवाजी रणचोड संझगिरी—(स. १७५२) मुंबईस इंग्रजांकडे मराठ्यांचा वकिल. हा रणचोड कृष्णाचा पुतण्या असावा.

शिवाजी विठ्ठल विंचूरकर—(स. १७६७-९४) हा विठ्ठल शिवदेवाचा ज्येष्ठ पुत्र. यास स. १७६७ मध्यें सरदारीचीं वस्त्रें मिळालीं. पुढें स.१७६९ मध्यें यानें इतर सरदारांबरोबर उत्तर हिंदुस्थानांत जाऊन रोहिल्यांचा पाडाव केला. नाना फडणविसानें यास महादजी शिंद्याविरुद्ध फुस दिल्यामुळें हा कांहीं काळपर्यंत महादजीविरुद्ध वागे, नंतर महादजीचे रतपुतांशीं झालेल्या लढाईंत (स.१७८३) महादजीचें सैन्य माघार घेऊन परत फिरलें. व त्यांचा पाठलाग रजपूत करीत होते. त्या वेळीं महादजीनें यास पुढीलप्रमाणें विनंति केली. 'या संकटसमयीं मनांतील सर्व गोष्टी एकीकडे ठेवून तुम्हीं मला मदत केली असतां फौजेचा नक्षा राहिल. नाहीं तर आपले मालिकाचे कीर्तिस कलंक लागणार आहे.' तेव्हां यानें आपल्या फौजेची उठावणी केली; आणि जयपुरच्या रजपुत लोकांवर हल्ला करून त्यांचा अगदीं मोड केला; व त्यांची कत्तल उडवून त्यांस पळवून लाविलें. त्या रात्रीं महादजीनें याची गांठ घेऊन याचे बहुत उपकार मानिले, आणि त्या वेळेस जें समजुतीचें भाषण झालें त्यामुळें उभयतांचें पुनः सख्य झालें. या वेळेपासून महादजी यास काका असें म्हणूं लागला.

हा स. १७९४ मध्यें मरण पावला. यास तीन बायका होत्या व दोन पुत्र होते. परंतु दुर्दैवानें ते दोन्हीहि याच्या हयातींतच मृत्युमुखीं पडले. यानें प्रयाग येथें यमुनेचे पलिकडे रामेश्वराच्या नजीक वेणीमाधवाचें मंदिर बांधलें. त्याचप्रमाणें मथुरा येथें राधामाधवाचें मंदिर व नरसिंहपूर येथें श्रीनरसिंहाचे देवालयांतील गाभारा बांधिला. याचे नंतर याचा कनिष्ठ भाऊ खंडेराव यांस सरदारचीं वस्त्रें मिळालीं (विंचूरकर घराण्याचा इतिहास, पृ. ९९-११८).

शिवानंद—(स. १७०९) हा 'कुलप्रदीप' या ग्रंथाचा कर्ता होय.

२. (जन्म स. १७४४) हा नागर ब्राह्मण असून सुरतेचा रहिवासी होय. एक गुजराथी कवि. यानें शिवपार्वतीच्या स्तवनपर काव्यें रचलीं आहेत तीं रसाळ व गोड आहेत.

शिवापा नाईक बिदनूरकर—(मृत्यु स. १६६३) हा विजयनगरचा राजा श्रीरंगरायाचा मांडलिक असून बिदनूरचा डोंगराळ प्रांत याच्या ताब्यांत होता. श्रीरंग-

राय याच्या आश्रयानें वेलोर लढवीत असतां याचा पराजय झाला. हा मोठा बलिष्ठ होता (रा. मा. चं. प्र. पृ. ८४-८५).

शिहाबुद्दीन—(स. १३६३-८६) हा काश्मीरच्या शहामीरचा पुत्र. हा शेर अलीनंतर गादीवर आला. यानें सिंध व नगरकोट जिंकले. याच्यानंतर हिंदाल गादीवर आला.

शिहाबुद्दीन खल्जी—माळव्याच्या नासिरुद्दीन खल्जीचा मुलगा.

शिहाबुद्दीन नुस्रतखान—(स. १३३६-३७) बिहारचा सुभेदार. सुलतान मुहंमद तुघ्लकाच्या कारकीर्दीत यानें मक्का अधिक चढवून बिहारची सुभेदारी मिळवली. पण मक्का पुरा करितां न आल्यानें यानें बंड उभारलें. पण शेवटी जीवदान मिळालें. शिहाबुद्दीन हें नांव, नुस्रतखान ही पदवी आहे.

शिहाबुद्दीन बुघ्रा—(बुघ्राखान बल्बन पाहा).

शिहाबुद्दीन ऊर्फ मुइज्जुद्दीम घोरी—(स. ११७३-१२०६) गुज्झ लोक गझनीस सत्ताधीश असतांना घियासुद्दीन मुहंमदानें स. ११७३ मध्यें स्वारी करून गुज्झ लोकांना हाकून दिलें व तेथें हा त्याचा धाकटा भाऊ असल्यानें याचीच नेमणूक केली. यानें स. ११७५ मध्यें हिंदुस्थानवर पहिली स्वारी करून मुलतान शहर व उच्छचा किल्ला काबीज केला. तो किल्ला तेथील राणाला तिच्या मुलीशीं लग्न करण्याचें आश्वासन देऊन यानें काबीज केला. परंतु पुढें यानें तिचा वचनभंग केला. नंतर यानें वालुकामय प्रदेशांतून अनहिलवाडच्या भीम वाघेलावर स्वारी केली परंतु तींत याचा पराभव झाला. स. ११७९ मध्यें पेशावर जिंकल्यावर स. ११८६ मध्यें यानें खुस्रव मलीकचा विश्वासघात करून लाहोर जिंकलें. स. ११९१ त यानें पृथ्वीराज चौहाणाचें भांतिंदा नांवाचें ठाणें घेतलें. तेव्हां याचें व पृथ्वीराजाचें कर्नूलजवळील तरौरी येथें युद्ध झालें व त्यांत याचा पराभव झाला. शेवटीं स. ११९२ मध्यें १२००० घोडदळ बरोबर घेऊन यानें त्याजवर पुन्हां तरौरीजवळ स्वारी केली. तींत पृथ्वीराजाचा पूर्ण पराभव झाला. नंतर यानें अजमीरवर स्वारी करून ते शहर लुटलें (कुत्बुद्दीन ऐबक, इख्तियारउद्दीन मुहम्मद खल्जी, पृथ्वीराज चौहान व जयचंद गाहडवाल पाहा).

शी—(स. १०० सुमार) हा दुसऱ्या कदफिसेसचा सेनापति होय. यानें राजाज्ञेवरून ७००० फौजेसह चीनवर स्वारी केली. परंतु डोंगराळ मुलखांतून जातांना सैन्याचें फार हाल झाले व याचा पराभव झाला (कदफिसेस दुसरा पाहा).

शीतलनाथ—हा जैनांचा दहावा तीर्थंकर होय.

शीरशामक शिहाबुद्दीन—(काश्मीरचा शहाबुद्दीन पाहा).

शीलभद्र—(स. ६३५) हा पूर्व बंगाल्यांत ढाका जिल्ह्यांत रामपालगांवीं जन्मला. एका ब्राह्मण राजवंशांत याचा जन्म झाला होता. पण यानें राज्यपदाकडे लक्ष न देतां बौद्धाच्या सुप्रसिद्ध नालंदा येथील विद्यालयांतील सर्वश्रेष्ठ स्थान मिळविलें. त्या वेळीं नालंदा येथील विद्यालयांत १५१० अध्यापक आणि १० हजार विद्यार्थी होते.

याचें पहिलें नांव दंतदेव असें होतें. सोळाव्या वर्षीच हा आपलें अध्ययन पुरें करून अधिक शिकण्याकरितां नालंदा येथें गेला. धर्मपाल नांवाच्या महापंडितापाशीं अध्ययन करून हा मोठा ज्ञाता झाला.

या वेळीं दक्षिणेंतील एक महापंडित मगधराजाच्या धर्मपालाशीं वाद करण्याकरितां आला. पण धर्मपालाऐवजी यानेंच त्याचा पराजय करून अलौकिक कीर्ति संपादन केली (स. ५५४). याच्या उच्च वर्तनामुळें लोक यास शीलभद्र असें म्हणूं लागले. चीन देशांतल्या लोकांनीं याचा शीलभद्र नांवानेंच उल्लेख केला आहे.

धर्मपालाच्या नंतर नालंदा विद्यापीठाचें मुख्य स्थान याच्याकडे आलें. ह्यु-एन-त्संग याच्या दर्शनास आला होता.

शीलुक प्रतिहार—(स. ८२५ सुमार) मंदोसरच्या प्रतिहारवंशांतील चंदुकाचा पुत्र. यानें त्रवणी व वल्ल हीं राज्यें आपल्या राज्यांत सामील केलीं. वल्लदेशाचा राजा भट्टिक (भाटी) देवराज यास पृथ्वीवर आपटून यानें त्याचें छत्र मिळविलें (ज. रॉ. ए. सो. स. १८९४, पृ. ६). याचा पुत्र झोट.

शुकदेवमिश्र—(स. १७८० सुमार) झांशीचा वैद्य. हा महादजी शिंदे व नारोशंकर राजेबहादर यांना औषधें देत असे. यास दररोज २॥ रु. नेमणूक मिळे. महादजीनें याला एक गांवहि दिला होता.

शुचिवर्मा गुहिलोत—(स. १००७-२१) मेवाडच्या गादीवर हा अंबाप्रसादानंतर आला. हा अंबाप्रसादाचा धाकटा भाऊ होता. रावल समरसिंहाचा सं. १३४२ (स. १२८५) मधील व राणा कुंभकर्णाच्या वि. सं. १४९६ (स. १४३९) मधील लेखांत याचें नांव गाळून शक्तिकुमारानंतर हा दिला आहे. पण आहाडच्या हस्तमातामंदिराच्या पायऱ्यांवरील लेखांत हा शक्तिकुमाराचा

पुत्र असें म्हटलें आहे. त्यावरून हा अंबाप्रसादाचा धाकटा भाऊ होता हें स्पष्ट होतें. धाकटा भाऊ गादीवर आल्यास बापाच्या मागें थोरल्या भावाचें नांव गाळून स्वतःचें नांव लिहिल्याचीं अशीं अनेक उदाहरणें आढळतात.

शुभराय महाराज—(स. १८०० सुमार) साधु व कवि. हे मूळचे मद्रासकडील असल्यानें सुबराव या नांवानें प्रसिद्ध आहेत. यांचा जन्म मद्रासकडील परकोट प्रांतांतील मालूर गांवीं शके १६४७ सालीं झाला. पन्नामा व गिरधरराय हे यांचे आईबाप. हे हुषार असून टिपु सुलतानाकडे मोठ्या हुद्यावर होते. पण पुढें विरक्त होऊन पंढरपुरीं एक तप राहिले. व पुढें सोलापुरीं राहत असत. यांचीं वेदान्तपर मराठी पदें आहेत. रामजोशाला कीर्तनाला मठ देण्याचें नाकारल्यामुळें त्यानें यांच्या मठासमोर कीर्तन करून ' हटातटानें पटा रंगवुनी ' ही लावणी यांना उद्देशून म्हटली अशी आख्यायिका आहे (म. क. च. भा. २, पा. ९४-१०१).

शुभंकर गुप्त—(स. १०८० सुमार) बुद्ध तर्कज्ञ. हा अभ्याकरगुप्ताचा शिष्य. याच्या तर्कशास्त्रावरील ग्रंथावर हरिभद्रसूरीची टीका आहे. ग्रंथाचें नांव आढळत नाहीं.

शुयेनहा—हा चिनी प्रवासी सुयेनताई या प्रवाशाबरोबर हिंदुस्थानांत आला होता. हा येथेंच मृत्यू पावला.

शूरपाल—(स. १०९७-९८) हा बंगाल्यांतील पाल घराण्यापैकीं तिसऱ्या विग्रहपालाचा दुसरा मुलगा. यानें वारेन्द्रवर स्वारी करून तो देश हस्तगत केला.

शूलपाणि--(स. १३७५-१४६०) बंगाल्यांतील संस्कृत धर्मशास्त्रकार. याची 'दीपकलिका' नांवाची याज्ञवल्क्य स्मृतीवरील टीका अगदीं थोडक्यांत आहे. याचा ' स्मृतिविवेक ' हा दुसरा ग्रंथ प्रसिद्ध आहे. हा आपल्या ग्रंथाच्या शेवटीं विवेक असा लावीत असे. असे यानें चवदा विवेक केले. उदाहरणार्थः—तिथिविवेक, दत्तकविवेक वगैरे. त्यांपैकीं ' श्राद्धविवेक ' फार प्रसिद्ध आहे.

हा बंगाली ब्राह्मणांपैकीं राधीयांतील ' साहुदियाल ' पोटजातीचा होता. ही जात बल्लालसेनाच्या वेळीं उदयास आली. रघुनंदनानें याला महामहोपाध्याय म्हटलें आहे. हा बंगालच्या लक्ष्मणसेन राजाचा न्यायाधीश होता. पण वरील काळा वरून तो गोष्ट संशयित आहे.

शूद्रक--(स. २०० सुमार) यांजविषयीं अनेक आख्यायिका प्रसिद्ध आहेत. हा क्षत्रिय असून मृच्छकटिक नाटकाचा कर्ता होय. हा शिवभक्त असून यानें अश्वमेध यज्ञ केला होता. प्रो. विल्सनच्या मतें आंध्रभृत्य घराण्याचा संस्थापक शिमुक आणि हा हे दोघे एकच होत. या मतास अनेक कारणांमुळें बरीच पुष्टी मिळते. दंडीच्या अवंतीसुंदरीकथासारांत याचें चरित्र दिलें आहे. त्यांत हा कवि असून उज्जयनी येथें राहत होता असें म्हटलें आहे. मृच्छकटिकांत यानें स्वतःच्या आयुष्यांतले प्रसंग वर्णिले आहेत असें म्हणतात. यासंबंधीं म्हैसूरच्या मिथिक सोसायटीचे प्रसिद्ध झालेले लेख (कै. के. व्ही. लक्ष्मणराव) पाहण्यासारखे आहेत.

याचा पद्मप्राभृतक भाण पाटण्याचे जी. जी. शर्मा यानें प्रसिद्ध केला आहे. शर्मानीं प्रसिद्ध केलेल्या 'चतुर्भाणि' यांत आलेल्या चार भाणांपैकीं एक याचा आहे (सौमिल्ल पाहा).

शृंगारगुप्त--वासवदत्तावृत्ति नामक ग्रंथाचा कर्ता.

शृंगारम्मा--(स. १६८५) कानडी कवयित्री. ही श्रीवैष्णव सांप्रदायांतील होती. पिता–चिंतामणि देशिकेन्द्र, गुरु-श्रीनिवासाचार्य. ही म्हैसूरच्या चिक्कदेवराजाच्या दरबारांतील होती. हिचें कवित्व त्याला आवडत असे. ग्रंथ–पद्मिनीकल्याण (क. क. च. भा.२,पा.५१६).

शेख नबी--(स. १६१९ सुमार) एक हिंदी कवि. हा जौनपुर जिल्ह्यांतील मड नामक नांवाचा राहणारा. यानें ' ज्ञानदीप ' नांवाचें काव्य लिहिलें.

शेख निजाम--(स. १६९० सुमार) छत्रपति संभाजीस पकडून देणारा औरंगजेबाचा सरदार. यास औरंगजेबानें ' मुकरबखान ' असा किताब दिला होता. यानेंच संभाजीस संगमेश्वरीं पकडलें. म्हणून औरंगजेबानें यास ' खान जमानबहादूर फत्तेजंग ' हा बहुमानाचा किताब दिला. याला इख्लासखान नांवाचा एक मुलगा होता.

शेख निजामुद्दीन हसन--(मृत्यु स. १३३८) एक मुसलमान कवि.

शेख मिरा--(स. १७०८-३६) हा प्रथम ताराबाईच्या पक्षाचा होता पण पुढें शाहूच्या पक्षाला मिळाला. शाहूनें स. १७३६ त याला सीदीचा पाडाव करण्यासाठी पाठवलें होतें.

शेख मुहम्मद--(स. १६९६) हा एक मराठी कवि होता. हा धर्मानें मुसलमान होता तरी भागवतधर्मी बनला होता. चांभार गोंद्यापासून आठ कोसांवर असलेल्या खेड वाहिरे या गांवीं हा राहत असे. भक्तविजयांत याचें सुरस आख्यान आहे. यानें ' योगसंग्राम,' (स. १६९६) ' निष्कलंकबोध,' 'ज्ञानसागर,' व 'पवनविजय' असे तीन अभंग ग्रंथ केलें आहेत. याच्या गुरूचें नांव चांद बोधले. हा पंढरीस वारी करण्यासाठी जात असे. याला कबीराचा अवतार मानतात. याच्या संबंधानें पुढीलप्रमाणें म्हटलें

आहे. 'ज्ञान्याचा एका, नाम्याचा तुका, व कबिराचा शेखा.' हा गृहस्थाश्रमी होता. याच्या पुण्यतिथीचा दिवस फाल्गुन शुद्ध नवमी हा आहे (महाराष्ट्र कवि च. १, पा. २३६-४८).

शेख सल्ला—(स. १५०० सुमार) पुणें येथील प्राचीन सत्पुरुष. हा मूळ हिंदू होता. परंतु पुढें मुसलमान होऊन सर्व गांवांतील लोकांस मुसलमान होण्यापासून यानें वांचविलें.

शेख सादी—(स. ११८४-१३१३) फार्शी भाषेतील लोकोत्तर कवि. हा शिराज येथील राहणारा असून फार बुद्धिमान् होता. हा सुफी साधु अबदुल कादिर जिलानीचा शिष्य. यानें 'गुलिस्तान' व 'बुस्तान' असे दोन ग्रंथ लिहिले. याच्या ग्रंथांचीं भाषांतरें इंग्रजी व इतर अनेक भाषांत झालीं आहेत.

शेन-गुत्तुवन (इमयवर्मन्) चेर—(स.१०० सुमार) हा दुसऱ्या आदन चेराचा मुलगा. यानें 'राजसूय' यज्ञ केला होता.

शेर अफकून—(मृत्यु स. १६०७) नूरजहानचा पहिला नवरा. हा प्रथम मुलतानच्या खानखानान नांवाच्या सरदाराजवळ नोकरीस होता. पुढें याचा विशेष पराक्रम दिसून आल्यामुळें अकबर बादशहानें स. १५९९ त सेलीमचे तैनातीस मेवाडचें स्वारींत पाठविलें. सेलीम ऊर्फ जहांगीरानें अकबर मेल्यावर याची नेमणूक बरद्वान येथें केली. व पुढें हा बंडवाल्यास सामील आहे असें पाहून, यास ठार मारिलें.

शेरअली—(मृत्यु स. १३६३) काश्मीरचा राजा. हा काश्मीरच्या शहा-मीरचा पुत्र. गादीवर आल्यावर यानें अलाउद्दीन हें नांव धारण केलें. याच्यानंतर याचा धाकटा भाऊ शिहाबुद्दीन राज्य करूं लागला.

शेरखान—हा गुजराथच्या सुलतान पहिल्या मुज्फरशाहाचा मुलगा. याला पांच भाऊ होते.

शेरखान लोदी—(स. १६७७ सुमार) विजापुरांतील तृणमळी प्रांताचा सुभेदार. याचा शिवाजीनें पराभव केला.

शेरशाहा सूर—(स. १५४०-४५) दिल्लीचा बादशाहा. हा अफगाणांपैकीं हसनखानाचा पुत्र. याचें मूळ नांव फरीदखान. शेर म्हणजे वाघ मारल्यानें शेरखान म्हणत. भावाशीं तंटा झाल्यानें जोनपूरचें राज्य सोडून हा आग्र्यास दौलतखान लोदीकडे नोकरीस राहिला. पुढें हा बिहारांत गेला. याला मोगलांनीं बादशाही बळकाविली हें पसंत नव्हतें. अफगाणांकडे पुनः बादशाही यावी अशी इच्छा होती. यानें बिहार ताब्यांत घेऊन चुनारगडाचा बंदोबस्त केला. हूमायूनानें यावर स्वारी केली असतां हा शरण गेला. पण यानें आपलें सामर्थ्य वाढवून बंगालहि घेतला. व अखेरीस हूमायुनचा पराभव करून बादशाहीहि मिळविली (स. १५४०). बंगालची नीट व्यवस्था करून ग्वाल्हेर, रतनभोर वगैरे किल्ले घेतले. कालिंजरचा किल्ला घेत असतां दारूचा भडका होऊन हा मेला. हा फार कुशल राजा होता. यानें कालवे, धर्मशाळा, टपाल, नाणीं, प्रांत विभाग, वसूल, वजनें, मापें वगैरे प्रत्येक बाबतींत फार महत्त्वाच्या सुधारणा केल्या. मुसलमानींतील पहिला योग्य राजा अशी याची कीर्ति आहे. याला दोन पुत्र. आदिलखान व जलालखान.

शेषकृष्ण दीक्षित—(स. १६००) याचा मुलगा शेष वीरेश्वर दीक्षित. वीरेश्वराचा शिष्य सुप्रसिद्ध जगन्नाथ पंडित. यानें रामचंद्राच्या प्रक्रियाकौमुदीवर प्रक्रियाप्रकाश नांवाची टीका लिहिली. भट्टोजी दीक्षितानें प्रौढमनोरमा लिहिली, ती प्रक्रियाप्रकाशाची छाया आहे. म्हणून जगन्नाथ भट्टोजीवर गुरुद्रोही म्हणून तुटून पडतो. सत्यभामापरिणय, सत्यभामाविलास मुरारिविजय व कंसवध हीं नाटकें याचीच दिसतात.

शेंगुत्तुवन चेर—(स. १९० सुमार) हा एक चेर वंशांतील राजा होता. या शब्दाचा अर्थ तांबड्या रंगाचा असा होतो. यानें नेदुमुडी किल्लीराज चोलाला पराभूत करून त्याच्या राज्यावर आपला अम्मल बसविला. हा मोठा पराक्रमी होता. यानें अश्वमेध यज्ञ केला होता. पश्चिम किनाऱ्यावरील वंजी येथें यानें पट्टिनी देवीचें मंदिर बांधलें. त्या देवळाच्या समारंभाकरितां सीलोनचा राजा गजबाहु आला होता. शेंगुत्तुवन याच्या मुलाचें नांव गजदृष्टि.

श्यामलदेवी—ही माळव्याच्या परमारांपैकीं उदयादित्याची मुलगी. ही मेवाडच्या गुहिलवंशी विजयसिंह राजास दिली होती.

श्यामसिंहदेव—(स. १४०८) नेपाळांतील भाटगांवच्या सूर्यवंशांतील एक राजा. हा शक्तिसिंहानंतर गादीवर आला. याची मुलगी मल्लवंशजास दिली होती. यानंतर ठाकुरी घराणें गादीवर आलें.

श्रीकक्कसूरि—(स.१०१५सुमार) यानें 'मच्छप्रबंध' नांवाचा ग्रंथ रचला. हा श्रीसिद्धसूरीचा उत्तराधिकारी होता.

श्रीकर—(स. ८००-१०५० सुमार) संस्कृत धर्मशास्त्रकार. हा मैथिल होता. श्रीनाथाचा पिता श्रीकर व हा भिन्न होय. मिताक्षरा, चंडेश्वराचा राजनीतिरत्नाकर या ग्रंथांत याचे उतारे आले आहेत.

श्रीकराचार्य कालगांवकर—(स. १६९३) हे राजाराम छत्रपतीच्या वेळीं रघुनाथराव पंडितरावांनंतर पंडितरावांच्या जागेवर नेमले गेले.

श्रीकंठ—(ग्रंथकाल स. १५७५) 'रसकौमुदी' या संस्कृत ग्रंथाचा कर्ता. नवानगरच्या जाम सत्तासेलच्या पदरीं हा होता. वाणीनाथाच्या 'जामविजय' काव्यांत याची विद्वान् म्हणून प्रशंसा आहे.

२. (स. १२५० सुमार) माधवनिदानचा टीकाकार व विजयरक्षिताचा शिष्य. आतंकदर्पणकार वाचस्पतीनें याचा निर्देश केला आहे.

३. (स. १४०९ सुमार) एक ब्राह्मण तत्त्वज्ञ. गुणरत्नानें आपल्या 'सद्दर्शनसमुच्चयवृत्ती'मध्यें याचा निर्देश केला आहे. यानें न्यायसूत्रावर 'न्यायालंकार' नांवाची टीका लिहिली आहे (हि. इं. लॉ., पा. १५१).

श्रीकृष्ण न्यायालंकार—(स. १६५० सुमार) हा गोविंद न्यायवागीशाचा पुत्र असून यानें न्यायसिद्धांतमंजरीवर 'भावदीपिका' नांवाची टीका लिहिली.

श्रीगर्भ—संखकवीच्या तीस ग्रंथपरीक्षक पंडितांपैकीं एक.

श्रीगिरींद्र—(स. १४४२–४३) विजयनगरच्या संगम घराण्यांतील वीरविजयाचा पुत्र. पर्वतराय किंवा प्रभातदेवराय असेंहि हा आपणांस म्हणवून घेत असे. याचा वध झाला.

श्रीगुप्त—(स. २७५ सुमार) हा गुप्तवंशाचा संस्थापक होय. याच्यामुळें वंशाला गुप्त असें नांव मिळालें. याच्या नांवामागें महाराज लावलेलें आढळतें. त्यावरून हा कोणाचा तरी मांडलिक असावा. याचा पुत्र घटोत्कच.

श्रीचंद्र—(स. ११३७–११६५ सुमार) हा जैन तर्कज्ञ हर्षपुरीय गच्छाच्या हेमचंद्रसूरीचा शिष्य होता. यानें स. ११३७ मध्यें हरिभद्रसूरीच्या 'न्यायप्रवेशवृत्ति' या ग्रंथावर 'न्यायप्रवेशटिप्पण' नांवाची एक टीका लिहिली. स. ११६५ त यानें 'आवश्यकसूत्रावर' 'प्रदेश व्याख्याटिप्पणक' नांवाची टीका लिहिली (हि. इं. लॉ., पा. २१०).

२. हा जातीचा रजपूत होता. हा नीहार गांवीं राहत असे. हा तानसेनाच्या बरोबरीचा गाणारा होता. यानीं शोधून काढलेल्या ध्रुपद गायकीस नीहारी म्हणूं लागले.

श्रीदेव—चाउही या चिनी प्रवाशानें हिंदुस्थानांत असतां धारण केलेलें नांव.

श्रीदेवगुप्तसूरि—यानें पार्श्वनाथाचा एक प्रासाद व एक उपोषणशाळा बांधली. यानें शत्रुंजयाची यात्रा केली. हा कवि व शास्त्रनिपुण होता.

हा विक्रम संवत् १०७२मध्यें ककसूरीचा उत्तराधिकारी झाला. यानें 'नवपदप्रकरण' नांवाचा ग्रंथ लिहिला.

श्रीधर—(स. ८५३ ग्रंथकाल) यानें पाटी गणिताचा ३०० आर्यांचा एक ग्रंथ लिहिला आहे. त्यांतील आरंभींच्या कांहीं श्लोकांवरून, यापेक्षांहि दुसरा मोठा ग्रंथ लिहिला असला पाहिजे असा समज आहे. 'न्यायकंदली' म्हणून एक न्यायशास्त्रावर ग्रंथ आहे व त्याचा कर्ताही श्रीधरच आहे. न्यायकंदलीच्या कर्त्याची माता अब्बोका व पिता बलदेव होता. महावीर याच्या कालावरून ठरवलेला पाटीगणितकार श्रीधर याचा काल अधिक विश्वसनीय आहे.

२. (स. ११५०–१२५० सुमार) संस्कृत धर्मशास्त्रकार. याचा 'स्मृत्यर्थसार' हा ग्रंथ प्रसिद्ध आहे (आनंदाश्रम, पुणें). त्यांत संस्कार, नित्यकर्म, श्राद्ध वगैरे विषय आहेत.

याचा पिता नागभर्तृ विष्णुभट्ट. गोत्र विश्वामित्र. याचा दुसराहि एखादा ग्रंथ असावा. याचा 'श्रीधरीय' म्हणून निर्देश येतो. हेमाद्रीनें याचें पुष्कळ उतारे घेतले आहेत.

३. कुंडार्णव या मराठी ओवीबद्ध ग्रंथाचा कर्ता (१९६ ओव्या). गोत्र वत्स. व्यंकटेश प्रेसमध्यें हा ग्रंथ छापला आहे.

४. (कविताकाल स. १६८०) या ब्राह्मण जातीच्या हिंदी कवीनें फुटकळ कविता बऱ्याच केल्या आहेत. शिवाय याचे पुढील ग्रंथ प्रसिद्ध आहेत. १ संगीत. २ जैनमुनिचरित्र. ३ कृष्णलीला. ४ जंगनामा. जंगगनाम्यांत फर्रुखसियर व जहांदरशाहा यांच्या युद्धाचें वर्णन आहे. यांशिवाय बाबु कृष्णदासानें याच्या नायिकाभेद व चित्रकाव्य वगैरेंचा निर्देश केला आहे.

श्रीधरकवि—(स. १७५० सुमार) मराठी कवि. याच्या वडलाचें नांव रामकृष्ण व उपनांव कोशे. याचा 'तत्त्वबोध' ग्रंथ आहे (५६ श्लोक). शिवाय नानासाहेब पेशव्यांना प्रार्थना व किरकोळ कविता आहे (मं.द्वि. सं. वृ. शके १८५६, ले. ७).

श्रीधरदास—संस्कृत पंडित. बंगालच्या लक्ष्मणसेनाचा आश्रित.

श्रीधर लक्ष्मण मुनशी—(मृत्यु स. १८२५) हा प्रसिद्ध भवानीपंताचा पुतण्या. त्यानंतर हा दिवाण झाला. हा रघूजी भोसला विश्वासांतला होता. त्याचे परराष्ट्रीय राजकारण याच्या सल्ल्यानें चाले.

श्रीधरस्वामी—(समाधि स. १७३० जाने. २६) हा एक प्रख्यात महाराष्ट्र कवि व ग्रंथकार होता. याचे रामायण, भारत, भागवत इत्यादि ग्रंथ लोकप्रिय आहेत. नाझरें हें याचें मूळ गांव. नाझरें गांवचे हे देशपांडे ऊर्फ देशकुलकर्णी होत. याचा पणजा रंगोपंत घोडके यानें देशपांडेपण संपादिलें. हें याचें पहिलें आडनांव होय. पुढें याला नाझरेकरहि म्हणूं लागले. हा यजुर्वेदी वाजसेनीय माध्यंदिन-शाखेचा ब्राह्मण असून, याचें गोत्र वासिष्ठ व आनंदसांप्रदाय होता. याची पत्नी पार्वतीबाई. यानें संन्यास घेतल्यावर कांतानंद असें नांव घेतलें. यास टाकळी गांव इनाम मिळालें. हा पंढरपूर येथें समाधिस्थ झाला. याची समाधि कुंभारघाटावर आहे. श्रीधराचा बाप ब्रह्माजीपंत (ब्रह्मानंद) यानें 'आत्मप्रकाश' नांवाचा ओवीबद्ध ग्रंथ शके १६०३ मध्यें लिहिला. याच्या एकंदर ग्रंथांपैकीं सहा ग्रंथ फार प्रसिद्ध आहेत. ते येणेंप्रमाणें:-(१) हरिविजय; शके १६२४, मार्गशीर्ष शु॥ २, पंढरपुरीं संपूर्ण केला. (२) रामविजय; शके १६२५, श्रावण शु॥ ७, पंढरपुरीं संपूर्ण केला. (३) वेदान्तसूर्य; शके १६२५, माघ शु॥ ७, सिद्धाश्रमास संपूर्ण केला. (४) पांडवप्रताप; शके १६३४, माघ शु॥ १०, पंढरपुरास संपूर्ण केला. (५) जैमिनी अश्वमेध; शके १६३७, पौष शु॥ ७, पाथरी येथें संपूर्ण केला. (६) शिवलीलामृत; शके १६४० फाल्गुन शु॥ १५, बारामतीस संपूर्ण केला.

ह्याशिवाय यानें पांडुरंगमाहात्म्य, व्यंकटेशमाहात्म्य, अंबिकाउदय, संतमाला, संप्रदायपरंपरा इत्यादि ग्रंथ रचिले. याशिवाय संस्कृत पदें व आरत्याहि यानें रचिल्या आहेत.

राजश्री दत्तोबा गोसावी व मनोहर गोसावी बिन श्रीधर गोसावी, उपनाम नाझरेकर यांना शाहूमहाराजांनीं दिलेली इनाम सनद व श्रीधराची वंशावळ भारत इतिहास-संशोधक मंडळ अहवाल शके १८३३ मध्यें (१०९ व ११० पानांवर) आहे. शिवाय अधिक माहितीहि आहे (मं. वा. इ. १८३७, ले. १७६-७७). याची वर्णनशैली अप्रतिम आहे. याची भाषा फार परिणामकारक व अप्रतिम असून महाराष्ट्रांतील स्त्रीपुरुष, विशेषतः स्त्रिया याचे ग्रंथ फार आवडीनें वाचतात.

श्रीनाथ—(स. १५९०) एक ज्योतिषी. 'ग्रहचिंतामणि' नांवाच्या करणग्रंथाचा कर्ता. याचा पिता राम व वडील बंधु रघुनाथ. हा राम मुहूर्तचिंतामणिकार असावा.

श्रीनिवास दीक्षित—जिंजीचा जो सुरप्पा नायक त्याचा हा एक आश्रित कवि होय. याला सुरप्पा नायकानें 'रत्नखेत दीक्षित' ही पदवी बहाल केली होती.

यानें एकंदर १८ नाटकें लिहिलीं. त्यांपैकीं 'भावना-पुरुषोत्तम' हें सर्वोत्कृष्ट नाटक होय. याशिवाय यानें 'शतकांडविजयम्' आणि अनेक दुसऱ्या टीका वगैरे ग्रंथ लिहिले आहेत.

श्रीनिवासराव—हा जुन्नरचा कारभारी होता. याला शहाजीनें पकडून याचे सर्व प्रांत आपणाकडे घेतले (मु. रि. भा. १, पृ. २७२).

श्रीपतफंदी—अनंतफंदीचा मुलगा. यास सवाई फंदी म्हणत.

श्रीपतराव पटवर्धन—(स. १७७९) मिरजेचा पटवर्धन. हैदरच्या कैदेंत होता.

श्रीपतराव प्रतिनिधी—(मृत्यु ता. २५-११-१७४६) हा परशरामपंतांचा मुलगा. याचें दुसरें नांव श्रीनिवासराव. हा, चुलता माधवरावास दत्तक गेला. परंतु शाहूनें तें दत्तविधान खोटें ठरवून यास आपल्याजवळ ठेवून प्रतिनिधी केलें (स. १७१४), आणि याजवर अखेरपर्यंत अकृत्रिम लोभ ठेविला. यानें वेळोवेळीं बाळाजीस मदत करून आपला पराक्रम शाहूस दाखविला. शाहूकडे व तसेंच संभाजीकडे याचें चांगलें वळण होतें (म. द. रु. १·१२९). बाजीरावाचें व याचें सख्य नव्हतें. पुढें मात्र नानासाहेबाशीं चांगलें सख्य झालें.

शाहू-संभाजीच्या समेटाअगोदर जें युद्ध झालें त्यांत यानें पुष्कळच पराक्रम दाखविला. संभाजीच्या बायका व इतर सरदार मंडळीस पकडून यानें साताऱ्यास आणिलें.

बाजीरावानें दहा हजार दंड भरून प्रतिनिधीपासून व्यंकटराव घोरपड्यांची सुटका केली!

सीदीच्या पाडावांत हा होता. याला निजामाकडून वऱ्हाडांतील जहागीर मिळाली. याच्या वडिलांच्या सांगण्यावरून हा खटावकरांशीं जाऊन लढला व त्याचा पुरा मोड केला. याची स्त्री राधाबाई हिनें सहगमन केलें. याला मूल नव्हतें म्हणून शाहूनें याच्या धाकट्या भावास प्रतिनिधीपद दिलें. हा धार्मिक होता.

श्रीपति—(स. १०३९ सुमार) याचे 'सिद्धांत-शेखर' आणि 'धीकोटिदकरण' असे दोन ज्योतिष-गणित-ग्रंथ आहेत. याचा 'रत्नमाला' म्हणून मुहूर्तग्रंथ आहे आणि 'जातकपद्धति' म्हणून जातकग्रंथ आहे. भास्कराचार्यानें याचा उल्लेख केलेला आहे.

मालाटीकेवरून यांचें गोत्र काश्यप, आजाचें नांव केशव व पित्याचें नांव नागदेव होतें असें दिसून येतें.

धीकोटिदकरणावरूनहि हा लल्लाचा म्हणजे आर्यपक्षाचा अनुयायी दिसतो.

मूळ संस्कृत आहे व त्यावर यांची स्वतःचीच मराठींत टीका असलेलें एक हस्तलिखित नेवासें येथील जोश्याच्या पोथ्यांत उपलब्ध झालें आहे (मं. द्वि. सं. १८३६, पा. ८१).

२. (ग्रंथकाल स. १७२०) हा हिंदी कवि कान्यकुब्ज ब्राह्मण. काव्यसरोज, कविकल्पद्रुम, रससागर अनुप्रासविनोद, विक्रमविलास वगैरे याचे ग्रंथ होत. हा चांगला साहित्यज्ञ व कवि होता.

३. भास्कराचार्य ज्योतिषी यांचा भाऊ.

श्रीपतिदास—मराठी कवि. याची एक गर्भगीता आहे. तसेंच यानें मनाचें चरित्रहि लिहिलेलें दिसतें (मं. वार्षिक १८३६, क्र. अ.)

श्रीपाद श्रीवल्लभ—श्रीगुरुचरित्र या ग्रंथांत ५-१० पर्यंतच्या अध्यायांत याचें चरित्र वर्णिलें आहे. याचा जन्म पीठापूर येथें झाला. शाखा-आपस्तंब (कृ. य.), माता-सुमती, पिता-आपल राजा. हे दत्ताचे अवतार होत; व नृसिंहसरस्वती हे याचा अवतार होत, अशी भाविकांची समजूत आहे.

श्रीपुरुष—पृथ्वीकोंगाणी गंगाचें नामान्तर.

श्रीभट्ट—(कविताकाल स. १५३८) हा निम्बार्क-सांप्रदायी हिंदी कवि केशव काश्मीरीचा शिष्य. मुगल-शतक (१०० पदें) व आदिवाणी हे याचे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. पहिला ग्रंथ कृष्णभक्त आवडीनें वाचतात.

श्रीमार पांड्य—(स. ८३०-६२) हा वरगुण पांड्याचा पुत्र. याला परचक्रकोलाहल म्हणत. यानें सिलोनवर स्वारी करून तो देश जिंकला. याला दोन पुत्र होते. एक वरगुणवर्मन् व दुसरा परांतक वीर नारायण. यानंतर पहिला गादीवर आला.

श्रीरंगराय आरविदु—(स.१५७२-८६) विजय-नगरच्या राजघराण्यांपैकीं तालिकोट युद्धानंतरच्या पहिल्या तिरुमल्ल आरविदूचा दुसरा मुलगा. माता वेंकटाम्बा. याची पत्नी तिरुमल्ला व कृष्णा. याची राजधानी पेनुकोंडा. पेम्मसानी पेद्द तिम्मराज हा याचा मंत्री होता. याच्या राज्यांत सारखीं बंडें होत. याच्यावर स. १५७५ मध्यें अली आदिलशाहानें स्वारी केली तेव्हां यानें इब्राहीम कुत्ब-शाहाच्या मदतीनें त्यास परत धाडलें. पण पुढल्याच वर्षी याचा पराभव होऊन पेनुकोंडा अली आदिलशाहानें घेतला, व यास कैद केलें. स. १५८० मध्यें गोवळकोंड्याच्या राजानें याचा पराभव केला. हा विष्णुभक्त होता. याला मुलगा नव्हता. मिकरतिम्म, जगदेवराय व चेनापन्न हे याचे जांवई होत. याला मुसलमानी सत्तेस बिलकुल आळा घालतां आला नाहीं.

२. (स. १६१४-१५) तिरुमल्ल आरविदूचा पुत्र व्यंकटपतीला मूलबाळ नव्हतें. त्यानें आपला भाऊ राम-राजाचा पुत्र जवळ बाळगला आणि त्याला चिक्कराय युव-राज पदवी दिली, आणि आपल्या मागें त्याला राज्य मिळावें अशी योजना केली. त्याप्रमाणें व्यवस्था झाली. पण हा गोष्ट व्यंकटपतीचा मेहुणा जगराय यास बिलकुल पसंत पडली नाहीं. त्यानें सैन्य उभारून त्रिचनापल्लीस जंगी लढाई दिली आणि याच्यासुद्धां सर्व राजघराण्याची कत्तल केली. पण याचम्मा नायकानें स्वामीभक्तीनें राजघरा-ण्यापैकीं एका पांच वर्षांच्या मुलाला मोठ्या शिताफीनें वांचविलें आणि जगरायाशीं सामना देऊन त्याचा त्रिच-नापल्ली येथें पराभव केला, आणि वांचविलेल्या मुलास तिसरा श्रीरंग हें नांव देऊन विजयनगरचें राज्य सुरू केलें.

३. (स. १६१४-७४) हा याचम्मा नायकानें वांच-विलेला व गादीवर बसविलेला मुलगा. हा कोणाचा मुलगा हें निश्चित नाहीं. हा या सुमारास सुमारें पांच वर्षांचा होता. याला तिसरा श्रीरंग म्हणत. हा राजा असतांच राम व तिसरा व्यंकट हे राजे म्हणून प्रांत बळकावून कारभार करीत. हा स. १६४२ नंतर मुखत्यारीनें राज्य करूं लागला. याला हाणून पाडण्याचें काम मीरजुम्ला करी. याला विस्कळित झालेलें साम्राज्य जुळवितां आलें नाहीं. पुढें पुढें तर याला स्वतःचें असें सुरक्षित स्थानहि राहिलें नाहीं. आश्रय मिळेल तेथें हा पळपुट्यासारखें आयुष्य काढी. याचा शेवट काय झाला तें समजत नाहीं. ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीला सेंट जॉर्ज किल्ला बांधण्यास यानेंच परवानगी दिली. म्हणजे दहा वर्षांपूर्वी तात्पुरता दिलेला परवाना यानें कायम केला.

कोणत्याच ठिकाणीं यश येईना तेव्हां यानें वेंतागाच्या भरांत दिल्लीस शहाजहान बादशाहाकडे मदत मागितली, व साम्राज्य सुसंघटित करून दिल्यास मुसलमानहि होण्यास तयार असल्याचें कळविलें. पण त्याच्या राज्यांत शेवटी झालेल्या गडबडींत त्याला इकडे लक्ष देतां आलें नाहीं.

पण विजापूर व गोवळकोंडा येथील मुसलमान राजांनी, घाटाखालचा मुलूख गोवळकोंडेकरानें व वरचा मुलूख विजापूरकरानें घेण्याचा आपसांत तह करून याला अगदी जर्जर केलें. विजापूरच्या वतीनें शहाजी भोसल्यानें यावर

स्वारी केली. वेलोरजवळ गुडियत्तम येथील खडींतून व दुसऱ्या बाजूनें चंगम खिंडींतून विजापूरचीं सैन्यें यावर चालून आलीं. यानें शिकस्तीचा प्रयत्न करूनहि याला पराजित व्हावें लागलें. म्हैसूरच्या पूर्वेकडील भाग गेलाच होता. शहाजीनें जिंजी वगैरे भाग ताब्यांत घेतला आणि यास इक्केरीस म्हैसूरकराच्या आश्रयास जाऊन राहावें लागलें. म्हैसूरकरानें एरोडे येथें विजापूरकराचा पराभव करून याचा बचाव करण्याचा प्रयत्न केला, पण चहूंकडून त्रस्त होऊन यास अज्ञातवास पत्करावा लागला. याच्या राणीनें शिवाजीला विनंति केल्यावरून त्यानें तिला निर्वाहाकरितां नेमणूक करून दिल्याचा एक रौप्यलेख उपलब्ध आहे. पण त्याच्या खरेपणाबद्दल शहानिशा झालेली नाही. येथें विजयनगरचें राज्य नामशेष झालें.

श्रीवत्स–मंख ग्रंथाच्या परीक्षक तीस पंडितांपैकीं एक.

श्रीवत्सलांछन—(स. १५५० सुमार) 'काव्यपरीक्षा' या ग्रंथाचा कर्ता. मम्मटाच्या काव्यप्रकाशावर याची टीका आहे.

श्रीवद—(स. १४७७ सुमार) यानें जोनराजानंतर काश्मीरचा इतिहास लिहिण्याचा प्रयत्न केला. यानें स. १४१२-१४७७ पर्यंतचा इतिहास लिहिला. हा ग्रंथ राजतरंगिणीचा तिसरा भाग असून त्याचें नांव 'कथाकौतुक' आहे. 'सुभाषितावलि' ग्रंथहि याचा आहे.

श्रीवर्धदेव—(स. ६५० सुमार) कानडी जैन कवि. ग्रंथ-चूडामणि (तत्त्वार्थमहाशास्त्रावर कानडी भाषेंतील टीका). हा ग्रंथ अनुपलब्ध आहे. तुंबुलूला याचा जन्म झाला; आणि यानें वरील ग्रंथ केला असें देवचंद्राच्या 'राजावळीकथा' या कानडी ग्रंथांत लिहिलें आहे. तुंबुलूर आचार्य (तुंबुलु गांवचा आचार्य) असा याचा देवचंद्रानें निर्देश केला आहे. श्रवणबेळगोळच्या सदुसष्ठाव्या शासनांत (स. ११२९) याचा व याच्या ग्रंथाचा उल्लेख आहे. दंडी नांवाच्या संस्कृत भाषेंतील प्रसिद्ध कवीनेंहि याची प्रशंसा पुढील पद्यानें केली आहेः

'चूडामणिः कवीनां चूडामणिनामसेव्यकाव्यकविः। श्रीवर्धदेव एव हि कृतपुण्यः कीर्तिमार्हर्तुम्। य एव उपश्लोकितो दण्डिना। जह्नोः कन्यां जटाग्रेण बभार परमेश्वरः। श्रीवर्धदेव संधत्से जिह्वाग्रेण सरस्वतीम्।' वरील दोन्ही श्लोक वरील शासनांत आहेत (क. क. च. भा. १ पा. ७).

श्रीवर्धमान—(ग्रंथकाल स. ११४०) हा श्रीगोविंदसूरीचा शिष्य. यानें 'गणरत्नमहोदधि' नांवाचा ग्रंथ केला. हा ग्रंथ जुलियस् एजलिंग यानें संपादला आणि संस्कृत टेक्स्ट सोसायटीनें लंडन येथें स. १८८१ मध्यें प्रसिद्ध केला.

श्रीविद्यानिकेतन—जैनपंडित. कुमारिलभट्टानें याच्याजवळ जैनमताचा अभ्यास केला.

श्रीशातकर्णि—(आंध्र, शातकर्णि शालिवाहन व सातवाहन पाहा).

श्रीहर्ष परमार—(स. ९४२-७२) माळव्याच्या परमारांपैकीं दुसऱ्या वैरिसिंहाचा पुत्र. याला दुसरा सीयक किंवा सिंहभटहि म्हणत असत. यानें दक्षिणेंतील राष्ट्रकूट राजा खोट्टिगदेवावर स्वारी केली होती. नर्मदेवर खलिघट्ट येथें त्याच्याशीं लढाई झाली त्यांत राष्ट्रकूटाचा पराजय झाला. या लढाईंत वागडचा स्वामी कंकदेव परमार हत्तीवर चढून लढत असतां मारला गेला (बांसवाडाराज्यांतील अर्थूणा-पाणाहेडा येथील मंडलेश्वराच्या मंदिरावरील प्रशस्ति वि. सं. ११३६). स. ९७२ मध्यें दक्षिणेंतील राष्ट्रकूटांची राजधानी मालखेड शहर यानें लुटलें (पाइअलच्छीनाममाला श्लो. १२८). यानें हूणांनाहि जिंकलें होतें. याच सुमारास धनपाल कवीनें आपली विदुषी बहीण सुंदरी हिच्याकरितां 'पाइअलच्छीनाममाला' नांवाचा प्राकृत कोश केला. याचें एक दानपत्र वि. सं. १००५ माघ वद्य अमावास्येचें मिळालें आहे (पुरातत्त्व (गुजराथी) वि. सं. १९७९-८० पृ. ४४-४६).

याला मुंज आणि सिंधुराज (सिंधुल) असे दोन पुत्र होते. यांपैकीं मुंज याचा उत्तराधिकारी झाला.

२. (स. ११७५ सुमार) 'नैषधीयचरितम्' नांवाचें संस्कृत भाषेंतील काव्य करणारा कवि. नैषधीयचरिताशिवाय याचे पुढील ग्रंथ आहेतः—

गौडोर्वीकुलप्रशस्तिः, विजयप्रशस्तिः (जयचंद्र गाहडवालप्रशस्तिः), अर्णववर्णनम् (अर्णवराजचालुक्यप्रशस्तिः), छिंदप्रशस्तिः (गयेचें छिंदघराणें). या काव्यांशिवाय वेदान्तावरील 'खंडनखंडखाद्यम्' हा याचा ग्रंथ आहे. याला जयचंद्र गाहडवालाचा मुख्यतः आश्रय होता, तरी इतरहि राजांच्या दरबारांत याला मानमान्यता होती. म्हणून इतर राजांच्या प्रशस्त्या यानें केल्या आहेत, असें वरील यादीवरून दिसून येतें. राजशेखरानें प्रबंधकोशांत याचें चरित्र दिलें आहे. पण प्रबंधकोशाला ऐतिहासिक महत्त्व फार कमी आहे.

मम्मट व श्रीहर्ष यांच्यासंबंधीं पुढील आख्यायिका प्रसिद्ध आहे. यानें आपलें नैषधीयचरितम् हें काव्य मम्मटाला दाखविलें असतां मम्मटानें असे उद्गार काढले कीं, 'मला आधींच हें काव्य दाखविलें असतेंस तर मला काव्य-

दोषाचीं उदाहरणें दुसरीकडे पहावीं लागलीं नसतीं.' यावरून मम्मट व हा समकालीन असावेत. तसेंच याच्या काव्याबद्दल यांत अभिप्रायहि ग्रथित आहे. इंडियन ॲंटिक्वेरीमध्यें भांडारकर, बुल्हर व तेलंग यांनीं याचा कालनिर्णय करण्याचा प्रयत्न केला आहे (व्हॉ. १, २, ३, ४२, ४३). याच्या मातेचें नांव मामल्लदेवी व पिता हीर. निर्णयसागरमुद्रणालयानें प्रसिद्ध केलेल्या नैषधीय-चरिताच्या प्रस्तावनेंत म. म. शिवदत्त दाधीचानें या-संबंधीं बरीच माहिती एकत्र केली आहे.

श्रीहीर—श्रीहर्षपंडिताचा पिता.

श्रुतसागरगणि—(स. १४९३ सुमार) हा जैन तर्कज्ञ दिगंबरपंथी सरस्वतीगच्छशाखेचा होता. यानें 'तत्त्वार्थदीपिका' नांवाचा ग्रंथ लिहिला आहे. नेमिचंद्र दत्त याच्या सेवेंत होता (हि. इं. लॉ., पा. २१५).

श्रेयांसनाथ—हा जैनांचा अकरावा तीर्थंकर (तीर्थंकर पाहा).

श्रेष्ठ–रामदासस्वामींचे ज्येष्ठ बंधु (रामीरामदास पाहा).

श्वेतवनवासिन्—(स. १५०० पूर्वी) उणादि-सूत्रावरील टीकाकार. याचा पिता आर्यभट्ट. जन्मस्थान उत्तरमेरु (मलबार).

ष

षडक्षरदेव—(स. १६५५) कानडी कवि. हा वीरशैव होता. जन्मस्थान मळवळ्ळि तालुक्यांतील दनुगूरु गांव आहे असें दिसतें. गुरु–चिक्कवीर देशिक. चिक्कवीर हा दनुगूरु गांवच्या मठाचा स्वामी होता. ग्रंथ–राजशेखर-विलास (स. १६५५), शबरशंकरविलास, बसवराजविजय (स. १६७७). शिवाय वीरभद्रक, हाहि याचा एक ग्रंथ असावा. कविकर्णरसायन नांवाचा ग्रंथ यानें संस्कृतमध्यें केला आहे.

षडक्षरस्तोत्रहि यानें केलेलें आहे. याचा वीरभद्रो-दारणगद्य नांवाचा संस्कृत ग्रंथ उपलब्ध आहे (क. क. च. ३. ३८६). केळदीच्या वीरभद्रदेवाची यांत स्तुति आहे.

याला वयाच्या अकराव्या वर्षी कविता करतां येऊं लागली. कानडीतील कंदपद्य नांवाचा छंद हा फार चांगल्या प्रकारें रचतो, अशी प्रसिद्धि आहे. याची वर्णन-शैली उत्कृष्ट आहे. याचा 'राजशेखरविलास' वगैरे सर्व ग्रंथ चंपूरूप आहेत. कालिदासाच्या अजविलापाप्रमाणें तिरु-कोळवी नाचीचा मुलगा मेला असतां तिनें केलेला या काव्यांतील विलाप प्रसिद्ध आहे. 'राजशेखरविलास' ही पद्य कादंबरी आहे म्हटलें तरी चालेल.

हा कानडींतील उच्च दर्जाचा कवि आहे.

हा यळंदुर मठाचा स्वामी होऊन तेथेंच समाधिस्थ झाला (क. क. च. भा. २, पा. ४४२).

षष्ठदेव कदंब—(स. १००७) हा गोवा येथील कादंब घराण्यांतील दुसरा राजा होय. हा पश्चिम चालुक्य जयसिंह याचा मांडलिक असावा.

२. (स. १२५७) हा त्रिभुवनमल्ल कदंबाचा पुत्र. रट्ट व शिलाहार राजांनीं याचे प्रांत जिंकून घेतल्यामुळें याच्या हातांत फारच थोडी सत्ता शिल्लक राहिली होती.

स

सईबाई—(लग्न स. १६४० एप्रिल १७, मृत्यु स. १६५९ सप्टें. ५) ही मुधोजी निंबाळकर २ रा याची मुलगी होय. हिचें लग्न शहाजी भोसल्याचा मुलगा शिवा-जीशीं झालें. पुत्र संभाजी. शिवाय सकवार, राणू व अंबिका अशा तीन मुली होत्या.

सकवारबाई ऊर्फ सखूबाई—ही शिवाजीची मुलगी होती. हिच्या आईचें नांव सईबाई असून तिची ही थोरली मुलगी. हिचें लग्न फलटणचे महादजी नाईक निंबाळकर यांच्याशीं झालें. हिचें लग्न पुण्यास झालें. बजाजीला शुद्ध करून घेतल्यावर हा संबंध जोडलेला दिसतो.

२. (लग्न स. १६५७ जाने.) ही शिवाजी-महाराजांची सहावी पत्नी होती. ही गायकवाडांची कन्या. हिला कमला नांवाची एक मुलगी होती (शिवाजी-निबंधावली १, पान २०९ ते २२५).

३. ही राणोजी शिर्क्यांची मुलगी असून शाहूची बायको होती. हिचा व ब्रह्मेंद्रस्वामींचा पत्रव्यवहार उपलब्ध आहे. हिनें सहगमन केलें. ही कोल्हापूरच्या संभाजीच्या पक्षाची होती.

सकोपंत—(रामोजी शेणवी कोठारी पाहा.)

सखारामबापू (सखाराम भगवंत बोकील)—(स. १७१६–८१ आगष्ट २) मराठेशाहींतील अत्यंत थोर राजकारणी पुरुष. शिवाजीच्या वेळेपासून याच्या घराण्यांतील लोकांनीं राजकारणांत प्रामुख्यानें भाग घेतला होता (पंताजी गोपीनाथ बोकील पाहा).

पंताजीचे पुतणे महादजी व गंगोपंत यांनीं शाहूमहाराजांना कैदेंत अत्यंत साहाय्य केलें होतें. म्हणून त्यास ते काका असें म्हणत. रायगडच्या पाडावांत शाहूबरोबर ही बोकील मंडळीहि औरंगजेबाच्या कैदेंत होतीं. गंगोपंत–भगवंत–सखाराम असा यांचा वंश आहे. निंबाजी व बाजी हे याचे बंधुहि राजकारणांत वावरत होते.

हा प्रथम महादजी ऊर्फ बाबा पुरंदऱ्याकडे शिलेदार होता. बाजीरावानें याला आपणाकडे घेतलें, आणि शनवारवाडा बांधण्याच्या कामावर यास नेमलें (स. १७३२), पण पुढें हा सरदारी करूं लागला. नानासाहेब पेशव्यांच्या उत्तरेकडील दोनहि स्वाऱ्यांत हा होता (स. १७४१; १७४४). पण सतरा वर्षांचा सदाशिवरावभाऊ सेनापति व हा कारभारी असतां यानें व्यवस्थित हालचाली व कारभार करून अलोट संपत्ति मिळविली, शाहूचें कर्ज फेडलें आणि नानासाहेब व शाहू यांचा विश्वास संपादन केला (स. १७४७ जाने.). उत्तरेकडील राजकारणांत मल्हारराबरोबर यानें प्रामुख्यानें भाग घ्यावयास सुरुवात केली (स.१७४८). पुढील तीन वर्षे राजकीय भानगडीमुळें महादजीपंताबरोबर यानें सासवडीं काढलीं असावींत. पुढें मात्र रघुनाथरावाचा कारभारी नेमून गुजराथच्या बंदोबस्ताकरितां याची रवानगी झाली (स. १७५१).

येथून पुढें पानपतची लढाई संपेपर्यंतच्या राजकारणांत याचा प्रामुख्यानें भाग होता. त्यांत अमदाबादचा किल्ला सर करणें, रोहिल्यांचा पाडाव करून दोआब जिंकणें, कुंभेरीचा वेढा आणि दिल्लींत मराठ्यांचें वर्चस्व स्थापण्याचे कामीं यानें समाधानकारक कार्य करून दाखविलें. पुढेंहि रघुनाथरावाच्या स्वारींत हा कारभारी होता. पण पानपतयुद्धाच्या वेळीं मात्र याला दक्षिणेंत राहावें लागलें. नानासाहेबानें मृत्युसमयीं यास मुख्य कारभारी नेमलें, आणि पुढील बारा वर्षांत प्रत्येक आणीबाणीच्या प्रसंगीं मुख्य दिवाणगिरीचीं व शेवटीं सर्वाधिकारित्वाचीं कामें याच्याकडे सोंपविणें सर्वांना भाग पडलें (स. १७६१–७२).

पानपतच्या युद्धामुळें चढाई करणाऱ्या निजामाचें पारिपत्य करण्याचें काम यानें पार पाडलें. पण तहाच्या कलमामुळें गैरसमज होऊन माधवराव व रघुनाथराव यांच्यांत बेबनाव होऊन हा कारभारांतून बाहेर पडला. घोडनदीच्या लढाईंत माधवराव पेशव्याचा पराभव केला आणि राक्षसभुवनच्या लढाईंत चातुर्यानें निजामाचा सपशेल पराभव केला, त्यामुळें माधवरावाची याच्या कर्तबगारीबद्दल खात्री झाली. पण तो याला डोईजड न होईल व प्रतिपक्षालाहि न मिळेल असें वागवी. पण मरतेसमयीं नारायणरावाला याच्या ताब्यांत देऊन याच्यावरील विश्वास त्यानें व्यक्त केला. वास्तविक राघोबाकडे याचा कल असे, पण त्यानें अयोग्य वर्तन करतांच त्यालाहि यानें बारभाईचें कारस्थान रचून योग्य धडा घालून दिला.

राघोबाला पेशवाई मिळाल्यानंतर त्यानें नारायणरावाचा खून करणाऱ्या सुमेरसिंग व मुहम्मद युसफ यांस भेटून बक्षिसें दिलीं. यामुळें राघोबा सर्वांच्या मनांतून उतरला. पुढें साबाजी भोसल्याला निजामानें आश्रय दिल्यानें राघोबा त्याचें पारिपत्य करण्यास निघाला. सिद्धटेकाहून पेडगांवास गेल्यावर सखारामबापू मुलाच्या मुंजीच्या निमित्तानें सासवडाकडे परतला. बाकीची मंडळी पुण्याकडे येऊं लागली. स्वारींत ठरल्याप्रमाणें सर्वांच्या विचारें राघोबाला पदच्युत करून गंगाबाईच्या नांवें पेशवाईच्या कारभारास सुरुवात झाली (नवं. १७७३). यालाच 'बारभाईचें कारस्थान' असें म्हणतात. यांत प्रथम बापू, नाना, मोरोबा, तात्या, व त्रिंबकरावमामा हे पांच भाई प्रमुख होते. यानें गरोदर असणाऱ्या गंगाबाईची पुरंदरवर व्यवस्था लावली. नंतर राघोबा, निजाम, भोसले, होळकर, शिंदे व इंग्रज यांची व्यवस्था लावून राघोबाला ताब्यांत घेऊन जिकडेतिकडे स्थैर्य उत्पन्न केलें. या वेळीं बापूकडे सर्वांनीं एकमतानें सर्वाधिकार सोंपविले होते. आणि बापूनें आपल्या कर्तृत्वशक्तीचा चमत्कार सर्वांना दाखवून चकित केलें.

पुरंदरच्या तहानंतर बापू व नाना यांची चित्तशुद्धि राहिली नाहीं. बारभाईच्या कारस्थानानंतर याच्याकडे अनभिषिक्त पेशव्याचा दर्जा आला आणि नानाकडे याच्या हुकुमाच्या अंमलबजावणीचें काम आलें. पण महत्त्वाचे प्रसंग उलगडतांच नानानें परभारें आपल्या जबाबदारीवर

कामें उरकण्यास सुरुवात केली. महादजी शिंद्यासारखा मनुष्य आपल्या लगामीं घेऊन नानानें आपलें पारडें जड केलें आणि बापूला निर्माल्य करून सोडलें. तेव्हांच्या राजकारणांत प्रत्येक मुत्सद्याला स्वतःचें महत्त्व ताजें ठेवावें लागे. बापूसारखाच एकदां महत्त्व पावलेल्या पण सध्यां निर्माल्य झालेल्या मोरोबानें कारस्थान उभारलें आणि पुणें ताब्यांत घेऊन कारभारास सुरुवात केली. बापूनें मोरोबाला हाताशीं धरून नानाला नमविलें, आणि पुनः सहज रीतीनें नानाशीं तडजोड करून हें कारस्थान यानें नाहींसें केलें; व पुढें इंग्रज-मराठ्यांचें युद्ध होऊन राघोबानें राज्याची सोडचिठी देऊन तो शिंद्याचे स्वाधीन झाला (स. १७७८).

पण पुढें बापूनें फितुरी केल्याच्या दोन चिठ्ठ्या राघोबानें शिंद्याच्या स्वाधीन केल्या. तेव्हां यास कैद करून सिंहगडावर पाठविलें (स. १७७९ फेब्रु. २७). निजामाची मदत घेण्याबद्दल यास सुचविलें असतां 'अंतःकलहांत परक्यास हात घालूं दिला तर राज्यनाश होतो' असें बापूनें उत्तर दिलें (ऐ. गो. २५०). या चिठ्ठ्या बनावट आहेत असें बापूचें म्हणणें होतें. बापूला पळून जाण्याची संधि किंवा पुनः राज्यकारभार हातीं घेण्याची हरिपंत फडक्यानें सूचना केली असतां यानें फक्त कार्शीस पाठवीत असल्यास सुटण्याची इच्छा दर्शविली (पर्शियन कॅ. ५. ३४९). याला तुरुंगांत टाकल्यावर याची ५० लाखाची जिंदगी सरकारजमा केली.

नानानें अडथळा करतो म्हणून बापूला कैदेत टाकलें तरी याची व्यवस्था प्रथम पुर्वीलप्रमाणें ठेवली होती. 'दोन नोकर, नित्य-दानास १० रुपये, व्यतिपाताचे दिवशीं २। तोळे सोन्याच्या २८ पुतळ्या दानधर्मास, उत्तम जेवण, शाकभाजी, विड्याचीं पानें, श्राद्धविधि वगैरे सर्व बाबतींत तरतूद केली होती. प्रतापगडीं असतां दुधाकरितां एक गाय, व म्हैस पुण्याहून पाठविल्याची माहिती मिळते. सिंहगड, प्रतापगड, नगर, रायगड असें बापूला कैदी असतां नेण्यांत आलें. पण याला सोडविण्याचे प्रयत्न झाल्यानें याला बेडी घालण्यांत आली व याचे शेवटीं अत्यंत हाल करण्यांत आले. रायगडीं हा थोर पुरुष अतिसारानें मेला (शके १७०३, श्रावण शु. १३). क्रियेकरितां नानानें ५ हजार रुपये खर्च करविले.

यानें एकंदर पांच लग्नें केलीं. त्यांपैकीं कार्शीबाई, राजूबाई व जिऊबाई या मागें हयात होत्या. हीं लग्नें उतारवयांत म्हणजे स. १७७६-७८ पर्यंत झालीं. याचा आकोपंत नांवाचा मुलगा याच्या हयातींतच वारला होता (स.१७७५ मे). आकोपंताला रघुनाथ चिमणाजी पंतसचीवाची मुलगी दिली होती. बापूची दुसरी एक मुलगी अंताजी माणकेश्वराचा मुलगा बहिरोपंत यास दिली होती. आणखी एक मुलगी होती ती शंकरराव रघुनाथ पंतसचीवाला दिली होती. शेवटी जिऊबाईनें बापूचे चुलते धोंडो महादेव यांचे चिरंजीव दत्तक घेऊन त्याचें नांव यशवंतराव असें ठेविलें (स. १८२५).

बापूला 'राजकारणांतील विधि', 'प्रतिसृष्टि करणारा', 'शहाणा' अशीं समकालीन पत्रांत विशेषणें लावलीं आहेत. तत्कालीन 'सख्या, देवा, विठ्ठला' या शहाण्यांत पूर्ण शहाणा म्हणून यास अग्रमान मिळाला आहे. राजकारणांतील शस्त्र व शास्त्र हा चांगलेंच जाणीत होता. पटवर्धनी दप्तरांत याच्याबद्दल व देशस्थ जातीबद्दल अत्यंत अनुदार उद्गार आढळतात. तथापि हा अत्यंत बुद्धिमान् व हातांत घेईल तें काम पार पाडणारा होता, याबद्दल समकालीन सर्वांची खात्री होती. तत्कालीन व्यक्तिप्रधान राजकारणांत स्वतःचें महत्त्व राखून राजकारण करावें लागे त्यामुळें समष्टीचा विचार करून केलेलें राजकारण क्वचित् आढळतें.

सखाराम मोकाशी—निजामशाहाच्या राज्यकारभारांत सुधारणा करण्याच्या कामांत यानें मलीकंबरास मदत केली.

सखाराम हरि गुप्ते—(स. १७२०-७९) हा प्रभु जातीचा सरदार प्रथम थो. बाजीरावाच्या वेळीं उदयास आला. हा प्रथम जंजिऱ्याच्या स्वारींत होता. (स. १७३३). नंतर रघुनाथरावाबरोबर स्वाऱ्यांस जाऊं लागला आणि त्याचा कट्टा पुरस्कर्ता बनला. राक्षसभुवनचे लढाईत यानें अद्वितीय शौर्य गाजविलें व हैदरचे छावणींत शिरून त्याचा धुव्वा उडविला. नारायणरावाचे खुनानंतर याला कैद करण्यांत आलें व याची जिंदगी जप्त केली. यानें दादाचा पक्ष घेऊन फितुरी करण्याचें काम शेवटपर्यंत चालूं होतें. त्यामुळें बारभाईची यावर अत्यंत अवकृपा होती. कडक शिक्षा भोगीत असतांहि हा म्हणे 'माझी शक्ति गेली, माझे प्राणहि चालले, माझी वाचा बंद झाली व श्वासोच्छ्वासहि बंद पडला तरी माझे अस्थी. तूंहि रघुनाथराव हींच अक्षरें निघतील!' अशा निष्ठावंताची द्रव्यदंड देऊनहि याच्या बायकोस भेट घेतां आली नाही. बायको भेटण्यापूर्वीच यानें अवजड बेड्यांवर डोकें आपटून प्राण सोडला होता. पुढें भेटीबद्दल ठरलेली रक्कम वसूल करण्याबद्दल कारवाई चालूच होती! महादजीनें नाना फडणीसाला त्याबद्दल मध्यस्ती केलेली आढळते. याची मुलगी बखरकार मल्हार रामराव चिटणीसाला दिली होती. याचे घराणें आंबेगांवकर या नांवानें प्रसिद्ध आहे.

सखो विठ्ठल—(स. १७०७) शाहूचा न्यायाधीश.

सगनभाऊ—(स. १७७८-१८४०) प्रसिद्ध मराठी शाहीर. हा जातीनें शिकलगार मुसलमान होता. याच्या फडांत बिबिजान, येमा, बाळा, राघू व रामा गोंधळी सुंदर गाणारा होता. 'लावणी करावी सगनभाऊनें व म्हणावी रामा गोंधळ्यानें' अशी त्या वेळीं म्हणच असावी. 'दक्षिणच्या पेशव्यास घाला नव्हता आला । गंगाधरशास्त्र्यावरून राज्याचा नाश झाला' हा याचा पोवाडा फार प्रसिद्ध आहे. नंतर सातारचें राज्य जाईपर्यंत हा साताऱ्यास राहिला. याच्या कांहीं लावण्या मेदिक म्हणजे परमार्थपरहि आहेत. याचा गुरु गुरुनाथ सिद्ध होय. दुसऱ्या बाजीरावाच्या विलासकांडावर याच्या पंधरा लावण्या आहेत.

सगुणाबाई घोरपडे—ही प्रसिद्ध संताजीची सून असून पिराजीची बायको होती. हिला एक मुलगा असून त्याचें नांव राणोजी असें होतें.

सगुणाबाई निंबाळकर—हिचा पुत्र नरसिंगराव धारराव निंबाळकर (म. रि. म. वि. १, पृ. १८०).

सगुणाबाई पेशवे—जनार्दन बाजीराव पेशवे यांची पत्नी व रामजी अनंत भिडे यांची कन्या. हिच्या पुस्तकाची यादी पेशवे दप्तरांत प्रसिद्ध आहे.

सगुणाबाई भोसले—(लग्न स. १६५०) ही शिरक्याची कन्या व शिवाजीची पत्नी. हिला एक मुलगी होती. तिचें नांव राजकुवरबाई.

२. (मृत्यु स. १७५४) शाहू महाराजांची पत्नी. हिला धाकटी धनीण म्हणत. हिच्यावर शाहूचें प्रेम असून हीहि शाहूच्या मर्जीप्रमाणें वागे. हिची मुलगी राजसबाई. हिचा व ब्रह्मेंद्रस्वामीचा पत्रव्यवहार उपलब्ध आहे.

सच्चिदानंद—हा सदानंदाचा शिष्य. यानें ब्रह्मानुभव निवेदन करणारा 'अनुभवसार' नांवाचा ओवीबद्ध ग्रंथ केला (मं. वार्षिक १८३६, क्र. २३). यानें 'स्वात्मबोध,' नांवाचा ग्रंथ लिहिला. भाषा जुनी आहे (मं. श. १८३७ वार्षिक, ले. १३७).

सच्चिदानंदबाबा—(स. १२९० सुमार) ज्ञानेश्वरानें नेवासें येथें यांच्याकडून ज्ञानेश्वरी लिहविली. हे दे. ऋ. ब्राह्मण होते. यांचा 'ज्ञानेश्वरविजय' नांवाचा ग्रंथ होता. यांचे वंशज संगमनेरी आहेत. त्यांचें उपनांव थावरे.

सज्जनरंजन—(स. १७७६-१८०४) याचें मूळचें नांव गोविंदा गोसावी. हा इंदापूरचा राहणारा. याचीं पदें या नांवानेंच प्रसिद्ध आहेत. हा चांगल्या-चांगल्यांचीं मनें रंजवीत असे.

सज्जनसिंह—(अजमसिंह व बाजी घोरपडे पाहा).

सटवोजीराव डफळे—(मृत्यु स. १७०६) जत संस्थानचा संस्थापक व डफळपुरचा पाटील. प्रथम आदिलशाहा व नंतर औरंगजेबाकडून यानें जहागीर मिळविली. याचे बाबाजी व कान्होजी हे दोन मुलगे याच्या हयातीतच मेले. याची पत्नी येसूबाई.

सणकुल शिलाहार—हा दक्षिण कोंकणमधील शिलाहार घराण्याचा उत्पादक होय. यानें स. ७८० मध्यें शिलाहार घराण्याची स्थापना केली.

हा राष्ट्रकूट घराण्यांतील कृष्णराज १ ला याच्या आश्रया(संरक्षणा)खालीं होता. याच्या नंतर याचा मुलगा धम्मियर हा गादीवर आला (B.).

सतीबाई ऊर्फ बयाबाई शहापुरकर—(स. १६४५) यांचे पति बाजीपंत किंवा बाळकृष्णपंत व पिता अंबाजी मुऱ्हार व चुलतचुलता दत्ताजी अनंत यांना म्हणजे सतीबाईच्या सासरच्या व माहेरच्या सर्व मंडळींना समर्थांचा अनुग्रह झाला होता. भीमस्वामीकृत चरित्रांत बाजीपंताबद्दल कमळाजीपंत आणि अंबाजीपंताबद्दल विसाजीपंत अशीं नांवें आहेत. सतीबाईचे भाचे भिकाजीबुवा ऊर्फ भीमाजीबाबा किंवा भीमस्वामी यांची सद्गुरुवचनीं पूर्ण निष्ठा पाहून शके १५६७ मध्यें मसूर मुक्कामीं त्यांना समर्थांनीं अनुग्रह केला होता. तेव्हांपासून १० वर्षे ते समर्थांपाशीं होते.

सत्तर्सल, सत्तर्साल, शत्रुतुल्य—(स. १५६९-१६०८) हा नवानगर येथील जाम घराण्यांतील जो विभोजी त्याचा मुलगा होय.

याच्या आश्रयानें श्रीकंठकवीनें 'रसकौमुदी' ग्रंथ केला. स. १५९१ पासून हा सत्ता वाढवून स्वतंत्र झाला व त्याप्रमाणें इतर राजेहि याला मान देऊं लागले. यानें आपल्या राज्याची व्यवस्था उत्तम प्रकारें ठेविली होती. हा विद्येचा भोक्ता होता. याला अजोजी, जसोजी आणि विभोजी असे तीन मुलगे होते.

सत्यदामा क्षत्रप—हा दामघ्सद क्षत्रपाचा ज्येष्ठ पुत्र. याला महाक्षत्रप असें लिहिलेलें आढळत नाहीं. हा महाक्षत्रप होण्यापूर्वीच मेला असावा.

सत्यधर्मा कदंब—बनवासीच्या कदंबांपैकीं मृगवर्म्याचा पुत्र.

सत्याश्रय (पश्चिम) चालुक्य—(पुलकेशी पश्चिम चालुक्य व रविकीर्ति पाहा).

(स्वामी) **सत्यसिंह क्षत्रप**—याचीं नाणीं उप-

लब्ध नाहींत. पण यांचें नांव व महाक्षत्रप ही पदवी याच्या स्वामि (स्वामि) रुद्रसिंह नांवाच्या पुत्राच्या नाण्यावरून कळून येते. याच्या पित्याचें नांव उपलब्ध नाहीं.

सदम्बर—(स. ७२५ सुमार) एक शैव साधु. यानें पांड्य राज्यांत जैनांचा उच्छेद केला (रामस्वामी आयंगार, एम्. ए. कृत 'दक्षिणेंतील जैन धर्माचा इतिहास' पा. ६६).

सदानंद—(स. १६६४-१७२९ नंतर) एक महाराष्ट्रीय संत कवि. यानें आपल्या ग्रंथांत आत्मचरित्र थोडेंसें दिलें आहे. खानदेशांत धरण गांवीं मधुसूदन चिंतामणी धर्माधिकारी होते. त्याचा पुत्र सदाशिव हाच पुढें गुरुकृपेनें सदानंद नांवानें प्रसिद्धीस आला. याचे ग्रंथः-आनंदबोध, पराविद्या, आनंदप्रकाश (र. श. १६३२ अश्विन), भूगोलवर्णन, आत्मसारप्रकाश, संतमालिका, षड्रसादिप्रकरण, आनंदसार, वेदांतसार.

सदाशिव चिमणाजी सचीव (भोर)—(स. १७५७-१७८७) चिमणाजी नारायणाचे तीन पुत्रांपैकीं वडील पुत्र सदाशिव चिमणाजी होत. या वेळीं सचिवांना पुणें दरबारास ५० हजारांचा नजराणा पाठवावा लागला. स. १७६३ मध्यें पेशवे-निजाम युद्ध झालें. त्यांत यांची फार नुकसानी झाली, व खजिना रिकामा पडला. यांनीं आंबवडें येथील श्रीनागनाथाचा जीर्णोद्धार केला व भोरास भोरेश्वराचें व मुरलीधराचें देवालय बांधलें.

सदाशिव (दीक्षित वाजपेयी) ढकार—(स. १७२० सुमार) सातारचे कऱ्हाडे ब्राह्मण. हे नागपूरच्या भोसल्यांचीं शाहूदरबारांतील कामें कुशलतेनें उरकीत.

सदाशिव दिनकर करमरकर—हा नाना फडणीसाचा वकील. हा महादजीकडे होता. यानंतर कृष्णाजी भावे यांची नेमणूक झाली (स. १७८८).

सदाशिव नायक—(स. १५१३-६०) हा इक्केरीच्या राज्याचा संस्थापक. बुर्हाण निजामानें व इब्राहीम आदिलशाहानें रामराय आरविदूवर स्वारी केली तेव्हां यानें सेनापतित्व स्वीकारून त्यांचा पूर्ण मोड केला. याची राजधानी केलडी. हें विजयनगरचें सेनापति घराणें होय. यानें आपला भाऊ भद्रप्पा नायकास 'इम्मडी सदाशिव नायक' अशी पदवी देऊन गादीवर बसविलें व आपण वानप्रस्थाश्रम स्वीकारला. पण भद्रप्पास रामराय आरविदूनें ताबडतोब पदच्युत केलें (स. १५६०).

सदाशिव पंडित—'गूढदीपिनी' नामक वैद्यकावरील संस्कृत ग्रंथाचा कर्ता.

सदाशिव माणकेश्वर—(मृत्यु स. १८१६) हा दुसऱ्या बाजीरावाचा एक दिवाण होता. गोविंदराव पिंगळ्याच्या चाकरीस राहण्यापूर्वी हा कथा करून पोट भरीत असे. निजामास टिपूशीं युद्ध करण्यांत सामील करून घेण्याकरितां त्याजकडे वकील म्हणून यास पाठविलें होतें. स. १८०२ सालीं झालेला वसईचा तह याला बिलकुल पसंत नव्हता. परंतु हा तह बाजीरावानें याच्या विरुद्ध केला. पुढें यास खूष ठेवण्याकरितां इंग्रजांशीं होणारा पेशव्यांचा सर्व व्यवहार याच्या मार्फत होऊं लागला. खुशखेटचें व याचें शेवटीं वांकडें आलें.

त्रिंबकजी डेंगळ्याचें वजन बाजीरावाजवळ जास्त होऊन यांचें बस्तान बिघडलें. परंतु लवकरच त्रिंबकजीस बाजीरावास इंग्रजांच्या स्वाधीन करावें लागलें. तेव्हां पुन्हां बाजीरावानें सदाशिव माणकेश्वरास आपल्या सल्लागारमंडळांत घेतलें (स. १८१६). पुढें हा लवकरच वारला.

सदाशिव रामचंद्र शेणवी—(स. १७५६-८३) यास रामचंद्र बाबा शेणवी यांनीं दत्तक घेतलें. हा पराक्रमी होता, पण यांचें पेशव्याशीं किंवा बारभाईशीं पटलें नाहीं. नानानें याचा बराच छळ केला.

सदाशिवराय तुलुव—(स. १५४२-७० सुमार) हा विजयनगरचा राजा. हा व्यंकटरायानंतर गादीवर आला. याच्या पित्याचें नांव रंग क्षितींद्र. हा अच्युतरायाचा पुतण्या. हा गादीवर आला तेव्हा १३ ते १६ वर्षांचा होता. सलाकम तिम्मराजूच्या वेळीं कांहीं दिवस याला अज्ञातवासांत काढावे लागले. रामराय आरविदूनें सलाकम तिम्मराजूला ठार करून आपल्या ताब्यांत सर्व व्यवस्था घेतली आणि याला गादीवर बसविलें.

याची चुलत बहीण रामरायाची पत्नी होती. हा वयांत आला तेव्हां रामरायानें यास कैदेंत ठेवलें. हा तेरा वर्षें कैदेंत होता. याचें दर्शन लोकांना वर्षांतून एकदां होई. तथापि राज्यविस्तार किंवा व्यवस्था या दृष्टीनें रामरायांनीं चांगली व्यवस्था ठेवली होती. तालिकोटच्या युद्धानंतर रामरायाचा भाऊ तिम्मळानें स्वतःकडे सर्वाधिकार घेतले व राजधानी पेणुकोंडा केली. याचा खून त्यानें व त्याच्या मुलानें केला असावा.

सदाशिवराव ऊर्फ भाऊसाहेब पेशवे—(जन्म स. १७३० आगष्ट ३; मृत्यु स. १७६१ जानें. १४) हा चिमाजी आपाचा मुलगा. मुंज स. १७३६ मार्च २० ला झाली. पुढें लग्न झालें. (स.१७४०फेबु.) पत्नीचें नांव

उमाबाई. यांचें दुसरें लग्न पेणच्या भिकाजी नाईक कोल्हटकरांच्या मुलीशीं झालें (२३ एप्रिल स. १७५०) तिचें नांव पार्वतीबाई.

कृष्णातुंगभद्रा दुआबांतील ठाणीं देशमुखांनीं उठविलीं होतीं तीं परत घेण्याकरितां हा गेला होता (स. १७४६). बहादूरबेंड्याचा किल्ला यानें घेतला (स. १७४७). यानें यमाजी शिवाजीचें बंड मोडण्याकरितां रामराजाला बरोबर घेऊन सांगोल्यावर स्वारी करून बंड मोडलें व रामराज्याकडून मराठी राज्याची कायमची पूर्ण मुखत्यारी लिहून घेतली (स. १७५०). यानें आपला दिवाण रामचंद्रबाबा याच्या शिकवणीवरून नानासाहेब पेशव्याच्या दिवाणगिरीची मागणी केली. पण महादजीपंत पुरंदरे यास त्या जागेवरून कमी करण्याची त्याची इच्छा नसल्यानें यानें कोल्हापूरकराची पेशवाई स्वीकारली. पण भावाभावांत तंटा लागूं नये म्हणून महादाजीपंत पुरंदऱ्यानें आपल्या जागेचा राजीनामा दिला आणि हा पुण्याच्या पेशव्याचा दिवाण झाला (स. १७५०). तुंगभद्रा व कोरेगांव येथें झालेल्या लढायांत हा हजर होता (स. १७५१-५२). यानंतरच्या दक्षिणेंतील लढायांत हा असे (स. १७५८). उदगीरची लढाई तर याच्या नेतृत्वाखालींच झाली. उत्तरेंत नजीब व दक्षिणेंत सलाबत अशी त्या वेळीं स्थिति होती.

दिल्लीच्या बादशाहानें अब्दाली व रोहिले यांच्यापासून बादशाहीचें मराठ्यांनीं संरक्षण करावें म्हणून मराठ्यांशी करार केला होता (स. १७५२ मे). त्याप्रमाणें प्रयत्न करूनहि रघुनाथरावादि लोकांना अब्दालीच्या जोरास आळा घालतां आला नाहीं. अब्दालीशीं रोहिल्यांचें सूत होतें. रजपूत मराठ्यांशीं विरुद्ध होते. दिल्लीतहि दोन प्रबळ पक्ष होते. शिंदे-होळकरांत विरोध होता. त्यांचा अब्दालीनें वेगवेगळा पराभव केला आणि दत्ताजी पडला तेव्हां याची पटदूराहून उत्तरेकडे रवानगी झाली (स. १७६० मार्च १४).

हा निघाल्याबरोबर यानें सरदारांचे रुसवे काढून सर्वांना कामाला लावलें. बऱ्हाणपूर, भोपाळ, सिरोज, ओर्च्छा, नरवर, ग्वाल्हेर अशा मार्गानें यानें गंभीर नदी ओलांडली. अब्दालीनें वकील पाठवून याला नादीं लावलें. सुजाला याला वळवितां आलें नाहीं. अली गोहरहि अब्दालीला मिळाला. मराठ्यांच्या फौजा आग्र्याजवळ येतांच अब्दालीहि यमुनेच्या पलीकडे यांच्यावर नजर ठेवून राहूं लागला. मुचुकुंद तीर्थावर सर्व मराठे एकत्र झाले (६ जुलै). यमुनेस उतार नसल्यानें प्रथम दिल्ली घेऊन नंतर अब्दालीस कोंडावा असें ठरलें. मथुरेत याला आठ सामील झाला. अब्दालीपासून दिल्ली घेतली (२२ जुलै). नारो शंकरला राजेबहादर किताब देऊन दिल्लीचा बंदोबस्त त्याकडे सोंपविला. या वेळीं अब्दालीचें तहाचें बोलणें यानें धुडकावलें. युद्धाचा निर्णय लागल्याशिवाय शहाअलम दिल्लीस येईना म्हणून अली गोहरचा मुलगा जवानबख्त यास दिल्लीस युवराज केलें (ता. १०।१०।६०). दिल्लींत अन्न व पैसा याची टंचाई भासूं लागली तेव्हां 'दिवाण-इ-आम'च्या छताचे १७ लाख रुपये पाडले (पे. द. २७.२५७). यानंतर तहाचें बोलणें यानें पुनः धुडकावलें, आणि अब्दालीला रसद पोंचविणारें कुंजपुरा हें ठाणें घेतलें (१७ आक्टो. १७६०).

पण मराठ्यांना आग्र्यापासून कुंजपुऱ्यापर्यंतचा दोनशें मैलांचा पश्चिम किनारा संभाळणें कठीण झालें. आणि अब्दालीनें बागपतापाशीं यमुना उतरून मराठ्यांचा दिल्लीशीं संबंध तोडला.

अब्दालीचा रस्ता बंद करण्यास गेले पण मराठ्यांचाच रस्ता बंद झाला. प्रथम अब्दालीवर हा गणोरापर्यंत चालून गेला, पण अब्दालीपुढें याचा निभाव लागेना. म्हणून याला खंदक खणून आवळून मदतीची वाट पाहत बसावें लागलें. दोनहि सेना दोन कोसांच्या अंतरानें समोरासमोर होत्या. खंदक ५० हात रुंद व १२ हात खोल होता, व रोज चकमकी चालूं होत्या (नवंबर मध्यापासून जानेवारीच्या मध्यापर्यंत). बळवंतराव मेहेंदळे व गोविंदपंत बुंदेले पडल्यावर अब्दालीला पायबंद पडेनासा झाला. बागपताचा उतार अब्दालीच्या ताब्यांत असल्यानें त्याला रसद मिळे, पण मराठ्यांची अन्नावांचून दुर्दशा झाल्यानें शत्रूवर तुटून पडून मरण्याची वेळ आली. चांदी-सोन्याचें सर्व सामान आटवून बादशाही शिक्क्याचीं नाणीं पाडलीं आणि दुसऱ्या बाजूस भाऊशाही, जनकोजीशाही व मल्हारशाही अशा अर्थाचीं भा. ज. म. अशीं अक्षरें घातलीं. पण हीं नाणींहि खलास झालीं. बिकानेरकडे काटेरी झुडपें व इकडे सक्त अब्दाली यामुळें मराठे टेकीस आले. शेवटीं गोल करून फळी फोडून जाण्याचें यानें ठरविलें. मराठे पूर्वाभिमुख व गिलचे पश्चिमाभिमुख होते. गिलच्यांच्या मागल्या बाजूस यमुना होती. सकाळीं आठला युद्ध सुरू झालें. दुपारीं तीनला विश्वासराव पडला आणि पळ सुरूं झाला. ऐत्यावेळीं ठरलेला बेत बदलून ठाण मांडून युद्ध केल्यानें राखीव सैन्य नव्हतें व सर्वांना बदललेल्या बेताचीं बातमीहि नव्हती. अब्दालीचा ताज्या दमाचा कतलबाज रिसाला चारनंतर पुढें येतांच मराठे पळूं लागले. यानंतरची मराठ्यांची दुर्दशा वर्णन करणें

अशक्य आहे. पहिलाच बेत कायम असता तर तोफखान्याच्या जोरावर हा दिल्लीस पोंचता.व गिलचे यमुनेंत बुडण्याचा प्रसंग येता.

विश्वासराव पडल्यावर देहभान विसरून हा शत्रुसैन्यांत शिरला. हा व जनकोजी कोठें पडले याचा पत्ताहि लागला नाहीं. दुसऱ्या दिवशीं प्रेत शोधून काढून काशीराजानें याच्या प्रेताला अग्नि दिला. नाना फडणीस हा गर्दीत नाहींसा होईतोंपर्यंत याच्याजवळ होता. त्यानें आपल्या आत्मचरित्रांत स्वकीयांचें न ऐकल्याबद्दल यास दोष दिला आहे.

यानें केलेली मद्यबंदी पुष्कळ काल टिकली (पे. द. ३२ २०६).

सनंदनाचार्य—श्रीशंकराचार्यांचा शिष्य.

सन्मुखसिंग—(स. १५७० सुमार) हा जातीचा रजपूत असून खंडार येथील राहणारा होता. हा उत्तम ध्रुवपदिया तसाच उत्तम बीनकार असे. यानें मुसलमानी धर्माचा स्वीकार केला व त्यामुळें याचा प्रवेश अकबराच्या दरबारांत झाला. धर्मान्तरानंतर याचें नांव ' नौबतखान ' असें पडलें. यास तानसेनानें आपली मुलगी दिली होती. याचे वंशज बीनकार म्हणून ओळखले जातात. सारांश तानसेनाच्या मुलीचे वंशज ते ' बीनकार ' व मुलाचे वंशज जे गाणारे अशी प्रसिद्धि आहे.

सफदरजंग—(स. १७३९-५४) सातदखानाच्या पश्चात् त्याचा पुतण्या व जांवई सफदरजंग हा अयोध्या प्रांताचा कारभार पाहूं लागला. याच्या कारकीर्दीत या प्रांताची बरीच भरभराट झाली. यानें पुष्कळ लोकहिताचीं कामें केलीं. याच्या कारकीर्दीतील मुख्य गोष्टी म्हटल्या म्हणजे रोहिले, अबदाली व फरुखाबादचा नबाब यांच्याशीं युद्धें ह्या होत. एकदां तर याचा संबंध प्रांत रोहिल्यांच्या ताब्यांत गेला होता तो यानें मराठ्यांच्या मदतीनें परत मिळविला. यानें शेवटलीं सहा वर्षें दिल्लीच्या बादशाहाच्या वजीराचें काम केलें. यांचें संबंध नांव अबूल मनसूरजंग. याची राजधानी फैजाबाद. हा फार शूर होता (म. रि. म. वि. १, पृ. ३६०).

सफ्रा—(स. १७२६-१७८८) फ्रेंचांचा सेनापति व दर्यावर्दी. सप्तवार्षिक युद्धांत यानें उत्कृष्ट कामगिरी केल्यानें यास अमेरिकेस वसाहतींच्या संरक्षणाकरितां पाठविलें. तिकडून परत येतांच याची नेमणूक हिंदुस्थानांत झाली. हैदरनें या वेळीं इंग्रजांविरुद्ध चांगलेंच वर्चस्व संपादिलें होतें. त्याच्याशीं याचें संगनमत झालें आणि यानें इंग्रजांचा समुद्रांत पुरा मोड केला. हा. स. १७८१-८४ पर्यंत हिंदुस्थानांत होता. याच्या कर्तृत्वामुळें इंग्रज कां फ्रेंच असें वातावरण उत्पन्न झालें होतें.

सबक्तगीन गझनवी—(स. ९७७-९७) गझनीच्या यामिनी घराण्याचा संस्थापक. हा गुलाम होता तरी अलप्तगीननें यास आपली मुलगी दिली. पिराईस पदच्युत केल्यावर हा गादीवर बसला, आणि आपल्या राज्यारोहणास बुखाऱ्याच्या दुसऱ्या नूहाची संमति मिळविली. हा गादीवर आला तेव्हां गझनीच्या भोंवतालचें लहान राज्य याचे ताब्यांत होतें. पण पुढील बारा वर्षांत उत्तरेकडील आक्ससनदीपर्यंत व पश्चिमेस अफगाणिस्थान व इराणपर्यंत यानें आपलें राज्य वाढविलें. स. ९७९ चे सुमारास पंजाबच्या जयपाल राजानें गझनीवर स्वारी केली पण तह करून त्यानें आपला बचाव केला. पुढें यानें त्याच्यावर स्वारी करून लूट मिळविली (स. ९८६); व पुढें काबूलहि स्वाधीन करण्यास भाग पाडलें (स.९८८). या स्वाऱ्या धार्मिक दृष्टीच्या नसून फक्त राजकीय दृष्टीच्या दिसतात. पुढें यानें अबू अली सुंजूर नांवाच्या इस्मायली पंथाच्या गृहस्थाचें पारिपत्य करून नूह राजाकडून खुरासान प्रांत मिळविला, व त्यावर महमूदची नेमणूक केली. याच्या या कामगिरीमुळें महमूदाला साम्राज्य वाढवितां आलें.

समरसिंह गुहिलोत—(स. १२७३-१३०२) तेजसिंहानंतर त्याचा पुत्र समरसिंह मेवाडच्या गादीवर आला. याच्या वेळच्या आबूच्या शिलालेखांत लिहिलें आहे कीं तुरुष्करूपी (मुसलमानी) समुद्रांत बुडणाऱ्या गुजराथचा यानें उद्धार केला (इंडि. अँटि. भा. १६, पृ. ३५०). हा लेख वि. सं. १३४२ (स. १२८५) मधला आहे. स. १२६६-१२८७ पर्यंत घियासुद्दीन बल्बन हा दिल्लीचा सुलतान होता. त्याच्या सेनापतींनें ही स्वारी केली असावी. दिल्लीच्या गुलाम सुलतानांच्या तवारिखा मोगल बादशहांसारख्या विस्तृत लिहिलेल्या नसल्यानें त्यांत या स्वारीचा निर्देश नसल्यास आश्चर्य मानण्याचें कारण नाहीं. चीरव्याच्या शिलालेखांत 'शत्रूच्या संहारांत सिंहासारखा' असा याचा निर्देश आहे. तलारक्ष क्षेमचा मुलगा मदन यास यानें चितोडचा तलारक्ष नेमलें असल्याचें चीरवालेखावरून कळतें.

जिनप्रभसूरीनें आपल्या तीर्थकल्पांत उलगखाच्या गुजराथ-विजयाचें वर्णन करीत असतां लिहिलें आहे कीं- ' वि. सं. १३५६ (स. १२९९) मध्यें अलाउद्दीनचा सर्वांत धाकटा भाऊ उलूखान (उलगखां) कर्णदेवाचा मंत्री माधव याच्या प्रेरणेनें दिल्लीहून गुजराथकडे आला. चित्त-

कूड(चित्रकूट-चितोड)चा स्वामी समरसिंहानें त्याला दंड देऊन मेवाडचें रक्षण केलें. सुलतानचा युवराज बगड देश (बागड) आणि मोडासा आदि नगरें नष्ट करीत असावल्लीला पोहोंचला. असावल्ली अहमदाबादच्या जवळ आहे. राजा कर्णदेव (गुजराथचा राजा करणघेला) पळून गेला.' हा ग्रंथकार या वेळीं हयात होता. फारसी तवारिखांत यानें दंड दिल्याची हकीगत नाहीं. तसेंच सनहि जमत नाहींत. तथापि फारसी तवारिखांपेक्षां ही माहिती अधिक विश्वासार्ह आहे असें ओझाजी मानतात.

अंचलगच्छाच्या पट्टावलीवरून समजतें कीं, या गच्छाचे आचार्य अमितसिंहसूरि यांच्या उपदेशानें यानें आपल्या राज्यांत जीवहिंसा बंद केली होती (पीटर्सनचा पांचवा रिपोर्ट, ग्रंथकर्त्यांचें विवरण, पृ. २, तिसरा रिपोर्ट पृष्ठ १, विधिपक्ष गच्छीय प्रति क्रमण सूत्र सू. ५०४-१६).

याची आई जयतल्लदेवी. हिची जैनधर्मावर श्रद्धा होती. हिच्या आग्रहामुळें व वरील सूरीच्या उपदेशामुळें यांनीं वरील गोष्ट केली असेल.

याचा दुसरा पुत्र कुंभकर्ण होय. त्यापासून नेपाळचें राजघराणें उत्पन्न झालें असें मानतात.

समशेरबहादर—(स. १७३४-६१) हा पहिल्या बाजीरावापासून मस्तानीस झालेला मुलगा. हा पानपतावर जखमी होऊन दीग येथें मृत्यु पावला. याची मुंज करावी अशी बाजीरावाची इच्छा होती, पण ती ब्राह्मणांनीं नाकारली अशी आख्यायिका आहे. याचें लग्न ता. १८ आक्टोबर १७५३ रोजीं झालें. निंबगिरीकरांची मेहेरबाई ही याची बायको होती. याचा शौर्याबद्दल फार लौकिक होता. हा सैन्यांत एक खासा सरदार असे. रमाबाई व फुलाबाई या दोन याच्या रक्षा होत्या. मेहेरबाईच्या पोटीं यास अलीबहादर नांवाचा पुत्र झाला होता. हा मुसलमान असूनहि आपल्या हस्तें 'पांडुरंगा' असें आपल्या पत्रांत श्रीकारापुढें लिही, आणि शिक्क्यांत नानासाहेब पेशव्यांचें चरण स्मरण करी.

२. (स. १७८४-१८२३) अलीबहादराचा मुलगा व पहिल्या समशेरबहादराचा नातू. यास इंग्रजसरकारनें दरसाल चार लाखाचा तनखा करून देऊन याचे बांद्याचें राज्य स. १८०४ त खालसा केलें.

पुढें याचा भाऊ झुल्फिकारअली बांद्याचा नबाब झाला. तोहि त्याच सालीं वारला. त्याचा मुलगा अलीबहादर नबाबगिरीवर असतां सत्तावन सालचें बंड झालें. त्या गडबडींत बांद्याचा उत्कृष्ट राजवाडा व सर्व जडजवाहीर जळून गेलें. त्यानंतर इंग्रजांनीं बांदा शहर आपल्या ताब्यांत घेऊन नबाबास ३६००० ची नेमणूक देऊन आपल्या नजरेखालीं इंदुरास ठेविलें. तेथें याचे वंशज आहेत. बांदा येथील मशीद या नबाबाच्या वैभवाची साक्ष देते. कुटुंबास बाराशें रुपयांची नेमणूक देण्यांत आली.

समंतभद्र—(स. ६००) हा जैनांपैकीं दिगंबर पंथाचा महान् धर्मोपदेशक होता. श्रवणबेळगोळा येथील डोंगरांतील शिलालेख नं. ४४ यांत असें वर्णन आहे कीं 'यानें पाटलीपुत्र, मालवा, सिंध व टक्क देश (पंजाब) येथें ढोल पिटला' (म्हणजे वादी लोकांस उघड आव्हान केलें). नंतर दक्षिणेंत कांचीस आला व तेथून कर्नाटकांत आला. हा 'आप्तमीमांसा' (देवागमस्तोत्र) नांवाच्या महत्त्वाच्या जैन ग्रंथाचा कर्ता होय. आप्तमीमांसा या ग्रंथांत स्याद्वादसिद्धांताचें सुंदर विवेचन आहे. यानें उमास्वातीच्या तत्त्वार्थाधिगम सूत्रावर गंधहस्तिमहाभाष्य लिहिलें.

हा कर्नाटकांतील असावा. कानडी कवि याचा आदरपूर्वक उल्लेख करतात. मणुवकहळ्ळी या कर्नाटकांतील ठिकाणीं यानें तपश्चर्या केली, असें देवचंद्राच्या राजावली कथेंत लिहिलें आहे. याच्या संस्कृत व प्राकृत ग्रंथांवर कानडींत टीका उपलब्ध आहेत (क. क. च. भा. १ पा.१).

याशिवाय याचे युक्त्यनुशासन, रत्नकरंडक किंवा उपासकाध्ययन, स्वयंभूस्तोत्र व चतुर्विंशतिजिनस्तुति हे ग्रंथ होत. कांचीपूरच्या शिवकोटि महाराजाचा व याचा कांहीं संबंध होता व यानें त्याला शैव असून जैन करून घेतलें.

समुद्रगुप्त—(स. ३३६-८०) गुप्त घराण्यांतील प्रसिद्ध पहिल्या चंद्रगुप्ताला लिच्छवीघराण्यांतील कुमारदेवीपासून झालेला पुत्र. प्रयाग येथील किल्ल्यांत अशोकाचा शिलालेख असलेल्या विशाल स्तंभावर याचाहि एक लेख कोरलेला आहे. त्यावरून पुढील माहिती मिळते—

हा विद्वान् आणि कवि होता. तसेंच विद्वानांच्या बरोबर राहण्यांत याला आनंद वाटत होता. यानें आपल्या बाहुबलानें अच्युत आणि नागसेन यांना पराजित केलें होतें, शेंकडों युद्धांत जय मिळवला होता, आणि याचें शरीर शेंकडों शस्त्राघातांच्या खुणांनीं सुशोभित होतें. कोसल-(सिरपुर आणि संबलपुर याच्या आसपासचा प्रदेश)चा राजा महेंद्र, महाकांतार(मध्यप्रान्तांतील सोनपुरजवळचा जंगली भाग)चा व्याघ्रराज, कौराळचा (उडीसापासून समुद्रावरील-केरळ नव्हे) व पिष्टपुरचा (पिठापुर) महेन्द्र, गिरिकोट्टचा (मद्रास, जि. गंजम) स्वामिदत्त,

एरंडपल्लाचा (मद्रास, चिकाकोलच्या जवळ एरंडपालि) दमन, कांचीचा विष्णुगोप, अवमुक्तचा (?) नीळराज, वेंगीचा हस्तिवर्मा, पालक्कचा उग्रसेन, देवराष्ट्राचा (मद्रास-विजगापट्टम्चा भाग) कुबेर आणि कुस्थलपुरचा धनंजय इत्यादि दक्षिणापथांतील राजांना यानें कैद केलें आणि शेवटीं मुक्त करून कीर्ति मिळविली. रुद्रदेव (बहुतेक वाकाटवंशी रुद्रसेन प्रथम), मतिल, नागदत्त, चंद्रवर्मा, गणपतिनाग (बहुतेक पद्मावतीचा नागवंशी राजा), नागसेन, अच्युत, नंदी, बलवर्मा (आसामच्या भास्करवर्म्याचा पूर्वज), इत्यादि आर्यावर्तांतील प्रमुख राजांना नष्ट केलें, जंगली राजांना आपले सेवक बनविलें, समतट (गंगा-ब्रह्मपुत्र यांच्यामधील समुद्रापर्यंतचा प्रदेश, जस्सोर, कलकत्ता वगैरे जिल्हे), डवाक, कामरूप (आसाम), नेपाळ, कर्तृपूर (गढवाल, कमाऊं, अलमोडा) इत्यादि सीमान्त प्रदेशांतील राजांना, तसेंच मालव, अर्जुनायन, यौधेय, माद्रक, अभीर, प्रार्जुन, सनकानिक, काक, खर्परिक इत्यादि जातींना आपल्या स्वाधीन करून त्यांच्यापासून कर घेतला. तसेंच राज्यच्युत लोकांच्या वंशांना पुनः गादीवर बसविलें. देवपुत्र शाही, शहानुशाही (हे कुशानवंशी राजांचे किताब आहेत. म्हणजे त्यांचे सूचक हे शब्द आहेत.), शक, मुरुंड तसेंच सिंहल वगैरे द्वीपान्तरींचे राजे येऊन याला मुली भेट देत होते. हा दयाळु, हजारों गाई दान देणारा होता. याचा सर्व वेळ दीन, अनाथ, दुःखी यांना साहाय्य करण्यांत जात असे. हा संगीतविद्येंत निपुण व काव्यरचनेंत कविराज होता (फ्लीट गु. इं., पृ. ६-१०). दुसऱ्या शिलालेखावरून असें दिसतें कीं याला अनेक पुत्रपौत्र होते. पुष्कळ दिवस न झालेला अश्वमेधहि यानें केला होता. याचीं सोन्याचीं नाणीं मिळतात. त्यांवर अनेक कामांचा निर्देश करणारे छंदोबद्ध लेख आढळतात. ही चाल याच्या पुढल्या वंशजांनींहि उचलली. इतक्यांपूर्वी अशी छंदोबद्ध लेख नाण्यावर देण्याची प्रथा इतरत्र आढळत नाहीं. याच्या नाण्यांतून कुशानवंशी राज्यांच्या नाण्यांचें अनुकरण दिसतें (जॉन ऐलन्-कॉइन्स ऑफ दी गुप्त डाइनेस्टीज). याची राणी दत्तदेवी. तिच्यापासून यास दुसरा चंद्रगुप्त झाला आणि तो याचा उत्तराधिकारी होता. याला आशियांतील नेपोलियन म्हणतात.

सयाजी भोसले—(स. १६९० सुमार) हा परसोजी विठोजी भोसल्याचा मुलगा होय.

यानें कांहीं स्वारांसह जाऊन बाळापूर आकोल्याजवळ बंडखोर लोकांच्या पुढाऱ्यास धरून हुजूर पेश केलें; व परत घरीं आल्यावर सयाजीनें रयतेच्या अनुकूलतेनें नांदनज येथें नवीन एका गांवाची वसाहत करून त्याचें नांव अलमगीरपूर असें ठेविलें. त्यावरून अलमगीर बादशाहा खुष झाला व मोठ्या गौरवानें त्याचे परवाने सयाजीचे नांवें करून अलमगीरपूर हा गांव ११६०८५४ दामांचा (दामांचा म्हणजे २९५०० रुपयांचा; ४० दाम-१ रुपया) दिवाणी फौजदारी हक्कासह जहागीर म्हणून दिला. त्या अव्वल परवान्यांचीं इंग्रजींत भाषांतरें झालीं आहेत.

याला मृत्युसमयीं दोन मुलगे होते. त्यांपैकीं थोरला राजरूप व धाकटा रुस्तुमजी (मं. सप्तम सं. वृ. श. १८४१, पृ. ६७).

सय्यद इब्राहीम—(स. १३३६) हांसी-सिसी प्रांताचा सुभेदार. हा मदुरेचा सुभेदार सय्यद जलालुद्दीन हसनचा पुत्र. सय्यद जलालुद्दीननें बंड करून स्वातंत्र्य जाहीर केलें तरी याला मुहम्मद तुघ्लकनें सुभेदारीवरून कमी केलें नाहीं, पण मुहम्मद तुघ्लक तेलंगणच्या स्वारींतून आजारी पडून परत फिरला तेव्हां तो मेला अशीच सर्वत्र बातमी उठली. तेव्हां प्रांतिक सुभेदार स्वतंत्र होऊं लागले. यानेंहि स्वातंत्र्य जाहीर केलें, म्हणूनच याचा वध करण्यांत आला.

सय्यद जलालुद्दीन अहसन—(स. १३३५-४०) माबरचा सुभेदार. माबर म्हणजे मदुरा होय. तेथें यानें स्वातंत्र्य जाहीर केलें. मुहम्मद तुघ्लक पारिपत्य करण्याकरितां निघाला पण आजारी पडल्यानें वरंगळच्या पुढें आल्यावर त्यास परत फिरावें लागलें. यानें इब्न बतूता नांवाच्या सुप्रसिद्ध सूर प्रवाशास मुलगी देऊन जांवई केलें होतें. त्यानें लिहिलें आहे कीं, 'यानें स्वातंत्र्य जाहीर केल्यावर पांच वर्षांनीं याच्या एका अधिकाऱ्यानें याचा खून केला व अलाउद्दीन उदौजी नांव धारण करून गादी मिळविली.'

सय्यद लष्करखान—(स. १७५२-५६) हा सलाबतजंग निजामाचा दिवाण, पुढें वऱ्हाडचा सुभेदार. शेवटीं मक्केला गेला.

सय्यद हुसेन—सय्यद बंधु म्हणून प्रसिद्ध असलेल्या बंधूंपैकीं एक. हा प्रथम तीन वर्षें दक्षिणेंत होता. दक्षिणेंत आपल्या तर्फेचे लोक नेमून यानें दिल्लीकडे मोर्चा फिरविला (स. १७१९ फेब्रु.) व पहिल्यास पदच्युत करून दुसरा बादशाहा बसविला. शेवटीं बंधूंत फूट झाली. बादशाहाचा 'तोडाभीम' येथें मुक्काम असतां याचा खून झाला (स. १७२० आक्टो. ८). याचा भाऊ अबदुल्ला सय्यद. याच्याच मार्फत शाहूनें बाद-

शाहाशीं दुसरा तह केला, व बाळाजी विश्वनाथानें दिल्लीस जाऊन येसूबाईस सोडविलें.

सरफोजी भोसले—(स. १७११-२८) शहाजी निपुत्रिक वारल्यामुळें त्याचा भाऊ सरफोजी तंजावरचा राजा झाला. याचा सर्व काळ अर्काटचा नबाब व त्रिचनापल्लीकर याच्यापासून राज्य राखण्यांत गेला. यानंतर कनिष्ठ बंधु तुकोजीकडे राज्य गेलें.

२. (स. १७९८-१८३२) हा तंजावरच्या अमरसिंहाचे थोरले बंधु तुळाजीचा दत्तक पुत्र. यास इंग्रजांनीं गादीवर बसविलें व तंजावर संस्थान पूर्णपणें आपल्या ताब्यांत घेतलें. यानें आपला वेळ ग्रंथसंग्रह, विद्याप्रसार वगैरे करण्यांत घालविला. याला इंग्रजी येत होतें. यानें अनेक ग्रंथ विद्वानांकडून तयार करविले. याला शिल्प, संगीत, वैद्यक व ज्योतिष हीं अवगत होतीं. यानें धार्मिक व शैक्षणिक सुधारणा केल्या. हा लंडनच्या रॉयल एशि. सोसायटीचा ऑनररी मेंबर होता. याचा पुत्र शिवाजी.

सरजूराम पंडित—(काव्यकाल स. १६९१) एक हिंदी कवि. जैमिनिपुराणभाषाग्रंथाचा कर्ता.

सरदारसिंह—(स. १७६८-१८४२) हा बीगोरच्या शिवदानसिंहाचा पुत्र. जवानसिंग निपुत्रिक मरण पावल्यानें याच्याकडे मेवाडचें राज्य आलें. यानें लालसिंगाला मारल्यानें सर्व याच्या विरुद्ध होते. यास मुलगा नव्हता म्हणून याचा भाऊ सरूपसिंहास गादी दिली (वीरविनोद भा. २).

सरबुलंदखान—(मृत्यु स. १७४२) मुबारिजखानानंतरचा माळवा व गुजराथचा सुभेदार. निजामाचा मामा हमीदखानानें ते प्रांत बळकावले होते. मराठेहि त्याला सामील झाले. शेवटीं यानें मराठ्यांशीं केलेला तह अमान्य झाल्यानें जोधपूरच्या अभयसिंहास याच्या जागीं नेमलें.

सरस्वतीगंगाधर—(स. १४५८ सुमार) यालाच नामधारक असें म्हणत. यानें नृसिंहसरस्वतीचरित्र मराठींत ओवीबद्ध लिहिलें तें 'गुरुचरित्र' या नांवानें प्रसिद्ध आहे. गुरुचरित्र हा ग्रंथ बावन्न अध्यायात्मक असून तो दत्तोपासक ब्राह्मणांच्या नित्यपठणांत आहे. या ग्रंथांत ३१।३२ या अध्यायांत पतिव्रता व विधवा यांचे आचार दिले आहेत. अ. ३६।३७ यांत ब्राह्मणधर्माचा आचार दिला आहे, व ठिकठिकाणीं अनेक धर्मपर विचार सांगून समाजास वळण देण्याचा प्रयत्न केला आहे. या ग्रंथाच्या पठणानें पिशाचबाधा दूर होते, अशी भाविक लोकांची श्रद्धा आहे. हा आपस्तंबशाखेचा कौंडिण्यगोत्री साखरे आडनांवाचा गृहस्थ होय. सायंदेव-नागनाथ-देवराव-गंगाधर असा यानें आपला वंश दिला आहे. आईचें नांव सरस्वती व मातामहाचें चौंडेश्वर. शाखा आश्वलायन (ऋग्वेदी), गोत्र काश्यप असा मातृकुलाचा निर्देश आहे. यांपैकीं सायंदेव व नागनाथ नृसिंहसरस्वतीचे साक्षात् शिष्य होते. गुरुचरित्राचें संस्कृतमध्यें भाषांतर झालें आहे (गुरुचरित्र अ. १३।१४; ४१-४२).

सरहपा—(स. ८०० सुमार) हा चौऱ्यांशीं सिद्धांपैकीं सहावा सिद्ध. जात ब्राह्मण. गांव नालंदा. याचें दुसरें नांव राहुलभद्र किंवा सरोजवज्र. शबरपा व नागार्जुन याचे शिष्य. याचे अनेक ग्रंथ व हिंदी कविता आहेत.

सरूपचंद गुप्त—(स. १७८० सुमार) हा जैन व्यापारी असून गोहदचे राण्याचे पदरीं होता. यानें ग्वाल्हेरचा किल्ला घेण्यास इंग्रजांस मदत केली.

सरुपसिंह गुहिलोत—(स. १८४२-६१) सरदारसिंहानंतर हा त्याचा धाकटा भाऊ मेवाडच्या गादीवर आला. याच्या वेळीं याचें राज्य इंग्रजानें घेतलें व तैनाती फौजेचा तह केला.

सरुर उल्मुल्क—(स. १४३५ सुमार) हा दिल्लीच्या मुबारक सय्यदाचा प्रधान. यानें मुबारकचा खून केला व मुहम्मद सय्यदाला गादीवर बसविलें. त्यानें याचा खून केला.

सर्जेराव घाटगे—(खून स. १८०९) याला सखाराम व तुळोजी असेंहि म्हणत. हा कागलचा राहणारा. हा परशुरामभाऊ पटवर्धनाकडून नानाफडणिसाकडे आला (स. १७७६). नानावर कठीण प्रसंग आला असतां हा दौलतराव शिंद्याकडे गेला, आणि आपल्या बायजाबाई नांवाच्या रूपवती मुलीस त्यास देऊन हा त्याचा दिवाण झाला. बाजीराव व नाना फडणीस यांना केलेल्या मदतीबद्दल यावयाच्या रुपयाकरितां यानें अनन्वित प्रकार केले. कित्येक ठार झाले, कांहीं पळाले व कांहींनीं आत्महत्या केल्या. महादजी शिंद्यांच्या बायकांना यानें चाबकानें सडकलें. त्यामुळें त्यांना अनुकूलता मिळून युद्ध सुरू झालें. हा कैद झाला. बायजाबाईनें सोडविलें, पण यानें शिंदे बायांवर मारेकरी घातले. यानें शेणवी सरदारांची कत्तल केली. दौलतरावाच्या पाठोपाठ हा उत्तरेकडे गेला. इंदूरलाहि यानें असाच कहर केला. इंग्रजानें याला कारभारांतून काढण्याची अट घातली, तथापि दौलतरावाला याला अगदीं दूर करितां आलें नाहीं. शेवटीं मानाजी फाकड्याचा मुलगा आनंदरावानें याचीं भररस्त्यांत खांडोळी केली. पुष्करला

याची छत्री आहे. हा ठेंगू, जाड, बटबटीत, घारा, गोरा, सफेत केसाचा मोठा क्रूर पुरुष होता. मराठी राज्याला फांसावर चढविणारा हा यमदूतच होता.

सर्फराजखान—(मृत्यु स. १७४०) हा मुर्शीदकुलीखानाचा नातू. याच्या पित्याचें नांव शुजाखान. हा उद्दाम होता.

सर्वदेवसूरि—प्रमाणमंजरी ग्रंथाचा कर्ता.

सर्वभक्षपा—हा चौऱ्यांशीं सिद्धांपैकीं पंचाहत्तरावा सिद्ध होय. जात शूद्र. भमर शहराचा राहणारा. हा शबरी (२) आणि भूसुक यांचा शिष्य. याचा करुणाचर्चाकपालदृष्टि (तं. ४८।४६) हा ग्रंथ होय.

सर्वसेन—संस्कृत ' हरिविजय ' काव्याचा कर्ता.

सर्वज्ञ—(स. १७००) कानडी कवि. वीरशैव. 'सर्वज्ञवचन' नांवाचा त्रिपदी छंदांतील याचा ग्रंथ प्रसिद्ध आहे. याच्या प्रत्येक वचनाच्या शेवटी सर्वज्ञ असें पद येतें. याच्या या ग्रंथांत अनेक विषयांसंबंधीं चांगले विचार आले आहेत. त्यामुळें याचीं वचनें मराठींतील तुकारामाप्रमाणें कर्नाटकांत सर्वसामान्य लोकांच्याहि तोंडीं आहेत (क. क. च. भा. २, पा. ५३२).

सर्वज्ञानदेव—सुयेनताई या चिनी प्रवाशानें हिंदुस्थानांत धारण केलेलें नांव.

सर्वज्ञात्ममुनि—(स. ९७८) यानें ' संक्षेपशारीर ' नांवाचा शंकराचार्यांच्या आत्माद्वैतमताला पुष्टि देणारा ग्रंथ लिहिला. जीवाचा आत्म्याशीं संबंध सांगतांना प्रतिबिम्बवादाचा हा स्वीकार करतो. याच्यापूर्वी वाचस्पतिमिश्रानें अवच्छेदवादाचें चांगलें प्रतिपादन केलें, पण तें सोडून यानें प्रतिबिम्बवाद स्वीकारला.

सलहदी पूरबिया—(स. १५३२) हा तंवर घराण्यांतील असून रायसेन येथील राजा होता. याला चितोडच्या सांगा(संग्रामसिंह)ची मुलगी दुर्गावती दिली होती. याचा गुजराथचा सुलतान बहादुरशहा यानें पराजय केला तेव्हां हा मुसलमान झाला. बहादुरशहा सुरुंग लावून चितोड उडवून देऊं लागला तेव्हां याला बायकामुलांबद्दल वाईट वाटूं लागलें. म्हणून यानें बहादुरशहाला सांगितलें कीं, तूं माझ्या बायकामुलांना सतावूं नकोस, मी लढाई बंद करवतों. हें ऐकून बहादुरशहानें मलिकअली शेर नांवाचा अधिकारी बरोबर देऊन याला चितोडवर पाठविलें. तेव्हां याची पत्नी राणी दुर्गावती हिनें याचा अत्यंत धिःकार केला.

तेव्हां हा शत्रूवर तुटून पडला आणि कामीं आला. राणी दुर्गावतीहि सातशें रजपूत स्त्रिया व आपलीं दोन मुलें यांसह अग्नींत उडी घेऊन परलोकीं गेली (ब्रिग, फिरिश्ता भा. ४, पृ. १२२).

हा मुसलमान झाल्यामुळें याचें रायसेनचें राज्य याचा भाऊ लखमनसेन (लक्ष्मणसिंह) याच्या ताब्यांत होतें. बहादुरशहानें रायसेनच्या किल्ल्याला वेढा दिला तेव्हां याचा पुत्र भूपतराय यानें महाराणा विक्रमादित्याकडून मदत आणली. पण पुढें बरादुरशहानें रायसेनचा किल्ला घेतला (स. १५३२).

सलाकम तिम्म राजू—(मृत्यु स. १५४२) हा विजयनगरच्या अच्युतराय तुलुवाचा मेहुणा. व्यंकट अज्ञान असल्यानें हाच मुख्त्यारीनें कारभार पाही. रामराय आरविदूनें याला ठार करून सर्व सत्ता आपल्या हातीं घेतली. हे एकाच नांवाचे दोन भाऊ होते व त्याचा उच्चार सकल तिम्म राजू असाहि आहे.

सलाबतखान—(शीद्दीजोहार पाहा).

सलाबतजंग—(स. १७५१-६१) निजामअलीचा भाऊ व कृष्णामुखाचे दक्षिणेकडील गुंटूरचा जहागीरदार. हा अडोनींस राहात असे. हैदरानें याजवर स्वारी केली असतां याच्याजवळ असलेल्या फ्रेंच सैन्याचा यास उपयोग झाला नाहीं, तेव्हां यानें इंग्रजांची मदत मागितली व त्याचे खर्चाकरितां गुंटूर प्रांत लावून दिला. त्यामुळें निजामअलीस फार राग आला. यांच्या भांडणाचा फायदा पेशव्यास उदगीरचे लढाईत मिळाला (पे. द. २५. २६९, २७४). हे दोघे एक झाल्यावर पेशव्यांना यांचा मोड करणें कठीण झालें. क्लाईव्हनें अर्कोटला शह देऊन मच्छलीपट्टण ताब्यांत घेतलें तेव्हां यानें इंग्रजांशीं तह केला (स. १७५९). या तहान्वयें इंग्रजांना उत्तर सरकार प्रांत मिळाला व फ्रेंच सैन्याची हकालपट्टी झाली. याचें दुसरें नांव बसालतजंग. शेवटी निजामअलीनें यास कैदेंत टाकलें व पुढें ठार मारून स्वतः गादी बळकाविली.

सहजयोगिनी चिन्ता— ही चौऱ्यांशीं सिद्धांपैकी होती. हिनें 'व्यक्तभावानुगततत्त्वसिद्धी' हा ग्रंथ लिहिला.

सहजानंद—(स. १६३८-१६७८) रामदासपंचायतनांतील रंगनाथ हे याचे परात्पर गुरु व गुरु ब्रह्मानंद. याचे ग्रंथ—ज्ञानदीपिका व अमृतानुभवावर संस्कृत टीका. योगवासिष्ठसार हा अपुरा ग्रंथ याचा नसून माधवदासाचा असावा, असें राजवाडे म्हणतात (मं. वा. इ. १८३६, ले. ८८).

सहजानंदस्वामी—(स. १७७३) स्वामी नारायण तो हाच. हा मूळ अयोध्येकडील राहणारा होता.

यानें गुजराथी भाषेंत 'वर्तमानधर्म' या नांवाचें मत लोकांस शिकवून पुष्कळ लोकांस आपल्या मतांत ओढलें. या मताचें नांव 'स्वामीनारायणपंथ' असें जरी चालत आहे, तरी यास 'उद्धवसंप्रदाय' असें म्हणतात; व वल्लभसंप्रदायास यानें बराच अडथळा आणला आहे.

सहजोबाई—(स. १७८१) चरणदासाची शिष्या. हिंदी कवयित्री (क. कों. १).

सहदेव भाडळी—एक शूद्र ज्योतिषी. याचीं वचनें मराठी व हिंदी या भाषांत आहेत, आणि तीं अत्यंत लोकप्रिय आहेत (मं. १८३५, वा. इ. ले. २९).

सहर—(कुत्बुद्दीन लंगा पाहा).

संकट—(स. ९०४) काश्मीरच्या शंकरवर्मनाचा हा पुत्र होय. गोपाळवर्मन् यास त्याचा प्रधान प्रभाकरदेव यानें ठार मारिल्यावर गादीवर आला. हा गादीवर आलेल्या दिवसापासून अवघ्या सहा दिवसांतच मरण पावला. तेव्हां शंकरवर्मनची विधवा स्त्री सुगंधा ही राज्य करूं लागली (B.).

संगम—(स. १३३६ सुमार) विजयानगरच्या संगम घराण्यांतील हा मूळ पुरुष होय. याच्या बायकोचें नांव कामाक्षी असें होतें. याला हरिहर १ला, कम्पन १ला, बुक्क १ला, मारप्पा आणि मुद्दप्पा असें पांच मुलगे होते.

२. (स. १३४८–६१) हा पहिल्या बुक्करायाचा पुतण्या व कंपनाचा मुलगा. याचा भाऊ सावण यानें नेलोरजवळचा एक गांव ब्राह्मणांना दिला (ता. ३ मे १३५६); व तत्पूर्वी एक वर्ष गादीवर आला, असें नेलोर ताम्रपटांत म्हटलें आहे.

संगराजित्—(महाबतखान पाहा).

संग्रामदेव लोहर—(स. १०२९–५९) काश्मीरचा राजा. यावर गझनीच्या महमूदनें स्वारी केली.

संग्रामसिंह—(स. १७७८–१८१३) 'काव्यार्णव' नांवाच्या हिंदी ग्रंथाचा कर्ता. सिंगरामऊचा राजा.

संग्रामसिंह गुहिलोत (ऊर्फ संगराणा)— (जन्म स. १४८२ एप्रिल १२, अभिषेक स. १५०९ मे २४, मृत्यु स. १५२८ जाने. ३०) हा रायमल्लाचा पुत्र. याला राज्य मिळेल असें ज्योतिषानें सांगितल्यामुळें राजमल्ल व पृथ्वीराज हे वडील बंधु याचा द्वेष करूं लागले, आणि याला अज्ञातवासांत बरेच दिवस घालवावे लागले. गादीवर आल्यावर इडरचा राजा रायमल्ल याला मुलगी देऊन त्याचा भीम नांवाचा चुलता व त्याला साहाय्य करणारा गुजराथचा मुज्फरशाहा यांचा पराभव केला, आणि त्यानें राज्य त्यास मिळवून दिलें.

दिल्लीच्या इब्राहीम लोदीनें स्वारी केली असतां यानें त्याचा धौलपुराजवळ पराभव केला व बयानेपर्यंत त्याचा पाठलाग केला. पण तेव्हां याचा उजवा हात तुटला व पाय कायमचा लंगडा झाला.

मांडूचा महमूद (दुसरा) व साहेबखा यांच्या भांडणांत मेदिनीराय नांवाच्या रजपुताच्या साहाय्यानें महमूदनें राज्य मिळविलें; पण त्याला मेदिनीरायाचें भय वाटून तो गुजराथकडे पळाला. मेदिनीरायानें याच्या साहाय्यानें त्यावर स्वारी करून त्याचा पराभव केला व महमूदहि जखमी होऊन हातीं लागला. पण त्याला बरें करून व अर्धें राज्य देऊन यानें सोडून दिलें. ही गोष्ट उदारपणाची असली तरी राजकारणाच्या दृष्टीनें अत्यंत चुकीची होती.

पण गुजराथच्या सुलतानानें पुनः लढाईची तयारी करून मलिक अयाजच्या नेतृत्वाखालीं चढाईला प्रारंभ केला. कारण मागल्या लढाईच्या वेळीं यानें गुजराथचें खूपच नुकसान केलें होतें. मागें उदारपणानें सोडलेला मांडूचा सुलतान महाराण्याविरुद्ध नेमका मलिक अयाजला येऊन मिळाला. पण मुसलमानी अधिकाऱ्यांत मतभेद असल्यानें पिछेहाट होऊन तह करून सर्व परत फिरले.

नंतर बाबर हिंदुस्थानांत आला आणि त्यानें पानपतच्या पटांगणांत मुक्काम करून दिल्लीचा बादशहा इब्राहिम लोदी यास युद्धांत ठार करून दिल्लीचें राज्य घेतलें (स. १५२६ एप्रिल २०). यापूर्वीहि बाबर हिंदुस्थानांत आला होता. दिल्ली ताब्यांत आली तरी त्या वेळीं प्रबळ असणाऱ्या याला त्याला जिंकावयाचें होतें. प्रथम लढाया होऊन प्रत्येक ठिकाणीं याची सरशी झाली. बाबरहि निराश झाला होता. हा सारखा जवळ येत चालला आणि बाबरचें सैन्य भयभीत होऊं लागलें. शेवटीं बाबरनें दारू सोडली आणि दारू पिण्याचीं मूल्यवान् पात्रें गरीबांना वांटलीं. कुराणावर हात ठेवून मेरेपर्यंत लढण्याच्या सर्वांकडून शपथा घेतल्या, व याला तहाच्या वाटाघाटीला लावून आपली तयारी जोरांत सुरू केली. शेवटी तह फिसकटला व लढाई सुरू झाली (स. १५२७ मार्च १७). प्रथम याचा जय होता, पण तोफखान्याच्या जोरावर मुसलमानांनीं चारहि बाजूंनीं रजपुतांना वेढा दिला. याला मर्मस्थानीं बाण लागल्यामुळें बेशुद्ध स्थितींत परत नेलें. कोणीतरी जबाबदार आहे असें दाखविण्या-

करितां 'झाला अज्जा' राजचिन्हयुक्त होऊन राजाचें काम करीत होता. पण शेवटीं बाबरचा जय होऊन मुसलमान हिंदुस्थानांत स्थिर झाले.

या पराजयाचें मुख्य कारण पहिल्या विजयानंतर बाबरला तयारी करण्यास सवड देणें हें होय. खांडव्यास जय झाल्यावर हल्ला न थांबतां चढाई केली असती तर याचा जय नक्की होता. तसेंच हे शत्रूंचीं साधनें लक्षांत घेऊन युद्ध करीत नव्हते. शत्रूचा व्यूह व तोफा या लक्षांत न घेतां रजपूत केवळ तरवारीनें शौर्यानें लढत असत. तोफा व बंदुका यांच्याकडे नव्हत्या. तसेंच हा हत्तीवर असल्यामुळें त्यावर नेम धरण्यास सोपें गेलें, व हा परत गेल्याचाहि सैन्यावर परिणाम झाला. या पराजयाचा परिणाम रजपुतांवर व सगळ्या हिंदुस्थानावर झाला.

मूर्च्छित स्थितींत याला नेल्यावर बसवा गांवापाशीं हा शुद्धीवर आला. पण याला युद्धभूमींतून परत आणल्याबद्दल फार वाईट वाटलें. यानें पुनः युद्ध करण्याचीहि धडपड केली, पण दुर्दैवानें याला ग्रासलें होतें. तथापि उत्साहानें यानें प्रयत्न सुरू केला. बाबरलाहि याचें भय होतें. सारखे हल्ले करून याचें बळ क्षीण केलें पाहिजे असें त्यानें ठरविलें व त्याप्रमाणें मेदिनीरायावर त्यानें स्वारी केली व तो चंदेरीपर्यंत आला तेव्हां हा ही संधि उत्तम आहे असें समजून चंदेरीकडे निघाला. इरिचगांवीं याचा मुक्काम असतां हा पुनः युद्धांत पडतो आहे असें पाहून युद्धविरोधी रजपुतांनीं याला विषप्रयोग करून ठार केलें. शेवटीं हा कालपी येथें मेला.

यानें अठ्ठावीस विवाह केले होते असें म्हणतात. याला सात मुलें होतीं. त्यांचीं नांवें–×भोजराज, ×कर्णसिंह, रत्नसिंह, विक्रमादित्य, उदयसिंह, ×पर्वतसिंह व ×कृष्णसिंह. चार मुली होत्या—१ कुंवरबाई, गंगाबाई, पद्माबाई व राजबाई. मुलांपैकीं ×अशी खूण केलेले हा जिवंत असतांच परलोकवासी झाले होते.

बाबरानें याच्याविषयीं लिहिलें आहे कीं, 'राणा संग आपलें शौर्य व तरवार यांनीं सर्वश्रेष्ठ झाला होता. याची शक्ति इतकी वाढली होती कीं माळवा, गुजराथ किंवा दिल्ली येथील सुलतान याला स्वतंत्रपणें एकटे जिंकूं शकत नव्हते. यानें दोनशें शहरांतल्या मशिदी पाडल्या व शेकडों मुसलमानांना कैद केलें. याचा मुलूख दहा कोटींचा होता व याच्या सैन्यांत एक लक्ष स्वार होते. शिवाय सात राजे, नऊ राव आणि १०४ छोटे सरदार होते. याचे तीनहि उत्तराधिकारी असेच योग्य असते तर हिंदुस्थानांत मोंगलांचें राज्य झालें नसतें.'

२. (स. १६९०–१७३४) मेवाडच्या दुसऱ्या अमरसिंहाचा मुलगा. औरंगजेबाच्या अखेरच्या दिवसांत यानें वडिलाच्या वेळीं गेलेला प्रांत परत घेतला. फर्रुखसियरला यानें जिजिया कर उठविण्यास सांगितलें. हा मोठा स्वाभिमानी, धार्मिक आणि प्रजाहितदक्ष राजा होता. टॉड म्हणतो, 'बापा रावळच्या गादीचें महत्त्व रक्षण करणारा हा शेवटचा राजा होय.' यानंतर दुसरा जगत्सिंह गादीवर आला.

संग्रामापीड कर्कोटक—(स. ७४३–७५०) हा वज्रापीडानंतर काश्मीरच्या गादीवर आला.

संघदामा क्षत्रप—(स. २२२) हा रुद्रसिंहाचा दुसरा मुलगा. हा महाक्षत्रप झाल्यानंतरचीं याचीं चांदीचीं नाणीं शा. श. १४४–१४५ मधील मिळालीं आहेत. यानें दोन वर्षांहि पुरें राज्य केलें नाहीं. यानंतर याचा धाकटा भाऊ दामसेन अधिकारी झाला.

संघमित्रा–सम्राट् अशोकाची मुलगी. ही सिलोनांत धर्मप्रसारार्थ गेली होती. हिचा एक स्तूप स्तूपाराम येथें आहे.

संजय—(स. १२८८) बंगालींत महाभारताचा अनुवाद करणारा भारद्वाजगोत्री बंगाली ब्राह्मण. हा कृतिवाससचा समकालीन होता (क. कौ. ७).

संताजी घोरपडे—(मृत्यु स. १६९७ जून) हा बाजी घोरपड्याचा चुलत भाऊ म्हाळोजी म्हणून होता त्याचा पुत्र. शिवाजीच्या वेळीं उदयास आलेला पराक्रमी सेनापति. धनाजी व संताजी हे दोघे पराक्रमी पुरुष एकत्र राहूं शकत नव्हते. राजारामानें याला सेनापति केलें (स. १६९१). पण पुढें तें पद धनाजीस दिलें (स. १६९६). तेव्हां दोघांचा विरोध वाढला.

यानें म्हसवडच्या नागोजी मान्याच्या भावास हत्तीच्या पायीं दिलें होतें. त्यामुळें त्यानें आपल्या बायकोच्या सल्ल्यानें याचा पाठलाग केला आणि श्रमून हा एका ओढ्यावर स्नान करीत असतां तरवारीनें यास ठार मारलें.

नागोजी माने याचें मुंडकें तोबऱ्यांत घालून धनाजीकडे जात असतां तें वाटेंत पडलें; तें एका मुसलमान शिपायानें औरंगजेबास नजर केलें तेव्हां त्यानें आनंदोत्सव करून त्या शिपायास खुषखबरखान अशी पदवी दिली (नारो महादेव व मुरारराव घोरपडे पाहा). याचे पुत्र राणोजी व पिराजी.

संताजी जाधव—(स. १७११) धनाजीचा पुत्र व चंद्रसेनाचा वडील भाऊ. चंद्रसेन निजामाकडे गेल्यावर शाहूनें यास सेनापति नेमलें. पण याच्या चमत्कारिक

स्वभावामुळें याला तें झेपलें नाहीं. नंतर मानसिंग मोरे व त्यानंतर तें पंद दाभाड्याकडे गेलें.

संताजी भोसले (नागपूरकर)—(मृत्यु स. १७१९ फेब्रु. २८) याचा भाऊ बापूजी. हा बाळाजी विश्वनाथाबरोबर दिल्लीस गेला. तेव्हां झालेल्या कत्तलींत पंधराशें लोकांसह हा कापला गेला (ना. प्रां. इ. १, पा. ५१-५३).

संध्याकरनंदि—हा बंगाल्यांतील पालराजांपैकीं रामपालाच्या सांधिविग्रहिक प्रधानाचा पुत्र.

संप्रति मौर्य--(ख्रि. पू. २१६-२०७) हा कुनालाचा पुत्र. हा अशोकाच्या वेळीं युवराजपदावर होता. पुढें सर्व कारभार हाच पाही, पण वडील बंधु दशरथानंतर हा प्रत्यक्ष गादीवर आला. बौद्ध वाङ्मयांत जें अशोकला महत्त्व आहे तें याला जैन वाङ्मयांत आहे. यानें जैनधर्माचे प्रचारक हिंदुस्तानाबाहेरील देशांत पाठविले होते. यानें योद्धयांनाहि साधूंचा वेष देऊन धर्मप्रचाराकरितां रवाना केलें. याला दुसरा चंद्रगुप्त म्हणत (मौर्य साम्राज्यका इतिहास, पा. ६५०). बारा वर्षांचा भयंकर दुष्काळ पडल्यावर हा श्रुतिकेवलि भद्रबाहूबरोबर दक्षिणेंत आला आणि यानें चंद्रगिरीवर प्राणत्याग केला. या सर्व गोष्टी पहिल्या चंद्रगुप्ताच्या नसून दुसऱ्या चंद्रगुप्ताच्या म्हणजे याच्या आहेत. याच्या वेळीं हें राज्य कमजोर झालें. याच्यानंतर शालिशुक गादीवर आला. तिबेटांतील ग्रंथांत याचा उत्तराधिकारी वृषसेन दिला आहे. तो तिकडचा याचा अधिकारी असावा.

संभवनाथ—जैनांचा तिसरा तीर्थंकर.

संभाजी आंगरे—(मृत्यु स. १७४१ डिसें. १२) हा कान्होजी आंगऱ्यास मथुराबाईपासून झालेला धाकटा मुलगा. मानाजी व संभाजी या भावांच्या भांडणांत पेशव्यांनीं मानाजीस हातीं धरून यास विरोध केला. यानें शाहूच्या आज्ञेवरून जंजिऱ्याची मोहिम चालविली असतां इंग्रजानें हबशास मदत केली. पुढें तर पेशवे व इंग्रज हे दोघे एकत्र होऊन त्यांनीं यास ताब्यांत घेतलें.

संभाजी कावजी-(मृत्यु स. १६६९) हा प्रथम शिवाजीचा भालदार होता. अफजलखानाच्या भेटीच्या वेळीं विश्वासूक म्हणून जिवा महाला व हा असे रक्षक बरोबर घेतले होते. शिवाजीस खानानें कांखेत दाबून धरलें आणि वार केला, तेव्हा शिवाजीनें वाघनखें चालविलीं. ही गडबड ऐकून सय्यदबंडा हा खानाचा शरीररक्षक पुढें धांवला. त्याचा समाचार जिवा महाला यानें घेतला. पालखीचे भोई गडबड करणार इतक्यांत यानें पट्ट्यानें पालखीच्या भोयांच्या पायाच्या ढोण्या शिरा तोडून पालखी भुईस पाडली (मराठीदप्तर, रुमाल १. पृ. ३०), आणि खानाचें शिर कापून शिवाजीस दिलें. आणि तिघेजण जलदीनें गडावर आले. तेथें याची वाहवा करून चाकणच्या पागेवरील यास मुख्य नेमलें. पुढें कांहीं काळ शिवाजीची याच्यावर गैरमर्जी झाली होती. शाहिस्तेखानानें चाकणास वेढा घातला तेव्हां हा त्यास जाऊन मिळाला. ' बळकट घोडे उचलावे ऐसें बळ, मर्द होत' (चि. २११) अशी याची शक्ति पाहून खान खूष झाला व चाकण सर केल्यावर यास तेथील हवालदार नेमलें. स. १६६९ अखेर मोगलांवरील मोहिम सुरू झाली तेव्हां चाकण लुटून सर केलें आणि शिवाजीच्या लोकांनीं यास ठार केलें.

संभाजी भोसले—(मृत्यु स. १६५५) हा शहाजीचा वडील पुत्र व शिवाजीचा ज्येष्ठ बंधु. याचा जन्म वेरूळ येथें झाला (मराठी दप्तर रु.१). याच्या बारशाच्या दिवशीं खुद्द मूर्तिजा निजामशाहा नामकरणविधीस हजर होता. हा आपल्या बापाबरोबर स. १६३६ मध्यें पुणें प्रांत सोडून कर्नाटकांत गेला. शिवनेरी गडाचा गडकरी विजयराव याची मुलगी जयंती ही संभाजीस दिली होती. बृहदीश्वर शिलालेखांत गडकऱ्याचें नांव विश्वासराव असें दिलें आहे. शिवाय गौरीबाई व पार्वतीबाई अशा आणखी दोन स्त्रिया यास होत्या. शहाजीस मिळालेल्या जहागिरींपैकीं बंगळूर व कोलार यांवर याचा अंमल स. १६४७ पासून होता. याचें वास्तव्य बहुतेक कोलार येथें असे. स. १६५५ मध्यें आदिलशाही अमलाखालीं कनकगिरीच्या संस्थानांत बंडाळी झाली तेव्हां संभाजी बंडखोरांवर चालून गेला. याच युद्धांत तोफेचा गोळा लागून हा मरण पावला. विजापुराहून त्याच कामावर रवाना झालेल्या अफझलखानानें याला पुढें पाठवून मागून याचा पाठपुरावा न केल्यामुळें हा मेला. यामुळें शहाजीचाहि अफझलखानावर राग झाला.

कोलार प्रांत चिक्क रायल तिम्मा गौडा याजपासून जिंकून तेथें शहाजीनें संभाजीस अधिकारी नेमलें. याची स्त्री मकाऊ आईसाहेब कसबे जिंतीनजीक पळसदेव (भीमातीरीं) येथें पाटिलकीच्या वतनावर शहाजीनें पोंचविली. यास उमाजीराजे नांवाचा पुत्र असून (जन्म ता. २५ नवंबर १६५४) उमाजीच्या बायकोचें नांव सखूबाई असें होतें. यास मलकोजी नांवाचा पुत्र असल्याचा उल्लेख सांपडतो. शिवाय सुरतसिंग नांवाचा मुलगा

होता. त्याचींहि पत्रें उपलब्ध आहेत. तो उमाजीचा सख्खा भाऊ असून उमाजीपेक्षां वडील होता.

संभाजी (छत्रपति)—(जन्म स. १६५७ जून १४-वध स. १६८९ मार्च ११) हा थो. शिवाजीचा वडील मुलगा आणि मराठ्यांचा दुसरा छत्रपति. याचा जन्म पुरंदरास झाला. हा दोन वर्षांचा होतांच याची आई सईबाई वारली. तेव्हां जिजाबाईनें याला वाढविलें. याला जयसिंगानें केलेल्या पुरंधरच्या तहांत पांच हजारांची मनसब द्यावी असें ठरलें होतें. पुढें आग्र्याहून सुटून आल्यावर तीं मनसब यास देण्यांत आली. त्याप्रमाणें हा बऱ्हाणपुरानजीक मोगलांच्या छावणींत दोन वर्षें जाऊन राहिला. नंतर अण्णाजी दत्तोस मदतीस देऊन विजापूरकरांशीं युद्ध करण्याचें काम यावर सोंपविण्यांत आलें (स. १६७२-७३). तेव्हांपासून हा पन्हाळ्यास राहूं लागला. पुढें यानें एका ब्राह्मणाच्या स्त्रीवर अत्याचार केल्यामुळें यास शृंगारपुरीं ठेवण्यांत आलें. तेथून हा स्त्रीसह रातोरात मोगलांकडील दिलेरखानास जाऊन मिळाला (स. १६७८ नवं.). पुढें हा पुनः शिवाजीकडे आला. तेव्हां यास पन्हाळगडावर नजरकैदेंतल्यासारखें ठेवून जनार्दनपंत हणमंत्याच्या नजरेखालीं दक्षिणेकडचा कारभार याच्याकडे सोंपविला होता.

शिवाजी परलोकवासी होतांच संभाजीस कळूं न देतां राजारामास गादीवर बसविलें आणि साबाजी भोसल्यानें त्याची क्रिया केली. सोयराबाईनें पुढाकार घेऊन याचा बंदोबस्त पक्का करण्याचीं पत्रें रवाना केलीं. याचा बंदोबस्त करणाऱ्या सोनाजी नायकास यानें ठार मारलें, किल्ला ताब्यांत घेतला आणि कऱ्हाडकडे असणाऱ्या सेनापति हंबीरराव मोहित्याला आपणाकडे वळविलें. चहूंकडे पत्रें लिहून आणि गोड बोलून लोक आपल्या लगामीं लावले. हिरोजी फर्जद व जनार्दनपंत हणमंते यांस कैदेंत टाकलें. अण्णाजी दत्तो व मोरोपंत पिंगळे हे पन्हाळ्याकडे निघाले होते. त्यांना पकडून आणविलें. पण रायगड घेतल्यावर राज्याभिषेकाच्या वेळीं त्यांना सोडलें (स. १६८० जुलै ७). मोरोपंत मेला त्याचे जागीं त्याचा पुत्र निळोपंताची नेमणूक केली. याच सुमारास औरंगजेबानें रजपुतांवर पाठविलेला पुत्र अकबर रजपुतांना फितुर होऊन औरंगजेबाकडून पराभव पावून दुर्गादासाबरोबर दक्षिणेंत संभाजीकडे आला होता. त्याचा विचार मराठ्यांच्या साहाय्यानें औरंगजेबास तोंड देण्याचा होता. औरंगजेबहि त्याच्या पाठोपाठ दक्षिणेंत आला (स. १६८१).

पण या वेळीं रायगडावर संभाजीच्या विरुद्ध कट झाला. आणि यानें 'अण्णाजी दत्तो, त्याचा बंधु सोमाजी, हिरोजी फर्जद, बाळाजी आवजी यांस परळीखालीं कैद करून मारलें.' 'कर्नाटकांत श्यामजी नाईक पुंडे यास कैद करविलें. महादेव अनंत व आणखी तीन इसम यांस हत्तीचे पायीं बांधून ठार केलें.' सोयराबाईलाहि यानें ठार केलें. या वेळीं तिच्या माहेरची शिर्केमंडळी प्राणभयानें मोगलांना मिळाली. असे अनेक लोक यानें ठार केल्याचे उल्लेख आहेत. जुन्या व स्थानिक लोकांसंबंधीं याला संशय वाटूं लागल्यामुळें यानें कविकलश ऊर्फ कबजीसारखा अगदीं परका मनुष्य जवळ केला असावा. तथापि अष्टप्रधानांचीं कामें जुन्या घराण्यांकडे थोड्या फरकानें चालू होतीं. रघुनाथ नारायण हणमंते हा मोठा नजराणा घेऊन लवाजम्यानिशीं यास भेटण्यास आला. तेव्हां यानें बिरवाडीस भव्य मंडप उभारून त्याची भेट घेतली. त्यास अमात्यपद दिलें, पण तो लवकरच परत गेला.

रायगडावर स्थिरता केल्यावर याला जंजिऱ्याच्या सीदी कासमकडे वळावें लागलें. पण त्याला पोर्तुगीजांची मदत होत असल्यामुळें याला पोर्तुगीजांवर स्वारी करावी लागली. चौलच्या वेढ्यांत यास अपयश आलें, पण फोंड्याच्या वेढ्यांत यास यश मिळालें (स. १६८३) व पुढें तह झाला (जाने. १६८४). पण युद्धाच्या खर्चाची रक्कम मागतांच सावंताला पुढें करून पोर्तुगीजांनीं पुनः युद्धाला सुरुवात केली. संभाजी तडफेनें सावंताला तोंड देत होता. सीदी, पोर्तुगीज व सावंत यांबरोबरच मोगलांशींहि याचे निकराचे सामने या वेळीं चालू होते.

शहाजादा शहाअलम दक्षिणेंत होता. त्याला बोलावून घेऊन बहादूरखानाला औरंगजेबानें इकडे धाडलें. त्यानें येतांच चांदवड जवळच्या अहिवंत किल्ल्यास वेढा घातला (स. १६८० जुलै). त्याच वेळीं हंबीररावानें बऱ्हाणपूर लुटलें आणि तो सुरक्षित परतला. संभाजीनें बहादूरखानाशीं धावपळीचें युद्ध सुरू ठेवलें. औरंगजेबाच्या हसनअली, दलपत बुंदेला, शिहाबुद्दीन वगैरे सेनापतींनीं याच्या मुलखांत धुमाकूळ सुरू केला. एकदां तर डोकीचें पागोटें जमिनींवर आपटून 'संभाजीचा पाडाव करीपर्यंत पुनः पागोटें घालणार नाहीं' असें औरंगजेब बोलला (ता. ३०-७-१६८२).

मराठ्यांनीं त्यांना जागोजाग अडवून अगदीं जेरीस आणलें (जानी बेगम पाहा). कल्याण, औरंगाबाद, चांदा, बेदर, फलटण व रायगड एवढ्या विस्तृत टापूंत यानें बादशाहाशीं दिलेली लढाई इतिहासांत अगदीं अपूर्व आहे (स. १६८३).

पुढेहि बादशाहानें जोराची मोहिम सुरू केली व आपण नगरपाशीं सूचना देत राहिला. पण त्यांतहि संभाजीलाच जय मिळाला (स. १६८५).

तेव्हां तो खर्चाच्या दृष्टीनें अगदी टेकीस आला. विजापूर व गोवळकोंडा येथील राज्यें संभाजीला मदत करीत असल्यामुळें याला आपणास जिंकतां येत नाहीं, याकरितां औरंगजेबानें तीं राज्यें जिंकून खालसा केलीं. मोगलां सैन्य तिकडे गुंतलें असतां मराठी सैन्यानें लूट मिळवून आपली स्थिति सुधारली. पण याचा सेनापति हंबीरराव वाईकडे सर्जाखानाशीं लढत असतां गोळी लागून ठार झाला.

विजापूर व गोवळकोंडा हीं राज्यें घेतल्यावर औरंगजेबाचें सैन्य जिंजी वगैरे मराठ्यांच्या कर्नाटकांतील मुलुखाकडे वळलें, तेव्हां महाराष्ट्रांतील मराठ्यांच्या सैन्याला तिकडे जावें लागलें.

अशा स्थितींत चहूंकडे नाकेबंदी करून व बातमी ठेवून यास संगमेश्वरीं पकडलें (शेखनिजाम पाहा) आणि हत्तीवर बांधून बादशाहाकडे आणलें.

मुसलमानी धर्म स्वीकारण्याची मागणी यानें धिःकारपूर्वक नाकारली आणि हा मरणास तयार झाला. प्रथम याचे डोळे काढले व कलुषाची जीभ तोडली. पंधरा दिवसपर्यंत एक एक अवयव तोडून कुत्र्यास खावयास दिला, आणि शेवटीं याचा शिरच्छेद करण्यांत आला (स. १६८९ मार्च ३, फाल्गुन वद्य ३० शके. १६१०)

पकडल्यापासून सव्वा महिन्यानें तुळापुराजवळ वढू येथें याचा शिरच्छेद झाला व त्या मस्तकाला तुळापुरीं अग्नि दिला.

२. (कोल्हापूरचा)-(स. १६९३-१७६०) हा छत्रपति राजाराम व राजसबाई यांचा मुलगा. याचा जन्म जिंजीस झाला. हा कोल्हापूरच्या गादीवरील दुसरा छत्रपति होय. यानें आपल्या शिवाजी नांवाच्या सावत्र भावास व त्याची आई ताराबाई यांना कैदेंत टाकून आपल्या आईच्या मदतीनें कोल्हापूरची गादी मिळविली (स. १७१४). शिवाजी बेडसर होता.

हा गादीवर आल्यावर रामचंद्र नीळकंठ अमात्यानें आपला आज्ञापत्र नांवाचा राजनीतीवरील उत्कृष्ट ग्रंथ लिहिला (स. १७१६ नवं. १९); आणि राजकारणांतून आपलें अंग काढून तो संन्यासी झाला. दमाजी थोराताच्या साहाय्यानें यानें शाहूच्या मुलुखावर शह बसविण्यास सुरुवात केली. शाहूनें बाळाजी विश्वनाथाच्या साहाय्यानें याचा वडगांवीं पराभव केला (स. १७१८). हा पुनः त्रास देऊं लागला तेव्हां बाळाजीनें उरूणबहे येथें याशीं लढाई दिली (स. १७२०). शाहूचें आसन स्थिर होऊन उत्कर्ष होत चाललेला यास सहन होईना. हा कृष्णा व तुंगभद्रा यांच्यामधील प्रदेशावर आपली मालकी समजत असे. तिकडेहि आक्रमण सुरू झालें. तेव्हां चंद्रसेन व निजाम यांच्याशीं संगनमत करून यानें शाहूशीं झगडा सुरू केला. तीन वर्षे स्वारीवर होता (स. १७२५-२८). तेव्हां कोल्हापूरचा कारभार राजसबाई पाहत असे. शेवटीं लढाईत याचा पराजय होऊन वारणेचा तह झाला आणि उघड चालू असलेला तंटा मिटला (स. १७३१). पुढें परस्पर सलोख्यानें वागत. वरचेवर एकमेकांच्या भेटीहि घेत. तथापि किरकोळ राजकारणें चालत. बंडखोरांना उत्तेजन मिळे व प्रसंगीं सातारकर व पुणेकर यांच्याविरुद्ध डोकें वर करण्याचें काम शेवटपर्यंत चालू असे. वडगांवाहून टापेनजीक माळावर हा मृत्यु पावला. गांव वसवून त्याचें नांव संभापूर असें ठेवलें (स. १७६० डिसें. २०). याच्या सात बायकांपैकीं तोरगलच्या शिंदे घराण्यापैकीं जिजाबाई कर्तृत्ववान् होती.

सामान्यतः शाहू व हा प्रेमानें वागत. पेशव्यानें यास त्रास दिल्यास शाहू याचा पक्ष घेऊन पेशव्यांना जरब देत असे. आपल्यामागें सातारच्या गादीवर यालाच बसविण्याचा शाहूचा विचार होता. पेशव्यांनाहि सोयीच्या दृष्टीनें दोनहि छत्रपतींच्या गाद्या एक करण्याची आतुरता होती. पण शेवटीं ताराबाईनें रामराजाला गादीवर बसविण्याची शाहूकडून व्यवस्था करविली.

संभाजी मुधोजी भोसले--(मृत्यु स. १७१६) परसोजीचा भाऊ. शिवाजीचा अंत्यविधि याच्या हस्तें झाला असावा.

संभाजी शिर्के—हा प. रघूजीची पत्नी सकवारबाई हिचा भाऊ होय. हा प. रघूजीच्या प्रमुख मराठे सरदारांपैकीं एक होता (ना. प्रां. इ.).

संभूनाथ बाबा—(स. १७६९ सुमार) हे जातीनें कासार असून यांचें उपनांव ' धुमाळ ' असें होतें. नाथबाबांची समाधि तळेगांव ढमढेरे येथें आहे. समाधीजवळच श्रीविश्वेश्वराचें देऊळ आहे. तें 'नाथां'चें देवालय या नांवानेंच संबोधिलें जातें.

संयोगिता—(जयचंद पाहा).

संवरभद्र—हा चौऱ्यांशीं सिद्धांपैकीं होता. यानें वज्रगीतावाद (तं. ४४।२१) हा ग्रंथ लिहिला.

संसारचंद्र—(स. १४४०) यानें भवनचें (कांगडा) वज्रेश्वरीचें देऊळ बांधलें (हिं. भा. अ. पा. ८२-८३).

सागरपा—हा चौऱ्यांशीं सिद्धांपैकीं चौऱ्याहत्तरावा सिद्ध होय. देश–कांची. यानें आलिकालिमहायोगभावना (तं. ४८–८०) हा ग्रंथ लिहिला.

सातवाहन—सातवाहन राजे मूळचे महाराष्ट्रीय असून त्यांपैकीं कांहीं शेवटले पुरुष आंध्रांत गेले असावेत. 'कुन्तलः शातकर्णिः' हें नांव वात्स्यायनाच्या कामसूत्रांत आलें आहे 'सातियपुतो'चा अशोकाच्या लेखांत निर्देश आहे. शातकर्णि शालिवाहन, सातवाहन व आंध्रभृत्य एकच होत.

याशिवाय काश्मीरांतहि एक सातवाहन दिविरवंशांतील दिद्दा राणीचा आजा होता. तिचा संग्रामदेव लोहर पुतण्या होय (स. १००० सुमार). त्याचा दक्षिणेंतील या घराण्याशीं कांहीं संबंध असावा.

साताप्पा शिलारखाने–(स.१७२०-६० सुमार) हा होनाजी बाळाचा आजा असून उत्तम लावण्या करी. याची समाधि पुणें येथें संगमावर बांधली. तेथें श्रावणी सोमवारीं तमासगीर हजेरी देतात. याचा पुत्र बाळा बहिरू होय.

सादतअली—(मृत्यु स. १८१४) अयोध्येचा नबाब.

सादतखान—(स. १७२४–३९) अयोध्येचा सुभेदार. यास मुहम्मद अमीन म्हणत. याचा बहुतेक काळ मराठे व नादीरशाहा यांच्याशीं लढण्यांत गेला. यानें फैजाबाद शहर वसविलें. नादिरशहाच्या छळानें यानें विष खाल्लें.

सादुल्लाखान—(मृत्यु. स. १६५५) शहाजहान बादशहाचा वजीर व औरंगजेबाचा शिक्षक. या पुरुषाचा कित्ता सर्वांनीं घ्यावा असें औरंगजेबानें याबद्दल लिहिलें आहे.

साबाजी अनंत चतुर—(चतुर साबाजी पहा).

साबाजी रघूजी भोसले—पहिल्या रघूजीचा धाकटा मुलगा व जानोजीचा भाऊ (भवानी काळो व मुधोजी भोसले पाहा). याचा शिक्का–रघुवीर चरणीं तत्पर साबाजी भोसले निरंतर.

सामराज—सुदामचरित व धूर्तनर्तक प्रहसनाचा कर्ता.

सामलभट—(जन्म स. १६४०) हा अहमदाबादेजवळ गोमतीपूरचा राहणारा. हा प्रसिद्ध गुजराथी कवि प्रेमानंद याचा विरोधी होय. हा जातीचा श्रीगौड मालवी ब्राह्मण असून यास संस्कृत, हिंदी, फार्सी वगैरे भाषा अवगत होत्या.

यानें एकंदर २६ काव्यें लिहिलीं. त्यांत राखीदास पाटील व गमानजी भाट यांची यास फार मदत झाली. 'रावणमंदोदरीसंवाद,' 'मदनमोहना,' 'राखीदासनी चरित्र,' वगैरे याचीं काव्यें सुप्रसिद्ध आहेत. याला मधूनमधून कूट श्लोक घालण्याची संवय होती.

यानें सिंहासनबत्तिशी, वेताळपंचविशी, शुकबाहात्तरी, नंदबत्तिशी, रेवाखंड यांचीं गुजराथींत भाषान्तरें केलीं. तसेंच रणछोडदेवावर कित्येक श्लोक व शिवपुराण हें लिहिलें.

सामलवर्म—(स. १०७९ सुमार) हा बंगाल्यांतील वर्म घराण्यांतील जतवर्म व वीरश्री यांचा पुत्र. याचा पुत्र भोज हा वैष्णव होता. बौद्धांना देणगी दिल्यानें विष्णु प्रसन्न होतो असें हा मानी. हा वैदिकांचें आदरातिथ्य करी (मॉडर्न रिव्ह्यू १९३२).

सामंतसिंह गुहिलोत—(स. ११७४) हा क्षेमसिंहानंतर मेवाडच्या गादीवर आला. यानें गुजराथच्या अजयपालास जिंकून चितोड परत घेतला (स.११७४). याचें राज्य कीतू चौहाणानें घेतलें तें कुमारसिंह नांवाच्या धाकट्या भावानें परत मिळविलें व तो राजा झाला. तेव्हां हा बागड(डूंगरपूर)चा राजा झाला.

सामंतसेन—(स. १०८०) बंगाल्यांतील सेन घराण्याचा मूळ पुरुष. याचा पुत्र हेमंतसेन. हा मूळचा कर्नाटकांतील होता. हा वृद्धपणीं गंगाकिनारीं येऊन राहिला.

सायण—(मृत्यु स. १३८७) हा माधवाचार्याचा सख्खा भाऊ. याचीं मातापितरें अनुक्रमें मायण व श्रीमती होत. हा कृष्णयजुर्वेदी भारद्वाजगोत्री बौधायनशाखेचा ब्राह्मण होता. शृंगेरीचे स्वामी विद्यातीर्थ व भारतीतीर्थ यांच्या सांगण्यावरून माधवाचार्य बुक्काचा कुलगुरू झाला, आणि त्याच्यामुळें सायण व भोगनाथ या बंधूंचाहि दरबारांत प्रवेश झाला. हा प्रथम कंपरायाचा महाप्रधान होता. हरिहरामागून तोच खरा राज्याचा वारस असल्यामुळें 'सुभाषितसुधानिधी'त सायणानें त्याचा गौरव केला आहे. त्याचा पुत्र संगम. 'संगमाचें राज्य म्हणजे सायण मंत्र्यावर अवलंबून असलेलें राज्य' असें भोगनाथानें 'उदाहरणमालें'त म्हटलें आहे (सोसेंस वि. हि.१९१९, पा. ४९). यानें संगमाची प्रधानकी करीत असतां 'माधवीया धातुवृत्तिः,' 'प्रायश्चित्तसुधानिधिः' (कर्मविपाक) व 'अलंकारसुधानिधिः' हे ग्रंथ लिहिले. 'अलंकारसुधानिधि' लिहून झाल्यावर हा बुक्काच्या सेवेंत दाखल झालेला दिसतो. बहुतेक संगम मेल्यानंतर यास बुक्काला कथा सांगण्याच्या कामावर नेमिलें, असें माधवाचार्यानें पुरुषार्थसुधानिधींत म्हटलें आहे (हि. क्रा. व्हा. ६, पा. ७०८). नंतर वेदार्थाचें कामहि याच्याकडे आलें (स. १३६० सुमार).

बुक्क व हरिहर यांच्या वेळीं हा वेदभाष्याचें काम करीत असतां याला अनेक पंडितांचें साहाय्य घ्यावें

लागलें असेल. ऐतरेय आरण्यकावरील भाष्याचा कांहीं भाग उत्तमामृत स्वामीचा शिष्य ज्ञानामृत यतीनें रचिला, असा प्रथमारण्यकाच्या शेवटीं कांहीं प्रतीत निर्देश आहे. तसेंच वेदभाष्याला साहाय्य केल्याबद्दल नारायण वाजपेययाजी, नरहरी सोमयाजी व पंढरी दीक्षित या तिघांना कांहीं भूमिदान देण्यांत आल्याचा एक ताम्रपट उपलब्ध आहे. ताम्रपटावरून असें दिसतें कीं स. १३८१ मध्यें वेदभाष्याचें काम पुरें झालें होतें. त्याकरितां हरिहरपुत्र चिक्करायानें या ब्राह्मणांना कांहीं वराह (नाणें) दिले होते. त्यांबद्दल ही जमीन दिली (म्हे. अर्का. रिपोर्ट १९०८, पा. १४). तैत्तिरीयसंहितेच्या आरंभीच्या कांहीं भागाचें भाष्य, आरंभ व शेवट पाहतां माधवाचार्यांचें असावें असें दिसतें.

प्रथम कृष्णयजुर्वेद, नंतर ऋग्वेद, नंतर सामवेद आणि नंतर अथर्ववेद अशीं यानें भाष्यें लिहिलीं. माधवानें भाष्याचा आरंभ केला म्हणून माधवीय वेदार्थप्रकाश असें यानें आपल्या भाष्याचें नांव शेवटपर्यंत ठेवलें. हें काम चालू असतां प्रथम माधवाचार्य वारले. नंतर बुक्कराय वारला. हरिहराची कारकीर्द सुरू झाली तेव्हां यानें अथर्ववेदाचें भाष्य लिहावयास घेतलें असें त्या वेदाच्या उपोद्घातावरून दिसतें. हें काम स. १३८१ (श. १३०३ दुर्मति) मध्यें पूर्ण झालेलें दिसतें.

याला कंपण, मायण व सिंगण नांवांचे तीन मुलगे होते. यांपैकीं सिंगण हा वेदविद्येंत निष्णात होता असें भोगनाथाच्या उदाहरणमालेंतील निर्देशावरून दिसतें (सोर्सेस ऑफ दि विजयनगर हिस्टरी, पा. ४९).

सायरस—हखामनीषीय घराण्यांतील राजा (कुरुसू व सिकंदर पाहा).

सारंग गख्खर—(स. १५४० सुमार) शेरशाहानें याचें कातडें काढून याला ठार केलें.

सारंगदेव—(स. १२७४-९६) हा वाघेल वंशांतील अर्जुनदेवाचा दुसरा पुत्र. हा आपला थोरला भाऊ रामदेव याच्यानंतर गादीवर आला. याच्या वेळचा शिलालेख आबू येथील विमलशाहच्या मंदिरांतील भिंतीवर लावलेला आहे (स.१२९३). यानें गोगदेवाचा पराभव केला होता असें फार्सी तवारिखांवरून समजतें. गोगदेव प्रथम माळव्याच्या राजाचा प्रधान होता, नंतर संधि साधून त्या राज्याचा अर्धा भाग त्यानें मिळविला होता. याच्या वेळीं काव्यप्रकाशवरील जयंती टीकाकार जयंत होऊन गेला.

सारंगधर—(स. १३९६) यानें हमीररासा व हंमीरकाव्य हिंदींत लिहिलें.

सालवर्मन्—(अनंतराज पाहा).

सालोमालो—(तुकाराम पाहा).

सावण संगम—(स. १३५१-६४) हा विजयनगरच्या पहिल्या कंपन संगमाचा पुत्र.

२. (स. १३५० सुमार) मारप्प संगमाचा पुत्र.

सावता माळी—(समाधि स. १२९५) हा पंढरपूरनजीक अरणगांवचा राहणारा. मोडनिंब स्टेशनापासून तीन मैलांवर गांव आहे. तेथें याची बाग व विहीर अद्यापहि दाखवितात. हा ज्ञानेश्वराच्या तीर्थयात्रेंत होता. याचे कांहीं अप्रसिद्ध अभंग श्रीमंत बाळासाहेब मिरजकर यांचेकडे आहेत. 'सावत्यानें केला मळा । विठ्ठलपाई गोविला गळा' अशी याची वृत्ति होती. समाधि शके १२१७ आश्विन व. १४.

सावित्रीबाई भोसले—(मृत्यु स. १७३१ सुमार) ही रुस्तुमराव जाधवाची मुलगी असून शाहूची बायको होती.

२. (मृत्यु स. १८६०) ही नागपूरच्या अप्पासाहेब भोसल्याची पत्नी. राज्य खालसा झाल्यावर हिला दहा हजार दरमहा वेतन मिळे (ना. प्रां. इ. ४६६),

साहसी—(सुहांडी पाहा).

साहिलवर्मन्—जयपाळ आणि सबक्तगीन यांच्या युद्धांत हा चंबाचा राजा जयपाळच्या बाजूनें हजर होता (चंपा गॅझेटियर; हि. भा. अ. पा ४०).

साळुव—(स. १५५० सुमार) कानडी कवि. जैन. पिता-धर्मचंद्र, गुरु-श्रुतकीर्ति, ग्रंथ-साळू-भारत, रसरत्नाकर, वैद्यसांगत्य. शिवाय शारदाविलासहि याचाच असावा. याचा आश्रयदाता तैलपाच्या वेळचा कोंकणचा महामंडलेश्वर साळुवमल्ल हा होता. साळुवमल्लहि कवि होता. साळुवमल्ल व त्याच्या बहिणीचा मुलगा साळुवदेव यांच्या इच्छेनुसार यानें भारत लिहिलें.

याच्या साळुवभारताला नेमीश्वरचरित्र असेंहि म्हणतात. याच्यांत हरिवंश व कुरुवंश सांगितला आहे. रसरत्नाकर हा ग्रंथ शृंगारादि रस व नायकनायिका वगैरे भेद सांगणारा आहे. वैद्यसांगत्य हा ग्रंथ वैद्यकावरील आहे. शारदाविलास हा ग्रंथ अर्धवट उपलब्ध असून उपलब्ध असलेल्या दुसऱ्या आश्वासांत व्यंग्यार्थाचें महत्त्व वर्णिलें आहे. हा शेवटला ग्रंथ विशेषतः साळुवाची कीर्ति वाढावी म्हणून लिहिला आहे (क. क. च. भा. २ पा. २४४).

साळुव तिम्मद—(स. १५१२-४२ सुमार) विजयनगरच्या कृष्णदेवराय तुलुवाचा मुख्य मंत्री. कृष्णराया-

नंतर विजयनगरच्या गादीवर येणाऱ्या अच्युतरायाचाहि हा कांहीं दिवस मंत्री होता.

साळ्या रसाळ—हा शुक्लयजुर्वेदी ब्राह्मण पंढरपुरास राहत असे. हा चांगला विद्वान् व विठोबाचा परमभक्त असे. यानें ओवीबद्ध रसाळरामायण केलें (स. १७३८).

सिकंदर—(ख्रि. पू. ३५६-३२३) एक जगज्जेता पराक्रमी पुरुष. याचा जन्म मॅसिडोनियांतील पेला नांवाच्या शहरीं झाला. याचा पिता फिलिप व माता आलिंपिया. याचा गुरु प्रसिद्ध तत्त्ववेत्ता ॲरिस्टॉटल होय.

फिलिप हा मोठा महत्त्वाकांक्षी असून त्यानें लहानसें राज्यहि मिळविलें होतें. आपल्या पराक्रमी सैन्याच्या जोरावर त्यानें ग्रीस देशाच्या सेनापतीचें स्थान मिळविलें. पारसीकांशीं त्याचें लवकरच युद्ध होणार होतें, पण त्याचा खून झाला आणि त्याचें अपुरें राहिलेलें कार्य सिकंदरानें पुढें सुरू केलें.

हा वीस वर्षांचा नवा राजा गादीवर येतांच कांहीं जुन्या शत्रूंनीं डोकीं वर काढलीं. पण यानें सर्वांची वासलात लावून बापाची 'ग्रीसचा सेनापति' ही पदवीहि आपल्याला घेतली, आणि डॅन्यूब नदीपर्यंत मुलूख पादाक्रांत केला. पण खुद्द याच्या देशांतच याच्या गैरहजेरीचा फायदा घेऊन हा मेल्याची बातमी उठविली गेली आणि शेवटीं याला भयंकर कत्तल करून आपलें स्थान पुनः मिळवावें लागलें. पुढें पारसीकांना तोंड देण्याचें काम यावर सोंपविण्यांत आलें.

या वेळीं पारसीकांचा दारियस हा सम्राट् आशियामायनर, इजिप्त, तुर्कस्थान, इराण, अफगाणिस्थान, बलुचिस्थान व मध्य आशियाचा कांहीं भाग यांवर राज्य करीत होता आणि त्याचें भय युरोपांतील मॅसिडोनिया, ग्रीस वगैरे भागासहि उत्पन्न झालें होतें. त्याच्याजवळ लक्षावधि सैन्य आणि आरमारहि होतें. त्याच्याशीं तोंड देण्याची यानें तयारी सुरू केली.

सैन्याच्या तयारीबरोबर साधुसंतांचे आशीर्वाद घेण्याचेंहि याचें काम चालू असे. एकदां हा डायोजीनीस नांवाच्या साधूच्या दर्शनास गेला असतां तो तपस्वी सकाळचें ऊन्ह खात बसला होता. हा न कळत त्याचें ऊन्ह धरून उभा राहिला आणि विनंतिपूर्वक म्हणाला, 'मीं आपली काय सेवा करावी?' तेव्हां त्या साधूनें तुटकपणें उत्तर दिलें, 'तेवढें ऊन्ह सोड म्हणजे झालें!' तेव्हां हा खजिल झाला. पण आपल्यासारख्या समर्थांशींहि निःस्पृह वर्तन करणाऱ्या त्याबद्दल याच्या मनांत अत्यंत आदर उत्पन्न झाला. तरी पण दुसऱ्या कांहीं प्रसंगीं अशा लोकांशीं दंडेली केल्याच्याहि याच्या गोष्टी आहेत. याचा भाकितें, शकुन यांवरहि विश्वास असला तरी कोणत्याहि प्रसंगीं धीर खचूं न देतां निराश न होणें हा याचा महत्त्वाचा गुण होता.

तयारी झाल्यावर यानें हेलेस्पांटच्या सामुद्रधुनीकडे कूच केलें, आणि ग्रॅनिकस नदीवर लढाईला सुरुवात झाली. आणि याच्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें सैन्य थोडें होतें तरी आपणहून शत्रूवर चढाई करून साहसानें शत्रूच्या मध्यावर यानें जोराचा हल्ला केला; आणि एक पळाला म्हणून दुसरा पळाला या न्यायानें संपूर्ण शत्रुसैन्याला यानें पळावयास लावून अपूर्व जय मिळविला. तहाचें बोलणेंहि यानें झिडकारलें.

दारियसशीं दुसरी लढाई इस्सस गांवाजवळ झाली. तेथेंहि आपला जम बसत नाहीं असें पाहून यानें केवळ साहसानें दारियसवर निकराचा हल्ला करून त्याचें तोंड फिरविलें आणि राजा पळाला म्हणून सैन्यहि पळूं लागलें. हजारों लोक नुसत्या धांवपळींत चेंगरून मेले. दारियसनें आपलीं बायकामुलेंहि तेथेंच सोडलीं. पण यानें त्यांचा अपमान न करितां त्यांना सोडून दिलें. तेथल्या लुटींत प्रथम याला खऱ्या वैभवाची कल्पना आली.

याप्रमाणें यानें पारसीक साम्राज्य धुळीला मिळविलें. दारियस पळत एका नातेवाईकाच्या आश्रयास गेला. पण तेथें त्याच्या कपाळीं तुरुंगवासच आला. पण सिकंदरच्या पाठलागानें त्यालाहि पळण्याचा प्रसंग आला तेव्हां दारियसला जखमी करून तो पळाला व दारियस असहाय स्थितींत मेला.

यानंतर यानें हिंदुस्तानाकडे मोर्चा वळविला.

हा दिग्विजय करीत सिंधुनदापर्यंत आला आणि यानें उद्भांडपुरापाशीं सिंधूनद ओलांडला. उद्भांडपूर हें अटकच्या उत्तरेकडे सोळा मैलांवर आहे. त्या वेळीं सिकंदरजवळ पन्नास हजार सैनिक होते. सिंधूच्या पूर्वेकडील प्रदेशांतील अनेक राजांनीं सिकंदरचें वर्चस्व सहज मान्य केलें. या किरकोळ राजांत तक्षशिलेचा आम्भी (आम्फिस) विशेष ध्यानांत घेण्यासारखा आहे. आम्भीनें आपल्या शेजारीं असणाऱ्या प्रसिद्ध राजा पोरसच्या विरुद्ध सिकंदरला सर्व प्रकारची मदत केली. मोठ्या समारंभानें त्यानें सिकंदरचें स्वागत केलें. त्या जोरावर हा झेलम ओलांडून पुढें सरला व यानें राजा पोरसला नजराणा घेऊन भेटीस बोलावलें. पण त्यानें उलट कळविलें कीं 'मी नजराणा घेऊन येत नाहीं, तर सेना घेऊन येतों.'

याची हिंदुस्थानावर स्वारी झाली, तेव्हां उत्तर हिंदुस्थानांतील मल्लोई (मल्ल किंवा मालव) व क्षुद्रक या दोन स्वतंत्र क्षत्रिय जातींनी आपल्यांत एका व्हावी म्हणून परस्परांत लग्नव्यवहार सुरू केला. एका वेळीं दहा दहा हजार मुलींचीं लग्नें लावण्यांत आलीं. पूर्वी या जातींत वैर असून विवाहसंबंध होत नव्हते (मॅक्क्रिडल-दि इन्वेजन ऑफ इंडिया बाय् अलेक्झांडर दि ग्रेट, पृ.२८७).

अनेक राजांनीं बिलकूल आढेवेढे न घेतां याची अधीनता स्वीकारली, पण कांहीं ठिकाणीं याला भयंकर युद्धेंहि करावीं लागलीं. असें करतां करतां हा व्यास नदीपर्यंत आला. यापुढें जाण्याचें याच्या सैनिकांनीं नाकारलें. आपल्या दिग्विजयाचें स्मारक व्यास नदीच्या कांठीं करून व देवतांची पूजा करून हा तेथून झेलमकडे परत फिरला. झेलमपाशीं आल्यावर यानें मोठा दरबार भरवला व पोरसला व्यास नदीपासूनच्या प्रदेशावर क्षत्रप नेमलें. प्रांताधिकाऱ्यांना क्षत्रप असें म्हणत. हिंदुस्तानचा पश्चिमोत्तर भाग जिंकून यानें तीन भाग केले. झेलमपासून सिंधूपर्यंतच्या प्रदेशाचा क्षत्रप आम्भीला नेमलें. सिंधूच्या पश्चिमेकडील प्रदेशावर सेनापति फिलिप्पोस यास क्षत्रप नियुक्त केलें. तसेंच झेलमपासून व्यास नदीपर्यंतच्या भागावर पोरसला क्षत्रप नेमलें. अशा प्रकारें जिंकलेल्या प्रदेशाची व्यवस्था करून हा परत फिरला. पण परत जातांना यानें पहिल्या रस्त्यानें न जातां नवा मार्ग पत्करला. झेलम नदींत जहाजें व नावा यांची व्यवस्था करून जलमार्गानें हा परत फिरला. परत जातांना पंजाबच्या मध्यावरील प्रदेशांतील पराक्रमी लोकांशीं याला युद्ध करावें लागलें. शिलाई म्हणजे शिलि, अगलासोई, मल्लोई म्हणजे मल्ल किंवा मालव, आक्सिड्रोकाई म्हणजे क्षुद्रक यांचीं गणराज्यें म्हणजे प्रजासत्ताक राज्यें या भागांत होतीं. हे शूर लोक एकत्र होऊन याच्याशीं लढूं इच्छित होते पण सिकंदरनें नीतिकुशलतेनें पहिल्या दोहोंशीं वेगळें लढून त्यांचा पराजय केला. अगलासोईंपैकीं वीस हजार स्त्रीपुरुष व मुलें यांनीं शत्रूच्या हातीं लागूं नये म्हणून आपणांस जाळून घेतलें. मल्लोई म्हणजे मल्ल किंवा मालव व आक्सिड्रोकाई म्हणजे क्षुद्रक या दोन जमाती एक होऊं शकल्या नाहींत. कारण संयुक्त सेनेचें सेनापति कोणीं व्हावें याबद्दल त्यांच्यांत मतभेद झाला. आपसांतील या भेदाचा यानें पुरा फायदा घेतला व मल्लोई म्हणजे मल्ल किंवा मालव यांच्यावर स्वारी करून त्यांचा पराजय केला व त्यांचा दूरपर्यंत पाठलाग केला. जरी सिकंदरचा जय झाला तरी मल्लोईंशीं लढतांना हा चांगलाच जखमी झाला.

याच्या वेळीं सिंधची राजधानी अरोर होती. अरोर येथें हुसीकैनो राजा राज्य करीत होता. तो पराक्रमी होता, पण सिकंदरानें त्याचा पराजय केला. अशा प्रकारें सिंध जिंकून हा समुद्रतटावर आला व यानें आपल्या सैन्याचे दोन भाग केले. आपल्या न्यार्कस नांवाच्या सेनापतीच्या हाताखालीं एक भाग देऊन त्याला जलमार्गानें इराणकडे जाण्याची आज्ञा दिली. आपण सैन्याच्या दुसऱ्या भागासह बलुचिस्थान, मकरानचें अरण्य यांतून स्थलमार्गानें इराणकडे गेला. मार्गांत याचे अत्यंत हाल झाले. उन्हाळा व अन्नाभाव यांमुळें हजारों सैनिक मेले. कसा तरी हा सूसा येथें जाऊन पोंचला. पण आपल्या विस्तृत साम्राज्याचा उपभोग न घेतां ख्रि. पू. ३२३ मध्यें सूसा येथें मृत्यु पावला. शेवटीं हा दारू फार पीत असे.

सिकंदरसारख्या योद्धयाला त्या वेळच्या भारतीयांनीं योग्य प्रकारें तोंड दिलें आहे. पण आपसांतील दुहीमुळें त्यांचा पराजय झाला, पराक्रमाच्या अभावामुळें नव्हे, असें वरील माहितीवरून दिसून येतें. ससाण्याप्रमाणें वेगानें आक्रमण करणाऱ्या सिकंदरला हिंदुकुशापासून सिंधूपर्यंत येण्यास दहा महिने लागले आणि सिंधूपासून व्यासनदीपर्यंत येण्यास ऐकूणीस महिने लागले. हा काळच त्याला भारतीयांनीं कसा विरोध केला हें दर्शवितो.

या सिकंदरच्या स्वारीचें ऐतिहासिक दृष्ट्या फार महत्त्व आहे. या वेळीं युरोप व हिंदुस्थान यांचा प्रत्यक्ष संबंध आला. आजपर्यंत हिंदुस्थानांत आढळणाऱ्या गणित, ज्योतिष, लेखन किंवा इतर अनेक कला या वेळीं किंवा यानंतर हिंदुस्थानांत आल्या आणि हिंदुस्थानांतील संस्कृति व समाजव्यवस्था यांत नवयुग सुरू झालें अशी कल्पना होती. पण ती कल्पना उत्खननादिमुळें लागलेल्या शोधांनीं पार नष्ट झाली आहे. युरोपपेक्षां किती तरी पुरातनकालीं हिंदुस्थानांत विद्याकलादिकांचा उत्कर्ष झाला असून त्याचाच परिणाम जगावर झाला असें आतां ठरत आहे.

सिकंदरनें पंजाब प्रांत जिंकून तेथें आपला सुभेदारहि नेमला, पण हा मृत्यु पावल्यानें तिकडे घोटाळे सुरू झाले आणि चंद्रगुप्तासारखा पराक्रमी पुरुष पुढें येऊन त्यानें लवकरच आपली सत्ता स्थापली. चंद्रगुप्तानें एका ग्रीक राजकन्येशीं लग्न केलें. याच्या लष्करी शिस्तींत कवाइती पद्धत होती, तिचा परिणाम चंद्रगुप्तावर झाला असावा.

२. (स. १३५७-६७) बंगालचा राजा. हाजी इल्यास ऊर्फ शम्सुद्दीनचा पुत्र. फीरूजनें याचा पराभव केला होता.

३. (स.१५२६ सुमार) गुजराथचा राजा. हा दुसऱ्या मुज्फरचा मुलगा. हा गादीवर आल्यावर लवकरच खून झाला. नंतर बहादुरशहा गादीवर आला.

४. (बुत्सिकन) (स. १३९६-१४१६) हा काश्मीरचा राजा. हिंदालचा पुत्र. बुत्सिकन म्हणजे मूर्तिभंजक. यानें काश्मीरांतील अनेक देवालयांचा विध्वंस केला व ही पदवी धारण केली. तैमूरलंगाला हा शरण गेला, म्हणून त्यानें काश्मीरवर स्वारी केली नाहीं.

सिकंदर आदिलशाह-(स. १६७२-८६) हा विजापूरच्या दुसऱ्या अली आदिलशाहाचा मुलगा. त्यानंतर हा गादीवर आला. तेव्हां हा पांच वर्षांचा होता. खवासखान याचा मुख्य प्रधान होता. शिवाजीपेक्षां औरंगजेबाचा यास फार त्रास झाला. शिवाजीवर यानें बहलूलखानास पाठविलें. औरंगजेबानें बहादूरखानास खानजमान असा किताब देऊन इकडे पाठविलें. त्यानें खवासखानाशीं सख्यत्व केलें, पण इतक्यांत खवासखानाचा खून झाला व अब्दुल करीमखान प्रधान झाला. दिल्लीहून कुतुबखान व इस्लामखान रूमी हे आणखी विजापुरावर आले, पण त्यांचा विजापूरच्या बहलूलखानानें पराभव केला. तथापि विजापूरची अन्तःस्थिति बिघडली. पठाण सैनिक पगाराकरितां वरचेवर बंड करीत. औरंगजेबानें बहादूरखानाच्या जागीं दिलेरखानाची नेमणूक केली. अबदुल करीमखानानें राज्यांतून अंग काढून घेतल्यानें मसूदखान मुख्य प्रधान झाला. पण राज्याची स्थिति खालावत चालली. चिंतो चिमणाजीसारखे ब्राह्मण बंडखोर उघडपणें वावरूं लागले. शिवाजीनें एकामागून एक प्रांत घेतले. तेव्हां मसूदखानानें मोगलांविरुद्ध त्याचें साहाय्य घेतलें. दिलेरखानाकडून काम होत नाहीं म्हणून औरंगजेब स्वतः आला आणि स. १६८६ आंक्टो. १५ रोजीं विजापूरचा किल्ला घेतला. याची भेट घेऊन वर्षास एक लक्ष रुपयांची नेमणूक करून दिली व सहुल्लाखानास विजापूरचा सुभेदार नेमलें. स्वतःजवळचें जडजवाहीर औरंगजेबाचे हातीं लागूं नये म्हणून यानें खंदकांत ओतलें असें म्हणतात.

यास पदच्युत केल्यावर औरंगाबादेस ठेवलें, पण पुढें जिवंत ठेवणें योग्य न वाटल्यावरून विषप्रयोग करून ठार करण्यांत आलें (स. १७०१). त्या वेळीं याचें वय तेहतीस वर्षांचें होतें. याची कबर विजापुरीं आहे.

सिकंदर लोदी—(निजामखान पाहा).

सिकंदरशाह तुघ्लक-(स. १३९४) हा मुहम्मदशाह तुघ्लकाचा पुत्र. तो जालेसर येथें मरण पावल्यावर (२० जाने. स. १३९४) हा गादीवर आला (२२ जाने.). पण लवकरच आजारी पडून मेला (ता. ८ मार्च स.१३९४). अबूबकरापासून दिल्लीचें तक्त घेतांना यानें बापाला फार मदत केली होती.

सिकंदशाहा सूर—(स. १५५४-१५५५) हा इब्राहीमानंतर दिल्लीचा बादशाहा झाला. अंगीं राज्य करण्याचें चातुर्य व धमक नसल्यानें याच्या शूरपणाचा कांहीं उपयोग झाला नाहीं. हुमायुनास अडविण्यासाठीं यानें फौज पाठविली, परंतु बहराम व अकबर यांनीं याचा पूर्ण मोड केला. पुढें हा पळून गेला व अज्ञातवासांतच मरण पावला. अशा प्रकारें सूर घराण्याचा शेवट झाला. अफगाणांचें वर्तन क्रूर असल्यामुळें लोकहि त्यांच्या राज्यास कंटाळले होते.

सिद्दी मौला—(स. १२९१) (जलालुद्दीन फीरूज खल्जी पाहा).

सिधोजी लाडोजी शितोळे देशमुख—हा महादजी शिंदे यांच्या बाळाबाई नांवाच्या मुलीचा मुलगा. हा दौलतरावाबरोबर खर्ड्याच्या लढाईंत हजर होता.

सिद्धपाल केसरी—(स. १५७५ सुमार) मराठी कवि. पिता कुबेर व माता अंबा. ग्रंथ मल्हारिमाहात्म्य. उपनांव कृदांत (मं. वा. इ. श. १८३७ ले. १२३).

सिद्धराज जयसिंह—(जयसिंह सिद्धराज पाहा).

सिद्धसेनगणि—(स. ६००) हा श्वेतांबरपंथी जैन होता. यानें उमास्वातीच्या 'तत्त्वार्थाधिगम' सूत्रावर टीका लिहिली, हा भास्वामिनूचा शिष्य.

सिद्धसेन दिवाकर—(स. ५३३ सुमार) एक जैन तत्त्वज्ञ आणि कवि. श्वेतांबर जैनांची अशी समजूत आहे कीं यानें ख्रि. पू. ५७ व्या वर्षी विक्रमादित्य राजास जैनधर्मांत घेतलें. दिगंबर जैन याचा काल महावीरानंतर ७१४-७९८ (स. १८७-२७१) हा मानतात. वृद्धवादिसूरि हा याचा गुरु होता. याकोबीच्या मतें याचा काल स. ६७० हा होय. यानें जैनधर्माची दीक्षा घेतल्यावर कुमुदचंद्र हें नांव धारण केलें असें म्हणतात (विंटरनिट्झ-हिस्टरी ऑफ संस्कृत लिटरेचर, भा. २).

जैनांत न्यायावर व संस्कृतमध्यें लिहिणारा हा पहिलाच ग्रंथकार होय. यानें 'न्यायावतार' नांवाचा बत्तीस श्लोकांचा एक ग्रंथ लिहिला आहे. तसेंच यानें 'संमतितर्कसूत्र' नांवाचा प्राकृतांत तत्त्वज्ञानावर एक ग्रंथ केला आहे.

सतीशचंद्र विद्याभूषणांच्या मतें विक्रमादित्याच्या दरबारांतील क्षपणक हा होय.

यानें उपदेश केलेला विक्रमादित्य म्हणजे यशोधर्मदेवच असावा.

सिद्धिचंद्र—(स. १५९३) अकबराच्या दरबारांतील एक जैन पंडित. हा भानुचंद्राचा शिष्य. यानेंच बाणभट्टाच्या कादंबरीवर टीका लिहिली आहे. त्या टीकेच्या शेवटीं लिहिलेल्या वाक्यावरून यानें अकबराला सूर्यसहस्रनाम शिकविलें होतें असें दिसतें. तसेंच यानें शत्रुंजय तीर्थावरील करहि माफ करविला होता.

सिद्धेश्वरभट्ट—(स. १८०० सुमार) कोल्हापूरच्या छत्रपतींचे गुरु. मूळचे औरंगाबादेकडील शुक्लयजुर्वेदी ब्राह्मण. उपनांव देवपाठक. यांचा 'सरणी' नांवाचा प्राकृत ग्रंथ आहे. यांची समाधि कोल्हापूर येथें आहे. पुणें व कोल्हापूर येथें यांचा वंश आहे. सध्यांचे जगन्नाथ महाराज यांचे वंशज होत.

सिद्धेश्वर मेघनाथभट्ट ब्रह्मे—(स.१६६० सुमार) यांच्यावर शिवाजीमहाराजांची निष्ठा होती. 'स्वामींच्या अनुष्ठानबळें आपण राज्यास अधिकारी झालों व सकळ मनोरथ चिंतिलें पावलों' (स. प. पृ. ११३), असें श्रद्धापूर्वक मानून १०० होनांचें वर्षासन करून दिलें. 'संकटकाळीं सहकारी' मानण्याइतका शिवाजीचा यांजवर विश्वास होता.

सिमुक शातवाहन—(शिमुक पाहा).

सिंगण—वेदभाष्यकार सायणाचा मुलगा. हरिहराच्या मृत्यूनंतर दिलेल्या दानाच्या यादीत सायणानंतर याचें नांव आहे (रिपोर्ट ऑफ दि वार्किंग ऑफ दि अर्का. १९१४-१५, पा. ४२). हा मोठा वेदवेत्ता होता, असें भोगनाथाच्या उदाहरणमालेंतील लिहिण्यावरून दिसतें (सोर्सेस ऑफ विजयनगर हिस्टरी, पा. ४९).

सिंगरार्य—(स. १६८० सुमार) कानडी कवि. श्रीवैष्णव (रामानुज). कौशिक गोत्र. पिता–सौम्यनृसिंहसूरि किंवा अळ सिंगरार्य. माता–सिंगम्मा.

ग्रंथ—मित्रविन्दागोविंद (नाटक), यांतील एका श्लोकावरून राघवाभ्युदय व गीतरंगेश्वर असे दोन ग्रंथ याचे असावेत, पण ते उपलब्ध नाहींत.

तिरुमल्ल आर्याचा हा भाऊ. तिरुमल्ल हा म्हैसरच्या चिक्कदेवरायाचा अत्यंत स्नेही व विश्वासपात्र मंत्री व कवि होता. हाहि त्याच राज्याचा आस्थान पंडित होता.

कानडींत उपलब्ध असलेल्या नाटकांत यांचेंच नाटक पहिलें होय. याचें नाटक हर्षाच्या रत्नावलीचें भाषान्तर आहे (क. क. च. भा. २, पा. ५०३). हा चिक्कदेवरायाचा वडील जो दोड्डदेवराय त्याचा हा पौराणिक होता.

सिंगले—विजयनगरच्या माधवाचार्यांची धाकटी बहीण. ही कन्नडिग कुलांतील (कानडी) रामरसाला दिली होती, असें हंपीजवळच्या स. १४११ च्या शिलालेखांत म्हटलें आहे (साउथ इंडियन इन्स्क्रिप्शनस, न्यू इंपीरियल सीरीज, व्हा. ४४, पा. ६०)

सिंघण कलचुरी—(स. ११८३-८४) हा बिज्जल कलचुरीचा चवथा मुलगा. हा दुर्बल असल्यामुळें चवथ्या सोमेश्वर चालुक्यानें आपला मांडलिक व सेनापति ब्रह्माच्या साहाय्यानें कलचुरीचें राज्य बुडवून अण्णेगिरी येथें नवें राज्य स्थापिलें.

सिंघण यादव—परम्मरदेव सिंहराज यादवाचें नामान्तर. कदाचित् हा त्याचा भाऊ असून त्यानंतर गादीवर आला असावा.

२. (स. १२१०–१२४७) हा पहिल्या जैत्रपालाचा मुलगा. याच्या कारकीर्दीत यादवांची सत्ता अतोनात वाढली. यानें कुंतलदेश काबीज करून माळवा, गुजराथ, चेदि देशांतील छत्तिसगड इत्यादि ठिकाणच्या राजांस व तुर्कास जिंकिलें. यानें आंध्रांचा पराभव केला होता. तसेंच बल्लाळ होयसलाचा पराभव केला होता असें गदग लेखांत म्हटलें आहे. यानें पन्हाळ्याच्या शिलाहार भोजाचें राज्य आपल्या राज्याला जोडलें. तेव्हां हा मोठ्या सैन्यानिशीं पुष्कळ दिवस सातारा जिल्ह्यांत येऊन राहिला. या वेळीं मायणीचा संगमेश्वर (ता. खटाव) व भूषणगड हे बांधले व शिखर शिंगणापूर वसविलें असें म्हणतात.

याचा सेनापति खोलेश्वर हा उमरावतीचा ऋग्वेदी ब्राह्मण असून त्याला बिज्जल व राम असे दोन पराक्रमी मुलगे होते. खोलेश्वरानें गुजराथेवर अनेक स्वाऱ्या करून खंबायत येथें जयस्तंभ उभारला. याचा राम नांवाचा पराक्रमी मुलगा दुसऱ्या स्वारींत वीरधवलाचा मुलगा बिसलदेव याच्याशीं लढत असतां मारला गेला. बिज्जलानें कावेरीपर्यंत मुलूख काबीज करून शिमोघा हें आपलें मुख्य ठाणें केलें. सिंघणाचा मुख्य प्रधान सोढ्ढलचा पुत्र संगीतरत्नाकराचा कर्ता शार्ङ्गधर होय. पृथ्वीवल्लभ, विष्णुवंशोद्भव इत्यादि विशेषणें यानें धारण केलीं होतीं. याचा ध्वज सुवर्णगरुडचिन्हांकित असे. यादवांच्या मुख्य मंत्र्यास श्रीकरणाधिप अशी संज्ञा होती. भास्कराचार्यांचा नातू चांगदेव हा ह्याच्या दरबारीं मोठा ज्योतिषी होता. याचा पराक्रमी मुलगा जैत्रपाळ दुसरा हा बापाच्या अगोदरच मरण पावला होता. यानंतर याचा नातू कृष्णदेव हा राजा झाला.

सिंधुदा—(खारवेल पाहा).

सिंधुराज परमार—(मृत्यु स. १००९ पूर्वी) माळव्याच्या परमारांपैकीं श्रीहर्षाचा दुसरा पुत्र. हा

मुंजानंतर गादीवर आला. याला सिंधुल असेंहि म्हणत. याला कुमारनारायण व नवसाहसांक अशीं बिरुदें होतीं. याचा मुलगा भोज यास मुंजानें दत्तक घेतलें होतें, पण तो लहान असल्यानें मुंज मारला गेल्यावर हा गादीवर आला. यानें हूण (एपि. इंडि. भा. १, पृ. २२८), कोसल (दक्षिण), बागड, लाट आणि मुरलवाले यांना जिंकलें होतें. हें नवीन साहस केल्यामुळेंच यानें 'नवसाहसांक' ही पदवी धारण केली असावी. पद्मगुप्त (परिमल) यानें यावर ' नवसाहसांकचरित ' हें काव्य लिहिलें, पण त्यांत ऐतिहासिक भाग कमी आहे. त्यावरून याच्या प्रधानाचें नांव रमांगद असें होतें. यानें नागवंशी राजकन्या शशिप्रभेशीं लग्न केलें होतें. हा गुजराथच्या चामुंडराज चालुक्याशीं लढत असतां मारला गेला.

२. (स. ११६१) आबूच्या परमार घराण्याचा मूळपुरुष. जालोरचें सिंधुराजेश्वराचें मंदिर यानें बांधलें असावें. हा मारवाडचा राजा होता.

सिंह गुहिलोत—(स. ८१३-२८) मेवाडच्या भर्तृभटाचा पुत्र. याच्यानंतर दुसरा खुंमाण गादीवर आला.

सिंहनंदी—गंगवाडीचें राज्य स्थापणारा जैन. हा समंतभद्राच्या मागाहून झाला.

सिंहवर्मा पल्लव—(स. ५७५-५८०) हा विष्णुगोप पल्लवाचा भाऊ होय. याचा पुत्र सिंहविष्णु.

२. (स. ४०४) जयवर्म्याचा पुत्र. याला मंदोसराच्या शिलालेखांत (स. ४०४) क्षितीश म्हणजे राजा म्हटलें आहे.

सिंहविष्णु पल्लव—(स. ५७५-६००) याच्या पित्याचें नांव सिंहवर्मन्. यानें पश्चिम चालुक्य, चेर, चोल व पांड्य यांच्या बरोबर युद्धें केलीं. यानें सिंहल व मालव यांवर स्वाऱ्या केल्या होत्या (साउथ इंडि. इन्स्क्रि., भा. २, पार्ट ३. ३५६, कविता २०). पण हे मोघम उल्लेख आहेत. काशकुडी येथील लेखावरून यास अवनिसिंह म्हणत असत असें दिसतें. याचा मुलगा महेन्द्रवर्मा पहिला याचा लेख त्रिचनापल्ली येथें उपलब्ध झाला आहे. त्यांतहि यानें चोलदेश जिंकल्याचें लिहिलें आहे. हा मोठा विष्णुभक्त होता. डॉ. डुब्रिल यानें याचा काळ अंदाजानें स. ५७५-६०० हा दिला आहे. भारवि नांवाचा सुप्रसिद्ध कवि दुर्विनीताकडून कांचीस याच्या आश्रयास आला (दंडिकृत अवंतिसुंदरीकथा).

सिंहसेन क्षत्रप—(स. ३८२) हा रुद्रसेनाच्या बहिणीचा मुलगा. याचीं नाणीं मिळालीं आहेत.

सीतल—(स. १७२३) हरिदासाच्या टट्टी संप्रदायाचा महंत. यानें 'गुलजारचमन' ग्रंथाची चार भाषांत रचना केली आहे (क. कौ. १).

सीदी सात—(मृत्यु स. १७३६ एप्रिल १९) यानें ब्रह्मेंद्रस्वामींस त्रास दिला म्हणून चिमाजी आपानें यास लढाईत ठार केलें.

सीदी रेहान—(स. १६३५) मुहम्मद आदिलशाहाकरितां यानें खवासखानास ठार केलें.

सीदी जोहर—(मृत्यु स. १६६१) मलीक अबदुल नांवाच्या कर्नूल प्रांताच्या आदिलशाही सरदाराचा हा गुलाम. त्याच्या मागें त्याच्या मुलास कैद करून हा अधिकारी झाला. हा बंडखोर होता, पण संधि साधून माफीपत्र लिहून दिलें आणि अफजलखान मेला व रुस्तुमजान धास्ती खाऊन परत फिरला अशा प्रसंगीं अली आदिलशहानें यास सलाबतखान पदवी देऊन शिवाजीवर पाठविलें. यानें शिवाजीस पन्हाळ्यांत अडकविलें तेव्हां शिवाजी पळाला. पण अलीस हा फितुर आहे असा संशय आला. तेव्हां यानें उघड बंड सुरू केलें. प्रत्यक्ष युद्धाची वेळ आली तेव्हां हा रायचूरकडे पळाला व तिकडेच मेला. याचा मुलगा सीदी अबदुल अजीज. याचा जांवई मसूद.

सीदी बिलोल हबशी—(स. १६२८) शहाजीचा नोकर. लोहगडचा हवालदार. शिवाजीकरितां माणकोजी दहातोंड्यानें यास जिंकलें.

सीयक परमार—(श्रीहर्ष पाहा).

सुखदेवमिश्र—(जन्म स. १६३३) हिंदी कवि. एक कान्यकुब्ज ब्राह्मण. याचे वंशज सध्यां दौलतपूर (जि. रायबरेली) येथें आहेत. याचें जन्मस्थान कंपिला. याच्या पुढील सात ग्रंथांचा शोध आतांपर्यंत लागला आहेः १ वृत्तविचार, २ छंदविचार, ३ फाजिलअलीप्रकाश, ४ रसार्णव, ५ शृंगारलता, ६ अध्यात्मप्रकाश, ७ दशरथराय, ८ नखशि. हा कांहीं दिवस औरंगजेबाचा मंत्री फाजिलअलीशाह याचा मंत्री होता. नंतर मुरारमऊच्या देलीसिंह राजाकडे होता. यास कविराज ही पदवी दिली. हा पंडित व कवि होता.

सुखनिधान—(स. १७६३-७६) कनोजा ब्राह्मण. सदाशिवराव भाऊचा तोतया. याचें बंड मोडून शेवटीं धिंड काढून यास ठार केलें.

सुजाउद्दीन—(मृत्यु स. १७३९) हा सुजाउद्दीन जाफरखानाचा (मुर्शीदकुलीखान) जांवई होता. हा बऱ्हाणपुरचा राहणारा असून जाफरखानाच्या वजनामुळें ओरिसा प्रांतांत ' नायब नाजीम ' म्हणून नेमला गेला.

सुजाउद्दौला—(स. १७५४-७५) हा सफदरजंगाचा पुत्र. स. १७५४ त त्याच्या मागून गादीवर आला. यानें आपली राजधानी लखनौ येथें आणली. यानें बादशाहाचा वजीर गाजिउद्दीन यास हांकून दिलें व राजपुत्र अलीगोहर (शहाअलम दुसरा) यास बंगालवर स्वारी करण्याची सल्ला दिली. हा पानिपतच्या युद्धांत मुसलमानांच्या बाजूनें लढला. याला पुढें बादशहाच्या वजीरातीचें काम वंशपरंपरा मिळालें.

पाटण्याच्या कत्तलींनंतर मीर कासीमास यानें आश्रय दिला. तेव्हां याचें व इंग्रजांचें युद्ध होऊन त्यांत याचा पराभव झाला. परंतु पुन्हां यानें मराठे व पठाण यांच्या मदतीनें इंग्रजांशीं सामना दिला. पण दैव याला अनुकूल नव्हतें. शेवटीं यास इंग्रजांबरोबर तह करावा लागला.

मराठ्यांनीं पानिपतचा कलंक धुवून टाकण्याचा निश्चय केल्यानें त्यांची सगळीकडे सरशी होत होती. तेव्हां याला व इंग्रजांना सुरक्षितता पाहिजे असल्यामुळें यांनीं आपआपसांत तह केला. त्या तहान्वयें सुजाउद्दौल्यानें दरसाल २५ लाख रुपये सरहद्द-रक्षणाकरितां द्यावयाचें ठरलें व त्याप्रमाणें यानें ताबडतोब ५० लाख रुपये दिले; व दरबारीं रेसिडेंट ठेवून घेतला. पुढें यानें इंग्रजांच्या मदतीनें रामपूर संस्थान खेरीज करून सर्व रोहिलखंड ताब्यांत घेतलें.

सुजानबाई भोसले (तंजावर)—(स. १७३६-३९) तंजावरचा राजा बाबासाहेब यांची ही पत्नी. त्यांना पुत्र नसल्यामुळें हिला गादीवर बसविण्यांत आलें. हिनें तीन वर्षें उत्तम कारभार पाहिला. पण सवाई शहाजीनें किल्लेदार सय्यदखानास फितवून राज्य घेतलें.

सुजा मोगल—(स. १६१३-१६५८) हा शहाजहान बाहशहाचा दुसरा मुलगा. शहाजहाननें आजारी पडल्यावर यास बंगालवर नेमलें. शहाजहानची प्रकृति विशेष बिघडून गडबड सुरू झाली तेव्हां यानें एकदम आग्र्यावर चाल केली. तेव्हां दाराचा वडील मुलगा सुलेमान शुकोहची यावर योजना झाली. बरोबर राजा जयसिंगाला देण्यांत आलें. अलाहाबादेस लढाई होऊन याचा पराजय झाला (स. १६५७). त्याच सुमारास औरंगजेबानें दाराचा पराभव केला, तेव्हां सुलेमान शुकोह काश्मीरकडे पळाला. पुढें खजवा येथें औरंगजेबानें मीरजुम्लाच्या साहाय्यानें याचा पराभव केला (स. १६५८ जाने. ५). पुढें राजमहाल येथें मीरजुम्ला व सुलतान मुहंमदनें याचा पराभव केला, तेव्हां हा आराकानमध्यें गेला व आराकानच्या राजाची गादी मिळविण्याचा यानें कट केला. तो फुटल्यानें याला दगडांनीं ठार मारण्यांत आलें (स. १६५८ फेब्रु. ७). हा इराणी धर्माचा अनुयायी होता व दिल्लीदरबारांत इराण्यांचें वर्चस्व होतें म्हणून यास राज्य मिळण्याची फार आशा होती. औरंगजेबाचा मुलगा मुहम्मदला याची मुलगी दिली होती.

सुजायतखान—(स. १७२९-३७) हा वऱ्हाडचा सुभेदार. रघूजी भोसल्यानें याला पकडून पांच लाख दंड घेऊन सोडलें (स. १७२९). हा एलिचपूरच्या नबाबास साहाय्य करी. हा कांहीं काळ बंगालचा सुभेदार होता. डफ लिहितो, हा स. १७२९ मध्यें विषप्रयोगानें मेला (काळेकृत वऱ्हाडचा इतिहास, पृ. १८३).

सुज्येष्ठ—(२ वसुमित्र पाहा).

सुदत्त—(अनाथ पिंडक पाहा). अनाथ पिंडकोवाद नांवाचें माज्झिमनिकायांत एक सुत्त आहे. त्यावरून व इतर कांहीं उल्लेखांवरून सारिपुत्रानें याला अंतकाळीं उपदेश केला, व त्यायोगें हा वेदना भोगीत असतांहि शांतपणें मेला.

सुबंधु—(स. ६२५ सुमार) वासवदत्तेचा कर्ता.

सुभटवर्मा परमार—(स. १२५० सुमार) माळव्याच्या परमारांपैकीं विंध्यवर्म्याचा उत्तराधिकारी. यास 'सोहड' म्हणत. यानें गुजराथेवर स्वारी केली, पण भीमदेवाचा सामंत लवणप्रमादानें यास परत फिरविलें.

सुभान कुली कुत्बशाह—(स १५५०) जमशीदचा मुलगा. याचा कारभार दुःसह झाल्यामुळें जमशीदचा धाकटा भाऊ इब्राहीम गादीवर आला.

सुमतिनाथ—जैन तीर्थंकर.

सुमतिविजय—(टीकाकाल स. १६७५) रघुवंशावरील एक टीकाकार. हा विक्रमपूरचा (बिकानेर) राहणारा. याच्या टीकेंत भोजव्याकरणाचे उतारे आहेत. हा भोज म्हणजे भारमल्लीचा पुत्र होय.

सुमेरसिंग गारदी—(मृत्यु स. १७७४ जून) यानें नारायणराव पेशव्याला ठार मारलें. त्यानंतरहि रघुनाथरावाचा याला आश्रय होता. हा इंदूर येथें मेला. शेवटीं बारभाईंनीं याचीं बायकामुलें पकडून आमरण कैदेंत ठेवलीं व चीजवस्त जप्त केली.

सुयशस्—(कुनाल पाहा).

सुरजमल्ल जाट—(स. १७४३-स. १७६३) हा बापाच्या वेळेपासूनच मुखत्यारीनें काम करी. दिल्ली दरबारांतील प्रमुख सवाई जयसिंग याला पुत्र मानी. त्याच्या अश्वमेधाला हा हजर होता. त्याच्यामागें यानें ईश्वरसिंगाचा पक्ष घेतला व माधवसिंगाचा परा-

भवहि केला (स. १७४७), त्यामुळें होळकराची याजवर इतराजी झाली. पुढें दिल्लीस यानें सफदरजंगाचा पक्ष स्वीकारून रोहिल्याचा पराभव केला व वाहवा मिळविली. पण पुढें सफदरजंगाचा पक्ष मागें पडून गाजीउद्दीनची सरशी झाली. त्यानें होळकर-शिंद्यांच्या मदतीनें यावर स्वारी करतांच जयाप्पा शिंद्याच्या साहाय्यानें ३० लक्ष खंडणी कबूल करून यानें बचाव करून घेतला, व गाजीउद्दीनाशीं सलोखा केला. पुढें पानपतच्या युद्धांत सदाशिवराव भाऊंनीं याचा सल्ला झिडकारला तेव्हां हा दिल्लीहून परत गेला. पण पराजित झालेल्या मराठ्यांना यानें उत्तम साहाय्य केलें. पुढें आग्र्याचा किल्ला घेतला. पुढें नजीबाशीं याचें शत्रुत्व होतें. तो स्वारी करणार असें पाहतांच हाच चालून गेला. शहादऱ्यापाशीं शिकारीस गेला असतां गैरसावध स्थितींत नजीबानें यास ठार करविलें. याची राजधानी दीग. पुत्र जवाहीर. याची छत्री गोवर्धन येथें कुसुमसरोवरावर आहे. हा मुत्सद्दी व योद्धा म्हणून अत्यंत श्रेष्ठ होता.

सुरतिमिश्र—हा हिंदी कवि कान्यकुब्ज ब्राह्मण होता. यानें अलंकारमाला, बिहारीसत्सईवरील अमरचंद्रिका टीका, 'कविप्रिया' व 'रसिकप्रिया' यांवर टीका, रसरत्नमाला, सरसरसकाव्यसिद्धांत व रसरत्नाकार हे ग्रंथ लिहिले.

सुरेश्वराचार्य—(स. ९०३ सुमार) यानें आद्यशंकराचार्यकृत बृहदारण्यक भाष्यावर वार्तिक केलें. यानें ब्रह्माशीं जीवाचा संबंध प्रतिपादतांना आभासवादाचा स्वीकार केला आहे. आभासवाद या शब्दाचा अर्थहि यानें जुन्या परंपरेप्रमाणें स्वीकारलेला दिसतो. वाघाच्या पिलाला जन्मभर शेळ्यांत ठेवलें तरी आपण व्याघ्र आहोंत असें ज्ञान होतांच तो वाघासारखा वागूं लागतो. त्याप्रमाणेंच जीवाला आपण परमात्मस्वरूप आहोंत असें ज्ञान झालें कीं तो तत्स्वरूप होतो, असें यानें प्रतिपादिलें आहे.

याचा 'नैष्कर्म्यसिद्धि' हा शंकराचार्यांच्या मतानुसार लिहिलेला ग्रंथ सध्यां उपलब्ध आहे.

शंकराचार्यांच्या यतिसंध्याविधीवर यांचें श्लोकबद्ध वार्तिक आहे. तैत्तिरीय उपनिषदावरील आद्यशंकराचार्यांच्या भाष्यावर यांनीं वार्तिक लिहिलें आहे. दक्षिणामूर्तिस्तोत्रावरहि यांनीं मानसोल्लास नांवाचें वार्तिक केलें आहे.

सुलतान आदम—(स. १५४८-५३) सिंधुनदीवरील नीलाब प्रांतांतील गख्खर लोकांचा राजा. हुमायुनानें याचें राज्य खालसा केलें व यास कैदेंत टाकलें.

सुलतान कुली कुत्बशाह—(स. १५१२-४३खून) हा मूळचा हमदान (इराण) प्रांतांतला स. १४८२ नंतर महमूद शाहा बहामनींकडे आला व त्याजकडे खास तैनातीं फौजेंत नोकरीस राहिला. तेलंगणच्या लढाईवर हा तेलंगणाचा तरफदार म्हणून गेला होता. दक्षिणी व सीद्दी मुसलमानांनीं महमूदशहाचा खून करण्याचें ठरविलें असतां यानें त्यास वांचविलें म्हणून त्यानें यास 'मलीक कुत्ब उल्मुक' असा किताब देऊन वजीर नायब केलें. बहादुर गिलनीनें युसुफआदिलशाहाची जमखिंडी घेतली असतां महमूदानें यास जमखिंडीवर पाठविलें. तेव्हां युसुफचा सेनापति त्यांत मारला गेला, आणि सेनापतिपद याच्याकडे आलें. तेव्हां यास तेलंगणांतील भोंगीर व दुर्गी हीं दोन गांवें मिळालीं. पुढें यानें कुलबर्ग्याचा सुभेदार दस्तुर दिनारचा मोड केला म्हणून यास होटगी व उदगीर हीं दोन गांवें व 'अमीर-उल-उमराव' हा किताब मिळाला. विजयनगराच्या स्वारींत यानें पराक्रम गाजवला. पुढें सर्व कर्ती माणसें नाहींशीं झाल्यावर हा प्रमुख झाला. खुत्बा आपल्याच नांवानें वाची. महमूदशहाचे मागून हा स्वतःस शाहा म्हणवून घेऊं लागला (६ डिसें. १५१८). स. १५१२-१३ मध्यें गोवळकोंडा हें आपलें राजधानीचें शहर करून त्याचें नांव महमूदनगर असें यानें ठेविलें.

सुलतानजी निंबाळकर—(स. १७१५-२७) हा हैबतरावाचा पुत्र. हा सरलष्कर होता. हा कोल्हापूरकरांना मिळाला म्हणून शाहूनें याचा निषेध केला.

सुलतान मुहम्मद—औरंगजेबाचा पुत्र (औरंगजेब पाहा).

सुलतानशाह लोदी—मलीक बहीराम लोदीचा मुलगा.

सुलतान हुसेन शर्की—(स. १४५८-१४९९) या जौनपूरच्या शर्की राजानें ख्यालाच्या गाण्यांत सुधारणा करून त्याचा फैलाव केला.

सुलेमान—(स. ८५७) एक अरब प्रवासी. हिंदूंच्या साम्राज्यकल्पनेंत दुसऱ्याचें राज्य नाहींसें करण्याची कल्पना नाहीं असें यानें आपल्या प्रवासवृत्तांत लिहिलें आहे.

सुलेमान शुकोह—(स. १६३५-६०) हा दाराचा मुलगा. औरंगजेबानें यास ठार केलें.

सुविनय—(स. १०० सुमार) यानें चीनमध्यें बौद्धधर्माचा प्रचार केला.

सुविधिनाथ—हा जैनधर्माचा नववा तीर्थंकर (तीर्थंकर पाहा).

सुस्थितवर्मन्—(स. ६१९ सुमार) बाणाचे हर्षचरित्र, निधनपूर येथील ताम्रपट आणि नालंदा येथील शिलालेख या तिन्हींवरून हा मौखरी नसून आसाममधील कामरूप येथील राजा होता असें सिद्ध झालें आहे. वरील शिलालेखावरून याच्या बापाचें नांव स्थितवर्मन् असून बायकोचें श्यामादेवी असें होतें.

हा महासेन गुप्ताचा समकालीन असून याची व महासेनाची ब्रह्मपुत्रा नदीच्या तीरावर लढाई झाली. तींत याचा पराभव झाला. हा एक प्रबळ राजा होता. याचा वचक मौखरी वंशांतील लोकांना होता. यानें आपणास 'महाराजाधिराज' ही पदवी धारण केली होती. 'श्रीमृगांक' असें याचें दुसरें नांव शिलालेखांत आढळतें (E. I. XII, p. 69). याला सुप्रतिष्ठितवर्मन् आणि भास्करवर्मन् असे दोन मुलगे होते (मौखरी by E. A. Piers, p. 95-102).

सुस्सल—(स. १११२-२८) काश्मीरचा राजा.

सुहांदी—(स. ६५०) सिंधच्या सिंधुराज साहसीची पत्नी. हिनें चचाला राज्य मिळवून दिलें व त्याशीं लग्न केलें.

सुंदर—(स. १६०० सुमार) एक हिंदी कवि. हा ग्वाल्हेरचा ब्राह्मण. शाहजहानच्या दरबारीं कविता ऐकवावयाचें काम करी. याला महाकविराज अशी पदवी होती. सुंदरशृंगार, सिंहासनबत्तिशी व बारहमासा असे याचे ग्रंथ आहेत. याची रचना शब्दचमत्कारपूर्ण आहे.

सुंदरदास—(स. १५९६-१६८०) एक हिंदी कवि. याचा पिता परमानंद व माता सती. जन्मस्थान द्यौसा (जयपूर राज्य). हा दादू दयालाचा शिष्य. याला संस्कृत व फार्सी चांगलें येत असे. हा देखणा असून ब्रह्मचारी होता. याच्या लहानमोठ्या ग्रंथांची संख्या चाळीसपेक्षां जास्त आहे. याचे ग्रंथ सुंदरविलास, ज्ञानविलास, ज्ञानसमुद्र वगैरे. हा शांकरमत उत्तम प्रतिपादन करितो.

सुंदरवर्मन् मौखरी—(स. २८३-३१९) कनोजच्या मौखरी वंशांतील हा एक राजा असून क्षत्रवर्मन्नंतर गादीवर आला.

याला प्रथम बरींच वर्षें मूलबाळ नसल्यामुळें यानें चंद्रसेन नांवाच्या एका मुलास दत्तक घेतलें. त्यामुळें चंद्रसेनाचा मगधच्या गादीवरील वारसा हक्क सिद्ध झाला. परंतु पुढें यास कल्याणवर्मन् नांवाचा औरस पुत्र झाला. कल्याणवर्मनाचा जन्म झाल्यामुळें आपल्या वारसाहक्कांवर धाड येईल या भीतीनें चंद्रसेनानें आपल्या दत्तक बापाविरुद्ध युद्ध पुकारलें. चंद्रसेनानें लिच्छवी घराण्यांतील राजकन्येशीं लग्न केल्यामुळें लिच्छवी राजांनीं वरील लढाईत चंद्रसेनाच्या बाजूनें भाग घेतला. हा चंद्रसेन म्हणजे गुप्त घराण्यांतील जो चंद्रगुप्त पहिला तोच होय, असें रा. जयस्वाल यांनीं म्हटलें आहे.

शेवटीं चंद्रगुप्तानें (चंद्रसेन) याची राजधानी जें पाटलीपुत्र त्यास वेढा दिला. तेव्हां हा मारला गेला व याच्या राण्यांनीं आत्महत्या केली.

सूदन—(स. १७५३) सूदन या हिंदी कवीनें आपल्या 'सुजानचरित्र' या वीररसप्रधान काव्यांत सुरजमल्ल जाटाच्या चरित्रांतील स. १७४५-५३ मधील प्रसंग वर्णिले आहेत. ते ऐतिहासिकदृष्ट्या बरोबर आहेत. हें काव्य नागरीप्रचारिणी सभेनें प्रसिद्ध केलें आहे.

सूरदासजी—(स. १४८२-१५६०) एक हिंदी भाषेतील महाकवि व साधु. याचीं जन्मभूमि दिल्लीच्या जवळ असणारा 'सीही' गांव मानतात. पण कांहींच्या मतें मथुरा ते आग्रा सडकेवर असलेलें 'सनकता' हें गांव याची जन्मभूमि होय. हा सारस्वत ब्राह्मण असून याच्या पित्याचें नांव रामदास होय.

यानें आपल्या 'दृष्टिकूट' ग्रंथावर स्वतः टीका लिहून स्वतःविषयीं माहिती दिली आहे. त्यावरून हा ब्रह्मभट असून चंदवरदाई या महाकवींचा वंशज होता असें दिसतें. याला सहा भाऊ होते. ते सर्व मुसलमानांशीं झालेल्या युद्धांत मारले गेले. हा आंधळा होता.

यानें वल्लभाचार्यांच्या आज्ञेवरून 'श्रीमद्भागवत' अनेक पदांमध्यें गायिलें आहे. तीं पदें 'सूरसागर' या नांवानें प्रसिद्ध आहेत. वल्लभाचार्यांच्या अष्टछाप मंडळांतील हा सर्वश्रेष्ठ कवि होय. याच्या 'साहित्यलहरी' ग्रंथांत सूरसागरांतील दृष्टकूट पदांचा संग्रह आहे. यांचा 'सूरसारावली' हा ग्रंथ 'सूरसागर' ग्रंथाची सूचि होय. याशिवाय बॅहलो व नलदमयंती हीं याचीं काव्यें आहेत. हरिवंशावरील टीका अद्यापि उपलब्ध नाहीं. हा जन्मतः अंध नसावा. रामचरित्र गाण्यांत तुळसीदासानें प्रगट केलेलें चातुर्य यानें कृष्णलीला वर्णन करतांना प्रगट केलें आहे. यासंबंधीं हिंदीमध्यें पुढील कविता प्रसिद्ध आहेः 'सूर सूर तुळसी ससी, उडुगण केशवदास । अबके कवि खद्योतसम जहँजहँ करैं प्रकाश ।।' 'सूरदास सूर्य, तुळसीदास चंद्र आणि केशवदास नक्षत्रगण होय. बाकीचे कवि काजवे होत.' हे उद्धवाचे अवतार मानले जातात. यांची समाधि काशीच्या उत्तरेस दोन मैलांवर असलेल्या शिवपुरी गांवीं आहे.

सूरदास मदनमोहन--(कविताकाल स. १५०२-१५४२) हा हिंदी कवि ब्राह्मण जातीचा असून गौडीया सांप्रदायाचा वैष्णव होता. हा अकबराच्या वेळीं संडीळचा अमीन असतां सरकारी पैसा खर्च करून विरक्त झाला. याची सरस रचना सूरसागरांत आढळते. याचा ग्रंथ नाहीं.

सूर्य—(जन्म स. १५०८) हा सिद्धांतसुंदरकार ज्ञानराजाचा पुत्र. हा आपणांस सूर्यदास असें म्हणवितो. याचे ग्रंथ-१ लीलावतीटीका (गणितामृतकूपिका), २ बीजटीका, ३ श्रीपतिपद्धतिगणित, ४ बीजगणित (स्वतंत्र), ५ ताजिकग्रंथ (ताजिकालंकार), ६ काव्यद्वय, ७ बोधसुधाकर (अध्यात्मग्रंथ).

शिवाय याचीं पुढील आठ काव्यें आहेत-१ पद्यामृततरंगिणी, २ रामकृष्णकाव्य, ३ शंकराभरण, ४ नृसिंहचंपू, ५ विघ्नमोचन, ६ भगवतीगीत. रामकृष्णकाव्य, प्रसिद्ध असून राम व कृष्णपर दोन अर्थ त्यापासून निघतात. यांशिवाय आणखीहि याचे ग्रंथ असावेत.

सूर्यमती-ही काश्मीरच्या लोहर घराण्यांतील अनंतदेवाची पत्नी. पुत्र कलशाला गादीवर बसवून वानप्रस्थाश्रम स्वीकारला असतां या पतिपत्नीला त्याच्या छळामुळें आत्महत्या करावी लागली.

सूर्यराव काकडे—(मृत्यु स. १६७२) हा शिवाजीचा बाळमित्र व शूर योद्धा. हा जेध्याचा नातलग असून मोरे प्रकरणांत याचें शौर्य दिसून आलें. सभासद म्हणतोः भारतीं जसा कर्ण तसा हा होता.

सूर्यराव सुर्वे—(स. १६६१) कोंकणांतील शृंगारपूरचा राजा व आदिलशाहाचा मांडलिक. मोरे प्रकरणांत हा मोऱ्याच्या बाजूनें होता. पण शिवाजीची सरशी होतांच यानें त्यास कळविलें कीं मी तुमचा क्रीतपुत्र आहें. पण शिवाजीनें कोंकणावर स्वारी केली तेव्हां रुस्तुमजमा तोंड देऊं शकत नाहीं असें पाहून तें काम यावर सोंपविलें. तेव्हां यानें मध्यरात्रीं अचानक हल्ला केला. पिलाजी नीलकंठ घाबरला, पण तानाजी मालुसरे पुढें झाला व त्यानें याची दाणादाण केली. पुढें बोलावलें असतांहि हा शिवाजीच्या भेटीस आला नाहीं. तेव्हां शिवाजीनें प्रभानवल्ली प्रांत घेऊन तेथील किल्ल्यास प्रतीतगड असें नांव दिलें. तेथें त्र्यंबक भास्कराची नेमणूक केली.

सूर्याजी पिसाळ—(स. १६८९) यानें फितुरी करून रायगड औरंगजेबाच्या ताब्यांत दिला, आणि मुसलमान होऊन वाई प्रांताची देशमुखी मिळविली. शाहूमहाराज सुटून आले तेव्हां त्यांनीं पिसाळाची कत्तल केली आणि त्याचे हाल करून ठार मारलें. याचें गांव ओझर्डे.

सृष्टिधर—महाभारतावरील टीकाकार. यानें देवबोध, विमलबोध, व चतुर्भुजमिश्र याच्या टीकांचा निर्देश केला आहे.

सेऊणचंद्र यादव—(स. ९०० सुमार) हा दृढप्रहाराचा मुलगा होय. यानें सेऊणपूर स्थापून देशाचेंहि नांव सेऊणदेश असें ठेविलें. सेऊण देशांतल्या कांहीं भागास खानदेश असें म्हणूं लागले.

२. (स. १०६९) हा यादव घराण्यांतील चवथ्या भिल्लमनंतर गादीवर आला. हा पराक्रमी असून यानें विक्रमादित्य चालुक्याला मदत केली.

सेखोजी आंगरे—(मृत्यु स.१७३३) कान्होजीचीं स्त्री जी मथुराबाई तिचा हा थोरला मुलगा. कान्होजीनंतर सरखेलीचा कारभार हाच पाहूं लागला. हा राजनिष्ठ व इमानी सेवक असून हबशांचें प्राबल्य मोडून मराठ्यांची अभिवृद्धि करण्याकरितां मनापासून झटत होता. याच्यांत भारदस्तपणा, शालीनता, कर्तृत्वाची आवड व उत्तम शौर्य हे विशेष गुण होते. याच्या वेळीं राजकोटच्या गाजीखानानें कोंकणांत लुटालूट केली. त्याचें यानें व चिमाजीनें पारिपत्य केलें. याच्या वेळीं कोंकणपट्टीवरील मुसलमानांचा अम्मल पूर्णपणें नाहींसा झाला.

स. १७३३ मध्यें यानें सीद्दीपासून थळचा मोठा किल्ला व रावळीचा किल्ला हस्तगत केला. त्यामुळें मुंबईस इंग्रजांस मोठी धास्ती पडली. 'रोझ' नांवाच्या जहाजाचा पाडाव केल्यावरून याला इंग्रजास दंडादाखल ७६०३ रु. व जहाज परत करावें लागलें. हबशी कमजोर होऊन आंगऱ्याचें प्राबल्य वाढूं नये म्हणून उंदेरी किल्ल्यांत आंगऱ्याविरुद्ध हबशास इंग्रजांनीं दारूगोळा पुरविला. पुढें हा इंग्रजांचा समाचार घेण्यास फार दिवस टिकला नाहीं. याचें वर्तन सर्वांशीं गोड व हा अष्टपैलू होता. सर्व बायामाणसांशीं याचें प्रेम व सलोखा होता.

याच्या वेळीं याच्या शिक्क्यांत निरंतर असें पद प्रथम जोडण्यांत आलें. शिक्का 'श्रीशाहू नृपतिप्रीत्या कानोजीतनुजन्मना' सेकोजी सरखेलस्य वजारत निरंतर.

सेतेकर—(स. १०० सुमार) तेलगू कवि.

सेना न्हावी—(स. १४४८ सुमार) हा रामानंदाचा शिष्य. पण यानें वेगळा पंथ स्थापिला. बांधवगडचे राजे याच्या शिष्यांपैकीं होते. भक्तविजयांत याची चमत्कारप्रधान माहिती दिली आहे (भ. वि. ३४).

श्रावण वद्य द्वादशीस आपण समाधिस्थ झाल्याचें यानें लिहिलें आहे ! ज्ञानेश्वरादि बंधूंचा फक्त याच्या अभंगांत निर्देश आहे.

सेनाचार्य—अमोघवर्ष राजाच्या पदरचा पंडित यानें जैनधर्माविषयीं कित्येक ग्रंथ लिहिले आहेत. याच्या ग्रंथांतील शकावरून हा शालिवाहनाच्या आठव्या शकांत होता (कविचरित्र).

सेल्यूकस् निकेटर—(ख्रि. पू. ३२३-३००) हा प्रथम सिकंदरचा एक प्रमुख सेनापति होता. तसाच दुसरा प्रमुख सेनापति अँटिगोनस हा होता. सिकंदर मेल्यानंतर (ख्रि. पू. ३२३) दोघांमध्यें सारखीं युद्धें सुरू झालीं. सिकंदरच्या या साम्राज्यांत वर्चस्व कोणाचें असावें, हाच त्यांत हेतु होता. अशीं नऊ वर्षें सारखीं युद्धें चाललीं (स.पू. ३१३). प्रारंभीं अँटिगोनसचा जय होत होता. त्यानें याला पराजित करून पळवून लावलें होतें. पण ख्रि.पू. ३१२मध्यें यानें बाबिलोन (पूसा) जिंकलें. या वेळेपासून युद्धाची गति पालटली. सेल्यूकसचा सारखा जय होत गेला आणि याने राजा पदवी धारण केली. यापुढें अँटिगोनसचीं सारखीं युद्धें चालूच होतीं. पण शेवटीं पराजित होऊन त्यास इजिप्तमध्यें पळून जावें लागलें. मग मात्र हा मॅसिडोनियन साम्राज्याच्या एशियाई भागाचा प्रतिस्पर्धीरहित राजा झाला. ख्रि. पू. ३०६ मध्यें याचा राज्याभिषेक मोठ्या थाटानें साजरा करण्यांत आला. या वेळेपासूनच विजेता या अर्थाची निकेटर अशी पदवी यानें धारण केली. इतिहासांत याला सीरियाचा राजा असें म्हटलें असलें तरी वास्तविक हा संपूर्ण पश्चिम व मध्य आशियाचा राजा होता. याच्या साम्राज्याची पूर्वेकडील सीमा हिंदुस्थानाला लागली होती. ख्रि. पू. ३०५ मध्यें यानें सिंध आणि पंजाब जिंकण्याच्या इच्छेनें हिंदुस्थानाकडे मोर्चा वळवला. तेथें चंद्रगुप्त मौर्य याच्याशीं युद्ध करण्यास सज्जच होता. त्यानें याचा सिंधूच्या काठीं पराजय केला. पण शेवटीं या दोघांचा तह झाला, आणि यानें आपली मुलगी चंद्रगुप्ताला देऊन स्नेह जोडला. कांहीं लोक म्हणतात यानें पाटलिपुत्रापर्यंत स्वारी केली होती, पण त्याला प्रमाण नाहीं. लैसन, श्लीगल, श्वातर्बेक इत्यादींनीं हा सिंधूपर्यंत आला होता असें सिद्ध केलें आहे. कदाचित् तह झाल्यानंतर व आप्तपणा जोडल्यानंतर हा पाटलिपुत्र येथें गेला असेल. पण युद्ध सिंधु नदीच्या तीरींच झालें आणि त्यांत चंदगुप्ताचा जय झाला. शेवटीं तर याच्या सैन्याचा चंद्रगुप्ताच्या सैन्यानें पाठलाग केला. जय झाला ही गोष्ट तहाच्या अटींवरूनहि लक्षांत येण्यासारखी आहे. तहाच्या अटी—१ चंद्रगुप्तानें सेल्यूकसला पांचशें हत्ती द्यावेत. २ सेल्यूकसनें चंद्रगुप्ताला पुढील प्रान्त द्यावेतः १ पॅरोपॅनिसडेई (काबूल), एरिया (हिरात), व आर्केशिया (कंदाहार), जिड्रोशिया (मकरान), स्ट्रेबो, एरियन, प्लूटार्क, जस्टिन व प्लिनी हे ग्रंथकार आपल्या प्राचीन पुस्तकांत असेंच मानतात.

इतकें झाल्यावर हा पुनः अँटिगोनसशीं युद्ध करण्याकरितां गेला. शेवटीं त्याचा पराजय होऊन तो ख्रि. पू. ३०१ मध्यें फ्रीगियांत मारला गेला.

ख्रि. पू. ३०३ मध्यें वरील तह झाला. तह झाल्यावर यानें मॅगेस्थनीज नांवाचा वकील चंद्रगुप्ताच्या दरबारीं ठेवला (मेघाक्ष पाहा).

सेवकराम तुळजाराम—(स. १७६५-८७) जयपूर व कलकत्ता येथें असलेला मराठ्यांचा वकील. याचीं पत्रें शुद्ध मराठी भाषेंत मोडीत लिहिलेलीं आढळतात. त्यांत याला दरमहा पगार तीनशें रुपये असून त्यांतील घरखर्चास फक्त ९४ राहत. ते पुरत नसल्याचें हा लिहितो (म. व. पृ. ५७).

सोच्छराज परमार—दुसऱ्या कृष्णराजाचा पुत्र (किराडूच्या देवळावरील लेख).

सोज—(स. १७२७-१७९७) ऊर्दू कवि. याचें नांव सैय्यद मुहम्मद मीर. बापाचें नांव जिहाउद्दीन. हा तीर मारण्यांत व लेखनांत कुशल होता. हा फकिरी वेषांत राही. शेवटीं हा लखनौस आसफुद्दौलाचा गुरु झाला. याचें नांव मीर होतें. मीर तकीचें तेंच नांव असल्यानें यानें 'सोज' हें नांव धारण केलें. याचा एक दीवान प्रसिद्ध आहे (क. की. ४).

सोढ्ढल—(कथाकाल स. १०२६-५०) या कायस्थ जातीच्या संस्कृत कवीनें 'उदयसुंदरीकथा' चंपूरूपानें लिहिली. कलादित्य-चंद्रपति-सोल्लपेय-सूर-सोढ्ढल असा याचा वंश आहे. याचा गुरु-चंद्र व मातुल गंगाधर. याला ठाण्याच्या (शिलाहार ?) चित्तराज, नागार्जुन व मम्मुनीराज या राजांचा आश्रय होता. लाट देशच्या वत्सराजानें याला बोलाविलें होतें. हा कवि आपणास वाल्मिकी व बाण यांच्या तोडीचा समजतो.

यादव घराण्यांतील जो सिंघण राजा त्याचा एक कारभारी. याचा पुत्र संगीतरत्नाकरकार शार्ङ्गधर.

सोडास महाक्षत्रप—(स. १५ सुमार) हा मथुरेच्या राजुल क्षत्रपाचा मुलगा.

सोनभट बहुतकर—रामचंद्र निळकंठ अमात्यासारखे सुप्रसिद्ध पुरुष याच्या घराण्यांत झाले. भाऊबंदांनीं त्रास दिल्यामुळें या घराण्यांतील एक स्त्री गरोदरपणींच देशत्याग करून शिवापूरच्या ठकारदीक्षितांच्या घरीं येऊन राहिली. हें शिवापूर दादोजी कोंडदेवानें वसविलेलें होय. या बाईस मुलगा झाला तो सोनभट बहुतकर होय. ठकार हे देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण असून शिवाजीच्या कुटुंबांत मुहूर्त वगैरे सांगण्यास ते जात असत. सोनभट हा विद्वान् निघाल्यामुळें ठकारांच्या ऐवजीं याचें जाणेंयेणें पडूं लागलें. सोनभटावर शिवाजीचा मोठा विश्वास जडला. सोनभटाला आबाजी व निळोबा असे दोन मुलगे होते. हेच शिवाजीच्या राज्यांत प्रसिद्धीस आलेले आबाजी सोनदेव व निळो सोनदेव होत.

सोनजीराव भापकर—(मृत्यु स. १७६१) थो. बाजीराव व नानासाहेब पेशवे यांच्या राजवटींतील एक प्रख्यात सेनानायक. लोणीचे पाटील. फार शूर. पानपतावर दहा हजार घोडदळाचे अधिपति. त्या वेळीं यांनीं एकदां सुजाउद्दौल्याचा पराजय केला होता. पानपतच्या शेवटच्या लढाईंत यांच्याकडे होळकरासह एक बगल संभाळण्याचें काम होतें. तेथेंच हे मृत्यु पावले.

सोनाजी विश्वनाथ डबीर—(मृत्यु स. १६६४) हा शिवाजीच्या पदरीं होता (रा. खं. १७ पृ. १८). हा औरंगजेबाकडे तह करण्याकरितां गेला होता (रा. खं. ८ पृ. ६). हा शाहिस्तेखानचा निरोप घेऊन राजगडावर शिवाजीकडे आला (स. १६६०). हा राजनीतिज्ञ असून यानें शिवाजीला राजनीति सांगितल्याचा शिवभारतांत निर्देश आहे. याची जिजाईबरोबर तुला झाल्याचा निर्देश आहे (जे. श.)

सोपानदेव—(समाधि स. १२९७) हा ज्ञानेश्वराचा लहान भाऊ. यानींहि पंचीकरण, हरिपाठ, नमन वगैरे प्रकरणें व सोपानदेवी या नांवाची गीतेवर एक समश्लोकी ओवीबद्ध टीका लिहिली आहे. यांच्या नांवावर दोन अगदीं भिन्न असे हरिपाठ उपलब्ध आहेत आणि तिसरा एक अर्धवट आहे (मं. वार्षिक १८३६ क्र. ३७). यांचा जन्म शके ११९९ मध्यें होऊन समाधि शके १२१९ मार्गशीर्ष शु. १३८ सासवडीं झाली.

सोमदेव—(स. १०६३-८१) हा संस्कृतांतील कथासरित्सागराचा कर्ता. हा काश्मीरी कवि असून गुणाढ्याच्या पैशाची भाषेंतील बृहत्कथानुरोधानें यानें आपला लोकप्रिय ग्रंथ रचिला. याची भाषा प्रौढ असून कथालेखनांत याचें उत्कृष्ट कौशल्य दिसून येतें. 'क्रियानीतिवाक्यामृत' हाहि याचा दुसरा ग्रंथ आहे.

२. (स. ११५० सुमार) यानें 'ललितविग्रहराज' नाटक शाकम्भरीच्या विसलदेव चाहमानास अर्पण केलें.

सोमदेवसूरि—(स. ९५९) हा एक कवि असून दिगंबर जैन धर्माचा होता; यानें 'यशस्तिलकचंपू', 'नीतिवाक्यामृत,' 'युक्तिचिंतामणि' वगैरे संस्कृत ग्रंथ लिहिले आहेत. यानें 'यशस्तिलकचंपू'च्या शेवटी स्वतःविषयीं व ग्रंथरचनेविषयीं कांहीं माहिती दिली आहे. तीवरून चंपूकाव्य श. ८८१ मध्यें राष्ट्रकूट राजा कृष्ण हा मेल्पाटी येथें राज्य करीत असतांना आणि त्याचा सामंत व अरिकेसरिन्चा पहिला मुलगा बद्दग हा गंगधारा येथें राज्य करीत असतांना तयार केलें असें दिसतें (मं. त्रै. द. म. इ. सा. सं. २, पा. ३७ टीप).

सोमदेवज्ञ—(स. १६३०-४२) एक ज्योतिषी. याचा पिता व आजा अनुक्रमें रुद्रभट्ट व कामभट्ट होत.

गुरु-चुलता बाळंभट्ट. याचा शिष्य वसुदेव (गुजराथी) जळगांवचा राहणारा.

याचे ग्रंथ—कल्पलता, कल्पवल्ली, पद्धतिभूषण (स. १६३७), बृहत्कल्पलता, संवत्सरकल्पलता (स. १६४२). तिथिरत्न.

सोमनाथभट्ट—(स. १५००सुमार)तेलंगी ब्राह्मण. हा सूरिभट्टाचा पुत्र. व्यंकटाद्रि यज्वन्चा धाकटा भाऊ आणि निट्टिल घराण्यांतील होय. पार्थसारथिमिश्राच्या शास्त्रदीपिकेवर 'मयूखमालिका' नांवाची यानें टीका लिहिली.

सोमसिंह परमार—(स. १२३०-३६) आबूच्या परमारांपैकीं धारावर्षाचा पुत्र. यानें आपल्या पित्यापासून शस्त्रविद्या व चुलत्यापासून शास्त्रांचें अध्ययन केलें (एपि. इंडि. भा.८, पृ.२११). याच्या वेळच्या मंत्री वस्तुपालाचा भाऊ तेजपाळ यानें आबूवर देलवाडागांवीं लूणवसही नांवाचें मंदिर बांधलें. हें आबूवरील मंदिरांत सौंदर्याच्या दृष्टीनें दुसरें आहे. क्रोडो रुपये लावून आपला पुत्र लूणसिंह (लावण्यसिंह) यास श्रेय मिळावें म्हणून स. १२३० मध्यें तें बनविलें. याची पूजा वगैरेकरितां यानें बारठ परगण्यांतील डबाणी हें गांव मंदिराला दिलें. त्या गांवीं मिळालेल्या वि. सं. १२९६ श्रावण शु. ५ च्या शिलालेखांत मंदिर, तेजपाळ आणि त्याची पत्नी अनुपमादेवी यांचा उल्लेख आहे. याच्या वेळचे तीन शिलालेख आतांपर्यंत मिळाले आहेत. ते वि. सं. १२८७-९३ पर्यंतचे आहेत (एपि. इंडि. भा. ८, पृ. २०८-२२). हा गुजराथच्या दुसऱ्या भीमदेवाचा सामंत होता. यानें स्वतः

आपला पुत्र कृष्णराज (कान्हडदेव) याला युवराज केलें होतें, व त्याला हातखर्चाकरितां नाणागांव (जोधपूर राज्यांतलि गोडवाड इलाख्यांतील) दिलें होतें.

सोमा—ही गणपतीची बायको होती. हिच्यापासून रुद्रम्बा नांवाची मुलगी झाली. ती पुढें राणी झाली.

सोमेश्वर कलचुरी—(सोविदेव कलचुरी पाहा).

सोमेश्वर (पश्चिम) चालुक्य—(स. १०४२–६८) हा दुसऱ्या जयसिंहानंतर गादीवर आला. याचा पिता आहवमल्ल. बिल्हणानें याच्या पराक्रमाचें फार वर्णन केलें आहे. यानें राजाधिराज चोलाचा कोप्पम येथें पराभव केला. पण पुढें त्याचा भाऊ राजेंद्रानें याचा पराभव केला. यानें भोजाचा पराभव करून धार घेतलें. याचे कारकीर्दीत कदम्ब वगैरेंनीं स्वतंत्र होण्याचा प्रयत्न केला. यानें कांची, गौड, बंगाल, कामरूप वगैरे देशांवर स्वाऱ्या केल्या व कल्याण ही राजधानी केली. मैळालदेवी ही याची राणी बनवासी प्रांतावर स. १०५० च्या सुमारास राज्य करीत होती व दुसरी राणी केतलदेवी ही स. १०५४ मध्यें पोन्नवाड जिल्ह्यावर राज्य करीत होती. यानें बच्चलदेवी, चन्दलकब्बे (चन्द्रिकादेवी), मैळालदेवी व केतलदेवी या चार राण्या केल्या होत्या. याच्यामागून याचा पुत्र सोमेश्वर दुसरा हा राजा झाला. यानें तुंगभद्रेंत जलसमाधि घेतली. यानें अनेक काव्यें, कथा व नाटकें लिहिलीं असें विक्रमांकदेवचरितांत लिहिलें आहे (४. ४६-६८).

२. (स. १०६९–७६) पहिल्या सोमेश्वराचा पुत्र. यानें कदम्ब, अलुप व चोल यांवर वचक बसविला. यास सोयीदेव ऊर्फ भुवनैकमल्ल असें म्हणत. याची राणी चोलकन्या होती. यानेंच चोल राजास गादीवर बसण्यास मदत केली होती.

यानें राजेंद्र चोलाचा पराभव केला. तिसरा जयसिंह (नोळंबवाडी) व सहावा विक्रमादित्य (बनवासी) या भावांपैकीं दुसऱ्यानें याला कैद करून राज्य घेतलें.

३. (स. ११२६-३८) सहाव्या विक्रमादित्याचा पुत्र. यानें विज्जल व कलचुरी यांनीं डळमळीत केलेली चालुक्यसत्ता तात्पुरती पुनः प्रस्थापित केली. यानें आंध्र, द्रविड, मगध व नेपाळ येथील राजांवर स्वारी केली व मानसोल्लास (अभिलषितार्थचिंतामणि) ग्रंथ रचला (स. ११२७). पुढें कलचुरी व गणपति या घराण्यांची वाढती सत्ता व म्हैसूरच्या बल्लाल होयसळ राजाचा उदय यांमुळें या चालुक्य-सत्तेस या वेळीं ग्रहण लागलें. यास भूलोकमल्ल म्हणत. याच्या नंतर जगदेकमल्ल दुसरा हा राजा झाला. याचें व कलचुरी राजा पेरमादि याचें वांकडें होतें (B.).

४. (स. ११६३–८९) तिसऱ्या तैलाचा मुलगा. याला त्रिभुवनमल्ल तिसरा व वीर सोमेश्वर म्हणत. हा या घराण्याचा शेवटचा राजा होय. याच्या उत्तरेकडील राज्यांत वऱ्हाड व माळवा हीं मुद्दां येत. हे निरनिराळ्या प्रान्तांवर आपले राजपुत्र, राण्या व इतर नातलग यांना राजप्रतिनिधि नेमीत. अशा प्रतिनिधींचीं नांवें निरनिराळ्या शिलालेखांतून व ताम्रपटांतून पुष्कळ आलीं आहेत. शेवटीं यांचें उत्तरेकडील राज्य देवगिरीचे यादव व दक्षिणेकडील राज्य द्वारसमुद्राचा दुसरा बल्लाळ होयसळ यांनीं जिंकून घेतलें. यानें आपला सेनापति वर्मरसच्या मदतीनें कलचुरी राजा सिंघण याजवर स्वारी करून गेलेला प्रांत परत मिळविला होता.

हा धर्मपुरास राज्य करीत होता. हा फार बलाढ्य असून पुष्कळशा शिलालेखांवरून याच्या राज्याचा विस्तार अजमावतां येतो. याच्या नंतरच्या राजांनीं विशेष कांहीं केलें नाहीं. याच्यानंतर चालुक्यांच्या सत्तेस उतरती कळा लागली.

सोमेश्वर चौहान—(स. ११६९) पृथ्वीराजाचा पिता. हा अर्णोराज व कांचनदेवी यांचा पुत्र. कांचनदेवी सिद्धराज जयसिंहाची मुलगी. पृथ्वीराजाची माता कमलादेवी अनंगपाळ तुवराची मुलगी होय. याचें पालणपोषण सिद्धराज जयसिंहानें व कुमारपालानें केलें.

सोमेश्वरदेव—(स. १२३२–५२) कुमार व लक्ष्मी यांचा हा पुत्र. याची कीर्तिकौमुदी बॉंबे संस्कृत सीरीजमध्यें श्री. काथवटे यांनीं संपादून प्रसिद्ध केली आहे.

याचे ग्रंथ व प्रशस्ति पुढीलप्रमाणें उपलब्ध आहेतः–

ग्रंथ—१ सुरथोत्सव (काव्यमालेंत प्रसिद्ध आहे), २ रामशतक, ३ काव्यादर्श, ४ काव्यप्रकाशटीका, ५ उल्लाघराघव (नाटक), ६ कीर्तिकौमुदी.

प्रशस्ति—१ आबूच्याजवळ देलवाडागांवीं तेजपालानें बांधलेल्या लूणवसही मंदिरावरील प्रशस्ति. २ गिरनार पर्वतावरील तेजपालानें जीर्णोद्धार केलेल्या दोन मंदिरांवरील प्रशस्त्या. ३ वीर नारायण प्रासादावरील प्रशस्ति. ही होती असें जैन राजशेखराच्या प्रबंधकोशावरून कळून येतें. सध्यां उपलब्ध नाहीं.

सोमेश्वर परमार—(स. ११६१) आबूच्या परमारांपैकीं किराडूच्या शाखेंतील उदयराजाचा पुत्र. हा सिद्धराज जयसिंहाच्या कृपेंतील सामंत होता. सिंधुराजपुरचें गेलेलें राज्य यानें जयसिंहाच्या कृपेनें पुनः मिळ-

विलें, आणि जयसिंहानंतर गादीवर आलेल्या कुमारपालाच्या कृपेनें आपलें स्थान स्थिर करून यानें किराडू येथें पुष्कळ वर्षे राज्य केलें. यानें जज्जक राजापासून १००० घोडे दंड म्हणून घेतले व त्याचे दोन किल्ले जैसलमोर राज्यांतील तणुकोट्ट व नक्सर (जोधपूर राज्यांतील) हे घेतले (स. ११६१). शेवटीं जज्जकला कुमारपाल सोलंकीच्या स्वाधीन करून किल्ले वगैरे त्याला दिले. या कृत्याच्या स्मरणार्थ किराडू येथें वरील अर्थाचा लेख कोरविला. तो लेख अद्यापि अप्रकाशित आहे.

सोमेश्वर होयसळ—(स. १२३४-५४) हा दुसऱ्या नरसिंहाचा मुलगा. हा चोल देशांत विक्रमपूर येथें राज्य करीत होता. याला बिज्जला व देवला (चालुक्य-राजकन्या) अशा दोन बायका होत्या.

सोयराबाई--(शिवाजी व संभाजी पाहा).

सोयीदेव—पश्चिम चालुक्यांपैकीं दुसऱ्या सोमेश्वराचें नामान्तर.

सोविदेव कलचुरी—(स. ११६७-७५) बिज्जलचा पुत्र. याला सोमेश्वर किंवा रायमुरारी असें म्हणत.

सोहिरोबा अंबिये—(स. १७१४-९२) मराठींतील एक संत व कवि. सांवतवाडी संस्थानांतील बांदे गांवचे राहणारे व तेथील कुलकर्णी. यांचा जन्म शके १६३६ (स. १७१४) च्या सुमारास झाला. जात सारस्वत ब्राह्मण. यांचे वंशज सध्यां गोवें प्रान्तांत आहेत. हे कुलकर्ण करीत असतां सावंतवाडीच्या गादीवर खेमसावंत हे अल्पवयी होते. तेव्हां त्यांचा कारभार त्यांचे चुलते आबासाहेब हे पाहत असत. त्यांनीं एकदां एका खोलींत यांना कोंडून 'देव दाखवा' म्हणून फर्माविलें. तेव्हां एक ज्वाला उत्पन्न होऊन आबासाहेबांचे डोळे दिपले. तेव्हां यांना त्यानें सोडलें, पण यांनीं सांगितलें कीं, तुझी किंवा माझी आहुति घेतल्याशिवाय ही ज्वाला शान्त होणार नाहीं. पुढें लवकरच आबासाहेबानें दारूच्या कोठारांत आपणास जाळून घेतलें असें म्हणतात. पुढें गहिनीनाथ किंवा गैबनाथ यांनीं यांच्यावर अनुग्रह करून वरदहस्त मस्तकीं ठेवला. तेव्हांपासून यांनीं लेखणी खालीं ठेवली. यांच्या कवितेचा बराच भाग यांच्या बहिणीच्या हातचा आहे. आणखीहि कांहीं कविता या बहिणीनें पानावर लिहून ठेविली होती ती चुकीनें यांच्या मातेच्या हातून जाळली गेली. हे आपल्या वयाच्या साठाव्या वर्षी उत्तर हिंदुस्थानांत यात्रेकरितां गेले. तिकडेच शके १७०१ (स. १७७९) मध्यें महादजी शिंदे यांच्याशीं भेट झाली. त्या वेळीं महादजींना सडेतोड उत्तर म्हणून असलेलीं यांचीं दोन हिंदी पदें यांच्या वैराग्याची साक्ष देतात. पुढें हे उज्जनीस दहा वर्षे राहिले व तेथेंच एके दिवशीं हे मठांतून बाहेर पडले ते पुनरपि दिसले नाहींत. 'गादीवर दिसणें हें सरलें। अवघें प्रावतन हें मुरलें,' हें पद फक्त बसण्याच्या जागीं आढळलें. शके १७१४, चैत्र शुद्ध नवमी या दिवशीं वयाच्या अठ्ठ्याहत्तराव्या वर्षी यांनीं आपला देह सोडला (म. क. वि. १, पा. ३७७-४०१).

सौदा—(स. १७११-८०) एक ऊर्दू कवि. याचें नांव मीर्झा मुहम्मद रफी. याचा जन्म दिल्लीचा. बाप व्यापारी होता म्हणून यानें 'सौदा' हें नांव घेतलें. हा सुलेमान कुलीखाचा शागीर्द म्हणजे शिष्य होता. हा प्रथम फार्सीत नंतर ऊर्दूत कविता करूं लागल्यानें हा लवकर लोकप्रिय झाला. याचें गद्य व पद्य असें दोनहि प्रकारचें लिखाण आहे. हा शेवटीं लखनौस राहण्यास आला.

सौमिल्ल—कालिदासानें मालविकाग्निमित्र नाटकांत निर्देश केलेला एक नाटककार. याचें एकहि नाटक प्रसिद्ध नाहीं. कदाचित् यानें मृच्छकटिक नाटक लिहून तें शूद्रक या कल्पित व्यक्तीच्या नांवावर घातलें असावें.

स्कंदगुप्त—(स. ४५५-८०) गुप्तवंशांतील कुमारगुप्ताला अनंतदेवीपासून झालेला मुलगा. हूणांच्या स्वारींत याचा पिता मारला गेला, तेव्हां यानें धीर न सोडतां तीन महिने हूणांना तोंड देऊन हूणांचा पराजय केला व आपलें राज्य टिकविलें (भिटारीच्या स्तंभावरील याचा लेख, ज. बॉ. ब्रॅ. ए. सो. भा. १६, पृ. ३४९-५०; फ्लीट गु. इं. पृ. ५३-५४). यानें क्रमादित्य, विक्रमादित्य, राजाधिराज व महाराजाधिराज अशा पदव्या धारण केल्या होत्या. हा परमवैष्णव होता. याच्या वेळचे दोन शिलालेख गुप्तसंवत् १३६ व १४१ (स. ४५५, व ४६०) मधील मिळतात. गु. सं. १३६ (१३७, १३८) चा जुनागड येथील लेख (फ्ली. गु. इं. लेखसंख्या १४) व गु. सं. १४१ चा काहाऊ येथील (संयुक्त प्रान्तांतील गोरखपुर जिल्ह्यांतील) लेख (फ्ली. गु. इं. लेखसंख्या १५), तसेंच एक दानपत्र गुप्त-सं. १४६ (स. ४६५) मधील मिळालें आहे. तसेंच अलाहाबाद जिल्ह्यांतील गढवा येथील विष्णुमंदिरासंबंधीं एक फुटका शिलालेख गुप्त-सं. १४८ (स. ४६७) मधील मिळाला आहे. त्यांतील राजाचें नांव फुटून गेलें आहे (फ्ली. गु. इं. १६, ६६). पण तो फुटका शिलालेख याचाच असावा. कारण तेथें दुसरा चंद्रगुप्त व कुमारगुप्त यांचे शिलालेख चांगले आढळतात. तसेंच

याचे चांदीच्या नाण्यांवर गुप्त-सं. १४१-१४८ (स. ४६०-४६७) पर्यंतचीं वर्षे आढळतात. यांचीं सोन्याचांदीचीं अनेक प्रकारचीं नाणीं मिळतात (जा. ऐ. का. गु. डा. पा. ११४-३४, लेख १९-२१). शेवटलीं दहा वर्षे याला श्वेतहूणांशीं लढण्यांत घालवावीं लागलीं. याच्यानंतर पुरगुप्त गादीवर आला.

स्कंदस्वामी—याचें ऋग्वेदावर भाष्य आहे.

स्टीफन्स—(जन्म स. १५४९) 'ख्रिश्चनपुराण' नांवाच्या ओवीबद्ध मराठी ग्रंथाचा कर्ता.

स्थाणुरवि चेरराज—(स. ८०० सुमार) हा चेरवंशांतील एक राजा. हा आदित्य चेलराजाचा समकालीन व मित्र होता.

स्थिरदेव—(स. ९०० सुमार) मेघदूत काव्यावर टीका लिहिणारा पंडित.

स्वामीनारायण—(जन्म स. १७८१) यानें एक वैष्णवपंथ स्थापन केला आहे. त्यास 'स्वामीनारायणपंथ' असें म्हणतात. याला हरिकृष्ण असें म्हणतात. यानें संन्यास घेतल्यावर सहजानंद असें नांव घेतलें होतें. याचा जन्म अयोध्या प्रांतांत छपैया गांवांत सरवरीया जातीच्या ब्राह्मणकुलांत स. १७८१ (संवत् १८३७ रामनवमी) सालीं झाला. याची मुक्तानंदाच्या मार्फत रामानंदाशीं भेट झाली आणि यानें रामानंदाला गुरु केलें.

ह

हगान—(हगामाश पाहा)

हगामाश—हा मथुरेचा क्षत्रप राजा असावा. कारण हें नांव असलेलीं कांहीं नाणीं मथुरा येथें सांपडलीं आहेत. त्यांत एका नाण्यावर हगान व हगामाश अशीं दोन्ही नांवें आहेत. कदाचित् हे एकामागून एक झालेले असावेत किंवा भाऊ असावेत.

हणमंतभट गुळवणी—(स. १७७५ सुमार) विठ्यानजीक पारें नांवाचें गांव आहे तेथील हा ग्रामजोशी. भगवंतराव व भवानराव प्रतिनिधीचा साहाय्यकर्ता. याचाच नातू हणमंतराव सदाशिव हा भगवंतरावाची पत्नी राजसबाई यांचा कारभार करीत होता (म. रि. उ. १, पृ. ४३४-३८).

हणमंतराव—(स. १७८१-८२) रघुनाथराव-दादाचा इंग्लंडांत गेलेला वकील.

हदीया—विजापूरच्या इब्राहिम आदिलशहाची मुलगी व मूर्तझा निजामाची पत्नी.

हनुमत्—यानें गीतेवर पैशाचभाष्य नांवानें एक टीका लिहिली आहे. गुजराथ प्रिंटिंग प्रेसनें छापलेल्या गीता-टीकांत दुसऱ्या आवृत्तींत ही टीका छापली आहे.

२. (स. ११८०-१२०० सुमार) महानाटक किंवा हनुमन्नाटका कर्ता. याच्या चवदा अंकी व नऊ अंकी अशा दोन प्रती आहेत. हें हनुमानानें दगडावर लिहिलें आणि समुद्रांत बुडविलें, असें चंद्रशेखर नांवाच्या टीकाकारानें लिहिलें आहे. हें नाटक समुद्रांतून काढून भोजानें त्याचा पुनरुद्धार केला, अशी आख्यायिका आहे. याला नाटकापेक्षां काव्याचें रूप आहे. मधूनमधून संवाद आहेत.

हनुमन्तस्वामी—(स. १७८३-१८१८) हे समर्थांचे वडील बंधु जे श्रेष्ठ त्यांच्या नातवाचे नातू होत. यांनीं दप्तरांतील कागदपत्रांचें साहाय्य घेऊन समर्थांच्या चरित्रपर बखर लिहिली आहे.

ही बखर हनुमंतस्वामींच्या नांवानें प्रसिद्ध असली तरीहि हनुमंतस्वामींच्या आज्ञेवरून संस्थानचे कारभारी रा. रंगो लक्ष्मण मेढे यांनीं जुनीं कागदपत्रें व टिपणें पाहून शके १७१५ प्रमादीनाम संवत्सरीं प्रथम पुरी केली. त्या प्रतीवरून पुढें मल्हार रामराव चिटणीस व रंगो लक्ष्मण या उभयतांनीं मिळून प्रस्तुतची प्रत शके १७४० चे आश्विन शु. १० मीस तयार केली.

दोनहि प्रतींच्या कांहीं जुन्या नकला सत्कार्योत्तेजक सभेच्या संग्रहीं आहेत. शके १७११ श्रावण शु. ९ स समाप्त झालेली एक बखर सभेस मिळाली आहे. खुद्द बखरींत (पृ. १३) पाहिलें तर समर्थांचे नातू जे गंगाधरस्वामी यांनीं समर्थचरित्र स्वतः अवलोकन केलेल्या मा. आक्कासारख्या व्यक्तीच्या तोंडी माहितीवरून आणि श्रीकल्याण-उद्धव-वासुदेवादि समर्थशिष्यांनीं लिहून ठेविलेल्या चरित्रांच्या आधारें एक चरित्र स. १६४० त लिहिण्यास आरंभ केला आणि बहुधा त्यांचीच १६४५ मध्यें तयार झालेली परळीवरील प्रत या दोन प्रतींच्या

आधारें (पृ. ५३४) १७१५ तील प्रत तयार झाली असें स्पष्ट दिसतें. जरा अधिक बारकाईनें पाहिल्यास तत्कालीन कांहीं टिपणांचा किंवा चरित्रविषयक स्फुट ग्रंथांचाहि आधार या बखरीस आहे असें आढळून येतें. (अनंतदास रामदासीकृत प्रस्तावना, पा. १५).

हबीब—(स. १५५७-६१) काश्मीरच्या इस्माईलचा मुलगा. याच्यानंतर अकबर बादशहानें काश्मीरचें राज्य घेतलें.

हबीब सुलतान—विजापूरच्या आदिलशाही घराण्यांतील जो शेवटचा राजा सिकंदर त्याचा मुख्य कारभारी जो खवासखान दुसरा याची ही बायको होय.

हमीदखान--(स. १६२९) बुर्‍हाण निजामशाहाचा कारभारी व सेनापति. यानें लुखजी जाधवाचा भर दरबारांत खून केला.

२. (स. १७२५) गुजराथेंतील बंडखोर.

हयग्रीववास मानभाव—(स. १२७५-१३२४) सुप्रसिद्ध मानभाव. ह्यांचें नांव हिरण्यगर्भभट्ट असें होतें. हे गोदावरीचे कांठीं पंचाळेश्वराजवळ राक्षसभुवन नांवाचें गांव आहे तेथील देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण. यांच्या २८० श्लोकांच्या स्तोत्राचें नांव गद्यराजस्तोत्र. तें निर्यमक आहे. यांचे पिते माधवभट्ट. माता कावेरी. हे काशीस निघाले असतां वाटेंत कवीश्वराचार्यांची (भास्करची) भेट झाली व यानें त्यांचें शिष्यत्व पत्करलें. ह्यांना हयग्रीवाचार्य हें नांव प्राप्त झालें. हे पैठणास मृत्यु पावले.

हयातं मुंहमद—(स. १७७८) भोपाळचा राजा. नंतर फौलादखान राजा झाला.

हरजी राजे महाडिक—(स. १६६८-१६९४) हा परसोजीचा मुलगा, व थोरल्या शिवाजीमहाराजांचा जांवई. याचें शिवाजीच्या मुलीशीं लग्न स. १६६८ मध्यें झालें.

रघुनाथ नारायण हणमंते यास शिवाजीनें कर्नाटकचे कामावर नेमिलें होतें. रघुनाथपंतानें तिकडचा बंदोबस्तहि फार चांगला केला. पण संभाजीच्या राज्याभिषेकाच्या वेळच्या गडबडींत रघुनाथपंत विरुद्ध बाजूचे आहेत अशा समजुतीनें रघुनाथपंतांना पकडून स. १६८० च्या पौष महिन्यांत हरजीराजे महाडिक व श्यामजी नाईक पुंडे यांना कर्नाटकाचा कारभार सांगितला, असा शकावलींत निर्देश आहे. पण ही नेमणूक तात्पुरती असावी. पुढें रघुनाथपंत संभाजीमहाराजांकडे येऊन त्यांनीं आपल्याबद्दलचा संशय घालविला आणि संभाजीनेंहि रघुनाथपंताला अमात्यपद दिलें. पण रघुनाथपंताचें संभाजीशीं फार दिवस जमलें नाहीं. पुढें तो परत जात असतां मृत्यु पावला, तेव्हां कर्नाटकाचा कारभार हरजी राजे महाडिक व श्यामजी नाईक पुंडे यांजकडे पुनः सोंपविण्यांत आला (जे. श., मे महिना, स. १६८३).

कर्नाटकांत यान्या बरोबर श्यामजी नाईक पुंडे होता, पण त्याला संभाजीनें कैद करविल्यामुळें तिकडचा कारभार हा एकटाच पाहत असे. यानें तिकडे चांगला जम बसविला. स. १६८२ च्या चैत्रांत श्रीरंगपट्टण व त्रिचनापल्ली येथील सत्ताधीशांचा तंटा लागला. त्यांत यानें त्रिचनापल्लीकरांना मदत केली. लढाई होऊन श्रीरंगपट्टणचा सरदार कुमार व दोन हजार घोडे पाडाव केले. एकोजीच्या पश्चात् त्याची पत्नी दीपाबाई व मुलगा शहाजी यांच्याशीं सलोख्यानें वागून यानें कर्नाटक हें स्वतंत्र राज्यच निर्माण केलें. औरंगजेबानें विजापूर व गोवळकोंडें बुडविलें, पण त्याला या नव्याच मराठी राज्याकडे लक्ष द्यावें लागलें. संभाजीलाहि हा मागून वसूल पाठवीत नाहीं असें वाटल्यावरून संशय उत्पन्न झाला व त्यानें या प्रान्ताची व्यवस्था पाहण्याकरितां केसो त्रिमल पिंगळे यास पाठविलें. केसोपंताला औरंगजेबाच्या चढाईला तोंड देण्याचेंच मुख्य काम होतें. प्रथम हरजीचा व त्याचा विरोध येऊन निराळ्याच भानगडी उत्पन्न झाल्या. त्यामुळें औरंगजेबाची चढाई होऊं लागली तेव्हां हरजीनें समजुतीनें आपलें सैन्य व सामान केसोपंताच्या स्वाधीन केलें. त्यामुळें मराठ्यांचें बल वाढून हरजी व संताजी यांनीं अर्काटचें मजबूत ठाणें काबीज केलें. केसोपंतानेंहि चिंगळपट व कावेरीपाक हीं ठाणीं घेतलीं. कांचीला युद्ध झाल्यावर वांदिवाश येथें मोंगल-मराठ्यांचें तुंबळ युद्ध झालें (८।३।१६८८). पण पराजय कोणाचाच झाला नाहीं. इतक्यांत महाराष्ट्रांत संभाजी मारला गेला आणि ही बातमी येतांच हरजीनें केसोपंतास त्रिनोमाली येथें कैद केलें (संभाजी ९२-९३). पुढें राजाराम जिंजीस आल्यानंतर सर्वच परिस्थिति पालटली. हा शिवाजीमहाराजांचा जावई व मराठी राज्याला अत्यंत उपयोगी पडलेला सरदार शेवटीं जिंजीच्या वेढ्यांत मृत्यु पावला (स. १६९४).

हरदत्तमिश्र—(स.११०० सुमार) आपस्तम्बमंत्रपाठाचें दुसरें नांव एकाग्निकांड आहे. त्यावर हरदत्ताचें भाष्य आहे. हा आपणास 'पदवाक्यप्रमाणज्ञमहामहोपाध्याय' असें म्हणवून घेतो. याची व्याख्या विद्वत्ताप्रचुर आहे. सायणानें आपल्या माधवीय धातुवृत्तींत आणि

देवराजानें आपल्या निघण्टुभाष्यांत याचा निर्देश केला आहे. त्यावरून हा तेराव्या शतकाच्या पूर्वीचा ठरतो.

यानें आपस्तंबगृह्यसूत्रावर 'अनाकुला' आणि आश्वलायन गृह्यसूत्रावर 'अनाविला' नांवाची टीका लिहिली. शिवाय गौतमधर्मसूत्रावर 'मिताक्षरा' व आपस्तंबधर्मसूत्रावर 'उज्वला' नांवाची टीका लिहिली आहे. याच्या सर्व टीका महत्त्वाच्या आहेत.

हा दक्षिण हिंदुस्थानांतील असून याला चोलांची माहिती चांगली दिसते. याचें लिखाण अगदीं व्याकरणदृष्ट्या शुद्ध आहे.

याचा पिता पद्मकुमार. हा अग्निकुमाराचा धाकटा भाऊ आणि अपराजिताचा शिष्य. याचें मूळ नांव सुदर्शन. वामन व जयादित्य यांच्या काशिकावृत्तीवर 'पदमंजरी' नांवाची यानें टीका लिहिली आहे. शिवाय हरिहरतारतम्य व चतुर्वेदतात्पर्यसंग्रह हे याचे ग्रंथ आहेत. हे सर्व हरदत्त एकच मानितात. शंकरभट्टानें द्वैतनिर्णयांत असेंच मानलें आहे. हा आपल्या ग्रंथांत तामिळ शब्दाचा उपयोग करतो.

हरपाळदेव—(मृत्यु स. १३१८) हा देवगिरीच्या रामदेवराव यादवाचा जांवई होय. अलाउद्दीनाचे हातीं देवगिरि गेल्यानंतर यानें मोठा उठाव करून मुसलमान किल्लेदारास हाकून लाविलें आणि स्वतः स्वतंत्रतेनें राज्य करूं लागला. तेव्हां स. १३१८ मध्यें मुबारिक खल्जीनें यास पकडून याला जिवंत सोलून हाल करून मारिलें व महाराष्ट्र प्रांत आपल्या राज्यास जोडला.

२. (स. ११४५–५५) हा ठाण्याच्या शिलाहारांपैकीं पहिल्या अपरादित्याचा मुलगा. याचे स. ११४५, ११४९, ११५० व ११५३ मधील लेख सांपडले आहेत (मु. रि. भा. १ ला, पृ. १३७, १४६).

हरभट पटवर्धन--(समाधि स. १७५० डिसें. ३) पटवर्धनांचा मूळ पुरुष. हरभटबाबा कोतवडेकर हा शके १६८२ मार्ग. व. १ सोमवार (स. १७६० डिसें. ३) रोजीं पुणें येथें समाधिस्थ झाला. याची समाधि ओंकारेश्वराजवळ धक्याचे पिछाडीस श्री. भुस्कुटे यांच्या शेजारच्या घरांत आहे. यांनीं मरणापूर्वी चतुर्थाश्रम घेतला होता (मं. वार्षिक श. १८३७ पा. ३०२). यांचा पुत्र गोविंद हरि पटवर्धन.

हरमॉइस—(ख्रि. पू. २०) हा इंडो-ग्रीक लोकांचा शेवटला राजा. याच्या ताब्यांत पंजाबचा कांहीं भाग होता. याचा पहिल्या कदफिसेसनें पराभव करून पंजाब प्रांत काबीज केला. याच्या बायकोचें नांव कॅलीओप असें होतें (V. Smith, p. 258).

हरराज—(स. १५५१) एक हिंदी कवि. हा कवि जेसलमेर येथील राजाचा आश्रित होता. यानें 'ढोला मारूरी चउपदी' हें काव्य लिहिलें. हा ग्रंथ राजस्थानी किंवा मारवाडी भाषेंत आहे.

हरसेवकमिश्र—एक हिंदी कवि. यानें कामरूपकथेंत कामरूप देशच्या राजकुमार आणि राजकुमारी यांची प्रेमकथा वर्णिली आहे. हा ओडछा–नरेश पृथ्वीसिंहाचा आश्रित होता.

हरिकवि ऊर्फ भानुभट्ट—(स. १६८५) थोरल्या शिवाजीचा मुलगा जो संभाजी त्याच्या दरबारीं हा होता. याच्या बापाचें नांव नारायण अगर नारायणसूरि असें असून आईचें नांव अन्नपूर्णा असें होतें. जरी याचें नांव हरिकवि होतें तरी पण हा भानुभट्ट या नांवानें फार प्रसिद्ध होता. हा महाराष्ट्रांतील राहणारा होय. रंगनाथ हा याचा आजा आणि पद्मनाभ चुलता.

संभाजीचा गुरु जो कृष्णपंडित त्याच्या आज्ञेवरून यानें स. १६८५ मध्यें 'शंभुराजचरित' (संभाजीचें चरित्र) हा ग्रंथ संस्कृतांत लिहिला. संभाजीचा गुरु कृष्णपंडित आणि कविकलश हे दोघे बहुतेक एकच होत. वरील ग्रंथांत यानें संभाजीचे सुरतेच्या तापीकांताच्या मुलीशीं झालेल्या लग्नाचें वर्णन केलें आहे. त्या मुलीचें नांव चंपा असें होतें. याशिवाय यानें हैहयेंद्रचरित, हैहयेन्द्रचरितटीका, सुभाषितहारावलि वगैरे ग्रंथ लिहिले. 'शंभुविलासिका' हें हैहयेन्द्रचरितटीका याच ग्रंथाचें प्रसिद्ध नांव असून तो संभाजीच्या सांगण्यावरून यानें लिहिला. जरी हा संभाजीचा आश्रित होता तरी याचें वास्तव्य सुरत येथें जास्त असे. याचा बापच याचा गुरु होता. याला चकपाणि नांवाचा एक धाकटा भाऊ होता.

हरिगुप्त (आचार्य)—(स. ५५० सुमार) या जैन आचार्यास तोरमाण या हूण राजानें गुरु केलें होतें. त्याची राजधानी उत्तर हिंदुस्थानांतील पव्वैया (पार्वतिका, किंवा पार्वती) येथें हा राही. याचा शिष्य देवगुप्त. हा गुप्त घराण्यांतील म्हणवितो.

हरिचरणदास—(स. १६४१–८१) यानें कुमारसंभव काव्यावर 'देवसेना' नांवाची टीका लिहिली. ह्यानें आपणास 'राधाकृष्णचरणकमलसेवि' असें म्हटलें आहे. 'गुप्तवृंदावनरहस्य' हा ग्रंथहि याचा असावा.

हरि दामोदर नेवाळकर—(मृत्यु स. १७६५ मे ९) झांशीच्या राजघराण्याचा पूर्वज. हा थो. बाजीरावाच्या वेळीं निजामाला पायबंद घालण्याकरितां वऱ्हाडांत होता (स. १७३५; पे. द. १७. ५१; ३०. १६९).

दमाजी गायकवाडाचा खानदेशांत बंदोबस्त करणारांत हा होता (पे. द. २०.१५१; १५२; १८२). यानें चाकणचा किल्ला व विजयदुर्ग घेतला (स. १७१५). पुढें याची उत्तरेकडे नेमणूक झाली. पेशव्यांच्या बहुतेक महत्त्वाच्या राजकारणांत हा असे. शेवटीं विजयनगरकडे उत्पन्न झालेल्या तोतयाच्या भानगडींत श्रम झाल्यानें यास ज्वर येऊं लागला, व हा मृत्यु पावला. याचा पुत्र रघुनाथ व शिवराम. शिवरामाचा पुत्र गंगाधर. तोच झांशीच्या लक्ष्मीबाईचा पति.

हरिदास—(कविताकाल स. १५४३-६०) हिंदी कवि. हा टट्टीसांप्रदायाचा संस्थापक. हा मोठा गवई असून तानसेन याला गुरूप्रमाणें मान देई. हा सनाढ्य ब्राह्मण होता. हरिदासजी के ग्रंथ, पदें व बानीं प्रसिद्ध आहेत. 'सिद्धांतके एकोणीस पद' व 'केलिमा' हे याचे दोन ग्रंथ प्रसिद्ध आहेत. याचे शिष्य मोठे महात्मे व कवि होते.

२. (स. १७४४) क्षत्रिय जातीचा गुजराथी कवि. शिवविवाह व वेदांत या विषयावर याची गुजराथी कविता आहे.

३. 'पुरंजन' संस्कृत नाटकाचा कर्ता.

हरिदास न्यायालंकार भट्टाचार्य—(स. १४८०-१५४०) वासुदेव सार्वभौमाचा शिष्य. ग्रंथ-१ कुसुमांजलिकारिकाव्याख्या (उदयनाच्या कुसुमांजलीवरील टीका). २ तत्त्वचिंतामणिप्रकाश (गंगेशाच्या तत्त्वचिंतामणीवरील टीका). ३ मान्यालोकटिप्पणी (जयदेवाच्या आलोकावरील उपटीका) (हि. इं. लॉ., पा. ४६५).

हरिदासबाबा—(स. १५४० सुमार) तानसेनाचे गुरु. हे कृष्णभक्त गवई वृंदावनास राहत. गवयांच्या मुखांतून यांचीं अनेक पदें ऐकूं येतात.

हरिदासमिश्र—(स. १४५० सुमार) कुमारसंभव व रघुवंश यांवरील टीकाकार. ग्रंथ-दीपिका व प्रकाशिका. आई मूळदेवी, पिता विष्णुदास, आजा सक्तूमिश्र.

हरिनारायण—(समाधि स. १७२५) हा साधु तेरचा ऋग्वेदी ब्राह्मण. याचीं नामामृतलहरी, अभंग व पदें उपलब्ध आहेत. सुलतानजी निंबाळकर याचा शिष्य. शाहूनें हा व याची पत्नी यांच्या मूर्ति करविल्या होत्या. याच्या सांप्रदायांत 'अन्नपूर्णापते हरिनारायण' अशी गर्जना करतात (म. क. च. भा. ५). समाधि बेनहाडी, ता. कर्जत, जि. नगर.

२. योगवासिष्ठावर सोळा हजार ओव्यांची टीका लिहिणारा मराठी ग्रंथकार. ग्रंथ आपचंदमठांत आहे (मं. वा. इ. शके १८३५, ले. ४३).

हरिनाथ—मुकुंदराजाचा गुरु.

२. (स. १३७५ सुमार) स्मृतिसार व सारसमुच्चय या संस्कृत ग्रंथांचा कर्ता. हा महामहोपाध्याय व मैथिल होता.

हरिपंत फडके—(स. १७२९-९४) बाळंभट नांवाच्या नाना फडणीसाच्या घरच्या भिक्षुकाचा हा पुत्र. याचा भाऊ बापू हा पानपतच्या लढाईत मेला. तेव्हां याची माधवराव पेशव्यानें कारकुनाच्या जागीं नेमणूक केली (स. १७६२). केळशीमहालाची देशमुखी याला वतन देण्यांत आली होती. नारायणरावाच्या वधानंतर हा बारभाईंना मिळाला. यानें मोरोबाचें कारस्थान उघडकीस आणलें (स. १७७४). राघोबाचा पाठलाग करून महीतीरीं त्याची फौज यानें उधळून लावली (स. १७७५ फेब्रु. १७). होळकर व शिंदे माळव्यांत गेले तरी गुजराथेंत राघोबाशीं याच्या लढाया चालूच होत्या. कर्नल कीटिंग राघोबासह पुण्यावर चालून येत असतां यानें त्याशीं लढाई दिली. पहिलीस आनंदमोगरीची व दुसऱ्या लढाईस आरासची लढाई म्हणतात (मे). या लढाया बरोबरीच्या झाल्या. नर्मदातीरीं भाऊपीर येथील लढाई होण्याचा आलेला प्रसंग यानें टाळला (स. १७७५ जून ११).

हैदराकडे याची नेमणूक झाली तेव्हां मानाजी फाकडे व बाजीपंत बर्वे या स्तुर लोकांस यशवंतराव मान्याला तोफेच्या तोंडीं देऊन यानें आळा घातला (स. १७७७). हैदरापासून खंडणी घेतली (स. १७७८). हा पहिल्या इंग्रज-मराठे युद्धांत होता (स. १७८१). हा पहिल्या व दुसऱ्या टिपूवरील स्वारींत प्रमुख होता (स. १७८७, १७९२). पुढें महादजी शिंदे पुण्यास आल्यामुळें नानालाहि आपल्या विश्वासांतील सेनापति सैन्यासुद्धां जवळ पाहिजे होता म्हणून हा पुण्याकडे होता (स. १७९३). पुढें हा सिद्धटेक येथें पोटदुखीनें मेला (स. १७९४ जून २०). हा नानाच्या पूर्ण विश्वासांतील होता. हा गेल्यामुळें नाना फडणीसाचें सामर्थ्य लंगडें पडलें. याचा पुत्र बाबा ऊर्फ रामचंद्र खर्ड्याच्या लढाईंत जरीपटक्यावर होता. याला चिंतामण, लक्ष्मण व माधव असे आणखी तीन मुलगे होते. हरिपंत नानाच्या पक्षांतील म्हणून याच्या मुलाला दुसऱ्या बाजीरावाचा छळ सोसावा लागला.

हरिपाळ चालुक्य—(स. ११७० सुमार) 'संगीतसुधाकर' या संस्कृतभाषेंतील संगीतशास्त्रावरील ग्रंथाचा कर्ता. हा गुजराथेंत राज्य करीत होता. याच्या

पित्याचें नांव सामंतसिंह व आजा भीमदेव, असा संगीत-सुधाकराच्या शेवटीं यानें आपला उल्लेख केला आहे. हा मोठा कवि असून यानें अनेक ग्रंथ केले आहेत. क्षेमराज सोळंकी व हा एक असावा. याला 'विचारचतुर्मुख' अशी पदवी होती (डॉ. एस्. कृष्णस्वामी यांचा स्मारक-ग्रंथ).

हरि बाबाजी केतकर--(मृत्यु स. १७७९) महादजी शिंद्याचा सरदार. दादाशीं झालेल्या झटापटींत हा जखमी होऊन मेला.

हरिबुवा भोंडवे—(स. १७०७-७७) हे पारनेरचे शिंपी. यांचा पिता केरेश्वर व माता बचाई. यांची पत्नी गोडाई. यांना रखमा व तारा अशा दोन मुली होत्या. हे रामदासी असूनहि वारकरी होते. यांची पालखी पंढरीस जाते व तिचा उजवा मान आहे. हे प्रथम लावण्या करीत. नंतर अभंग करूं लागले. यांचे ग्रंथ-ज्ञानसागर (मोक्षसिद्धिविवरण), हरिबोध, पंचीकरण, संसारतोडा, स्वरोदय. जुन्नरनजीक नारायणगांवीं यांची समाधि आहे. यांचा पहिला ग्रंथ फार महत्त्वाचा आहे असें म्हणतात. यांचे रामदासपंथाचे गुरु शिवरामस्वामी.

हरिभद्रसूरि—(मृत्यु स. ४७८) एक जैन पंडित.

२. (मृत्यु स. ११६६ सुमार) हा नागेंद्रगच्छशाखेच्या आनंदसूरि व अमरचंद्रसूरि यांचा शिष्य. यास 'कलिकालगौतम' म्हणत. ग्रंथ-षड्दर्शनसमुच्चय, वैकालिक सूत्रावर निर्युक्ति, न्यायप्रवेशसूत्र व न्यायावतारवृत्ति. आईच्या आज्ञेवरून यानें १४०० ग्रंथ लिहिले. यानें खूण म्हणून ग्रंथाच्या शेवटीं 'विरह' शब्द वापरला आहे.

हा ब्राह्मण असून चित्रकूट पर्वताजवळच्या चितोरच्या जितारी राजाचा गुरु होता. याचे हंस व परमहंस हे शिष्य धर्मप्रसारार्थ तिबेटांत गेले असतां मारले गेले (हि. इं. लॉ. पा. ४९-६०).

हरि भिडे—(मृत्यु स. १७७५ सुमार) राघोबाचा अभिमानी. याचा राक्षसभुवनचे लढाईत हात तुटला. नापारच्या लढाईत दगाबाजी केली म्हणून इंग्रजानें श्रीमंतांसमक्ष यास ठार केलें.

हरियदेवी—ही मेवाडच्या अल्लट राजाची पत्नी. ही एका हूण राजाची कन्या होती. हिनें हर्षपुर नांवाचें गांव स. ९७७ मध्यें वसविलें (इंडि. अँटि. भा. ३९, पृ. १९१).

हरिराम—एक गुजराथी कवि. याचीं काव्यें अनेक असून 'सीतास्वयंवर' सर्वांत उत्तम आहे.

हरिराम तर्कवागीश—(स. १६२५ सुमार) हा रघुदेव व गदाधर यांचा गुरु. याचे ग्रंथ-१ तत्त्वचिंतामणिटीकाविचार, २ आचार्यमतरहस्यविचार, ३ रत्नकोशविचार, ४ स्वप्रकाशरहस्यविचार अथवा भट्टमतसिद्धांतविचार (हि. इं. लॉ., पा ४६९).

हरिराय—शिक्षापत्री या ग्रंथाचा कर्ता.

हरिवर्मन् कदंब-(स. ५३७-५५०) हा रविवर्मन् कदंबानंतर बनवासीच्या गादीवर आला. याच्या राज्याभिषेकाचा काळ स. ५३८ असावा (एंप. इंडि. १४. १६६ सांगलीचा लेख पाहा). याच्या कारकीर्दीच्या चवथ्या वर्षी शिवरथ हा उच्छंगी दुर्ग येथें राज्य करीत होता (इंडि. अँटि. ६.३० हल्सी येथील लेख). पहिल्या पुलकेशी चालुक्यानें याचें राज्य घेतलें.

हरिवर्मन् मौखरी—(स. ४७५-५००) मौखरी वंशांतील एक राजा. अनंतवर्मनानंतर हा मगधच्या गादीवर आला. याचें व अनंतवर्मनाचें काय नातें होतें हें मात्र उपलब्ध नाहीं. करिकाल चोल यानें याच्या कारकीर्दीत किंवा याच्या मुलाच्या कारकीर्दीत मौखरींचा चांगलाच पराभव केला. याच्यानंतर याचा मुलगा आदित्यवर्मन् हा मौखरींच्या गादीवर आला. याच्या बायकोचें नांव जयस्वामिनी असें होतें.

हरिश्चंद्र प्रतिहार—यालाच रोहिल्लद्धि असें म्हणत. हा प्रारंभीं कोणा एका राजाचा प्रतिहार म्हणजे द्वाररक्षक होता. याला दोन बायका होत्या. एक ब्राह्मणकन्या होती आणि दुसरी क्षत्रियकन्या होती. हा स्वतः ब्राह्मण होता. क्षत्रियस्त्रीचें नांव भद्रा असून तिला शिलालेखांत राज्ञी असें म्हटलेलें आहे. तिला चार पुत्र होतेः १ भोगभट, २ कक्क, ३ रज्जिल, ४ दद्द. यानें आपल्या पराक्रमानें मांडव्यपुर(मंडोर)चा किल्ला घेऊन त्याला उंच कोट बांधला. हा मंडोरच्या प्रतिहारांचा मूळ पुरुष. याच्यानंतर रज्जिल अधिकारी झाला.

हरिश्चंद्रदेव--(स. १३२४) हा नेपाळांतील भाटगांवच्या सूर्यवंशी घराण्यांतील राजा. यानें स. १३२४ मध्यें नेपाळचें खोरें पादाक्रांत केलें.

हरिश्चंद्रवर्मा--(स. ११७८) माळव्याच्या परमारांपैकीं महाकुमारशाखेंतील लक्ष्मीवर्म्याचा पुत्र. याचे पुत्र उदयवर्मा व देवपाल. यांचें एक दानपत्र पीवलियानगर (भोपाळ राज्यांत) येथें मिळालें त्यांत दोन दानांचा निर्देश आहे (बंगा. ए. सो. ज. ७. ७३६).

हरिषेण—(स. ३८० सुमार) सम्राट् समुद्रगुप्ताच्या पदरचा एक कवि. समुद्रगुप्तानें अनेक राजांचा उच्छेद करून त्यांचा प्रदेश आपल्या राज्यास जोडला, व दक्षिण-हिंदुस्थानावरहि स्वारी केली. या दिग्विजयानंतर त्यानें या आपल्या दरबारी कवीला आपला पराक्रम गद्यपद्यात्मक

काव्यांत वर्णन करावयास सांगून तें वर्णन अशोकाच्या शिलास्तंभावर संस्कृतांत कोरून ठेविलें. तो स्तंभ अद्यापि प्रयागच्या किल्ल्यांत आहे. तो थोडा खराब झाला आहे तरी त्यावरून समुद्रगुप्ताच्या दिग्विजयाची पूर्ण कल्पना येते (गुप्त. इन्स्क्रिप्शन्स नं. १). ही प्रशस्ति चम्पू काव्याचा उत्कृष्ट नमुना आहे. हिचा प्रथमार्ध पद्यांत असून द्वितीयार्ध बहुतेक गद्यांत आहे. गद्यभागांत समासप्राचुर्य असलें तरी एकंदर वर्णन अत्यंत सरस व रमणीय आहे. पद्यें तर फारच उत्कृष्ट आहेत, पण तीं बरींच खंडित झालीं आहेत.

२. (स. ४९०–५२०) वाकाटक घराण्यांतील शेवटचा राजा.

हरिसिंग—(स. १३२० सुमार) मूळचा दाक्षिणात्य, पण नंतर नेपाळचा राजा. यानें महाराष्ट्रांतील तुळजाभवानी नेपाळांत नेऊन स्थापिली. पण ती चितोडहून महाराष्ट्रांत आली असेल. कदाचित् राजपुतान्यांतून तिकडे गेली असावी.

हरिहर—(स. १२५०–१३००) संस्कृत भाषेंतील ग्रंथकार. हा विज्ञानेश्वराचा शिष्य असल्याचा याच्या एका हस्तलिखितांत निर्देश आहे. याचा व्यवहारावर एक ग्रंथ आहे. तसेंच पारस्कर-गृह्यसूत्रावर याची टीका आहे. विज्ञानेश्वराच्या 'अशौच-दशका'वर याची टीका आहे. त्यावरून हा त्याचा शिष्य दिसतो. यानें छंदोगपरिशिष्टप्रकाशावर भाष्य लिहिलें असावें.

हरिहर संगम—(स. १३३६–५५) हा यदुकुळांतील संगमाचा वडील मुलगा. याला कंप, बुक्क, मारप व मुद्दप असे चार भाऊ होते. हे पांचजण विजयनगरच्या राज्याचे संस्थापक होत. या साम्राज्याची स्थापना स. १३३६ मध्यें झाली. त्याला खरें स्थैर्य स. १३४६ मधील चिरस्मरणीय जयोत्सव होईपर्यंत आलें नव्हतें. प्रथम हा तिसऱ्या बल्लाळ होयसळाचा मंत्री व सेनापति होता. तेथेंच याला मुसलमानी राजकारणाचा परिचय झालेला दिसतो. पुढें आनेगुंदीच्या राज्यांत हा प्रमुख झाला. त्याच सुमारास विद्यारण्याशीं याचा परिचय होऊन याला धार्मिक व राजकीय व्यापक दृष्टि प्राप्त झाली. त्यांच्याच नांवानें तुंगभद्रेच्या दक्षिणतीरावर यानें विद्यानगर नांवाचें शहर वसविलें. पण या शहराला अनेक नांवें दिसतात. मुहम्मद तुघ्लकाच्या सरदारालाहि यानें मदत केली होती (स. १३४०). पण येथून पुढें दक्षिणेतील राजांनीं एकी करून मुसलमानांना हाकून देण्याचें यानें धोरण स्वीकारलें. बल्लाळ होयसळानें रामेश्वरापर्यंत मुलूख जिंकून जयस्तंभ उभारला. यानेंहि स्वतंत्रता स्वीकारून पुष्कळ मुलूख काबीज केला. बल्लाळ होयसळ मदुरेचा राजा घियासुद्दीन दामघानीकडून त्रिचनापल्लीजवळ कोप्पमच्या लढाईंत मारला गेला (स. १७४२). तेव्हां यानें होयसळांचा बराच मुलूख काबीज केला व शेवटीं तर त्यांची राजधानी घेऊन त्यांना नामशेष केलें (स. १३४६). हा याच्या साम्राज्याचा खरा आरंभ होय. याच वेळीं वर उल्लेख केलेला जयोत्सव यानें केला, आणि शृंगेरीस जाऊन पुष्कळ दानधर्म केला.

दक्षिणेंतील मुसलमान सरदारांनींहि दिल्लीच्या बादशाहाविरुद्ध बंड पुकारून अलाउद्दीन हसन कांगो बाहमनीच्या नेतृत्वाखालीं गुलबर्ग्यास राज्य स्थापिलें (स. १३४७); आणि हरिहरानें घेतलेल्या मुलखावर आपला हक्क सांगण्यास सुरुवात केली व हक्क स्थापित करण्याकरितां भीमा उतरून सागर बळकाविलें (स. १३५१); आणि आपले सरदार करबजूर, कणबारी व मुधोळ घेण्याकरितां पाठविले. त्यांना तोंड देणें अशक्य झाल्यानें मोठी रक्कम व कृष्णेच्या उत्तरेकडील पुष्कळसा मुलूख देऊन यास तह करावा लागला.

हा आपल्या भावांना प्रेमानें वागवी. त्यांना युवराज प्रांताधिकारी नेमी. मारप (चंद्रगुत्ती), बुक्क (होसपट्टण), कंप (नेल्लूर व कडप्पा), इत्यादि प्रकारें नेमणूक करून हा आनेगुंदी येथें राहून कारभार करी. हा व बुक्क हे विशेष कर्तबगार होते. आपल्या वृद्धावस्थेंत यानें बुक्कावर राज्य सोंपविलें.

२. (स. १३७७–१४०४) पहिला बुक्क व गौरांबिका यांचा हा पुत्र. मुजाहिद बहामनीशीं याचें युद्ध सुरू होतें. त्यांत यास जय मिळाला (स. १३७८). यानें कोंकणांतील बंड मोडून खारेपाटण घेतलें. यानें वरंगळावर जय मिळविला. यानें मुद्गल व रायचूर घेतलें. पण फीरूज बहामनीनें बिनलढाऊ लोकांची कत्तल सुरू करतांच खंडणी देऊन यास तह करावा लागला. याला राजा वाल्मीकी व 'कर्नाटकविद्याविलास' म्हणत. याची राणी मल्लांबिका. दुसरी राणी पंपा. हा शांकरमतानुयायी होता तरी यानें जैनांना देणग्या दिल्या आहेत.

हरिहर भट्टाचार्य—(स. १५५९–६० सुमार) हा प्रसिद्ध बंगाली पंडित रघुनंदनाचा पिता होय. याचा ज्योतिषावर 'समयप्रदीप' नांवाचा ग्रंथ आहे.

हरीश्वर—(स. ११६५ सुमार) कानडी कवि. वीरशैव. गांव हळेबीड.

ग्रंथ–गिरिजाकल्याण, पंपाशतक, इत्यादि.

नरसिंह बल्लाळ होयसळाच्या (स. ११४१–११७२) वेळीं हा कुलकर्णी (कर्णिक) होता. याचा गुरु हंपीचा मायदेव. याचा भाचा प्रसिद्ध राघवांक कवि. याच्याच वेळीं केरेय पद्मरस हा मंत्री होता. वीरशैव (लिंगायत) कवींपैकीं हा आद्य म्हणतां येईल. तसाच हा कवि म्हणूनहि श्रेष्ठ दर्जाचा आहे (क. क. च. भा. १, पा. २२५).

हर्ष—(हर्षवर्धन पाहा).

हर्षगुप्त—नेपाळच्या गोपाळघराण्यांपैकीं परमगुरूचा पुत्र.

२. (आदित्यवर्मन् मौखरी व आदित्यसेन पाहा).

हर्षगुप्ता—ही कनोजचा दुसरा राजा आदित्य मौखरी याची पत्नी. ही हर्षगुप्ताची बहीण असावी.

हर्ष चंदेल्ल—(स. ९१०–९३०) राहिलनंतर त्याचा मुलगा हर्ष राज्य करूं लागला. याचा विवाह चाहमान कुलांतील कंचुका नामक कन्येशीं झाला होता. वि. सं. १०५३च्या एका लेखांत हर्षाला व त्याचा पुढें पराक्रमी झालेला मुलगा यशोवर्मा याला परमभट्टारक व परमेश्वर अशीं विशेषणें लावलीं आहेत. यावरून हर्ष हाच चंदेल्लचा पहिला स्वतंत्र राजा झाला असें अनुमान निघतें.

हर्षमती—तंत्रशास्त्रज्ञ प्रेमविधीची सासू. हर्षदेवाची पत्नी.

हर्षमिश्र—शांकरमतानुयायी पंडित. पंचदशींत याचा निर्देश आहे.

हर्ष लोहर—(स. १०८९–११०१) काश्मीरच्या लोहर घराण्यांपैकीं कलशाचा मुलगा. कलशानें आपला पिता अनंतदेव याचीं सर्व संपत्ति मुद्रा करून याच्या नांवची करून ठेवली होती. कांहीं लोकांच्या सल्ल्यानें यानें बापाविरुद्ध बंड केलें. बंड लवकरच मोडलें गेलें व याला बंदिवास पत्करावा लागला. विषप्रयोगांतून हा बचावला. अशा स्थितींतहि कलशाच्या मनांत यालाच गादीवर बसवावें असें होतें. पण नोनक नांवाच्या मंत्र्यानें उत्कर्ष नांवाच्या याच्या भावाला गादीवर बसविलें. पण विजयमल्ल नांवाच्या याच्या तिसऱ्या भावानें खटपट करून उत्कर्षाला पराभूत करून ठार केलें व याला बंधमुक्त करून गादीवर बसविलें. हर्षानें सर्वांशीं चांगलेपणानें वागून उत्तम राजा म्हणून लौकिक मिळविला.

याचा दरबार म्हणजे विद्वानांचें आश्रयस्थान झाला. कलशाच्या वेळीं देशत्याग करून कर्नाटकांत विक्रमादित्य पश्चिम चालुक्याच्या आश्रयाला जाऊन राहिलेल्या, तेथें विद्यापति म्हणून सन्मान पावलेल्या आणि ज्याचा हत्ती तेथील सैन्याच्या अग्रभागीं चालत असे त्या बिल्हण पंडितालाहि हर्षाच्या औदार्याची वार्ता ऐकून आपण व्यर्थ काश्मीर सोडलें असें वाटलें (रा. त. ७. ९३५–९३७). याचा सर्व वेळ शास्त्रीय वाद, नृत्यगायन यांत जात असे. पण लवकरच याच्या वैभवाचे दिवस संपले.

याला राज्य मिळवून देणारा याचा भाऊ विजयमल्ल यानें राज्यलोभानें बंड उभारलें. बंड लवकरच मोडलें गेलें आणि विजयमल्ल पळून गेला. पण यामुळें हर्षाच्या भोंवतालची सर्व परिस्थिति पालटली व जिकडेतिकडे संशयाचें वातावरण सुरू झालें. भोज नांवाचा याचा एक पुत्र होता त्याबद्दलहि यास संशय आला, तेव्हां तोहि पळून गेला. लवकरच याच्याच घराण्यांतील उच्चल नांवाच्या याच्या आप्तानें बंड उभारलें व याचा पाडाव केला. हर्षाच्या सैन्याची वाताहात होऊन राजधानी उच्चलाच्या ताब्यांत आली, तेव्हां याच्या राण्यांनीं स्वतःला जाळून घेतलें. आणि हा आपल्या विश्वासू सेवकांसह तेथून निसटून एका मठांत लपून राहिला. पण उच्चलाच्या हेरांनीं तेथेंहि याचा पाठलाग करून मठाला वेढा दिला. तेव्हां मात्र हा अगदीं निराश झाला. या वेळीं याला अशी बातमी समजली कीं आपल्या या दुर्दशेबद्दल सूड घेण्याकरितां आपला मुलगा परदेशाहून परत येत असतां वाटेंत युद्धांत मारला गेला. अशा रीतीनें चहूंकडून निराशा झाल्यामुळें हा शत्रूवर तुटून पडला आणि मृत्यु पावला. याच्या प्रेताचें दहन करण्यास कोणी दयाळु पुरुष पुढें आला असतां त्याला मोठ्या नाखुषीनें परवानगी दिली गेली. शेवटीं एखाद्या भिकाऱ्याप्रमाणें याचा दहनविधि पार पडला. याच्या मृत्यूमुळें काश्मीरांत पहिल्या लोहर घराण्याचा अंत होऊन उच्चलाच्या सातवाहन घराण्याची काश्मीरांत स्थापना झाली.

हर्षवर्धन–(मृत्यु स. ६४८) हा बैसवंशी रजपुतांपैकीं प्रभाकरवर्धनाला यशोमतीपासून झालेला दुसरा मुलगा. याला श्रीहर्ष, हर्ष व शीलादित्य असेंहि म्हणत असत. हा आपला भाऊ राज्यवर्धन याला बंगालच्या नरेंद्रगुप्तानें (शशांकानें) ठार मारल्यानंतर गादीवर आला. गादीवर आल्याबरोबर यानें आपल्या थोरल्या भावाला विश्वासघातानें मारणाऱ्या बंगालच्या नरेंद्रगुप्ताला मारण्याचा संकल्प केला, आणि आपला सेनापति सिंहनाद व स्कंदगुप्त यांच्या संमतीनें 'माझे मांडलिक व्हा, नाहींतर युद्धाला तयार व्हा' अशा अर्थाचीं पत्रें धाडलीं. दिग्विजयाकरितां हा निघाला आणि पहिला मुक्काम ठाणेश्वर

या आपल्या राजधानीपासून थोड्या अंतरावर सरस्वतीच्या तटावर गेला. तेथें प्राग्ज्योतिष (बंगाल्यांतील राजशाही जिल्ह्यांतील नगर) च्या भास्करवर्मा (कुमार) नांवाच्या राजानें पाठविलेल्या हंसवेग नांवाच्या दूतानें याला छत्र नजर केलें; आणि प्रार्थना केली कीं, भास्करवर्मा आपल्या मैत्रीची इच्छा करतो. तेव्हां यानें त्याचें म्हणणें मान्य करून त्याला समक्ष भेटीला बोलाविलें. तेथून कांहीं मैल पुढें गेल्यावर भंडि नांवाचा मंत्री याला येऊन मिळाला व त्यानें मालवराजाकडून आणलेली लूट याला नजर केली व राज्यश्री कनोजमधील कैदखान्यांतून निघून विंध्याटवीकडे गेल्याचें निवेदन केलें. हें ऐकतांच यानें भंडीला गौडराजाचें पारिपत्य करण्यास धाडलें व आपण विंध्याटवीकडे गेला. तेथें बहिणीला घेऊन याष्टिग्रह नांवाच्या स्थानावर आला (हर्षचरित ३-६-७). सारखे तीस वर्षपर्यंत दिग्विजय व युद्ध करून यानें काश्मीरपासून आसामपर्यंत आणि नेपाळपासून नर्मदेपर्यंतचा मुलूख आपल्या स्वामित्वाखालीं आणला. दक्षिण हिंदुस्थानहि यानें जिंकण्याचा प्रयत्न केला पण बदामीच्या चालुक्यांपैकीं दुसऱ्या पुलकेशीनें याचा पराभव केला. म्हणून ती गोष्ट साधली नाहीं (आहोळेचा शिलालेख एपि. इंडि. भा. ६, पृ. ६; इंडि. अँटि. भा. ७, पृ. १६३). हुएन्त्संग या चिनी प्रवाशानेंहि या याच्या पराजयाचा निर्देश केला आहे. याची राजधानी ठाणेश्वर आणि कनोज हीं दोनहि स्थलें होतीं. आपल्या भावाला ठार करणाऱ्या शत्रूचा नाश करीपर्यंत आणि आपल्या भोंवतालचे प्रदेश ताब्यांत घेईपर्यंत उजव्या हातानें जेवण करायचें नाहीं अशी यानें प्रतिज्ञा केली होती, असें हुएन्त्संग म्हणतो. ५००० हत्ती, २०००० स्वार, व ५०००० पायदळ इतक्या सैन्यासहित यानें सारखें सहा वर्षें युद्ध करून पंजाब, सिंध, मध्यप्रदेश, बंगाल, गुजराथ आणि राजपुताना हे प्रदेश आपल्या ताब्यांत घेतले. राज्य वाढल्यावर यानें सेनाहि वाढविली. हत्ती ६००० ठेवले व एक लक्ष स्वार वाढविले. तीस वर्षांनंतर याच्या शस्त्रांनीं विश्रान्ति घेतली व यानें शान्तिपूर्वक धर्मप्रचाराकडे लक्ष दिलें. सर्व राज्यांत जीवहिंसा व मांसभक्षण यांना मनाई केली. याच्या हुकुमांना न मानणारास प्राणदंड होई. प्रत्येक रस्त्यावर धर्मशाळा, अन्नपाणी व औषधें यांची व्यवस्था असे. प्रत्येक पांचव्या वर्षी हा 'मोक्षमहापरिषद्' प्रयाग येथें भरवीत असे व आपला सर्व खजिना दान करून टाकी. धर्मगुरूंमध्यें वादविवाद करवून ते स्वतः पारखीत असे. तेथें हा विद्वानांचा सत्कार करून सदाचारी लोकांना उत्तेजन देत असे. वि. सं. ७०१ (स. ६४४) च्या सुमारास यानें प्रयाग येथें धर्ममहोत्सव केला होता. त्यांत मोठाले वीस राजे सामील होते (बील–बुद्धिस्ट रेकार्डस् ऑफ दी वेस्टर्न वर्ल्ड, भा. १, पृ. २१३–१९). प्रयाग येथें यानें पहिल्या दिवशीं बुद्धाचा पुतळा, दुसऱ्या दिवशीं बापाची उपास्य देवता सूर्याची प्रतिमा व तिसऱ्या दिवशीं शिवाची प्रतिमा दिली असें हुएन्त्संग म्हणतो.

हा योद्धा होता तसाच विद्वान्हि होता. यानें रचलेली रत्नावलिः, प्रियदर्शिका व नागानंद हीं नाटकें याच्या विद्वत्तेची साक्ष देत आहेत. हीं नाटकें यानें धावक नांवाच्या कवीकडून लिहविलीं असें काव्यप्रकाशांतील एका वाक्यावरून लोक समजत आले आहेत. पण शोधान्तीं तें वाक्यच प्राचीन हस्तलिखितांत सांपडत नाहीं (डॉ. बुल्हरचे शोध, पा. ६९). बाणाला यानें विपुल संपत्ति दिल्याचे निर्देश हर्षचरित्रांत व इतरत्र आहेत (हर्षच. उ. २, पा. ८२). आणि बाणानें याला उत्तम विद्वान् म्हणून वाखाणिलें आहे. जसा हा विद्वान् होता तसाच चित्रकलेंतहि निष्णात होता. बंसखेडा येथें मिळालेल्या याच्या दानपत्रांत यानें आपलें हस्ताक्षर चित्रलिपींत केलें आहे (एपि. इंडि. भा. ४, पृ. २१०; तेथें याच्याजवळच्या फोटोंत राजाचें हस्ताक्षरहि आहे). हा विद्वानांचा चाहताहि होता. बाणभट्टानें हर्षचरित लिहून यांचें व आपलें नांव अमर केलें आहे. बाणभट्टाच्या हातून अपुरी राहिलेली त्याची कादंबरी पुरी करणारा त्याचा पुत्र पुलिंदभट्ट (पुलिन) हाहि याचा आश्रित होता. सूर्यशतककर्ता मयूर, मातंग व दिवाकर हे याचे आश्रित होत असें राजशेखरानें सूक्तिमुक्तावलींत म्हटलें आहे. वासवदत्ताकार सुबंधु व भक्तामरस्तोत्रकर्ता मानतुंगाचार्य जैन हेहि याच्याच वेळीं झाले.

याच्या मुलीचें लग्न वलभीपुरच्या (वळा, काठेवाड) ध्रुवभटा(दुसरा ध्रुवसेन)शीं झालें होतें असें चिनी यात्रेकरू हुएन्त्संग लिहितो.

यानें चीनच्या बादशहाकडे आपला एक ब्राह्मण राजदूत पाठविला होता. तो तेथून वि. सं. ७०० (स. ६४३) मध्यें परत आला. त्याच्यासह चीनच्या बादशहानेंहि आपलें दूतदल याच्या दरबारीं पाठविलें होतें. पुनः दुसऱ्यांदा चीनच्या बादशहानें आपलें दूतदल पाठविलें होतें. त्याचा मुख्य वंगहुएन्त्से होता (स. ६४७). पण तो मगधांत पोंचण्यापूर्वीच वि. सं. ७०५ (स.६४८) च्या सुमारास याचा देहान्त झाला. याचा सेनापति अर्जुन (अरुणाश्व) यानें राजसिंहासन ताब्यांत घेऊन चिनी यात्रेकरूंना लुटलें व कांहीं चिनी शिपाई मारले गेले. या

वेळीं वंगहुएन्त्से आपल्या लोकांसह नेपाळांत पळाला. थोडक्यांच दिवसांत तो नेपाळ व तिबेट येथील सैन्य घेऊन आला असतां अर्जुन पळाला. पण त्याला पकडून वंगहुएन्त्सेनें त्याला चिनांत नेलें (चवन्नेज 'मेमॉयर,' पृ. १९, टिप्पणी २). या प्रकारें हर्षवर्धनानें स्थापन केलेलें राज्य त्याच्याबरोबर लुप्त झालें व सर्व मांडलिक स्वतंत्र होऊन बसले.

वि.सं.६६४(स.६०७) मध्यें याला राज्याभिषेक झाला. त्या वेळीं यानें आपल्या नांवाचा संवत् सुरू केला. तो हर्ष किंवा श्रीहर्ष या नांवानें प्रसिद्ध आहे. अनुमानतः तो ३०० वर्षे चालून लुप्त झाला. राजपुतान्यांत हर्ष-संवत् असलेले शिलालेख मिळाले आहेत (अजमेरचा राजपुताना म्युझियम्, स. १९१६-१७ चा रिपोर्ट, पृ. २, ले. सं. १).

हा प्रथम शिवाचा भक्त होता. पण बौद्धधर्मावर अधिक श्रद्धा असल्यामुळें हा मागाहून बौद्ध झाला असावा. याच्या मागून या घराण्याचा संगतवार इतिहास मिळत नाहीं. अयोध्या प्रांतांत बैसवाडा हा भाग बैसवंशी रजपुतांचें मुख्य स्थान आहे. त्यांतील तिलकचंदी बैस आपणांस मुख्य समजतात.

हलायुध—(स. ७६०-८० सुमार) हा पहिल्या कृष्ण राष्ट्रकूटाच्या दरबारीं होता. याचे ग्रंथः-१ अभिधानरत्नमाला (हलायुधकोश), २ कविरहस्य, ३ मृतसंजीवनी (पिंगलाच्या छंदःशास्त्रावरील टीका). मृतसंजीवनींतील प्राकृत भाषेंतील उदाहरणें ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाचीं आहेत.

२. (स. ११७८ सुमार) हा धनंजयाचा पुत्र. मातेचें नांव उज्वला. याचा ग्रंथ-ब्राह्मणसर्वस्व. या ग्रंथांत काण्वशाखेला उपयुक्त अशा मंत्रांची यानें व्याख्या केली आहे. यानें शैवसर्वस्व, वैष्णवसर्वस्व, मीमांसासर्वस्व व पंडितसर्वस्व असे ग्रंथ केले. याचा द्विजनयन नांवाचाहि एक ग्रंथ आहे. हा बंगालच्या लक्ष्मणसेनाच्या दरबारीं न्यायाधीश होता. याचे ग्रंथ सर्वमान्य आहेत. याचे बंधु ईशान व पशुपति हेहि ग्रंथकार होते.

३. (स. ११५०-१५०९ सुमार) प्रकाश नांवाच्या ग्रंथाचा कर्ता. हा ग्रंथ कात्यायनाच्या 'श्राद्धकल्पसूत्रां'-वरील टीका आहे. याचा पिता संकर्षण.

४. (स. १०००-११०० सुमार) हा मैथिल किंवा बंगाली असावा. हा मोठा धर्मशास्त्रज्ञ असून याचे संस्कृत भाषेंत कांहीं ग्रंथहि असावेत, असें अनेक ग्रंथांत येणाऱ्या याच्या उताऱ्यांवरून दिसतें. मिताक्षरेवरील टीका याची असावी.

हसन—(स. १७३५-८५) एक ऊर्दू कवि. याचें नांव गुलाम हसन व बापाचें नांव मीर गुलाम हुसेन 'जाहक'. हे मूळचे हिरातचे पण पोट भरण्यास इकडे आले. लखनौस कवि म्हणून याचा मोठा सन्मान झाला. हा उत्कृष्ट कवि होता. 'सहरुल्बयान' हा याचा कथाग्रंथ प्रसिद्ध आहे. याचा दीवान (कवितासंग्रह) नवलकिशोर प्रेसनें प्रसिद्ध केला आहे (क. कौ. ४).

हसन कांगो किंवा **गंगू बाहमनी**—(स. १३४७-५८) हा दक्षिणेंतील गुलबर्ग्याच्या बाहमनी राज्याचा संस्थापक होय. यानें गादीवर बसल्यावर अलाउद्दीन अशी पदवी धारण केली. आपल्या मूळ उपकर्त्याचें नांव गंगू ब्राह्मण हेंहि कृतज्ञता दाखविण्याकरितां आपल्या नांवापुढें लावलें, म्हणून याचें नांव अलाउद्दीन हसन गंगू बाहमनी असें लिहिलें जातें. मधल्या घालमेलींच्या काळांत यानें जाफरखान अशी पदवी संपादन केली.

हा दिल्ली येथील गंगू नांवाच्या ब्राह्मणाच्या येथें गुलाम होता. या गंगू ब्राह्मणावर मुहम्मद तुघ्लकाची मेहेरबानी होती. फेरिस्त्यानें कांगो नांवाच्या ब्राह्मण जोशाच्या पदरीं हा नोकरीस होता असें म्हटलें आहे. एका बखरींत गंगरसपंत देशपांड्याकडे मिरजेस हा नोकर होता असेंहि आढळतें. हा अत्यंत इमानीपणें वागे, त्यामुळें यानें गंगूचा लोभ संपादन केला होता. एकदां याची पत्रिका पाहून याला राजयोग असल्याचेंहि त्यानें सांगितलें होतें.

याला अलाउद्दीन हसनशहा कांगो बाहमनी ही पदवी बंडखोरांचा पुढारी इस्मायल यानें दौलताबादेचा सुलतान झाल्यावर दिली.

२. (स. १४७२-८५) काश्मीरच्या हाजीखानाचा पुत्र. नंतर याचा पुत्र मुहम्मद गादीवर आला.

हसन खुस्रवखान—(स. १३१६-२९) हा मूळचा हिंदु भंगी असून बाटून मुसलमान झाला आणि दिल्लीचा बादशहा मुबारक खल्जीचा नोकर बनला. लवकरच याला तेथें अग्रस्थान मिळालें. मदुरा जिंकण्याकरितां याची योजना झाली (स. १३१८), पण ७०० मैलांचें अंतर सात दिवसांत पुरें करून यास मेण्यांतून दिल्लीस परत आणलें. इतकी मुबारकची यावर मर्जी होती. सैन्यांतले लोक याचे हुकूम मानीत नसत म्हणून यानें भंगी जातीच्या लोकांचें स्वतंत्र सैन्य उभारलें. त्यांत गुजराथेंतील ४०००० लोक होते. यावर मुबारकाची अत्यंत मर्जी असल्यानें रात्रीहि यास राजवाड्यांत राहावें लागे. कांहीं सबब सांगून संध्याकाळींच राजवाड्याच्या किल्ल्या यानें ताब्यांत घेतल्या आणि आंत आपले लोक भरले व रात्रीं मुबारकाचा

यानें खून केला, आणि राज्य बळकावलें. जिकडेतिकडे मुसलमानी धर्माचा उच्छेद करून हिंदुधर्माला पाठिंबा देण्यास सुरुवात केली, आणि मुसलमानांचा सूड घेतला. पण लवकरच याचा खून झाला.

हसनखान फारुकी—(स. १५०८) खानदेशच्या फारुकी घराण्यांतील पहिल्या मुबारकखानचा हा मुलगा होय.

हसनशाह फारुकी—(स. १५७६–७७) खानदेशच्या फारुकी घराण्यांतील दुसऱ्या मुहम्मदशाहचा पुत्र.

हस्तामलक—(स. ८५० सुमार) आद्य शंकराचार्यांच्या चार शिष्यांपैकीं एक. कश्मीरचा आचार्याच्या सूचीपत्रांत ऋग्वेदाचा भाष्यकार म्हणून याचें नांव आहे. हा प्रभाकरमिश्राचा पुत्र होता असें म्हणतात (जर्नल ऑफ ओरिएण्टल रीसर्च, मद्रास, सन १९२९, पृ. ३९–५६). याचें एक स्तोत्र प्रसिद्ध आहे.

हंबीरराव मोहिते—(मृत्यु स. १६८७ डिसेंबर) याचें मूळ नांव हंसाजी मोहिते असें असून स. १६७४ पावेतों हा शिवाजीच्या सैन्यांत पंचहजारी सरदार होता. परंतु विजापूरकरांच्या सैन्यावर प्रतापराव गुजर तुटून पडला असतां तो पडला, पण हंसाजीनें प्रसंगावधान राखून पळणाऱ्या सैन्यास प्रोत्साहन देऊन मुसलमानांचा पाडाव केला. तेव्हां शिवाजी खूष होऊन याला 'हंबीरराव' असा किताब दिला, व प्रतापरावाच्या जागीं याची नेमणूक केली, असें सभासदी बखरींत म्हटलें आहे. पण यापूर्वीच्या भिकूजी मोहिते यासहि 'हंबीरराव' हा किताब आढळतो (ऐ. फा. सा. खं. २ पा. ३-४ टीप). याचें मूळ उपनांव चव्हाण. हंबीररावानें स. १६७५ सालीं मोंगलांचा मुलूख लुटून मिळालेली लूट सुरक्षित रायगडीं पोंहचती केली. पुढच्या वर्षी हुसेनखान मायणाचा पराभव केला व पुष्कळ लूट मिळविली.

शिवाजी स. १६७८ त कर्नाटकांतून परत आला असतां त्यानें हंबीररावास व्यंकोजीजवळ ठेविलें होतें. व्यंकोजीची व याची एक लढाई झाली, परंतु शिवाजीची व व्यंकोजीची तडजोड झाल्यावर हा परत महाराष्ट्रांत यावयास निघाला. वाटेंत विजापूरच्या सैन्याचा पराभव करून कृष्णा व तुंगभद्रा यांमधील दुआब प्रांत जिंकला. स. १६७९ त मोंगलांकडे पळून गेलेल्या संभाजीचा पाठलाग करण्याकरितां याची रवानगी झाली. परंतु हा जाण्यापूर्वीच संभाजी दिलेरखानाच्या छावणींत सुखरूप पोंहचला होता. पुढें याला मोगलांच्या विरुद्ध आदिलशाहाच्या मदतीस पाठविलें. यानें रणमस्तखानाचा पराभव केला; व विजापुरास वेढा देऊन बसलेल्या दिलेरखानाच्या सैन्याभोंवतीं फिरून त्यांना अन्नाची इतकी उणीव भासविली कीं पावसाळा संपल्याबरोबर दिलेरखानानें वेढा उठविला.

शिवाजीनंतर हा संभाजीच्या पक्षास येऊन मिळाला. याच्यामुळेंच संभाजीस ताबडतोब गादी मिळाली, व सोयराबाईकडील प्रमुख माणसांस यानेंच संभाजीच्या स्वाधीन केलें; व कोल्हापूरजवळ शहाअलम याचा यानें पराभव केला. स. १६८४ मध्यें औरंगझेबानें आपली छावणी अहमदनगरास आणल्यामुळें हंबीरराव अचानक बऱ्हाणपुरास जाऊन यानें तेथें मोकळ्या पडलेल्या खानदेशांतील खंडणी गोळा केली. शेवटीं स. १६८७ त हंबीरराव व सरदार सर्जाखान यांची वाईजवळ लढाई होऊन तींत मोंगलांचा पराभव झाला, पण हंबीरराव घायाळ होऊन मरण पावला.

हंमीर गुहिलोत—(मृत्यु स. १३६४) हा मेवाडच्या सीसोदिया राणा शाखेपैकीं अरिसिंहाचा पुत्र. याचा बाप अरिसिंह व आजा लक्ष्मसिंह हे सर्व अलाउद्दीन खल्जीनें चितोडवर केलेल्या स्वारींत मारले गेले होते. शिवाय याचे सात चुलतेहि त्याच लढाईत कामास आले. फक्त याचा चुलता अजयसिंह हा जखमी होऊन सिसोदें येथें परत आला, आणि सिसोदें येथील जहागिरीचा मालक झाला. त्याला सज्जनसिंह आणि क्षेमसिंह असे दोन पुत्र होते.

अरिसिंहानें चंदाणे रजपूत जातीच्या एका गरीब कुळांतील पण अत्यंत सशक्त अशा स्त्रीशीं बापाला न कळत लग्न लावलें होतें. उनवा गांवीं शिकारीच्या मिषानें हा तिच्याकडे जाऊन राही. तिच्यापासून त्याला हंमीर नांवाचा मुलगा झाला.

अरिसिंह मारला गेल्यावर अजयसिंहाला ही गोष्ट कळली तेव्हां त्यानें अजोळाहून हंमीराला बोलावून घेतलें. याच वेळीं जोधपूर भागांतील गोडवाड जिल्ह्यांत मूंजा नांवाच्या 'बालेचा' रजपुतानें लूटमार चालविली होती. त्यावर अजयसिंहानें आपले दोन पुत्र पाठविले, पण त्यांच्याकडून त्याचा बंदोबस्त झाला नाहीं. तेव्हां त्यानें तें काम अल्पवयी पण वीरप्रकृतीच्या हंमीरावर सोंपविलें. हंमीरानें काम अंगावर घेतलें तेव्हां मूंजा गोडवाडच्या नजीक सामेरी गांवीं उत्सवाला गेला होता. हा तेथें गेला आणि त्याचें डोकें कापून यानें आपल्या चुलत्यापुढें आणून ठेविलें. हा पराक्रम पाहून अजयसिंह अत्यंत खूष झाला,

आणि आपला उत्तराधिकारी म्हणून रक्ताचा टिळा याच्या कपाळीं लावला. वास्तविक हा अरिसिंहाचा पुत्र म्हणून उत्तराधिकारी होताहि. पण ही गोष्ट अजयसिंहाच्या मुलांना खपली नाहीं, आणि ते दोघेहि मेवाड सोडून दक्षिणेकडे चालते झाले. मेवाडच्या ख्याताप्रमाणें सज्जनसिंह व क्षेमसिंह या दोन भावांपैकीं सज्जनसिंहाच्या वंशांत गोब्राह्मणप्रतिपालक छत्रपति शिवाजीमहाराज जन्मास आले. मुधोळच्या बाजी घोरपड्याचें घराणें यांपैकींच होय.

अजयसिंग मेल्यावर हा सिसोदें येथील जहागिरीचा मालक झाला. याच्या वीर, साहस आणि निर्भीक प्रकृतीला मेवाडचें राज्य दुसऱ्याकडे गेलेलें पाहवणें शक्य नव्हतें. यानें त्या राज्यांत धुमाकूळ घालण्यास सुरुवात केली. अलाउद्दीन खल्जीच्या शेवटच्या दिवसांत दिल्लीची बादशाही दुर्बल झाली होती, आणि बादशहा मेल्यावर तर तेथें अधिक बखेडा सुरू झाला. त्यामुळें आपलें राज्य परत घेण्याची याला प्रबल इच्छा झाली. यानें मालदेवाचा मुलूख आपल्या राज्याला जोडण्यास प्रारंभ केला. याच्याशीं मेळ करावा म्हणून त्यानें आपली मुलगी याला देऊन पुष्कळसा मुलूख याला देकार म्हणूनहि दिला. पण यानें त्याच्या मरणानंतर त्याचा पुत्र जेसा किंवा जयसिंग याला पदच्युत करून चितोडचें राज्य ताब्यांत घेतलें आणि मेवाडवर पुनः गुहिलवंशाची सत्ता सुरू झाली ती आजपर्यंत आहे (स. १३२६ सुमार).

राव मालदेवाचा पुत्र जेसाच्या ताब्यांतून मेवाड गेल्यावर तो दिल्लीचा बादशहा सुलतान मुहम्मद तुघ्लक याच्याकडे गेला आणि त्याच्याकडून हंमीरावर स्वारी करवली. पण या लढाईंत बादशाही सैन्याचा पराभव झाला आणि बादशहाला तीन महिने चितोड येथें कैदेंत राहावें लागलें व शेवटीं पन्नास लाख रुपये, शंभर हत्ती, व कांहीं मुलूख देऊन सुटका करून घ्यावी लागली, असें कर्नल टॉड म्हणतो. ही लढाई सिंगोली गांवाच्या आसपास झाली. या विजयामुळें मेवाडच्या राज्यावर हंमीरचा पुरा ताबा बसला. याचा परिणाम मालदेवाच्या तिसऱ्या पुत्रावर होऊन त्यानें बादशहाची सेवा सोडून हंमीरची सेवा पत्करली. या पुत्राचें नांव वणवीर असें होतें, व त्याचा पुत्र रणवीर होय.

यानें जीलवाडा (चेलाख्यपुर) जिंकला आणि डोंगरांतील भिल्ल शत्रूंना युद्धांत ठार केलें, व पालनपुर जाळून टाकलें असें महाराणा मोकलच्या शृंगी ऋषि येथील शिलालेखावरून दिसतें (स. १४२८). जीलवाड्याच्या राजाचें नांव राघव असें एकलिंगमाहात्म्यांत दिलें आहे. तसेंच यानें ईडरचा राजा जैत्रकर्ण यास जिकलें व ठार केलें होतें. एकलिंगमाहात्म्यांत ईडरचें संस्कृतीकरण इलादुर्ग असें केलें आहे. यानें बांग्याच्या हाडा देवीसिंहाला बुंदी आपल्या सैन्याच्या सहायानें मिळवून दिली (स. १३४१). यानें चितोड येथील अन्नपूर्णेचें मंदिर व कुंड बांधलें (भावनगर इन्स्क्रिप्शन्स्, पृ. ९७, श्लो. १६).

याला खेता (क्षेत्रसिंह), लूंणा, खंगार, बैरसल (वैरीसाल) असे चार पुत्र होते. लूंणाचे वंशज लूंणावत सीसोदिये होत.

२. (स. १७७३-७८) हा अल्पवयी गादीवर बसला व अपघातानें मेला. याच्या वेळीं महादजी शिंदे वगैरे मराठ्यांनीं मेवाडांतून अगणित संपत्ति नेली.

हंसदास (राज)—(समाधि स. १८५५) याचें मूळ नांव नारायण असें होतें. हा परभणी येथील ऋग्वेदी ब्राह्मण. परमहंस-दीक्षा घेतल्यावर यास हंसराज हें नांव मिळालें. हे रामदासी होते. पहिले हंस आदिनारायण, त्यांच्यापासून सातवे हंस श्रीसमर्थ व त्यांच्यापासून हे सातवे हंस नारायण हंस ऊर्फ हंसराज होत असें मानण्यांत येतें. हे शके १७७७ त समाधिस्थ झाले. यांचे ग्रंथः— वेदेश्वरी (शिवगीताटीका), कथाकल्पलता, आगमसार, सदाचारटीका, लघुवाक्यवृत्तीटीका, चूडालाख्यान (२२ शतकें), संकेतकुबडी, ईशावास्योपनिषद् टीका, तत्त्वझाडा, (गद्य), अनुभवामृतटीका, (रचना श. १७७१ सौम्य, विजयादशमी), हंसकोश, वेद नांवानें लिहिलेलीं पदें, अभंग इत्यादि (सं. सू.).

हंसपाल गुहिलोत—(स. १०८८-११०३) मेवाडच्या गादीवर वैरटानंतर हंसपाल आला. राणपुरच्या मंदिरावरील शिलालेखांत याचें नांव वंशपाल दिलें आहे.

हंसाजी मोहिते—(हंबीरराव मोहिते पाहा).

हाजी इल्यास शम्सुद्दीन—(स. १३५१-५७) बंगालचा राजा. मुहम्मद व फीरूज तुघ्लक यांनीं याशीं लढण्याचा प्रयत्न केला, पण त्यांना यश आलें नाहीं. यानें आपलें ठाणें लखनावती होतें त्याचें नांव गौड असें ठेविलें. पुढें त्या शहरास जन्नताबाद म्हणजे 'स्वर्गनगर' असें नांव मिळालें. पांडवा म्हणून एक जुनें शहर होतें त्यास फीरूजाबाद असें नांव दिलें. हीच बंगाल्यांतील पठाणांची राजधानी होती. हा भांग पीत असे म्हणून यास भांगरा असें नांव मिळालें होतें. यानंतर याचा पुत्र सिकंदर गादीवर आला.

हाजी शम्सुद्दीन इल्यास भंगर—(हाजी इल्यास शम्सुद्दीन पाहा).

हाजीखान हैदरशाह—(स. १४७०) काश्मीरच्या शादीखानाचा पुत्र. हा गादीवर आल्यानंतर एक वर्षात मारला गेला.

हाजी मौला—(स. १३००) अलाउद्दीन खल्जी रणथंभोरकडे गुंतला असतां यानें दिल्लींत बंड केलें. पण याला व याच्या साहाय्यकांना ठार करून दिल्ली ताब्यांत घेण्यांत आली.

हाजी सय्यद सरसरी—(स. १३४४) ईजिप्तमधील खलीफा अबासीद अल् हकीम (२) याचा वकील. यानें मुहम्मद तुघ्लकाचें राज्यपद मान्य केल्याचें खलिपाचें पत्र आणलें. याचा दिल्लींत बादशाही सन्मान झाला. शुक्रवारी झालेल्या प्रार्थनेंत खलिपानें मान्य केलेल्या सुलतानांचा यानें नामनिर्देश केला. नाण्यावर खलिपाचें नांव खोदण्याचा परिपाठ या वेळीं सुरू झाला (अलाउद्दीन तर्माशिरीन घियासुद्दीन मुहम्मद पाहा).

हातिम (स. १६९८-१७९१) ऊर्दू व फार्सी कवि. याचें नांव शेख जहूरुद्दीन हातिम. हा दिल्लीचा राहणारा होता. हा प्रथम शिपाईगिरी करी. नंतर हा फकीरी बाण्यानें राही व कविता करी. याच्या पंचेचाळिस शिष्यांपैकीं सौदा हा सर्वत्र प्रसिद्ध आहे. याचा दीवान (कवितासंग्रह) प्रथम फार मोठा होता. त्यांपैकीं निवडक कवितांचा ' दीवाण जादा ' नांवाचा संग्रह यानें केला. प्रथम हा 'रम्जा' असें नांव लावी.

हार्ता—(स. १५२० सुमार) सिंधुनदीवरील नीलाब प्रांतांतील गख्खर लोकांचा पुढारी. हा आपला चुलतभाऊ तातार यास ठार करून राजा झाला. हा बाबरला शरण गेला.

हाफिज—(मृत्यु स. १३९१) एक फार्सी महाकवि. याचें नांव मुहम्मद शम्सुद्दीन. हा इराणमधील शिराजचा राहणारा. हा शियापंथी होता. याच्या ग्रंथावरून लोक प्रश्न पाहतात. याच्या शिराज येथील कबरस्थानास 'खाके मुसल्ला' असें म्हणतात. याचीं कवितेचीं अनेक पुस्तकें असलीं तरी याच्या गज्जलाचा संग्रह अत्यंत लोकप्रिय आहे. हा इराण येथील लोकप्रिय कवि असून तेथें याच्या कविता लोकांच्या तोंडीं आहेत. याची कविता भक्तिप्रधान आहे असें कांहींना वाटतें, तर कांहींना व्यावहारिकतेच्या पलीकडे त्यांत कांहीं नाहीं असें वाटतें. यास मुहम्मद बाहमहीनें हिंदुस्थानांत बोलावलें होतें, पण समुद्रांतील वादळी लाटांना भिऊन हा परत फिरला. याला मुसलमान अधार्मिक समजत व ते याला मुसलभानी धर्माप्रमाणें पुरण्यासहि तयार नव्हते.

हारीतराशी—हा लकुलीशमतानुयायी कानफाट्या साधु होता. याचा शिष्य मेवाडांतील उदेपूरचा राजा काळभोज ऊर्फ बाप्पा रावळ. याच्याजवळ एक धेनु होती. तिची यानें सेवा केली होती. सर्वदर्शनसंग्रहांत लकुलीशदर्शन दिलें आहे.

हाल—(स.९९-१०२ सुमार) हा आंध्रांचा सतरावा राजा होय. यानें गाथासप्तशती या नांवाचें एक पुस्तक प्राचीन महाराष्ट्रभाषेंतून लिहिलेलें प्रसिद्ध आहे. तें कदाचित् एखाद्या कवीनें याला अर्पण केलें असावें.

हितहरिवंश--(स. १४९९) एक हिंदी कवि. हा गौड ब्राह्मण. याचा पिता केशवदासमिश्र व आईचें नांव तारामती. हा प्रथम मध्वानुयायी गोपाळभट्टाचा शिष्य होता. नंतर स्वप्नांत राधेनें मंत्र दिल्यावर यानें ' राधावल्लभ ' सांप्रदाय काढला. यानें वृंदावन येथें राधावल्लभाची मूर्ति स्थापिली (स. १५२५). याला संस्कृत उत्तम येई. याला कृष्णाच्या मुरलीचा अवतार मानतात. याच्या नांवावर असलेला ' राधानिधि ' हा ग्रंथ चैतन्यप्रभूचा शिष्य प्रबोधानंद यानें लिहिला असें म्हणतात. मग हिंदींत याचीं फक्त ८४ पदें राहतात.

हिमू किंवा हेमू—(वध स. १५५६) सूर सुलतानाचा दिवाण. हा मुहम्मद सूरचा प्रधान होय. पठाणांविरुद्ध होता. यानें इब्राहिमखान सूरचा पराभव केला. बुंदेलखंडावर स्वारी केली, हुमायुनापासून दिल्ली व आग्रा घेतली. शेवटीं विक्रमादित्य हा किताब धारण केला. अकबरानें स. १५५६ मध्यें याचा पराभव करून यास ठार केलें.

हिरण्यगर्भ भट्ट—(हयग्रीवाचार्य महानुभाव पाहा).

हिरे किंवा दोद्द चामराज--(स. १५७१-७६) हा म्हैसूरचा राजा बेट्टदचा चवथा मुलगा. कृष्णराज नांवाच्या भावानंतर हा गादीवर आला. विजयनगरमधून हा स्वतंत्र झाला (स. १५६४).

सदाशिवरायाच्या खुनानंतर विजयनगरच्या नवीन राजघराण्यास यांनीं मानलें नाहीं. यानें श्रीरंगपट्टणच्या राजाची खंडणी देण्याचें टाळलें व तटबंदी केली. पुढें श्रीरंगपट्टणचा राजा देवाची प्रार्थना करीत असतां त्यास पकडण्याचा यानें प्रयत्न केला, पण तो फसला. हा निपुत्रिक मरण पावला. याच्या मागून याचा चुलत भाऊ बेत्तड गादीवर आला. पण याचा पुत्र राजा

ओडियर यानें म्हैसूरच्या स्वतंत्र राज्याला प्रथम मान्यता मिळविली.

हिममित्र—मंडनमिश्राचा पिता.

हिरेबेट्टाद चामराज—(हेरेबेत्तड चाम १ ला)–(स. १४२३–५८) म्हैसूर संस्थानचा मूळ पुरुष जो विजय त्याचा पुत्र.

हिंदाल––(स. १५०० सुमार) दिल्लीच्या मोंगल घराण्याचा संस्थापक जो बाबर त्याचा हा तिसरा मुलगा होय. याला हुमायून, कामरान व मिर्झास्करी असे तीन भाऊ होते. त्यांपैकीं हुमायून दिल्लीच्या गादीवर आला.

२. (स. १३८६–९६) काश्मीरचा सुलतान शहामीरचा मुलगा. हा आपला भाऊ शिहाबुद्दीननंतर गादीवर आला. गादीवर येते वेळीं यानें कुतुबुद्दीन असें नांव धारण केलें. (मु. रि. भा. १ पा. ३१६).

हिंमतबहादुर गोसावी—(मृत्यु स. १८०४) याचें दुसरें नांव अनुपगीर गोसावी असें होतें. हा अनुपगीर अंतर्वेदींतील अनुप शहरचा राहणारा. यानें गोसाव्याचें एक छोटेंसें सैन्य तयार केलें. हा त्याचा गुरु व सरदारहि होता. यानें प्रथम अयोध्येचा नबाब सुजा याची चाकरी धरली. पुढें सुजाच्या मृत्यूनंतर हा स्वतंत्र राहूं लागला. मराठे, मोंगल, रजपूत वगैरेंपैकीं ज्यांना मिळालें असतां आपला फायदा होईल त्यांना हा मदत करी. याचा वडील भाऊ उमरावगीर हाहि शूर होता. तो बहुतेक अयोध्येच्या नबाबाच्या बाजूस असे.

नानासाहेब पेशव्यांच्या सांगण्यावरून दत्ताजीनें नजीबखानाचा धुव्वा उडविला. अखेर त्यानें सुजाची मदत मागितली. सुजानें अनुपगीरास दहा-बारा हजार सैन्य देऊन दत्ताजीवर रवाना केलें. पुढें दत्ताजी अनुपगीराच्या थापबाजीस फसला, व पुढें अबदाली व मागें सुजा अशा कैचींत सांपडून त्याचा बदाऊ घटांत नाश झाला (नवंबर-डिसेंबर). बक्सारच्या लढाईत सुजातर्फे हा हजर होता (स. १७६३). सुजानें अंतर्वेदी प्रांत इजाऱ्यानें दिला (स. १७७५). सुजानंतर नजीबखानानें याला सरदारी दिली व जयपुरास खंडणी-वसुलीस पाठविलें. पाटीलबावानें आपलें वर्चस्व दिल्लीस स्थापिलें, तेव्हां हा दिल्लीस कारस्थानांत गुंतला होता. शहाअलमनें याला 'राजा हिंमतबहादर' ही पदवी दिली. याच्यामार्फत पाटीलबावानें नजीब व दिल्लीदरबार यांना इंग्रजांविरुद्ध वळविण्याचा निष्फळ प्रयत्न केला. पुढें नजीब व अनुपगीर यांचें पटेनासें झालें, तेव्हां हा जयपुरास गेला. हा अनेक भानगडी करी. हा होळकर व अलीबहादर यांच्या म्हणजे नाना फडणीसाच्या बाजूचा आहे असा महादजीस संशय होता. महादजी एकदां आजारी असतां यानेंच जादूटोणा, व अनुष्ठान करून, त्याची प्रकृति बिघडेल अशीं कृत्यें केलीं म्हणून पाटीलबावानें यास मथुरेस पकडलें. परंतु हा पळून जाऊन जरीपटक्याचा आश्रय घेऊन " श्रीमंतांच्या जरीपटक्याजवळ आलों आतां माझे अंगीं मुद्दा शाबीद करावा व जें करणें तें करावें. " असें म्हणूं लागला.

पुढें यानें अलीबहादरास सांगून सबंध बुंदेलखंड स्वाऱ्या करून ताब्यांत घेतलें. अलीबहादर बुंदेलखंडाचा मुख्य झाल्यावर अनुपगीरचें महत्त्व जास्त वाढलें. पुढें हा आपल्या जहागिरींत राहून अनेक भानगडी करूं लागला. स. १७८७ मध्यें मराठ्यांविरुद्ध बंड उभारून खंडणी देण्याचें यानें नाकारिलें. पुढें हा राणाखानामार्फत पाटीलबावास पुन्हां शरण आला. समशेरबहादराचा हा दिवाण झाला. पण इंग्रजांस मिळून हा आपल्या धन्यावर उलटला. कर्नल पॉवेल याला हा ससैन्य जाऊन मिळाला (१६ सप्टें. १८०३). या दोघांनीं बुंदेलखंड हस्तगत करून समशेरबहादराचा पराभव बेटवा नदीवर केला (१३ ऑक्टोबर). याबद्दल इंग्रजांनीं याची जुनी जहागीर कायम करून थोडी नवीहि दिली. परंतु या मिळालेल्या जहागिरीचा उपभोग घेण्यास हा फार दिवस जगला नाहीं. हा काल्पी येथें मरण पावला (१८०४). हा गृहस्थाश्रमी होता.

हीरप—(अनंतवीर्य पाहा).

हीरविजयसूरि—(मृत्यु स. १५९२) एक जैन आचार्य. हा मूळचा गुजराथेंतील पालनपूरचा. याची कीर्ति ऐकून याला अकबर बादशाहानें मुद्दाम बोलावून घेतलें. हा फत्तेपूर–शिक्री येथें पायीं आला तेव्हां अकबरानें यास पहिल्या श्रेणींत घेऊन याचा सन्मान केला. या विरक्त साधूनें अकबरापासून फक्त जीवदयेचीच भिक्षा मागून घेतली. पर्युषणपर्वाचे बारा दिवस, नवरोज, रविवार, अकबराचा जन्ममास वगैरे दिवस निश्चित करून त्या वेळीं हिंसा बंद करण्यांत आली. याचा बदाऊनीच्या ग्रंथांत व विजयप्रशस्ति नांवाच्या महाकाव्यांत निर्देश आहे. यास त्यानें जगद्गुरु अशी पदवी दिली. दरबारांत शांतिचंद्राला ठेवून हा पाटणला परत आला (स. १५८७). याला बादशहाकडून मिळालेलें अहिंसेचें आज्ञापत्र सर जॉन मालकमच्या मेमॉयर्स ऑफ सेंट्रल इंडियाच्या दुसऱ्या भागांत छापलें आहे व तें उद्ध-

यनीच्या जैनमंदिरांत अद्यापि सुरक्षित असल्याचें तेथें म्हटलें आहे. याशिवाय यानें अनेक धर्मकृत्यें केलीं.

हीलीओद्रा—(ख्रि. पू. २०० सुमार) यवनराज अन्तलिकित यानें या नांवाचा दूत (पूर्व) माळव्याचा अधिकारी भावभद्र याच्याकडे पाठविला होता. हा भागवत किंवा वासुदेवधर्माचा अनुयायी झाला होता. याचा वेसनगर येथें एक शिलालेख असून त्यांत यानें आपण बांधलेल्या गरुडध्वजाचा निर्देश केला आहे. हा मौर्यांच्या अखेरीच्या कालांतील आहे (मौर्यसाम्राज्याचा इतिहास पा. ६०३).

हुएनत्संग—(जन्म स. ६०६–मृत्यु स. ६६४) हा एक प्रसिद्ध चिनी प्रवासी होता. हा चीनमध्यें क्युर्शा जिल्ह्यांत होननफू गांवाजवळ स. ६०६ सालीं जन्मला. आपल्या वडील भावाप्रमाणें हाहि लहानपणींच बौद्ध भिक्षु झाला. यानें चीनभर कांहीं वर्षें प्रवास केला. शिगनफू राजधानींत असतां याची तेथें विद्वान् म्हणून ख्याति झाली. बौद्धधर्माचें मूलस्थान जो हिंदुस्थान तो पाहण्याची याची फार इच्छा होती. म्हणून हा स. ६२९ सालीं हिंदुस्थानकडे यावयास निघाला. सरहद्द ओलांडून जाऊं नये असा तेथील कायदा असल्यामुळें याला अनेक संकटें व हाल सोसावे लागले. शेवटीं हा हिंदुस्थानांत आला. काश्मीरांत दोन वर्षें अध्ययनांत घालविल्यावर मथुरेस गेला. नंतर, ठाणेश्वर, गंगा-यमुना नद्यांच्या कांठचीं स्थळें पाहून हा कानोज येथें पोंहचला. नंतर यानें बौद्ध-धर्मक्षेत्रें व हिंदुधर्मक्षेत्रें पाहिलीं. नालंदा येथें यानें दोन वर्षें संस्कृताचा अभ्यास केला. येथेंच त्यानें बौद्धतत्त्व-ज्ञानाचाहि अभ्यास केला. पुढें यानें जवळजवळ सर्व हिंदुस्थानभर प्रवास करून हा काबूल-मार्गानें १५ वर्षांनीं चीनला गेला (स. ६४५). यानें येथून मोठा ग्रंथसंग्रह, मूर्ती व इतर अवशेष चीनला नेले. चीनच्या बादशहानें याचा सन्मान करून यास आपलें प्रवासवृत्त लिहिण्यास सांगितलें. यानें तें कबूल करून स. ६४८ मध्यें आपलें प्रवासवृत्त पुरें केलें. मरणापूर्वी त्यानें आपल्या शिष्याकडून आपण केलेल्या चांगल्या कृत्यांची यादी तयार करविली व ती आपल्या सर्व शिष्यांदेखत वाचून घेतली असें म्हणतात. हा स. ६६४ सालीं मरण पावला. यानें लिहून ठेविलेलें प्रवासवृत्त हिंदुस्थानचा प्राचीन इतिहास लिहिण्याच्या कामीं फार उपयुक्त आहे.

तेविसाव्या वर्षी हा हिंदुस्थानांत येण्यास निघाला. याचा उद्देश बौद्धधर्माचा अभ्यास करणें आणि संस्कृत पुस्तकें जमविणें हा होता. चीनच्या उत्तरपश्चिम सीमेला ओलांडून आक्सस व जॅक्सर्टस नद्यांचे प्रदेश पाहून हिंदुकुश पर्वत ओलांडून हा हिंदुस्थानांत शिरला. पश्चिमेकडील भारत अवलोकन केल्यावर हा सम्राट् हर्षवर्धनाच्या दरबारांत आला. तेथून सर्व हिंदुस्थानभर प्रवास करून पामीर, काशगर व खोतानवरून हा चीनला परत गेला.

हुमायून (ऊर्फ सिकंदर) तुघ्लक—(सिकंदर तुघ्लक पाहा).

हुमायून बाहमनी—(स. १४५८–६१) हा दुसऱ्या अलाउद्दीनचा मुलगा.

हुमायून मोगल—(स. १५०५–१५५६) हा एक मोगल बादशाहा होऊन गेला. याचें नांव नासिरुद्दीन मुहंमद असें होतें. हा बाबराचा वडील मुलगा असून याला आणखी तीन भाऊ होते. त्यांना यानें निरनिराळ्या प्रांतांचे आधिकारी नेमिलें होतें. गुजराथ व माळवा येथील बंदोबस्त नीट न राहिल्यानें ते प्रांत याच्या हातचे गेले. पुढें शेरखानानें बंड करून बंगाल व बहार प्रांत घेतले, व याला पळावयास लाविलें. स. १५५५ पर्यंत दिल्लीच्या तख्तावर शेरशाहा व त्याचे वंशज राज्य करीत होते. या १५ वर्षांत हुमायुनाचे अत्यंत हाल होऊन तो आश्रयार्थ भटकत होता. पुढें इराणांतून सैन्य आणून यानें आपलें तख्त मिळविलें, व पुन्हां तो बादशहा बनला. पण याचा उपभोग घेण्यास तो जगला नाहीं. हा जिन्यावरून पडून दिल्लीस मृत्यु पावला. याच्यांत हिकमत व जबाबदारी ओळखण्याची पात्रता मुळींच नव्हती. हा कर्मी शूर नव्हता, पण आळशी व बेफिकीर वृत्तीचा असे. तथापि हा उदार, ममताळू व सौजन्यपूर्ण होता. विद्वानांचा आश्रयदाता असून स्वतः गणिती व ज्योतिषी होता.

हुविष्क कुशान—(स.१६२ सुमार) कनिष्काचा पुत्र. बाप स्वारीवर गेल्यावर हा राज्यकारभार पाहत असे. हा वशिष्काच्यानंतर गादीवर बसला. याचीं सर्व नाणीं हा गादीवर आल्यानंतरचीं असावींत. याचें राज्य काबूल, काश्मीर, व मथुरा येथपर्यंत पसरलें होतें. हा कनिष्काप्रमाणेंच बुद्धधर्माचा आश्रयदाता होता असें दिसतें. कारण त्यानें मथुरेला एक स्वतःच्या नांवाचा मठ बांधून तो बुद्धांना दिलेला होता (Cunningham-Arch. Rep. I. 238). यानें काश्मीरांत हुशकपुर या नांवाचें एक शहर वसविलें. हें शहर अत्यंत महत्त्वाचें असून त्याला पश्चिमेकडील दरवाजा असें म्हणत असत. हें शहर पुष्कळ दिवसपर्यंत भरभराटींत होतें. हुएनत्संग स. ६३१ मध्यें याच राजधानींत आला होता. याला सध्यां उशकुर असें म्हणतात, व त्या

ठिकाणीं एक अत्यंत जुना स्तूप आहे. याच्या वेळचीं कांहीं सोन्याचीं नाणीं पण सांपडलीं आहेत. राजतरंगिणींत यास हुष्क म्हटलें आहे.

हुशंगशाह घोरी—(स. १४०५-१४३६) माळव्याचा सुलतान जो दिलावरखान घोरी त्याचा हा पुत्र होय. याचें मूळ नांव आलफखान असें होतें. हा आपल्या बापानंतर स. १४०५ मध्यें गादीवर आला (अमीशाह ऊर्फ दिलावरखान घोरी पाहा).

हा सरदारमंडळीस आवडत नसल्यामुळें त्यांनीं याला पदच्युत करून माळवा प्रांत गुजराथचा सुलतान मुज्फरशहाचा भाऊ नुस्त्रतच्या हवालीं केला. पण नुस्त्रतखानास माळवा प्रांत लवकरच सोडावा लागल्यामुळें, स. १४१८ मध्यें यानें गुजराथेवर स्वारी केली, पण तींत याचाच पराभव झाला. यानें मांडवगडचा किल्ला उत्कृष्ट रीतीनें बांधून मजबूत केला. शिवाय तेथें एक जुम्मामशीद बांधिली. जरी याला आपला शत्रूंपासून बचाव करविला नाहीं, तरी हा आपल्या राज्यांत फार प्रिय होता. हिंदु लोकांच्या देवळांस धक्का न लावतां सर्वांस यानें ममतेनें व निःपक्षपातानें वागविलें. त्याबद्दल माळव्यांतील लोकांत अद्यापि याची आठवण निघते. यानेंच हुशंगाबाद शहर स्थापिलें.

यानें ओरिसाच्या जाजनगर किंवा जाजपुरावर व्यापाऱ्याच्या वेषानें जाऊन तेथील राजास कपटानें कैद करून त्याच्याकडून यानें पुष्कळ हत्ती मिळविले (स. १४२२). नंतर यानें काल्पीवर स्वारी केली (स. १४३३). याच्यानंतर याचा मुलगा गज्नीखान ऊर्फ मुहम्मदशाह हा तख्तनशीन झाला.

हुसेन कुली—गोवळकोंड्याच्या इब्राहिम कुत्बशाहचा पुत्र.

हुसेनखान— हा काश्मीरच्या हसनशाहचा मुलगा.

हुसेन निजाम—(स. १५५४-१५६५) हा अहमदनगरच्या निजामशाही घराण्यांतील बुर्हाणचा पुत्र. विजापूर, गोवळकोंडें, विजयनगर येथील राजे त्याच्यावर चालून आले, तेव्हां त्यानें त्यांच्याशीं तह केला. प्रसिद्ध चांदबिबी ही ह्याचीच मुलगी. तालीकोटच्या लढाईत याच्या तोफखान्यानें उत्तम कामगिरी बजाविली. याच्याजवळ ६०० तोफा असून त्यांजवर चलीबी रूमीखान नांवाचा एक मुसलमान सरदार मुख्य होता. चलीबी रूमीखान हा आशियामायनरांतील असून युरोपांतील लष्करी खात्यांत तोफखान्याचें काम शिकून निपुण झाला होता.

हा स. १५६५ मध्यें आपल्या वयाच्या २४ वे वर्षी मरण पावला. याला पुष्कळ मुलें होतीं. याला वऱ्हाडच्या दर्या इमादशाहची मुलगी दौलतशाह ही दिली होती.

२. (स. १६३०-३३) हा अहमदनगरच्या निजामशाहींतील दुसऱ्या मूर्तझाचा मुलगा. याला फत्तेखानानें गादीवर बसविलें. फत्तेखानानें निजामशाही मोंगलांच्या स्वाधीन केली. शहाजीनें दौलताबाद घेतलें व फत्तेखान व हुसेनशहा यांस पकडून दिल्लीस पाठविलें. फत्तेखानानें बुर्हाण निजामशहास ठार केलें ही गोष्ट, बील म्हणतो, स.१६२८ मध्यें घडली व प्रो. सरकार म्हणतात, स. १६३२ फेब्रुवारींत घडली (शि. च. प्र. पृ. ५४; शि. भा. प्र. ७७).

३. हा अहमदनगरच्या निजामशाहींतील हसनचा पुत्र.

हुसेन लोदी—लोदी घराण्यांतील जो निजामखान त्याचा मुलगा होय. याला इब्राहिम, इस्माईल व महमूद असे तीन भाऊ होते. त्यांपैकी इब्राहिम हा दिल्लीच्या गादीवर आला.

हुसेनशाहा लंगा—(स. १४५६-१५०२) मुलतानचा राजा जो कुतुबुद्दीन लंगा त्याचा पुत्र.

२. (स. १५२७-२८) हा मुलतानचा राजा महमूद लंगा त्याचा पुत्र. बाबर बादशाहच्या सांगण्यावरून पंजाबचा सुभेदार शाहा हुसेन अर्घून यानें मुलतानचा किल्ला काबीज केला व याचें राज्य घेऊन लंगा घराण्याची समाप्ति केली.

हुसेनशाहा शर्की--(स. १४५८-७९) हा जोनपूरच्या महमूदशाह शर्कीचा पुत्र. हा आपल्या मुहम्मद नांवाच्या भावानंतर गादीवर आला. हाच या घराण्यांतील शेवटचा पुरुष होय.

हुसेन सय्यद—(सय्यद हुसेन पाहा).

हृदयराम—(स. १६२२) एक हिंदी कवि. हा पंजाबमधील राहणारा असून याच्या बापाचें नांव कृष्णदास होय. यानें स. १६२२ मध्यें संस्कृतमधील हनुमन्नाटकाच्या आधारावर हिंदीमध्यें हनुमन्नाटक लिहिलें आहे. यांतील कविता व संवाद सुंदर आहेत. हें तत्कालीं प्रसिद्ध असलेलें नाटक आहे.

हेमचंद्र—(स. १०८८-११७२) चाचिग नांवाच्या मोढवंशी वाण्यास चाहिणी किंवा पाहिणी नांवाच्या स्त्रीपासून हा झाला. वि. सं. ११४५ च्या कार्तिकी पौर्णिमेच्या रात्रीं याचा जन्म झाला. याच्या घरांत कुलदैवत चामुंडा व यक्ष गोनस असल्यानें दोनहि देवतांचीं आद्याक्षरें घेऊन याचें नांव प्रथम चांगदेव असें ठेवण्यांत

आलें. याला 'कलिकालसर्वज्ञ' असेंहि म्हणत. याच्या गांवाचें नांव धुंधुका. संस्कृतांत धुंधुक्कनगर किंवा धुन्धूकपुर असा याचा निर्देश येतो.

देवचंद्राचार्य अनहिलपट्टणहून फिरत फिरत धुंधुकाला आले. तेथें जैनमंदिरांत गेले असतां इतर मुलांबरोबर खेळत असलेला चांगदेव त्यांना आढळला. तो खेळत खेळत देवचंद्राचार्यांच्या गादीवर येऊन बसला. देवचंद्राचार्यांच्या लक्षांत चांगदेवाचें वैशिष्ट्य आल्याशिवाय राहिलें नाहीं. त्यांनीं याच्या आईकडे मुलाची मागणी घातली. आईची विशेष श्रद्धा असल्यानें तिनें चांगदेवास देवचंद्राचार्यांच्या स्वाधीन केलें; आणि त्यांनीं कर्णावती येथें उदयनमंत्र्याकडे पुढील व्यवस्थेकरितां त्याला ठेवून दिलें. परंतु ही गोष्ट चाचिग गांवाला गेला असतां त्याच्यामागें झाली होती. तो गांवाहून येतांच त्याला ही गोष्ट कळली. तो तडक देवचंद्राचार्यांकडे आला. देवचंद्राचार्य व उदयन यांनीं त्याचा मोठा सत्कार केला, आणि त्याच्याकडून मोठ्या खुबीनें दीक्षा देण्याची परवानगी मिळवली. दीक्षाविधि वि. सं. ११५४ माघ शुद्ध चतुर्दशीचे दिवशीं शनिवारीं झाला. हा समारंभ स्तंभतीर्थावर पार्श्वनाथाच्या मंदिरांत झाला. दीक्षा दिल्यावर याचें नांव सोमचंद्र असें ठेवण्यांत आलें. पुढें गुरुजीपाशीं तर्क, लक्षण, साहित्य वगैरे शास्त्रांचें अध्ययन करीत आठ महिने प्रवास करावा व चार महिने कोठेंतरी एका स्थळीं राहून चातुर्मास करावा असा क्रम कांहीं वर्षे चालला. हा नागपूर येथें धनदशेटजीच्या येथें, गौडदेशांत खिल्हार गांवीं व काश्मीरांत गेल्याचा आज पुरावा उपलब्ध आहे. यांचें अगाध पांडित्य, तेजस्विता वगैरे पाहून वि. सं. ११६६ मध्यें नागपूर येथें याला आचार्यपदावर अधिष्ठित करण्यांत आलें. धनदशेटजीनें मोठा उत्सव केला आणि यांचें नांव हेमचंद्राचार्य असें ठेवण्यांत आलें.

सिद्धराज जयसिंह चालुक्य आणि हेमचंद्राचार्य यांचा पुढें अत्यंत निकट संबंध आला. सिद्धराज हा वैदिकधर्मी होता, तथापि हेमचंद्राचार्यांनीं त्याच्याशीं विरोध न येऊं देतां मोठ्या सन्मानानें दिवस काढले. विरोधाचे प्रसंग आले तरी यानें आपल्या पांडित्यानें व समयसूचकतेनें आपली छाप सिद्धराजावर ठेविली होती.

सिद्धराज सोमनाथाच्या यात्रेला गेला तेव्हां हा त्याच्या बरोबर होता. त्या वेळीं सिद्धराज राजधानीच्या बाहेर आहे असें पाहून माळव्यांतील यशोवर्मनूनें सिद्धराजाच्या राज्यावर स्वारी केली. सांतु नांवाच्या प्रधानावर सिद्धराज परत येईपर्यंत राज्य सांभाळण्याची जबाबदारी होती. यशोवर्म्यानें सांतूला कळविलें कीं, सिद्धराजाच्या यात्रेचें पुण्य मला देण्याचें अभिवचन देत असशील तर मी परत जातों. तेव्हां सांतूनें ती गोष्ट मान्य केली. पण सिद्धराज परत आल्यावर त्याला ही गोष्ट समजली तेव्हां त्याला या गोष्टीचा फार राग आला. आणि त्यानें त्यावर स्वारी करून पराजित केलें आणि त्याला पकडून पत्तन येथें घेऊन आला. त्या वेळीं सिद्धराजाचा विजयोत्सव मोठ्या समारंभानें साजरा करण्यांत आला आणि त्याला सर्व सांप्रदायाच्या लोकांनीं आशीर्वाद दिले. त्या वेळीं यानेंहि एका सुंदर श्लोकांत राजाला आशीर्वाद दिला. तेव्हांपासून राजाची यावर विशेष मर्जी बसली आणि याला नवें व्याकरण करण्याविषयीं राजानें सुचविलें. यानेंहि काश्मीरमधून प्राचीन व्याकरणाच्या कांहीं प्रती आणविल्या, देशोदेशींच्या विद्वानांना बोलावून त्यांच्याशीं वाटाघाट केली आणि एक वर्षांत व्याकरणग्रंथ तयार केला. आणि त्याचें नांव राजा सिद्धराज व हेमचंद्र यांनीं संयुक्त 'सिद्धहेम' असें ठेवण्यांत आलें. राजानें त्या ग्रंथाला मिरवीत आणून दरबारांत ग्रंथाची प्रसिद्धि केली. तीनशें लेखक बसवून त्याच्या प्रती करविल्या व अठरा देशांत पाठवून दिल्या (महोपाध्याय जिनमंडनकृत कुमारपालप्रबंध आणि मेरुतुंगाचार्यकृत प्रबंधचिंतामणि). पण चंद्रप्रभसूरीच्या प्रभावकचरित्रांत यापेक्षां निराळी हकीकत आहेः अवंती येथील ग्रंथालयांत भोजाचें व्याकरण पाहून त्यानें याच्याकडून नवीन व्याकरण करविलें आणि त्याचा सर्वत्र प्रचार केला.

याच वेळीं दिगम्बर आणि श्वेताम्बर या दोन पंथवाल्यांमध्यें वाद झाला. त्यांत दिगम्बर जैनांच्या तर्फे सुप्रसिद्ध पंडित कुमुदचंद्र होते आणि श्वेताम्बर जैनांच्या बाजूनें वादिश्रीदेवसूरि आणि हेमचंद्र होते. शेवटीं श्वेताम्बर जैनांचा जय होऊन दिगम्बर जैनांना पराजित व्हावें लागलें. तथापि हेमचंद्राला सिद्धराजावर विशेष छाप बसवतां आली नाहीं. सिद्धराजानें जैनमंदिरावर ध्वज लावण्याला मनाई केल्याचें वर्णन सांपडतें. तसेंच सोमनाथाच्या यात्रेच्या वेळीं जैनधर्माच्या आचाराप्रमाणें सिद्धराज म्हणत असतांहि वाहनांत बसण्यांत इन्कार केला तेव्हां सिद्धराज हेमचंद्राला व्यवहारजड म्हणाला. तेव्हांहि खटका उडाल्याचें वर्णन आढळतें. पण सिद्धराज व हेमचंद्र यांचा संबंध सिद्धराजाच्या अखेरीपर्यंत कायम होता. सिद्धराज दिवंगत झाला तेव्हां हेमचंद्राचें वय चौपन्न वर्षांचें होतें (वि. सं. ११९९). सिद्धराजाला मुलगा नसल्यानें त्याच्याच घराण्यांतील

कुमारपालानें शेवटीं सिद्धराजाचें राज्य मिळविलें. या कुमारपालाचा सिद्धराज अत्यंत द्वेष करीत असल्यानें आणि याला मारण्याचाहि त्यानें प्रयत्न केला असल्यानें सिद्धराज असतांना कुमारपालाला अत्यंत संकटांत दिवस काढावे लागले. हेमचंद्र स्तंभतीर्थावर असतांना कुमारपालानें याला संकटांना कंटाळून 'माझ्या नशिबीं सुख आहे का?' म्हणून प्रश्न विचारला होता. तेव्हां यानें त्याला वि. स. ११९९ मार्गशीर्ष वद्य चतुर्दशी रविवार रोजीं तुला राज्याभिषेक होईल म्हणून लिहून दिलें होतें. कुमारपालानेंहि हें खरें झाल्यास आपणच राजे व्हाल असें सांगितलें. त्याच वेळीं सिद्धराजाच्या हेरांपासून त्याला पुस्तकांत लपवून हेमचंद्रानें त्याचें रक्षण केलें. पुढें भविष्याप्रमाणेंच कुमारपाल राजा झाला पण त्याला भविष्य सांगणाराचें विस्मरण पडलें. एकदां हेमचंद्र कुमारपालाला भेटावयास आला असतां अद्भुत चमत्कार करून त्याची भेट घ्यावी लागली. पुढें त्यानें पूर्वी वचन दिल्याप्रमाणें जैनधर्माच्या प्रचाराचें काम चांगल्या प्रकारें केलें. पूर्वी हेमचंद्र दरबारांत केवळ विद्वान् म्हणून सन्मान मिळवीत होता. आतां राजाचा गुरु म्हणून याचा सन्मान होऊं लागला. कुमारपालानंतर अजयपाल राजा झाला. त्याचा प्रधान यशपाल नांवाचा होता. त्यानें 'मोहराजपराजय' नांवाचें नाटक संस्कृत भाषेंत लिहिलें आहे. त्यांत कुमारपालाच्या आध्यात्मिक जीवनाविषयीं बरीच माहिती दिली आहे. कुमारपालानें हेमचंद्राच्या उपदेशानें मद्यमांस सोडलें होतें. हिंसा बंद केली होती. जैनधर्माचा तो चांगलाच पुरस्कर्ता बनला होता. तथापि जुन्या धर्माचें दडपण हेमचंद्र पूर्णपणें दूर करूं शकला नव्हता. कुमारपालाच्या इच्छेकरितां हेमचंद्रानें सोरटी सोमनाथाची पूजा केल्याचा उल्लेख सांपडतो. स. ११७४ मध्यें कुमारपाल मेला. आणि त्यापूर्वी सहा महिने हेमचंद्र दिवंगत झाला होता. हेमचंद्राची रक्षा पवित्र म्हणून लोक मस्तकाला लावीत. त्यामुळें हेमचंद्राला ज्या ठिकाणीं जाळलें त्या ठिकाणीं एक मोठा खड्डा पडला. त्याला हेमखाड असें लोक म्हणत.

गुजराथचा इतिहासलेखक ए. के. फोर्बस यानें आपल्या रासमाला नांवाच्या ग्रंथांत हेमचंद्राचें वर्णन केलें आहे. त्यांत इतरत्र न आढळणाऱ्या कांहीं गोष्टींचा निर्देश आढळतो. त्यांपैकीं एक खालीं देतों.

कुमारपालानें सिसोदिया वंशांतील एका मुलीशीं लग्न केलें. मुलीला असें समजलें कीं, पट्टणला गेल्यानंतर हेमचंद्राकडून जैनधर्माची दीक्षा घ्यावी लागेल. तेव्हां तिनें पट्टणला जाणें नाकारलें. पण कुमारपालाचा जयदेव नांवाचा भाट होता. त्यानें तिच्यावर दीक्षा घेण्याचा प्रसंग येणार नाहीं असें आश्वासन देऊन तिला पट्टणला आणलें. हेमचंद्राच्या ही गोष्ट ध्यानांत आल्यावर त्यानें राणीला दीक्षा देण्यास पाठविण्याचा तगादा लावला. कुमारपालानें राणीस दीक्षा घेण्यास सांगितलें. तेव्हां राणीस दीक्षा टाळण्याकरितां पळून जात असतां वाटेंत सैन्यानें वेढा दिला तेव्हां राणीनें आत्महत्या केली. यावरून तत्कालीन स्थितीची चांगली कल्पना येते.

हेमचंद्राचे खालील ग्रंथ आज उपलब्ध झाले आहेत:— १ अनेकार्थकोष, २ अनेकार्थशेष, ३ अभिधानचिंतामणि (नाममालाव्याख्या), ४ अलंकारचूडामणि (काव्यानुशासनव्याख्या), ५ उणादिसूत्रवृत्ति, ६ काव्यानुशासन स्वकृत टीकेसह, ७ छन्दोनुशासन (छंदोनुशासनवृत्ति), ८ देशीनाममाला (सवृत्ति) ९ द्याश्रयकाव्य (ऐतिहासिक, मूळ राजापासून चामुंडराज, वल्लभराज, दुर्लभराज, भीम, कर्ण व सिद्धराज जयसिंह यांपर्यंत वर्णन करणारा ऐतिहासिक ग्रंथ), १० धातुपाठ (सवृत्ति), ११ धातुपारायण (सवृत्ति), १२ धातुमाला, १३ नाममाला, १४ नाममालाशेष, १५ निघंटुशेष, १६ प्रमाणमीमांसा (सवृत्ति), १७ बलाबलसूत्र (बृहद्वृत्ति), १८ बालभाषा, १९ सिद्धहेमव्याकरण (सूत्र व वृत्ति), २० योगशास्त्र, २१ विभ्रमसूत्र, २२ लिङ्गानुशासन (सवृत्ति), २३ शेषसंग्रहसारोद्धर २४ त्रिषष्टिशलाकाचरित (याची पुरवणी परिशिष्टपर्व).

यांशिवाय याचे अनेक ग्रंथ असावेत. याची अशी प्रसिद्धि आहे कीं, याच्या लेखनशाळेंत सातशें लेखक सदोदित काम करीत असत.

हेमविजयगणि—(स. १६३१) हा हीरविजयसूरीचें चरित्र असलेलें 'विजयप्रशस्ति' काव्य करणारा कवि. एकवीस सर्गांपैकीं शेवटले पांच गुणविजयगणीनें लिहिले व सर्व काव्यावर टीकाहि लिहिली.

हेमाद्रि अथवा हेमाडपंत—(स. १२६०–१२७५ सुमार) देवगिरीच्या महादेव व रामदेव राजांच्या कारकीर्दीत हा होऊन गेला. हा प्रख्यात ग्रंथकर्ता होता. याच्या धर्मशास्त्रावरील ग्रंथांच्या उपोद्घातांत याला महादेवाचा "श्रीकरणाधिप" अथवा "श्रीकरणप्रभु" असें म्हटलें आहे. दरबारचे कागदपत्र व हुकूम सोडण्याचें काम याचेकडे होतें. हा शुक्ल-यजुर्वेदी वत्सगोत्री ब्राह्मण होता. याच्या वडिलाचें नांव कामदेव व आजाचें नांव वासुदेव. हा उदार व विद्येचा भोक्ता होता. स्वतः विद्वान् असल्यामुळें

विद्वानांना याच्याकडे आश्रय मिळत असे. हा धार्मिक, शूर व सुशीलहि होता. धार्मिक आचारविचारांना सुव्यवस्थित रूप देण्याची मूळ कल्पना यानें काढली व ती यानें आपल्या देखरेखीखालीं 'चतुर्वर्गचिंतामणि' हा ग्रंथ करून पार पाडली. हा पंढरीच्या विठ्ठलाचा भक्त होता असें तेथील शिलालेखावरून दिसतें. पण तेथें पिता वामन दिला असल्यामुळें हा तो नसावा असें वाटतें.

चतुर्वर्गचिंतामणि हा हेमाद्रीचा मोठा ग्रंथ होय. या ग्रंथाचीं (१) व्रतखंड, (२) दानखंड, (३) तीर्थखंड, व (४) मोक्षखंड अशीं चार खंडें आहेत. यांशिवाय परिषेशखंड नांवाचें पांचवें एक खंड आहे. त्यांत देवता, श्राद्ध, मुहूर्त व प्रायश्चित्त वगैरेंचें विवेचन केलें आहे. वाग्भटाच्या अष्टांगहृदय नामक वैद्यकग्रंथावर आयुर्वेदरसायन नांवाची टीका यानें केली आहे. तसेंच बोपदेवाच्या मुक्ताफळ नांवाच्या ग्रंथावरहि ' कैवल्यदीपिका ' नांवाची यानें टीका केली आहे.

महाराष्ट्रांत हा हेमाडपंत या नांवानें प्रसिद्ध आहे. विशिष्ट प्रकारच्या रचनेच्या देवळांना हेमाडपंती देऊळ असें म्हणतात. हीं चालुक्य शिल्पपद्धतीचीं असून तींत चुना न भरतां मोठाले दगड एकमेकांस सांधलेले असतात. मोडी लिपी यानेंच प्रचारांत आणिली असें म्हणतात. कै. वि. का. राजवाडे यांनीं कित्येक जुनीं हेमाडपंती मेस्तकें प्रसिद्ध केलीं आहेत. त्यांतून जमाखर्चाच्या व हिशेबाच्या पद्धती, कारभारांची अनेक शाखांनीं व्यवस्था, शिरस्ते वगैरे आहेत. बिभीषणानें याला ज्वारीचें बीं दिलें आणि तेव्हांपासून हिंदुस्थानांत ज्वारी होऊं लागली असें म्हणतात. तसेंच मोडी लिपी व ढेकूण हींहि त्यानेंच दिलीं अशी दंतकथा आहे. त्यावरून असें अनुमान निघतें कीं, जंगल साफ करून दक्षिणेमधील शेतीस यानें उत्तेजन दिलें असावें; व मराठींत मोडी लिपीचा प्रचार याच्या वेळीं होऊं लागला असावा.

बोपदेवानें आपल्या मुक्ताफलांत याचें वर्णन ' गणकाग्रणीः ' असें केलें आहे. ओवळें येथील ताम्रपटांत 'निर्जितझाडीमंडळ' व ' हस्तिपकाध्यक्ष ' अशीं यास विशेषणें दिलेलीं आढळतात. तसेंच तेथें यास रामचंद्राचा मुख्य प्रधान म्हटलें आहे (स. १२७२).

चक्रधराच्या महानुभाव सांप्रदायाचा प्रचार वाढूं लागला तेव्हां ब्रह्मसानु व महदाश्रम या दोघांनीं चक्रधरांना विष व यंत्रासन (आसनाखालीं खड्डा खणून) यांनीं ठार करण्याचा प्रयत्न केला. पहिला देवगिरीकर यादवांचा गुरु होता आणि दुसरा हेमाद्रीचाच गुरु होता. हे दोन्ही प्रयत्न फसले.तथापि महानुभाव सांप्रदायाची छाप लोकांप्रमाणें त्या वेळच्या रामदेवराव यादवरावावरहि पडली आणि हेमाद्रीचें वजन दरबरांत कमी झालें. रामदेवरावाची पत्नी कामाइसानें तर महानुभावी पंथाची दीक्षाहि घेतली होती. शेवटीं तर बहुतेक चक्रधराला आपल्या मुलाकडून ठार केल्याबद्दल हेमाडपंतास क्लेशपूर्ण देहांत शासन भोगावें लागलें असावें, असें महानुभावी ग्रंथावरून (लीलाचरित्राचा जाखोबा पाठ) व महिकावती बखरीवरून दिसतें (प्रो. वि. भि. कोलते, एम्. ए., यांच्या 'महाराष्ट्र शारदें'तील लेखावरून).

२. (स. १४००-५०सुमार) यानें रघुवंशावर दर्पण नांवाची टीका लिहिली आहे. प्रक्रियाकौमुदीचा निर्देश केल्यामुळें वरील काळ ठरविण्यांत आला आहे. हा प्रसिद्ध हेमाद्रीहून वेगळा आहे. हा आपल्या पित्याचें नांव ईश्वर असें देतो.

हैदर अली—(स. १७२२-८२) हा म्हैसूरच्या गादीवर बसणारा उपरी राजा होय. हा स. १७४०च्या सुमारास म्हैसूरच्या लष्करांत उदयाला आला. यानें दिवाण व राजा या दोघांनाहि आपल्या ताब्यांत ठेविलें. पेशव्यांनीं केलेल्या स्वारीबद्दल त्यांस देऊं केलेली खंडणी न देण्याबद्दल यानेंच राजास सल्ला दिली व आपल्या मुलखांतून पेशव्यांचे कारकून हाकून लावले. तेव्हां गोपाळ गोविंद पटवर्धनाच्या नेतृत्वाखालीं यावर स्वारी करण्यांत आली (स. १७५९). यानें पेशवे अबदालीशीं लढण्यांत गुंतलेले पाहून व नंतर पानपतावर त्यांची झालेली वाताहात जाणून स. १७६१ ते ६४ दरम्यान मराठी मुलूख बराच काबीज केला. तेव्हां पेशव्यांनीं स. १७७४ मध्यें याच्यावर स्वारी करून सर्व मुलूख सोडविला. हा पेशव्यास शरण आला व यानें ३२ लाख खंडणीहि दिली. पुन्हां यानें मलबारप्रांत पादाक्रांत केल्यावरून पेशव्यांनीं याच्यावर दुसरी स्वारी केली व ३० लाख रुपये खंडणी वसूल केली. याच्या मागोमागच हैदराला निजाम व इंग्रज यांच्या संयुक्त सैन्याशीं टक्कर द्यावी लागली, परंतु यानें युक्तीनें आपल्या म्हणण्याप्रमाणें तह घडवून आणून इंग्रजांशीं दोस्ती केली. यामुळें हा अर्थातच मराठ्यांची खंडणी देईनासा झाला व उलट त्यांना त्रास देऊं लागला. म्हणून पेशव्यांनीं पुनः तिसरी स्वारी केली (स. १७७०). यांत पेशव्यांना बराच मुलूख, स्वारी-खर्च ३६ लाख रुपये व दरसाल १४ लाख खंडणी देण्याचें यानें कबूल केलें.

या युद्धांत इंग्रजांनीं मदत केली नाहीं म्हणून हा त्यांचा सूड घेण्यास प्रवृत्त झाला. पुढें राघोबानें याच्यावर

स्वारी केली तींत यानें राघोबास दरसाल ६ लक्ष रुपये खंडणी कबूल केली. पुढें पेशव्यांच्या गृहकलहाचा फायदा घेऊन यानें मराठ्यांचा बराच मुलूख काबीज केला. राघोबाहि यास मिळाला व यानेंहि २४००० होन राघोबास मदत म्हणून दिले. पुढें यानें अनेक मराठे सरदारांचा पराभव केला. परंतु हरिपंत फडक्यापुढें याचें कांहीं न चालून यानें तहाचें बोलणें लाविलें व बराच पैसा दिला. याचें धोरण विरुद्ध पक्षाचा जोर दिसला कीं नमतें ध्यावयाचें असें होतें. पुढें इंग्रजांशीं याच्या लढाया होऊन त्यांतच याचा अंत चितूर येथें झाला (स. १७८२). १८ व्या शतकास उत्तरेस रणजितसिंग व दक्षिणेंत हैदर असे दोघे शूर व राज्यसंस्थापक उदयास आले. दोघेहि निरक्षर व उलट्या काळजाचे होते. हैदराच्या ठिकाणीं नीति, धर्म किंवा दया कांहीं नव्हतें. हा स्वतः सर्व काम पाहत असून फार कडक रीतीनें अम्मल चालवी. याला पांच भाषा चांगल्या बोलतां येत होत्या. हा सर्व काम झटपट उरकी. याची स्मरणशक्ति फार दांडगी असून अवघड आंकडेमोडींतहि हा कुशल असे. हा लोकांचा स्वभाव व गुण ओळखण्यांत तरबेज असल्यानें याला आपल्याभोंवतीं कार्यक्षम माणसें गोळा करितां आलीं. याच्या ताब्यांत स. १७६१ पासून पूर्ण सत्ता होती तरी राजा अशा अर्थाची सुलतान ही पदवी याच्यानंतर टिपूनें धारण केली.

हैबतबुवा—(मृत्यु स. १८३६) वारकरी सांप्रदायांतील एक प्रसिद्ध पुरुष. यानें उत्तर हिंदुस्थानांतून दक्षिणेंत येतांना सुरक्षित पोंचल्यास ज्ञानेश्वराच्या समाधीपुढें सतत वीणा धरण्याचा नवस केला. तो अद्यापि चालू आहे. यानें प्रथम 'रूप पाहतां लोचनीं' हा अभंग म्हणावा,शेवटीं तुकाराम-ज्ञानेश्वराच्या आरत्या म्हणाव्यात, असा वारकरी भजनाचा क्रम सुरू केला. 'ज्ञानदेव तुकाराम' हें भजन यानेंच सुरू केलें असें म्हणतात. यानें सध्यांचा ज्ञानेश्वर व तुकाराम यांच्या पालख्यांच्या वारीचा सोहळा प्रथम सुरू केला, असें सध्यां कांहीं लोक म्हणतात. याचे वंशज सातारा जिल्ह्यांत आर्फळ येथें आहेत. आळंदीस ज्ञानेश्वराच्या समाधीस जातांना याची पायरी लागते. तीच याची समाधि होय.

हैबतराव निंबाळकर—(मृत्यु स. १७१४) शाहूनें यास सरलष्कर करून चंद्रसेनाचा याकडून पाडाव करविला. याला सेनापतिपद पाहिजे होतें. याच्यानंतर याचा पुत्र सुलतानजी यास सरलष्कर पद मिळालें.

होती—(ख्रि. पू. १०–५८९) हा एक चिनी राजा. यानें पानाचाओ नांवाच्या सेनापतीच्या मदतीनें चिनी साम्राज्याची हद्द रोमन साम्राज्यापर्यंत नेऊन भिडवली. यानें दुसऱ्या कदफिसेसचा पराभव केला (V. Smith, p. 294; २ कदफिसेस् व पानचाओ पाहा.).

होनाजी अनंत—(स. १७१३) शाहूचा न्यायाधीश. बाळाजी विश्वनाथ पेशवा झाल्यावर तें पद पुनः याच्याकडे आलें.

होनाजी बाळ—(स. १७९०–१८१८ नंतर) हा साताप्पाचा नातू व सयाजीचा मुलगा. यानें रंगाचा आणि खर्ड्याच्या लढाईचा पोवाडा केला आहे, त्यावरून हा सवाई माधवरावाच्या वेळीं उदयास आलेला दिसतो. रागदारीच्या लावण्या लोकप्रिय करण्याचें काम यानेंच केलेलें दिसतें. दु. बाजीरावास हा त्या म्हणून दाखवी. याचें स्वराज्य नष्ट होण्याच्या प्रसंगाचे दोन पोवाडे प्रसिद्ध आहेत. हा गवळ्याचाहि धंदा करी. याचा त्रिंबकजी डेंगळ्याशीं स्नेह असे. त्याच्या वाड्यांत याची बैठक असे. याचें कुळदैवत रवळनाथ. जेजुरीच्या खंडोबाच्या दर्शनास गेला असतां यानें एक लावणी केली. याला मारेकऱ्यानें ठार केलें. मारेकरी प्रतिस्पर्ध्यानें किंवा खासगी कलागतीनें घातले गेले असावेत. याची पुणें येथें संगमावर समाधि होती. पण आतां तेथें एक बेलाचें झाड आहे. भाद्रपद कृष्ण चतुर्दशी हा याचा मृत्युदिन पुण्यांत अद्यापि साजरा होतो. भैरवींत लावण्या म्हणण्याबद्दल याची ख्याति होती. 'घनश्याम सुंदरा' ही याची भूपाळी सर्वांच्या तोंडीं असून त्यांतील गोडी प्रो. शि. म. परांजपे यांनीं विशद करून दाखविली आहे. यानें अनंतफंदी या समकालीन कीर्तनकाराची अत्यंत प्रशंसा केली आहे.

होन्नम्म—(स. १६८० सुमार) कानडी कवयित्री. जात शूद्र असावी. गुरु–अळसिंगरार्य. हिला प्रथम संची होन्नी म्हणत असत. ग्रंथ–हदिबदेयधर्म (पतिव्रतांचा धर्म). म्हैसूरच्या चिक्कदेवरायाच्या (स. १६७३–१७०४) दासीसारख्या हलक्या कामावर ही होती. चिक्कदेवरायाची पट्टराणी यळंदूर-देवाजम्माणिच्या ही मर्जीतील होती. त्यावरून हिचेंहि गांव यळंदूर असावें असें वाटतें. राजा, राणी व गुरु यांचें हिच्या काव्यकौशल्य व विद्या यांबद्दल उत्कृष्ट मत होतें. आणि त्यांच्या इच्छेवरूनच हिनें वरील काव्य लिहिलें. घरांतील प्रत्येक माणसाला व्यवहारज्ञान व नीति कुशलतेनें शिकवणारें हिचें वरील काव्य अत्यंत लोकप्रिय आहे (क. क. च. भा. २, पा. ५०५).

क्ष

क्षत्रवर्मन्—(स. २००-२८३) कनोजच्या मौखरी-वंशांतील हा पहिला पुरुष होय. याच्यानंतर सुंदरवर्मन् मौखरीच्या गादीवर आला.

क्षीरस्वामी—(स. १०५०-११००) याला भट्ट-क्षीरस्वामी असें म्हणतात. हा मध्यहिंदुस्थानचा रहिवाशी होता. हा ईश्वरस्वामीचा पुत्र. हा काश्मीरच्या जयापीडाचा गुरु व प्रतापरुद्राचा आश्रित होता (?). गणरत्नमहोदधीचा कर्ता वर्धमान हा क्षीरस्वामीचा उल्लेख करतो. यावरून वरील काल निश्चित होतो. यानें अमरकोशावर 'अमरकोशोद्घाटन' नांवाची टीका लिहिली. कनोजजवळ काकुपदगांवीं ' क्षीरेश्वर महादेव ' नांवाचें दैवत आहे. त्यावरून याचें नांव क्षीरस्वामी पडलें असावें असा विद्वानांचा तर्क आहे. यानें प्रथम शिवाला नमन केलें असून पुढील सहा ग्रंथ केले आहेतः १ नामपारायण (अमरकोशोद्घाटन), २ क्षीरतरंगिणी (धातु-(पाठ)वृत्ति), ३ अमृततरंगिणी, ४ गणवृत्ति, ५ निपाताव्ययोपसर्गवृत्ति, ६ निघण्टुवृत्ति. या ग्रंथांवरून हा व्याकरणशास्त्रांत निष्णात असावा असें दिसतें. ' धातुजनामें ' हा सिद्धांत धरून यानें प्रत्येक शब्दाची फोड केली आहे. यानें पुढील कोश व कोशकार यांचा निर्देश केला आहेः १ कात्य, २ मुनि (व्याडि ?), ३ भागुरि, ४ माला व मालाकार, ५ वैदिक निघण्टु, ६ शाश्वत, ७ अमरमाला, ८ नाममाला, ९ अभिधानकार, १० अभिधानशेष, ११ अनेकार्थ, १२ श्रीहर्ष, १३ दुर्ग, १४ भोज, १५ रुद्र (कृ. गो. ओककृत अमरकोश-प्रस्तावना, स. १९१३).

क्षेत्रसिंह गुहिलोत—(मृत्यु स. १३८२) हा मेवाडचा महाराणा हंमीरचा ज्येष्ठ पुत्र. याची खेता व खेतसी या नांवांनीं प्रसिद्धि आहे.

महाराणा हंमीरच्या वेळीं हाडांशीं सख्य होतें. पण पुढें वैरभाव उत्पन्न झाला तेव्हां यानें त्यांच्यावर स्वारी करून त्यांना पूर्ण कबजांत घेतलें. हाडा ही चौहान-वंशाची एक शाखा असून तीमध्यें बुंदी व कोटा येथील राज्यें समाविष्ट आहेत. तसेंच यानें मांडलगड किल्ला फोडला. यानें माळव्याचा राजा अमीशाह याला चितोडजवळ जिंकलें. हा अमीशाह म्हणजे मांडूचा पहिला सुलतान दिलावरखां घोरी होय (वाके आते मुश्ताकी, तुजुके जहांगिरी). यानें इडरचा किल्ला जिंकला व तेथील राजा रणमल्ल याला कैद केलें. त्याचा पुत्र पुंजास गादी दिली. यानें जयपूर राज्यांतील सादळ (सातल) याला जिंकलें होतें.

याला सात पुत्र होते. लाखा, भाखर, माहप (महीपाल), भवणसी (भुवनसिंह), भूचर, सलखा व सखरा. तसेंच यास एका रखेलीपासून चाचा व मेरा असे पुत्र झाले.

यानें पनवाड गांव एकलिंगजीला दिलें. याचा एक शिलालेख (स. १३६६) आषाढ वद्य १३ चा आहे (रा. इ. पा. ५५५-५७१).

क्षेमराज—(स. १०३० सुमार) हा काश्मीर प्रांतांतील एक शैवतत्त्वज्ञानी व अभिनवगुप्ताचा शिष्य. अभिनवगुप्ताच्या पारमार्थसारावर यानें भाष्य लिहिलें आहे. यानें स्वच्छंदोद्योत हा ग्रंथ आणि पुष्कळ वृत्ती लिहिल्या आहेत. स्पंदनिर्णय आणि स्पंदसंदोह या ग्रंथांचा कर्ता क्षेमेंद्र आणि हा क्षेमराज हे दोघे एकच असावेत असें बुल्हरचें मत आहे. यानें ' प्रत्यभिज्ञाहृदय ' व ' शिवसूत्र-विमर्शिनी ' यांवर टीका लिहिल्या आहेत. काश्मिरी शैव संप्रदायाचें सामान्य ज्ञान होण्याकरितां प्रत्यभिज्ञाहृदयावरची क्षेमराजाची टीका वाचणें जरूर आहे.

क्षेमसिंह गुहिलोत—(स. ११६८-७२) रणसिंहानंतर हा मेवाडच्या गादीवर आला. कुंभलगडच्या प्रशस्तीवरून याला माहणसिंह नांवाचा वडील बंधु असावा. पण तो पिता हयात असतांना मेल्यामुळें हा गादीवर आला असावा. याला सामंतसिंह व कुमारसिंह असे दोन पुत्र होते. याच्यानंतर मेवाडच्या गादीवर सामंतसिंह आला.

क्षेमंकर—(स. १४७० सुमार) हा एक जैन मुनि होता. हा कदाचित् ' सिंहासनद्वात्रिंशिका ' किंवा ' विक्रमचरित ' या ग्रंथाच्या जैन भाषांतराचा कर्ता असून भाषांतराच्या कामीं त्यानें सिंहासनबत्तिशीची एखादी अतिशय जुनी महाराष्ट्री प्रत वापरलेली दिसते.

क्षेमीश्वर—(स. ९४० सुमार) चंडकौशिक (हरिश्चंद्रकथा) नाटक व नैषधानंद काव्य यांचा कर्ता. हा राजशेखराच्या मागून झाला. हा कान्यकुब्जाच्या महीपाल प्रतिहाराचा आश्रित होता. हा व क्षेमेंद्र भिन्न होत. याला आर्य किंवा आचार्य म्हणत. याच्या पणज्याचें नांव विजयप्रकोष्ठ किंवा विजयकोष्ठ.

क्षेमेंद्र—(स. १०२०–१०८० सुमार) या कवीनें आपल्याच ग्रंथांत जी माहिती दिली आहे तीवरून असें समजतें कीं, हा कवि काश्मीर देशांत होऊन गेला. यांचें दुसरें नांव 'व्यासदास' असें होतें. याचा आजा व बाप या दोघांचीं नांवें अनुक्रमें सिंधु व प्रकाशेंद्र अशीं होतीं. काश्मीरचा राजा अनंत याच्या कारकीर्दीत (स. १०२९–६४) यानें ग्रंथरचना केली. याचा अभिनवगुप्ताचार्य हा गुरु होता. सोमेंद्र हा याचा मुलगा असून उदयसिंह आणि राजपुत्र लक्ष्मणादित्य हे याचे शिष्य होते. यानें आपले बहुतेक ग्रंथ रामयशस्च्या सांगण्यावरून लिहिले. हा प्रथम शैव होता, नंतर वैष्णव झाला.

ग्रंथः—याचे ग्रंथ पुष्कळ आहेत; परंतु आजपर्यंत जेवढे उपलब्ध आहेत ते येणेंप्रमाणेः—अमृततरंगकाव्य, अवसरसार, औचित्यविचारचर्चा, कनकजानकी, कलाविलास, कविकंठाभरण, चतुर्वर्गसंग्रह, चारुचर्या, चित्रभारत नाटक, दर्पदलन, दशावतारचरित्रकाव्य (स. १०६६), दानपारिजात, देशोपदेश, नीतिकल्पतरु, नीतिलता, पद्यकादंबरी, पवमानपंचाशिका, बृहत्कथामंजरी, बौद्धावदानकल्पलता, महाभारतमंजरी, मुक्तावली, मुनिमतमीमांसा, राजावली, रामायणकथासार, ललितरत्नमाला (उदय+कथा नाटिका), लावण्यवती, लोकप्रकाशकोश, वात्स्यायनसूत्रसार, विनयवल्ली, वेतालपंचविंशति, व्यासाष्टक, शशिवंशमहाकाव्य, समयमातृका (स.१०५०), सुवृत्ततिलक, सेव्यसेवकोपदेश, क्षेमेंद्रप्रकाश.

२. मदनमहार्णवाचा कर्ता.

३. सारस्वतप्रक्रियाटीका ग्रंथाचा कर्ता.

४. पिता भूधर. नागर ब्राह्मण. गांव राजनगर. पेटलादच्या राजाच्या सांगण्यावरून यानें (१) लिपिविवेक, (२) मातृकाविवेक असे दोन ग्रंथ लिहिले.

५. गुर्जर घराण्यांतील यदुशर्मन्चा मुलगा. यानें 'हस्तिज्ञानप्रकाश' नांवाचा ग्रंथ लिहिला.

ज्ञ

ज्ञानचंद्र—(स. १३५०) हा जैनधर्मी श्वेतांबरपंथी होता. यानें 'रत्नावतारिका' या ग्रंथावर टिप्पण लिहिलें आहे. राजशेखरसूरीचा हा शिष्य.

ज्ञानदास—(स. १६०४ सुमार) एक बंगाली कवि. यांचें गांव कंद्रा (जि. वीरभूमि). पिता आत्माराम. जात वैद्य. पदकल्पतरु नांवाचा १८६ कवितांचा याचा ग्रंथ प्रसिद्ध आहे (क. कौ. ७).

ज्ञानराज—(जन्म स. १५०३ सुमार) देवगिरीच्या राजाजवळ असणाऱ्या रामापासून हा सहावा पुरुष. 'सिद्धांतसुंदर' नांवाचा ज्योतिषावर याचा ग्रंथ आहे. याचा पुत्र चिंतामणीची त्या ग्रंथावर टीका आहे. ज्ञानराजाचे जातक, साहित्य व संगीत विषयावर ग्रंथ आहेत. पाथरी (पार्थपुर) हें यांचें गांव (भा. ज्यो).

ज्ञानसंबद—एक शैव साधु. यानें आपल्या काव्यांत करिकाल चोलाचें वर्णन केलें आहे.

ज्ञानश्री भद्र—(स. १०५० सुमार) बौद्ध तर्कज्ञ. हा मूळ काश्मीरी ब्राह्मण होता. यानें अनेक संस्कृत ग्रंथांचें तिबेटींत भाषांतर केलें व धर्मकीर्तीच्या प्रमाणविनिश्चयावर टीका लिहिली, असें तिबेटी ग्रंथांवरून दिसतें.

ज्ञानश्री मिश्र—(स. १०४० सुमार) हा बौद्ध तर्कज्ञ विक्रमशिला विद्यापीठाचा आधार होता. याच्या कार्यकारणभावसिद्धीचें तिबेटी भाषांतर उपलब्ध आहे.

ज्ञानेश्वर—(स. १२७५–९६) महाराष्ट्रांतील भागवतधर्म-संस्थापक, महायोगी व अद्वितीय ग्रंथकार. हे वत्सगोत्री शुक्लयजुर्वेदी माध्यंदिन शाखेचे ब्राह्मण होते. यांच्या मातापित्यांचीं नांवें विठ्ठल व रखमाबाई अशीं असून यांचा श्रावण वद्य अष्टमीच्या मध्यरात्रीं म्हणजे गोकुळअष्टमीच्या दिवशीं कृष्णजन्माच्या वेळीं जन्म झाला. लोकहि यांना विष्णूचा अवतार मानितात. रखमाबाई या आळंदीच्या सिधोपंत कुलकर्ण्याच्या कन्या होत.

यांचें गांव नगर जिल्ह्यांतील आपेगांव व आजोळ आळंदी होय. ज्ञानेश्वराचे चुलत आजोबा हरिपंत देवगिरीच्या सिंघण यादवाचे सेनापति होते. ते एका लढाईत मारले गेले तेव्हां विठ्ठलपंत उदास झाले व तीर्थयात्रा करीत

आळंदीस आले. तेथें विवाह होऊन आपेगांवीं गेले. पुढें वैराग्य उत्पन्न होऊन काशीस जाऊन संन्यास घेतला व चैतन्याश्रम हें नांव प्राप्त झालें. संन्यासदीक्षा रामानंदानें दिली. संन्यास दिलेला विठ्ठलपंत सपत्नीक आहे, ही गोष्ट तीर्थयात्रा करीत रामानंद आळंदीस आले तेव्हां म्हणजे बारा वर्षांनीं त्यांच्या ध्यानांत आली. तेव्हां रामानंदांनीं विठ्ठलपंतास पुनः गृहस्थाश्रम स्वीकारावयास लावला. नंतर त्यास निवृत्ति, ज्ञानदेव, सोपान व मुक्ताबाई अशीं अपत्यें झालीं. संन्याशाचीं मुलें म्हणून त्यांची मुंज लावण्यासहि ब्राह्मण तयार होईनात. विठ्ठलपंत व रखमाबाई यांना तर ब्राह्मणांनीं देहान्त प्रायश्चित्त सांगितलें आणि त्यांनींहि त्याप्रमाणें प्रयागक्षेत्रीं जाऊन गंगेंत देह विसर्जन केला. या वेळीं निवृत्ति दहा वर्षांचा व बाकीचीं भावंडें दोन दोन वर्षांनीं लहान होतीं. याच सुमारास हीं मुलें त्र्यंबकेश्वरीं आलीं असतां गहिनीनाथ नांवाच्या नाथपरंपरेंतील थोर पुरुषाची गांठ पडून निवृत्तीवर त्यांचा अनुग्रह झाला. आणि निवृत्तीनें आपला धाकटा भाऊ ज्ञानेश्वर यास नाथपरंपरेंत गोंविलें. यानंतर हीं मुलें आपेगांवीं आलीं व लोकांनीं यांस वाळींत टाकलें.

निवृत्ति व ज्ञानदेव कोरडी भिक्षा मागत आणि आपल्या भावंडांचें पोषण करीत. पुढें आळंदीस जाऊन उपनयन करण्याकरितां ब्राह्मणांचा निर्णय घेण्यास हे पैठणास आले असतां त्यांनीं विरुद्ध दिलेला निर्णयच यांच्या अलौकिक कार्यास प्रोत्साहक ठरला. वेदादि विद्या शिकणें यांना ब्राह्मणांच्या निर्णयामुळें अशक्य झालें. तेव्हां स्वतःच विद्या संपादून यांनीं ईश्वरप्राप्ति करून घेतली. वेद रेड्याकडून वदविले आणि ब्राह्मणांना आपली योग्यता पटवून दिली. त्यामुळें व यांचें योगसामर्थ्य पाहून नंतर पैठणच्या ब्राह्मणांनीं यांना शुद्धिपत्र दिलें.

ज्ञानेश्वरांनीं पैठणास असतां शंकराचार्यांचें गीताभाष्य, योगवासिष्ठ व भागवत वगैरे ग्रंथ पाहिले असावेत. पुढें आळ्याला वेद म्हणविलेल्या रेड्यास समाधि दिली व नेवाशास आले. तेथें ज्ञानेश्वरी लिहिली. सच्चिदानंद बाबाला जिवंत करून त्यालाच ज्ञानेश्वरीचा लेखक केला (स. १२९०). नंतर हे चाकणाहून पंढरपुरास आले. तेथें यांचा नामदेवाशीं परिचय झाला. नंतर ज्ञानेश्वरादि मंडळी, नामदेव व महाराष्ट्रीय संतमंडळ हे हिंदुस्थानभर तीर्थयात्रा करून पंढरीस परत आले. तेथून आळंदीस आल्यावर योगसामर्थ्यानें चमत्कार करणाऱ्या चांगदेवास त्याच सामर्थ्यानें निर्जीव भिंत चालवून यांनीं लज्जित केलें आणि पासष्ट ओव्यांत त्याला उपदेश केला. तो 'चांगदेवपासष्टी' या नांवानें प्रसिद्ध आहे.

यानंतर ज्ञानेश्वरानें आपला जिवंत समाधि घेण्याचा हेतु जाहीर केला व समाधीकरितां गुहा वगैरे तयार करविली. या अखेरच्या सोहळ्यास सर्व संतमंडळी आळंदीस आली होती. शेवटीं यांच्या गळ्यांत हार घालण्यांत आला आणि कपाळीं केशरी गंध लावण्यांत आलें. निवृत्तीनें ज्ञानदेवाला हात देऊन गुहेंत उत्तरेकडे तोंड करून आसनावर बसविलें. 'ज्ञानदेव म्हणे सुखी केलें देवा। पादपद्मीं ठेवा निरंतर॥' अशी प्रार्थना केल्यावर ज्ञानेश्वरांनीं सर्वांचा आनंदानें निरोप घेतला. गुहेची शिळा बंद केली व सर्वांनीं भजन करून शिळेवर फुलें वाहिलीं. हा प्रसंग अत्यंत गंभीर होता. या वेळीं झालेल्या स्थितीचें शब्दचित्र मुक्ताबाई व नामदेव यांच्या पुढील शब्दांत आढळतें: 'मायबापें आम्हां त्यागियेलें जेव्हां। ऐसें संकट तेव्हां आलें नाहीं।' 'नामा म्हणे। पेटला हुताशन। करा समाधान निवृत्तीचें॥'

भावार्थदीपिका म्हणजे ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, चांगदेवपासष्टी, हरिपाठ व कांहीं अभंग हें यांचें लोकप्रसिद्ध वाङ्मय होय. यांचा ज्ञानेश्वरी हा ग्रंथ मराठींत अद्वितीय समजला जातो. तत्त्वज्ञानाचे प्रतिपादनाला यांनीं प्रसादपूर्ण काव्याचें रूप आणलें आहे. वारकरी संप्रदायांत तर यांच्या या ग्रंथाला धार्मिकदृष्ट्या पहिलें स्थान प्राप्त झालें आहे. यांच्या ज्ञानेश्वरीच्या उपसंहारांतील कांहीं ओव्या पुढीलप्रमाणें आहेत:

आतां विश्वात्मकें देवें। येणें वाग्यज्ञें तोषावें॥
तोषोनि मज द्यावें। पसायदान हें॥
जे खळाची व्यंकटी सांडो। तया सत्कर्मी रती वाढो॥
भूतां परस्परें पडो। मैत्र जीवाचें॥
दुरितांचें तिमिर जावो। विश्व स्वधर्मसूर्ये पाहो॥
जो जें वांछील तो तें लाहो। प्राणिजात॥

परिशिष्ट १ लें—कालगणनापद्धति

अनंदविक्रमशक—'पृथ्वीराजरासो' या ग्रंथांत सर्व कालविषयक निर्देश या शकांत करण्यांत आले आहेत. हे कालाचे निर्देश चुकीचे आहेत असें कविराज श्यामलदास म्हणतात. मोहनलाल पंड्या यांनीं या शकाचें केलेलें विवरण बरोबर दिसतें. कारण रासोंत दिलेले सर्व कालनिर्देश एक्याण्णव संख्येनें चुकलेले आढळतात. मोहनलालांचें म्हणणें हा स्वतंत्रच शक कवीनें सुरू केला असावा. यांतील शब्द आनंद नसून अनंद असा आहे. याचा अर्थ ९१ असा करतात. पण तो कसा याचा उलगडा नाहीं (म. यु. भा. २. २८-३०).

अमली सन—हा हिजरीचाच एक प्रकार आहे. ओढ्या (ओरिसा, उत्कल) प्रांताचा राजा इंद्रद्युम्न याच्या जन्मतिथीपासून म्हणजे भाद्रपद शुक्ल १२ पासून अमली वर्ष सुरू होतें, आणि संक्रमणकाळीं महिना सुरू होतो, असें या सनाचें वर्णन गिरीशचंद्र यांच्या Chronological Tables या पुस्तकांत आहे. याचे महिनेहि चांद्र असतील असें दिसतें. कन्यासंक्रांति भाद्रपद महिन्यांत द्वादशीपूर्वी किंवा नंतर केव्हांहि होऊं शकेल. एवढी गोष्ट खेरीजकरून विलायती आणि अमली सनाचा आरंभकाल आणि वर्षाचा अंक हीं एकच आहेत.

आदिलशाही संवत्—विजापूरच्या युसुफ आदिलशाहानें स. १६५६ मध्यें आपल्या नांवानें वर्षगणना सुरू केली, असें म्हणतात. पण तिचा उपयोग केल्याचें आढळत नाहीं.

आर्य संवत्—(वैदिक संवत् पाहा).

इलाही संवत्—हा अकबर बादशहानें सुरू केला. ह्याला अकबरी सन असेंहि म्हणतात. हिजरी सन ९६३ रबिउस्सानी महिन्याची तारीख २ शुक्रवार, तारीख १४ फेब्रुवारी स. १५५६, शक १४७७ या दिवशीं अकबर बादशहा गादीवर बसला. हेंच वर्ष या सनाचें पहिलें मानिलें. अकबर व जहांगीर यांच्या नाण्यांवर हा सन पुष्कळदां आहे. शहाजहानच्या कारकीर्दीत हा सन मागें पडला. याचें वर्ष सौर आहे. अबुल फज्ल म्हणतो कीं, " या सनाचे महिने आणि दिवस नैसर्गिक सौर (सावन) आहेत. महिन्यांत दिवसाची क्षयवृद्धि होत नाहीं. महिने आणि दिवस यांचीं नांवें प्राचीन फार्सी आहेत. महिन्याचे दिवस २९ किंवा ३० असतात. त्यांतील प्रत्येकास निरनिराळीं नांवें आहेत. आठवडे मुळींच नाहींत. कांहीं महिन्यांचे ३२ दिवस आहेत." यांत महिन्याचे दिवस २९ किंवा ३० म्हटलें आहे, परंतु प्राचीन फारशी पंचांगांत ३० दिवस असतात. पारशी महिन्यांचीं परवर्दिन इत्यादि नांवें हल्लीं पंचांगांत असतात, तींच या सनाच्या महिन्यांचीं नांवें होत. इलाही सनाच्या वर्षांत १४७६-७७ मिळविले तर शकवर्ष येतें; आणि १५५५।५६ मिळवून इ. स. चें वर्ष येतें.

कपिल संवत्—ओरिसाच्या (पूर्व) गंग वंशांतील चवथ्या वीरभानूचा कपिलेंद्रदेव प्रधान होता. त्यानें हा संवत् सुरू केला. याचा आरंभ स. १४३५ च्या पूर्वी मानतात.

कलचुरि संवत्—(चेदि संवत् पाहा).

कलिवर्ष किंवा संवत्—सनपूर्व ३१०२ या वर्षीं कलियुग सुरू झालें. यांत सध्यांचा स. १९३७ मिळविला म्हणजे आजचें कलिवर्ष म्हणजे गतकलि ५०३९ येतो. शकांत ३१७९ मिळवून गतकलि निघतो. कलियुगाच्या आरंभापासूनच युधिष्ठिरसंवताचा आरंभ धरतात.

कोल्लमकाल (अथवा परशुरामकाल)—याच्या वर्षाला कोल्लम आंडु असें म्हणतात. कोल्लम म्हणजे पश्चिमेकडील आणि आंडु म्हणजे वर्ष. हा काल मलबार प्रांतांत मंगलोरपासून कुमारीपर्यंत आणि तिनेवल्ली जिल्ह्यांत सुरू आहे. ह्याचें वर्ष सौर आहे. मलबारच्या उत्तर भागांत कन्नी (कन्या) मासापासून यांचें वर्ष सुरू होतें; आणि तिनेवल्ली प्रांतांत चिंगम (सिंह) मासापासून होतें. मलबार प्रांतांत याच्या वर्षाचीं नांवें मेष, वृषभ इत्यादि राशींच्या नांवाचे अपभ्रंश आहेत. १००० वर्षांनीं ह्याचें एक चक्र होतें, आणि सांप्रतचें चक्र चौथें आहे असें म्हणतात. परंतु हल्लीं याची वर्षगणना १००० हून जास्त प्रमाणांत आहे. शकवर्ष १८१८ याच्या आरंभीं कोल्लमवर्ष १०७२ आहे. शक वर्ष ७४७ (स. ८२५) या वर्षीं कोल्लमवर्ष पहिलें होतें. याच्या पूर्वी कोल्लमवर्ष प्रचारांत होतें असें दिसत नाहीं. कोल्लमवर्षांत ७४६।४७ मिळवून शकवर्ष होतें; आणि ९३५ मिळवून कार्तिकादि विक्रम संवत् येतो, व ८२४-२५ मिळवून सन येतो (चेरमाण पेरुमाल पाहा).

ख्रिस्तिकाल—इंग्रजी राज्य सुरू झाल्यानंतर हा काळ सर्वत्र प्रचारांत आहे. या सनाचें वर्ष सायन सौर आहे. वर्षारंभ जानेवारी १ तारखेस होतो. सांप्रत जाने-

वारी महिन्याचा प्रारंभ अमान्त पौषांत होतो. स. १७५२ मध्यें इंग्लंडांत न्यू स्टाईल सुरू झाली. शकांत ७८।७९ मिळवून सन काढतां येतो.

गंग-संवत्—इंद्राधिराज गंगाचें गंग-संवत् ८७ (स. ६६३) मधील दानपत्र मिळालें आहे. त्यावरून स. ५७६ च्या सुमारास एक गंग-संवत् सुरू झालेला दिसतो.

२. स. ८७८-९७ पर्यंत राज्य केलें, तेव्हां आपल्या नांवानें सन सुरू केला. त्यावरून इतरांचा कालनिर्णय होतो. हा दुसरा गंग संवत् होय (प्रवर्द्धमान गंग पाहा).

गुप्तकाल—हा काल सांप्रत प्रचारांत नाहीं. पण याचा आरंभ स. ५७६ च्या सुमारास झाला असावा असें सिद्ध करण्याचा प्रयत्न झाला आहे (ज्ञानकोश प्रस्ता. ५, पा. ११३). याचें वर्ष वर्तमान आहे; तें चैत्रादि आहे; आणि मास पौर्णिमान्त आहेत. शकवर्ष २४२ चैत्र शुद्ध प्रतिपदा हा गुप्तकालाचा आरंभ होय. गुप्तवर्षांत २४१ मिळविले म्हणजे शकवर्ष येतें; ३१९।२० मिळविले म्हणजे इसवी सन येतो. मध्य हिंदुस्थानांत आणि नेपाळांत हा काल प्रचारांत होता. गुप्त नांवाचे राजे याचा उपयोग करीत असत. हाच पुढें वलभी नांवानें चालूं लागला.

चालुक्यविक्रमकाल—पश्चिम चालुक्य राजा सहावा विक्रमादित्य यानें शालिवाहनशकाऐवजीं आपला एक शक प्रचारांत आणला. याला त्याच्या नांवावरून 'चालुक्यविक्रमकाल' व 'चालुक्यविक्रमवर्ष' म्हणत असत. या शकाचें पहिलें वर्ष म्हणजे त्याच्या राज्यारोहणाचें पहिलें वर्ष होय. अनळ अथवा नळ संवत्सर, शालिवाहन शक ९९८ म्हणजे स. १०७५-७६ होय. परंतु हा शक फाल्गुन शुद्ध पंचमी शालिवाहन शक ९९८ (ता. १४ फेब्रुवारी स. १०७६) रोजीं सुरू झाला असें दिसतें. ही तारीख माबेल डफनें शिलालेखांच्या आधारें दिली आहे. इलियटनें हिरेमुद्दनूर, कुर्तकोटी, अरलेश्वर, लक्ष्मेश्वर, नरेगळ वगैरे ठिकाणच्या शिलालेखांवरून या शकाच्या आरंभाचें (स. १०७५) वर्ष दिलें आहे. परंतु हें वर्ष याप्रमाणें एक येत नसून निरनिराळें येतें. मात्र त्यांत फारसा फरक न येतां एखाद्या वर्षाचेंच अन्तर येतें (इंडि. अँटि. पु. २२)

चिनी-संवत्—चिनी देशाचा हिंदुस्थानशीं पुष्कळ घनिष्ठ संबंध होता. त्या वेळीं हिंदु यात्रेकरू व चिनी यात्रेकरू हे दोन्हीं देशांत जात येत असत व हिंदु लोकांनीं त्याप्रमाणें आपल्या 'भ्रमण-वृत्तांतांत' चीन देशाची बरीच माहिती लिहिली आहे. विक्रमसंवत् १९९४ मध्यें चिनी संवत् ९६००२४३६ वर्षांचा मानतात; व हाच चिनी संवताचा प्रारंभकाल मानतात. चीनला फार्सी भाषेंत खता म्हणतात व चिनी सनाला 'खताई संवत्' असें म्हणतात. चिनी पंचांगांत सौर आणि चांद्र या दोन्ही रीतीनें वर्षगणना करतात.

चेदिसंवत्—हा काल सांप्रत प्रचारांत नाहीं. चेदिवर्ष ७९३ पासून ९३४ पर्यंतच्या कालांतले १० ताम्रपटादि लेख पाहून प्रो. कीलहॉर्न यानें असें अनुमान काढलें आहे कीं, चैत्रादि विक्रमसंवत् ३०५ (शकसंवत् १७० स. २४८।४९) आश्विन शुद्ध प्रतिपदा हा चेदिकालाचा आरंभ होय; याचें वर्ष अश्विनादि आहे; तें वर्तमान आहे; आणि त्याचे महिने पौर्णिमान्त धरतात. चेदिवर्षांत १६९-७० मिळविले म्हणजे शकवर्ष येतें; २४७-४८ मिळविले म्हणजे इसवीसनाचें वर्ष येतें. पश्चिम हिंदुस्थानांतले आणि मध्यहिंदुस्थानांतले कलचुरी राजे ह्या कालाचा उपयोग करीत असत. आणि त्यांच्यापूर्वी देखील हाच काल हिंदुस्थानच्या त्या भागांत चालत असे असें दिसतें. पौर्णिमान्त आश्विन कृष्ण १ म्हणजे अमान्त भाद्रपद कृष्ण १ हा चेदिवर्षारंभ असावा, असें शं. बा. दीक्षितांचें मत आहे.

जव्हार संवत्-जव्हार संस्थानचे नेमीशाहा यांस शाहा ही पदवी मिळाल्यापासून हा नवीन शक सुरू झाला. ही गोष्ट शके १२६५ ज्येष्ठ शु. १२ रोजीं झाली. या शकाचा आरंभ मृगापासून धरतात. जव्हार संस्थानांत या शकाचा उपयोग करितात (मं. वार्षिक १८३७, पा. १८८).

जिन संवत्-(वीर संवत् पाहा).

टिपू संवत्—(मल्लूदी सन पाहा).

जुलूसी संवत्-प्रत्येक मोगल बादशाहा आपल्या राज्याभिषेकाच्या दिवशीं हा सुरू करी.

तुर्की संवत्-प्राचीन इतिहासांत कांहीं कांहीं ठिकाणीं तुर्की संवत्चाहि उल्लेख मिळतो. या संवत्चा कुंस्तंतुनीया नगरामध्यें प्रारंभ झाला. तुर्क लोक ह्या संवताची गणना सृष्टीच्या आरंभाबरोबर झाली असें धरतात. हा संवत् ख्रिस्ताच्या ग्रीकचर्च या सांप्रदायामध्येंहि प्रचलित आहे.

तुर्कांमध्यें दुसरा एक संवत् आहे; त्याची गणना गाजलीम बादशहाबरोबर करतात. प्रत्येक तीन वर्षांनीं एक अधिक मास धरतात. ज्या महिन्याला कुंभेची संक्रांत असेल त्या महिन्याच्या अमावास्येपासून वर्षारंभ होतो. ते युगाला करण असें म्हणतात आणि १२ वर्षांचें युग असें मानतात. वर्षाला 'ईल' असेंहि म्हणतात.

भाषा-तज्ज्ञांनीं इंग्रजीच्या Year या शब्दाची उत्पत्ति ह्या 'ईल' शब्दावरून मानली आहे. यांत बारा वर्षांचें एक चक्र धरतात. त्यांचीं नांवें तिबेटीवरून घेतलीं असावींत (मं. त्रै.१६, पृ. ५१). तसेंच पंडित खुशीलाल शास्त्रींनीं आपल्या 'नक्षत्रसूची' या पुस्तकांत तीं नांवें चीनमध्यें चालूं असल्याचेंहि लिहिलें आहे. हीं नांवें प्रायः राशींचीं आहेत.

दयानंद-संवत्—स्वामी दयानंद यांचा जन्म विक्रमसंवत् १८८१ मध्यें झाला. यांचा मृत्यु विक्रम-संवत् १९४० मध्यें दिवाळीच्या दिवशीं झाला. पहिल्या प्रथम हा संवत् स्वामीजींच्या मृत्यूवरून धरला जात होता; पण विक्रमसंवताप्रमाणें 'महर्षि दयानंद शताब्दि' या नांवाचा उत्सव साजरा केला; या वेळेपासून त्यांच्या जन्मतिथीवरून या संवताचा आरंभ मानला जातो. याप्रमाणें विक्रमसंवत् १९८१ मध्यें ४२ वें वर्ष होतें आणि नवीन नियमानुसार १०१ वर्ष येतें.

नेवार संवत्—नेपाळांत हा काल शक १६९० पर्यंत सुरू होता. याचें वर्ष कार्तिकादि आहे व मास अमान्त आहेत. संस्कृत ग्रंथांत आणि ताम्रपटादि लेखांत याला नेपालकाल असें म्हणतात. याच्या वर्षांत ८००।८०१ मिळवून शकवर्ष येतें; ८७८।७९ मिळवून सनाचें वर्ष येतें; आणि ९३५ मिळवून कार्तिकादि विक्रम संवत् येतो (जयदेवमल्ल पाहा). नेपाळांत याचा प्रारंभ राजा राघव-देवानें केला आणि राजा पृथ्वीनारायणानें बंद करून शालिवाहनशक सुरू केला. नेवार हा नेपाळचा अपभ्रंश आहे.

पार्थियन संवत्—ह्या संवतचें नांव अद्यापिहि भारत-इतिहासमध्यें मिळत नाहीं, परंतु कधींकधीं याचा उल्लेख बुद्धाच्या समकालीन इतिहासामध्यें सांपडतो. विक्रमसंवतच्या १९० व्या वर्षी अँटी ओकसच्या मृत्यूनंतर इराणांतील पार्थ लोकांनीं हा संवत् सुरू करून आम्ही स्वतंत्र आहोंत असें जाहीर केलें. पहिल्या प्रथम स्मिथ-साहेबानें हा संवत् शोधून काढिला. या संवतचें नवें वर्ष एप्रिलआरंभीं सुरू होतें. याचा इ. पू. २४७ च्या आसपास आरंभ होतो.

परशुरामशक—(कोल्लमकाल पाहा).

पारसी संवत् (यज्दजर्द सन)—पारसी लोकांना मुसलमान 'आतिशपरस्त' (अग्निपूजक) असें म्हणतात. यांचा जुना संवत् इराणच्या पहिल्या राजापासून मोजला जातो. तो विक्रमसंवत् १९९४ (स. १९३७) मध्यें १८९९०६ होता. महिना तीस दिवसांचा आणि वर्ष बारा महिन्यांचें आहे. वर्षाच्या शेवटीं पांच दिवस अधिक धरून वर्षाचे ३६५ दिवस करतात. महिन्याच्या तीस दिवसांची आणि वर्षाच्या शेवटीं धरावयाच्या पांच दिवसांचीं वेगळालीं स्वतंत्र नांवें आहेत. पुनः एकशेंवीस वर्षांनीं महिन्याच्या अनुक्रमानें एक महिना अधिक धरतात आणि सौरमानाशीं जुळवून घेतात.

फसली सन—हें पिकाच्या हंगामाचें वर्ष अकबर यानें सुरू केलें. प्रथम हिजरी सनाचाच वर्षांक यास लाविला. परंतु हिजरी वर्ष केवळ चांद्र आहे (३५४ दिवसांचें आहे); व फसली हें सौर आहे; यामुळें पुढें वर्षाच्या अंकांत फरक पडत चालला. हिजरी सन ९६३, इसवी सन १५५६ या वर्षीं म्हणजे अकबर राज्यावर बसला त्या वर्षी उत्तर हिंदुस्थानांत फसली सन सुरू झाला; आणि दक्षिण हिंदुस्थानांत शहाजहान बादशहानें स. १६३६ म्हणजे हिजरी सन १०४६ या वर्षी तो सुरू केला. प्रथम त्यास वर्षांक हिजरी सनाचा म्हणजे १०४६ लागला. आणि त्या वेळीं उत्तरेकडील फसली सन १०४४ होता. यामुळें दक्षिणेकडील फसली वर्षाचा अंक उत्तरेच्या अंकापेक्षां जास्त झाला (हिजरी वर्ष केवळ चांद्र म्हणून असें झालें). वर्षारंभ दोहोंकडे भिन्न धरल्यामुळें आणखी कांहीं महिन्यांचें अंतर पडलें. हें वर्ष केवळ सरकारी असल्या-मुळें आणि याचा धर्माशीं संबंध नसल्यामुळें ह्याचा वर्षारंभ अनियमित झाला असें दिसतें. मद्रास इलाख्यांत प्रथम ह्या वर्षाचा आरंभ आडी (कर्क) महिन्याच्या पहिल्या दिवशीं होत असे. इ. स. १८०० मध्यें इंग्लिश सरकारनें जुलईच्या १३ तारखेस ठरविला. मुंबई इलाख्याच्या कांहीं भागांत सूर्य मृगनक्षत्रीं जातो. त्या दिवशीं (हल्लीं जूनच्या ५, ६, किंवा ७ तारखेस) फसली वर्षाचा आरंभ होतो म्हणजे तो सौर आहे; परंतु याचे महिने मोहरम इत्यादि चांद्र आहेत. उत्तर हिंदुस्थानांत बहुधा सर्वत्र पूर्णिमान्त मानाच्या आश्विन कृष्ण प्रतिपदेस फसली वर्षाचा आरंभ होतो. म्हणजे तेथलें फसली वर्ष चांद्रसौर आहे. बंगाल्यांत फसली १३०० या वर्षाचा आरंभ स. १८९२ च्या सप्टेंबरांत झाला. आणि दक्षिणेंत स. १८९० च्या जून किंवा जुलई महिन्यांत फसली सन १३०० हें वर्ष लागलें. दक्षिणेंतील फसली सनाच्या वर्षांत ५१२।१३ मिळवून शक निघतो; आणि ५९०।९१ मिळवून इ. स. निघतो. बंगाल्यांतील फसली वर्षांत ५१४।१५ मिळविले म्हणजे शकवर्ष निघतें, आणि ५९२।९३ मिळवून इ. स. निघतो. बंगाल्यांतील फसली, विलायती आणि अमली या तिन्ही सनांचा अंक वर्षांत फार तर १८ दिवस खेरीज करून एकच असतो. या तिन्ही सनांहून बंगाली सन फक्त सुमारें ६।७ महिन्यांनीं धाकटा आहे. वस्तुतः बंगाली, विलायती, अमली आणि बंगाली फसली यांचें मूळ एकच

फसली सन हें होय. पुढें त्याच्या आरंभांत थोडा थोडा फरक पडला हें उघड दिसतें.

फारुकी—खानदेशांतील फारुकी राजांच्या कांहीं पत्रांत सूरसनाचा आंकडा दोहोंच्या फरकांनीं आढळतो, असें श्री. ग. ह. खरे यांनीं सिद्ध करून दाखविलें आहे (मं. त्रै. १३ पा.).

बंगाली—हा बंगाल्यांत प्रचारांत आहे. याचें वर्ष सौर आहे. याचा आरंभ मेषसंक्रांतीस होतो. महिन्याचीं नांवें चैत्र, वैशाख अशीं चालूंच आहेत. मेषसंक्रांतीला जो महिना सुरू होतो त्याला वैशाख म्हणतात (यालाच तामिळ प्रांतांत चैत्र म्हणतात). बंगाली सन १३४४ म्हणजे शकवर्ष १८५९ व इ. स १८३६।३७ होय. बंगाली सनांत ५१५ मिळविले म्हणजे शकवर्ष निघतें; ५९३।९४ मिळविले म्हणजे इ. स. निघतो (मगी संवत् पाहा).

बुद्धनिर्वाणसंवत्—याच्या निर्वाणकालाबद्दल विद्वानांत मतभेद असले (ज्ञानकोश प्रस्ता. ५, पा. १८ पाहा) तरी ख्रि. पू. ४८७ हा काल बरोबर असण्याचा संभव आहे, असें पं. गौ. हि. ओझा यांना वाटतें (प्राचीन लिपिमाला द्वितीयावृत्ति, पा.१६४), व व्ही. ए. स्मिथचेंहि तसेंच म्हणणें आहे. आम्हीं निर्वाणकाल ख्रि. पू. ४९० असा दिला आहे. तें एक मत आहे.

ब्रह्मदेशसंवत्—ब्रह्मदेशांत या संवताचा आरंभ बौद्धधर्माच्या प्रचाराबरोबर झाला. विक्रमसंवताच्या ४८६ वर्षांपूर्वी या संवताची सुरुवात धरतात. ब्रह्मदेशांतील बौद्ध साहित्यांत याचा निर्देश आढळतो.

मगीसंवत्—हा एक बौद्धसंवताचा प्रकार आहे. हा चितागांग प्रांतांत सुरू आहे. हा बंगाली संवताहून ४५ वर्षांनीं लहान आहे. बौद्धधर्माचा प्रचार ज्या प्रांतांत जेव्हांपासून झाला तेव्हांपासून असे कांहीं संवत् सुरू केलेले दिसतात.

मव्लुदी सन—ही वर्षगणना म्हैसूरच्या टिपूनें सुरू केली. हिजरीसन मुहम्मद पैगंबराच्या पलायनापासून सुरू झाला. पण हा जन्मापासून झाला (स. ५७५ एप्रिल २०). ही वर्षगणना चांद्रसौर आहे. वर्षारंभ चैत्र शुद्ध प्रतिपदेपासून धरीत (मंडळांतील नाणीं, पा. ६-७).

महावीरनिर्वाणसंवत् (वीर-निर्वाणसंवत्).

मौर्यसंवत्—मौर्यविरोधी कलिंग देशचा प्रतापी जैनसम्राट् खारवेल याचा 'हाथी-गुफा' या ठिकाणीं एक शिलालेख सांपडला आहे त्यावरून ह्या संवतचा काल सांपडतो. मौर्यसम्राट् चंद्रगुप्त यानें हा संवत सुरू केला होता. जैनधर्मी प्रसिद्ध विद्वान् हेमचंद्रसूरीनें बुद्ध-संवतापासून १५५ वर्षे बाद करून चंद्रगुप्ताचा शासनकाल सिद्ध केला. वि. पू. ४७० वर्ष म्हणजे पहिल्या महावीरस्वामीचा निर्वाणकाल मानला आहे. आतां ४७० मधून १५५ वजा केले तर ३१५ उरतात; यावरून हें सिद्ध होतें कीं, वि. पू. ३१५ वे हें वर्ष या संवताचें पहिलें वर्ष होय. हा संवत् कार्तिक शुक्ल अथवा चैत्र शुक्ल ह्या दोन्ही रीतीनें सुरू होतो. पूर्व आणि उत्तर हिंदुस्थानांत चैत्र शुक्लपासून मोजतात आणि दक्षिण व पश्चिम हिंदुस्थानांत कार्तिक शुक्लाप्रमाणें मोजतात.

युधिष्ठिर-शक-(कलिसंवत् पाहा).

राजशक (अथवा **राज्याभिषेकशक**)—मराठी राज्याचा संस्थापक शिवाजी यानें हा काळ सुरू केला. शिवाजीस राज्याभिषेक झाला त्या दिवसापासून, म्हणजे ज्येष्ठ शुद्ध १३ शक १५९६ आनंदसंवत्सर या दिवशीं हा सुरू झाला. याचें वर्ष सदरहू तिथीस बदलतें. बाकी सर्व गोष्टींनीं याची पद्धति दक्षिणेतील चांद्रसौर अमान्त शकवर्षाप्रमाणें आहे. या कालाच्या वर्षांत १५९५।९६ मिळवून शकवर्ष येतें, आणि १६७३।७४ मिळवून इसवी सनाचें वर्ष येतें. हा नानाफडणीस व सखारामबापू यांनीं बहुधा गैरसोयीचा म्हणून हुकूम काढून स. १७७७ मध्यें बंद केला असें धडफळे यादींत लिहिलें आहे (मं. वा. इ. १८३५, पृ. ३७५). म्हणजे हा शक १०४ वर्षे चालला. पण सातारचे छत्रपति हा शेवटपर्यंत वापरीत. पण हा सार्वत्रिक करण्याचा केव्हांच प्रयत्न झालेला दिसत नाहीं.

लक्ष्मणसेनकाल-हा काल तिरहूत आणि मिथिला या प्रांतांत विक्रमकाल किंवा शककाल यांबरोबर प्रचारांत आहे. याच्या आरंभकालाविषयीं मतभेद आहे. कोलब्रूक(स. १७९६)च्या मतें याचें पहिलें वर्ष स. ११०५ त होतें. बुकनन(स. १८१०)च्या मतें तें स. ११०५ किंवा ११०६ मध्यें होतें. स. १७७६ पासून १८८० पर्यंतच्या तिरहूत प्रांतांतील पंचांगांवरून दिसतें कीं तें स. ११०८ किंवा ११०९ मध्यें होतें. बुकनन म्हणतो कीं, वर्षाचा आरंभ आषाढांतील पौर्णिमेच्या दुसरे दिवशीं म्हणजे पौर्णिमांत श्रावण कृष्ण प्रतिपदेस होतो. परंतु राजेंद्रलाल मित्र (स. १८७८) आणि जनरल कनिंगहम म्हणतात कीं, तो (पूर्णिमान्त) माघ वद्य प्रतिपदेस होतो. डॉक्टर कीलहॉर्ननें स. ११९४ पासून १५५१ पर्यंत या कालांतले दहा लेख पाहून त्यावरून असें अनुमान काढलें कीं, या कालाचें वर्ष कार्तिकादि आहे; महिने अमान्त आहेत; आणि

याचें पहिलें वर्ष शक १०४०।४१ मध्यें होतें. अकबरनामा या ग्रंथांतील अबुल फज्ल याच्या लेखाशीं हें अनुमान मिळतें. याप्रमाणें या कालाच्या वर्षांत १०४०।४१ मिळवून शकवर्ष येतें; ११०८।०९ मिळवून इसवी सन येतो; आणि ११७५ मिळवून कार्तिकादि विक्रमसंवत् येतो.

वलभिसंवत्—गुप्त या नांवाच्या ठिकाणीं वलभि हें नांव येऊन पुढें चालला. याच्या चौथ्या शतकांत हा काठेवाड प्रांतांत सुरू झाला, आणि या वेळीं याच्या वर्षाचा आरंभ चैत्रांत होता, तो हा पूर्वीच्या कार्तिक शुद्ध प्रतिपदेस म्हणजे ५ महिने मागें गेला. याचें वर्ष वर्तमान व कार्तिकादि आहे. महिने पौर्णिमान्त आणि अमान्त दोन्ही आहेत. वलभिवर्षांत २४०।४१ मिळविले म्हणजे शकवर्ष येतें; आणि ३१८।१९ मिळविले म्हणजे इसवी सन येतो. गुप्तसंवत् अथवा वलभिसंवत् ८२ पासून ९४५ पर्यंत कालांतले ताम्रपटादि लेख सांपडले आहेत.

विक्रमसंवत्—सांप्रत हा संवत् गुजराथ व बंगाल या प्रांतांखेरीज सगळ्या उत्तर हिंदुस्थानांत प्रचारांत आहे. नर्मदेच्या उत्तरेस याचें वर्ष चैत्रादि आहे आणि महिने पूर्णिमान्त आहेत. परंतु गुजराथेंत वर्ष कार्तिकादि आहे, आणि मास अमान्त आहेत. काठेवाड आणि गुजराथ यांच्या कांहीं भागांत विक्रमसंवताचें वर्ष आषाढादि आहे आणि मास अमान्त आहेत.

स. ४५०–८५० पर्यंत या कालाला मालवकाल म्हणत. याचा निर्विवाद असा निर्देश प्रथम एका काव्यांत येतो (विक्रमादित्य पाहा). शकांत १३४।१३५ मिळवून कार्तिकादि विक्रमवर्ष येतें आणि १३५ मिळवून चैत्रादि वर्ष निघतें (विक्रमादित्य गर्दभिल्ल पाहा).

विलायती सन—हा हिजरीचाच एक प्रकार आहे. हा सन बंगालच्या कांहीं भागांत आणि मुख्यतः उत्कल प्रांतांत चालतो. याचें वर्ष सौर आहे. परंतु महिन्यांचीं नांवें चांद्रच आहेत. वर्षाचा आरंभ कन्यासंक्रांतीच्या दिवशीं होतो. महिन्याचा आरंभ बंगाल्यांत संक्रांतीच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या दिवशीं होतो; परंतु विलायती सनाच्या महिन्यांचा आरंभ संक्रांतीच्या दिवशींच होतो. विलायती सनाच्या वर्षांत ५१४।१५ मिळविले म्हणजे शकवर्ष निघतें; ५९२।९३ मिळविले म्हणजे इसवी सन निघतो. हा सूरसनाचाच एक प्रकार होय.

वीरनिर्वाणसंवत्—महावीर स्वामी निर्वाणाला गेल्यापासून हा मोजतात. ते ख्रि. पू. ५२६ अश्विन वद्य अमावास्येस निर्वाणाला गेले. विक्रमसंवतांत ४७०, सनांत ५२७ व शकांत ६०५ मिळविले कीं, हा सन येतो.

वैदिक संवत्—यालाच आर्यसंवत् किंवा सृष्टिसंवत् असें म्हणतात. वैदिक लोक सृष्टीच्या आरंभापासून वर्षगणना करितात आणि तिचा आपल्या धर्मकृत्यांतील संकल्पापूर्वी नित्य उल्लेख करितात. सध्यां ब्रह्मदेवाच्या दिवसाचा दुसरा प्रहर, श्वेतवाराहकल्प, वैवस्वतमन्वंतर, चातुर्युगांतील अठ्ठाविसाव्या कलियुगाचा प्रथम चरण आहे. कलिसंवत् वर दिला आहे. याची एकूण संख्या सध्यां दोन अब्जाला थोडी कमी होते.

शककाल—ज्योतिषकरणग्रंथांत हाच काल घेतात. ज्योतिष्यांनीं ह्यास आश्रयस्थान दिल्यामुळेंच हा इतकीं वर्षें टिकला. नाहींतर गुप्तकाल, शिवाजीचा राज्याभिषेकशक, इत्यादि अनेक कालांप्रमाणें कधींच लयास गेला असता. सांप्रत तिनवेल्ली आणि मलबारचा कांहीं भाग हे प्रदेश खेरीजकरून सगळ्या दक्षिण हिंदुस्थानांत व्यवहारांत हाच काल मुख्यत्वें आहे. हिंदुस्थानच्या इतर भागांत स्थानिक कालाबरोबर हा काल चालतो. ह्याचें वर्ष चांद्र आणि सौर आहे. तामिळ आणि बंगाल प्रांतांत सौरवर्ष चालतें आणि इतर प्रांतांत चांद्रवर्ष चालतें. त्यांत चांद्रवर्ष चैत्रादि आहे आणि सौरवर्ष मेषादि आहे. नर्मदोत्तर भागीं ह्याचे महिने पौर्णिमान्त आहेत, आणि दक्षिण भागीं अमान्त आहेत. शालिवाहनशकांत ७८ मिळविले असतां इ. स. येतो; आणि १३४ मिळविले असतां विक्रमसंवत् येतो. हा शालिवाहन व शक यांचे युद्धांत शालिवाहनाचा जय झाला तेव्हां सुरू झाला असावा.

सप्तर्षिकाळ—सांप्रत हा काळ काश्मीरांत व त्याच्या आसपासच्या प्रदेशांत आहे. अल्बेरूनीच्या वेळीं हा काळ काश्मीरांत, मुलतानांत आणि कांहीं इतर प्रांतांतहि चालू होता असें दिसतें. राजतरंगिणींत सगळा इतिहास ह्याच काळाच्या वर्षांनीं सांगितला आहे. कधींकधीं या काळास लौकिककाळ किंवा शास्त्रकाळ म्हणतात. सप्तऋषींना गति आहे. ते शंभर वर्षांत एक नक्षत्र आक्रमितात आणि २७०० वर्षांत भचक्र फिरतात या समजुतीवर ही कालगणना प्रचारांत आली.

सिंहसंवत्—हा संवत् गुजराथ आणि काठेवाड या प्रांतांत सुरू होता. सिंहसंवत् ३२, ५१, ९३, ९६, यांतील लेख सांपडले आहेत (इंडि. अँटि. १८.१९). त्यावरून असें अनुमान आहे कीं, याचें वर्ष चांद्रसौर आहे; त्याचा अंक वर्तमान असतो; महिने अमान्त आहेत; (फक्त एका उदाहरणांत पूर्णिमान्त आहेत.) वर्ष बहुधा

आषाढादि आहे; चैत्रादि अथवा कार्तिकादि खचित नाही. सिंहसंवतांत १०३५।३६ मिळवून शकवर्ष येते, १११३।१४ मिळवून इसवी सन येतो आणि ११७० मिळवून आषाढादि विक्रमसंवत् येतो (गौ. ओ.).

सूरसन अथवा **शुद्धूर (महिने) सन**—याला कधीं कधीं अरबी सन असेंहि म्हणतात. स. १३४४, हिजरी, सन ७४५ या वर्षी सूरसन सुरू झाला, आणि प्रथम हिजरी सनाचा अंक ७४५ हाच त्यास लाविला. फसली सन दक्षिणेंत सूरसनानंतर २९२ वर्षांनीं हिजरी सन १०४६ या वर्षी सुरू झाला, तेव्हां सूरसन १०३७ होता. म्हणून सूरसन आणि दक्षिणी फसली सन यांत ९ अंतर पडलें. मराठ्यांच्या कारकीर्दीत सूरसन फार प्रचारांत होता. हा मुंबई इलाख्यांतील फसली सनाहून ९ वर्षांनीं लहान आहे; परंतु इतर सर्व गोष्टींत दोन्हीं एकच आहेत. ह्याच्या वर्षाचा आरंभ सूर्य मृगनक्षत्रीं जातो तेव्हां होतो. म्हणून यांचें वर्ष सौर आहे. परंतु यांचे महिने मोहरम इत्यादिक चांद्र आहेत. सूरसनाच्या वर्षांत ५२१।२२ मिळविले म्हणजे शक येतो आणि मृगापूर्वी ६०० व मृगानंतर ५२९ मिळवून सन येतो. बंगाली, दिवाणी आणि अमली हे सन उत्तरेकडील फसलीचे विशेष प्रकार होत, आणि उत्तरेकडील फसली, दक्षिणी फसली व सूरसन हे हिजरीचे विशेष प्रकार होत.

मराठेशाहींतील मोडी पत्रांत सुमा अशीं अक्षरें सूरसनाकरितां वापरलेलीं दिसतात. पण तीं सु काढून दोन रेघा असाव्यात.

उत्तरकालीन मराठी पत्रांत हा फार वापरण्यांत येई. या वर्षाची गणना अंकांनीं न करतां शब्दांनीं करण्याची रीत आहे. या वर्षांत १ पासून १० आणि २० पासून (दहांचा आंकडा) १०० पर्यंत, तसेंच पुढें शत आणि सहस्र या अंकांना पुढील निरनिराळीं नांवें आहेत.

१ इहिदे	११ इहिदे अशर	१२२ इसन्ने अशरीने मया
२ इसन्ने	२० अशरीन	२०० मय्या तैन
३ सल्लास	३० सल्लासीन	३०० सल्लास मय्या
४ आबी	४० आर्बैन	४०० अर्बा मय्या
५ खमस	५० खमसैन	५०० खमस मय्या
६ शीत	६० शीतैन	१००० अल्फ
७ सब्बा	७० सब्बैन	११०० मय्या व अल्फ
८ सम्मान	८० सब्ब नीन	१२०० मय्या तैन व अल्फ
९ तिस्सा	९० तिस्सैन	१२३० सल्लासीन मय्या तैन व अल्फ
१० अशर	१०० मय्या	१३१३ सल्लास अशर सल्लास-मय्या व अल्फ.

सेल्युकस-संवत्—सिकंदरच्या मृत्यूनंतर १२ वर्षांनीं सेल्युकसने हा संवत् सुरू केला. भारतीय पंचांगांत ज्याला स्थान मिळालें तो हा पहिला विदेशी संवत् होय. विशेषतः हा संवत् नाण्यांवर सांपडतो. याचा पहिला दिवस ऑक्टोबरची पहिली तारीख मानिली जाते. हा संवत् ख्रि. पू. ३१२ पासून प्रचलित आहे. हें पंचांग व यूनानी पंचांग सारखेंच होते.

हर्षसंवत्—कनोजच्या राजा हर्षवर्धनानें आपल्या राज्याभिषेकापासून (स. ६०७) हा संवत् सुरू केला. अल्बेरुनीच्या वेळीं कनोज व मथुरा येथें हा संवत् सुरू होता. हल्लीं हा प्रचारांत नाहीं. या कालाच्या दुसऱ्या व तिसऱ्या शतकांतील दहाबारा ताम्रपट व शिलालेख मिळाले आहेत. त्यांत फक्त संवत् असें म्हटलें आहे. हर्षसंवतांत ५२८ मिळवून शक येतो व ६०६।७ मिळवून सन येतो.

हिजरी—हा मूळचा अरबस्थानांतला होय. मुसलमानांच्या अमलापासून तो ह्या देशांत आला. हिजरा म्हणजे पळणें. मुसलमानांचा पैगंबर मुहंमद हा इ. स. ६२२ ता. १५ जुलै; शक ५४४ श्रावण शुद्ध १ गुरुवार (मुसलमानी शुक्रवारच्या) रात्रीं मक्केहून मदिनेस पळून गेला. म्हणून या सनास हिजरी म्हणतात आणि त्या पळण्याची वेळहि या सनाची आरंभ-वेळ धरिली आहे. (मुहम्मदाचा जन्म अरबस्थानांतील मक्का येथें स. ५७५ एप्रिल २०, मृत्यु स. ६३२.) ह्या सनाचे महिने मोहरम इत्यादि चांद्र आहेत आणि अधिक मास मुळींच धरीत नाहींत, यामुळें वर्ष केवळ चांद्र म्हणजे ३५४ किंवा ३५५ दिवसांचें आहे आणि यामुळें दर ३२ किंवा ३३ सौर वर्षांत या सनाच्या वर्षाचा अंक कोणत्याहि सौर कालाच्या वर्षाच्या अंकापेक्षां १ नें वाढतो. शुक्ल प्रतिपदा किंवा द्वितीया या तिथीस चंद्रदर्शन झाल्यापासून महिना सुरू होतो. महिन्याचा पहिला दिवस, दुसरा दिवस म्हणण्याऐवजीं पहिला चंद्र, दुसरा चंद्र, असें म्हणतात. असे चंद्र (दिवस किंवा तारखा) महिन्यांत २९ किंवा ३० होतात. वाराचा आणि तारखेचा आरंभ सूर्यास्तीं होतो. यामुळें आमची गुरुवारची रात्र मुसलमानी शुक्रवारची रात्र होय. दिवसांस वाराचें नांव दोघांचें एकच असतें.

परिशिष्ट २ रें–वंशावळी, वंशावरील टीपा व राजवंश यांची सूचि

अमात्यांचा वंशवृक्ष (गगनबावडा)
आदिलशाही घराणें (वंशवृक्ष)
आंग्र्यांची वंशावळ
आंध्र (विवेचन) व आंध्रघराण्यांतील शेवटले राजे
इचलकरंजीकर यांची वंशावळ
इमादशाही घराणें (बऱ्हाड) वंशवृक्ष
इंगळे यांची वंशावळ
उद्धवचिद्घन (चैतन्यवंश)
ओढेकर वंशवृक्ष
औंक अथवा अवुक घराणें (वंशवृक्ष)
औंधच्या प्रतिनिधींचा वंशवृक्ष
कच्छवाहवंश (अंबर किंवा जयपूर)
कदम बांडे वंश, पा. १९१
१ कदंब वंश (गोवा) १९०
२ ,, (बनवासी) १९२
३ ,, (हानगळ किंवा पानुंगळ) १९३
कमान वंश
१ कलचुरि वंश (कल्याणी)
२ ,, (त्रिपुरीचे हैहय)
३ ,, (रतनपूर)
[illegible]
[illegible]
१ [illegible] (राजवंश)
२ [illegible] (राजवंश)
३ [illegible] (राजवंश)
४ [illegible] (राजवंश)
५ [illegible] (राजवंश)
६ [illegible] (राजवंश)
[illegible] (टीप)
[illegible] (टीप व राजवंश)
[illegible] (टीप व राजवंश)
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible] (टीप व राजवंश)
[illegible] (राजवंश)
[illegible] (राजवंश)
२ बघेल
३ मुसलमान
गुप्त घराणें (टीप व राजवंश)
गुप्त घराणें
१ पाटलीपुत्रचे (वंशवृक्ष)
२ माळव्याचे (वंशवृक्ष)
गुलाम घराणें (टीप व राजवंश)
गुहिलोतवंश (मेवाडचे राजे पाहा)
गोवळकोंड्याचें कुत्बशाही घराणें (टीप व राजवंश)
ग्रीक राजांची वंशावळ
बॅक्ट्रियाचा राजवंश
चंदेल्ल घराणें (नन्नुक चंदेल्ल पाहा)
चालुक्यवंश
१ पूर्व वेंगीचे (राजवंश)
२ पश्चिम बदामीचे व कल्याणीचे (वंशवृक्ष)
चैतन्यवंश (उद्धवचिद्घन पाहा)
चोल घराणें
१ प्राचीन
२ मध्ययुगीन
छत्रसाल बुंदेला (वंशवृक्ष)
चित्रावघराणें (शिवरामभट्ट चित्राव पाहा)
जामराजे (सिंधचे)
चौहानवंश (पृथ्वीराज चौहान पाहा)
तीर्थंकर (२४ तीर्थंकरांचीं नांवें व खुणा)
दिल्लीचे बादशाह
१ तुर्कवंश (राजवंश)
२ गुलामवंश ,,
३ खल्जीवंश ,,
४ तुघ्लकवंश ,,
५ सैयदवंश ,,
६ लोदीवंश ,,
७ मोगलवंश ,,
८ सूरवंश ,,
९ मोगलवंश ,,
धडफळे घराणें (टीप व वंशवृक्ष)
नन्नुक चंदेल्ल
चंदेल्ल घराणें (राजवंश)